श्रीमंत बाळाजी बाजीराव

ऊर्फ

नानासाहेब पेशवे

यांचें चरित्र.

हा ग्रंथ

चिंतामण गंगाधर गोगटे

यांनीं लिहिला.

आवृत्ति पहिली.

पुणें येथें 'इंदिरा' छापखान्यांत त्र्यंबक हरि आवटे यांनीं छापिला, व
चिंतामण गंगाधर गोगटे यांनीं घर नंबर ६ शुक्रवार पेठ, पुणें,
येथें प्रसिद्ध केला.

इ० स० १९०८.

किंमत १॥। रुपये.

पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें:

नवीन किताबखाना, बुधवार पेंठ, पुणें.
पांडुरंग बळवंत दीक्षित, शनवार पेठ, पुणें.

प्रस्तावना.

काव्येतिहाससंग्रहकार, रा. राजवाडे, रा. खरे, रा. पारसनीस व. डेक्कन व्हर्न्याक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी यांनीं अत्यंत परिश्रमानें मराठ्यांचे इतिहासाची बरीच माहिती प्रसिद्ध केली आहे, व पुष्कळ माहिती अद्यापि प्रसिद्ध व्हावयाची आहे. अशा परिस्थितींत मराठशाहींतील कोणाही इतिहासप्रसिद्ध पुरुषाचें चरित्र लिहिण्याचा प्रयत्न करणें म्हणजे एक प्रकारचें धाडसच करणें होय. तशांत प्रस्तुत लेखकासारख्या अल्पमति माणसानें बाळाजी बाजीरावासारख्या पेशव्याच्या अत्यंत महत्त्वाच्या कारकीर्दीचें वर्णन करणें म्हणजे तर तृणपर्णांच्या केलेल्या क्षुद्र नावेंत बसून सागरोल्लंघन करण्याइतकेंच वेडेपणाचें होय! परंतु एकदा आरंभिलेलें कार्य—मग तें कसेंही होवो—शेवटास नेलेंच पाहिजे असा मनाचा दृढ निश्चय झाल्यामुळें हा माझा अल्प प्रयत्न मी सुज्ञ वाचकांपुढें ठेवीत आहें, व या माझ्या धाष्टर्याबद्दल ते मला क्षमा करतील अशी आशा आहे.

हें पुस्तक लिहितांना ज्या ज्या ग्रंथकारांच्या कृतींचा उपयोग केला आहे त्यांचा त्यांचा—विशेषतः काव्येतिहाससंग्रहकार व रा. वि. का. राजवाडे यांचा—प्रस्तुत लेखक अत्यंत आभारी आहे.

ग्रंथ छापत असतां अनेक अपरिहार्य कारणांमुळें कांहीं चुका राहून गेल्या त्यांचें शुद्धिपत्र शेवटीं दिलें आहे, त्याप्रमाणें दुरुस्ती करून नंतर ग्रंथांचा उपयोग करावा अशी सविनय प्रार्थना आहे.

ग्रंथकर्ता.

हें चरित्र लिहितांना ज्या ग्रंथांचा आधार घेतला आहे त्यांची यादी.

काव्येतिहाससंग्रहापैकीं—

थोरले शाहूमहाराज यांचें चरित्र.
धाकटे रामराजे यांचें चरित्र.
भाऊसाहेबांची बखर.
भाऊसाहेबांची कैफियत.
रघुनाथ यादवकृत पानपतची बखर.
पेशव्यांची बखर.
पंतप्रधानांची शकावली.
पत्रें व यादी.

रा. राजवाडेकृत—

मराठ्यांचे इतिहासाचीं साधनें खंड १
" " " २
" " " ३
ग्रंथमालेंतील इतर पत्रें.

इतर ग्रंथ—

ऐतिहासिक लेखसंग्रह भाग १.
भारतवर्ष.
न्यायमूर्ति रानडे यांचीं व्याख्यानें.
महादजींचें चरित्र–नातूकृत.
सुभेदार थोरले मल्हारराव होळकर यांचें चरित्र–अत्रेकृत.
विंचूरकर घराण्याचा इतिहास.
ग्रांट डफकृत मराठ्यांचा इतिहास.
एलफिन्स्टनकृत हिंदुस्तानचा इतिहास.
क्यांबेलचीं ग्याझेटियर्स.
पेशव्यांची हस्तलिखित रोजनिशी.
मोडककृत जंत्री वगैरे.

अनुक्रमणिका.

श्रीमंत बाळाजी बाजीराव

ऊर्फ

नानासाहेब पेशवे

यांचें चरित्र.

भाग पहिला.

महाराष्ट्राची पूर्वपीठिका:—महाराष्ट्राचा विश्वसनीय व संगतवार असा प्राचीन इतिहास अद्यापि उपलब्ध नाहीं. पूर्वकाळीं शिलालेख, ताम्रपट, नाणीं वगैरे साधनांवरून कांहीं विद्वान् व शोधक मंडळीनें प्राचीन राजवंशांची थोडीशी हकीकत प्रसिद्ध केली आहे, तिच्यावरून महाराष्ट्राची पूर्वस्थिति कांहीं अंशीं समजते. उत्तरेस तापी व दक्षिणेस तुंगभद्रा या नद्यांचे मधील प्रदेशास महाराष्ट्र देश अशा संज्ञा आहे. अलीकडे विद्वानांनीं असा शोध लाविला आहे कीं, खि० श० पूर्वी या प्रदेशांत " राष्ट्रिक " किंवा " रट्ठे " या नांवाचे लोक रहात असत. ते पुढें प्रबल झाले व त्यांत जे राजे होऊन गेले ते आपणांस " महाराष्ट्रिक " किंवा " महारट्ठे " असें ह्मणवूं लागले, व या त्यांच्या नांवावरून ते ज्या प्रदेशावर राज्य करीत होते त्यास महाराष्ट्र असें नांव मिळालें. " महारट्ठे " या नांवावरून मराठे हें हल्लींचें नांव प्रचारांत आलें आहे. लोनावळ्याजवळ कार्लें येथें जीं कोरींव लेणीं आहेत त्यांत " महाराठा " हा शब्द वापरलेला आहे.

इ० स० पूर्वी ७३–इ० स० २१८ पावेतों शालिवाहन नांवाच्या घराण्यानें महाराष्ट्रावर राज्य केलें. त्या काळीं महाराष्ट्रांत बौद्ध धर्म प्रचलित होता. शालिवाहनांची राजधानी पैठण येथें होती. इ० स० २०० पासून इ० स० ६०० पर्यंत महाराष्ट्रावर कोणीं राज्य केलें तें निश्चयात्मक ठरलेलें नाहीं. तथापि वरील कालांत गुप्त घराण्याचा महाराष्ट्रावर अंमल असावा असें विद्वानांचें मत आहे. इ० स० ६००–७४७ पर्यंत चालुक्यवंशीय राजांनीं या देशावर राज्य केलें. त्यांची राजधानी कलादगी जिल्ह्यांतील बदामी[1] शहर येथें होती. इ० स० ७४८–९७३ पर्यंत राष्ट्रकूट नामक वंशानें या प्रदेशावर राज्य केलें. मराठ्यांचा पहिला अस्सल वंश हाच होय. त्याची राजधानी मान्यखेट ह्मणजे निजामाच्या राज्यांतील हल्लींचें मालखेड येथें होती. ह्या घराण्यांतील राजांनीं विद्येस चांगलें उत्तेजन दिलें. इ० स० ९७३–११८९ पर्यंत चालुक्य वंशानें महाराष्ट्रावर आपला अंमल पुन्हा सुरू केला. चालुक्यांच्या मागून यादव (जाधव) वंशाची सत्ता महाराष्ट्रावर चालू झाली. ह्या वंशांतील रामदेवराव जाधव नांवाचा राजा राज्य करीत असतां अल्लाउद्दीन खिलजी यानें यादवांची राजधानी देवगड ऊर्फ दौलताबाद या शहरावर स्वारी करून रामदेवरावास दिल्लीचे बादशाहाचा अंकित केलें (इ० स० १२९५). रामदेवरावाचे मागें मुसलमानांनीं त्याचे मुलास ठार मारून यादव वंशाची समाप्ति केली (इ० स० १३१८). पुढें इ. स. १३४७ पर्यंत महाराष्ट्रावर दिल्लीच्या बादशाहांचा साक्षात् अंमल होता. त्या वर्षी बहामनी[2] नामक स्वतंत्र

---

१ यास पूर्वी वातापीपूर असें म्हणत असत.

२ बहामनी नांवाचा पूर्वी इराणांत एक प्रख्यात बादशाहा होऊन गेला. बहामनी राज्याचा संस्थापक हसन ऊर्फ जफरखान राजा झाला तेव्हां त्या उच्च घराण्याशीं आपला संबंध जोडण्याकरितां त्यानें बहामनी असें उपनांव घेतलें. बहामनी याचा ब्राह्मणी असा जो अलीकडे अर्थ करितात त्यास मुसलमानी ग्रंथांत कांहीं आधार नाहीं.

मुसलमानी राज्याची स्थापना होऊन महाराष्ट्र देश बहामनी सुलता-नांचे अमलाखालीं गेला. इ० स० १५२६ चे सुमारास या बहामनी राज्याचे पांच[1] तुकडे झाले. त्यांपैकीं आदिलशाही ह्मणजे विजापूर व निजामशाही ह्मणजे अहमदनगर या घराण्यांच्या सत्तेखालीं म-हाराष्ट्र देश गेला. इ० स० १६३७ त मोगल बादशाहा शहाजहान यानें निजामशाहीचा शेवट केल्यामुळें महाराष्ट्राच्या कांहीं भागावर मोगलांचा अंमल सुरू झाला व कांहीं भाग विजापुरचे ताब्यांत राहिला.

मराठ्यांचा उदयः—चवदा, पंधरा, सोळा व सतरावे शत-काचें पूर्वार्ध या कालांत मुसलमानी अमलाखालीं महाराष्ट्र देश फा-रच विपन्नावस्थेस आला होता. मुसलमान लोक हिंदूंस जुल-मानें वागवूं लागले. राज्यकारभारांत वरिष्ठ प्रतीच्या जागा हिंदूंस मिळत नसत. सर्व देश पादाक्रांत केल्यामुळें आपणांस आतां कोणी शत्रु उरला नाहीं व आपण करूं ती पूर्वदिशा असें त्यांस वाटूं लागलें. अशा या वेडगळ व हानिकारक समजुतीमुळें मुसल-मान लोक नेहमीं ऐषआरामांत धुंद राहूं लागले, व त्यामुळें त्यांच्या अंगचें नैसर्गिक वीर्य-तेज हळू हळू मावळत चाललें. परंतु मराठे लोकांची स्थिति अगदीं उलट होती. यादवांचे वेळेपासून महा-राष्ट्रांत मराठ्यांचीं जीं अस्सल घराणीं नांदत होतीं त्यांचा स्वाभि-मान जागृत होता. मोरे, निंबाळकर, शिरके, घाडगे, माने, डफळे, महाडिक, भोंसले वगैरे घराण्यांतील पुरुषांनीं आदिल-शाहींत व निजामशाहींत मोठमोठीं महत्त्वाचीं कामें केलीं होतीं. शिवाय महाराष्ट्राची देशस्थिति त्यांच्या भाग्योदयास फारच अनुकूल होती. मुसलमानांनीं महाराष्ट्र देश जिंकिला तरी तो पूर्णपणें असा त्यांचे ताब्यांत कधींच गेला नाहीं. तेथें ठिकठिकाणीं शूर मराठे

[1] विजापूर, अहमदनगर, गोवळकोंडें, बेदर, व कलबुर्गे.

सरदार फौजबंद असून त्या सर्वांचा एकदम उच्छेद करण्याइतकी मुसलमानी फौज बाहेरून आणणें अशक्य होतें. तेव्हां मराठे लोकांस वश करून घेण्यांतच मुसलमानांचें हित होतें, व ह्याशिवाय महाराष्ट्राची सृष्टरचना, मराठ्यांचा मानी स्वभाव व त्यांची ग्रामसंस्था ह्या गोष्टीही मुसलमानांची महाराष्ट्रावर पूर्णपणें सत्ता न बसण्यास कारणीभूत झाल्या होत्या. अशा कारणांमुळें मराठे हळू हळू मुसलमानी सत्तेचा पाडाव करण्याच्या प्रयत्नास लागले.

महाराष्ट्राचा भाग्योदय होण्यास त्या कालीं दुसरें एक जबरदस्त कारण असें होतें कीं, दोनचारशें वर्षे हिंदुस्तानांत धर्मजागृतीची विलक्षण चळवळ उडून गेली होती. सर्वत्र मुसलमानी अंमल सुरू झाल्यामुळें हिंदु लोकांचे हाल होऊं लागले व हिंदुधर्म बुडत चालला. तेव्हां त्या संकटाचा परिहार करण्याकरितां हिंदु लोकांचें मन वेधलें असतां त्यांस साह्य करणारे असे साधुसंतही त्या कालीं निर्माण झाले, व त्यांनीं धर्मोन्नतीचें काम हातीं घेतलें. धर्मोन्नति ही राष्ट्रोन्नतीची जननी होय असें म्हटलें तरी चालेल. त्या कालीं हिंदु लोक समाजबंधनांनीं फारच जखडून गेल्यामुळें राष्ट्रास उत्तरोत्तर अवनति प्राप्त होत होती. ही अनिष्ट स्थिति नष्ट करण्याचे कामीं त्या कालीं संत मंडळीनें जे कष्ट केले ते ऐतिहासिकदृष्ट्या फारच महत्त्वाचे आहेत. ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास वगैरे मंडळीनें जनसमूहास उपदेश करून आपल्या पवित्र वर्तनानें महाराष्ट्रांत धर्मजागृतीची विलक्षण चळवळ उडवून दिली. ह्या सर्व मंडळींत रामदासाची कामगिरी फारच महत्त्वाची होती. धर्मसंबंधानें लोकांत जी चळवळ उडाली होती, तिचा राष्ट्रकार्याकडे कसा उपयोग करावा ही दिशा हिंदुसमाजास प्रथमतः रामदासानें दाखविली. आपण मुसलमानी अमलाखालीं हीन दशेस आलों आहों, आपल्या

अंगीं जें तेज आहे त्याचा राष्ट्रकार्याकडे युक्तीनें उपयोग केल्यास आपण त्वरित ऊर्जित अवस्थेस येऊं, इत्यादि गोष्टी त्या वेळच्या मराठमंडळाच्या मनांत रामदासानें भरवून दिल्या. त्यानें साधुवृत्तीनें फिरून महाराष्ट्रांत मुसलमानी अमलाची कोठें कशी स्थिति आहे, याची मराठमंडळास चांगली ओळख करून दिली. मुसलमानांचे अंतःकलह, त्यांची अव्यवस्था, हिंदूंचा छळ केल्यामुळें उत्पन्न झालेली चीड, व संतमंडळीनें धर्मोन्नतीचे जोरावर लोकांचे अंगीं उत्पन्न केलेला स्वाभिमान इत्यादि गोष्टींमुळें मराठे मुसलमानी अमलाचा प्रतिकार करून स्वराज्यस्थापनेच्या उद्योगास लागले, व शिवाजीसारखा पराक्रमी पुरुष त्यांस पुढारी मिळतांच त्यांचें तें काम शेवटास गेलें.

भोंसले घराणें—शिवाजीः—ह्या घराण्याची उत्पत्ति चितोडच्या रजपूत वंशापासून असून त्याचा मूळपुरुष लक्ष्मणसिंग हा उदेपूर येथें रहात असे. त्या वंशापैकीं देवराजजी नांवाचा पुरुष प्रथम दक्षिणेंत आला व त्याचे वंशज पुढें सातान्याजवळ हिंगणीबेरडी, देऊळगांव, वगैरे ठिकाणच्या पाटिलक्या करून राहूं लागले. पुढें त्यांनीं दौलताबादेजवळ वेरूळ गांवची पाटिलकी संपादन केली. त्यांच्यापैकीं बाबाजी नांवाच्या पुरुषास मालोजी व विठोजी असे दोन पुत्र होते. मालोजीनें प्रथम लखुजी जाधव शिंदखेडकर याचे पदरीं निजामशाहींत नोकरी धरली. त्यास शहाजी व सरिफजी असे दोन पुत्र होते. शहाजीस लखुजी जाधवाची मुलगी जिजाबाई ही दिली होती. तिच्या पोटीं ता० १० एप्रिल इ० स० १६२७ रोजीं मराठी राज्याचा संस्थापक शिवाजी हा पुणें प्रांतांत शिवनेरी किल्ल्यावर जन्मास आला. शिवाजीचें लहानपणचें शिक्षण जिजाबाई व पुणें प्रांताचा शहाजीचा कारभारी दादोजी कोंडदेव यांच्या देखरेखीखालीं झालें. दादोजीनें जिजाबाई व शिवाजी यांस पुण्यास आणून ठेविलें. शिवाजीस

आईचा फारच लळा होता. तिनें आपल्या पूर्वजांच्या साहसाच्या, शौर्याच्या व वैभवाच्या गोष्टी त्यास सांगून त्याच्या अंगांत धाडसाचीं कृत्यें करण्याचें धैर्य आणून दिलें, व रामायण व महाभारत यांतील कथा सांगून त्यांचें मन सुसंस्कृत केलें. दादोजीनें त्यास दांडपट्टा, कुस्ती, बोथाटी, निशाण मारणें, शिकार करणें वगैरे कलांत प्रवीण केलें व तत्कालीन देशस्थितीची त्यास चांगली माहिती करून दिली. शिवाजी हळूहळू धाडसाचीं व मेहनतीचीं कामें करूं लागला. सह्याद्रीचे लगत्याच्या मावळ प्रांतांतील मावळे हे गरीब पण शूर व इमानी आहेत अशी शिवाजीची खातरी झाल्यामुळें त्यानें त्यांस प्रथमतः शिपाईगिरींत तयार केलें व त्याच लंगोट्यांच्या जोरावर त्यानें मराठी राज्याचा पाया घातला. दादोजी वारल्यावर शिवाजी आपल्या जहागिरीचा स्वतः कारभार पाहूं लागला. त्यानें तोरणा, चाकण, कोंडाणें (सिंहगड), पुरंदर वगैरे किल्ले सर केले, व राजगड वगैरे नवीन किल्ले बांधले; कल्याणच्या सुभेदारास पकडून त्याचा खजिना लुटला; कोंकणांत विजापुरकरांचा सरदार शिद्दी याचा पराभव करून त्याचा रायगड किल्ला व त्याच्या आसपासचा मुलूख घेतला, व रायगडचा पक्का बंदोबस्त करून तेथें गादीची स्थापना केली.

त्यानें विजापूर, गोवळकोंडें हीं राज्यें व मोंगल यांच्यावर स्वाऱ्या करून बराच मुलूख संपादन केला, व त्यांच्या राज्यांत आपले चौथाई व सरदेशमुखी हे हक्क बसविले. इ० स० १६६४ त शहाजी निवर्तल्यावर तो आपणास राजा असें ह्मणवूं लागला व आपण मुसलमानांचे अंकित नसून स्वतंत्र सत्ताधीश आहों असें सर्व लोकांस जाहीर व्हावें ह्मणून इ० स० १६७४ त त्यानें आपणास विधिपूर्वक राज्याभिषेक करून घेतला. हा पराक्रमी पुरुष ता० ५ एप्रिल इ० स० १६८० रोजीं रायगड येथें मरण पावला.

पेशवे पदाची उत्पत्ति:—शिवाजीनें आपल्या राज्याची व्यवस्था खालीं दिलेल्या आठ तत्त्वांवर केली होती:—

१. डोंगरी किल्ले ज्यांचे साह्यानें त्यानें स्वराज्याचा पाया घातला त्यांस त्यानें दिलेलें महत्त्व.

२. एकाच घराण्यांत वंशपरंपरेनें राज्यांतील बडेबडे अधिकार न देणें.

३. लष्करी किंवा मुलकी कामगिरीबद्दल जमीन किंवा जहागीर तोडून देण्याची बंदी.

४. जमीनमहसुलाचें काम जमीनदारांकडून न करतां सरकारी कामदारांकडे देण्याची वहिवाट.

५. मक्त्यानें वसूल घेण्याची बंदी.

६. अष्ट प्रधानांची नेमणूक व त्यांच्यामध्यें राज्यकारभाराची वांटणी.

७. लष्करी खात्यापेक्षां इतर खात्यांस दिलेलें महत्त्व.

८. एकमेकांचा एकमेकांवर दाब रहावा म्हणून ब्राह्मण, परभू व मराठे या तिन्ही जातीकडे राज्यांतील लहानमोठीं कामें सोंपवून केलेली व्यवस्था.

वरील गोष्टींत प्रधानमडळाची नेमणूक ही गोष्ट मुख्य होय. त्यानें राज्यकारभाराचे आठ विभाग करून प्रत्येक विभागावर योग्य अशा कामगारांची नेमणूक केली होती. हें प्रधानमडळ येणेंप्रमाणें:—

फारशी नांव.	मराठी नांव.	कर्तव्य.
१. पेशवा	मुख्य प्रधान	मुख्य दिवाणगिरी.
२. मुज्मूदार	पंत अमात्य	मुलकी हिशेब व वसूल.
३. सुरनीस	पंत सचिव.	राज्याच्या दप्तराचा सांभाळ.

फारशी नांव.	मराठी नांव.	कर्तव्य.
४. वाकनीस	मंत्री	राज्याचा खासगी कारभार पहाणें.
५. डबीर	सुमंत	परराज्यांशीं व्यवहार ठेवणें.
६. सरनोबत	सेनापति	फौज व आरमार यांचा बंदोबस्त ठेवणें.
७.	न्यायाधीश	सर्व गुन्ह्यांची चौकशी करणें.
८.	पंडितराव	धर्मखात्याचें मुख्य काम.

ह्या सर्व मंडळींत पेशवा हा मुख्य प्रधान असून त्याची देखरेख इतर प्रधानांवर असे. त्याची पायरी राजाचे खालची असून त्याची बसण्याची जागा सिंहासनाशेजारीं उजव्या बाजूस पहिली ठरलेली होती. मुलकी आणि लष्करी या दोन्ही खात्यांवर त्याची पूर्ण देखरेख असून राज्याच्या सर्व कारभाराची जबाबदारी त्याच्या शिरावर असे. शिवाजीनें प्रथम शामराव राझेकर नांवाच्या पुरुषास आपला पेशवा नेमिलें. पण त्याचा वाडीकर सांवत व हबशी यांनीं पराभव केल्यामुळें शिवाजीनें त्यास त्या पदावरून दूर करून मोरो त्रिंबक पिंगळे यास आपला पेशवा नेमिलें. हा मोरोपंत शिवाजीच्या राज्याचा मुख्य आधारस्तंभ होता. त्यानें अनेक मोठमोठ्या लढाया मारून उत्तर-कोंकण व बागलाण हे प्रांत मराठी अमलाखालीं आणिले. त्याचेमागें त्याचा पुत्र निळोपंत यास पेशवेपद प्राप्त झालें. तो इ० स० १७०८ त मरण पावला. तेव्हां त्याचे जागीं त्याचा बंधु बहिरोपंत याची नेमणूक झाली.

भट पेशवे यांचा उदयः—जंजिरा संस्थानांत जंजिऱ्याचे दक्षिणेस बारा मैलांवर श्रीवर्धन म्हणून प्रसिद्ध गांव आहे. तेथें पूर्वी विश्वनाथपंत भट या नांवाचा एक सुखवस्तु गृहस्थ रहात असे. त्याचेकडे श्रीवर्धनच्या देशमुखीचें व कुळकर्णाचें काम असे. त्यास कृष्णाजी, रुद्राजी, जानोजी व बाळाजी असे चार पुत्र होते. शेवटचा बाळाजी ऊर्फ नानासाहेब हाच भट कुळांतील पहिला पेशवा होय. त्याचा जन्म इ० स० १६७२ च्या सुमारास झाला असावा. कृष्णाजी व रुद्राजी यांची हकीकत उपलब्ध नाहीं. मिठबंदरचा हवाला व चिपळूणच्या जकातीचें नाकें घेतल्यामुळें बाळाजी चिपळूण येथें रहात असे, व जानोजी श्रीवर्धन येथें राहून आपलें वडिलोपार्जित काम पहात असे. त्या वेळीं कुलाब्याचे आंग्रे व जंजिऱ्याचे शिद्दी यांचे नेहमीं युद्धप्रसंग होत असत; तेव्हां कोणी दुष्ट मनुष्यानें द्वेषबुद्धीनें जानोजी आंतून आंग्र्यास फितूर आहे असें शिद्दीस सांगितलें. शिद्दीनें त्या गोष्टीची फारशी चौकशी न करतां जानोजीस गोणत्यांत बांधून समुद्रांत बुडवून ठार मारिलें. तेव्हां बाळाजीस भीति उत्पन्न होऊन कुजनसेवेपेक्षां देशत्याग बरा असें वाटून त्यानें आपल्या कुटुंबासह श्रीवर्धन सोडून घाटावर येण्याचा निश्चय केला. तो आपलीं मुलेंमाणसें घेऊन श्रीवर्धन येथून निघाला व श्रीवर्धनचे शेजारी वेळास येथें रामाजीपंत व बाळाजीपंत भानू म्हणून दोघे बंधु त्याचे स्नेही होते त्यांचे घरीं आला. बाळाजीनें आपला मनोदय त्यांस सांगितला, तेव्हां तेही शिद्दीच्या भयानें घरादारावर तुळशीपत्र ठेवून बाळाजीबरोबर देशावर येण्याकरितां निघाले. ही सर्व मंडळी प्रथम सासवडचा कुळकर्णी अंबाजीपंत पुरंदरे याचे घरीं येऊन उतरली. पुढें बाळाजी, उभयतां भानू व अंबाजीपंत नोकरी धरण्याचे उद्देशानें साताऱ्यास आले उभयतां भानू शंकराजी नारायण सचिव याचेकडे कारकून राहिले,

व बाळाजीपंत व अंबाजीपंत हे सेनापति धनाजी जाधव याचे पदरीं जमाबंदी खात्यांत कारकून राहिले. बाळाजीची विशेष हुशारी पाहून धनाजीची त्याच्यावर फार मर्जी बसली. त्या वेळीं मराठी राज्याचीं सूत्रें राजारामाची स्त्री ताराबाई हिच्या हातांत असून ती आपला अल्पवयस्क पुत्र शिवाजी याचे नांवानें स्वतः राज्यकारभार पहात होती. मराठी राज्याचा खरा वारस संभाजीचा पुत्र शाहू हा औरंगजेबाचे कैदेंत होता. औरंगजेब मरण पावल्यावर (ता. २० फेब्रुआरी १७०७) त्याचे मुलांत गादीविषयीं तंटे उपस्थित झाले, तेव्हां त्याचा तिसरा पुत्र अजीमशाहा हा दक्षिणेंतून दिल्लीस जात असतां त्यानें झुलपिकारखान नामक सरदाराचे सांगण्यावरून शाहूस सोडून दिलें. असें करण्यांत मराठयांचे आपसांत तंटे लावून देऊन त्यांस मोंगलांचे मुलुखास उपद्रव देण्यास सवड मिळूं देऊं नये, असा अजीमशाहाचा हेतु होता, व तो बराच फलद्रूप झाला. शाहू सुटल्याची बातमी ताराबाईस समजली, तेव्हां त्या महत्त्वाकांक्षी स्त्रीस आपल्या हातचीं राज्यसूत्रें जाणार याचें वैषम्य वाटून तिनें शाहू म्हणून जो पुरुष मराठी राज्यावर हक्क सांगण्याकरतां येत आहे तो तोतया आहे, अशी कंडी पिकविली, व धनाजी जाधव व परशुराम त्रिंबक प्रतिनिधी यांस त्याच्यावर पाठवून दिलें. उभय पक्षांची पुण्याजवळ खेड-कडूस येथें गांठ पडली. त्या वेळीं बाळाजी धनाजीबरोबर होता. त्यानें धनाजीचें मन शाहूचे पक्षाकडे वळविलें. ह्या कामगिरीबद्दल शाहूनें बाळाजीस पुढें पेशवाई देण्याचें वचन दिलें. पुढें उभय पक्षांची लढाई झाली, तींत धनाजी आपले फौजेसह शाहूस मिळाला व प्रतिनिधी पराभव पावून साताऱ्यास पळून गेला. शाहूनें साताराचा किल्ला घेऊन प्रतिनिधीस कैद केलें, तेव्हां ताराबाई आपल्या मंडळीसह पन्हाळ्यास निघून गेली व तिनें कोल्हापूर येथें नवीन गादीची स्थापना केली.

अशा रीतीनें मराठमंडळांत दुफळी होऊन शाहूचा व ताराबाईचा असे दोन पक्ष उत्पन्न झाले. इ० स० १७०८ च्या जानेवारी महिन्यांत शाहूनें आपणास राज्याभिषेक करून घेतला. शाहू राज्याभिषिक्त झाला तरी ताराबाईचा पक्ष फार जोरांत होता. धनाजी जाधव शिवाय करून बाकीचे बहुतेक सरदार ताराबाईस अनुकूल होते. इ० स० १७०८ पासून १७१० पर्यंत शाहूची सत्ता साताऱ्याचे आसपास पांच पंचवीस मैलांवरच होती. पुण्याकडे दमाजी थोरात, भोराकडे शंकराजी नारायण सचिव, फलटणच्या बाजूस शहाजी निंबाळकर, मिरजेकडे उदाजी चव्हाण, उत्तर-कोकणांत कान्होजी आंग्रे, दक्षिण-कोकणांत खेमसांवत याप्रमाणें ताराबाईच्या पक्षाचे लोक साताऱ्याच्या सभोंवार पसरलेले होते. याशिवाय कृष्णेच्या पलीकडील माणदेश कृष्णराव खटावकर हा मोंगलांच्या तर्फेचें मिष करून आटोपून बसलाच होता. तसेंच औंधप्रांत प्रतिनिधीकडे असून शाहूनें परशुराम त्रिंबक यास कैदेंत ठेविल्यामुळें तिकडे शाहूविरुद्ध खटपटी सुरू होत्या. अशा भयंकर स्थितींत इ० स० १७१० त धनाजी जाधव मरण पावला. तेव्हां या गोष्टीमुळें ताराबाईचा पक्ष फारच जोरांत आला, व तितक्याच मानानें शाहूची स्थिति फार भयंकर झाली. धनाजीचा पुत्र चंद्रसेन व बाळाजी यांच्यामध्यें हरणाचे शिकारीवरून कांहीं तंटा उपस्थित होऊन शाहूनें बाळाजीची बाजू घेतल्यामुळें चंद्रसेनास राग येऊन तो ताराबाईकडे निघून गेला व तेथून पुढें त्यानें मोंगलाईत नोकरी धरली. अशा आणीबाणीच्या प्रसंगीं बाळाजीनें आपल्या पदरची दोन हजार फौज व तसलमातीची फौज मिळून शाहूचें सैन्य पुनः उभारून दिलें. या कामगिरीबद्दल शाहूनें बाळाजीस "सेनाकर्ते" असा किताब दिला (२० आगस्ट इ० स० १७११). बाळाजी शाहूकरतां

जरी अश्रांत परिश्रम करीत होता, तरी ताराबाईकडील बड्या बड्या मंडळीपुढें त्याचा कितीसा निभाव लागला असता हें उघड दिसत होतें, व शाहूचा पक्ष बुडाल्यासारखाच झाला होता. पण अशा आणीबाणीच्या प्रसंगीं शाहूस अनुकूल अशी एक गोष्ट घडली. ज्या आपल्या मुलाकरतां ताराबाई इतकी धडपड करीत होती, तो इ० स० १७१२ चे मे महिन्यांत मरण पावला. त्यामुळें कोल्हापुरच्या राज्याचीं सूत्रें ताराबाईची सवत राजसबाई व तिचा पुत्र संभाजी यांचे हातांत गेलीं. अर्थात् ताराबाई निर्माल्यवत् झाली, व पुष्कळ सरदार मंडळीचीं मनें शाहूचे पक्षाकडे परत फिरलीं. इ० स० १७१२ चे अक्टोबर-नोवेंबरचे सुमारास शंकराजी नारायण सचिव यानें जलसमाध घेतली. तेव्हां बाळाजीनें शाहूस सांगून सचिवपदाचीं वस्त्रें त्याचा पुत्र नारो शंकर याचे नांवें पाठवून दिलीं, व अशा रीतीनें सचिवास शाहूचे पक्षाकडे सामील करून घेतलें. मराठ्यांचे आरमाराचा सरदार कान्होजी आंग्रे हा मोठा प्रबळ असून त्याचा ओढा ताराबाईकडे होता. तो कोंकणांतून साताऱ्यावर चाल करून येऊं लागला. तसेंच कृष्णराव खटावकर हाही औंधपर्यंत चाल करून आला. त्या वेळीं शाहूनें बहिरोपंत पेशवे यास आंग्र्यावर व बाळाजीस खटावकरावर पाठवून दिलें. बाळाजीनें खटावकराचा पराभव केला. ह्या लढाईंत परशुराम त्रिंबक याचा पुत्र श्रीपतराव यानें तरवार गाजिवली. पुढें कृष्णराव यास खटाव गांव इनाम करून देऊन त्यास शाहूनें आपलासा केलें. परंतु कोंकणांत आंग्र्यानें बहिरोपंताचा पराभव करून त्यास कैद केलें. तेव्हां शाहूनें बाळाजीस आंग्र्यावर पाठवून दिलें. कान्होजीसारख्या बलिष्ठ सरदाराशीं लढून परिणाम लागणार नाहीं असें पाहून बाळाजीनें त्याच्याशीं सलोखा केला. त्यानें बहुतेक कोंकणपट्टीचा भाग

त्यास देऊन त्यास शाहूचे पक्षास सामील करून घेतलें व बहिरोपंत याची मुक्तता करून तो सातान्यास आला. ह्या असामान्य कामगिरीबद्दल शाहूनें बहिरोपंताकडून पेशवेपद काढून तें बाळाजीस दिलें (१६ नोव्हेंबर १७१३). अशा रीतीनें श्रीवर्धन येथून दैवाची पारख करण्याकरितां घांटावर आलेला एक कुळकर्णी आपल्या अकलेच्या जोरावर आठ दहा वर्षांत मराठी राज्याचा मुख्य प्रधान झाला. ही पेशवाई ह्या घराण्यांत इ० स० १८१८ त तिची अखेरी होईपर्यंत राहिली. आमचा चरित्रनायक या घराण्यांतील तिसरा पुरुष होय. मुख्य चरित्रास आरंभ करण्यापूर्वी चरित्र-नायकाच्या पूर्वजांनीं मराठी राज्याकरितां काय काय कामगिरी केली तें थोडक्यांत सांगणें इष्ट आहे.

बाळाजी विश्वनाथाची कारकीर्द:—(इ० स० १७१३-१७२०) बाळाजीस पेशवाई मिळाली तेव्हां त्याला बरींच कामें करावयाचीं होतीं. आंग्रे व सचिव यांस त्यानें अगोदरच शाहूचे पक्षास अनुकूल करून घेतलें होतें. आंग्रयाशीं केलेल्या तहांत जंजिऱ्याचे हबशाचा कांहीं प्रांत शाहूकडे आला. त्यामुळें आंग्रे व हबशी यांचें युद्ध जुंपलें. तेव्हां बाळाजी आंग्रयाचे मदतीस गेला व हबशाचा मोड करून त्यानें ता० ३० जानेवारी १७१५ रोजीं त्याच्याशीं तह केला. त्यांत तळें, गोरेगांव, निजामपुर व गोवळ इतके महालांत हबशानें शाहूस २५७५ व आंग्रयास १००० मिळून ३५७५ रुपये द्यावे व नागोठणें, अष्टमी, पाली, आश्रेधार पेटा, आंतोणें या प्रांतांत दोघांचेही पहाणीदार फिरून दोघांनींही निमे निमे वसूल वांटून घ्यावा असें ठरलें. पुणें प्रांत मोंगलाचा सरदार बाजी कदम याचे ताब्यांत होता; त्यास वश करून घेऊन तो बाळाजीनें आपलेकडे घेतला व पूर्वी तेथें चोरटे लोकांचा फार उपद्रव होता तो बंद करून कमी धान्यानें जमिनी देऊन तो लागवडीस आणला, व वसुलाचे बाबतींत

फेरफार करून त्याची सुधारणा केली. इ० स० १७१६ त बाळाजी सहकुटुंब स्वारीस निघाला असतां दमाजी थोरातानें त्याच्यावर छापा घालून त्यास त्याच्या कुटुंबासह पुरंदराजवळ जाधवाचे वाडीस कैद केलें व हिंगणगांवचे गढींत नेऊन ठेविलें. थोरात बाळाजीपाशीं जबरदस्त खंडणी मागूं लागला व त्यासंबंधें त्यानें सर्व मंडळीवर मोठा जुलूम चालविला. पुढें आपले दोन पुत्र व स्त्री यांस ओलीस ठेवून बाळाजी अंबाजीपंतासह कैदेंतून सुटला व मागितलेला पैसा भरून त्यानें आपल्या मुलांमाणसांचीही सुटका केली. इ०स०१७१७त मोंगलाचा दक्षिणचा सुभेदार हुसेनअली यानें बाळाजीच्या मार्फत शाहूमहाराजांशीं तह केला. हा तह चालला असतां बाळाजीनें हुसेनअलीच्या मदतीनें हिंगणगांवच्या गढीवर हल्ला करून थोरातास कैद केलें, व ती गढी पाडून टाकून तिच्यावर गाढवांचा नांगर फिरविला. सय्यदांशीं तह केल्यावर इ० स० १७१८ च्या आगस्ट महिन्यांत बाळाजी सातान्याहून निघाला तो ३१ दिसेंबर रोजीं दिल्लीस जाऊन पोहोचला. बादशाही फौजेची व सय्यदांची दिल्ली येथं

१ पे. श. पा. २४. यावेळी बाळाजी, त्याची पत्नी राधाबाई, पुत्र बाजीराव व चिमणाजी आप्पा, आणि अंबाजीपंत पुरंदरे, इतकी मंडळी दमाजीचे हातीं सांपडली होती.

२ दिल्ली येथें फिरुकशिअर बादशाहा राज्य करीत असतां अबदुल्ला व हुसेनअली असे दोन सय्यद बंधु फार प्रबल झाले. अबदुल्ला वजीर असून हुसेनअली सेनापति होता बादशाहाचे मनांत त्या दोघांविषयीं वैषम्य उत्पन्न होऊन तो त्यांचे नाशाविषयीं प्रयत्न करूं लागला. त्यांची ताटातूट व्हावी म्हणून इ. स. १७१६त त्यानें हुसेनअलीस दक्षिणच्या सुभेदारीवर पाठवून दिलें. आपल्या नाशाविषयीं बादशाहाचे प्रयत्न चालले आहेत असें पाहून हुसेनअलीनें बादशाहाविरुद्ध शाहूमहाराजांशीं तह केला व मराठी फौज मदतीस घेऊन बाळाजी अबदुल्लाचे साह्याकरितां दिल्लीस निघून गेला.

चकमक झडून सय्यदांनीं बादशाहास कैद केलें व ठार मारून टाकिलें. पुढें रफी उदरजात व रफी उदौला या दोन शहाजाद्यांस त्यांनीं तक्तनशीन केलें; पण ते सहा महिन्यांतच मरण पावले. नंतर रोषन अखत्यार नांवाच्या शहाजाद्यास महंमदशाहा असें नांव देऊन त्यांनीं गादीवर बसविलें, व राज्याचा सर्व कारभार स्वतः पाहूं लागले. पुढें सय्यदांनीं चौथाई, सरदेशमुखी व स्वराज्य यांच्या सनदा करून बाळाजीपाशीं दिल्या (ता० ३ मार्च इ० स० १७१९). ही मोठी कामगिरी बजावून ता० ४ जुलै १७१९ रोजीं बाळाजी सातान्यास परत आला.

इ० स० १७१९ चा पावसाळा त्यानें वसुलाची व्यवस्था करण्यांत घालविला. बाळाजीनें ह्या वेळीं जी व्यवस्था केली तिच्यामुळें मराठमंडळांत एकाचा जो फायदा तोच दुसऱ्याचा असें झालें व त्यांच्यांत फूट होऊन नेहमीं जी बंडाळी चाले ती बंद होऊन सर्व मराठे सरदारांस आपापले हक्क वाढविण्याकरितां मोठें उत्तेजन आलें. पुढें इ० स० १७१९च्या नोव्हेंबर महिन्यांत तो स्वारीस बाहेर पडला, व इ० स० १७२० च्या जानेवारींत परत आला. नंतर प्रकृतीस आराम नसल्यामुळें तो सासवडास आला व तेथें चैत्र शु० १ शनिवार (ता० २ एप्रिल १७२०) रोजीं त्याचें देहावसान झालें.

बाळाजीची योग्यताः—शाहूमहाराज मोंगलांचे कैदेंतून मुक्त झाले त्या वेळीं मराठमंडळांत शाहूचा व ताराबाईचा असे दोन पक्ष झाले होते, व त्यामुळें मराठी साम्राज्यांत बरीच अव्यवस्था माजली होती. परस्परमत्सर, वैर व संशय यांच्या योगानें मराठ्यांची जूट फुटून त्यांच्यांत यादवी सुरू झाली होती. मोंगलांचा अंमलही बरेच ठिकाणीं शिल्लक राहिला होता. शाहूमहाराज शूर असून शहाणे होते, परंतु वर सांगितलेली अव्यवस्था मोडून आपली छाप बसविण्यास जी व्यव-

स्थापक बुद्धि व असामान्य कल्पनाशक्ति लागते तिचा त्यांचे ठायीं अभाव होता. नुसतें धाडस व सामर्थ्य यांची मराठमंडळांत वाण नव्हती. परंतु राज्यस्थापनेस अत्यावश्यक अशी जी चतुराई, दूरदृष्टि, स्वदेशप्रीति, स्वाभिमान व मुत्सद्दीपणा या गुणांची त्या काळीं फारच जरूरी होती. वर सांगितल्या प्रकारचे गुण बाळाजीच्या अंगीं पूर्ण वास करीत होते, व पेशवेपद प्राप्त झाल्यावर त्यानें राज्याची व्यवस्था लावण्याचें काम हातीं घेतलें. ताराबाईचे पक्षाचे सरदार मंडळीस युक्तिप्रयुक्तीनें शाहूमहाराजांचे पक्षास मिळवून व खटावकर, थोरात, वगैरे पुंड मंडळीचा बंदोबस्त करून त्यानें राज्यांत शांतता आणिली. अशा रीतीनें राज्यांतील लहानसहान बखेडे मोडल्यावर राजा व प्रजा यांच्यांतील परस्परसंबंध दृढ करण्याच्या उद्योगास तो लागला. व्यक्तीचें हित तेंच सर्व लोकांचें हित व सर्व लोकांचें हित तेंच राज्याचें हित, जुटीनें राहिल्यास मराठ्यांसारखे बलिष्ठ कोणी नाहीं, आपसांतील फाटाफूट संघशक्ति कमी करून राष्ट्रनाशास कारणीभूत होते, अशा रीतीनें बुद्धिवाद करून त्यानें सरदार लोक व अष्टप्रधानमंडळ यांचीं मनें स्वदेशसेवेस तयार केलीं व निरनिराळे प्रांतीं त्यांस पृथक् हक्क देऊन त्यांच्या महत्त्वाकांक्षेस प्रोत्साहन दिलें. बाळाजी मात्र अशा प्रकारची सत्ता किंवा अधिकार न घेतां शाहूमहाराजांचा मुख्य मुलकी सल्लागारच राहिला. हा स्वार्थत्याग बाळाजीच्या अंगचा मुख्य गुण होय. राष्ट्राची उन्नति करण्याकरितां सर्व सरदारमंडळीची एकी करण्याचा त्यानें जो यत्न केला त्यांत यश येण्यास त्याच्या अंगचा हा अलौकिक गुणच कारणीभूत झाला. शाहूची नोकरी धरल्यापासून दहा वर्षांचे आंतच राष्ट्रांत एकी उत्पन्न करण्याचें व परस्परांतील फुटीचीं कारणें नाहींतशीं करण्याचें श्रेय बाळाजीनें घेतलें. मोगल सुभेदार व दिल्ली येथील

वजीर पूर्वी मराठे सरदार व शिवाजी यांस जो मान देत[1] असत, तोच ते आतां शाहूमहाराज व त्यांचे सरदार यांस देऊं लागले, व आपसांतील तंटे मिटविण्याकरितां प्रसंगीं शाहूची मदत मागूं लागले. अशा रीतीनें जें मराठमंडळ स्थापन झालें त्याचा जोम इतका वाढला कीं, पुढें शंभर वर्षें हें मराठमंडळ करील ती पूर्वदिशा असें झालें.

बाळाजीनें राज्यव्यवस्थेची जी शिस्त घालून दिली तीच पुढें शंभर वर्षेपर्यंत चालू होती. चौथाई व सरदेशमुखी हे हक्क बादशाही मुलखांत मराठ्यांस आहेत अशी बादशाहाची कबुली घेणें हा बाळाजीचा मुख्य हेतु होता, व तो सफल करून घेण्यांत बाळाजीचे शेवटचे दिवस खर्च झाले. या बादशाही कबुलीनें मराठ्यांचे हक्कांस कायदेशीर स्वरूप आलें. मराठीराज्याचा संस्थापक शिवाजी याच्यानंतर गणना करतांना बाळाजी विश्वनाथ यास दुसरें स्थान द्यावें लागतें.

भाग दुसरा.

बाजीराव बल्लाळ पेशवे:--(इ० स० १७२०-१७४०) बाळाजीचा वडील पुत्र बाजीराव यास ता० १७ एप्रिल इ०स० १७२० रोजीं प्रधानपद प्राप्त झालें. पुढें तो खानदेशांत निजामउल्मुल्काचा प्रतिस्पर्धी अलमअल्लीखान याचे मदतीस गेला. इ० स० १७२० च्या जुलै महिन्यांत निजाम व अलमअल्लीखान यांची बाळापुर येथें लढाई होऊन अलमअल्लीचा पराभव झाला. या लढाईत बाजीराव प्रत्यक्ष लढल्याचा जरी दाखला मिळत नाहीं, तरी त्याचें अलमअल्लीस साह्य होतें. पुढें बाजीराव खानदेशांतून परत आला व महिना दोन महिने सासवडास राहून ता० २५ नोव्हेंबर इ० स० १७२० रोजीं सातान्यास शाहूचे भेटीकरितां गेला.

---

[1] न्यायमूर्ति रानडे यांचीं व्याख्यानें.

येथें शाहूनें त्यास पेशवेपदाचीं वस्त्रें दिलीं. बाजीराव उपेक्षणीय पुरुष नाहीं असें समजून निजामउल्मुल्कानें त्याची सावार्डेया येथें गांठ घेतली (ता० ६ जानेवारी इ० स० १७२१). परंतु या भेटीपासून फारसें निष्पन्न झालें नाहीं. इ० स० १७२१ त भडबुंजा मोंगलाशीं पुरंदर येथें लढाई झाली व करिम बेग याच्याशीं जुन्नर मुक्कामीं लढाई झाली. निजामाच्या या दोघां सरदारांचा पराभव करून ता० २८ आगस्ट इ० स० १७२१ रोजीं बाजीराव शिवापुरावरून सातान्यास आला. नंतर पुणें प्रांतीं कांहीं दिवस राहून पुणें शहर वसविण्याचें काम संभाजी जाधव यास सांगून फेब्रुआरी इ० स० १७२२ त सातान्यास जाऊन एप्रिल महिन्यांत बाजीराव मोंगलाईंत गेला. नंतर मे महि-न्यांत करकुंबेहून सुप्यास येऊन जुलै महिन्यांत स्वारी सातान्यास आली. इ० स० १७२२ च्या सप्टेंबर महिन्यांत निजामाचे सरदार अर्काटाकडे स्वारीस निघणार अशी बातमी आल्यामुळें त्यांना शह देण्याकरतां बाजीराव नोव्हेंबरांत औरंगाबादेस गेला. तेथें मोंगलांचा सरदार ऐवजखान याची भेट घेऊन बाजीराव बऱ्हाणपुरास गेला. इ०स०१७२३ च्या फेब्रुआरींत हांडिया प्रांतात पिंपळोद येथें अनुपासिंग राजाची भेट झाली. नंतर दिल्लीस निजामउल्मुल्क गेला होता त्याची मुक्काम बदकशा प्रांत झाबाब येथें भेट घेऊन स्वारी दक्षिणेंत फिरली. इ० स० १७२३ च्या दिसेंबरांत अंबाजीपंत

---

१ इ०स०१७२१ च्या आगस्टांत बाजीराव विजापुर प्रांतांत होता असें राजवाडे यांनीं शकावलि पान १४ यांत म्हटलें आहे, तें चूक असावें. कारण त्यास आधार शकावलि पान ४५ यांत दिलेल्या तारखा होय. तेथें छं. १२ जिलकाद (२६ आगस्ट १७२१) रोजीं विजापुराहून निघून छ० १४ जिलकाद (२८ आगस्ट १७२१) रोजीं बाजीराव सातान्यास आला असें म्हटलें आहे; परंतु त्या काळची स्थिति लक्ष्यांत घेतां दोन दिवसांत विजापुराहून सातान्यास येणें शक्य नाहीं. विजापुर याचे ठिकाणी शिवापुर असें पाहिजे, व आम्हांस जी रोजनिशी मिळाली आहे तींत शिवापुर असेंच आहे.

पुरंदरे, मल्हारराव होळकर, व राणोजी शिंदे यांनीं माळव्यांत स्वारी केली. बाजीराव मागून त्यांचे मदतीस गेला. बादशाहाकडील सुभा सय्यद बहादरशाहा चालून आला. त्याचा मोड करून बाजीराव उज्जनीस आला व तिकडील राजेरजवाड्यांपासून त्यानें खंडणी गोळा केली. तसेंच खानदेशांत मोकासा हक्क वसूल केला. या स्वारींत मल्हारराव होळकर, राणोजी शिंदे व उदाजी पवार यांनीं फार मर्दुमकी केली होती. तेव्हां त्या तिघांस वीस हजार फौजेनिशीं त्या प्रांतीं ठेविलें. शिंद्यानें उज्जनीकडे, होळकरानें इंदुराकडे व पवारानें माळवेप्रांतीं साधेल तितका अंमल साधावा असें ठरवून बाजीराव दक्षिणेंत परत आला.

इ० स० १७२२ त निजामउल्मुल्क महंमदशाहानें बोलाविल्यावरून वजिरीचे कामावर दिल्लीस गेला. परंतु तेथें बादशाहाचें व त्याचें पटेना. तेव्हां तो शिकारीचे निमित्तानें दिल्लीहून निघून दक्षिणेंत आला. ह्या गोष्टीचें बादशाहा व दरबारी मंडळी यांस वैषम्य वाटून त्यांनीं हैदराबादचा कोतवाल कुंवरजखान यास दक्षिणच्या सहा सुभ्यांची सुभेदारी देऊं करून निजामाचें पारिपत्य करण्यास सांगितलें. कुंवरजखानानें फौजेची तयारी केली तेव्हां निजामानें बाजीरावापाशीं मदत मागितली. पुढें बाजीराव व निजाम यांनीं साखरखेडलें मुक्कामीं कुंवरजखानाचा पराभव केला (ता० २ आक्टोबर इ० स० १७२४). बाजीराव या स्वारीवरून दिसेंबर महिन्यांत साताऱ्यास आला. नंतर ७ जुलै इ० स० १७२५ रोजीं साताऱ्याहून निघून माहुलीस कांहीं दिवस राहून आगस्ट महिन्यांत तो सुप्यास आला, व तेथून सासवडावरून पुण्यास आला. कांहीं दिवस पुणें व सातारा येथें राहून बाजीराव आक्टोबर

१ कसबे पुणें इ० स० १७२५ त शाहूनें बाजीरावास इनाम दिलें—पेशव्यांची रोजनिशी.

महिन्यांत कर्नाटकाचे स्वारीस निघाला. फत्तेसिंग भोंसले याजबरोबर बाजीराव, प्रतिनिधि, दाभाडे, रघूजी भोंसले वगैरे सरदार व पन्नास हजार फौज देऊन शाहूनें त्यास कर्नाटकाचे स्वारीस पाठवून दिलें. सुरापुर, चित्रंदुर्ग, गदग, लखमेश्वर वगैरे संस्थानांतून पूर्वीच्या खंडणी घेऊन व पुढें घेण्याचा ठराव करून व पूर्वीचीं हुजूरचीं ठाणीं सोडवून मराठ्यांनीं त्रिचनापल्ली येथें दादखान नामक सरदाराचा पराभव करून तें संस्थान घेतलें. बाजीराव या स्वारीवरून सर्व मंडळीसह मे इ० स० १७२६ त सातान्यास परत आला.

बाजीराव आगस्टांत श्रीरंगपट्टणचे[1] स्वारीस निघाला तो फेब्रुआरी इ० स० १७२७ त पुण्यास आला. या स्वारींत मानाजी व राणोजी भोंसले यांनीं बेळगांवावर निशाण चढविलें. बाजीराव जून महिन्यांत सासवडास राहून जुलै महिन्यांत सातान्यास आला. मराठे आपले राज्यांत चौथाई घेतात याचें निजामउल्मुल्कास वैषम्य वाटून त्यानें श्रीपतराव प्रतिनिधि याचे विद्यमानें शाहूस कांहीं द्रव्य व इंदापुराजवळ कांहीं मुलूख देण्याचें ठरविलें, व अशा रीतीनें आपल्या राज्यांतून मराठ्यांचें पाऊल काढून टाकण्याचा प्रयत्न चालविला. या कामगिरीबद्दल प्रतिनिधीस निजामानें वऱ्हाडांत कांहीं जहागीर करून दिली होती. निजामाचें हें कारस्थान बाजीरावाचे लक्ष्यांत येऊन त्याला प्रतिनिधीचा मोठा राग आला. त्याने शाहूस त्या कारस्थानाची फोड करून सांगितली, त्यामुळें निजामाचा कावा साधला नाहीं. या गोष्टीमुळें पेशवे व प्रतिनिधि यांच्यांतील वैमनस्य जारत विकोपास गेलें. आपला डाव फसला असें पाहून निजामानें कोल्हापुरच्या संभाजीस हाताशीं धरलें व त्याच्याकडून निजामाकडून शाहूस जी चौथाई मिळत असे, तिच्या चौथाईच्या निमे हिश्शाची मागणी करविली. पुढें

[1] या स्वारीची हकीकत उपलब्ध नाही. राजवाडे यांचे रोजनिशींत ही स्वारी दिली नाहीं. परंतु आम्हांस मिळालेल्या डायरींत हिचा उल्लेख आहे.

शाहूचे लोक चौथाई वसूल करण्याकरितां गेले तेव्हां निजामानें त्यांस वसूल न देतां " तुमचे आपसांत कलह लागले आहेत, दोघांच्याही मागण्या मजकडे आल्या आहेत, तेव्हां तुम्हांपैकीं खरा वारस कोण, याचा निर्णय मी करीपर्यंत दोघांचाही वसूल मी जप्त करून ठेवला आहे," असा निरोप शाहूस सांगून त्यानें शाहूच्या तर्फेच्या मंडळीस घालवून दिलें. निजामाची ही लबाडी बाजीरावाचे लक्ष्यांत येऊन तो त्याचे पारिपत्याकरितां शाहूचे आज्ञेनें निघाला (ता० २७ आगस्ट इ० स० १७२७). मालखेड येथें निजामाचा पूर्ण पराभव करून त्यानें त्यास तह करण्यास भाग पाडलें (२५ फेब्रुआरी इ० स० १७२८). मुंगी परगणे शेवगांव येथें उभयपक्षीं ता० ६ मार्च इ० स० १७२८ रोजीं भेटी होऊन तह झाला. निजामानें संभाजीचा पक्ष सोडून दिला व शाहूस वसूल देण्याचें कबूल केलें.

माळवे प्रांतीं राजा गिरधर म्हणून दिल्लीच्या बादशाहाचा सुभेदार होता त्यास उदाजी पवार व चिमणाजी दामोदर या मराठे सरदारांनीं लढाईंत ठार मारिलें. तेव्हां दायबहादर म्हणून कोणी सुभेदार त्याचे जागेवर आला. इ० स० १७२८त चिमणाजी आप्पा, पिलाजी जाधव व होळकर यांस बरोबर घेऊन माळव्यांत गेला, व उज्जनी येथें उभयपक्षीं लढाई होऊन दायबहादर लढाईंत पडला. नंतर त्याचे जागीं महंमदखान बंगष नामक सरदाराची नेमणूक झाली. त्यानें बुंदेलखंडाचा राजा छत्रसाल याचे मुलखास फार त्रास दिला. तेव्हां त्यानें बाजीरावापाशीं मदत मागितली. तेव्हां बाजीराव स्वतः माळव्यांत गेला व चिमणाजी आप्पास कोंकणच्या बंदोबस्ताकरितां परत पाठवून दिलें. बाजीराव व छत्रसाल यांची भेट धामोरा येथें झाली (ता० १३ मार्च १७२९). ता० ३० मार्च १७२९ रोजीं जेतपूर मुक्कामीं बाजीरावानें बंगष याचा पराभव केला. ह्या

कामगिरीबद्दल छत्रसालानें झांशीनजीक दोन अडीच लाखांचा मुलूख मरणसमयीं आपले राज्याचा तिसरा हिस्सा बाजीरावास दिला. कायमखान बंगष म्हणून एक सरदार बाजीरावावर चाल करून आला त्याचाही बाजीरावानें पराभव केला आणि त्यास पिटाळून लाविलें, व त्याचें सर्व लष्कर लुटलें (ता० ४ मे इ० स० १७२९).

बाजीराव या स्वारीवरून जुलै १७२९त दक्षिणेंत परत आला, व ता० १ आगस्ट रोजीं तो चिमणाजी आप्पा व नानासाहेब यांस बरोबर घेऊन साताऱ्यास गेला. तेथून आक्टोबर महिन्यांत बाजीराव पुण्यास गेला व चिमणाजी आप्पा नानासाहेबांसह नोव्हेंबरचे आरंभीं साताऱ्याहून निघून फलटणावरून उरमुडीस येऊन तेथून दिसेंबर ता० २४ इ० स० १७२९ रोजीं पुण्यास आला. ही मंडळी या वेळीं नानासाहेबाचे लग्नाचें निमंत्रण देण्याकरितां साताऱ्यास गेली असावी. ता० १० जानेवारी इ० स० १७३० रोजीं शनवारचे वाड्याचे जागीं पूर्वी कोष्टी रहात असत त्यांना मंगळवार पेठेंत जागा देऊन तेथें वाडा बांधण्यास प्रारंभ केला. बाजीराव फेब्रुआरी महिन्यांत शाहूमहाराज उमरज येथें होते तेथें त्यांस भेटण्याकरितां गेला, तो सालअखेर होईपर्यंत तेथेंच होता. पुढें चिमणाजी आप्पानें गुजराथेवर स्वारी करून पेटलादची खंडणी घेऊन ढवळकें (धोलकें) शहर लुटलें (मार्च १७३०). गुजराथचा सुभेदार सरबुलंदखान यानें मुलूख हैराण झाल्यामुळें वसूल येत नाहीं तर द्रव्य देऊन रक्षण करावें अशी बादशाहास विनंती केली. परंतु बादशाहानें त्याची दाद घेतली नाहीं, तेव्हां त्या मुलखाचे संरक्षणाकरितां २५०० स्वार ठेवण्याचा करार करून घेऊन सरबुलंदखानानें सुरत खेरीजकरून बाकीच्या गुजराथ प्रांताची चौथाई व सरदेशमुखी पेशव्यास करून दिली. इ० स० १७२९ त पूर्वी गुजराथ व माळवा येथील बाबती

व सरदेशमुखी यांच्याबद्दल दरसाल दोन लाखांचा मक्ता 'शाहूमहाराजांकडून पेशव्यांनीं घेतला होता, तो पन्नास हजारांची सूट घेऊन कायमचा दीड लाख रुपयांस करून घेतला.

इ० स० १७२८ त निजामउल्मुल्कानें बाजीरावाशीं तह केला तो केवळ जुलमाचा रामराम होता. त्याचे मनांत बाजीरावाचा सूड घ्यावयाचा होता. सेनापति खंडेराव दाभाडे इ० स० १७२९ त मरण पावलो[1] व त्याचा पुत्र त्रिंबकराव यास इ० स० १७३० त सेनापतिपद मिळालें. त्याची व बाजीरावाची त्यानें गुजराथेंत हात घातल्यामुळें चुरस लागली होती. तेव्हां निजामानें आंतून बाजीरावाचे नाशाविषयीं त्रिंबकरावाशीं कारस्थान सुरू केलें व त्यास लागेल ती मदत देण्याचें कबूल केलें. तेव्हां त्रिंबकरावानें ३५०० फौज गोळा केली. पिलाजी गायकवाड, त्याचे बंधु महादजी व दमाजीराव, कंठाजी व रघूजी कदम बांडे, उदाजीराव, आनंदराव व मालोजीराव पवार, चिमणाजी दामोदर, जावजी दाभाडे वगैरे मंडळी या वेळीं त्रिंबकरावास मिळाली होती. बाजीराव शाहूमहाराजाचें राज्य घेण्याची खटपट करीत आहे, असें त्यानें लोकांत जाहीर केलें, व तो दक्षिणेंत चाल करून येऊं लागला. बाजीराव दाभाड्याचे पारिपत्याकरितां निघाला (आक्टोबर १७३०). पुढे डभई मुक्कामीं उभयपक्षीं भयंकर युद्ध होऊन त्रिंबकराव व मालोजी पवार लढाईंत पडले (ता० २ मार्च इ० स० १७३१), उदाजी पवार व चिमणाजी दामोदर पाडाव झाले, आनंदराव पवार, पिलाजी गायकवाड व दुसरे कित्येक सरदार जखमी होऊन पळून गेल. अशा रीतीनें या कारस्थानाचा शेवट करून बाजीराव परत आला.

---

१ ग्रांटडफ खंडेराव दाभाडे इ०स० १७२१च्या सुमारास वारला असें लिहितो, परंतु अलीकडे मिळालेल्या माहितीवरून तो इ०स० १७२९त वारला असें सिद्ध होतें. पेशव्यांची शकावलि पान १९.

उदाजी चव्हाण नामक एका पुंड सरदारानें शाहूमहाराजांस मारण्याचा यत्न केला.. तेव्हां त्यांनीं प्रतिनिधीस त्याच्यावर पाठवून दिलें. कोल्हापुरच्या संभाजीनें उदाजीचा पक्ष धरला. प्रतिनिधीनें त्या दोघांचाही पराभव करून त्यांस पन्हाळ्याकडे पिटाळून लाविलें व संभाजीच्या बायकामाणसांस कैद करून तो सातान्यास घेऊन आला. त्यांत ताराबाई व तिची सून राजसबाई ह्या सांपडल्या होत्या. ताराबाईनें सातान्यास राहण्याचा आपला मानस कळविल्यावरून शाहूमहाराजांनीं तिला राजसबाईसह साताऱ्या किल्ल्यावर खर्चाचा नीट बंदोबस्त करून ठेविलें, व बाकीच्या मंडळीस संभाजीकडे परत पाठवून दिलें (इ० स० १७३०). इ० स० १७३१च्या आरंभीं शाहू व संभाजी यांच्या भेटी कऱ्हाडनजीक जखीणवाडी येथें झाल्या, व एप्रिल महिन्यांत उभयतांमध्यें तहनामा होऊन शाहूनें आपसांतील तंटा कायमचा मिटवून टाकला.

इ० स० १७३१च्या दिसेंबरपर्यंत बाजीराव व चिमणाजी आप्पा देशींच होते. इ०स० १७३२च्या दिसेंबर महिन्यांत बाजीराव निजामचे भेटीस गेला व इ०स० १७३३च्या मार्च महिन्यांत परत आला व लगेच कोंकणांत जंजिऱ्याचे स्वारीवर निघून गेला. त्यानें शिद्दीचे मंडणगड, बिरवाडी, मांडल, अष्टमी, आश्रेधार, आंतोणें, नागोठणें, तळें, घोसाळें, निजामपुर वगैरे महाल घेतले, व प्रतिनिधीनें रायगडचा किल्ला घेतला.

जंजिरा घेण्याकरितां खुष्कीवरून मोर्चे लावून बाजीरावानें किल्ल्यावर तोफांचा भडिमार चालविला. पुढें शिद्दी तहास कबूल झाल्यावरून त्याच्याशीं तह करून बाजीराव सातान्यास गेला (दिसेंबर १७३३). इ० स० १७३४ त राजा जयसिंग माळव्याचे सुभेदारीवर आला

होता, त्यानें बादशाहाचे कबुलीनें माळवा प्रांत बाजीरावास दिला, परंतु त्या वेळीं त्याची सनद बाजीरावास मिळाली नाहीं.

इ० स० १७२९ त कान्होजी आंग्रे मरण पावला. त्याला सखोजी व संभाजी असे दोन औरस पुत्र व तुकोजी, येसाजी, व मानाजी असे तीन दासीपुत्र होते. सखोजीस सरखेल पदाचीं वस्त्रें मिळालीं पण तो इ० स० १७३३ त मयत झाला. तेव्हां संभाजीस त्या पदाचीं वस्त्रें मिळालीं. त्यानें तुळाजीस आपलेजवळ ठेवून येसाजीस मुलुखाचा बंदोबस्त सांगितला व मानाजीस (कुलाब्याचे) अलिबागचे किल्ल्याचा व फौजेचा बंदोबस्त सांगितला. पुढें येसाजी व मानाजी यांच्यामध्यें कलह लागून मानाजीनें कपटानें फिरंगी लोकांचे मदतीनें येसाजीस धरून त्याचे डोळे काढले. संभाजी मानाजीचे पारिपत्यास निघाला. तेव्हां मानाजीनें बाजीरावापाशीं मदत मागितली. इ० स० १७३५ च्या फेब्रुवारी महिन्यांत बाजीराव कुलाब्यास गेला, व खांदेरी, कुलाबा वगैरे किल्ले घेऊन त्यानें संभाजीस पिटाळून लाविलें. बाजीरावानें मानाजीशीं तह करून त्याचा कांहीं मुलूख आपले अमलाखालीं घेतला व एप्रिल अखेर तो परत आला.

इ० स०१७३५च्या अखेरीस बाजीराव अजमीर पावेतों जाऊन इ०स०१७३६च्या जून महिन्यांत दक्षिणेंत परत आला.इ०स०१७३६ च्या नोव्हेंबरांत बाजीराव पुनः हिंदुस्तानचे स्वारीस निघाला. त्यानें चौथाई व सरदेशमुखी यांचा पैसा माळव्यांत वसूल केला व आपणास माळवा प्रांत मिळावा व सरबुलंदखानानें देऊं केलेली गुजराथची चौथाई व सरदेशमुखी मिळावी म्हणून जयसिंगाचे मार्फत बादशाहापाशीं मागणी केली. वजीर खानडौरान व बादशाहा ह्या मागण्या देण्यास कबूल झाले. परंतु बादशाहाचे पदरचे तुराणी सरदारांस ती गोष्ट मानवली नाहीं. खानडौरान व निजामउल्मुल्क यांचें आपसांत

वैमनस्य होतें. तेव्हां निजामाची मानहानि करण्याच्या उद्देशानें खानडौरान यानें याकुबखान नांवाच्या आपल्या वकीलाबरोबर चौथाई व सरदेशमुखी यांच्या सनदा देऊन समय पाहून त्या सनदा बाजीरावास द्याव्या असें त्यास सांगितलें. बाजीराव यास ही गोष्ट समजली, तेव्हां त्यानें पूर्वींपेक्षां फारच जबरदस्त मागण्या केल्या. परंतु त्यांपैकीं दक्षिणच्या सहा सुभ्यांच्या सरदेशपांडेपणाची सनद मात्र खानडौरान यानें बादशाहाकडून त्यास देवविली. बाजीराव तेव-ढ्यानें तृप्त झाला नाहीं. तो शिंदे, होळकर यांसह भेलसें प्रांतीं आला (दिसेंबर १७३६). बादशाहानें "मुसलमानी बुडणार यासाठीं तुम्ही त्वरित यावें" असें निजामास लिहिलें. निजाम चौतीस हजार फौज व मोठा तोफखाना घेऊन आला. बाजीरावापाशीं ऐंशी हजार फौज होती. इ० स० १७३७ च्या फेब्रुवारी महिन्यांत आठरें मुक्कामीं लढाई होऊन निजामाचा पराभव झाला. खानडौरान याचे मसलतीवरून माळवा प्रांताचा अधिकार व तेरा लाख रुपये घेण्याचें ठरवून बाजी-राव परत फिरला. या स्वारीस भेलशाची स्वारी असें म्हणतात.

पुढें बाजीराव आंग्रयाचे मदतीस कोंकणांत गेला. पूर्वी फिरंगी लोकांच्या मदतीनें मानाजी आंग्रे यानें कुलाब्याचा किल्ला घेतला होता. परंतु त्या वेळीं देऊं केलेला पैसा मानाजीनें न दिल्यामुळें फि-रंगी कुलाबा घेण्याकरितां आले. मानाजीनें बाजीरावाचे मदतीनें फिरंगी लोकांस हाकलून दिलें. या कामगिरीबद्दल मानाजीनें दरसाल सात हजार रुपये व तीन हजारांचे बिलोरी सामान सरकारांत देत जावें असें ठरलें. बाजीराव जुलै १७३७ त कोंकणांतून परत आला. ह्या वर्षी चिमणाजीआपानें साष्टी प्रांतांतील फिरंगी लोकांचीं बरींच ठाणीं सर केलीं.

इ०स० १७३७ च्या आक्टोबर महिन्यांत बाजीराव हिंदुस्तानचे

स्वारीस निघून सांगवी नजीक कस्वंदवारीनें भोपाळाकडे आला. भोपाळ येथें चांगली जागा पाहून बाजीराव निजामउल्मुल्काची वाट पहात बसला. निजाम सिरोंज येथें होता. दिसेंबर महिन्यांत लढाई सुरू झाली. सुरवातीसच निजामाचे पांचशें रजपूत व सातशें घोडस्वार मारले गेले. नंतर बाजीरावानें निजामाभोंवतीं गराडा घालून त्याची रसद बंद केली. निजाम ती जागा सोडून देऊन जाऊं लागला. परंतु बाजीरावानें त्याचेवर चोहोंकडून हल्ले करून त्यास परत भोपाळचे किल्ल्यांत घातला. परंतु ती जागा लहान असल्यामुळें सर्व फौजेस आश्रय मिळेना. मराठ्यांच्या मारामुळें निजाम घाबरून गेला. नंतर लढाईचें जड सामान भोपाळ व इस्लामगड येथें टाकून मारीन किंवा मरेन अशा निश्चयानें निजाम सिरोंज नजीक दुराई-सराई येथें येऊन पोहोंचला. शेवटीं निरुपाय होऊन निजामानें बाजीरावाशीं तह केला (७ जानेवारी १७३८). त्यांत नर्मदा व चंबळा या नद्यांचे मधील मुलूख व लढाईचे खर्चाबद्दल ५० लाख रुपये बादशाहाकडून देवविण्याचें निजामानें कबूल केलें. ही स्वारी आटोपून जुलै महिन्यांत बाजीराव पुण्यास आला. चिमणाजीआपानें उत्तर-कोंकणांतून पोर्तुगीज लोकांची सत्ता काढून टाकिली.

नागपुरकर भोंसल्यांनीं अलाहाबादपर्यंत स्वाऱ्या करून मुलूख लुटला, व पेशव्यांचा सरदार आवजी कवडे याचा पराभव केला. तेव्हां त्याचा सूड उगविण्याकरितां इ० स० १७३९ च्या मार्चांत बाजीराव खानदेशांतून नागपुराकडे जात असतांना नादिरशाहानें दिल्ली शहर लुटल्याची खबर आली. तेव्हां नादिरशाहाचें पारिपत्य करण्याची बाजीराव तयारी करूं लागला. इतक्यांत तो परत इराणास गेला अशी बातमी आली. इ. स. १७३९ च्या नोव्हेंबर महिन्यांत बाजीराव, व चिमणाजीआपा निजामउल्मुल्काचा पुत्र नासिरजंग

याच्यावर चालून गेले. ह्या स्वारीपासून बाजीरावास फारसा फायदा झाला नाहीं. नासिरजंगाशीं मुंगीपैठण येथें तह केला, आणि बाजीराव औरंगाबादेवरून खानदेशांत गेला व चिमणाजीआपा नानासाहेबांसह कोकणांत मानाजी आंग्रयाचे मदतीस गेला. बाजीराव नर्मदातीरीं आल्यावर त्यास ज्वराची भावना झाली व तो मुक्काम रावेर प्रांत खरगोण रेवातीर येथें अकालीं मरण पावला (ता० २८ एप्रिल १७४०).

बाजीरावाची योग्यता:—बाळाजी विश्वनाथानें सय्यदांशीं तह करून शाहूचा दरारा वाढविला. परंतु कोल्हापुरकरांच्या पक्षाचे चंद्रसेन जाधव, रावरंभा निंबाळकर वगैरे सरदार जास्त प्रबळ होत चालले व त्यांनीं सय्यदांचा शत्रु निजामउल्मुल्क याचा पक्ष स्वीकारला. शाहू, बाजीराव बल्लाळ, खंडेराव दाभाडे, कंठाजी कदम बांडे, कान्होजी भोंसले, चिमणाजी दामोदर, कान्होजी आंग्रे, व सय्यद बंधु असा एक पक्ष झाला; व कोल्हापुरचा संभाजी, चंद्रसेन जाधव, रावरंभा निंबाळकर, उदाजी चव्हाण, निजामउल्मुल्क असा दुसरा पक्ष झाला. या दोन पक्षांची चढाओढ इ० स० १७२०–१७३१ पर्यंत चालली होती. त्यांत शाहूच्या पक्षाकडील बाजीराव व विरुद्ध पक्षाकडील मंडळीचा निजामउल्मुल्क हीं पात्रें प्रमुख होतीं. शाहूच्या पक्षाकडील मंडळीचा हितसंबध एक म्हणजे मराठी राज्याची वृद्धि करणें एवढाच होता. परंतु विरुद्ध पक्षांतील निरनिराळ्या मंडळीचे हेतु भिन्न भिन्न असून केवळ स्वार्थसाधुपणाचे होते. संभाजीला आपला मुलूख व आपले हक्क आपणास अबाधित मिळावे एवढीच आकांक्षा होती. निजामउल्मुल्क यास दक्षिणेंत राज्य स्थापावयाचें होतें, व तें कार्य साधण्यासाठीं त्यानें संभाजीस हातीं धरलें होतें. जाधव व निंबाळकर यांस जहागिरी

होत्या. परंतु त्यांच्या दर्जाप्रमाणें त्यांस जहागिरी देणें संभाजीस अशक्य असल्यामुळें ते निजामउल्मुल्कास जाऊन मिळाले होते. शाहू व बाजीराव यांचे मनांत वर सांगितलेल्या सर्व मंडळीस व सय्यद व प्रत्यक्ष दिल्लीचे बादशाहा यांस नामशेष करून सर्वत्र एकछत्री मराठी राज्याची स्थापना करावयाची होती. शाहू गादीवर आला तेव्हां त्याला आपलें वर्चस्व स्थापन करण्याकरितां सरंजामी जहागिरीची पद्धत स्वीकारावी लागली. परंतु त्याची सत्ता स्थिरस्थावर झाल्यावर इ० स० १७३१ च्या पुढें तो व त्याचे मुख्य मंत्री पेशवे हे ती पद्धत संकुचित करण्याचा प्रयत्न करूं लागले. दिलेल्या जहागिरी परत घेण्याची मुख्य सत्ताधीशाची इच्छा व त्या परत न देण्याविषयींचे सरदार मंडळीचे प्रयत्न या लढ्यांत मराठी साम्राज्याच्या उत्कर्षाचीं व अपकर्षाचीं बीजें सांपडण्यासारखीं आहेत. बाजीरावाची वीस वर्षांची कारकीर्द स्वाऱ्या करण्यांत खर्च झाली. तेवढ्या अवधींत त्यानें जास्त मुलूख संपादन करून चोहोंकडे मराठ्यांचा दरारा वाढविला. मोंगलाच्या सत्तेचा पाडाव होऊन मराठ्यांच्या सत्तेचा फैलाव होऊं लागला, याचें मुख्य श्रेय बाजीराव व त्याचे जिवाचे सरदार शिंदे, होळकर, पवार, वगैरे मंडळीस देणें अवश्य आहे. त्याचा सर्व काळ स्वाऱ्यांत खर्च झाल्यामुळें राज्याची अंतःस्थिति सुधारण्यास त्यास फुरसत मिळाली नाहीं. मराठशाहींत जे पुरुष निर्माण झाले त्यांत बाजीराव प्रमुख होता. तो आपले हाताखालचे लोकांस उत्तेजन देऊन पुढें आणीत असे, त्यामुळें पुष्कळ सरदारमंडळी या कारकीर्दीत उदयास आली. बाजीरावानें निर्माण केलेल्या या नवीन सरदारमंडळापुढें जुन्या सरदारमंडळाचें तेज फिकें पडत चाललें व त्यामुळें हें जुनें मंडळ बाजीरावाचा हेवा करूं लागलें, व मराठ्यांतील दुहीचें बीज याच कारकीर्दींत पेरलें गेलें. विरुद्ध मंडळींत

श्रीपतराव प्रतिनिधि, सेनापति दाभाडे, रघूजी भोंसले, गायकवाड वगैरे मंडळी प्रमुख होती, व ते वेळोवेळीं मराठी साम्राज्याचे प्रगतीस अडथळा आणीत. ही सर्व मंडळी बाजीरावासारख्या शूर पुढाऱ्याच्या हाताखालीं एकजुटीनें काम करती तर मराठी साम्राज्याची इमारत कधींच पुरी होऊन तिला चिरस्थायीपणा आला असता. बाजीराव फार दयाळू होता, व शत्रुमित्र यांना तो सारखीच दया दाखवीत असे. निजामासारखा प्रबल शत्रु ज्याच्यापासून पुढें अनेक प्रसंगीं अनेक अडचणी पेशव्यांस येत गेल्या, तो हातीं सांपडला असतां त्यास त्यानें सोडून दिलें हा राजकीयदृष्ट्या बाजीरावाचे हातून प्रमाद घडला असें म्हणण्यास हरकत नाहीं.


भाग तिसरा.

बाळाजी बाजीराव ऊर्फ नाना साहेब पेशवे—(इ० स० १७४०-१७६१).—बाजीरावाच्या मृत्यूमुळें मराठी राज्यावर घडलेले परिणामः--पहिले बाजीराव पेशवे यास दुष्ट काळानें अकालीं ओढून नेल्यामुळें मराठे लोकांचें किती नुकसान झालें व त्यांच्या राज्याभिवृद्धीस केवढा जबरदस्त धक्का बसला याची कल्पनाही होणें अशक्य आहे. शिवाजीमहाराजांनीं आडदांड, पण इमानी अशा मावळ्यांच्या जोरावर मराठी राज्याचें बीज पेरलें. संभाजी-महाराजांच्या जुलमी कारकीर्दीतील अवर्षणांत तें जागचे जागीं करपून जाण्याचा प्रसंग आला. परंतु सुदैवानें त्या कारकीर्दीचा लवकरच शेवट होऊन पुढें राजाराममहाराजांचे कारकीर्दीत धनाजी जाधव,

संताजी घोरपडे, वगैरे रणशूरांनीं त्या बीजावर शत्रूंच्या रुधिररूपी जलाचें सिंचन केल्यामुळें व प्रल्हाद निराजी, रामचंद्र नीळकंठ, वगैरे स्वामिकार्यदक्ष पुरुषांनीं आपल्या लोकोत्तर बुद्धिमत्तेचा मसाला घातल्यामुळें त्याचा अंकुर मोठ्या जोमानें बाहेर पडला. शाहूमहाराजांचे कारकीर्दीच्या पूर्वार्धात बाळाजी विश्वनाथ व पहिले बाजीराव वगैरे राजनिष्ठ, स्वार्थत्यागी, शूर व कुशल पुरुषांच्या जोपासनेंखालीं तो जोरानें वाढीस लागला. अशा प्रकारें उत्पन्न झालेला हा जोमदार रोपटा शाहूमहाराजांचे कारकीर्दीचे उत्तरार्धांत राव बाजीच्या आकस्मिक व अकालिक मृत्यूमुळें सर्वत्र पसरलेल्या दुःखाग्नींत होरपळून जातो कीं काय, अशी मराठे लोकांस मोठी भीति उत्पन्न झाली होती. परंतु त्याच बाजीच्या पोटीं जो गाजी पैदा होऊन ज्यानें आपल्या अचाट बुद्धिसामर्थ्यानें राजकार्यकर्तृत्वाची व मंत्रीकुशलतेची कमाल करून सोडली, ज्यानें क्षात्रधर्माचा अंगीकार करून स्वभुजभुजगप्रतापानें आपल्या शत्रूस दातीं तृण धरावयास लाविलें, जो स्वतःच्या शहाणपणानें एक वेळ महाराष्ट्रमंडळाचा अग्रेसर होऊन बसला होता, ज्यानें वर निर्दिष्ट केलेल्या होरपळून जाणाऱ्या राज्यरूपी वृक्षांकुरास वारंवार उत्तम व मनमुराद खत घालून त्याला पुनः टवटवी आणिली, व त्याचा मोठा वृक्ष बनवला, ज्याच्या अश्रांत परिश्रमामुळें थोडक्याच अवधींत त्या वृक्षाच्या फांद्या सर्व हिंदुस्तानभर लांब लांब पसरत गेल्या, व त्याच्या शीतल छायेखालीं कांहीं दिवस मराठे लोकांनीं स्वातंत्र्यसुखाचा व हिंदुपद-पादशाहीचा उपभोग घेतला, त्या नरवीराचें चरित्र कोणाला प्रिय होणार नाहीं ? हा श्रेष्ठ पुरुष म्हणजे पहिले बाजीराव पेशवे यांचे ज्येष्ठ चिरंजीव बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशवे हे होत.

जन्म व बाल्यदशा:—नानासाहेबांचा जन्म[1] शके १६४२ मार्गशीर्ष वद्य १२ सह १४ घटी ४१ पळें १२ मुक्काम सातें तर्फ नाणें मावळ येथें झाला, व त्यांचा व्रतबंध शके १६४९ माघ शुद्ध ११ म्हणजे इ० स०

१ जन्मकुंडली—पेशव्यांची शकावलि पृष्ठ ४६. काव्येतिहास संग्रहांत नानासाहेबांचा जन्म लोहगडी झाला असें लिहिलें आहे.



२ पहिले बाजीरावसाहेबांस चार पुत्र होते. ज्येष्ठ पुत्र आमचे चरित्रनायक नानासाहेब हे होत. दुसरे रामचंद्रबाबा यांचा जन्म इ० स० १७२८ च्या एप्रिलच्या सुमारास झाला, व ते इ० स० १७३३ च्या सप्टेंबर महिन्यांत मरण पावले. तिसरे रघुनाथराव ऊर्फ दादासाहेब यांचा जन्म इ० स० १७३३ च्या एप्रिल महिन्यांत झाला. व चवथे जनार्दनपंत यांचा जन्म इ० स० १७३५ च्या जुलै महिन्यांत झाला. काव्येतिहाससंग्रहांत दादासाहेबांचा जन्म शके १६४५ त म्हणजे इ० स० १७२३ त झाला असें दिलें आहे; परंतु तें चुकीचें आहे. कारण इ० स० १७२३ त बाजीरावसाहेबांस पुत्र झाल्याबद्दल मराठ्यांच्या इतिहासाच्या उपलब्ध साधनांत कोठें दाखला सांपडत नाहीं. शिवाय तो सन खरा मानला तर, बाजीरावसाहेबांचे कनिष्ट बंधु चिमणाजीआपा यांचे पुत्र सदाशिवरावभाऊ यांचा जन्म १७३० च्या जुलै महिन्यांत झालेला आहे. तेव्हां दादा भाऊपेक्षां सात वर्षांनीं वडील पाहिजेत. परंतु दादा भाऊपेक्षां लहान होते ही गोष्ट सप्रमाण सिद्ध करतां येते. पेशव्यांच्या कारकीर्दींतील मुख्य मुख्य गोष्टींचें टिपण म्हणून आम्हांस एक हस्तलिखित शकावलि मिळाली आहे, तींत वर नमूद केलेले सन दिले असून शिवाय दादासाहेबांचा व्रतबंध नानासाहेबांनीं ता० ४ फेब्रुवारी इ० स० १७४० रोजीं केला व भाऊसाहे-

१७२८ च्या जानेवारी महिन्यांत झाला. त्यांच्या बाळपणची विद्याभ्यासासंबंधाची व इतर माहिती फारशी उपलब्ध नाहीं. पहिले बाजीरावसाहेब नेहमीं दूरदूरच्या मोहिमांत गुंतलेले असल्यामुळें पुण्याच्या आसपासच्या लढायांचें काम व संसाराचें गाडें त्यांचे कनिष्ठ बंधु चिमणाजीआपा हेच हांकीत असत. तेव्हां नानासाहेबांच्या शिक्षणाचेंही काम आप्पांकडेच होतें. श्रीमंतांच्या किंवा सरदारांच्या मुलांना त्या काळीं कोणत्या प्रकारचें शिक्षण मिळत असे याचा अंदाज मागील पानांत दिलेल्या टीपेवरून सहज करतां येण्यासारखा आहे. वरील टीपेंत दिलेल्या पत्रांत नानासाहेबांनीं दादासाहेबांच्या संबंधानें ज्या शिक्षणाचा उल्लेख केलेला आहे त्याच तऱ्हेचें शिक्षण आप्पांनीं नाना-

यांचा विवाह ता० ६ फेब्रुवारी इ० स० १७४० रोजीं झाला असे सन दिलेले आहेत. म्हणजे दादासाहेबांच्या मुंजीनंतर दोन दिवसांनीं भाऊसाहेबांचा विवाह झाला. तेव्हां दादा भाऊंपेक्षां सात वर्षांनीं वडील असणें ही गोष्ट अगदीं असंभवनीय आहे. त्याचप्रमाणें राजवाडे यांनीं मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें म्हणून जो ग्रंथ प्रसिद्ध केला आहे त्यांत नानासाहेबांनीं उदेपुराहून दादास पाठविलेलें पत्र प्रसिद्ध केलें आहे, त्यांत नानासाहेब दादास लिहितात कीं, "× × × रघुवंश, विदुरनीति, चाणाक्य व जें तुम्हांस येत असेल त्याची नेमपूर्वक चिंतनिका करून थोडें बहुत शास्त्री यांजवळ नित्य म्हणत जाणें, विराटपर्वापासून पुढें भारत रिकामपणीं वाचीत जाणें, नेमेंकरून शंभर दोनशें दंड निरंतर काढीत जाणें, केवळ घोडीं फेरावयाचे छंदास न लागणें, वजनी, केली बेरीज, बरावर्द करावयाचा सराव बहुत करणें. चिरंजीव भाऊंची मर्जी बहुत प्रकारें रक्षण करीत जाणें, ते आज्ञा करतील तेंच काम करणें, बहुतकरून भाऊंबरोबरच जेवीत जाणें, × ×·× भाऊंसमागमें घोडीं फिरवावयास जात जाणें. सातान्यास जाण्याची आज्ञा केली तर चिमणगिरी गंगाधरभटास भाऊंजवळ विनंती करून बरोबर दिलें तर घेऊन जाणें इ०". वरील लेखावरून दादा भाऊंपेक्षां लहान होते हीच गोष्ट सिद्ध होते. त्याचप्रमाणें राजवाडे यांचे ग्रंथांतील खंड १ पत्रनंबर ५४ हें दादासाहेबांनीं भाऊसाहेबांस लिहिलें असून त्यांत ते भाऊसाहेबांस "तीर्थरूप" असें लिहितात. खंड ६ पत्रनंबर १२४ यांत भाऊ दादास "चिरंजीव" असें लिहितात. यावरूनही हीच गोष्ट सिद्ध होते.

साहेबांस दिलें असलें पाहिजे. अर्थात् ज्यांना पुढें राज्यसूत्रें चालवावयाचीं आहेत त्यांना ज्या शिक्षणाची अवश्यकता होती, अशा प्रकारचें सर्व शिक्षण नानासाहेबांस मिळालेलें होतें. मोडी अक्षरावर त्या काळीं विशेष मेहनत घेत असत. कारण उत्तम मोडी अक्षर असणें हें त्या काळीं नोकरी मिळण्याचें मुख्य साधन असे. नानासाहेबांचें मोडी अक्षर फार सुरेख होतें, व त्याची साक्ष त्यांच्या अक्षराचे जे मासले हल्लीं दृष्टीस पडतात ते उत्तम रीतीनें पटवितात. चिमणाजीआपा नानासाहेब लहान असतां त्यांना सातारा, सासवड, सुपें, वगैरे ठिकाणीं आपणाबरोबर शांततेच्या वेळीं घेऊन जात असत, अशाबद्दलचा दाखला मिळतो. परंतु ते त्यांना एकाद्या लढाईवर घेऊन गेल्याचें मात्र दिसून येत नाहीं.

इ० स० १७२९ च्या आगस्ट महिन्यांत आप्पा नानासाहेबांस बरोबर घेऊन सातान्यास शाहूमहाराजांचे दर्शनास गेले होते, त्या वेळीं ते नानासाहेबांच्या विवाहाचें निमंत्रण महाराजांस देण्याकरितां सातान्यास गेले असावे. नानासाहेबांची व महाराजांची ही पहिलीच भेट; या वेळीं त्यांचें वय ९ वर्षांचें होतें. आप्पा सुमारें तीन महिने सातान्यास होते. नंतर ता० २४ आक्टोबरच्या सुमारास त्यांनीं नानांस पुण्यास पाठवून दिलें व स्वतः नोव्हेंबरच्या प्रारंभीं सातान्याहून निघून फलटणावरून ता० २४ दिसेंबर १७२९ रोजीं पुण्यास आले. नंतर माघ शुद्ध ४ शके १६५१ म्हणजे ता० ११ जानेवारी इ० स० १७३० रोजीं नानासाहेबांचें पहिलें लग्न झालें. त्यांना भिकाजी नाईक रास्ते यांची कन्या दिली होती. या बाईचें नांव गोपिकाबाई असें ठेविलें होतें. ह्या लग्नाला ११९८२५ ॥।। खर्च झाला असा मराठी दप्तरांत दाखला सांपडतो. इ० स० १७६० त नानासाहेबांची स्वारी हिंदुस्ता-

नांत निघाली त्या वेळीं त्यांनीं मुक्काम हिरंडपुरी प्रांत आंबेड येथें आपलें दुसरें लग्न केलें (ता. २७ दिसेंबर इ० स० १७६०). या बाईचें नांव राधाबाई असें होतें. ही नारोबा नाईक बाकरे म्हणून कोणी देशस्थ ब्राह्मण होता त्याची कन्या होय. या गोष्टीवरून पेशव्यांचे कारकीर्दीपर्यंत कोकणस्थ व देशस्थ यांचे आपसांत शरीर-संबंध होत असत असें सिद्ध होतें.

पेशवेपद मिळण्यापूर्वी नानासाहेबांनीं केलेल्या मोहिमाः- इ०स० १७३५।३६ च्या सुमारास पुण्यानजीक शिरूर तालुक्यांत तळेगांव येथें ढमढेरे उपनांवाचे कोणी मराठे रहात असत. यांचा पूर्वापार धंदा म्हटला म्हणजे पाळेगारीचा होय. ते ह्या वेळीं पुण्याच्या आसपासच्या मुलखास बराच उपद्रव देऊं लागले होते. तेव्हां बाजीराव साहेबांनीं आपली फौज पाठवून त्यांचें पारिपत्य केलें. ह्या स्वारीबरोबर नानासाहेब असावे असें अनुमान होतें. कारण इ०स० १७३९ सालीं नानासाहेबांची स्वारी प्रथम नसरापुरास जाऊन तेथून सुप्यास गेली व त्या प्रांतीं एक महिनाभर राहून नंतर पुण्यास परत आली असा एक दाखला सांपडतो. परंतु याबद्दल खातरीलायक आधार नाहीं. इतका मात्र आधार सांपडतो कीं, नानासाहेब सुमारें १५ वर्षांचे झाल्यावर चिमणाजीआपा त्यांना नेहमीं आपणाबरोबर सातान्यास शाहूमहाराजांचे भेटीकरतां नेत असत व आप्पा परत आले तथापि नानांचा मुक्काम कांहीं दिवस सातान्यासच असे. बाजीरावसाहेब वारले त्यापूर्वी दोन अडीच वर्षें नानासाहेब बहुतकरून सातान्यासच महाराजांपाशीं असत, त्यामुळें त्यांच्या व महाराजांच्या वारंवार गांठी पडत, व तेव्हांपासून त्यांना नानासाहेबांची हुषारी व कर्तृत्वशक्ति कळून आली होती.

---

१ पंत प्रधानं शकावलि पृष्ठ ८, पत्रें व यादी-पत्र ४५-का. सं.

नानासाहेब ज्याप्रमाणें मोठे शहाणे होते, त्याचप्रमाणें ते शूर-ही होते, ही गोष्ट त्यांच्या चरित्रावरून स्पष्टपणें दिसून येईल. तथापि पेशवाईचा अधिकार प्राप्त होण्यापूर्वी ज्या मोहिमेंत त्यांचें नांव विशिष्ट रीतीनें दिलेलें आहे, अशी एकच मोहीम आहे. ही मोहीम म्हणजे त्यांनीं इ० स० १७३९ त कुलाबा येथें संभाजी आंग्र्यावर जी स्वारी केली ती होय. तिचा वृत्तांत येणेंप्रमाणें:—

आंग्र्यावरील मोहीम:— इ० स० १७३९ त बाजीराव साहेब व निजामउल्मुल्काचा द्वितीय पुत्र[1] नासिरजंग यांच्यामध्यें लढाई उपस्थित झाली, तेव्हां वसईची मोहीम आटोपल्यावर चिमणाजी-आपा आपल्या फौजेसह रायाचे (बाजीरावाचे) मदतीकरतां कोकणांतून निघून आले. ही संधि साधून संभाजी आंग्र्यानें मानाजी आंग्र्यावर स्वारी केली व चौल, अलिबाग, सागरगड, तळें वगैरे किल्ले सर करून त्यानें कुलाब्याच्या किल्ल्यास वेढा दिला. हा किल्ला जंजिरा (पाण्यांत) असल्यामुळे त्यांतील शिबंदीस गोड्या पाण्याचा पुरवठा गांवांतून होत असे. संभाजीनें किल्ल्यांतील शिबंदीस गांवांतून जें गोडें पाणी जात होतें तें बंद केलें. अशा रीतीने संभाजीने मानाजीस अगदीं जेरीस आणिलें, तेव्हां त्यानें शाहूमहाराजांकडे आपणास कुमक करावी म्हणून विनंतीपत्र पाठविलें. तेव्हां त्यांनी वासुदेवराव जोशी, अंताजी नारायण, व विठ्ठल शिवदेव विंचूरकर या तीन सरदारांस बरोबर चार-पांचशें लोक देऊन कोकणांत मानाजीचे मदतीस रवाना केलें, व चिम-

---

१ निजामउल्मुल्क याला एकंदर सहा पुत्र होतेः—१ गाजीउद्दीन, २ नासिरजंग, ३ सलाबतजंग, ४ निजामअली, ५ महम्मदशरीफ, ६ मीरमोंगल. य. पैकी पहिल्या चार पुरुषांचा या चरित्राशीं विशेष संबंध आहे.

पाजीआपा त्या वेळीं अहमदनगर जिल्ह्यांत पारनेर येथें होते तेथें त्यांस मानाजीचें पत्र पाठवून दिलें. आप्पांच्या हातीं तें पत्र पडतांच ते मोठमोठे मुक्काम करीत घोडनदीस आले व तेथून मानाजीस आश्वासनाचें पत्र पाठविलें. दुसरे दिवशीं तेथून वीस कोसांची मजल मारून ते लोहगांवास आले, व तेथून इंग्रज लोकांचें व त्यांचें पहिल्यापासून सख्य असल्यामुळें त्यांनीं मुंबईच्या इंग्लिशांच्या गव्हर्नरास मानाजीस समुद्रांतून मदत करण्याविषयीं व त्याच्या लोकांस गोड्या पाण्याचा पुरवठा करण्याविषयीं पत्र पाठविलें. तसेंच नानासाहेबांस रातोरात पुण्याहून बोलावून आणून सर्व फौज त्यांच्याबरोबर देऊन त्यांस कोंकणांत रवाना केलें व आपण मातुश्रीचे दर्शनाकरितां पुण्यास निघून आले. नानासाहेब लोहगांवाहून निघाले ते पांचव्या दिवशीं कुलाब्यास जाऊन पोहोंचले. त्याच दिवशीं त्यांनीं संभाजीची एक टोळी हिराकोटाचे आश्रयानें होती, तिच्यावर मोठ्या नेटानें हल्ला करून पंचवीस तीस लोक ठार मारले व संभाजीचा सावत्र भाऊ तुळाजी यास कैद करून साताऱ्यास पाठवून दिलें. इंग्लिशांचें आरमार नानासाहेब पोहोंचण्यापूर्वीच येऊन पोहोंचलें होतें. त्यांनीं संभाजीच्या आरमारावर हल्ला करून त्याला सुवर्णदुर्गाकडे पिटाळून लाविलें, व संभाजीच्या सैन्याचा समुद्रकांठीं जो तळ पडला होता त्याच्यावर तोफांचा मारा करून त्याचा तळ तेथून हालविला. . नानासाहेबांनीं संभाजीच्या सैन्याचा सागरगड येथें पुनः पराभव केला. आप्पा तीन दिवस पुण्यास राहून पुढें नानांचे मदतीस कोंकणांत गेले. आपणास सुरक्षित

---

१ नासिरजंग व बाजीरावसाहेब यांच्यामध्यें मुंगीपैठण येथें तह होऊन बाजीरावसाहेब तेथून उत्तर-हिंदुस्तानांत जाण्याकरितां खानदेशांत आले व आप्पा पुण्यास येण्याकरितां परत फिरले होते (इ० स० १७४०).

जाऊं द्यावें म्हणून संभाजी इंग्लिशाची विनंती करूं लागला. परंतु त्यांनीं त्याचें बोलणें ऐकिलें नाहीं. संभाजी इतक्या पेंचांत सांपडला होता तथापि पेशवे व इंग्रज ह्या दोघांनाही झुकांडी देऊन तो सुवर्णदुर्ग येथें सुखरूप जाऊन पोहोंचला. परंतु तो तेथें कसा गेला याचा मात्र मराठी दप्तरांत कांहींच दाखला सांपडत नाहीं. नानासाहेबांनीं स्वतः मारलेली अशी ही पहिलीच लढाई होय. ह्या वेळीं त्यांचें वय १९ वर्षांचें होतें. संभाजी आंग्र्याबरोबर चाललेल्या त्या लढाईचा अशा रीतीनें शेवट झाल्यावर ते चुलतेपुतणे हबशीचा व पोर्तुगीज लोकांचा समाचार घेण्याचा विचार करूं लागले. मानाजीनें ह्या वेळीं पेशव्यांस पाली व भिरगड हे दोन किल्ले दिले.

पितृवियोगः—पहिले बाजीरावसाहेब यांस नेहमीं लढाईचे प्रसंग येत गेल्यामुळें त्यांना अतिशय फौज ठेवावी लागत असे व त्यामुळें त्यांना मनस्वी कर्ज झालें होतें. त्या कर्जाची फेड लवकर न झाल्यामुळें सावकार लोकांचे तगादे सुरू झाले व त्यामुळें त्यांचा जीव अगदीं त्रासून गेला होता. त्या वेळीं त्यांनी आपले गुरु धावडशीचे स्वामी यांस एक पत्र लिहिलेलें आहे, त्यांत ते असें म्हणतात कीं, "मला आतां मरण येईल तर मी ईश्वराचा फार आभारी होईन." या गोष्टीवरून त्या वेळीं त्यांचें मन किती उदास व निरुत्साह झालें होतें, याची कल्पना सहज लक्षांत येईल. इ० स० १७३९ त नासिरजंगाशीं मोहीम सुरू केली त्या. वेळीं आपणांस ह्या लढाईपासून बराच लाभ होईल असें त्यांस वाटलें होतें, परंतु त्या बाबतींत त्यांच्या मनाप्रमाणें कांहींच घडून आलें नाहीं. शेवटीं उत्तर-हिंदुस्तानांत

१ पत्रें व यादी— का. सं. पत्र ५८.

एक जंगी मोहीम करून अतोनात संपत्ति आणावी व आपणावरचा पेंच दूर करावा असा त्यांनीं निश्चय केला व नासिरजंगाशीं मुंगी-पैठण येथें तह करून तेथून तडक उत्तर-हिंदुस्तानचा रस्ता धरला. ते नर्मदेपर्यंत येऊन पोहोंचले, परंतु त्यांचे सर्व मोठमोठे मानासिक व्यूह नर्मदेच्या कांठीं ढासळून पडावे असा ईश्वरी संकेत होता. ते रेवातीरीं मुक्काम रावेर येथें आल्यावर त्यांना ज्वराची भावना झाली व तें दुखणें विकोपास जात जात शेवटीं ता. २८ एप्रिल इ० स० १७४० रोजीं प्रातःकाळीं अकरा वाजतां त्यांचें प्राणोत्क्रमण झालें. त्या वेळीं त्यांचें वय पंचेचाळीस वर्षांचें होतें.

या जबरदस्त अपघातामुळें संपूर्ण महाराष्ट्र देश अगदीं हादरून गेला. शाहूमहाराजांस आज आपला उजवा हात तुटून गेला असें वाटूं लागलें. शिंदेहोळकरांसारखे रणसिंह अगदीं गाय होऊन धाय मोकलून रडत बसले. पेशव्यांचे घराण्यावर दुःखाचे पर्वत कोसळले व मराठ्यांच्या राज्यरूपी इमारतीचा हा आधार—स्तंभ पडल्यामुळें ती जमीनदोस्त होते कीं काय अशी भीति उत्पन्न झाली. चिमणाजीआपा व नानासाहेब या वेळीं कोंकणांत कुलाबा येथें होते. एके दिवशीं हे चुलते-पुतणे रेवदंडा घेण्याची मसलत करीत बसले असतां ही अस्मानची कुऱ्हाड एकाएकीं त्यांचे मस्तकावर येऊन पडली, व तिच्या तडाक्यानें ते दोघेही कांहीं वेळ आपलें देहभान विसरून गेले. आप्पांस ह्या बंधुवियोगदुःखाचा जो धक्का बसला त्यांतून त्यांनीं आपली मान वर कधींच काढली नाहीं व पुढें थोडक्याच महिन्यांत त्या दुःखातिशयांतच त्यांचा अंत झाला. असो.

आप्पांस हें वर्तमान ता० ५ मे इ० स० १७४० रोजीं कळलें. नंतर कुलाबा येथें रायाचें उत्तर कार्य करून, व शंकराजी नारायण

सचिव यास कोंकणची सुभेदारी व खंडेराव माणकर यास फौजेचा अधिकार देऊन ते नानासाहेबांस बरोबर घेऊन ता० १२ मे रोजीं कुलाब्याहून निघाले व लहान लहान मुकाम करीत ता० २५ मे रोजीं पुण्यास येऊन पोहोंचले. दुसरे दिवशीं रायाचें मासश्राद्ध झालें. ता० २८ मे रोजीं देशमुख व देशपांडे यांनीं नानांस दुखवट्याचें वस्त्र म्हणून खसखशी शेला दिला. ता० ४ जून रोजीं पेशवे-पदाचीं वस्त्रें आणण्याकरितां प्रस्थान ठेवून आप्पा व नाना, वासुदेव जोशी संगमेश्वरकर याचे घरीं जाऊन राहिले. ता० ९ जून रोजीं नाना व आप्पा स्वार घेऊन गारपिरावरून सातान्यास जाण्याकरितां निघाले. शाहूमहाराजांनीं रावबा मत्री व जीवबा चिटणीस ह्याचा धाकटा भाऊ त्यांस त्यांना नेण्याकरतां पुण्यास पाठवून दिलें होतें.

भाग चवथा.

पेशवेपदप्राप्तिः—चिमणाजीआपा नानासाहेबांस सातान्यास घेऊन गेल्यावर नानांस लगेच पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं नाहींत. पूर्वी इ० स० १७२० त बाजीरावसाहेब यांस पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं तेव्हां त्यांना ज्याप्रमाणें श्रीपतराव प्रतिनिधि हा प्रतिस्पर्धी उत्पन्न झाला होता, त्याचप्रमाणें नानासाहेबांसही ह्या वेळीं एक प्रतिस्पर्धी उत्पन्न झाला होता. त्याचें नांव बाबूजी नाईक जोशी बारामतीकर. हा त्या वेळचा एक बडा सावकार असून शिवाय त्याचा भाऊ आबाजी नाईक यास नानासाहेबांची आत्या भिऊबाई ही दिली होती. त्याचप्रमाणें तो बाजीरावसाहेबांचा मुख्य धनको होता. तो म्हणजे विशेष शहाणा होता असें नाहीं, परंतु सेनासाहेब सुभे

रघूजी भोसले यानें त्याला पेशवेपदाची आशा दाखवून हातीं धरलें होतें. बाजीराव व रघूजी यांचें पूर्वीपासून वैमनस्य होतें. तसेंच सातारचे दरबारीं असलेलें ब्राह्मणांचें वर्चस्व त्याला सहन होत नसे. तो मोठा महत्त्वाकांक्षी होता. शाहूमहाराजांस पुत्रसंतति नसल्या-मुळें, तसेंच त्याचा व शाहूमहाराजांचा नातेसंबंध असल्यामुळें व फत्तेसिंग भोसले यास महाराजांनीं जरी आपला पुत्र असें म्हटलें होतें, तरी तो राज्यपदास अयोग्य आहे अशी महाराजांची खातरी झा-ल्यामुळें ते कदाचित् आपणास दत्तक घेतील असें त्यास वाटत होतें, व त्यासंबंधानें त्याची खटपटही सुरू होती. परंतु महाराजांचे मनांत अशा प्रकारचा विचार कधींच आलेला नव्हता.

परंतु महाराजांच्या जवळची मंडळी बाजीरावसाहेबांच्याच प-क्षाची असल्यामुळें त्यांच्या मध्यस्थीशिवाय रघोजीला कांहीं करतां येत नसे. रघूजीची रग बाजीरावसाहेबांस तेव्हांच जिरवितां आली असती. परंतु “ पोट आणि अवयव ” याप्रमाणें आपली स्थिति आहे हें तत्व ते पूर्णपणें ओळखून होते. तेव्हां एके प्रसंगीं त्यांनीं रघू-जीची गांठ घेऊन मराठ्यांची सत्ता चोहोंकडे प्रसृत करणें हा जो आपला मुख्य हेतु तो त्यास नीट समजावून सांगितला, व कर्नाट-कावर स्वारी केली तर तिकडे आपणांस अतिशय संपत्ति मिळेल अशी त्यास लालूच दाखवून त्या प्रांतावर स्वारी करण्याकरितां त्यानें त्याचें मन वळविलें, व अशा रीतीनें मोठ्या शहाणपणानें रघूजी नर्मदेच्या उत्तरेकडील पेशव्यांचे हक्कांस जो त्रास देऊं लागला होता तोही बंद केला. कर्नाटकावर स्वारी करण्याकरितां बाजीरावसाहे-बांनीं रघूजीस आपली व महाराजांची अशा दोन्ही फौजा देण्याचें कबूल केलें होतें व त्याप्रमाणें रघूजीनें इ० स० १७३८।३९त

१ शाहूमहाराजांनीं त्याला आपली मेहुणी दिली होती.

कर्नाटकावर स्वारी केली. त्या वेळीं त्यानें बाबूजी नाईकास आपणाबरोबर घेतलें होतें व बाजीरावाच्या मागें महाराजांकडून "पेशवाईपदतुमच्या नांवानें करून देऊं" असेंही पण त्यानें त्यास आश्वासन दिलें होतें. बाजीरावसाहेब वारले त्या वेळीं रघूजी आपल्या फौजेसह शिवगंगेचे कांठीं होता व कर्नाटकचा नबाब चंदासाहेब यास बेसावध पाहून त्रिचनापल्लीवर हल्ला करण्याचा त्याचा विचार होता.

बाजीराव जिवंत होता तोपर्यंत रघूजी स्वस्थ बसला होता. परंतु त्याच्या मृत्यूचें वर्तमान त्याला कळतांच त्याची महत्त्वाकांक्षा पुनः भराऱ्या मारूं लागली. साताऱ्च्या दरबारीं खेळखंडोबा करण्यास ही संधि बरी आहे असें वाटून त्रिचनापल्ली घेण्याचा बेत रहित करून तो बाबूजी नाईक यास बरोबर घेऊन एकदम साताऱ्यास निघून आला, व महाराजांनी नानासाहेबांस पेशवाई न देतां ती बाबूजी नाईक यास द्यावी अशाविषयीं मोठ्या जोरानें खटपट करूं लागला. वास्तविक पाहतां बाबूजी नाईक यास पेशवाई मिळवून द्यावयाची हा रघूजीचा फक्त बाह्यात्कारीं बहाणा होता. परंतु अंतर्यामीं त्याचा हेतु फार खोल होता. बाबूजी नाईक याचा वकूब किती होता हें रघूजी पूर्णपणें ओळखून होता. तेव्हां त्याला फक्त नामधारी पेशवा बनवून त्याचीं सर्व सूत्रें आपल्या हातीं ठेवावीं, असें रघूजीच्या मनांत होतें. त्यानें शाहूमहाराजांपाशीं बारामतीकर याच्या गुणांची प्रशंसा केली, तसेंच आपण त्यास पेशवाई दिली तर त्याबद्दल तो आपणाला पुष्कळ द्रव्य देईल असेंही सांगितलें. परंतु ह्या शिफारशीचा कांहीं उपयोग झाला नाहीं; शिवाय दरबारीं ह्या कामीं रघूजीला मुळींच सहाय्य नव्हतें. श्रीपतराव प्रतिनिधि व नानासाहेब यांचें वैमनस्य होतें ही गोष्ट खरी, तथापि बारामतीकर यास पेशवाई मिळाली तर त्याचा परिणाम पुढें काय होईल हें तो जाणून होता,

व येवढ्याच कारणामुळें तो रघूजीस पाठबळ देण्यास तयार नव्हता. त्याचप्रमाणें दमाजी गाईकवाड व रघूजी यांचें जरी सख्य होतें तरी तो या गोष्टीस कबूल नव्हता. शिवाय एवढ्या मोठ्या जबाबदारीच्या कामास बाबूजी नाईक अगदीं नालायक मनुष्य आहे असें शाहू-महाराजांसही वाटत होतें. या एकंदर कारणांमुळें रघूजीच्या पक्षाचा अगदीं मोड झाला. इतक्या अवधींत चिमणाजीआपाही स्वस्थ बसले नव्हते. त्यांनींही रघूजीचा बेत हाणून पाडून पेशवाईचीं वस्त्रें नानासाहेबांचे नांवानें करून घेण्याविषयीं मोठ्या नेटानें प्रयत्न चालविला होता. या कामीं चिमणाजीआपास महादाजीपंत पुरंदरे व गोविंदराव चिटणीस यांनीं फार मदत केली; व मुख्यतः या दोघांच्या खटपटीमुळें त्या वेळीं नानासाहेबांस पेशवाई मिळाली असें म्हटलें तरी चालेल. इ० स० १७३८–१७३९ या सालीं नानासाहेब बरेच दिवस सातार्‍यास महाराजांच्याजवळ असल्यामुळें त्यांची लायकी महाराजांचे लक्षांत आली होती. पेशवाईचें काम चालविण्यास नानासाहेबांशिवाय दुसरा कोणीही पुरुष लायक नाहीं अशी त्यांची पूर्वीच खातरी झाली होती. त्यामुळें शेवटीं नानासाहेबांसच पेशवाईचीं वस्त्रें द्यावयाचीं असें त्यांनीं ठरविलें. शाहूमहाराजांच्या दूरदर्शीपणाचें हें उत्कृष्ट उदाहरण आहे. रघूजीच्या म्हणण्याप्रमाणें महाराजांनीं बाबूजी नाईक यास पेशवाई दिली असती तर त्यामुळें मराठशाहींत बराच घोंटाळा माजला असता; चिमणाजीआपा, नानासाहेब यांच्यासारख्या मानी वीरांनीं हा अपमान कधींच सहन करून घेतला नसता. मराठ्यांचे आपसांतील तंटे त्याच वेळीं विकोपास जाऊन सातारा व कोल्हापुर या दोन भागांत भयंकर रणकंदन माजलें असतें व कदाचित् सातारच्या गादीसही धक्का पोहोंचला असता व अशा रीतीनें मराठ्यांचे राज्याचे प्रगतीस जबरदस्त धक्का आला

असतां. असो. ता० २९ जून इ० स० १७४० रोजीं शाहू-महाराजांनीं नानासाहेबांस पेशवाईचीं वस्त्रें दिलीं त्यांचा तपशील:—

श्री० बाळाजी बाजीराव यांस दिलेलीं वस्त्रें	रा० चिमणाजी आप्पांस दिलेलीं वस्त्रें	महादजीपंत पुरंदरे यांस दिलेलीं वस्त्रें.
१ चिरा बादली	१ चिरा बादली.	१ बादली चिरा
२ बादली जामेदार	२ बादली जामेदार	२ पासोडी पैठणी.
३ बादली चादर	२ बादली चादर	
४ पटका	४ पटका	
५ तरवार	९ मोत्यांचा तुरा	
६ कटार	नौबत त्याच वेळेस	
७ मोत्यांचा तुरा	सुरू झाली व तोफांची सरबत्ती झाली.	
८ हत्ती.		

ज्या वेळेस शाहूमहाराजांनीं नानासाहेबांस पेशवाईचा अधिकार दिला त्या वेळीं त्यांनीं एक बडा दरबार भरविला, व खालीं लिहिल्या-प्रमाणें त्यांस उपदेश केला.

“बाजीराव यांनीं थोरले बाळाजीपंत यांचे मागें मोठमोठीं कार्ये करून दाखविलीं. शेवटीं इराणीचें (नादिरशहाचें) पारिपत्य करून पादशाही स्थापावी म्हणून रवाना केले. तेथें आयुष्य थोडें झालें. इराणींनीं पादशाही दौलत लुटून नेली. ते अटकेपार जाऊन इराणी बादशहाचें पारिपत्य करून दौलत माघारी आणावी असा मनोदय; उमेद धरली असतां ईश्वराचे इच्छेनें असें घडून आलें. त्यास त्यांचे पुत्र तुम्ही. त्याप्रमाणें पराक्रम करून सेवा करण्यास योग्य आहां. बाजीराव यांचा हेतु राहिला, व आमचा संकल्प दिल्लीची पादशाही कमजोर झाली, ती इराणी आले त्याजपासून रक्षून निम्में हिंदुस्तान घ्यावें असें लिहिलें. ते पादशाही रक्षोन

हिंदुस्तान सर्व आपलें करावें असा बेत केला. तुम्हीं सिद्दीस त्याचा अटकेपार घोडे चालवावे." अशा रीतीनें नानासाहेबांस इ० स० १७४० च्या जून महिन्यांत पेशवाईचा अधिकार प्राप्त झाला. नंतर कांहीं दिवस तेथें राहून ता० १४ आगस्ट इ० स० १७४० रोजीं आप्पा नानासाहेबांसह पुण्यास आले. रघूजी हताश होऊन बाबूजी नाईक यास बरोबर घेऊन त्यांच्या पूर्वींच कर्नाटकांत निघून गेला होता. त्याच्याबरोबर त्या वेळीं श्रीपतराव प्रतिनिधि व फत्तेसिंग भोसले हेही कर्नाटकच्या मोहिमेवर निघून गेले.

नानासाहेब अधिकारारूढ झाले त्या वेळची देशस्थितिः—

दिल्लीः—ह्या वेळी दिल्ली येथें महंमदशहाबादशहा तख्त-नशीन होता. मोंगलांचें साम्राज्य अगोदरच मोडकळीस आलें होतें. तशांत इ० स१७३८ त इराणचा बादशहा नादिरशहा यानें जी स्वारी केली तिनें त्याचा चुराडाच करून टाकिला होता. नादिरशहा इराणांत परत गेला त्या वेळीं त्यानें सिंधुनदीच्या पलीकडील काबूल, ठठ्ठा, व मुलतान हे प्रांत जिंकून आपले राज्यांत सामील केले होते, त्यामुळें मोंगलांची अफगाणिस्तानांतील सत्ता समूळ नष्ट झाली होती. राज्यकर्त्यांचे अंगीं अवश्य लागणाऱ्या गुणांचा बादशहाचें ठायीं पूर्ण अभाव होता. बादशहा व दरबारी लोक यांची एकमेकांविषयीं मनें शुद्ध नव्हतीं. तो मोठा भेकड होता. तसेंच तो व्यसनी असल्यामुळें त्याचें तेज दिवसेंदिवस कमी होत चाललें होतें. जे रजपूत राजे पूर्वी दिल्लीचे बादशहाचे अंकित म्हणून होते त्यांपैकीं जोधपुर, उदेपुर व जयपुर हीं तीन घराणीं खेरीज करून बाकीचे बहुतेक राजे आपापल्या मुलखाचा कारभार बहुतेक स्वतंत्र रीतीनें पाहूं लागले होते. वर सांगितलेल्या तीन राज्यांपैकीं जोधपुर व उदेपुर यांची मराठ्यांनीं [illegible]

ळावलीच होती. फक्त जयपुरचा राजा सवाई जयसिंग व पेशवे यांचा-पूर्वापार ऋणानुबंध असल्यामुळें तेवढें राज्य मात्र जीव धरून होतें. सारांश, दिल्लीच्या बादशाहास या वेळीं अगदीं नातवानीची स्थिति आली होती.

पंजाब प्रांतः—शीख लोक—इ०स० १७१३ त फिरुकशिअर बादशहाचे कारकीर्दीत मोंगलानीं शीख लोकांची भयंकर कत्तल केली होती. तेव्हांपासून सुमारें २९ वर्षे त्यांनीं आपलें डोकें वर केलें नाहीं. परंतु नादिरशहाचे स्वारीनंतर दिल्लीच्या बादशाहीस जेव्हां मोडकळा आली तेव्हां त्यांनीं पुनः हातीं शस्त्र धरलें, ते मोंगलांचे मुलखास हळू हळू उपद्रव देऊं लागले व स्वराज्यस्थापनेचे विचार त्यांचे मनांत घोळू लागले. तसेंच मोंगलांच्या लाहोरच्या सुभेदारास न जुमानतां ते कांहीं कांहीं प्रांताचा स्वतंत्र रीतीनें वसूलही गोळा करूं लागले होते.

जाट लोकः—हे लोक शूद्र जातीचे असून पूर्वी सिंधुनदीच्या कांठीं रहात असत. औरंगजेबबादशहाचे कारकीर्दीच्या अखेरीस त्या लोकांनीं आग्रा व जयपुर यांचे मधील प्रांतांत वसाहत केली. त्या वेळीं चूडामण जाट या नांवाचा त्यांचा एक सरदार फार प्रसिद्धीस आला. औरंगजेबाचे मृत्यूनंतर जी बलबलपुरी माजली त्या संधींत त्यानें मोंगलांचा मुलूख लुटून अतोनात पैसा मिळवला. त्या पैशानें त्यानें त्याचें राहण्याचें शहर भरतपुर यास एक भक्कम तट बांधला. हा तट इतिहासांत फार प्रसिद्ध आहे. प्रथमतः मराठे व जाट लोक हे एकमेकांपासून फार अंतरावर रहात असत. परंतु मराठे जसजसे चंबळा नदीच्या उत्तरेस जाऊं लागले; तसतसा त्यांचा व जाट लोकांचा जास्त परिचय होत गेला, व ते मराठ्यांशीं कोणतीही फिसाद न करतां त्यांच्याशीं मोठ्या स्नेहभावानें वागूं लागले.

अशा रीतीनें मराठ्यांच्या कैचींतून सुटल्यामुळें ते दिवसेंदिवस बळा-वत चालले होते व ह्या वेळेच्या सुमारास बरेच सत्ताधारी झाले होते.

रोहिलखंड:—रोहिले—दिल्लीच्या दक्षिणेस शंभर मैलांवर गंगा-नदीच्या पूर्वेस अयोध्या प्रांताला लागून तहत हिमालयाच्या पाय-थ्यापर्यंत जो प्रांत आहे त्याला रोहिलखंड असें म्हणतात. प्रथमतः बाबर ह्याचे कारकीर्दींत (इ०स०१५२६–१५३०) रोहिले या नांवाचे सुनी पंथी कांहीं मुसलमान लोक ह्या प्रांतांत येऊन राहिले व त्यांच्यावरूनच त्या प्रांताला रोहिलखंड हें नांव प्राप्त झालें. हे लोक मोठे शूर व कडवे होते. त्यांच्यांत अल्लीमहंमद या नांवाचा पुरुष या वेळेस मोठ्या योग्यतेस चढला होता. हा प्रथमतः मुरादाबाद येथील मोंगलांच्या दुय्यम सुभेदाराच्या हाताखालीं अफगाण लोकांच्या घोडे-स्वारांच्या एका लहानशा टोळीचा नायक होता. या सरदारानें रोहि-लखंडाचा सारा जास्त वाढवून तो प्रांत मक्त्यानें आपल्या ताब्यांत घेतला. पुढें कांहीं बाबतीवरून तो व दिल्लीच्या बादशहाचा वजीर कमरुद्दीनखान यांच्यांमध्यें लढा उत्पन्न झाल्यावरून त्यानें बंडाचें निशाण उभारलें व कमरुद्दीनखान ह्यानें त्याचा बंदोबस्त करण्या-करितां म्हणून ज्या सरदारास त्याच्यावर पाठविलें होतें त्यास ठार मारून तो सर्व रोहिलखंडाचा स्वतंत्र रीतीनें अधिकार चालवूं लागला. प्रसिद्ध नजीबखान रोहिला, ज्यानें पुढं मराठ्यांमध्यें आप-सांत कलह लावून दिले व जो अखेर त्यांच्या समूळ नाशास कारणीभूत झाला, तो याच कुळांतला होता. त्याचा वृत्तांत पुढें येईलच.

बंगाल प्रांत—याच वेळेच्या सुमारास अलीवर्दीखान (इ०स० १७३६ ते. १७५६) हा बंगाल, बहार, ओढया या प्रांतांची सुभेदारी बळकावून बसला. हा अलीवर्दीखान बंगालचा पूर्वीचा नबाब सुजाखान (इ० स० १७२५ ते १७३९) याच्या पदरीं

एक लहान सरदार होता. सुजाखान हा स्वभावानें फार आळशी होता व त्याचा व्यवहार फार ढिला होता. कांहीं दिवस त्यानें आपला कारभार मोठ्या जोरानें व शहाणपणानें चालविला. परंतु पुढें त्यानें आपल्या अधिकाराचीं सर्व सूत्रें अलीवर्दीखान, त्याचा भाऊ हाजीमहंमद व अलमचंद आणि जगत्शेट असे दोन श्रीमान व्यापारी होते त्यांच्या हातीं देऊन आपण ऐषआरामांत लोळूं लागला. अलीवर्दीखानानें प्रथमतः त्या प्रांतांतील डोईजड राजेरजवाडे व पाटणा आणि मोंगीर यांचे दरम्यान चकवार म्हणून एका जातीचे शूर हिंदु लोक रहात असत त्यांचा फडशा पाडला. नंतर त्यानें आपला धनी सुजाखान याच्याविरुद्ध दिल्लीच्या दरबारीं कारस्थान सुरू केलें व दरबारी मंडळीस मोठमोठे लांच देऊन बहार प्रांतावर आपली स्वतंत्र रीतीनें नेमणूक करून घेतली. सुजाखान यास त्याचा मोठा राग येऊन तो अलीवर्दीखानाचा नाश करण्याचा उद्योग करूं लागला. परंतु याच संधीस तो स्वतः मरण पावला (इ० स० १७३९). त्याच्यामागें त्याचा पुत्र सरफराजखान हा बंगालचा सुभेदार झाला. तो मोठा लहरी व उन्मत्त असल्यामुळें त्याचेच लोक त्याच्यावर उठले व त्यांनीं अलीवर्दीखान यास बंगालची सुभेदारी देऊं करून त्याला आपल्या मदतीस बोलाविलें. अलीवर्दीखान आपल्या फौजेसह मुर्शिदाबादेवर चाल करून आला. नंतर उभयपक्षांची मोठी लढाई होऊन तींत सरफराजखान मारला गेला. अशा रीतीनें बंगालची सुभेदारी बळकावल्यावर अलीवर्दीखान त्या प्रांताचा बहुतेक स्वतंत्र रीतीनेंच कारभार पाहूं लागला. त्यानें सुजाउद्दीनाचा जांवई मुर्शिदकुलीखान हा ओढया प्रांताच्या सुभेदारीवर होता त्यास तेथून घालवून दिलें तेव्हां त्याचा दिवाण मीरहबीब म्हणून कोणी पुरुष होता तो प्रथमतः पळून गेला. परंतु

मागाहून तो अलीवर्दीखानाच्या पदरीं येऊन राहिला. मीर हबीब व अलीवर्दीखान यांचा या चरित्राशीं बराच संबंध आहे.

दक्षिण हैदराबाद किंवा **निजामाचें राज्यः**—या वेळीं निजामउल्मुल्क हा आपल्या राज्याचा स्वतंत्र रीतीनें कारभार पाहूं लागला होता. तो अद्वितीय पुरुष होता. मराठयांना ज्याचा खरा दरारा होता, व दिल्लीची बादशाही मराठयांचे तडाक्यांतून ह्या वेळेपर्यंत ज्याच्या पराक्रमामुळें बचावली होती तो हाच पुरुष.अशा पुरुषाची थोडीशी पूर्वपीठिका देणें जरूर आहे.इ०स० १६८३त औरंगजेबबादशाहानें दक्षिणेवर जी जंगी मोहीम केली, त्या वेळीं त्याच्याबरोबर शहाबुद्दीनखान नांवाचा एक दुराणी सरदार होता.त्याचा पुत्र हा निजामउल्मुल्क होय.त्याचें मूळचें नांव कमरुद्दीनखान असें होतें. पुढें त्यानें मोठमोठे पराक्रम केल्यामुळें औरंगजेबानें त्याला चिंकिलीजखान असा किताब दिला. औरंगजेब त्याला नेहमीं आपल्याजवळ ठेवीत असे, त्यामुळें त्याच्या तालमींत तो पूर्णपणें कसला गेला होता. फिरुकशिअरचे कारकीर्दींत (इ०स० १७१३ ते इ०स० १७१९) त्याला निजामउल्मुल्क अथवा असोफजा असा किताब मिळाला. तो पुष्कळ दिवस वजिरीचें काम पहात होता; परंतु दिल्लीच्या दुर्बल बादशाहांच्या दरबारांत जेव्हां फारच हलकटपणा शिरला, तेव्हां त्याच्या मनांत दक्षिणेंत हैदराबाद येथें स्वतंत्र गादी स्थापण्याचा विचार आला. पुढें दिल्ली येथें सय्यद बंधूंचें प्रस्थ माजलें तेव्हां ते त्याचा द्वेष करूं लागले. त्यामुळें तो दक्षिणेंत निघून आला. सय्यदांच्या मनांत निजामउल्मुल्कास आपल्या मार्गांतून काढून टाकावयाचें होतें. म्हणून तो दक्षिणेंत येतांच त्यांनीं त्याचा नाश करण्याकरितां अलमअल्लीखान व दिलावरखान अशा दोन सरदारांस त्याच्यावर पाठवून दिलें. परंतु त्या बहाद्दरानें बऱ्हाणपुर व बाळापुर या दोन ठिकाणीं त्यांचा पराभव करून त्यांना कैद केलें, व त्यांचीं शिरें कापून तीं दिल्लीस "बंडखोरांचीं शिरें" म्हणून

बादशाहाकडे पाठवून दिलीं [इ०स० १७२०]. पुढें सय्यदबंधूंचा अवतार संपल्यावर महंमदशाहाबादशाहा तख्तनशीन झाला, तेव्हां त्यानें त्याला पुनः आपली वजिरी दिली, व तो पुनः वजिरीचें काम पाहूं लागला. नादिरशाहाचे स्वारीचे वेळीं तो दिल्ली येथेंच होता. नादिरशाहा निघून गेल्यावर बादशाहानें त्यास अमीर-उल-उमराव असा नवीन किताब दिला. नंतर कांहीं वेळ तो दिल्ली येथें होता. पुढें त्याचा दुसरा पुत्र नासिरजंग यानें हैदराबाद येथें त्याच्याविरुद्ध बंड केलें. तेव्हां तें मोडण्याकरितां तो दक्षिणेंत येण्याकरितां निघाला. त्या वेळीं त्यानें त्याचा ज्येष्ठ पुत्र गाजीउद्दीन हा दिल्ली येथें होता, त्याला बादशाहाकडून अमीर-उल-उमराव हा किताब देववून दरबारीं ठेविलें. पहिले बाजीराव यांनीं त्याला अनेक प्रसंगीं बरेंच जेरीस आणलें होतें. तथापि मराठ्यांस या वेळीं निजामउल्मुल्क हा एक जबरदस्त प्रतिस्पर्धी होता.

कर्नाटक:— हा प्रांत पूर्वी दक्षिणच्या सहा[१] सुभ्यांखालीं मोडत असे. परंतु या वेळीं तेथें बरींच स्वतंत्र संस्थानें उत्पन्न झालीं होतीं. औरंगजेबबादशाहाचे कारकीर्दींत त्यानें झुलपिकारखान यास कांहीं दिवस त्या प्रांताचा सुभेदार नेमिलें होतें. झुलपिकारखानाच्यामागें दाउदखान पन्नी याची त्या प्रांतावर नेमणूक झाली. पुढें त्याची बदली गुजराथच्या सुभ्यावर झाली. तेव्हां सफतरअल्ली या नांवाचा सरदार कर्नाटकच्या सुभ्याचें काम पाहूं लागला. त्यानें इ० स० १७१० पासून १७३१पर्यंत कर्नाटकचा सुभा फार उत्तम रीतीनें चालविला. तो मृत्यु पावल्यावर त्याचा पुतण्या दोस्तअल्लीखान हा त्या सुभ्याचें काम पाहूं लागला. इ० स० १७३८।१७३९ त रघूजीनें कर्नाटकावर जी स्वारी केली, तींत दामुलचेरी येथें जी लढाई झाली

१ औरंगाबाद, बेदर, विजापुर, हैदराबाद, वऱ्हाड, खानदेश.

तींत दोस्तअल्ली मारला गेला. नंतर त्याचा पुत्र सफतरअल्ली यानें मराठ्यांस पुष्कळ पैसा देऊन त्यांच्याशीं सख्य केलें (इ० स० १७४०). परंतु दोस्तअल्लीचा जांवई चंदासाहेब हा त्या वेळीं त्रिचनापल्ली येथें असून त्याच्या मनांत कर्नाटकची सुभेदारी बळकवावी असें होतें, व त्याला जेरीस आणण्याकरतां रघूजी त्रिचनापल्लीस वेढा देऊन बसला होता. कर्नाटकांतून मोंगलांची सत्ता बहुतेक नष्ट झाली होती, व स्वराज्य व जहागीर शिवायकरून जो वसूल येईल तो निजामउल्मुल्क व मराठे हे आपसांत वांटून घेत असत. कर्नूल कडपा, सावनूर येथील नबाब हे विजापुर व गोवळकोंडें येथील बादशाही वंशांपैकीं असून ते आपला कारभार स्वतंत्र रीतीनें पहात असत. तंजावर येथें शिवाजीमहाराजांचा बंधु व्यंकोजी याचा पुत्र सयाजी हा गादीवर होता. परंतु तो मद्रास येथील इंग्लिश लोकांच्या तंत्रानें वागूं लागला ही गोष्ट त्याचा एक मुसलमान दिवाण होता त्यास न आवडून त्यानें त्याला ठार मारलें व त्याचा सावत्र भाऊ प्रतापसिंग यास गादीवर बसविलें. पुढें तो दिवाण प्रतापसिंगासही मोठ्या जरबेनें वागवूं लागला. तेव्हां त्या राजपुत्रास ही गोष्ट सहन न होऊन त्यानें त्या दिवाणास ठार मारलें व आपण स्वतंत्र झाला.

इंग्लिश व फ्रेंचः—इंग्लिश व फ्रेंच या लोकांच्या वसाहती मद्रास व कारोमांडेल या किनाऱ्यांवर मोठ्या जोरानें फैलावत चालल्या होत्या. पुढें राज्यप्राप्तीची इच्छा उत्पन्न होऊन ते दोघेही हिंदुस्तानच्या राजकारणांत शिरले. तथापि इ० स० १७४० पर्यंत ते आपला व्यापारच धरून होते. त्या वेळीं बंगालप्रांतात इंग्लिशांस फ्रेंचांपेक्षां ज्यास्त हक्क प्राप्त झाले होते. त्याचें कारण असें होतें कीं, इ० स० १७१८ त ईस्ट इंडिया कंपनीनें बंगालच्या नबाबा-

विरुद्ध कांहीं गाऱ्हाणीं सांगण्याकरितां आपला एक वकील फिरुक शिअरबादशहाचें दरबारीं पाठविला. त्या वेळीं त्याच्याबरोबर डॉक्टर हॅमिल्टन नांवाचा एक वैद्य दिल्ली येथें गेला होता. इंग्लिशांचा वकील दिल्लीस गेला त्या वेळीं बादशाहा चाळपुळीचे दुखण्यानें फार बेजार झाला होता. हिंदु वैद्य व मुसलमान हकीम यांनीं आपली शिकस्त केली. परंतु बादशाहास गुण पडेना. शेवटीं डॉक्टर हॅमिल्टन यानें तें दुखणें बरें केलें. या गोष्टीमुळें बादशाहा मोठा खुष झाला, व त्याला बादशाहानें तुला काय पाहिजे म्हणून विचारलें. त्या वेळीं डॉक्टर हॅमिल्टन यानें स्वतः करितां कांहीं एक न मागतां आपल्या राष्ट्राकरितां खालीं दिलेले चार हक्क बादशाहापासून मागून घेतले. ते येणेंप्रमाणें:—

१ बंगाल्यांत बादशाहानें कंपनीस ३८ शहरें द्यावीं; २ ज्या व्यापाऱ्यांजवळ बंगालच्या प्रेसिडेंटाचा परवाना असेल त्यांच्या मालावर जकात घेऊं नये; ३ कंपनीस स्वतःचें नाणें पाडण्याचा हक्क असावा; व ४ ज्या लोकांकडे कंपनीचें येणें असेल त्यांस कंपनीचे स्वाधीन करावें. बादशाहानें वरील हक्कांची सनद डॉक्टर हॅमिल्टन यास दिल्यामुळें बंगाल्यांत इंग्लिशांस विशेष हक्क प्राप्त झाले होते, व ह्याच हक्कांच्या जोरावर त्यांनीं पुढें बंगालच्या राज्यप्रकरणांत हात घातला. परंतु ह्या एकंदर प्रकरणांत ध्यानांत धरण्यासारखी गोष्ट म्हटली म्हणजे डॉक्टर हॅमिल्टन याची स्वार्थ-त्याग-परायणता ही होय. ज्या देशांत अशीं माणसें निपजतील तो देश ऊर्जित दशेस आलाच पाहिजे. इ० स० १७३९ त मुंबईच्या इंग्लिश लोकांनीं चिमणाजीआपाचे मार्फत पहिले बाजीराव यांच्याशीं मराठ्यांचे राज्यांत व्यापारासंबंधानें आपणास जास्त सवलती मिळाव्या म्हणून बोलणें लाविलें, व त्या दोघांमध्यें त्याच वर्षी वसई येथें तह झाला

होता. त्यामुळें इंग्लिशांस मराठ्यांपासून मुळींच उपद्रव होत नसे. फ्रेंच लोक हे जोरांतच होते, परंतु इंग्लिशांइतक्या सवलती त्यांना मिळालेल्या नव्हत्या. पोर्तुगीज लोकांचीं हाडें चिमणाजीआपानें बहुतेक खिळखिळीं करून टाकिलीं होतीं. उत्तरेस दमण व दाक्षिणेस गोंवें यांच्या दरम्यानचा त्यांचा अम्मल मराठ्यांनीं समूळ काढून टाकिला होता.

वर सांगितल्याप्रमाणें मोंगलांच्या राज्याची अवाढव्य इमारत आंतून अगदीं पोंखरून जाऊन जमीनदोस्त होण्याच्या बेतांत आली होती. मोंगलांच्या सत्तेचा जसा जसा ऱ्हास होत गेला तसतशी मराठ्यांची सत्ता आस्ते आस्ते वृद्धिंगत होत गेली. मराठ्यांचे आपसांत तंटे नसते तर नानासाहेबांच्या कारकीर्दींत ती फारच लौकर सर्व हिंदुस्तानभर फैलावली असती; परंतु त्यांची अर्धी अधिक कारकीर्द आपसांतील तंटेबखेडे मिटविण्यांतच खर्च झाली ही मोठी दुःखाची गोष्ट होय.

कर्जाचा तगादा:—बाजीरावसाहेबांचा मुख्य धनको बाबूजी नाईक हा होता, हें मागें सांगितलेंच आहे; व या कर्जावरूनच त्या दोघांत वैमनस्य उत्पन्न झालें होतें. अगोदरच मनांत असलेलें वितुष्ट व त्यांत पेशवाई न मिळाल्यामुळें उत्पन्न झालेल्या रागाची भर; मग काय विचारतां? कर्तृत्वशक्तीचा जोर नाहीं तर नाहीं, पण पैशाचा जोर तर कोठें गेला नव्हता. तेव्हां नानासाहेबांची अप्रतिष्ठा करण्यास ही संधि बरी आहे, असें मनांत आणून बाबूजी नाईक यानें त्यांच्यावर बाजीरावसाहेबांच्या सर्व कर्जाची एकदम मागणी केली. नानासाहेबांपाशीं त्या वेळेस द्रव्य नसल्यामुळें त्यांना मोठा पेंच येऊन पडला. परंतु ह्या आणीबाणीच्या प्रसंगीं पेशव्यांचा दिवाण

महादाजीपंत पुरंदरे ह्यानें पेशव्यांच्या सर्व कर्जाची हमी घेतली व अशा रीतीनें नानासाहेबांवरचा प्रसंग टाळला. पुरंदऱ्यांचे हे उपकार नानासाहेब शेवटपर्यंत विसरले नाहींत. महादाजीपंतासारखीं स्वार्थत्यागी व एकनिष्ठ माणसें फारच थोडीं सांपडतील. खाल्लुचा घराचे वांसे मोजणारींच माणसें फार!

माळव्याच्या सनदेची मागणीः— बाजीरावसाहेब मृत्यु पावल्यावर माळव्यावरचा त्यांचा हक्क उडवून देऊन दिल्लीच्या बादशाहानें अजिम उल्लाखान नामक सरदारास त्या प्रांताचा सुभेदार नेमलें. परंतु नानासाहेबांस पेशवाईचा अधिकार प्राप्त होतांच त्यांनीं पूर्वीं बादशाहानें बाजीरावास माळव्यासंबंधानें जे हक्क देऊं केले होते त्यांची मागणी केली व त्यासंबंधानें आपल्या व चिमणाजीआपाच्या सहीचा एक अर्ज दरबारीं पाठवून दिला. त्याचप्रमाणें बादशाहानें पूर्वीं जो पैसा देऊं केला होता त्याचीही मागणी त्यांनीं त्याच वेळीं केली. हा अर्ज त्यांनीं निजामउल्मुल्क व जयसिंग यांच्या मार्फत पाठवून दिला. पैशाच्या टंचाईमुळें नानासाहेबांस या वेळीं जेवढी रक्कम रोकड मिळेल तेवढी पाहिजे होती. नानासाहेबांनीं बादशाहाकडे जो अर्ज केला तो येणेंप्रमाणेंः—

१ बादशाहाचे हुजुरांत आम्हांस पदवी प्राप्त होऊन आमची इभ्रत वाढावी असा आमचा अर्ज आहे.

२ आम्ही लिहून देतों कीं, माळवा सोडून दुसऱ्या प्रांतावर आम्ही स्वारी करणार नाहीं व लुटालूट करून देशाची नासाडी करणार नाहीं.

३ कोणीही मराठा सरदार नर्मदेच्या पलीकडे उत्तर-हिंदुस्थानां-

च्या मुख्यांत जाणार नाहीं. त्याची जबाबदारी आम्ही आमचे माथ्यावर घेतों.

४ कोणी तरी लायकीचा मराठा सरदार पांचशें घोडेस्वारांनिशीं बादशाहाचे हुजूर नेहमीं नोकरींत राहील.

५ या सालीं जो ऐवज बादशाहांनीं आम्हांस इनाम दिला आहे तो आम्ही ग्रहण करतों. परंतु पुढें आम्ही बादशाही दरबारांतून एक छदामही मागणार नाहीं. बादशाहाचें दरबार पृथ्वीच्या मध्य आहे. आम्ही आपले कामांत बादशाहाचे सेवेस हमेष तत्पर राहूं.

६ जेव्हां जेव्हां सरकारचें गाजी सैन्य बाहेर निघेल, तेव्हां तेव्हां त्या लष्करावरोबर चार हजार स्वारांची एक टोळी आम्ही पाठवूं. परंतु जर जास्त लोकांची गरज असेल तर त्यांचा खर्च मात्र हुजुरांतून मिळावा.

७ चंबळा नदीच्या पलीकडील जमीनदारांपासून ठरलेल्या पेशकशा खेरीज एक छदामही आम्ही अधिक घेणार नाहीं.

८ चंबळा नदीच्या पलीकडील मुलखांत कोणा एकाद्या लहानसहान जमीनदाराचें शासन करण्यास हुजूर फर्मावतील तर आम्ही चार हजार स्वार तिकडे पाठवूं व हें कार्य शेवटास नेण्यास हरप्रयत्न योजूं.

९ किल्लेदार लोकांच्या जहागिरी व कानगो (कारकून वगैरे) व मुफ्ति लोकांचे हक्क व इनाम जमिनी, व नेमणुका व धर्मादाय वगैरे हुजूरच्या देणग्यांमध्यें आम्ही व्यत्यय आणणार नाहीं. ज्यांना ज्यांना त्या दिल्या आहेत त्यांनीं त्यांनीं त्यांचा उपभोग घेऊन बादशाहाची हमेश बढती व्हावी ह्या हेतूनें दुवा देत असावें म्हणून त्या आम्ही चालवूं. या अर्जाकडे या वेळीं बादशाहानें विशेष लक्ष दिलें नाहीं.

पैशाच्या संबंधानें मात्र बादशाहानें नानासाहेबांस पंधरा लक्ष रुपये दिले. काय पाहिजे तें झालें तरी माळव्याची सनद बादशाहाकडून घ्यावयाची असा नानासाहेबांचा निश्चय झाला होता. हातघाईस न येतां धीमेपणानें युक्तीच्या मार्गानें आपला कार्यभाग करून घेण्याची युक्ति नानासाहेबांचे अंगीं पूर्णपणें वसत होती. जयसिंग व निजामउल्मुल्क यांस वश करून घेतलें तर आपला मनोदय सिद्धीस जाईल अशी नानासाहेबांस पूर्ण खातरी होती. वरील दोन व्यक्तींपैकीं जयसिंगाचा व त्यांचा पूर्वीपासून ऋणानुबंध होताच. फक्त निजामउल्मुल्कास वश करून घ्यावयाचें होतें. पण त्याची गांठ पडण्याचा त्याचवेळीं अनायासानें प्रसंग आला. निजामउल्मुल्काचा दुसरा पुत्र नासिरजंग यानें ह्या वेळीं आपल्या पित्याविरुद्ध दक्षिणेंत बंड केलें होतें, व तें मोडण्याकरितां त्या वेळीं निजाम दिल्लीहून दक्षिणेंत येण्याकरितां निघाला होता. तेव्हां नानासाहेब स्वतः महादाजीपंत पुरंदरे यांस समागमें घेऊन निजामाची गांठ घेण्याकरितां ता० २३ नोव्हेंबर १७४० रोजीं पुण्याहून निघून नर्मदेवर आले; तिकडून निजामही येऊन पोहोंचला. पुढें ता० ७ जानेवारी इ० स० १७४१ रोजीं उभयतांच्या भेटी मुक्काम पोंदें, प्रांत एदलाबाद येथें झाल्या. त्या वेळीं नानासाहेबांनीं माळवा प्रांताबद्दल त्याच्यापाशीं मागणें केलें. पहिल्या कलमांत असा अर्ज आहे कीं, बादशाहांनीं बाळाजी बाजीराव यांस माळवा सुभ्याचें काम सांगावें आणि त्या सर्व प्रांताची जहागीर द्यावी. यावर निजामउल्मुल्काचा असा जबाब आहे कीं, सुभेदार तर आम्ही खुद्द आहोंच. जर हुकमाची तामिली (बजावणी) करीत जाऊं अशी पेशवे यांची इच्छा असेल तर नाइकीच्या सनदा त्यांस दिल्या जातील. दुसऱ्या कलमांत असा अर्ज आहे

कीं, पूर्वी म्हणजे नादिरशाहानें दिल्लीवर स्वारी केली व बादशाहानें बाजीरावसाहेबांस मदतीस बोलाविलें तेव्हां मदतखर्चास म्हणून जे पन्नास लाख रुपये देण्याचें कबूल केलें होतें ते द्यावे. त्यावर निजामाचा असा जबाब आहे कीं, ही रक्कम बादशाहाकडून घेऊन तुम्हांस देण्याविषयीं प्रयत्न केला जाईल. अशीं बोलणीं झाल्यावर निजाम आपल्या पुत्राचें बंड मोडण्याकरितां आपले राज्यांत निघून गेला; व नानासाहेब सवाई जयसिंगास भेटण्याचे उद्देशानें उत्तर-हिंदुस्तानांत गेले. नानासाहेबांनीं या वेळीं आपला सरदार पिलाजी जाधवराव यास निजामाच्या मदतीस पाठवून दिलें. पुढें नानासाहेबांची व सवाई जयसिंगाची भेट झाली(इ०स० १७४१ मे-जून).त्या वेळीं शिंदे व होळकर हे उत्तर-हिंदुस्तानांतच होते. धारचा आनंदराव पवार यानें इ० स० १७३१ त त्रिंबकराव दाभाडे सेनापति यास डभईच्या लढाईंत साहाय्य केल्यामुळें त्याचें व पेशव्यांचें वैमनस्य होतें, व तेव्हांपासून तें संस्थान घेण्याचा त्यांचा विचार होता. त्याप्रमाणें मल्हारराव होळकर यानें इ०स० १७४१ च्या दिसेंबर महिन्यांत धारचा किल्ला घेतला.

चिमणाजीआपांचा मृत्यु:—बाजीरावसाहेब वारल्यानंतर चिमणाजीआपांची प्रकृति दिवसेंदिवस क्षीण होत चालली होती. नानासाहेब निजामाचे भेटीकरितां उत्तर-हिंदुस्तानांत गेले त्या वेळीं आप्पा पुण्यास होते. ते बाजीरावसाहेबांच्या मृत्यूनंतर कोकणांतून निघून आले त्या वेळीं त्यांनीं शंकराजी नारायण, व खंडेराव माणकर, या दोघांस कोकणच्या बंदोबस्ताकरितां मागें ठेविलें होतें, हें मागें सांगितलेंच आहे. पुढें त्या दोघांनीं एकामागून

१ पेशव्यांची शकावलि.

एक धारावी, यशवंतगड, मनोहरगड, मांडवी, घोडबंदर, उरण, वगैरे ठाणीं पोर्तुगीज लोकांपासून घेऊन शेवटीं त्यांचें अवशेष राहिलेलें एकच ठाणें रेवदंडा हें ता० ८ दिसेंबर इ० स० १७४० रोजीं घेतलें व अशा रीतीनें उत्तर-कोकणांतून पोर्तुगीज लोकांची सत्ता नाहींशी केली. आप्पांस हें वर्तमान समजलें तेव्हां त्यांना आपण जें कार्य हातीं घेतलें होतें त्याचा आज शेवट झाला असें पाहून फारच आनंद झाला. परंतु त्या वेळीं ते आसन्नमरण होऊन पडले होते. पुढें नऊ दिवसांनीं म्हणजे पौष शुद्ध १० सह ११ शके १६६२ म्हणजे ता० १७ दिसेंबर इ० स० १७४० रोजीं ते कैलासवासी झाले. त्यांच्या पत्नी अन्नपूर्णाबाई या त्यांच्याबरोबर ओंकारेश्वरावर सती गेल्या. बाजीराव व चिमणाजीआपा अशा प्रकारचें एकमेकांवर निस्सीम प्रेम करणारें बंधुद्वय विरळाच सांपडेल. चिमणाजीआपा जे अल्पवयांत वारले ते केवळ बंधुवियोगदुःखाच्या वेदना असह्य होऊनच वारले. ते मोठे शूर होते. तसेंच ते दृढ निश्चयी असून मोठे निग्रही होते. याचें उत्कृष्ट उदाहरण त्यांनीं इ०स०१७३९त पोर्तुगीज लोकांपासून वसईचा किल्ला घेतला त्या वेळीं चांगलें दिसून यतें. त्यांची नानासाहेबांवर भाऊसाहेबांपेक्षांही जास्त ममता होती, व नानासाहेबही आप्पांच्या मर्जीबाहेर कधींच वागले नाहींत. ते वारले त्या वेळीं नानासाहेब नर्मदेच्या कांठीं होते. त्यांना हें वर्तमान कळलें तेव्हां अतिशय दुःख झालें. त्यांच्याजवळचें अनुभवशीर व मायेचें पोक्त मनुष्य नाहींसें झाल्यामुळें ते अगदीं उघडे पडले. घरांत सर्व पोरांडा असल्यामुळें एकंदर सर्व जबाबदारी या वेळेपासून त्यांचे . शिरावर येऊन पडली. या वेळीं त्यांचें वय फक्त २१ वर्षांचें होतें. तथापि तशा वयांत न डगमगतां कोणी साह्यकारी नसतांही त्यांनीं आपल्या

शिरावरील भयंकर जबाबदारीचें काम मोठ्या धीमेपणानें एखाद्या अनुभवशीर मुत्सद्याप्रमाणें पुढें चालविलें याबद्दल त्यांची तारीफ करावी तेवढी थोडीच आहे.

नानासाहेबांचें उत्तर-हिंदुस्तानांतील पर्यटनः—चिमणाजी-आपा वारले त्या वेळीं नानासाहेब नर्मदेच्या तीरीं होते. पुढें ता० ७ जानेवारी १७४१ रोजीं त्यांची व निजामउल्मुल्काची मुलाखत झाली. नंतर ते मुरंदभेलसें, भूपाळ वगैरे ठिकाणीं फिरले. नंतर ढवळापुर-चमेलीस आले. इ० स० १७४१ च्या मे महिन्यांत त्यांची व सवाई जयसिंगाची भेट झाली. त्या वेळीं माळव्यासंबंधानें बोलणें होऊन उभयपक्षीं जीं कलमें ठरलीं तीं येणेंप्रमाणें:—(१) परचक्र चढून आलें असतां अगर परचक्रावर चढ करून जाणें असल्यास जयसिंग व मराठे यांनीं एकमेकांस मदत करावी. (२) हें कलम बादशाहाशीं बेइमान होण्याचा प्रसंग आला तर त्यासंबंधाचें आहे. तें असें कीं, असा प्रसंग मी (जयसिंग) येऊं देणार नाहीं. कलम ३ व कलम ४ हीं मोघम आहेत. पांचवे कलमांत जयसिंगानें असें वचन दिलें आहे कीं, चंबळा नदीच्या उत्तरेस ज्या रजपूत सरदारां-विषयीं बाळाजीनें शिफारस केली आहे, त्यांच्या हितावर मी दृष्टि देईन. ते बादशाहाच्या ताबेदारींत फरक करणार नाहींत तर व खंड देतील तर त्यांच्या जमिनी त्यांच्याकडे चालवीन. शेवटचें कलम महत्त्वाचें आहे. त्यांत असें आहे कीं, सुभे माळव्याचे वजिरीची सनद व त्याप्रमाणें रिवाजाप्रमाणें लिखत शाहूकडे पाठविण्याविषयीं व चंबळा नदीचे उत्तरेकडील राज्यावर बसविलेला खंड घेण्यास परवानगी देण्याविषयीं सहा महिन्यांचे आंत मी बादशाहाचा हुकूम आणून देतों. हा तह इ०स०१७४१च्या मे महिन्यांत झाला. परंतु मराठ्यांचे दुर्दैवानें

१ पेशव्यांची शकावळि.

जयसिंग पुढें लवकरच मरण पावला, व तहाचीं कलमें कागदांतच राहिलीं. जयसिंग कांहीं वर्षे जिवंत असता तर मराठ्यांस अनुकूल अशीं अनेक राजकारणें नानासाहेबांनीं त्याचे मध्यस्थीनें दिल्लीच्या दरबारीं करून घेतलीं असतीं. परंतु भवितव्यता बलीयसी! नंतर जून महिन्यांत शिंदे व होळकर ग्वालेर मुक्कामीं त्यांस येऊन भेटले. पुढें त्या दोघांस तिकडील प्रांताचा बंदोबस्त करण्याकरितां तिकडेच ठेवून स्वारी श्रावण शुद्ध ३ शके १६६३ म्हणजे ता० ४ जुलै इ० स० १७४१ रोजीं पुण्यास येऊन दाखल झाली. ही नानांची पहिलीच मुलुखगिरी होय.

शाहू महाराजांकडून नानासाहेबांस नवीन सनद मिळते:— नानासाहेब पुण्यास आठदहा दिवस राहिले. नंतर सदाशिव चिमणाजी ऊर्फ भाऊसाहेब यांस बरोबर घेऊन ते ता० १९ जुलै इ० स० १७४१ रोजीं महाराजांचे दर्शनाकरितां साताऱ्यास जाण्यास निघाले. उत्तर-हिंदुस्तानांतील स्वारीची एकंदर हकीकत त्यांनीं महाराजांपाशीं निवेदन केली. त्या वेळीं ते फार खुष झाले व त्यांनीं नानासाहेबांस पेशव्यांनीं कोकणांत पोर्तुगीज लोकांपासून जो मुलुख जिंकून घेतला होता त्याची जहागीर व गुजराथ प्रांत शिवायकरून नर्मदेच्या उत्तरेकडील मुलखाची खंडणी वसूल करण्याचा व चौथाई आणि सरदेशमुखी हे हक्क बसविण्याचा पूर्ण हक्क दिला. एवढा हक्क प्राप्त झाल्यामुळें नानासाहेबांचें महत्त्व त्या वेळीं किती वाढलें हें सहज ध्यानांत येईल. नानासाहेब सातारा येथें सप्टेंबर अखेर होते. नंतर ते पुण्यास आले, व तेथें सुमारें तीन महिने राहिले. हा काळ त्यांनीं राज्याची अंतस्थ स्थिति सुधारण्यांत घालविला.

रघूजी भोंसल्याच्या कर्नाटकच्या स्वारीचा शेवटः—सातान्यास मनाप्रमाणें गोष्टी न घडून आल्यामुळें रघूजी भोंसले कर्नाटकांत परत गेल्यावर त्यानें त्रिचनापल्लीच्या वेढयाचें काम सुरू केलें. या पुढचा कर्नाटकच्या मोहिमेचा संगतवार असा इतिहास सांपडत नाहीं. तथापि इतका शोध लागतो कीं, जरी त्या वेळीं तंजावरच्या राज्यांत लढे उत्पन्न झाले होते, तरी तेथील राजानें मराठयांशीं सख्य केलें. त्रिचनापल्ली ता० ६ मार्च इ०स०१७४१ रोजीं मराठयांनीं घेतली व चंदासाहेबास[1] कैद करून साताऱ्यास पाठवून दिलें. रघूजीनें त्रिचनापल्लीचा किल्ला मुरारराव घोरपडे याच्या ताब्यांत दिला. किल्ल्याच्या संरक्षणार्थ जी शिबंदी टेविली होती तींत कांहीं पेशव्याचे लोक असावे असें ठरलें. तसेंच अर्काट प्रांताची जी खंडणी येईल, तींपैकीं वीस हजार रुपये सालीना पेशव्यास मिळावे असें ठरलें. या वर्षी नानासाहेबांस हा बराच मोठा फायदा झाला. कर्नाटकची मोहीम आटोपल्यावर रघूजीचें सर्व लक्ष बंगाल प्रांताकडे लागल्यामुळें तो वऱ्हाडांत परत आला. या बंगालच्या स्वारीची हकीगत पुढच्या भागांत येईल.

भाग पांचवा

नानासाहेबांस माळव्याची सनद मिळतेः—नानासाहेबांस दिल्लीच्या बादशाहानें माळव्याची सनद करून देण्यास काय काय

1 या चंदासाहेबास हुसेनदोस्तखान असें ह्मणत असत. तो साताऱ्यास ७ वर्षे नजरकैदेंत होता. तो फिरावयास निघाला ह्मणजे त्याच्याबरोबर एक शिपाई असे. इ० स० १७४८ त त्याची मुक्तता झाली.

कारणें घडून आलीं तीं नीट समजण्याकरितां रघूजी भोंसल्याच्या बंगाल्यावरील स्वारीचा साग्र इतिहास देणें जरूर आहे.

रघूजी भोंसल्याचा दिवाण भास्करपंत याची बंगाल प्रांतावर स्वारीः—अलीवर्दीखानानें बंगाल प्रांताचा अधिकार कसा मिळविला त्याची हकीगत मागें दिलीच आहे. त्यानें ओढया प्रांताचा सुभेदार मुर्शिदकुलीखान याचा पराभव केल्यावर त्याचा दिवाण मीर हबीब हा पळून गेला. मीर हबीब यानें आपणास मदत करावी ह्मणून रघूजी भोंसल्याचा दिवाण भास्करपंत यास विनंतीपत्र पाठविलें. रघूजी त्या वेळीं कर्नाटकांत होता. तेव्हां भास्करपंतानें त्याला एकंदर हकीगतीचें पत्र पाठवून बंगाल्यावर स्वारी करण्याची परवानगी मागितली. परंतु ही परवानगी येऊन भास्करपंत स्वारीची तयारी करण्यापूर्वींच अलीवर्दीखानानें सर्व ओढ्या प्रांत जिंकून घेतला. त्यामुळें मीर हबीब यास नाइलाजास्तव त्याचें वर्चस्व कबूल करणें भाग पडलें. परंतु पुढें लौकरच बंगाल प्रांतावर स्वारी करण्याची दुसरी एक संधि भास्करपंतास आली. तो प्रकार येणेंप्रमाणें:—अलीवर्दीखानानें आपला नातू सुराजउद्दौला यास कटक प्रांताचा सुभेदार नेमिलें होतें. परंतु तो मोठा जुलमी असल्यामुळें त्या प्रांतांतील लोक त्रासून जाऊन त्यांनी त्याच्याविरुद्ध बंड केलें. तें मोडण्याकरितां अलीवर्दीखान आपल्या फौजेसह कटक प्रांतांत गेला, व त्यानें लौकरच तें बंड मोडून इ०स० १७४२ च्या एप्रिल महिन्यांत तो मुर्शिदाबाद येथें येण्याकरतां परत फिरला. परंतु वाटेंतच मराठे बहार प्रांतांत शिरल्याची खबर त्याला लागली. अलीवर्दीखानानें कटक प्रांतांतील बंड मोडण्याकरतां बहार प्रांतांतील आपली फौज नेली आहे व अशा रीतीनें तो प्रांत उघडा पडला आहे, ही

बातमी भास्करपंतास कळतांच तो आपल्या फौजेसह रामगिरी जवळच्या डोंगरांतून खालीं उतरला व त्यानें पंचायत नामक प्रांतावर स्वारी करून तो लुटून फस्त करून टाकिला.

नानासाहेबांची हिंदुस्तानांत स्वारीः—भास्करपंत बंगाल्यांत गेला हें वर्तमान नानासाहेबांस समजतांच नर्मदेच्या उत्तरेकडील प्रांताचा जो हक्क शाहूमहाराजांनीं त्यांस दिला होता, तो प्रस्थापित करण्याकरतां ते इ० स० १७४१ च्या दिजंबर महिन्याच्या अखेरीस पुण्याहून निघाले. या वेळीं त्यांच्या पत्नी गोपिकाबाई व चुलतबधु सदाशिवरावभाऊ यांसही त्यांनीं आपणाबरोबर घेतलें होतें. परंतु गोपिकाबाई गरोदर असल्यामुळे तिला व भाऊसाहेबांना त्यांनीं वाटेंतूनच पाटोंदें येथून परत पुण्यास लावून दिलें व आपण पुढें चालते झाले. गोपिकाबाई पुण्यास परत आल्यावर ता० २२ जुलै १७४२ रोजीं प्रसूत होऊन त्यांना पुत्र झाला, त्याचें नांव विश्वासराव असें ठेविलें. या वेळीं नानासाहेबांबरोबर राणोजी शिंदे, मल्हारराव होळकर, पिलाजी[1] जाधवराव, महादाजी अंबाजी, बापूजी भिवराव वगैरे सरदार होते.

नर्मदा उतरल्यावर ता० ५ मार्च १७४२ रोजीं मराठ्यांनीं मंडळ किल्ल्यास वेढा दिला. किल्ल्यावर पहिला हल्ला ता० १८ मार्च रोजीं केला. परंतु मंडळचा राजा महाराजशाहा यानें तो मागें फिरविला. पुढें

---

१ बाळाजी विश्वनाथ याचे कारकीर्दींत पिलाजी जाधवराव हा एक शिलेदार होता. चंद्रसेन जाधव बाळजीस कैद करण्याचे हेतूनें त्याचा पाठलाग करीत असतां पिलाजीनें त्यास मदत करून चंद्रसेनाचे भयापासून मुक्त केलें. पुढें त्यास सरदारी मिळाली व त्या वेळच्या बहुतेक मोहिमांत तो हजर होता. त्याचें मूळ गांव पुण्यापासून ९ मैलांवर वाघोली म्हणून खेडें आहे तें होय. या गांवीं पिलाजीची सुरेख समाधि बांधलेली आहे. वाघोलीकर जाधवांचा हा मूळपुरुष होय.

एप्रिल ता० १२ रोजीं पहाटेस मराठ्यांनीं पुनः हल्ला केला व दहा बारा सुरुंग उडवून गांवकुसूं उडवून दिलें. महाराजशाहा यास यशाची फारशी आशा नसल्यामुळें त्यानें आपलीं मुलें माणसें ठार मारून मोठ्या जोरानें मराठ्यांवर हल्ला केला. पण त्याला उरांत गोळी लागून तो मरण पावला. हल्ल्यांत असलेल्या त्याच्या ४ मुलांपैकीं २ ह्या गर्दीतच मरण पावले व बाकीचे दोन पुत्र व त्याचा भाऊ हे मराठ्यांचे हातीं सांपडले. अशा रीतीनें मराठ्यांनीं तो किल्ला सर केला. नंतर मावज, भडाळें वगैरे ठिकाणीं लढाया करून मराठ्यांनीं तो प्रांत सर केला. पुढें पावसाळा सुरू झाला म्हणून जून महिन्यात नानासाहेब सुरंज येथें छावणी देऊन राहिले.

धारच्या पवारांशीं सख्यः—इ० स० १७४२ चा पावसाळा संपल्यावर नानासाहेबांनीं धार व त्याचा आसपासचा मुलूख जिंकून घेतला. परंतु पुढें धारचा संस्थानिक आनंदराव पवार हा नानासाहेबांस भेटावयास आला, तेव्हां नानासाहेबांनीं पूर्वीचें वैमनस्य विसरून जाऊन त्याला भेट दिली. पुढें उभय पक्षीं सल्लुल्याचीं बोलणीं होऊन नानासाहेबांनीं धारसंस्थान आनंदरावाकडे कायम केलें. नानासाहेबांच्या दूरदर्शीपणाचें हें उत्तम उदाहरण आहे. पवारांशीं सख्य करून त्यांनीं आपला एक शत्रु मित्र केला ही तर गोष्ट मोठी खरीच; परंतु त्यापेक्षांही विशेष महत्त्वाची गोष्ट ह्या कृत्यानें साधली ती अशी कीं, माळवा प्रांतावर गुजराथेंतून स्वाऱ्या होण्याची पुष्कळ भीति होती; व धार संस्थान हें माळव्याचे पश्चिम बाजूस माळवा व गुजराथ यांचेमध्यें असल्यामुळें त्या संस्थानावर आपल्या पक्षाच्या सरदार असला ह्मणजे प्रथमतः हल्ला करणारांस सहजचिरच

सामना करावा लागेल व अशा रीतीनें माळव्यावर हल्ला येण्याची भीति कमी होईल. सारांश नानासाहेबांनीं माळव्यावर पाश्चिमेकडून स्वाऱ्या करणाऱ्या लोकांना मध्यंतरीं धार संस्थान हा एक बळकट किल्लाच करून ठेवला. याच वेळच्या सुमारास नानासाहेबांनीं झांशीं प्रांत छोडशाच्या राजापासून जिंकून घेऊन नारो शंकर राजेबहाद्दर यास त्या प्रांताचा सुभेदार नेमिलें (इ० स० १७४२).

बादशाहापाशीं चौथाई सनदेची मागणीः—नानासाहेब नर्मदेच्या उत्तरेस आल्यापासून त्यांनीं जयसिंग व निजामउल्मुल्क यांचे मार्फत मोंगलांचे राज्यावर आपणास चौथाई मिळावी ह्मणून बादशाहापाशीं बोलणें सुरू केलें होतें. बाजीराव साहेबांस जो नजराणा पाठविला होता त्याच्यापेक्षांही मौल्यवान् असा नजराणा या वेळीं बादशाहानें नानासाहेबांस पाठवून दिला. तसेंच चौथाईचा जो पैसा द्यावयाचा तो कधीं रोख व कधीं नेमणुकीच्या रूपानें द्यावयाचा असेंही ह्या वेळीं ठरलें. परंतु ह्या वेळीं बादशाहानें तोंडी वचनावरच नानासाहेबांची बोळवण केली. त्याबद्दलची सनद वगैरे कांहींएक करून दिलें नाहीं. वरील खटपटींत नानासाहेबांचा मुख्य हेतु माळव्याची सनद करून घेण्याचा होता. परंतु बादशाहाचे व जयसिंग व निजाम शिवाय करून इतर दरबारी मंडळीचे मनांत तें प्रकरण तसेंच लांबणीवर टाकून रघूजी भोंसले व पेशवे यांचा आपसांत कलह लावून देऊन ‘ दोघांचें भांडण तिसऱ्याचा लाभ ’ या न्यायानें बाळाजीचा माळव्यावरील हक्क व चौथाईची मागणी वगैरे गोष्टी अजीबात उडवावयाच्या होत्या. परंतु नानासाहेबही हा त्यांचा डावपेंच पूर्णपणें ओळखून होते.

भास्करपंताच्या बंगाल्यावरील स्वारीची पुढील हकीकतः—

ह्या वेळीं बंगाल्यांत भास्करपंताची सुमारें दहाबारा हजार फौज होती. परंतु खऱ्या संख्येच्या चौपट फौज आली आहे असा सर्व बंगाल प्रांतांत गवगवा होऊन गेला होता. अलीवर्दीखानाजवळ फक्त सात आठ हजार फौज होती. तथापि त्यानें भास्करपंताशीं सामना देण्याचा निश्चय केला. पुढें त्याची व भास्करपंताची लढाई झाली. परंतु तींत त्याचा पराभव होऊन भास्करपंतानें त्याच्या बऱ्याच लोकांची कत्तल केली, बरेच लोक त्याला सोडून पळून गेले, त्याचें युध्दोपयोगी सामान मराठ्यांनीं लुटून नेलें व त्याच्याजवळ फक्त तीन हजार लोक शिलक राहिले. भास्करपंतानें त्याला अगदीं जेरीस आणून सोडलें, तेव्हां त्यानें तहाचें बोलणें सुरू केलें. परंतु भास्करपंताच्या मागण्या फारच जबर असल्यामुळें त्याला त्या कबूल करतां येतना. शेवटीं मेलों-तरी बेहेत्तर परंतु धारातीर्थी मरावयाचें, भास्करपंताच्या फाजील मागण्या कबूल करावयाच्या नाहींत, असा त्यानें निश्चय केला. तो पुढें पळ काढीतच आहे, मागून मराठे त्याचा फडशा पाडीतच आहेत, अशा कष्टप्रद स्थितींत तो शेवटीं कटवा येथें येऊन पोहोंचला. त्या वेळीं एका छाप्यांत मराठ्यांनीं मीर हबीब यास कैद केलें. मीर हबीब याच्या मनांत अलीवर्दीखानाचा सूड घ्यावा असें होतें. तेव्हां तो भास्करपंतास वश झाला व भास्करपंताचा ज्या योगानें आपणावर विश्वास बसेल अशा रीतीनें त्यानें ह्याच्याशीं आपला वर्तनक्रम ठेविला. पावसाळा नजीक आल्यामुळें भास्करपंताच्या मनांत वऱ्हाडांत परत यावयाचें होतें. परंतु मीर हबीब यानें त्याला पुढील लुटीची मोठी आशा दाखवून तसें करूं दिलें नाहीं व भास्करपंताचा आपल्या बोलण्यावर विश्वास बसावा ह्मणून त्यानें त्याच्यापासून एक लहानशी टोळी मागून घेतली व ती एकाएकीं मुर्शिदाबाद शहरावर जाऊन

पडला, व तेथें जगतशेट व अलमचंद असे दोन श्रीमान् व्यापारी होते त्यांच्या पेढ्या लुटून त्यानें २९ लाख रुपयांची लूट भास्करपंतास आणून दिली. या गोष्टीमुळें त्याच्या इमानीपणाबद्दल भास्करपंताची खात्री होऊन तो पावसाळ्यांत तेथेंच राहिला. नंतर त्यानें हुगळी शहर घेऊन हळू हळू कटक्यापासून मिदनापुरपर्यंतचा सर्व मुलूख काबीज केला. त्याच्या मनांत मुर्शिदाबाद प्रांतही हस्तगत करावा असें होतें; परंतु हुगळी नदीस पूर आल्यामुळें त्याला तसें करतां आलें नाहीं.

अलीवर्दीखान नानासाहेबांपाशीं मदत मागतो.—भास्करपंतानें अशा रीतीनें बंगाल्यांत धुमाकूळ उडवून दिला असतां दिल्लीच्या बादशाहाकडून बंगालची खंडणी मागण्याकरतां अलीवर्दीखानाकडे एक कामगार आला. तेव्हां त्यानें त्या वकिलास असें सांगितलें कीं, " जोंपर्यंत मराठे माझ्या मुलखास त्रास देत आहेत, तोंपर्यंत खंडणी देण्याचें मला सामर्थ्य नाहीं. मराठे राज्यांत चोहोंकडे लूट करीत असल्यामुळें वसूल मुळींच येत नाहीं, ह्याकरितां खावंदांनीं मला ह्या वेळीं साह्य करून माझें रक्षण करावें." तसेंच त्यानें नानासाहेबांसही मदतीकरितां विनंती केली व त्यांनीं तसें करावें म्हणून त्यांच्याकडे बराच खजिनाही पाठवून दिला. परंतु अयोद्धेचा नबाब सफतरअल्ली यानें तो मधल्यामधेंच लुटून नेला, व त्यामुळें नानासाहेबांस त्या वेळीं अलीवर्दीखानास मदत करतां आली नाहीं.

बादशाहा नानासाहेबांस माळव्याची सनद देऊं करतो:—अलीवर्दीखानानें बादशाहा व नानासाहेब यांच्यापाशीं मदत मागितली होती. तथापि तो त्याच आशेवर स्वस्थ बसला नव्हता. त्यानें भास्करपंताशीं सामना देण्याची कडेकोट तयारी चालविली होती.

भास्करपंताची या वेळीं कटवा येथें छावणी होती. पावसाळा संपतो आहे तोंच अलीवर्दीखानानें हुगळी व आजी या नद्यांस नावांचे पूल बांधले. परतु आजी नदी उतरून जात असतां पूल तुटल्यामुळें त्याचे पधराशे लोक बुडून मेले. तरी न डगमगतां त्यानें राहिलेले लोक बरोबर घेऊन एकाएकीं भास्करपंतावर हल्ला केला, व त्याला त्या प्रांतांतून पिटाळून लाविलें. अलीवर्दीखानाने त्याचा बहार प्रांतापर्यंत पाठलाग करून त्याचें फार नुकसान केलें. परंतु तो परत फिरतांच भास्करपंताने मिदनापूर प्रांतावर हल्ला करून तो लुटून फस्त केला. तेव्हां अलीवर्दीखानानें पुनः त्याच्यावर स्वारी केली. उभय पक्षांची बालासोर येथें लढाई होऊन तींत भास्करपंताचा पराभव झाला. अलीवर्दीखानानें त्या वेळीं त्याचा अशा नेटानें पाठलाग केला कीं, भास्करपंताला एकदम वऱ्हाडचा रस्ता सुधारावा लागला.

रघूजीची बंगाल्यावर स्वारीः—भास्करपंत वऱ्हाडांत येण्यापूर्वीच रघूजी कर्नाटकांतून परत आला होता. पुढें भास्करपंतानें तिकडील लुटीची त्याला आशा दाखविल्यामुळें तो स्वतः बरोबर जंगी फौज घेऊन बंगाल्यांत शिरला. रघूजीशीं सामना देण्याचें अलीवर्दीखानाचें सामर्थ्य नव्हतें. तेव्हां मदतीकरतां त्यानें पुनः बादशाहास विनंती केली. तेव्हां त्यानें "रघूजीस बंगाल्यांतून घालवून द्याल, तर तुम्हांस माळव्याची सनद देऊं," असें नानासाहेबांस सांगितलें, व अझिमाबाद प्रांताच्या चौथाईचा वसूल अलीवर्दीखानापासून घ्यावा म्हणून त्यानें नानासाहेबांकडे वरात पाठवून दिली. ज्याच्यावर सर्व तन मन धन बसलें होतें अशा प्रकारचें मौल्यवान् बक्षीस नानासाहेबांपुढें बादशाहानें ठेवल्याबरोबर मग आणखी काय पाहिजे ? त्यांनीं लगेच फौजेची सिद्धता करून, बंगाल्याकडे आपला

मोर्चा फिरविला, व ते अलाहाबाद प्रांतांतून बोगळीपूर येथें येऊन दाखल झाले. नंतर राजरस्त्यानें गेलों तर वाटेनें शेतकरी लोकांस फौजेपासून त्रास पोहोंचेल ह्मणून ते आड रस्त्यानें मुर्शिदाबाद येथें येऊन पोहोंचले. प्रथमतः नानासाहेबांनीं बादशाहानें देऊं केलेला चौथाईचा पैसा अलीवर्दीखानापाशीं मागितला, व त्यानें लगेच तो त्यांचे पदरांत घातला. रघूजी आपल्या सैन्यासह त्या वेळीं कटवा व बरद्वान यांचे दरम्यान येऊन पोहोंचला होता. त्याला वरील प्रकार कळतांच त्यानें आपला रोंख फिरविला, व तो परत फिरला. अलीवर्दीखानानें लगेच त्याचा पाठलाग सुरू केला. अलीवर्दीखानाची कुवत व कावा ह्या दोन्ही गोष्टी नानासाहेब ओळखून होते. तेव्हां अलीवर्दीखानाच्या हातून तें काम शेवटास जाणार नाहीं अशी त्यांची खात्री असल्यामुळें त्यांनीं आड वाटेनें जाऊन अलीवर्दीखानाच्या पुढें आपली फौज नेली, व रघूजीला वाटेंतच गांठून कसबे जावळ व भंडाले परगणा खटाव येथें त्याच्यावर हल्ला करून त्याचा फडशा उडवून दिला (आक्टोबर १७४२). आपला कार्यभाग अशा रीतीनें फसला असें पाहून रघूजी विशेष भानगडींत न पडतां ओढ्या प्रांतांतून वऱ्हाडांत निघून गेला, व बोलीप्रमाणें कामगिरी फत्ते करून माळव्याची सनद बादशाहाकडून घेण्याकरतां नानासाहेब त्याच्याच मागून माळव्यांत निघून आले.

पुढें जानेवारी १७४३ अखेर स्वारी प्रयागास गेली व काशिवरून फेब्रुवारी महिन्यांत गयेस गेली. एप्रिल महिन्यांत मजावर्दीखान, मुस्तफाखान वगैरे मोंगल सरदारांच्या भेटी झाल्या. नानासाहेब प्रयागाकडे आले आहेत ही बातमी रघूजी भोंसले यास कळली तेव्हां त्याचे मनांत पेशव्यांचें लक्ष पुनः बंगाल्याकडे लागल्यास आपला

फायदा नाहींसा होईल अशी भीति उत्पन्न होऊन त्यानें गुजराथेंत दमाजी गायकवाड होता त्याला भरीस घालून त्याच्याकडून त्याच संधीस माळव्यावर स्वारी करविली. दमाजी माळव्यांत आल्यामुळें नानासाहेबांस आपले सर्व बेत एके बाजूस ठेवून अगोदर दमाजीचा बंदोबस्त करणें भाग पडलें, व ते आपल्या फौजेसह माळव्यांत आले. परंतु ते माळव्यांत येतांच गायकवाड गुजराथेंत निघून गेला. अशा रीतीनें रघूजीनें कावेबाजीनें नानासाहेबांचा बंगाल्यावर स्वारी करून रघूजीस दबावण्याचा प्रयत्न फिका पाडला.

नानासाहेबांस माळव्याची सनद मिळते:—नानासाहेब माळव्यांत परत आल्यावर ते बादशाहापाशीं पूर्वी केलेल्या कराराप्रमाणें माळव्याची सनद मागूं लागले. बंगालची कामगिरी नानासाहेबांनीं उत्कृष्ट रीतीनें बजाविल्यामुळें बादशाहाला ती सनद त्यांना दिल्याशिवाय दुसरी तोडच उरली नाहीं. परंतु एवढा मोठा प्रांत मराठ्यांस अजीबात देऊन टाकला तर त्यामुळें आपल्या दर्जास कमीपणा येईल आणि आपल्या दरबारची नाचक्की होईल, असें बादशाहास वाटल्यावरून त्यानें आपला पुत्र अहंमदशाहा याचे नांवें माळव्याची सनद करून बाळाजी बाजीराव यास त्याचा हस्तक व बहिवाटदार असें जयसिंग व निजामउल्मुल्क यांचे सल्ल्यानें ठरविलें, व ती सनद नानासाहेबांस देण्याचा विचार केला. पूर्वी चिमणाजी आप्पा व नानासाहेब यांनीं आपल्या सहीचा बादशहास जो करार लिहून दिला होता त्यांतील कलमांत व ही जी सनद करून दिली तींत जीं कलमें ठरलीं त्यांत विशेष फरक एवढाच होता कीं, पूर्वी बादशाहास मदतीची जरूर लागेल त्या वेळीं पेशव्यांनीं चार हजार स्वार

आपल्या खर्चानें देण्याचें कबूल केलें होतें. परंतु नवीन करारनाम्यांत चार हजारांबद्दल बारा हजार ठरले. परंतु आठ हजार स्वार जे ज्यास्ती द्यावयाचे त्यांचा एकंदर खर्च बादशाहानें द्यावा. असें नमूद केलें होतें. एकंदर ठराव बोलीप्रमाणें बिनतक्रार अमलांत येतील अशा-संबंधानें बादशाहाचे वतीनें जयसिंग जामीन झाला, व नानासाहेबांच्या वतीनें राणोजी शिंदे, मल्हारराव होळकर, यशवंतराव पवार व पिलाजी जाधव, हे जामीन झाले. त्यांनीं बादशाहास असें लिहून दिलें कीं, " बाळाजी बाजीराव मुख्य प्रधान यांनीं बादशाहाची नोकरी करायाचें कबूल केलें आहे. त्यास जर ते ह्या पुढें चाकरी करण्यास मागें पुढें पहातील तर त्यांस आम्हीं दोन गोष्टी सांगून तसें करूं देणार नाहीं, आणि आम्हीं सांगितलें असतां जर बाळाजी बाजीराव चाकरी न करण्याचा हट्ट धरतील तर आम्हीं सारे पंडित प्रधान यांची चाकरी सोडून देऊं. दाखल्या भावीं हा दस्तऐवज लिहून दिला असे." हा दस्तऐवज ता० २१ एप्रील इ०स० १७४३ रोजीं लिहून दिला. नंतर नानासाहेब दक्षिणेंत परत आले. अशा रीतीनें पेशव्याची कबुलायत झाल्यावर महंमदशाहा बादशाहानें पहिली सनद जुलै इ० स० १७४३ त व दुसरी आगस्ट सन १७४३ त नानासाहेबांकडे पाठवून दिली.

भाग सहावा.

नानासाहेब सातार्‍यास जातात:—नानासाहेब उत्तर-हिंदुस्तानांतून परत आल्यावर सुमारें दोन महिने पुण्यास राहिले. तितक्या मुदतींत त्यांनीं एकंदर राज्याच्या जमाखर्चाचा खर्डा तयार

केला. नंतर ते इ० स० १७४३ ता० ११ आगष्ट रोजीं पुण्याहून निघून सपटंबर महिन्यांत शाहूमहाराजांस भेटण्याकरतां साताऱ्यास गेले. बरोबर भाऊसाहेब व महादाजीपंत पुरंदरे होते. त्या वेळीं महाराज त्यांस सामोरे गेले व त्यांचा त्यांनीं मोठा सन्मान केला. नंतर नानासाहेबांनीं महाराजांच्या फौजेचे सेनापति या नात्यानें एकंदर जमाखर्चाचा हिशेब महाराजांपुढें ठेविला. जमा, खर्च व शिल्लक यांचा ताळेवार हिशेब पाहून महाराज फार खुष झाले. या वेळीं सर्व सत्ता महाराजांचे हातीं होती, व पेशव्यांनीं अशा प्रकारचा हिशेब दरसाल देणें हें त्यांचें कर्तव्य होतें. यांत विशेष कांहीं नाहीं. परंतु शाहूमहाराजांचेमागें सातारचे महाराजांचे दुबळेपणामुळें त्यांची सत्ता नियंत्रित होऊन सर्वत्र पेशव्यांचा अम्मल सुरू झाला, अशा वेळींही पेशवे या आपल्या कर्तव्यापासून कधींही पराङ्मुख झाले नाहींत, व दर वर्षीं ते सातारच्या महाराजांस जमाखर्चाचा हिशेब देत असत.

नानासाहेबांवर आलेलें अरिष्ट व त्यापासून त्यांची सुटका:- वर सांगितलेल्या कामाकरतांच केवळ नानासाहेब त्या वेळीं साताऱ्यास आले होते असें नाहीं. तर सातारच्या दरबारीं दुसऱ्या कांहीं अत्यंत महत्त्वाच्या भानगडी या वेळीं उत्पन्न झाल्या होत्या, त्यांचा निकाल लावण्याकरतां त्यांना या वेळीं साताऱ्यास येणें जरूर होतें. त्यांनीं बंगाल्यांत रघूजी भोंसल्याचा पराभव केला, तेव्हांपासून तो नानासाहेबांविषयीं मनांत एकसारखा जळत होता. तथापि आपसांत कलह असणें चांगलें नाहीं, असा बहाणा करून आणलेल्या सोंगाच्या बतावणीस त्यानें प्रथम प्रारंभ केला. त्यानें नानासाहेबांकडे आपला वकील पाटवून असें कळविलें कीं, बाजीराव पेशवे यांचा मनसोबा स्तुत्य असून त्यांत माझें स्वतःचें कल्याण आहे, ही गोष्ट माझ्या आतां

पूर्ण प्रत्ययास आली आहे, तर आपण वैरभाव विसरून जाऊन आम-च्याशीं प्रेमभावानें वागावें अशी आमची इच्छा आहे. अशा प्रकारें बाह्य शिष्टाचार व प्रेम याची रेलचेल करून आंतून त्यानें आपल्या फौजेंची कडेकोट तयारी केली व तो साताऱ्याच्या रोखानें चाल करून येऊं लागला. परंतु नानासाहेब या वरपांगी प्रेमास भुलणारे नव्हते. रघूजीचा कावा त्यांचे लक्षांत अगोदरच येऊन चुकला होता. गुजर्थेतून याच वेळीं दमाजी गायकवाडही फौजेसह साताऱ्याकडे यावयास निघाला होता. त्रिंबकराव दाभाड्याला मारल्या दिवसापासून गायकवाड पेशव्यांचा प्रतिस्पर्धि ठरलाच होता. नानासाहेबांचा हितशत्रु श्रीपतराव प्रतिनिधी पेशव्यांच्या विरुद्ध मंडळींत सामील होताच. परंतु ह्या वेळीं तो असन्नमरण होऊन पडला होता. तथापि त्याचा मुतालीक यमाजी शिवदेव हा नानासाहेबांस प्रतिनिधीपेक्षांही खडतर असा प्रतिस्पर्धि मिळाला. तो मोठा खटपटी व हुशार मनुष्य होता. जरी तो रघूजीच्या पक्षाचा नव्हता, तरी दमाजी गायकवाड यास त्याचें पूर्ण पाठबळ होतें. ह्या अरिष्टांतून पार पडण्याकरितां विरुद्ध पक्षाच्या मंडळीशीं युद्धाला तरी उभें राहिले पाहिजे, किंवा बंगाल्यावरचा आपला हक्क सोडून देऊन रघूजी भोंसल्याला तरी त्या कटांतून फोडलें पाहिजे; ह्याशिवाय नानासाहेबांस दुसरी तोडच उरली नव्हती. त्या वेळीं नानासाहेबांसारखा दूरदर्शी पुरुष पेशवा होता ह्मणूनच तो या काहुरांतून सुटला. इतकेंच नव्हे, तर सर्व मराठे एका मोठ्या यादवींतून बचावले. नाहीं तर त्याच वेळीं मराठ्यांचे आपसांतील तंटे फारच निकोपास गेले असते. नानासाहेबांनीं असा विचार केला कीं, आपसांत बखेडे माजवून आपल्या अंगास क्षतें पाडून घ्यावीं व काव काव करीत बसलेल्या बाहेरच्या काकपं-

क्तीस·चंचूप्रवेश करण्यास अचुक जागा तयार करून द्यावी, यापेक्षां थोडीशी झीज सोसून आपसांत सलोखा करून घ्यावा हें उत्तम. असा पोक्त विचार करून त्यांनीं शाहूमहाराजांच्या मध्यस्थीनें रघूजी भोंसल्याशीं सल्ला केला. त्यांत असें ठरलें कीं, सुभा प्रयाग, सुभा आग्रा व सुभा अजमीर या प्रांताची खंडणी पेशव्यांनीं वसूल करावी; सुभा पाटणापैकीं बारा लक्ष रुपयांचा तनखा व अर्काटच्या दीड लाख रुपये खंडणीपैकीं सालीना वीस हजार रुपये पेशव्यांस मिळावे; वसई, साष्टी वगैरे प्रांत पेशव्यांनीं घ्यावे; मोकाशाचा हक्क व बाळाजी विश्वनाथ, पहिले बाजीराव साहेब व स्वतः नानासाहेब यांस जहागिरीदाखल जो प्रांत मिळाला असेल तो यांवर पूर्ण हक्क पेशव्यांचा; वऱ्हाडांत पेशव्यांचे जे खासगत गांव असतील त्यांचा वसूल रघूजीनें पेशव्यांस द्यावा; मोंगलाईंत मंगळवेढ्याची खंडणी पेशव्यांनीं वसूल करावी; सुभा ढाका, बंगाला, सुभा लखनौ ऊर्फ अयोध्या व पाटणाच्या सुभ्यांतील बारा लाखांचा तनखा शिवाय करून बाकी जे महाल रहातील ते यांवर हक्क रघूजीचा; संस्थान गढें, तसेंच नर्मदेअलीकडे दक्षिणतीरीं जो प्रांत असेल तेथील मोंगलाई अमल पेशव्यांनीं करावा आणि चौथाई व स्वराज्य यांकडील अमल रघूजी भोंसले यानें करावा; अंतरवेदींत अयोध्या व पाटणा या सुभ्यांच्यापैकीं रघूजीच्या ताब्यांत जो मुलूख असेल तो रघूजीनें घ्यावा, त्यास पेशव्यांनीं हरकत करूं नये; वऱ्हाडपासून कटकपर्यंत सर्व प्रांतांची खंडणी रघूजीनें वसूल करावी; उभयतांनीं एकमेकांच्या मुलुखांत घासदाणा वसूल केला तर तो बिनतक्रार ज्याचा त्यास देऊन टाकावा; उभयतांनीं एकमेकांचे मुलुखास उपसर्ग न देतां सनदेप्रमाणें आपल्या मुलुखांत ज्यानें त्यानें अमल करावा. या

करारप्रमाणें पूर्वी बादशाहानें माळव्याची सनद दिली त्या वेळीं नानासाहेबांनीं त्याच्याशीं ज्या अटी कबूल केल्या होत्या, त्यांत नर्मदेच्या उत्तरेस कोणी मराठा सरदार उपद्रव करील तर त्याचें पारिपत्य आम्हीं करूं अशी जी अट होती तिला बाध आला, व त्यामुळें नानासाहेबांस थोडकासा कमीपणा आला असे म्हटलें तरी चालेल. परंतु आपल्या स्वतःच्या बचावाकरितां त्यांना या वेळीं तसें करणें भाग पडलें. अशा रीतीनें मोठ्या शहाणपणानें नानासाहेबांनीं रघूजीच्या तोंडास मधाचें बोट लावून त्याला त्यांच्या विरुद्ध चाललेल्या कारस्थानांतून फोडल्यावर दमाजी गायकवाड व त्याचा पुरस्कर्ता यमाजी शिवदेव हे अगदींच उघडे पडले, व त्या दोघांची रग जिरविण्याचें नानासाहेबांस पूर्ण सामर्थ्य होतें. वरील ठरावांत नानासाहेबांचे कांहीं हक्क गेले ही गोष्ट खरी आहे; परंतु त्याचा जो परिणाम घडून आला त्याकडे दृष्टी दिली तर त्यांत नानासाहेबांचें काडीभरही नुकसान न होतां उलट त्यांचा फायदा झाला, असें म्हटलें पाहिजे. पहिली गोष्ट पेशवाईच्या बुडाशीं घाव घालणारें जबरदस्त कारस्थान आंतल्याआंत विझालें; दुसरी गोष्ट रघूजीसारखा जबरदस्त शत्रु नानासाहेबांनीं आपल्या पक्षाकडे सामील करून घेतला; व तिसरी गोष्ट बंगाल्यासारख्या सुपीक प्रदेशांतील लुटीकडे रघूजीचें सारें लक्ष वेधून साताराचे गादीवर शाहूमहाराजांचे मागें आपण बसून सर्व राजसूत्रें आपण चालवावीं अशा प्रकारची रघूजीची जबरदस्त महत्त्वाकांक्षा मनांतल्या मनांतच जिरली. वरील कराराचे वेळीं आणखीं असें ठरलें होतें कीं, दमाजी गायकवाडानें पेशव्यांचे मुलखांत मागील सालीं जो घासदाणा वसूल केला होता, त्याचा हिशेब त्यानें नानासाहेबांस द्यावा; त्याचप्रमाणें तळेगांवचे दाभाडे सेनापति यांस, शाहू-

महाराजांचें कर्ज होतें, त्याचीही त्यानें फेड करावी. याच्यासंबंधानें पुढें काय काय गोष्टी घडल्या त्याचा खुलासेवार इतिहास उपलब्ध नाहीं. परंतु इतकें मात्र आढळून येतें कीं, त्या वेळीं कांहीं भानगडी-मुळें दमाजी गायकवाड यास गुजराथेंत जाणें जरूर होतें, परंतु त्याला तिकडे बरेच दिवस जातां आलें नाहीं. रघूजी भोंसले व नानासाहेब यांच्यातील वर सांगितलेला ठराव इ० स० १७४३ त झाला.

नानासाहेबांस शाहूमहाराजांकडून नवीन सनद मिळते:—वरील ठरावाअन्वयें नानासाहेबांस ज्या मुलखाचा हक्क हिंदुस्तानांत प्राप्त झाला होता त्याच्या ठळक मर्यादा म्हटल्या म्हणजे नर्मदा, गंगा व सोन ह्या नद्या होत. शाहूमहाराजांनीं या वेळीं त्यांना एक नवीन सनद करून दिली. तींत असें लिहिलें होतें कीं, मुलख संपादन करीत करीत वरील मर्यादेच्या उत्तरेस नानासाहेबांस जितकें दूरवर जातां येईल तितकें त्यांनीं जावें व तो सर्व प्रांत पेशव्यांचा समजला जाईल. त्यावर दुसऱ्या कोणाचा हक्क नाहीं. दादांनीं पुढें पंजाबांत वगैरे ज्या स्वाऱ्या केल्या त्या याच सनदेच्या जोरावर केल्या.

बाबूजी नाईक याजकडून कर्नाटकची सुभेदारी निघते:-बाबूजी नाईक बारामतीकर यांचें घराणें म्हणजे साताऱ्च्या महाराजांच्या पदरचें एक पुरातन घराणें होतें. त्याचें व नानासाहेबांचें वैमनस्य होतें याचा मागेंच उल्लेख झालेला आहे. शाहूमहाराजांनीं त्या उभयतांचें दरबारीं पटणार नाहीं म्हणून त्याला उमाबाई दाभाडे सेनापति हिच्याकडे कारभारी नेमिलें होतें. परंतु थोडक्याच दिवसांत तेथें त्याचें पटेनासें झालें. तेव्हां तो तेथून परत आल्या-

वर महाराजांनीं त्याला कांहीं दिवस हुजूर ठेविलें. पुढें रघूजी भोंसल्यानें त्याला हातीं धरलें, व इ० स० १७३९ त तो कर्नाटकच्या स्वारीवर गेला, त्या वेळीं त्याला आपणाबरोबर घेतलें. पुढें पेशवाई मिळविण्याचे कामीं हताश झाल्यावर तो रघूजीबरोबर पुनः कर्नाटकांत गेला. नंतर इ० स० १७४३ त मुरारराव[1] घोरपडे हा आपल्या फौजेसह त्रिचनापल्ली सोडून गेला, त्या वेळीं महाराजांनीं कर्नाटचा सुभा बाबूजी नाईक यास सांगितला, व त्याच्याकडे कांहीं फौज नेमून दिली. तसेंच कर्नाटकचे एकंदर उत्पनाबद्दल त्यानें सालीना सात लाख रुपये सरकारांत द्यावे असा त्याच्याशीं ठराव केला. फक्त त्रिचनापल्ली व श्रीरंगपट्टण एवढा प्रांत हुजूरच्या देखरेखीखालीं ठेविला होता. नाईक आपल्या सुभ्याचा अधिकार पाहूं लागल्यानंतर लवकरच तिकडे बखेडे उत्पन्न झाले. त्या प्रांतांतील देशमुख व इतर लहान लहान जहागीरदार व संस्थानिक हे त्यास जुमानीनातसे झाले. नाईक व नानासाहेब यांचें आपसांत वैमनस्य असल्यामुळें त्यांच्या मनांत नाईकाची खोड मोडावयाची होतीच. त्या लोकांचा बंदोबस्त करण्याकरितां नाईकानें ज्यास्त फौज ठेविली. संस्थानिकांनींही आपली फौज तयार केली. ज्यास्त

---

१ प्रसिद्ध संताजी घोरपडे याचा हा नातू होय. राजारामाचे कारकीर्दींत त्याचे कसुरीमुळें म्हसवडचा नागोजीराव माने यानें संताजीचा खून केला तेव्हांपासून सातारच्या महाराजांविषयीं घोरपड्यांच्या मनांत वैमनस्य होतें, व ते मराठ्यांशीं कधींही एकदिल झाले नाहींत. जिकडे ज्यास्त फायदा होईल तिकडे ते मिळत. मग तो मराठा असो किंवा दुसरा कोणी असो. तथापि इ० स० १७४२.त कर्नाटकची स्वारी आटोपून मराठे परत आले त्या वेळीं समशेर बहादूर यानें मुरारराव घोरपडे यास त्रिचनापल्लीचा बंदोबस्त सांगितला होता. पुढें त्याला गुटी संस्थानचा मालक असें ठरवून त्याला त्रिचनापल्ली येथून काढलें, व तो आपल्या फौजेसह एकदम गुटी येथें निघून गेला.

फौज ठेविल्यामुळें कर्नाटकची सर्व खडणी तिकडे खर्च होऊन शिवाय नाईकास कर्ज काढावें लागलें, व इतकें करूनही पुढें उभय पक्षांची जी लढाई झाली तींत नाईकाचाच पराभव झाला, व त्याच्याजवळ जें कांहीं थोडेंबहुत द्रव्य होतें तें सर्व शत्रूनें लुटून नेलें. फौजेची बाकी थकल्यामुळें ते लोक धरणें धरून बसले. तेव्हां नाईक भिऊन जाऊन त्यानें कर्नाटकांतून पळ काढला व थेट सातारचा रस्ता सुधारला. त्यानें एकंदर हकीकतीचें रडगाणें महाराजांजवळ गाईलें व आपणावरचा पेंच वारावा ह्मणून तो महाराजांची प्रार्थना करूं लागला. सात लाख रुपयांपैकीं एक कवडीचाही वसूल न देतां उलट सरकारांतच पैसे मागितले, हें पाहून शाहू महाराजांस त्याचा मोठा राग आला, व त्यांनी त्याला कर्नाटकच्या सुभ्यावरून दूर केलें. ज्याला एवढयाशा कर्नाटकच्या सुभ्याचें काम करितां आलें नाहीं तो पेशवा झाला असता तर त्यानें काय दिवे लाविले असते, हें उघडच दिसतें. असो; पुढें शाहूमहाराजांनीं यशवंतराव पोतनीस यास कर्नाटकांत पाठवून दिलें व तिकडचा बंदोबस्त केला (इ० स० १७४४).

भेलशावर स्वारी.—पुढें नानासाहेब माळव्याची खंडणी वसूल करण्याकरितां हिंदुस्तानांत गेले. माळव्यांत आल्यावर इ० स० १७४५ च्या मार्च महिन्यांत त्यांनीं भेलशाचा किल्ला घेतला. त्यांनीं बादशाहास एक पत्र पाठविलें, त्यांत असें लिहिलें होतें कीं, " आम्हीं खावंदांस पूर्वी जें इमानवचन दिलें आहे त्यांत आमचेकडून मुळींच अंतर पडणार नाहीं, परंतु कांहीं अडचणीच्या कामामुळें मला तूर्त आपल्या भेटीस येतां येत नाहीं. रघूजी भोंसले बंगाल्यांत शिरून धामधूम करीत असतां नबाब अलीवर्दीखान कसे स्वस्थ बसले व त्यांनीं रघूजीस

बंगाल्यांतून कां धुडकावून दिलें नाहीं, याचें मोठें आश्चर्य वाटतें." बादशाहानें नानासाहेबांस उत्तरादाखल जें पत्र पाठविलें होतें त्यांत, रघूजी बंगाल्यांत शिरल्यावर मागें ज्या घाटांतून त्याला वऱ्हाडांत परत येणें भाग होतें, त्या घाटवाटा नानासाहेबांनीं कां रोखल्या नाहीं, याबद्दल बराच दोष दिलेला आहे. पूर्वीं बादशाहानें माळव्याची सनद करून दिली, त्या वेळीं ठरलेल्या अटीप्रमाणें नानासाहेबांनीं अलीवर्दीखान यास मदत करणें जरूर होतें. परंतु शाहूमहाराजांच्या मध्यस्थीमुळें इ० स० १७४३ त रघूजी व नानासाहेब यांचा आपसांत जो ठराव झाला होता, त्याप्रमाणें त्यांना रघूजीच्या उलट जातां येईना. तेव्हां बादशाहानें दिलेलें दूषण निमूटपणें सहन करून ते तिकडील प्रांताची खंडणी घेऊन इ० स० १७४५ च्या आगष्ट महिन्यांत पुण्यास परत आले. नंतर सपटंबर महिन्यांत ते कोंकणांत गेले. तिकडे बारीक सारीक भानगडी होत्या परंतु त्यांस विशेष महत्त्व देण्यासारखें नव्हतें. नंतर तिकडचा बंदोबस्त करून इ० स० १७४६ च्या मार्च महिन्यांत नानासाहेबांची स्वारी कोंकणांतून परत आली. नानासाहेब कोंकणांत गेल्यावर मागें भाऊसाहेब, दादा व जनोबा, यांसह साताऱ्यास गेले, व कांहीं दिवस तेथेंच महाराजांपाशीं राहिले. राणोजी शिंदे इ० स० १७४५ च्या जुलै महिन्यांत मरण पावला. नानासाहेब कांहीं दिवस पुण्यास राहून साताऱ्यास गेले. त्या ठिकाणीं कारभार चालवीत असतां कर्नाटकांत कांहीं बखेडे माजले ह्मणून कर्नाटकच्या स्वारीची तयारी करून भाऊसाहेबांस तिकडे पाठविण्याचा त्यांनीं बेत केला.

भाऊसाहेबांची कर्नाटकावर स्वारी:-इ० स० १७४४ त बाबूजी नाईक याजकडून कर्नाटकची सुभेदारी निघाल्यावर तो

कांहीं दिवस घरांत रिकामाच बसला होता. तथापि फार दिवस तो स्वस्थ बसला नाहीं. कांहीं महिने लोटल्यावर त्यानें रघूजी भोंसले याच्या मार्फत कर्नाटकची सुभेदारी पुनः आपणास मिळावी ह्मणून शाहूमहाराजांपाशीं बोलणें लाविलें, व पूर्वीच्या बाकीबद्दल दोन लाख रुपये रोख देण्याचें कबूल करून बाकीच्या रकमेबद्दल होतंबदी कबूल केली. पुढें शाहूमहाराजांनीं त्याला कृष्णा व तुंगभद्रा या नद्यांच्या मधील प्रदेशाची चौथाई व सरदेशमुखी वसूल करण्याचा अधिकार दिला; परंतु तिकडील संस्थानिक त्याला पुनः जुमानीनातसे झाले. तेव्हां त्यांचा बंदोबस्त करण्याकरतां शाहूमहाराजांच्या आज्ञेवरून नानासाहेबांनीं भाऊ साहेबांस फौजेसह कर्नाटकांत पाठवून दिलें. भाऊसाहेबांस कर्नाटकांत पाठविण्यांत नानासाहेबांचा हेतु दुहेरी होता. पहिला बंडखोर जहागीरदारांस ताळ्यावर आणून त्यांच्या कडून खंडणी वसूल करणें, व दुसरा बाबूजी नाईक यास कर्नाटकांतून धुडकावून काढणें. नाईकानेंही आपणास खंडणी मिळावी ह्मणून तिकडे दीर्घोद्योग चालविला होता. ज्याप्रमाणें त्यानें शाहूमहाराजांस दोन लाख रुपये दिले होते, त्याचप्रमाणें सावनूरच्या नबाबासही पैसे भरून कर्नाटकांत आपला जम बसवून घ्यावा, असें त्याच्या मनांत होतें. भाऊसाहेब फौजेसह ता० ५ दिजंबर इ० स० १७४६ रोजीं सातान्याहून निघाले. ही भाऊसाहेबांची पहिली मोहीम होय. या वेळीं त्यांचें वय १६ वर्षांचें होतें. त्यांच्याबरोबर नानासाहेबांनीं सखाराम भगवंत बोकील यास प्रसंगीं योग्य सल्लामसलत देण्याकरितां पाठवून दिलें होतें. भाऊसाहेब कर्नाटकांत शिरल्यावर प्रथमतः आजूर-आतर नांवाच्या गांवीं पहिली लढाई झाली. तींत भाऊंची फत्ते होऊन तेथची खंडणी वसूल करून ते पुढें निघाले. नंतर ते वाटेनें

खंडणी वसूल करीत करीत बेदनूर प्रांतांत शिरले. प्रथमतः तेथंचा नबाब खंडणी देईना. तेव्हां उभय पक्षीं मायनहल्ली येथें लढाई होऊन तींत नबाबाचा पराभव झाला, व त्यानें तहाचें बोलणें लाविलें. या ठिकाणीं गुटी संस्थानचा जहागीरदार मुराराव घोरपडे हा भाऊसाहेबांस येऊन भेटला. नंतर भाऊंनीं घोरपड्यांचें कितूर नांवाचें ठाणें लुटारू लोकांनीं जबरदस्तीनें घेतलें होतें, तें त्या लोकांचा पराभव करून घोरपड्यांस परत दिलें. नंतर भाऊसाहेब सावनूरच्या नबाबाशीं खंडणी मागूं लागले. नबाब बाबूजी नाईक याची वाट पहात होता. त्याच्या मनांत नाईक यास खंडणी द्यावी व त्या योगानें आपलाही फायदा करून घ्यावा असें होतें. यामुळें भाऊसाहेबांस "देतों देतों" अशी हूल देऊन कांहीं दिवस दोन डगरींवर हात देऊन तो स्वस्थ बसला होता. नबाबाचा हा कावा भाऊंच्या नजरेस येतांच त्यांनीं नबाबाच्या बहादूरभेंढा या नांवाच्या प्रख्यात किल्ल्यावर हल्ला करून तो घेतला. तेव्हां नबाब घाबरून त्यानें तह केला व खंडणीची बाकी चुकती केली. नाईकास कोठेंच थारा मिळेना; तेव्हां त्या वेळीं नासिरजंग अर्काट प्रांतीं होता, त्याच्या आश्रयास आपण तूर्त जाऊन रहावें व भाऊसाहेब कर्नाटकांतून गेल्यावर मागें बेदनूर प्रांतांत धामधूम करावी असा त्यानें बेत केला. सावनूरच्या नबाबाशीं तह झाल्यावर भाऊंनीं सोंध्याची खंडणी वसूल केली. नंतर बेदनूरचें राज्यकारण आटोपून खंडणी घेतली व ते पुण्यास येण्याकरितां परत फिरले. परत येतांना 'बाबूजी नाईक आले तर त्यांस कोणी खंडणी देऊं नये' असा त्यांनीं सर्व संस्थानिकांपासून करार करून घेतला होता. भाऊसाहेब सावनूर प्रांतीं असतां वाडीचा जयराम सांवत त्यांस भेटावयास आला होता. सांवत व पोर्तुगीज लोक यांच्यामध्यें

पूर्वीपासून तंटे होते. या वेळीं पोर्तुगीज लोकांनीं सांवतांचा रेडी नांवाचा किल्ला घेतला होता. तो त्यांच्यापासून परत घेऊन आपणास द्यावा व पोर्तुगीज लोकांचें पारिपत्य करावें असें बोलणें त्यानें भाऊंपाशीं लाविलें होतें. तिकडून पोर्तुगीज लोकांनींही तहाचें बोलणें सुरू केलें व ह्या खटल्यांत आपण पडूं नये म्हणून भाऊंस विनंति केली. नानासाहेबांचे मनांत पोर्तुगीज लोकांचें पारिपत्य करावयाचें होतें. परंतु कांहीं विशेष महत्त्वाच्या कारणाकरितां त्यांनीं भाऊंस परत बोलाविलें. नानासाहेब ह्या वेळीं सातार्‍यास होते. नंतर पुण्यास येण्याचे हेतूनें ते सर्व मंडळीसह इ० स० १७४७ च्या एप्रिल महिन्यांत पंढरपुरास आले. पुढें भाऊंचीं व नानांची ता० ९ मे इ० स० १७४७ रोजीं पंढरपूर येथें भेट झाली, व सर्व मंडळी तां० २४ मे

१ पेशव्यांची खासगी डायरी. राजवाडे यांनीं आपल्या पुस्तकांत इ० स० १७४६ च्या मार्च महिन्यांत नानासाहेब पंढरपुरास होते असें दिलें आहे व त्याला आधार का० इतिहास संग्रहांतील पत्र ६८ हें दिलें आहे, तें चुकीचें आहे. या ठिकाणीं इ० स० १७४७ चा मार्च पाहिजे. कारण त्या पत्रांत नानासाहेब असें लिहितात कीं, " तुमचीं पत्रें अधिक शु० १३ स पाठविलीं तीं छ० २९ रबिलावलीं पंढरपुरीं पावलीं." इ० स० १७४६ चा मार्च म्हणजे शके १६६८ चा चैत्र महिना येतो. परंतु शके १६६८ त अधिक मास नव्हता. अधिक मास शके १६६९ स येतो व तो चैत्र महिना येतो. तो महिना म्हणजे इ० स० १७४७ चा मार्च महिना येतो. त्याचप्रमाणें पंतप्रधान यांचे शकावलींत भाऊसाहेब सावनूरच्या स्वारीहून २ रबिलावलीं पुण्यास परत आले असें लिहिलें आहे. तेंही बरोबर नाहीं. कारण वर नमूद केलेल्या पत्रांत नानासाहेब " भाऊंचे फार तर पंधरा दिवस तिकडे मोडतील " असें लिहितात, व त्या पत्राची पेवस्ती ६ रबिलावल अशी दिली आहे. तेव्हां हें पत्र पाठविण्यापूर्वीं ४ दिवस भाऊ पुण्यास येऊन पोहोंचले होते ही गोष्ट अगदींच असंभवनीय आहे. तेव्हां शकावलींत २ च्या ठिकाणीं २४ पाहिजेत. २ हा आंकडा चुकीनें पडला असावा. आम्हांस मिळालेल्या डायरींत २४ रबिलावल असें दिलें आहे तेंच खरें आहे.

रोजीं पुण्यास येऊन सुखरूप पोहोंचली. भाऊसाहेब यांचा पराक्रम पाहून शाहूमहाराज फार खूष झाले; व पूर्वी बाजीराव साहेबांचे हाताखालीं ज्याप्रमाणें चिमणाजी आप्पा यांस दुय्यम नेमिलें होतें त्याप्रमाणें या वेळीं त्यांनीं भाऊसाहेबांस नानासाहेबांच्या हाताखालीं दुय्यम नेमिलें.

राज्याची अंतस्थ सुधारणाः—नानासाहेब पुण्यास आल्यावर सुमारें ६ महिने तेथें राहिले. त्या वेळीं सर्वत्र बहुतेक शांतताच होती. वर सांगितलेल्या सहा महिन्यांत त्यांनीं राज्याच्या निरनिराळ्या खात्यांत सुधारणा केल्या. विशेष नमूद करण्यासारखी गोष्ट ह्मटली म्हणजे त्यांनीं शेतकीस उत्तेजन दिलें. राज्यांत त्यावेळीं पुष्कळ पडीत जमीन होती व तिची लागवड होत नसल्यामुळें राज्याचें पुष्कळ नुकसान होत असे. अशा प्रकारच्या पडीत जमिनी ज्या ज्या ठिकाणीं होत्या त्यांची तपासणी करून त्या शेतकरी लोकांस कांहीं वर्षेंपर्यंत फुकट लागवडीस दिल्या व त्या चांगल्या उत्पन्नास आल्या म्हणजे त्या त्यांना वंशपरंपरा देऊन त्याबद्दल कांहीं ठराविक सारा सालिना घ्यावा असें ठरविलें. वरील गोष्टीमुळें पुष्कळ जमिनीची लागवड होऊन हळूहळू राज्याचें उत्पन्नही वाढलें. यावरून राज्याची मुख्य संपत्ति शेतकरी लोक होत, हें मुख्य तत्त्व नानासाहेबांस पूर्णपणें अवगत होतें.

बुंदेलखंडच्या राजाशीं नवीन ठरावः—पूर्वीं इ० स० १७३३ त बुंदेलखंडचा राजा छत्रसाल[1] यानें बाजीराव साहे-

[1] ज्याप्रमाणें दक्षिणेंत शिवाजी महाराज त्याप्रमाणें बुंदेलखंडांत छत्रसाल राजा होऊन गेला. त्याच्या व शिवाजी महाराजांच्या चरित्रांत पुष्कळ साम्य आहे. त्याच्यावर मोंगलांनीं अनेक स्वाऱ्या केल्या, व त्या स्वाऱ्यांत

बांस आपला पुत्र असें मानून त्यांस आपल्या राज्याचा तिसरा भाग म्हणजे ३३ लाख रुपयांचें उत्पन्न दिलें होतें. छत्रसाल मृत्यु पावल्यावर मागें बरेच दिवस नीट सुरळीत व्यवस्था चालली होती. पुढें नानासाहेबांच्या कारकीर्दींत बुंदेलखंडाचे संबंधानें कांहीं भानगडी उत्पन्न झाल्या. तेव्हां इ० स० १७४७ त नानासाहेबांनीं तेथील राजाशीं नवीन ठराव केला. या ठरावा अन्वयें पूर्वीं मिळालेल्या मुलुखाशिवाय या वेळीं नानासाहेबांस साडे सोळा लक्षांचा ज्यास्त मुलुख मिळाला. त्याचप्रमाणें पन्ना[1] येथील प्रसिद्ध हिऱ्याच्या खाणींच्या उत्पन्नापैकीं तिसरा भाग मिळाला. नंतर नानासाहेबांनीं गोविंदपंत बुंदेले[2] यास त्या प्रांताचा पहिला कमाविसदार नेमिलें.

नानासाहेबांची हिंदुस्तानांत मोहीम—इ० स० १७४७ च्या दिंजबर महिन्याच्या प्रारंभीं नानासाहेबांची स्वारी उत्तर-हिंदुस्तानांत जाण्याकरितां पुण्याहून निघाली. त्या वेळीं भाऊ व दादा

[मा. पा. पुढें चालू.]

त्यानें मोंगलांची रग जिरवून टाकली. इ० स० १७३१ त मोंगलांचा माळवा व अलाहाबाद प्रांताचा सुभेदार महमदखान बंगश यानें बुंदेलखंडावर स्वारी केली. त्याचा पराभव करण्याइतकी छत्रसाल याची शक्ति नसल्यामुळें त्यानें बाजीराव साहेब त्या वेळीं माळव्यांत होते, त्यांना मदतीकरितां विनंती केली. तेव्हां त्यांनीं बंगष याच्या फौजेवर एकाएकीं हल्ला करून त्याच्या फौजेचा फडशा केला, व बंगष बुंदेलखंडांतून पळून गेला. त्या वेळीं छत्रसाल यानें आपल्या दोन पुत्रांप्रमाणें बाजीरावसाहेबांस तिसरा पुत्र असें मानून त्यांस ३३ लाख रुपयांचें उत्पन्न तोडून दिलें.

१ हिऱ्यांस पन्ने असें म्हणण्याचा जो प्रघात पडला आहे तो या खाणींच्या नांवावरून पडला आहे.

२ याचें मूळचें नांव गोविंद बल्लाळ खेर. तो कऱ्हाडे ब्राह्मण असून त्याचें मूळ गांव कोंकणांत रत्नागिरीच्या उत्तरेस सुमारें बारा मैलांवर नेवरें म्हणून खेडें आहे तें होय. गोविंदपंताची पुढें इतकी भरभराट झाली कीं, तो पुढें पेशव्यांसही डोईजड झाला.

यांस त्यांनीं आपणाबरोबर घेतलें होतें. नासिरजंग यानें पेशव्यांच्या मुलखांत कांहीं धामधूम केल्यामुळें नानासाहेब त्याचे पारिपत्याकरितां खानदेशांतून बेदरपर्यंत चाल करून गेले. तिकडून नासिरजंगही आपला कारभारी रामदासपंत यासह फौज घेऊन पेशव्यांवर चालून आला. उभय पक्षांची एक लहानशी चकमक झाली. पुढें आपसांत तह होऊन तें लढाईचें प्रकरण मिटलें. नंतर स्वारी तेथून परत फिरली, ती फेब्रुवारी महिन्याच्या प्रारंभीं पिंपरखेड, परगणे आहेर, येथें आली. तेथें भाऊसाहेबांची प्रकृति बिघडली म्हणून नानासाहेबांनीं त्यांस दादासाहेबांसह पुण्यास पाठवून दिलें, व खासा स्वारी उत्तर-हिंदुस्तानांत गेली. पुढें सवाई जयसिंग याचा पुत्र माधवसिंग याची मुक्काम बागथडी, परगणे तोंडा, प्रांत जयनगर येथें गांठ पडली. उभयतांच्या भेटी झाल्या. नंतर नानासाहेब आपल्या फौजेसह पावसाळ्यांत हिंदुस्तानांतच छावणी करून राहिले, व तिकडील खंडणी वसूल करून गंगेच्या कांठीं मखसुदाबाद शहर घेऊन प्रयागास गंगास्नान करून पावसाळा संपल्यावर स्वारी पुण्यास परत आली. या वेळीं शिंदे व होळकर यांस त्यांनीं आपणाबरोबर दक्षिणेंत आणिलें होतें. कारण त्या वेळीं साताऱ्यास शाहूमहाराजांची प्रकृति बिघडली होती, व दरबारांत त्यामुळें बऱ्याच भानगडी उपस्थित झाल्या होत्या. त्याचा इतिहास पुढें येईलच.

भाग सातवा.

—:०:—

इ० स० १७४८ हें वर्ष हिंदुस्तानचे इतिहासांत फार महत्त्वाचें आहे. कारण ह्या वर्षांत सर्व हिंदुस्तानांत मोठमोठया उला-

ढाली झाल्या. त्यांचा परिणाम सर्व देशावर व विशेषतः मराठयांवर काय झाला तो समजण्याकरतां त्या वर्षाचा सर्व हिंदुस्तानचा इतिहास देणें जरूर आहे.

अहमदशाहा अबदालीची हिंदुस्तानावर पहिली स्वारीः—

ज्यानें इ० स० १७६१ त मराठयांच्या राज्यवृक्षाच्या बुडाशीं जबरदस्त घाव घालून त्याची वाढ खुंटवून टाकिली, इतकेंच नव्हे, तर ज्या घावाच्या योगानें त्या वृक्षाच्या शाखा हळू हळू गळत जाऊन शेवटीं तो थोडक्याच अवकाशांत जमीनदोस्त जहाला, तो पुरुष कोण होता, हें कळणें अवश्य आहे. अहमदशाहा अबदाली हा एका अफगाण लोकांच्या टोळीच्या सरदाराचा मुलगा होता. नादिरशाहानें हिरात प्रांत घेतला, त्या वेळीं तो त्याच्या नोकरींत शिरला, व मोठमोठीं धाडसाचीं कृत्यें करून लवकरच फार प्रसिद्धीस आला. नंतर नादिरशाहानें त्याला हिरातचा सुभेदार नेमिलें. इ० स० १७४७ त नादिरशाहाचा एका अफगाण सरदारानें खून केला. तेव्हां अहमदशाहा आपल्या अफगाण फौजेसह हिरात येथून पळून गेला, व सर्व अफगाण लोकांनीं पुढें त्यास आपला बादशाहा केलें. त्याला हिंदुस्तानावर स्वारी करण्याचें मूळ जें कारण झालें तें येणेंप्रमाणेंः—

दिल्लीचा बादशाहा महंमदशाहा याचा वजीर कमरुद्दीनखान यानें आपल्या एका पुतण्यास मुलतान व लाहोर या प्रांतांचा सुभेदार नेमिलें होतें. पुढें या चुलत्यापुतण्यांचें कांहीं घरगुती कारणांवरून वांकडें आलें. तेव्हां त्या पुतण्यानें आदिनाबेग नांवाच्या सरदाराच्या नादीं लागून त्याच्याकडून अहमदशाहा अबदाली यास दिल्लीवर स्वारी करण्याची भर देवविली. पुढें आदिनाबेग यानें विश्वासघात करून

ती गोष्ट कमरुद्दीनखान यास कळविली. अदिनाबेग यानें आपला अशा रीतीनें विश्वासघात केला हें पाहून त्या पुतण्यानें कमरुद्दीनखान याची क्षमा मागितली. अशा रीतीनें एक बाजू पुरी झाली. परंतु निमंत्रणाप्रमाणें अहमदशाहा अबदाली बरोबर फौज घेऊन अफगाणिस्तानांतून खालीं उतरला, व त्यानें प्रथमतः मुलतान व लाहोर हीं शहरें घेतलीं, व तो दिल्लीवर चाल करून येऊं लागला. महंमदशाहानें आपली फौज गोळा केली, व तिच्यावर आपला पुत्र अहमद व वजीर कमरुद्दीनखान यांस देऊन अबदालीवर पाठवून दिलें. उभय पक्षांची सरहिंद येथें इ० स० १७४८ च्या मार्च महिन्यांत लढाई होऊन तीत अहमदशाहा अबदालीचा पराभव झाला, व तो मागें फिरला. परंतु कमरुद्दीनखान तोफेचा गोळा लागून मरण पावला. अहमद यानें त्याचा असा जोरानें पाटलाग केला कीं, त्याला थेट काबूलचाच रस्ता सुधारावा लागला. परंतु त्याच्या योगानें अहमदशाहाची हिम्मत न खचतां त्याला ज्यास्त ईर्षा उत्पन्न झाली, व त्यानें हिंदुस्तानावर स्वाऱ्या करण्याचा पुढें सपाटा लाविला. त्याच स्वाऱ्यांचा पानपतची लढाई हा शेवट होय. अशा रीतीनें मराठ्यांच्या राज्यास जें पुढें ग्रहण लागलें त्याचा वेध अदिनाबेग याच्या वर सांगितलेल्या कृत्यापासून सुरू झाला. या वेळीं दिल्लीच्या दरबारांतही मोठमोठ्या उलाढाली झाल्या. सरहिंदच्या लढाईत कमरुद्दीनखान मरण पावल्यावर महंमदशाहानें निजामउल्मुल्क यास आपली वजिरी देऊं केली. परंतु त्यानें बादशाहास असा निरोप पाठविला कीं, “ मीं आतां फार वृद्ध झालों आहे, व वजिरीच्या कामासारखें जबाबदारीचें काम आतां माझ्या हातून होणार नाहीं. ” तेव्हां बादशाहानें तें काम अयोध्येचा नवाब सफदरजंग यास सांगितलें. पुढें इ० स० १७४८ च्या

एप्रिल महिन्यांत महंमदशाहा मरण पावला. अहमद यास हें वर्तमान अबदालीचा पाठलाग करून परत येत असतां मार्गांत समजलें. तेव्हां तो ताबडतोब दिल्लीस आला व अहमदशाहा असा किताब घेऊन तख्तनशीन झाला.

निजामउल्मुल्क याचा मृत्युः—महंमदशाहा बादशाहा मरण पावल्यावर सुमारें दोन महिन्यांनीं म्हणजे ता० १९ जून इ० स० १७४८ रोजीं निजामउल्मुल्क बऱ्हाणपूर येथें मरण पावला. त्या वेळीं त्याचें वय १०४ वर्षांचें होतें. तो एक अद्वितीय पुरुष होता. दिल्ली येथें बादशाही सत्ता थोडीशी जीव धरून होती, ती मुख्यतः याच पुरुषाच्या कर्तृत्वशक्तीवर होय. नाहींतर मराठ्यांनीं दिल्लीची बादशाही कधींच रसातळास घालविली असती. त्याच्यामागें दिल्लीच्या दरबारीं सर्व हलकटपणा शिरून फार बखेडे माजले. त्याचा इतिहास पुढें येईलच. तो मरण पावला त्या वेळीं त्याचा वडील मुलगा गाजीउद्दीन ह्यास दिल्ली येथें अमीरउल्उमराव ही पदवी असून तो सेनापतीचें काम पहात होता. तेव्हां त्याचा दुसरा पुत्र नासिरजंग हा हैदराबाद येथें होता, त्यानें गाजीउद्दीन याचा गादीवरचा हक्क उडवून देऊन स्वतः गादीवर बसला. त्यामुळें हैदराबादच्या गादीसंबंधानेंही पुढें फार तंटे माजले. त्याचाही इतिहास पुढें येईल.

कर्नाटकांतील बखेडे:-इ० स० १७४४ त कर्नाटकची व्यवस्था लावून निजामउल्मुल्क हैदराबाद येथें परत आला. त्या वेळीं त्यानें अनवरुद्दीन नांवाच्या एका सरदारास कर्नाटक पैनघाटाचा सुभेदार नेमिलें व आपला नातू हिदायत मोहिद्दीनखान उर्फ मुजफरजंग यास कर्नाटक बालाघाटाचा सुभेदार नेमिलें. मुजफरजंग विजापूर येथें रहात असे. अनवरुद्दीन अर्काट येथें रहात असे.

निजामउल्मुल्काच्या मृत्यूचें वर्तमान त्यास समजतांच सर्व कर्नाटक-चा अम्मल आपण एकटयानें चालवावा या उद्देशानें त्यानें अनव-रुद्दीन याच्याशीं, वस्तुतः नासिरजंगाशीं तंटा उपस्थित केला, व चंदासाहेब व फ्रेंच लोक यांच्या मदतीनें त्यानें अंबूर येथें अनवरु-द्दिनावर हल्ला करून त्याचा पराभव केला, व त्यास ठार मारलें. दिल्लीच्या बादशाहाकडून नासिरजंग यास बोलावणें आलें होतें. त्यावरून तो या वेळीं नर्मदेपर्यंत आला होता. त्याला वाटेंतच मुज-फरजंगाच्या बंडाचें वर्तमान समजलें, व त्यामुळें पुढें जावें कीं मागें फिरावें अशा बुचकळ्यांत तो पडला; इतक्यांत आपण तूर्त इकडे येऊं नये, अशा प्रकारचा बादशाहाचा निरोप त्यास आला, व ती गोष्ट त्याचे फायद्यावरच पडली. तो ताबडतोब परत फिरला. मुज-फरजंगाचें पारिपत्य करण्याकरतां त्यानें रघूजी भोसले, याजपा-शीं मदत मागितली, व तीबद्दल त्याला कांहीं प्रांत देण्याचें कबूल केलें. त्याचप्रमाणें त्यानें कर्नाटकांत जे जहागीरदार व संस्थानिक मोगलां-चे आश्रित होते, त्यांना आपल्या मदतीस बोलाविलें. तो आपली फौज घेऊन कर्नाटकांत गेल्यावर त्याला म्हैसूरचा राजा, कर्नूल, कडप्पा, सावनूर येथील नबाब, अनवरुद्दिनाचा पुत्र महंमदअल्ली वगैरे आपल्या फौजेसह येऊन मिळाले. त्याचप्रमाणें मद्रास येथील इंग्लिशांच्या वसाहतींचा प्रेसिडेंट यानेंही आपली फौज या वेळीं नासिरजंगाच्या मदतीस पाठविली होती. इंग्लिश व फ्रेंच यांच्या युरोप खंडांत आपसांत लढाया सुरू होत्याच. परंतु त्या वेळपर्यंत त्या हिंदुस्तानांत सुरू झाल्या नव्हत्या. त्या आतां निरानिराळे पक्ष स्वीकारून सुरू झाल्या. त्याचप्रमाणें हिंदुस्तानच्या राज्यप्रकरणीं उलाढालींत त्यांनीं हात घातल्याचा हा पहिलाच प्रसंग होय. या

तंटयांचा पुढें काय परिणाम झाला, त्याचा या चरित्रांशीं फारसा संबंध नसल्यामुळें त्याचा इतिहास आम्हीं देत नाहीं. परंतु नासिरजंग आपल्या फौजेसह हैदराबाद सोडून कर्नाटकांत गेल्यामुळें नानासाहेबांस तो सर्व मुलूख मोकळा सांपडला होता. परंतु वर सांगितल्याप्रमाणें सातारा येथेंही त्या वेळीं कांहीं भानगडी उत्पन्न झाल्या होत्या. त्या उत्पन्न झाल्या नसत्या तर नानासाहेबांनीं आपला अतिशय फायदा करून घेतला असता, व निजामाचें राज्य मराठयांच्या राज्यांत तेव्हांच सामील झालें असतें. परंतु वर सांगितलेल्या कारणांमुळें त्यांना आपले सर्व हेतु एकीकडे ठेवून सातान्यास येणेंच भाग पडलें. त्याचा इतिहास येणेंप्रमाणें:—

शाहूमहाराजांच्या प्रकृतीची अस्वस्थता:—शाहूमहाराज बाल्यावस्थेपासून चोवीस वर्षांचे होत तोंपर्यंत औरंगजेबाचे कैदेंत होते परंतु औरंगजेबाची कन्या बेगमसाहेब हिची त्यांच्यावर पुत्रवत् प्रीति असल्यामुळें त्यांना तेथें दुःखाचा लेशही माहीत नव्हता; व त्यांचें आयुष्य ऐषआरामांत गेलें होतें. इ० स० १७०७ त औरंगजेब वारल्यानंतर त्यांची बंदीवासांतून मुक्तता झाली, व आपला गादीवरचा हक्क स्थापित करण्याकरतां त्यांना कांहीं दिवस ताराबाईशीं झगडावें लागलें. परंतु पुढें बाळाजी विश्वनाथासारखा शहाणा पुरुष राज्यकारभार चालविण्यास मिळाल्यामुळें ते पुनः ऐषआरामांत राहूं लागले; व त्या वेळेपासून इ० स० १७४० पर्यंतचा त्यांचा काल मोठ्या सुखानें गेला. पुढें जसें जसें त्यांचे उतार वय

---

१ संभाजीस औरंगजेबानें इ० स० १६८९ त ठार मारल्यावर त्याचा सरदार झुलपिकारखान यानें इ० स० १६९० त रायगडचा किल्ला घेऊन संभाजीच्या कुटुंबास कैद केलें होतें.

होऊं लागलें, तसतशी दुःखमालिकाही त्यांच्यामागें लागली. इ० स० १७४० त त्याची विरूबाई नांवाची आवडती दासी मरण पावली, तेव्हां त्यांना फार दुःख झालें. त्याचा थोडासा विसर पडतो आहे तों त्यांचा एकुलता एक पुत्र मरण पावला, व त्यामुळें पुनः त्यांचें मन उदास झालें. शाहूमहाराजांस दोन कुटुंबें होतीं. थोरल्या बाईचें नांव सकवारबाई, व धाकटीचें नांव सगुणाबाई असें होतें. सकवारबाई मोठी तापट बायको असून मोठी महत्त्वाकांक्षी होती. तिच्यापासून त्यांना फार ताप होत असे. सगुणाबाई मात्र त्यांच्या मर्जीप्रमाणें वागत असे. व त्यामुळें त्यांची तिच्यावर विशेष प्रीति होती. या दोघींमध्यें नेहमीं कांहीं तरी तंटे असत, व ते मिटवितां मिटवितां त्यांना पुरे पुरे होत असे. पुढें इ. स. १७४८त सगुणाबाई मरण पावली. तेव्हां तर त्यांच्या दुःखाची परमावधि झाली; व त्या दुःखामुळें त्यांना थोडासा भ्रमही झाला. नंतर सातान्यास रहाण्याचा त्यांस कंटाळा येऊन ते सातारा व माहुली यांचे दरम्यान् एक वाडी होती, तेथें जाऊन राहिले. तेव्हांपासून त्या वाडीला वनवासवाडी असें नांव पडलें. पुढें जसजशी त्यांची शक्ति क्षीण होत चालली, तसतसा त्यांचा भ्रम नाहींसा होत चालला. या वेळीं पेशव्यांच्या तर्फेनें त्यांचा दिवाण महादाजीपंत पुरंदरे व गोविंदराव चिटणीस हे महाराजांजवळ होते. पुरंदरे रोजची इत्थंभूत हकीगत नानासाहेबांस पुण्यास कळवीत असत. पुढें विशेष गडबड होण्याचा ज्या वेळीं संभव दिसला त्या वेळीं महादाजीपंतानें नानासाहेबांस सातान्यास बोलाविलें, व ते लगेच ३५ हजार फौज व आपले शिंदे व होळकर हे सरदार बरोबर घेऊन सातान्यास निघून गेले.

दत्तकाचे संबंधाचा विचारः—या वेळीं नानासाहेबांवर मोठा

आणीबाणीचा प्रसंग आला होता. कोणत्या वेळीं त्यांच्यावर काय प्रसंग गुजरेल याचा नेम नव्हता. दरबारांत त्यांच्याविरुद्ध बरीच मंडळी होती, व त्यांचीं त्यांच्याविरुद्ध कारस्थानें सुरू होतींच. महाराजांची प्रकृति दिवसेंदिवस क्षीण होत चालली होती. दत्तकाचे संबंधानें कांहींच विचार झालेला नव्हता. आपण ह्या दुखण्यांतून वांचत नाहीं, असें महाराजांस वाटूं लागलें होतें. पुढें महाराजांचे मागें कोण दत्तक घ्यावयाचा याचा निर्णय त्यांचे तोंडून करून घ्यावा, या उद्देशानें त्यांनीं एके दिवशीं महाराजांपाशीं त्या संबंधाचा प्रश्न काढला. त्यावेळीं ते ह्मणाले:—"पुत्र व्हावयाचा असता तर तसाच पुण्यवान् झाला असता, किंवा जो झाला तो तरी कां न वांचावा. तेव्हां पुत्रसुख पाहण्याचें आमचे नशिबीं नाहीं असेंच ह्मटलें पाहिजे. परंतु पुत्र घ्यावा तर थोरली धनीन (सकवारबाई) राहिली ती मनस्वी—चित्तांत येईल तो मनसोबा करतात. दत्तपुत्र घेऊन तुह्मां सर्वांच्या मसलतीनें राज्य करावें असें त्यांचे नशिबीं नाहीं. संभाजी राजे आहेत त्यांनाही संतती नाहीं; व तेही वृद्ध झाले, तेही राज्याचे धनी आहेत, परंतु तुह्मां सर्वांस घेऊन राज्य संभाळावें, अशी त्याच्या अंगांत कर्तबगारी नाहीं. दत्तपुत्र घेतलाच पाहिजे तेव्हां खानवटें, मुंगी, सिंगणापूर, हिंगणी, या सर्व ठिकाणीं बाबाजी[१]

१ हा भोसल्यांचा मूळपुरुष होय. शाहूमहाराज सातारच्या गादीवर आले, त्या वेळीं ताराबाईनें कोल्हापूर येथें दुसरी गादी स्थापन केली व आपला पुत्र शिवाजी यास गादीवर बसवून स्वतः राज्याचा कारभार पाहूं लागली. पुढें इ. स. १७१२ त शिवाजी मरण पावला त्या वेळीं रामचंद्रपंत बावडेकर वगैरे मंडळीनें ताराबाईची सवत राजसबाई हिचा पक्ष उचलून तिचा पुत्र संभोजी यास गादीवर बसविलें, व ताराबाईस कैद केलें. तिची सून भवानीबाई त्या वेळीं गरोदर होती. तिला पुढें पुत्र झाला. त्या मुलाला राजसबाई कदाचित् ठार मारील ह्या भितीनें मूल मेलें असें ठरवून ताराबाईनें गुप्तपणें त्याला बावडेकरांचें घरीं पोहोंचतें केलें.

महाराजांचा वंशविस्तार आहे. तेव्हां त्यापैकीं जो राजचिन्हांनीं योग्य असेल त्याला दत्तक घ्यावें असें आम्हांला वाटतें." सकवारबाईला ती गोष्ट पसंत पडेना. आपण मनास वाटेल तो दत्तक घेऊन त्याला राज्यावर बसवूं, असें तिचें म्हणणें होतें. ताराबाई ह्या वेळीं साताराच्या किल्ल्यावर होती. तिला हें वर्तमान समजलें तेव्हां तिनें महाराजांस असा निरोप पाठविला कीं, "बाहेरचा मुलगा पाहण्याची मला विशेष जरूरी दिसत नाहीं. मागें माझा पुत्र शिवाजी हा वारला (इ०स०१७१२)त्या वेळीं त्याची स्त्री भवानीबाई ही गरोदर होती. तिला पुढें मुलगा झाला, त्याला मी गुप्तपणें प्रथमतः बाजीराव भगवंतराव बावडेकर यांचें घरीं ठेविला होता. नंतर तो पांच वर्षांचा झाल्यावर त्याला मी पानगांवीं त्याची मावशी दर्याबाई निंबाळकर हिच्या घरीं पाठवून दिलें, व तेव्हांपासून तो तिच्याच घरीं आहे. तेव्हां अस्सल वंश जिवंत असतां बाहेरचा मुलगा दत्तक घेणें रास्त होणार नाहीं." महाराजांस तें वर्तमान समजतांच त्यांनाही ती गोष्ट मानविली, व यशवंतराव पोतनीस यास बावडेकरांकडे त्या मुलाचा शोध करण्याकरतां पाठवून दिलें. नंतर तो मुलगा अस्सल वंश आहे, अशी महाराजांची खातरी झाल्यावर त्यांनीं आपल्या प्रधानमंडळीस सांगितलें कीं, "अस्सल वंश जिवंत असतां परका दत्तक घेऊन निभाव लागणार नाहीं, बखेडे माजतील. तेव्हां आमचे मागें त्या मुलास आणून गादीवर बसवावें, व सर्वांनीं एका विचारानें हें राज्य संभाळावें." सकवारबाईस हें वर्तमान समजलें तेव्हां तिची तळपायाची आग मस्तकास गेली, व तिनें निराळेंच राज्यकारस्थान आरंभिलें. ताराबाईचा नातू गादीवर आला तर सर्व राज्यसूत्रें ताराबाईच्या हातीं जाऊन आपणास तिचें अंकित रहावें लागेल, ही अपमानाची गोष्ट सकवारबाईसारख्या मानी बायकोस कशी सहन

व्हावी.[१] तेव्हां तिनें तो सर्व बेत हाणून पाडण्याचा निश्चय केला. ती नानासाहेबांचा पूर्वीपासून द्वेष करीतच होती, व आतांचें हें कारस्थान पेशव्यांचेंच आहे, असें तिला वाटत होतें. त्यामुळें ती त्यांचा अधिकच द्वेष करूं लागली. तिनें नानासाहेबांच्या विरुद्ध जी मंडळी होती त्यांना आपल्या कटांत घेतलें; जगज्जीवनराव प्रतिनिधी व यमाजी शिवदेव यांचें तिला पूर्ण पाठबळ होतें. तिनें कोल्हापुरच्या संभाजी महाराजांस कळविलें कीं, ताराबाई ज्याला आपला नातू असें ह्मणते तो तोतया आहे, व त्याचा या गादीवरचा हक्क उडविण्याकरतां तुह्मीं मला मदत करावी; व तुह्माला लागेल ती मदत करावयास मीही तयार आहें. या वेळीं दमाजी गायकवाड यानेंही सकवारबाईस मदत करण्याचें वचन दिलें होतें. तसेंच ताराबाईचा नातू राजाराम गादीवर आला तर लोकांना बंड करण्यास उद्युक्त करावें या उद्देशानें तिनें आपल्या पक्षाची कांहीं मंडळी कोंकणांत व घाटमाथ्यावर पाठवून दिली होती. पानगांवीं राजारामाचा बंदोबस्त करण्याकरतां तिनें खंडेराव न्यायाधीश यास रवाना केलें, व सातारच्या किल्ल्यावरील शिबंदीस अनुकूल करून घेऊन त्यांना ताराबाईचा बंदोबस्त सांगितला. अशा रीतीनें राज्याच्या उलाढालीची तिनें मोठ्या जारीनें खटपट सुरू केली.

नानासाहेबांची त्या वेळची स्थिति :—नानासाहेब इ०स० १७४९ च्या आगस्ट महिन्याच्या २१ व्या तारखेस सातान्यास आले होते, व तेव्हांपासून दरबारांत काय काय प्रकार चालले होते, ते शांतपणें पहात होते, व आंतून त्यांच्याविरुद्ध ज्या खटपटी चालल्या होत्या त्यांच्या प्रतीकाराचे प्रयत्न करीत होते. मध्यंतरी त्यांच्यावर एक मोठा घाला पडला. ते सातान्यास आले त्या वेळीं त्यांनीं आपणा-

---

१ श्रीपतराव प्रतिनिधी इ. स. १७४७ त वारला व त्याचेमागें प्रतिनिधी पद जगज्जीवनराव यास मिळालें होतें.

बरोबर जनूभाऊंस आणिलें होतें, व भाऊ व दादा यांस पुण्यास ठेविलें होतें. सपटंबर महिन्यांत जनूभाऊ आजारी पडले, व त्यांतच त्यांचा अंत झाला. जनूभाऊ वारल्यामुळें नानांस अतिशय दुःख झालें; परंतु तें दुःख करण्याची वेळ नव्हती. त्यांचें सर्व लक्ष महाराजांचेमागें राज्याची स्थिति काय होणार या गोष्टीकडे लागलें होतें. सकवारबाईचीं सर्व कारस्थानें त्यांना समजत होतीं. परंतु आतांच आपण उघडपणें त्यांचा प्रतीकार केला, तर आतांच बखेडे माजतील, व महाराजांस तेणेंकरून दुःख होईल, म्हणून ते स्वस्थ बसले. सकवारबाईचीं आंतून फार मोठमोठीं कारस्थानें सुरू होतीं. बाहेरून मात्र "महाराजांचेमागें मला जगून काय करावयाचें आहे? मी सती जाणार." असें ती बोलून दाखवीत असे.

शाहूमहाराज नानासाहेबांस राज्याच्या संबंधानें यादी करून देतातः—महाराजांचें दुखणें दिवसें दिवस विकोपास जात होतें. सकवारबाईनें त्यांच्या जवळचीं सर्व माणसें आपल्या तर्फेचीं ठेविलीं होतीं, व ती नानासाहेब, गोविंदराव चिटणीस, यशवंतराव पोतनीस, वगैरे मंडळीची व महाराजांची गांठच पडूं देईना. तेव्हां आपल्यामागें आपल्या राज्याची धुळधाण होणार, असें त्यांस वाटूं लागलें, व तेणेंकरून त्यांस अतोनात दुःख होऊं लागलें. रघूजी भोसले, सेनापति दाभाडे, प्रतिनिधी वगैरे आपल्या सरदार व मानकरी मंडळींत पेशव्या इतका शहाणा व कर्ता पुरुष दुसरा कोणीही नाहीं, अशी त्यांची खात्री झालेली होती. आपल्या राज्याचें धुरीणत्व कोणातरी खंबीर पुरुषाचे हातीं दिलें नाहीं तर मराठ्यांचें राज्य लौकरच नष्ट होईल, असें त्यांस वाटूं लागलें. तेव्हां त्यांनीं गोविंदराव चिटणीस वगैरे यांच्या सल्ल्यानें पुढें राज्याची

काय व्यवस्था करावयाची त्या संबंधानें नानासाहेबांच्या नांवाची एक यादी तयार केली, व पुढें नानासाहेब त्यांच्या भेटीस आले तेव्हां ती त्यांस दिली. तींत माझेमागें राजाराम यास दत्तक घेऊन राज्य चालवावें, पूर्वीप्रमाणें आहे तसें चालवून राज्याचें रक्षण करावें, कोल्हापुरचें व हें राज्य एक करूं नये, इत्यादि मजकूर होता.

१. नानासाहेबांचा ओढा पहिल्यापासून कोल्हापुरच्या संभाजी महाराजांकडे होता, व ती गोष्ट शाहूमहाराजांस माहीत होती. म्हणून त्यांनीं हें कलम मुद्दाम घातलें होतें. इ० स० १७४० त चिमणाजी आपा व नानासाहेब यांनीं संभाजी महाराजांस जो करार लिहून दिला होता, त्यावरून पाहिलें तर त्या वेळीं कोल्हापुरचें व सातारचें राज्य एक करावें असा नानासाहेबांचा हेतु होता. परंतु शाहूमहाराजांस ती गोष्ट पसंत नसल्यामुळें त्यांना तसें करतां आलें नाहीं. नानासाहेबांच्या हेतूप्रमाणें ती दोन राज्यें त्या वेळीं एक झालीं असतीं तर त्यापासून मराठी राज्याचा बराच फायदा झाला असता. हा करार शेवटीं उपसहारांत दिला आहे.

२ वर सांगितलेली यादी काव्येतिहाससंग्रहांत शाहूमहाराजांचे चरित्रांत दिलेली आहे, व याच संबंधाच्या दुसऱ्या दोन यादी भारतवर्षाच्या ९ व्या अंकांत प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यांचे उतारे येणेंप्रमाणें:—

शाहूमहाराजांनीं पेशव्यांस दिलेली यादी:—“राजमान्य राजश्री प्रधान पंडित यांस आज्ञा: तुम्ही फौज धरने आज्ञा केली त्यांच्या दैवीं नाहीं, महाराजांस दुखणें झालें, नाही बरें होत नाहीं. राज्यभार चालला पाहिजे तरी पुढें वंस वसवन कोल्हापुरचे न करने. चिटनिसास सर्व सांगितलें तसें करावें. वस होईल त्याच्या आज्ञेत चालने, राजमंडळ चालने. चिटनीस स्वामीचे इसवासू. त्याच्या विचारें राज्य राखने. वंस होईल तो तू× × ×करनार नाहीं. सुदन असा.” या यादीच्या खरेपणाविषयीं ग्रांडडफ वगैरे इतिहासकार शंका घेतात. परंतु त्या वेळचा विचार केला तर व नानासाहेबांच्या योग्यतेबद्दल शाहूमहाराजांची जी खातरी झाली होती ती लक्षांत आणिली तर, अशा प्रकारची यादी दिल्याच्या संबंधानें फारशी शंका घेण्याचें कारण नाहीं. नानासाहेबांनीं ती बनावट केली असती तर शाहूमहाराजांचेमागें मराठ्यांत जे लढे उत्पन्न झाले त्यांत या गोष्टीची परिस्फुटता झालीच पाहिजे होती, व

बाजीराव यादव, चिंतो वामन सागांवकर, अतुर्बळीपंत, मोरो शिवदेव थिटे, व ताराबाईच्या पदरीं रुस्तुमराव जाधव नांवाचा

रघूजी भोसले, दाभाडे, गायकवाड, प्रतिनिधी, वगैरे पेशव्यांच्या विरुद्ध पक्षाची मडळी लगेच त्यांच्याविरुद्ध उठली असती. त्याचप्रमाणें कोल्हापूर व सातारा या दोन गाद्या नानासाहेबांनी त्याच वेळीं एक केल्या असत्या. परंतु ज्या अर्थी असा कांहीं एक प्रकार झाला नाहीं, त्या अर्थी ही यादी शाहु-महाराजांनीं स्वदस्तरची दिली असावी असें म्हणावें लागतें. आतां इतकी गोष्ट खरी आहे कीं, ज्या वेळीं ही यादी महाराजांनीं पेशव्यांस दिली, त्या वेळीं महाराजांनीं बोलाविल्याप्रमाणें रघूजी भोसले किंवा दाभाडे यांपैकीं कोणी तरी आला असता तर त्यांनी त्या यादींत फौजचा अधिकार जो पेशव्यांस दिला तो त्यांना न देतां कदाचित वर सांगितलेल्या दोन सरदारांपैकीं कोणा तरी एकास दिला असता असें मानण्यास जागा आहे.

भारतवर्ष अंक ९ पत्र ५५ यांत दिलेली यादीः—"यादी पेश-व्यांचें ह्मणणें शपथवचन असावें. त्यांनी येणेप्रमाणें चालावें:—पेशव्याखेरीज राज्य राखून चालावयाजोगें कोण्ही नाहीं हे खातरजमा जाहली. त्यांनीं वंश करवीरचे न करतां बसऊन त्याच्या आज्ञेप्रमाणें चालावें. हुजूर खासगी खर्च आहे तसा चालावा. ज्याजकडून नेमणूक ती यावी. हुजूर महाल, गांव, किल्ले, कोट दरोबस्त आहे तसें चालवावें. ज्याचे हवाली जी केली त्याची आनावी कसर (?) महाराजांचें कर्ज वारनें करार त्याप्रमाणें करावें. खत कोठे ठेवू नये. ज्यास जे वचन दिल्हे ते चालावें. सरदार, कारकून, चाकर सर्व राजमडळ त्यांस महाराजांनी दिल्हे त्याचें त्याजकडे चालून त्याचे काम त्याचे हातें करावें. कोन्हास अंतर देऊं नये. देवडयांकडे (राण्याकडे) नेमणूक आहे ती खर्चाप्रमाणें राखून खासगीकडे ओढावे. तुमची खातरजमा चिटणिसांनी केली त्याप्रमाणें निष्ठेनें राज्य राखून सेवा करणे. राज्य राखावें ह्मणजे कल्याण होऊन यश येईल. या-प्रमाणें महाराजांचे पाय दिव्य. आज्ञा प्रमाण."

भारतवर्ष, अंक ९, पत्र ५६ याचा उतारा:—"श्री बाळाजी पंडित प्रधान यांस शाहूमहाराजांचें पत्र. राजमान्य राजश्री बाळाजी पंडित प्रधान आज्ञा जे. राज्यभार तुम्ही चालवाल हा स्वामीस भरंवसा आहे. पहिलें सांगितले खातरजमा चिटणीसांनीं असल केला. मस्तकावर हात ठेविला आहे. वंश होईल तो तुमचे प्रधान चालवील. करील अंतर ती सफत आहे. त्याचे आज्ञेत चालून सेवा करनें. राज्य राखणे.' बहुत काय लिहिणें सुज्ञ असा. (हे दस्तुरखुद्द शाहूमहाराजांचा असे)."

एक कोल्हापुरचा सरदार होता तो, या सर्वांस कोल्हापुराकडील बंदोबस्त सांगितला; साताऱ्च्या किल्ल्यावर आनंदराव जाधव हवालदार व जोतीबा अनंत सुभेदार यांस महादाजीपंत पुरंदरे व गोविंदराव चिटणीस यांस मध्यस्थीस घालून वश केलें व त्यांना साताऱ्च्या किल्ल्याचा बंदोबस्त सांगितला. पानगांवीं राजारामास सकवारबाईच्या पक्षाची मंडळी कदाचित् अपाय करतील ह्मणून त्यांच्या बंदोबस्ताकरतां पांचशें स्वार पाठवून दिले. अशा रीतीनें त्यांनींही आंतून बंदोबस्त चालविला होता. सकवारबाईनें नानासाहेब वाड्यांत आले ह्मणजे त्यांचा घात करावा अशा उद्देशानें जिन्यांत मारेकरी वगैरे ठेविले. परंतु तो तिचा दुष्ट हेतु साधला नाहीं. त्यांना हें वर्तमान समजलें तेव्हांपासून वाड्यांत महाराजांचे भेटीस जाणें झालें तर ते हजार पांचशें लोक बरोबर घेऊन प्रथमतः नीट तपास करून नंतर जात असत. एके दिवशीं सकवारबाईनें आपला सर्व बेत महाराजांस कळविला. तेव्हां तिच्या कारस्थानांचा पल्ला किती पोहोंचला आहे, याचा अदाज पहावा ह्मणून शाहूमहाराजांनीं तिला प्रश्न केला कीं, " तुझें राजकारण शेवटास नेणारीं विश्वासु माणसें तुझ्याजवळ कोण आहेत ? " तेव्हां तिनें जगज्जीवनराव प्रतिनिधी, यमाजी शिवदेव, दाभाडे वगैरे मंडळीचीं नांवें सांगितलीं. तेव्हां महाराजांनीं पुनः तिला सांगितलें कीं, " दाभाडे तर लांब राहिले, ही गोष्ट फौजेशिवाय पार पडणार नाहीं. तर तुम्ही आपल्या विश्वासु मंडळीस फौज गोळा करण्यास सांगावें. " त्यावरून तिनें प्रतिनिधी व यमाजी शिवदेव यांस सांगून सहा सात हजार फौज गोळा केली. त्या वेळीं आपल्यामागें कांहीं तरी दंगा खास होणार अशी महाराजांची खातरी झाली, व त्यांनीं नानासाहेबांस त्या गोष्टीचा इषारा देऊन फौज गोळा करण्यास सांगितलें. त्यांना हें स्वप्न अगोदरच

पडलें होतें. ह्मणून त्यांनीं अगोदरच पस्तीस हजार फौज साताऱ्यास आणून ठेविली होती. महाराजांनीं अंतकाळीं एकवार आपल्या सर्व सरदारांस भेटावें या हेतूनें रघूजी भोसले, सेनापति दाभाडे, दमाजी गायकवाड वगैरे मंडळीस साताऱ्यास बोलाविलें होतें. परंतु त्या प्रसंगीं त्यांपैकीं कोणीही आला नाहीं. सकवारबाईचीं कारस्थानें सुरू होतींच. यमाजी शिवदेव यानें आपला भाऊ अंताजी शिवदेव याच्याबरोबर कांहीं लोक देऊन त्याला साताऱ्च्या किल्ल्यावर ताराबाईचा बंदोबस्त करण्याकरितां पाठवून दिलें; परंतु नानासाहेबांनीं किल्ल्यावरील सुभेदार व हवालदार यांस त्याची बातमी देऊन त्या लोकांस किल्ल्यावर चार दिवस अडकवून ठेवण्यास सांगितलें. सकवारबाईस मदत करण्याचे हेतूनें कोल्हापुरचे संभाजी महाराजही फौज घेऊन निघाले होते. परंतु नानासाहेबांनीं त्यांचे कारभारी व जिजाबाई यांस आंतून पत्रें पाठवून त्यांस परत फिरविलें. अशा रीतीनें सकवारबाईच्या बहुतेक मदतगारमंडळीचा नानासाहेबांनीं शक्य तो बंदोबस्त केला. महाराजांचें दुखणें दिवसेंदिवस विकोपास जातच होतें. शेवटीं ता० १५ डिसेंबर इ० स० १७४९ रोजीं प्रातःकाळीं चार घटका दिवसास ते सातारा येथें कैलासवासी झाले.

सकवारबाई सती जाते:—शाहूमहाराजांच्या मृत्यूमुळें सर्व सरदार, मानकरी व शहरवासी लोक यांस अतिशय दुःख झालें. नानासाहेबांसही त्या वेळीं फार दुःख झालें. पण तें दुःख करीत बसण्याची वेळ नव्हती. प्रसंग मोठा आणीबाणीचा होता, व त्या वेळीं भयंकर दंगा होण्याचा संभव होता. नानासाहेब पूर्वीपासून सावध होतेच. महाराज वारतांक्षणींच त्यांनीं आपली सर्व फौज शहरांत आणिली व शहरची नाकेबंदी करून राजवाड्यासमोर चौक्या बसविल्या. त्याचप्रमाणें त्यांनीं जगजीवनराव प्रतिनिधी व यमाजी शि-

वदेव यांस कैद करून त्यांच्या वाड्यांसभोंवार पहारे ठेविले. प्रतिनिधीस पुरंदर किल्ल्यावर पाठविलें व यमाजी शिवदेव यास [१]कावनई किल्ल्यावर कैदेंत ठेविलें. प्रतिनिधी व त्याचा मुतालीक यांचा अशा रीतीनें बंदोबस्त केल्यावर नानासाहेब पुढील उद्योगास लागले. त्यांनीं सकवारबाईचा बाप [२]कुंवरजी शिरके यास गोविंदराव चिटणीस याचे वाड्यांत बोलावून आणून त्यास सांगितलें कीं, "बाईसाहेबांची मर्जी कशी आहे? महाराजांसारखें रत्न गेलें. पुढें राज्यकारभार चालणें, त्यास आह्मांस सर्वांस घेऊन महाराजांची आज्ञा झाली आहे त्याप्रमाणें राज्याचे अधिकारी करून करावयाचें आहे. आम्हीं सर्व आज्ञांकित. महाराज तेच बाईसाहेब आहेत. किंवा सहगमन करण्याचा संकल्प आहे तें विचारून यावें." कुंवरजीनें तें सर्व वर्तमान सकवारबाईस जाऊन सांगितलें. त्या वेळीं तिच्या मनांत असें आलें कीं, राज्याचीं सर्व सूत्रें पेशवे व चिटणीस यांचे हातीं गेलींच आहेत. ताराबाईचा नातू गादीवर आला म्हणजे ताराबाईचा वरपगडा असणार व आपणास तिचे तंत्रानें वागावें लागणार. प्रतिनिधी, यमाजी शिवदेव वगैरे मंडळींची कुवत न पाहतां आपण त्यांचे नादास लागलों. पेशवे, चिटणीस यांचेसारखे कर्ते मुत्सद्दी हातचे गमावले ही मोठी चुकी झाली. आतां जिवंत राहण्यापेक्षां सती जाणें हेंच उत्तम. तेव्हां तिनें नानासाहेबांस निरोप पाठविला कीं, "मला सती जाणें आहे, झाली ती गोष्ट बरीच झाली. महाराज गेले. आम्हांस रहावयाचें नाहीं. तुम्ही सर्व

१ म. इ. सा. खंड ३ पत्र नंबर १३९. पेशव्यांचे शकावलींत यमाजीस अणकाई किल्ल्यावर ठेविलें असें दिलें आहे ती चुकी असावी.

२ ग्रांडडफचे इतिहासांत कुवरजी शिरके हा सकवारबाईचा भाऊ होता असें दिलें आहे.

महाराजांची जशी आज्ञा झाली असेल तसें करून राज्य राखावें." नानासाहेबांस हा निरोप कळला तेव्हां त्यांनीं दोन पालख्या तयार केल्या. सर्व मंडळी राजवाड्यांत जमा झाली. दोन्ही पालख्यांत सर्व राजोपचार, वस्त्रें, अलंकार, जवाहीर घालून एकींत महाराजांचें शव ठेविलें व दुसरींत सकवारबाईस बसविलें. नंतर सर्व मंडळी कृष्णावेण्यासंगमीं माहुली येथें आली. तेथें सकवारबाईनें मोठा दानधर्म केला व ती महाराजांबरोबर सती गेली. त्यांचें उत्तर-

---

१ या संबंधानें ग्रांटडफ यानें असें लिहिलें आहे कीं, पेशव्याच्या धूर्तपणामुळें आपलीं सर्व कारस्थानें उघडकीस आलीं असें पाहून सकवारबाई अतिशय गांगरून गेली, व तिला रागही आला. तशांत तिला ज्यास्त चिडवावें ह्मणून बाळाजी बाजीरावानें लबाडीनें असा निरोप पाठविला कीं, "आम्ही सर्व आपले आज्ञेप्रमाणें चालण्यास तयार आहों, तर बाईनीं सहगमनाचा विचार रहित करावा." त्यामुळें तर तिला फारच संताप आला. अशा रीतीनें सकवारबाईस जितीं लावूनच तो स्वस्थ बसला नाहीं. त्यानें तिचा भाऊ कुवरजी शिरके यास बोलावून आणून असें सांगितलें कीं, "आतां तुमची बहीण सती गेली नाहीं तर तुमच्या कुलाला केवढा कलंक लागेल याचा तुम्ही विचार केला पाहिजे. ह्मणून तुम्हीं हरप्रयत्न करून तिला सती घालवावें. तसें झालें तर तुमच्या शिरके कुलाचाच काय पण सर्व मराठी राज्याचा बोज राहील. ह्या कामगिरीबद्दल तुह्मांस कोंकणांत मोठी जहागीर मिळेल." अशा निंद्य कृतीनें बाळाजीनें सकवारबाईस आपल्या मार्गांतून काढलें. पेशव्याच्या देशबंधूंपैकीं ज्यांना ह्या कृत्याचें हृद्गत माहिती आहे ते या कृत्यावर धर्माचें पांघरूण घालून तें झांकण्याचा प्रयत्न न करितां बाळाजीस या संबंधानें दोषच देतात; सकवारबाईस ठार मारण्याकरितां त्यानें दुसरी एकादी युक्ति लढविली असती तर तें त्याचें कृत्य कमी दोषास्पद झालें असतें. डफसाहेबांनीं वर जें विधान केलें आहे, त्यास मराठी बखरींतून कोठें आधार मिळत नाहीं. त्यानें नानासाहेबांवर जो भयंकर आक्षेप घेतला आहे तो अयोग्य आहे असें आमचें मत आहे. सकवारबाई बाळाजीच्या चिथावणीनें सती गेली नसून आपल्या खुषीनें सती गेली असली पाहिजे. मानवी स्वभावाचें जरा बारकाईनें निरीक्षण केलें तर असें दिसून येईल कीं, सकवारबाईला त्या वेळीं सती जाण्याशिवाय गत्यंतर नव्हतें. आपण अशी कल्पना करूं कीं, कोणी एकानें एखादी जोखमेची कामगिरी अंगावर घेतली, व त्या कामांत प्रतिपक्षास ठार मारण्याचा प्रयत्न करण्यापर्यंत त्यानें आपली पराकाष्ठा केली; पण शेवटीं तोच उलट प्रतिपक्षाच्या हातांत सांपडला. अशा स्थितींत

कार्य मालोजी भोसले मुंगीकर यानें केलें. ज्या ठिकाणीं सकवारबाई सती गेली तेथें एका पाषाणमूर्तीची व लिंगाची स्थापना केलेली आहे. ह्या गोष्टीस आज दीडशें वर्षें होऊन गेलीं व कृष्णा व वेण्या या नद्यांस दर वर्षी महापूर येऊन मोठमोठे दगड वाहून जातात. तथापि तें लिंग व ती मूर्ति अद्यापि तेथें कायम आहे.[1]

शाहू महाराजांची कारकीर्दः—शाहूमहाराज शूर, दानशूर दूरदृष्टी व चतुर होते. त्यांना माणसाची फार उत्तम पारख असून भूतदया हा गुण त्यांचे अंगीं विशेष होता. ते मोठे भाग्यशाली होते. त्यांना मंत्रिमंडळ मिळालें होतें तें फार उत्तम होतें. लहानपणापासून औरंगजेबबादशाहाची कन्या रोषनार बेगम हिनें त्यांना पुत्राप्रमाणें पाळल्यामुळें त्यांचा स्वभाव विलासी व चैनी बनला होता. स्वतः आंगमेहनतीनें कामकाज करण्याची त्यांस सवय नव्हती. तेव्हां मंत्रिमंडळावर राज्यभार सोंपवून ते स्वस्थपणें विलास भोगीत पडलेले होते. त्यांच्या कारकीर्दीत मराठ्यांची सत्ता एकसारखी वाढत होती.

बेअब्रु करून घेण्यापेक्षां तो मनुष्य प्राण देण्यास तयार होतो. मग हें तर काय? सकवारबाईसारख्या गर्वीट व महत्त्वाकांक्षी राणीचें राज्याची उलथापालथ करण्याचें वडें कारस्थान; प्रतिनिधी, यमाजी शिवदेव, दाभाडे, गायकवाड वगैरे मंडळींचें पाठबळ; जवळ आठ दहा हजार फौज. इतकी जय्यत तयारी असून सकवारबाईला यश आलें नाहीं. तेव्हां मागें राहून ज्या पेशव्यांचा आपण द्वेष केला त्यांच्या ओंजळीनें पाणी पिण्यापेक्षां आपल्या धर्मशास्त्राप्रमाणें सहगमन करण्याची जी अमूल्य संधि आली आहे तिचा योग्य फायदा घेऊन स्वार्थ व परमार्थ हे एकदमच साधावे, असें त्या मानी स्त्रीला वाटून ती सती जाण्यास तयार झाली असली पाहिजे. यांत बाळाजी बाजीरावावर मुळींच दोष येत नाहीं.

१ सकवारबाई सती गेली त्या वेळची अशी एक चमत्कारिक गोष्ट बखरींत लिहिली आहे कीं, शाहूमहाराजांचा आवडता कुत्रा या प्रसंगी माहुलीस आला होता. प्रेतदहन झाल्यावर मंडळी परत फिरली त्यांत महाराजांची पालखी त्यास दिसेना. तेव्हां त्या कुत्र्यानें नदीचे कांठीं आपलें डोकें आपटून प्राण दिला. या कुत्र्याचेंही तेथें थडगें आहे.

ते राज्यपदारूढ झाले तेव्हां मराठ्यांच्या खास अमलाखालीं फारच थोडा मुलूख होता. परंतु त्यांच्या कारकीर्दीच्या अखेरीस हिंदुस्तानच्या बऱ्याच भागावर मराठ्यांची सत्ता पसरली. होती. बुंदेलखंडाचा तिसरा भाग त्यांच्या ताब्यांत आला होता. रजपूत संस्थानांपैकीं कांहीं त्यांनीं जिंकून घेतलीं होतीं; कांहीं त्यांस कारभार देत होतीं व जीं कांहीं स्वतंत्र होतीं तीं त्यांच्या स्नेहाची अपेक्षा करून होतीं. हैदराबादचा निजाम त्यांस चौथाई व सरदेशमुखी देत होता. बंगाल प्रांतावर रघूजी भोंसले यानें मराठ्यांचें वर्चस्व स्थापिलें होतें. कर्नाटकांतील सर्व संस्थानिक व सावनूर, बेदनूर, कडपा, येथील नबाब त्यांस खंडणी देत होते. कोंकण प्रांतांतून पोर्तुगीज लोकांचा अंमल नाहींसा होऊन तो सर्व प्रदेश मराठ्यांचे ताब्यांत आला होता. अशा रीतीनें शाहूमहाराजांचे अंतसमयीं हिंदुस्तानच्या बहुतेक भागावर मराठ्यांचीं छाप बसली होती. परंतु त्यांचेमागून जे पुरुष साताऱ्च्या गादीवर आले ते दुर्बल, कर्तव्यहीन, व तेजोहीन असल्यामुळें साताऱ्च्या महाराजांचें वैभव पुढें कमी झालें. अशा प्रकारचे पुरुष आपल्यामागें गादीवर येणार असें शाहूमहाराजांस जसें काय स्वप्नच पडलें होतें, म्हणून त्यांनीं “ मराठ्यांचा भगवा झेंडा किन्नर खंडांत नेऊन रोंवावा ” हा जो त्यांचा अंतिम हेतु तो साधण्याकरितां अंतसमयीं राज्याचीं सर्व सूत्रें नानासाहेबांसारख्या खंबीर पुरुषाचे हातीं दिलीं. वर सांगितलेल्या त्यांच्या हेतूप्रमाणें पुढें राघोबा भरारीनें इ.स. १७५८ त मराठ्यांचा झेंडा अटकेपार नेऊन रोंविला. हा जो मराठ्यांनीं दिग्विजय केला तो शाहूमहाराजांच्या दूरदर्शीपणाचें फल होय. कारण त्यांनीं मरणसमयीं जी राज्याची व्यवस्था केली ती केली नसती तर मराठ्यांचें राज्य जें पुढें सुमारें पाऊणशें वर्षें चाललें होतें तें तसें चाललें नसतें व शाहूमहाराजांचा अंत हा मराठी राज्याच्या विलयाचा प्रारंभ झाला असता,

मराठ्यांचे आपसांतील तंटे विकोपास जाऊन दाराशीं येऊन बसलेल्या शत्रूंचें चांगलें फावलें असतें, मराठ्यांमध्यें शेंकडों लहान लहान संस्थानें झालीं असतीं, व निजाम, हैदरअली यांसारख्या बलिष्ट शत्रूंनीं त्या सर्वांस एकामागून एक गट्ट करून टाकिलें असतें.

भाग आठवा.

—:०:—

रामराजे यांस राज्याभिषेकः— शाहूमहाराज मरण पावल्यानंतर ताबडतोब नानासाहेबांनीं बापूजी खंडेराव, ताराबाईकडील कारकून चिंतो विनायक, लिंबाजी अनंत, इंद्राजी कदम वगैरे मंडळीस बरोबर फौज देऊन ताराबाईच्या विचारानें राजारामास आणण्याकरितां पानगावीं पाठवून दिलें. ते राजारामास घेऊन आले. राजाराम कांहीं दिवस वडुथ येथें राहिला. नंतर साताऱ्याजवळ वेण्यानदीचे कांठीं म्हसवें येथें राहिला. ता. २० दिजंबर १७४९ रोजीं भाऊसाहेब पुण्याहून साताऱ्यास येऊन पोहोचले. नाना, भाऊ व इतर सरदार मंडळी वडूथ येथें भावी महाराजांचे भेटीस गेली. त्यांस त्या वेळीं नानासाहेबांनीं ८८९ रुपायांचा पोषाग केला. पुढें सुमुहूर्त पाहून शके १६७१ शुक्ल नाम संवत्सरीं पौष शु. ८ (तारीख ४ जानेवारी १७५०) या दिवशीं राजाराम याचें रामराजे असें नांव ठेवून त्यास राज्याभिषेक झाला. त्या दिवशीं सर्व सातारा शहरांत गुढ्यातोरणें उभीं केलीं होतीं. सडासंमार्जनकरून रस्त्यावरून तऱ्हे तऱ्हेच्या रंगी बेरंगी रांगोळ्या घातल्या होत्या. सर्व रस्ते सुशोभि-

१ रामराजे यांचे चरित्रांत विकारी ह्मणून संवत्सर दिला आहे तें चूक आहे.

त केलेले होते. घरोघरीं सुवासिनी हातांत मंगलारत्या, ताह्मा व अक्षता घेऊन नवीन महाराजांची मार्गप्रतीक्षा करीत दरवाज्यांत उभ्या होत्या. शहरांतील सर्व देवालयांतून रोषनाई करून देवतांच्या पूजा बांधल्या होत्या. राजवाड्यांत सर्व महाल व दिवाणखाने सुशोभित केले होते. समुद्राचें पाणी, गंगोदक वगैरे राज्याभिषेकाचें सर्व साहित्य सिद्ध करून ठेविलें होतें. मोठमोठे विद्वान् ब्राह्मण, पंडित, वैदिक यांची वाड्यांत गर्दी उडून गेली होती. दिवाणखान्यांतून वारांगनांचें नृत्यगायन सुरू होतें. अशा रीतीनें त्या दिवशीं सातारा शहर आनंदसागरांत हेलकावे खात होतें. प्रातःकाळीं सर्व अष्टप्रधान, सरदार, मानकरी, अमीरउमराव हत्तीघोडे शृंगारून मंगलवाद्यें वाजवीत फौजेसह महाराजांस आणण्याकरितां निघाले. सर्व मंडळी ह्मसवें येथें आल्यावर रामराजे यांस अंबारींत बसविलें. खवासखान्यांत नानासाहेब रुमाल वारीत बसले होते व किलाव्यांत[1] शंभुसिंग जाधव[2] हा वारा घालीत बसला होता. अशा रीतीनें वाजत गाजत स्वारी सहा घटका दिवसास शहरांत येऊन पोहोंचली. नंतर गृहप्रवेश होऊन कुलदेवता भवानी हिचें दर्शन घेऊन महाराज सभामंडपांत येऊन

१ महातास पाय अडकवितां यावे ह्मणून हत्तीचे गळ्यांत जें दोरखंड असतें त्यास किलावा असें ह्मणतात.

२ शंभुसिंग हा धनाजी जाधव याचा पुत्र. त्याचा वडील भाऊ चंद्रसेन जाधव व बाळाजी विश्वनाथ यांच्यामध्यें वैमनस्य आलें, तेव्हां शाहूमहाराजांनीं बाळाजी विश्वनाथास आश्रय दिल्यामुळें चंद्रसेन शंभुसिंग यास घेऊन मोगलांचे आश्रयास जाऊन राहिला. पुढें शाहूमहाराजांनीं शंभुसिंग यास साताऱ्यास आणिलें. किलाव्यांत बसण्याचा मान सेनापति यशवंतराव दाभाडे याचा होता. पण तो पक्का व्यसनाधीन झाल्यामुळें शाहूमहाराजांनीं बोलाविलें असतांही साताऱ्यास आला नाहीं. दाभाडे या समारंभास नसल्यामुळें तो मान शंभुसिंग यास दिला होता.

बसले. नंतर मंगलस्नान करून व्रतबंधपूर्वक वरील मितीस त्यांस राज्याभिषेक झाला. पुढें शिरके, मोहिते, महाडिक, पालकर, जाधव वगैरे महाराजांचे सोयरेधायरे जमले होते, त्यांनीं ताराबाईस सांगितलें कीं, " तुह्मी राजे यांस घेऊन एका ताटांत भोजन कराल तर हे खरे तुमचे नातू आहेत अशी आमची खात्री होईल. " त्यावरून ताराबाईनें रामराजे यांस आपले ताटांत घेऊन भोजन केलें. तेव्हां सर्वांची खातरी होऊन त्यांस आतिशय आनंद झाला.

रघूजी भोसले पेशव्यांस अनुकूल होतो:–शाहूमहाराज यांनीं अंतकालीं यशवंतराव दाभाडे व रघूजी भोसले यांस आपल्या भेटीस बोलाविलें होतें. दाभाडे व्यसनाधीन झाल्यामुळें आला नाहीं. रघूजी मात्र आपल्या प्रांताचा नीट बंदोबस्त करून निघाला. पण तो सातान्यास येण्यापूर्वीच शाहूमहाराज मरण पावले. पुढें रामराजे यांस राज्याभिषेक[1] झाल्यावर तो सातान्यास येऊन पोहोंचला. रघूजी या वेळीं बराच वृद्ध झाला होता. त्यामुळें त्याची पूर्वीची हिंमत, तरतरी, महत्त्वाकांक्षा वरीच कमी झाली होती. त्यानें आपली बरीच फौज आपला पुत्र जानोजी याचेबरोबर देऊन त्यास कर्नाटकांत पाठविलें होतें, व कांहीं फौज वऱ्हाडांत ठेविली होती. त्यामुळें त्याच्याजवळ या वेळीं फक्त बारा हजार फौज होती. तसेंच त्याला बंगाल्यांत कायमची सत्ता स्थापावयाची होती, व तो पूर्वीपासून नानासाहेबांची कर्तृत्वशक्ति ओळखून होता. त्यामुळें त्यांच्याविरुद्ध आपण गेलों तर त्यांत आपला निभाव लागणार नाहीं, असें त्यास वाटून तो त्यांस वश झाला व त्यानें शाहूमहाराजांनीं अंतसमयीं

---

१ धाकटे रामराजे यांचें चरित्र पान २. राज्याभिषेकाचेपूर्वी रघूजी सातान्यास आला होता असें ग्रांडडफ म्हणतो.

नानासाहेबांस राज्याचा जो अधिकार दिला होता तो कबूल केला. या वेळीं कांहीं मंडळीचा पेशव्यांस अडथळा करण्याचा विचार होता. परंतु रघूजीसारखा प्रबळ सरदार त्यांस वश झाला असें पाहून त्यांनींही निमूटपणें पेशव्यांचा अधिकार कबूल केला. या वेळीं पेशवे, शिंदेहोळकर, पिलाजी जाधवराव, रघूजी भोंसले वगैरे सरदारांची मिळून सुमारें साठ हजार फौज सातार्‍यास जमली होती. महाराजांस बरोबर घेऊन कोठेंतरी स्वारी फत्ते करून यावयाचें, सर्व मानकर्‍यांस नजरा द्यावयाच्या, कोणाचा अधिकार काढावयाचा, कोणाचा कायम करावयाचा, राज्यकारभार कोणचे पद्धतीनें करावयाचा, इत्यादि गोष्टींची वाटावाट सुमारें दोन महिने चालली होती. पुढें मार्च महिन्याचे अखेरीस भाऊसाहेब याची पत्नी उमाबाई ही मरण पावली (२२ मार्च इ० स० १७५०). तेव्हां नानासाहेब पुण्यास परत आले (२२ एप्रिल १७५०). पुढें भाऊसाहेब व विश्वासराव यांची लग्नें झाली. नानासाहेब पुण्यास आले त्या वेळीं त्यानीं नवीन महाराजांची सर्व व्यवस्था रघूजीस सांगितली होती, व " मी पुढें जातो; आपण, महाराज, सर्व सरदार, मानकरी यांसह आम्हीं निरोप पाठवूं त्या वेळी पुण्यास यावें " असें त्यास सांगितलें होते. या वेळेपासून पुढे सातारा शहर मराठयाची राजधानी होते तें नाहीसें होऊन पुणे शहर राजधानी झालें.

ताराबाईः—ताराबाईचें वय या वेळीं सत्तर वर्षांचें होतें. अशा वयांत ती कांहींएक गडबड न करतां स्वस्थ बसेल असें नानासाहेबांस वाटलें होतें, व ह्मणून त्यानीं रामराजे यास मसलतींत घेऊन राज्यकारभार हाकण्यास सुरवात केली होती. पण ही आपली समज चुकीची आहे असें थोडकेच दिवसांत त्यांचे अनुभवास

आलें. इ० स० १७०० त राजाराम महाराज वारल्यावर त्या वेळच्या मुत्सद्यांच्या विरुद्ध वागून त्यांचा या बाईनें द्वेष संपादिला होता. पुढें इ० स० १७०७ त शाहूमहाराज मोगलांचे अटकेंतून सुटून दक्षिणेंत आल्यावर ती इ० स० १७१२ पर्यंत त्यांचा सातारच्या गादीवरचा हक्क उडविण्याकरितां त्यांच्याशीं एकसारखी झगडत होती. परंतु त्या कामीं तिला यश न आल्यामुळें तिनें कोल्हापूर येथें स्वतंत्र गादीची स्थापना केली. इ० स० १७३० त शाहूमहाराजांनीं कोल्हापुरच्या संभाजी महाराजांचा पराभव करून तिला कैद करून सातारच्या किल्ल्यावर आणून ठेविलें. इ० स० १७४९ पर्यंत ती सातारच्या किल्ल्यावर स्वस्थ बसली होती. परंतु शाहूमहाराजांचेमागें सातारचे गादीवर तिचा नातू आणण्याचें ठरल्यावर तिची महत्त्वाकांक्षा पुनः भराऱ्या मारूं लागली. तिनें पूर्वीप्रमाणें संपूर्ण मराठी राज्याचीं सूत्रें आपल्या हातांत घेण्याचा निश्चय केला. पेशवे आपणास न विचारतां राज्य चालवितात ही गोष्ट तिच्या निदर्शनास आली, तेव्हां ती नानासाहेबांचा द्वेष करूं लागली. तिने नानासाहेबांस कारभारांतून काढून टाकावें असा विचार करून चिमणाजी नारायण पंतसचीव यास वश करून घेतलें. नंतर राजाराममहाराजांचे वार्षिक उत्सवाकरतां सिंहगडीं जावयाचें आहे असा बहाणा करून ती रामराजे यांस बरोबर घेऊन इ० स० १७५० च्या जून महिन्यांत पुण्यानजीक शिवापूर येथें आली. पंतसचीव ताराबाईस वश झाला ही गोष्ट नानासाहेबांस समजली तेव्हां त्यांनीं तो व त्याचा पुत्र यांस पुण्यास आणून कैदेंत ठेविलें व त्याच्या सर्व मुलखाची जप्ती केली. ताराबाईस हें वर्तमान समजलें तेव्हां तिचे हातपायच गळले. पुढें नानासाहेबांनीं तिला राज्यकारभारांत थोडासा भाग देण्याचे कबूल केलें, व अशा रीतीनें तिची

कवीविशी समजूत करून तिला रामराजे यांसह पुण्यास घेऊन आले. त्या वेळीं सिंहगड पंतसचिव याचे ताब्यांत होता. आपल्या राजधानी शेजारचा एवढा बळकट व लढाऊ किल्ला सचिवाचे ताब्यांत असणें इष्ट नाहीं असें वाटून नानासाहेबांनीं तो किल्ला रामराजे यांस विनंती करून ताराबाईच्या अनुमोदनानें आपणाकडे घेतला. पुढें किल्ला ताब्यांत घेण्याकरितां पेशव्याचे लोक गेले, तेव्हां सचिवाचे लोक किल्ला खालीं करून देईनात. इतकेंच नाहीं तर ते लोक किल्ला लढवूं लागले. तेव्हां नानासाहेबांनीं जिवाजी गणेश खासगीवाले यास फौजेसह किल्ला घेण्यास पाठवून दिलें. त्यानें ता. ६ जुलै इ० स० १७५० रोजीं किल्ला सर केला. ह्या किल्ल्याचे मोबदला पेटा शिरवळ व परगणे जाफराबाद येथील बाबती अंमल व दुसरे कांहीं महाल सचिवास देण्याचें ठरवून नानासाहेबांनीं तो किल्ला व त्याचे खालचे कर्यात मावळपैकीं कांहीं गांव आपणाकडे घेतले, व त्या प्रांताची कमाविशी जिवाजी गणेश यास सांगितली. पुढें सपटंबर महिन्यांत नानासाहेबांनीं सचिवास बंधमुक्त करून भोरास पाठवून दिलें, व त्याचा जप्त केलेला मुलूख त्यास परत दिला. ताराबाई व रामराजे यांस पुण्यास आणल्यावर नानासाहेबांनीं रघूजीस बोलाविल्यावरून तो आगष्ट महिन्यांत पुण्यास आला.

सांगोल्याची स्वारीः—शाहूमहाराज मरण पावले त्या वेळीं जगजीवनराव प्रतिनिधी व यमाजी शिवदेव यांस कैद केलें होतें. पुढें थोडेच दिवसांनीं नानासाहेबांनीं यमाजी शिवदेव यास सोडून दिलें. प्रतिनिधीस कैद केलें तेव्हांपासून सांगोलें व मंगळवेढें येथील

---

१ पेशव्यांची शकावली. धाकटे रामराजे यांचे चरित्रांत रामराजे रघूजी भोसले याच्याबरोबर पुण्यास आले असें दिलें आहे.

२ पेशव्यांची शकावली.

गडकरी लोकांचा बंड करण्याचा विचार चालला होता. यमाजी शिवदेव याच्याही मनांत पेशव्यावर आपला सूड उगवावयाचा होता. तेव्हां तो कैदेतून सुटल्यावर लगेच सांगोल्यास गेला, व तेथील गडकरी लोकांच्या मदतीनें त्यानें बंडाचा झेंडा उभारला. ही बातमी नानासाहेबांस समजतांच त्यांनीं भाऊंस बरोबर फौज देऊन सांगोल्यावर पाठवून दिलें. भाऊ रामराजे यांस बरोबर घेऊन सपटंबर महिन्याचे प्रारंभीं पुण्याहून निघाले. रामचंद्रबाबा[1] शेणवी, व

१ याचें नांव रामचंद्र मल्हार शेणवी. हा मूळ अरवली म्हणून वाडीचे सावंतांचे ताब्यांतील एक खेडें होतें तेथचा कुळकर्णी होता. त्यानें वसुलाची कांहीं अफरातफर केल्यामुळें सावंतांचा त्याच्यावर राग झाला. तेव्हां तो साताऱ्यास पळून आला. तेथें कनेश्वरबाबा अतीतकर या नांवाच्या गृहस्थानें प्रथम त्यास आपल्या पदरीं ठेविलें. पुढें त्याची हुशारी पाहून त्यानें पहिले बाजीराव साहेब यांचेजवळ त्याची शिफारस केली. त्यावरून बाजीराव साहेबांनीं त्यास आपल्या पदरीं ठेविलें. पुढें कारकुनी व शिपाईगिरी या दोन्ही पेशांत त्यानें चांगला नांवलौकिक मिळविला. तेव्हां बाजीरावानें त्यास राणोजी शिंद्याची दिवाणगिरी सांगितली. त्यानें शिंद्याचे दौलतीवर चांगलाच हात मारला. राणोजी शिंदे वारल्यावर त्याचा पुत्र जयाप्पा याचें व रामचंद्रबाबाचें पटेना. रामचंद्रबाबा यानें भाऊसाहेबांस पैसा भरून शिंद्याचे दिवाणगिरीवर आपणास कायम करावें म्हणून नानासाहेबांपाशीं आपली शिफारस करावी म्हणून भाऊंस सांगितलें. जयाप्पास ती गोष्ट पसंत नव्हती. तसेंच मल्हारराव होळकर यानेंही रामचंद्रबाबास तुम्ही आपला दिवाण नेमूं नका, असा उपदेश जयाप्पास केला होता. जयाप्पा विरुद्ध असल्यामुळें नानासाहेबांस ती गोष्ट करतां येईना. अशा रीतीनें रामचंद्रबाबा शिंद्याचे दिवाणगिरीवरून दूर झाला. ही गोष्ट दिसण्यांत फार क्षुल्लक दिसते. परंतु हिचे परिणाम पुढें फार भयंकर झाले. होळकराचे चिथावणीवरून रामचंद्रबाबास जयाप्पानें आपला दिवाण नेमिलें नाहीं, असें भाऊंस वाटून तेव्हांपासून मल्हाररावासंबंधानें भाऊंचे मनांत आढी बसली, व त्या वैमनस्याची पूर्णाहुति पानपतच्या रणमखांत झाली. जयाप्पा आपली दिवाणगिरी रामचंद्रबाबास देईना, तेव्हां भाऊंनीं त्यास आपला दिवाण नेमिलें, इकडे रामचंद्रबाबास असें वाटलें कीं, आपणास जी दिवाणगिरी मिळाली नाहीं ती नानासाहेबांनीं दिली नाहीं म्हणून मिळाली नाहीं. तेव्हां तो भाऊंचें मन नानासाहेबांविषयीं भ्रष्ट करण्याचा प्रयत्न करूं लागला.

गोविंदराव चिटणीस यांसही त्यांनीं आपणाबरोबर घेतलें होतें. भाऊसाहेबांची स्वारी पुण्याहून निघाली ती जेजूरीवरून मोरेश्वरास आली, व तेथून पंढरपुरास जाऊन सांगोल्यास आली. यमाजी शिवदेव पंधरा दिवस सांगोल्याचा किल्ला लढवीत होता. पुढें तो रामराजे यांस शरण आला, व प्रतिनिधीस मुक्त करण्याविषयीं त्यानें विनंती केली. ती मान्य होऊन त्यास बंधमुक्त केल्यावर तो स्वारींत येऊन दाखल झाला, व त्याचें पद त्याच्याकडे कायम केलें. रामराजे यांनीं सांगोल्याचें ठाणें घेऊन तें राणोजी मोहिते ह्मणून त्यांचा खासगीकडील सरदार होता त्यास दिलें. त्याच वेळीं मंगळवेढेंही पेशव्यांच्या फौजेनें घेतलें व तें रामराजे यांनीं पेशव्यांस दिलें. हें वर्तमान इ० स० १७५० च्या अक्टोबर महिन्यांत घडलें.

भाऊंनीं राज्यकारभाराची केलेली व्यवस्थाः—सांगोल्याचा बखेडा मोडल्यावर भाऊंनीं रामराजे यांसह कांहीं दिवस तेथें मुक्काम केला, व रामराजे यांचे मतानें राज्याची व्यवस्था केली.

---

१ ग्रांडडफचें असें म्हणणें आहे कीं, ही सर्व व्यवस्था नानासाहेबांनीं पुणें येथें केली. धाकटे रामराजे यांचे चरित्रांत ही सर्व व्यवस्था भाऊसाहेबांनीं सांगोलें येथें रामचंद्रबाबा व गोविंदराव चिटणीस यांच्या मदतीनें केली असें दिलें आहे, व त्याबद्दल नानासाहेबांस पुढें वैषम्य वाटलें असेंही दिलें आहे. परंतु भाऊंनीं स्वतःच्या जबाबदारीवर एवढी मोठी कामगिरी केली असावी असें संभवत नाहीं. रामराजे यांस स्वारीचे निमित्तानें ताराबाईपासून वेगळें काढून सांगोलें येथें न्यावें व तेथें ही सर्व व्यवस्था करावी असें नानासाहेबांचे विचारानें पुण्यास ठरून नंतर ही व्यवस्था भाऊंनीं सांगोल्यास केली असावी. ताराबाई पुण्यास होती व तेथें ही व्यवस्था केली असती तर ती सुध्या रीतीनें कोणतीही गोष्ट शेवटास जाऊं देतींना, व त्यामुळें नानासाहेबांस फार त्रास पडला असता. तेव्हां भाऊंनीं नानासाहेबांचे विचारानें सांगोल्यास ही व्यवस्था केली असावी हें ज्यास्त संभवनीय आहे या राज्यव्यवस्थेसंबंधें विशेष खुलासेवार माहिती धाकटे रामराजे यांचे चरित्रांत दिलेली आहे.

ती येणेंप्रमाणें:—यशवंतराव दाभाडे याच्याकडे गुजराथचा अंमल होता. परंतु तो व्यसनाधीन झाल्यामुळें त्याच्या हातून त्या प्रांताची नीट व्यवस्था लागेना, व ठरावीक खंडणीही येईना. त्यामुळें गुजराथचे दोन विभाग करून निमे अंमल ज्यास्त खंडणी ठरवून पेशवे यांनीं आपणाकडे घेतला व निमे दाभाडे याच्याकडे ठेविला. कर्नाटकचा सुभा बाबूजी नाईक याच्या नांवानें चालत होता. परंतु त्याला तिकडे कर्ज होऊन माकल्याचा पैसा बरोबर येईना, तेव्हां त्या प्रांताचा ज्यास्त गत्ता ठरवून तो सुभा भाऊसाहेबांनीं आपले नांवानें करून घेतला. रघूजी भोसले यास या वेळीं नवीन सनद करून दिली. तींत पूर्वी बंगाल वगैरे जो प्रांत त्यास दिला होता त्याशिवाय वऱ्हाड, गोंडवण व वऱ्हाडांत प्रतिनिधीच्या ज्या बाबती होत्या त्या सर्व रघूजीस दिल्या. गोविंदराव चिटणीस व बापूजी खंडेराव यांनीं हुजूर राहून पेशव्यांचे संमतीनें सर्व कारभार चालवावा, व त्याबद्दल त्यांच्याकडे पूर्वी जो चार लाखांचा सरंजाम चालत होता त्याशिवाय प्रतिनिधीकडील मोरगिरी, दातेगड वगैरे प्रांत त्यांच्याकडे दिला, व खानदेशांत पन्नास हजारांचें मोकासबाबीचें उत्पन्न दिलें. यशवंतराव पोतनीस यास खासगी कारभारी नेमून त्यास चाळीस हजारांचा सरंजाम दिला. येणेंप्रमाणें अष्टप्रधान, सरदार, मामलेदार, कारखानदार, शागीर्दपेशा वगैरे मंडळीच्या तैनाती व नेमणुका मगदुराप्रमाणें कमजास्ती करून कायमच्या सनदा देऊन टाकिल्या. रायगड, प्रतापगड वगैरे किल्ल्यांच्या नेमणुका पूर्वीप्रमाणें ठरवून हुजूरच्या खासगी खर्चाकरितां कोणाकडून काय ऐवज यावयाचा तें ठरवून टाकिलें. त्याचा तपशील:—

१ पंतप्रधान यांजकडील हिंदुस्तान व कोंकण या प्रांतांबद्दलचा ऐवज पेशजींपासून चालत आला होता तो, निमे गुजराथ

नवी सांगितली तिचा मक्ता ठरला तो, व कर्नाटक सुभ्याचे बाबूजी नाईक पूर्वी सात लक्ष रुपये देत होता त्याचा चढवून घेतलेला मक्ता, इतका ऐवज पेशवे यांनीं द्यावयाचा.

१ पंतप्रतिनिधी यांनीं पूर्वींपासून चालत आलेला ऐवज द्यावयाचा.

१ पंतसचिव यांनीं पूर्वीपासून चालत आलेला पीलखान्याचा खर्च द्यावयाचा.

१ रघूजी भोसले यांनीं पूर्वींपासून चालत आलेला ऐवज द्यावयाचा.

१ मानाजी आंग्रे यांनीं सालीना सतरा हजार रुपये द्यावयाचे.

त्याचप्रमाणें मंत्री, केशरकर, व जीराव यादव, कुसाजी भोसले, रत्नाकर विठ्ठल, महादाजीपत पिंगळे, नागो मेघश्याम, खंडोजी जगताप, शिवाजी डुबाळ, फत्तेसिंग भोसले वगैरे सरदार व मानकरी मंडळीचे ऐवज, शिवाय किरकोळ गांव, शेऱ्या, रमणे, खासबागा मिळून साठ सत्तर लाखांचा ऐवज हुजूरचे खर्चाकडे लावून दिला. तसेंच दरखदार, कारखानदार, कारकून, हुजरे, सेवेचे लोक, यांचे गांव, जमिनी, नेमणुका वगैरे ठरवून टाकल्या. सोमवशी यांचें सरलष्कर हें पद दूर करून ते निंबाजी नाईक निंबाळकर यास सांगितलें, व बाकीच्यांकडे त्यांचीं पूर्वींचीं पदें कायम केलीं.

रामराजे सांगोलें येथें असतां त्यांनीं पेशव्यांस दुसरी एक सनद करून दिली होती. तींत महाराजांस साताराचे आसपासचा कांहीं मुलूख देऊन बाकीचा सर्व राज्यकारभार पेशवे यांनीं चालवावा असें लिहिलें होतें. जरी अशा प्रकारची सनद त्या वेळीं झाली होती, तरी पेशवे यापुढें महाराजांस मुलूख तोडून न देतां त्यांच्या खर्चाकरतां त्यांस रोख पैसाच देत आले. अशा रीतीनें या सांगोलें येथील

१ पेशव्यांची शकावली.

राज्यव्यवस्थेनें साताराचे महाराज नामधारी बनले व खरी राज्यसत्ता पेशवे यांचे हातांत आली.

अशा रीतीनें सर्व व्यवस्था करून भाऊसाहेब रामराजे यांसह पुण्यास येण्याकरितां निघाले. वाटेनें बाबानें नानासाहेबांविषयीं भाऊसाहेबांचें मन भ्रष्ट करण्याचा उद्योग चालविला. इ० स० १७४१ त चिमणाजी आप्पा वारल्यानंतर पेशव्यांचे दिवाणगिरीचें काम महादाजीपंत पुरंदरे हा पहात होता. सर्व व्यवहारांत नानासाहेबांस महादाजीपंताचा फार उपयोग होत असे. बापूजी नाईक यानें कर्जाचा तगादा लाविला त्या वेळीं त्यांच्यावरचा तो पेंच महादाजीपंतानें वारला होता. त्यामुळें नानासाहेब त्याचे फार ऋणी होते. तेव्हां नानासाहेब त्यास आपल्या दिवाणगिरीवरून दूर करणार नाहींत असें रामचंद्रबाबास वाटून त्याच किल्लीवर नाना व भाऊ यांचेमध्यें भांडणाची कळ उत्पन्न करण्याची खटपट त्यानें चालविली. त्यानें "महादाजीपंताकडून कारभार काढावा व तो यापुढें आम्हीं पहाणार" असें नानासाहेबांस सांगावें म्हणून भाऊंस उपदेश केला.

नानासाहेबांची निजामावर स्वारीः—नासिरजंग मुजफरजंगाचें बंड मोडण्याकरितां कर्नाटकांत गुंतला आहे असें पाहून त्याचे मुलखांत धामधूम करून आपला फायदा करून घ्यावा अशा उद्देशानें नानासाहेब फौजेसह इ० स० १७५० च्या नवंबर महिन्याच्या प्रारंभीं पुण्याहून निघाले. त्यांनीं महादाजीपंत पुरंदरे यास आपणाबरोबर घेतलें होतें. त्यांचा तळ चरवली येथें पडला असतां तिकडून भाऊसाहेब सांगोल्याची मोहीम आटपून आले. बाबा व भाऊ यांच्या गांठी पडल्या तेव्हां रामचंद्रबाबाच्या उपदेशाप्रमाणें भाऊंनीं "आजपासून सर्व कारभार आम्हीं पहाणार, आपणास कारभार देणें

नसेल तर मला कोल्हापुरच्या संभाजी महाराजांनीं आपली पेशवाई दिली आहे तिकडे आम्हीं जाणार, " असें नानासाहेबांस सांगितलें. त्या वेळीं त्यांना मोठा पेंच येऊन पडला. एका अंगास महादाजीपंतासारखा विश्वासु, हुशार, परोपकारी दिवाण सोडवेना व दुसऱ्या अंगास भाऊंसारखा महत्त्वाकांक्षी, हुशार, शूर परंतु दुराग्रही व भ्रष्टमति भाऊ तोडवेना. त्या वेळीं महादाजीपंतानें जो मनाचा मोठेपणा दाखविला तो प्रशंसनीय आहे. पेशव्यांचे कुलांत कलहाग्नि पेटविण्याचा हा रामचंद्रबाबाचा प्रयत्न आहे हें त्यास माहीत होतें. तेव्हां त्या आणीबाणीच्या प्रसंगीं त्यानें आपली दिवाणगिरी सोडून दिली, व अशा रीतीनें पुढें उत्पन्न होणाऱ्या कळीचें तोंड मुळांतच दाबलें. अशा रीतीनें नाना व भाऊ यांचा सलोखा झाल्यावर नानासाहेब भाऊंस बरोबर घेऊन स्वारीवर निघून गेले. या वेळेपासून भाऊ रामचंद्रबाबाचे मदतीनें आपलें दिवाणगिरीचें काम पाहूं लागले.

रामराजे पुण्यास आल्यावर त्र्यंबक सदाशिव ऊर्फ नाना पुरंदरे यास फौजेनिशीं बरोबर देऊन नानासाहेबांनीं त्यांची व ताराबाईची साताऱ्यास रवानगी करून दिली. ताराबाईस बरें वाटावें

१ रामचंद्रबाबानें संभाजी महाराजांशीं संधान बांधून त्यांच्याकडून पेशवाई बद्दलचें भाऊंच्या नांवचें पत्र आणविलें होतें. त्यांत संभाजी महाराजांनीं भाऊस पारगड, भीमगड व वल्लभगड हे किल्ले देऊं करून शिवाय सालीना ५०० रुपयांची नेमणूक देण्याचें कबूल केलें होतें नानांनीं भाऊंस आपला दिवाण नेमिलें नसतें तर सातारा व कोल्हापूर या दोन गाद्यांत तंटा माजविण्याचें रामचंद्रबाबाचें हें कारस्थान होतें.

२ पेशव्यांची शकावली. धाकटे रामराजे यांचे चरित्रांत भाऊ रामराजे यांसह सांगोल्याचे स्वारीवर गेल्यावर ताराबाई साताऱ्यास आली असें दिलें आहे. रामराजे यांच्यासंबंधानें असें म्हटलें आहे कीं, "आईसाहेब यांचें मानस सर्व कारभार करणें तो आपण करावा. तें न होतां परभारें महाराज व कार-

ह्मणून पेशव्यांनीं आपल्या तर्फेची जी मंडळी साताऱ्च्या किल्ल्यावर ठेविली होती ती काढून टाकून पूर्वी तिच्या तर्फेची जी मंडळी होती ती तेथें ठेविली, व त्यांनीं नेहमीं तिच्या आज्ञेंत चालावें ह्मणून त्यांस ताकीद केली. ताराबाईनें साताऱ्च्या किल्ल्यावर रहावें व रामराजे यांनीं सालीना ६५ लक्षांची नेमणूक घेऊन सातारा शहरांत रहावें अशी व्यवस्था केली.

रामचंद्रबाबाच्या कारस्थानामुळें आपण पदभ्रष्ट झालों ही गोष्ट महादाजीपंतास आवडली नाहीं. बाहेरून जरी त्यानें मनाचा मोठेपणा दाखविला तरी अंतर्यामीं हा अपमान त्याला एखाद्या शल्याप्रमाणें टोंचत होता. त्याचे मनांत भाऊंनीं कोल्हापुरास जावें असें होतें. पण नानासाहेबांस ती गोष्ट पसंत नव्हती. या पूर्वी दोन तीन वर्षें महादाजीपंताचें मन नानासाहेबांविषयीं कलुषित झालें होतें, व त्यांच्याविरुद्ध त्यानें मसलती चालविल्या होत्या. वर सांगितलेल्या गोष्टींमुळें त्यांत ज्यास्तच भर पडली. ह्या संबंधानें इ. स. १७५१ च्या जानेवारी महिन्यांत नानासाहेबांनीं जयाप्पा शिंदे यास पाठवि-

---

भारी मिळोन स्वारींतच कामें विल्हेस लाविलीं. × × × दोन्ही राण्या बरोबर घेऊन ती किल्ल्यावर जाऊन राहिली. तों सांगोल्याहून महाराज व सर्व हुजुरातचे लोक फौजसुद्धां श्रीमहादेव सिंगणापूर करून कार्तिक असेर सातारा मुक्कामीं आले. ”

१ नानासाहेबांनीं शिंदे, होळकर यांस शाहू महाराजांचे मरणसमयीं दक्षिणेंत बोलाविलें होतें. शाहू महाराजांचेमागें सर्व स्थीरस्थावर झाल्यावर जुलै १७५० त नानासाहेबांनीं त्यांस उत्तरहिंदुस्थानांत पाठवून दिलें. माळव्याची जमा सुमारें दीड कोट रुपये होती. तीपैकीं ७४ लक्षांपेक्षां जास्त मुलूख होळकरास दिला. ६५५०००० चा मुलूख शिंद्यास दिला व बाकीचा आनंदराव पवार व इतर लहान लहान सरदार यांस वाटून दिला.

लेल्या पत्रांत ते असें लिहितात कीं, "राजश्री महादोबाशीं आम्हांशीं विमनस्कता तीन वर्षे आहे. सातारियापासून विशेष वृद्धि पावली. तुमचे पक्षपातामुळें अतिकष्टी होते. याजमुळें आम्हांस हरएक कामांत मुरदाड करावें याची तजवीज. रामचंद्रबावा, भाऊंकडे राजकारणें पत्रें जात येत असत. आम्हांपासून हरएक मसलत पुरती पायाशुद्ध शेवटास न जावी या भावें भाऊंकडेच फौज पाठवावी. आम्हांस घरीं बसवून गोविंदरावाचे आज्ञेंत वर्तवावें, उमाबाईस(दाभाडे) राखावें, ताराबाईस × × चढवावें, आम्हांवर सर्वांचे हुकूम रहावे ऐसा विचार दिसोन आला. तेव्हां आम्हीं भाऊंस साफ लिहिलें कीं, जर भाऊ असलेत तर पत्रदर्शनीं निघून येणें × × × त्यावरून भिडेस पडून आले. × × × × × याजमुळें बाबांनीं (महादाजी पंतानें) बहुत वाईट मानून घरास गेले. कोणी म्हणतात कीं, ताराबाईकडे जातील. परंतु ते कुलीन, जुने चाकर, हरामखोरी कधीं करणार नाहींत असें वाटतें. कालगत मात्र न कळे. असो आम्हांशीं बाबांशीं तूट पडली." या पत्रावरून नानासाहेब व महादाजीपंत यांचीं मनें परस्परांविषयीं कशीं झालीं होतीं तें स्पष्टपणें दिसून येतें. महादाजीपंत बरेच दिवस घरीं रिकामा बसला होता. पुढें नानासाहेबांनीं त्याची समजूत करून त्यास पुण्यास आणिलें. नंतर कांहीं दिवस तो नानासाहेबांबरोबर होता. पुढें कर्नाटकांत त्याला स्वारीवर स्वतंत्रपणें पाठवून दिलें, तथापि त्याच्यावरचा नानासाहेबांचा विश्वास बराच कमी झाला होता.

नासिरजंगावरील मोहिमेची हकीकतः— नासिरजंग मुजफरजंगाचें बंड मोडण्याकरितां इ० स० १७४९ त कर्नाटकांत

---

१ पत्रें व यादी ३८३ का. सं.

गेला होता हें मागें सांगितलेंच आहे. त्यानें इ० स० १७५० च्या मार्च महिन्यांत मुजफरजंगाचा पराभव केला. परंतु तो स्वस्थ बसला नाहीं. त्याला फ्रेंचांचा हिंदुस्तानांतील गव्हर्नर डुप्ली याचें पूर्ण पाठबळ होतें. तेव्हां त्यानें नासिरजंगाच्या सैन्यांत फंदफितूर करण्यास आरंभ केला. प्रथमतः त्यानें नासिरजंगाचा दिवाण रामदासपंत यास मोठमोठ्या देणग्या देऊन फितूर केलें. त्याच्या मदतीनें जानोजी भोसले, कडप्याचा नबाब वगैरे मंडळी मुजफरजंगास सामील झाली. नंतर फितूरी मंडळीचा व डुप्लीचा बेत ठरून मुजफरजंगानें नासिरजंगाचे छावणीवर छापा घातला. त्या गर्दींत कडप्याचा नबाब महंमदखान यानें नासिरजंगास गोळी घालून ठार मारिलें (ता० ५ दिजंबर १७५०). नासिरजंग अशा रीतीनें मरण पावल्यामुळें त्याचें सैन्य मुजफरजंग यास वश झालें. तो आपणास दक्षिणचा सुभेदार असें म्हणवूं लागला. मुजफरजंगाचा सर्व कारभार डुप्ली पाहूं लागला. त्यानें रामदासपंतास 'राजा रघुनाथराव' असा किताब दिला, व त्याला मुजफरजंगाचा मुख्य दिवाण नेमिलें. नंतर बुस्सी नामक फ्रेंच सरदारास बरोबर देऊन डुप्लीनें मुजफरजंगास हैदराबादच्या गादीवर बसण्याकरितां पाठवून दिलें. मुजफरजंगानें आपले सैन्यांतील पठाण लोकांस कांहीं पैसा देऊं केला होता. परंतु त्यानें तो न दिल्यामुळें वाटेंत त्या लोकांनीं बंड केलें व मुजफरजंगास ठार मारिलें (जानेवारी १७५१). निजामउल्मुल्काचा तिसरा पुत्र सलाबतजंग हा या प्रसंगीं त्या सैन्याबरोबर होता. त्यास बुस्सीनें निजाम केलें व मुजफरजंगानें केलेले करार त्याच्याकडून कायम करून घेतले. नंतर सलाबतजंग बुस्सी यास बरोबर घेऊन हैदराबाद येथें येण्यास निघाला. मार्च महिन्यांत

औरंगाबादचा सुभेदार सय्यद लष्करखान व जानोजी भोसले हे कर्नाटकांतून स्वदेशीं परत आले. सलाबतजंग हळू हळू मागून येत होता. ह्या गडबडींत निजामाचा नाश करण्याचे उद्देशानें नानासाहेब पुण्याहून निघाले होते. सय्यद लष्करखान याचें निजामउल्मुल्क याचा वडील पुत्र गाजीउद्दीन यास आंतून पूर्ण पाठबळ होतें व त्याला आणून निजामाच्या गादीवर स्थापावें असा त्याचा विचार होता. म्हणून त्यानें नानासाहेबांस वश करून घेऊन सलाबतजंगाशीं लढाई देण्याची तयारी करण्याकरितां म्हणून १९ लाख रुपये त्यांस दिले[1]. नानासाहेब सलाबतजंगास मार्गांत गांठून याचा फडशा पाडावा म्हणून कृष्णेच्या कांठीं रायचूर नजीक त्याची वाट पहात बसले. सलाबतजंगास हें वर्तमान समजलें तेव्हां तो घाबरून गेला व त्यानें रामदासपंत यास तडजोडीकरितां नानासाहेबांकडे पाठवून दिलें (मार्च १७९१). त्या वेळीं निजामाच्या राज्यांत नानासाहेबांस आपला बराच हात घालतां आला असता, परंतु ता. २९ मार्च इ. स. १७५१ रोजीं त्यांस साताऱ्याहून त्रिंबक सदाशिव (नाना) पुरंदरे याचें ताराबाईच्या कारस्थानासंबंधानें पत्र येऊन पोहोंचलें. तेव्हां निरुपाय होऊन त्यांनीं सलाबतजंगापासून १७ लाख रुपये घेतले व त्याच्याशीं सलोखा करुन ते साताऱ्यास येण्याकरितां निघाले.

ताराबाईचें कारस्थानः—ताराबाई पुण्याहून निघून साताऱ्यास आल्यावर तेथचा सर्व कारभार नानासाहेबांच्या आज्ञेप्रमाणें गोविंदराव चिटणीस, यशवंतराव पोतनीस वगैरे मंडळी चालवूं लागली. आपणास कारभारांत कांहींच अधिकार नाहीं असें पाहून ती

1 धाकटे रामराजे यांचें चरित्र पान ९४.

रागावून साताराच्या किल्ल्यावर निघून गेली. तिला समजावून आणण्याकरितां स्वतः रामराजे किल्ल्यावर गेले. त्या वेळीं त्यांनीं स्वतंत्र रीतीनें राज्यकारभार चालवावा ह्मणून ताराबाईनें त्यांस पुष्कळ उपदेश केला. परंतु तिचा उपदेश त्यांस पटेना. नानासाहेबांचे मतानें रामराजे यांनीं आपल्या कारभाऱ्यांच्या सल्ल्यानें आपला कारभार स्वतः पहावा असें होतें. तिनें रामराजे यांस सांगितलें कीं, तुम्ही आम्हापाशीं किल्ल्यांतच रहावें. कारभारी गाळून काढून टाकून प्रधानपंत यांसहवर्तमान दाबून राखावे. आपले लक्षाचे (पक्षाचे) प्रतिनिधी सुद्धां बोलवावे. " रामराजे यांस हा उपदेश पटला नाहीं, तेव्हां ते शहरांत येण्याकरितां निघाले. दरवाज्यांत त्यांस थोडासा अडथळा झाला. परंतु त्या वेळीं त्यांच्याबरोबर बापूजी खंडेराव हा सरदार होता, त्यानें नेट करून त्यांस किल्ल्याखालीं आणिलें. गोविंदराव चिटणीस, यशवंतराव पोतनीस व देवराव लपेटे यांस नानासाहेबांनीं रामराजे यांचा सर्व खासगी कारभार सांगितला होता, व ते त्यांच्याच सल्ल्यानें चालत असत. ताराबाईचे मनांत कांहीं तरी निमित्तानें रामराजे यांस किल्ल्यावर नेऊन अटकेंत ठेवावें असें होतें. पुढें रामराजे यांस चंपाशष्ठीचे निमित्तानें ताराबाईनें किल्ल्यावर भोजनास बोलाविलें. रामराजे किल्ल्यावर जाण्यास निघाले तेव्हां जवळच्या मंडळीनें " मातोश्रीचा कारभार ठीक दिसत नाहीं. जावयाचें नाहीं. " असें त्यांस सांगितलें. परंतु ते भोळे असल्यामुळें त्यांना तें कपट असें वाटलें नाहीं, व मंडळीचा विचार न घेतां ते एकटेच किल्ल्यावर निघून गेले. या वेळीं ताराबाईनें त्यांचें मन वळविण्याविषयीं पुष्कळ प्रयत्न केले. परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं-

---

* पेशव्यांची शकावली.

तेव्हां तिनें त्यांस कैद करून किल्ल्यांत ठेविलें व त्यांच्या सभोंवार चौक्या बसविल्या. ताराबाईनें त्या वेळीं रामराजे यांची फार निर्भर्त्सना केली. ती त्यांस ह्मणाली "ज्या अज्ञातवासाच्या स्थितींत तूं आजपर्यंत वाढलास तीच स्थिति तुला योग्य होती. मीं तुला त्या नीच स्थितींतून काढून उच्च पदावर आणिलें ही माझ्याकडून फार मोठी चुकी झाली. शिवाजी महाराजांच्या कुळांत तुझा जन्म झाला असेल असें मला वाटत नाहीं. भोसले अगर मोहिते यांच्या वंशांत तूं मुळींच शोभत नाहींस. तूं माझा खरा नातू आहेस किंवा नाहीं याचीच मला शंका आहे. तूं कोणी तरी हीन जातीचा आहेस. तुला मी आपला नातू म्हटलें हें मोठें पाप केलें व त्या पापाच्या क्षालनार्थ मला कृष्णाबाईचें स्नान केलें पाहिजे." रामराजे यांस कैद केल्यावर तिनें किल्ल्यावरील हवालदारास सातारा शहरावर—त्यांत विशेषतः कोकणस्थ लोकांच्या व नानासाहेबांच्या पक्षास अनुकूल असणाऱ्या इतर मंडळीच्या वाड्यांवर—तोफेची शिस्त बांधावी ह्मणून हुकूम केला.

गेंड्याचे माळावरील लढाईः—नानासाहेब सलाबतजंगावर चाल करून गेले आहेत, अशी संधी साधून ताराबाईनें आपलें कारस्थान जारीनें सुरू केलें. तिनें सेनापति दाभाडे व दमाजी गायकवाड यांस असें लिहून पाठविलें कीं, "सातारची गादी व सर्व मराठमंडळ यांस ब्राह्मणांचे कचाटींतून सोडविणें असेल तर ही संधी बरी आहे." तेव्हां दमाजीबरोबर पंधरावीस हजार फौज घेऊन आपला यजमान दाभाडे यासह सोनगडाहून साताऱ्यास येण्याकरितां निघाला. त्या वेळीं सातारचा कारभार नाना पुरंदरे हा पहात होता. त्याला प्रथमतः ताराबाईचीं कृत्यें वेडगळपणाचीं आहेत असें वाटत होतें.

परंतु पेशवे यांस ती बातमी समजतांच त्यांनीं "सातारच्या किल्ल्यासभोंवार चौक्या बसवून किल्ल्यांत दाणावैरण जाण्याची बंदी करावी" असा नाना पुरंदरे यास हुकूम पाठविला, व दमाजीचा बंदोबस्त करण्याकरतां बळवंतराव मेहेंदळे व बापूजी भिवराव रेटरेकर या दोन सरदारांस पांच हजार फौज देऊन खानदेशांत पाठवून दिलें. परंतु दमाजीनें त्या दोघांचा पराभव करून तो जेजूरी-मोरगांवापर्यंत चाल करून आला. जरी मेहेंदळे व रेटरेकर यांचा गायकवाडानें पराभव केला होता, तरी त्यांनीं त्याचा पिच्छा सोडला नव्हता. गायकवाड साताऱ्यानजीक येऊन पोहोंचला, हें वर्तमान नाना पुरंदरे यास समजतांच त्यानें मिळवितां आली तितकी फौज मिळविली. एकंदर फौज सुमारें पंधरा हजार जमली. पेशव्यांच्या पक्षाची मंडळी सातारा शहर सोडून निघून गेली. दमाजीनें आपल्या फौजेचा तळ वेण्यानदीचे कांठीं दिला होता. नाना पुरंदरे हा गायकवाडाचे पिछाडीवर होताच. त्यानें वडूथ–आरळें येथें आपल्या सैन्याचा तळ दिला. नंतर आपणही वेण्यानदीचे कांठीं जावें असा विचार करून पुरंदरे आरळ्याहून निघाला, व निंबखिंडीजवळ आला. परंतु दमाजीनें त्याच्यावर हल्ला करून त्यास मागें हटविलें. ह्या लहानशा जयामुळें दमाजीला मोठा आनंद होऊन तो ताराबाईस भेटण्याकरतां सातारच्या किल्ल्यावर गेला. त्या ठिकाणीं ताराबाईनें त्याचा मोठा गौरव केला. तिनें सातारा शहरांत आपल्या चौक्या बसविल्या, व आसपासचे कांहीं किल्लेही घेतले. प्रातिनिधींनेंही मदत करण्याचें तिला वचन दिलें होतें. अशा रीतीनें ताराबाईनें नानासाहेबांस उखडून टाकण्याचा मोठ्या नेटानें प्रयत्न चालविला होता. वरील अपजयामुळें

नाना पुरंदरे, गोविंदराव चिटणीस, बापूजी खंडेराव वगैरे मंडळीस मरणप्राय दुःख झालें. पुढें मारूं किंवा मरूं असा निर्धार करून नाना पुरंदरे फौजेसह दमाजी गायकवाडावर जाऊन पडला. उभय पक्षांची यौतेश्वराजवळ गेंड्याचे माळावर ता० १५ मार्च इ० स० १७५१ रोजीं मोठी निकराची लढाई होऊन तींत गायकवाडाचा पराभव झाला, व तो पळून गेला. पुरंदऱ्याचे फौजेनें गायकवाडाचें बाजारबुणगें लुटलें, व त्याचीं शेंकडों उंटें, घोडीं व पालख्या त्यांच्या हातीं लागल्या. या लढाईत बापूजी खंडेराव यानें मोठा पराक्रम केला. त्याच्या मानेवर तरवारीचा भयंकर वार झाला, तरी तो शूर गायकवाडाचा पुरा मोड होईपर्यंत तसाच लढत होता. दमाजी तेथून पळाला तो जोरखोऱ्यांत जाऊन उतरला, व तेथें प्रतिनिधी किंवा गुजराथेंतून आपली फौज आपल्या मदतीस येईल या आशेवर बसला. नाना पुरंदरे यानें दुसरे दिवशीं ह्मणजे ता० १६ मार्च रोजीं नानासाहेबांस ह्या जयाचें वर्तमान कळविण्याकरितां सांडणीस्वार पाठवून दिला. तें पत्र ता० २९ मार्च रोजीं नानासाहेबांस छावणींत मिळालें. तेव्हां निजामाशीं तह करून ते साताऱ्यास येण्याकरतां निघाले. दमाजीच्या पराभवाचें वर्तमान ऐकून त्यांना मोठा आनंद झाला व त्यांनीं नाना पुरंदरे यास पत्र लिहून पाठविलें कीं, "सारे एकदील होऊन गायकवाडास जाऊन न देणें. जोर पोंचल्यास लुटून नेस्तनाबूद करणें. जोंपर्यंत गायकवाड वारापाणी (टांकेढील) झाला नाहीं तोंपर्यंत फौज न फोडणें. आमचा मोगलांचा सलोखा झाला. आम्हीं दरमजल येत असों × × × गायकवाड जाऊं न पावे तें करणें."[१] अशा रीतीनें पत्र पाठवून ते मोठे मोठे मुक्काम करीत साताऱ्यास येण्याकरतां निघाले.

---

१ पत्रें व यादी १६८.

दमाजी गायकवाड याची पुढील हकीगतः—दमाजीला प्रतिनिधी किंवा आपली गुजराथेंतील फौज आपल्या मदतीस येईल अशी फार आशा होती. नानासाहेबांनीं गुजराथेंतून गायकवाडाची फौज येऊं लागली तर तिला अडविण्याचें काम कोंकणचा सुभेदार शंकराजी नारायण यास सांगितलें होतें, व प्रतिनिधीच्या हालचालीवर नाना पुरंदरे टपून बसला होता. अशा रीतीनें कोणीकडूनही दमाजीला मदत मिळण्याची आशा उरली नाहीं. नानासाहेब तेरा दिवसांत दोनशें कोसांची मजल करून साताऱ्यास येऊन पोहोंचले, व त्यांनीं दमाजीस वेढा देऊन त्याची रसद बंद केली. धान्यसामुग्री बंद झाल्यामुळें थोडक्याच दिवसांत दमाजी हतवीर्य होऊन गेला, व त्यानें आप्पाजी जाधव नांवाच्या सरदाराच्या मार्फत नानासाहेबांपाशीं तहाचें बोलणें लाविलें. नानासाहेबांनीं त्यास " प्रथमतः तुम्हीं आपला तळ सोडून आमचे सन्निध येऊन उतरावें, " ह्मणून कळविलें. त्यावरून नाइलाज होऊन दमाजी आपल्या फौजेसह नानासाहेबांच्या फौजेशेजारीं येऊन उतरला. नंतर नानासाहेबांनीं त्यास असें सांगितलें कीं, " गुजराथचा निमे सुभा आह्मांकडे झाला, तो आमचे मामलेदार व फौज जाईल त्यांस वांटून देण्याविषयीं बरोबर तुमचे कारकून यावे. " गुजराथचा सुभा दाभाडे सेनापति यांचेकडे होता. परंतु दाभाडे नाकर्ते झाल्यामुळें त्याचा सर्व कारभार दमाजी बहुधा स्वतंत्रपणें करीत असे. त्यामुळें नानासाहेबांनीं दमाजीस असें सांगितलें. परंतु दमाजीनें " वडील उमाबाई दाभाडे आहेत त्यांचे विचारें करणें तें करावें, " असा नानासाहेबांस जबाब दिला. त्या वेळीं त्यांना दमाजीचा मोठा राग येऊन त्यांनीं दमाजीच्या गोटास आपल्या फौजेचा वेढा दिला, व त्याला आणि दाभाड्याला

कैद करून त्यांची सर्व चीजवस्त लुटून फस्त केली. दमाजीच्या कुटुंबांतील मंडळीस लोहगड किल्ल्यावर पाठवून दिलें, व दाभाडे आणि त्याचे कुटुंबांतील मंडळीस पुण्यास पाठवून देऊन होळकर याचे वाड्यांत ठेविलें. या वेळीं नानासाहेबांनीं ताराबाईनें रामराजे यांसह किल्ल्याखालीं उतरावें, व वाड्यांत रहावें म्हणून पुष्कळ प्रयत्न केला. तिनें ज्या ज्या अटी घातल्या त्या सर्व त्यांनीं मान्य केल्या. पुढें ताराबाईकडील मध्यस्थ मानसिंग जाधव याचेबरोबर कायमचें बोलणें करण्याकरितां पेशव्यांनीं आपल्या तर्फे महादजी नाईक निंबाळकर व धोंडो गोविंद यांस किल्ल्यावर पाठविलें. परंतु ताराबाईनें त्यांपैकीं कोणालाच वर घेतलें नाहीं. इतकेंच नव्हे तर तिनें रामराजे यांस दगडी कोठडींत कोंडून ठेविलें व ती त्यांना जाडेंभरडें अन्न देऊं लागली. तिनें आपला पक्ष न सोडण्याविषयीं किल्ल्यांतील शिबंदीकडून शपथा घेतल्या. त्या लोकांची तिच्यावर विशेष भक्ति होती, व ते तिला देवीचा अवतार असें समजत असत. परंतु रामराजे यांस कैदेंत ठेवून ती वाईट रीतीनें वागवीत असे, त्यामुळें लोकांची तिच्यावरची श्रद्धा हळूहळू उडत चालली. साताऱ्याचा किल्ला घेऊन नानासाहेबांस रामराजे यांस बंधमुक्त करून ताराबाईचा बंदोबस्त करतां आला असता. परंतु तसें केलें तर स्त्रीवर शस्त्र धरलें असा आपला दुर्लौकिक होईल, असें त्यांस वाटलें. त्याचप्रमाणें तिचा मुख्य साथीदार दमाजी हा त्यांचे हातीं कैदी होऊन पडला होता, त्यामुळें तिच्या वाटेस न जातां साताऱ्याचा उत्तम बंदोबस्त करून ते दमाजीस घेऊन ता० २२ मे इ० स० १७५१ रोजीं पुण्यास निघून आले. दमाजीस त्यांनीं मुजूमदाराचे वाड्याशेजारीं आबाजी कवडे याचा वाडा होता, त्यांत कैदेंत ठेविलें.

१ प० या० का० सं० ३५४.

भाग नववा.

शिंदेहोळकर यांचे उत्तर-हिंदुस्तानांतील पराक्रमः— महंमदशाहा बादशाहा इ० स० १७४८ च्या एप्रिल महिन्यांत मरण पावला हें मागें सांगितलेंच आहे. त्या वेळीं निजामउल्मुल्क याचा वडील मुलगा गाजीउद्दीन हा दिल्लीच्या दरबारीं ' अमीरउल-उमराव ' ह्या हुद्यावर असून तो सेनापतीचें काम पहात होता. निजामउल्मुल्क वारल्यापासून गाजीउद्दीन यास हैदराबादेस यावयाचें होतें. परंतु दरबारीं कांहीं महत्त्वाचीं कारणें उपस्थित झाल्यामुळें त्याला दक्षिणेंत येतां आलें नाहीं. इ० स० १७५१ त अहमदशाहा अबदालीनें हिंदुस्तानावर दुसरी स्वारी केली. त्या वेळीं माजी वजीर कमरुद्दीनखान याचा पुत्र मीरमनू हा लाहोर व मुलतान या प्रांतांचा सुभेदार होता, व अयोद्धेचा नबाब सफदरजंग हा वजिरीचे कामावर होता. मीरमनू यानें बादशाहाचे सल्ल्यानें मुलतान, लाहोर व दुसरे दोन प्रांत देऊन त्या वेळीं अबदालीस परत लाविलें. ही गोष्ट सफदरजंग यास आवडली नाहीं. सफदरजंग अबदाली आला त्या वेळीं रोहिले लोकांशीं लढत होता. त्याचें कारण असें होतें कीं, रोहिले लोक आपली सत्ता भराभर वाढवीत चालले होते, व अयोध्या प्रांतांतील सफदरजंगाचीं कांहीं ठाणीं त्यांनीं बळकाविलीं होतीं. त्यामुळें सफदरजंगास त्यांचेबरोबर लढाई सुरू करावी लागली. सफदरजंगास वजिरी मिळण्यापूर्वीं कांहीं दिवस रोहिल्यांचा सरदार अल्ली महंमद हा वारला होता. त्याच्या मुलांत गादीविषयीं तंटे उपस्थित झाले. त्यांत त्याचा तिसरा पुत्र सादुल्लाखान हा दुंदीखान व हफीज रहिमतखान या दोन सरदारांच्या मद-

तीनें विजयी झाला. पुढें सफदरजंगानें रोहिलखंडावर स्वारी करून तो प्रांत आपल्या अमलाखालीं आणिला, व आपला सुभेदार तेथें नेमिला. परंतु थोडक्याच दिवसांत रोहिले लोक पुनः उठले व त्यांनीं त्या सरदारास ठार मारून ते स्वतंत्र झाले. तेव्हां सफदरजंग पुनः त्यांच्यावर चाल करून आला. परंतु त्याचा रोहिले लोकांनीं पराभव केला.त्या वेळीं रोहिले लोकांनीं सफदरजंगास पिटाळून लाविलें, व मुलूख घेत घेत ते थेट दिल्लीपर्यंत येऊन पोहोंचले. तेव्हां त्यानें मल्हारराव होळकर, जयाप्पा शिंदे, व सुरजमल जाट यांजपाशीं मदत मागितली. तेव्हां ते त्याच्या मदतीस गेले. ज्या वेळीं नानासाहेब सातान्यास दमाजीचा समाचार घेत होते त्या वेळीं शिंदेहोळकर रोहिले लोकांशीं लढत होते. ते रोहिलखंडांत शिरल्यावर त्यांनीं कादरगंजाजवळ रोहिल्यांस गांठून त्यांचे दहा हजार लोक ठार मारले. नंतर अहमदखान पठाण बंगष नांवाचा सरदार प्रयाग येथें होता, तो त्यांच्यावर चाल करून आला. परंतु त्याचा त्यांनीं फरोकाबाद येथें पराभव केला. ही लढाई एकसारखी पंचवीस दिवस चालली होती. अहमदखान यास गंगेच्या पलीकडून बहादरखान नांवाचा एक बलिष्ठ रोहिला सरदार सामानाची वगैरे मदत करीत होता. त्यामुळें तो लवकर वठणीस येईना. सफदरजंग या वेळीं फरोकाबादेपासून पांच कोसांवर कनोज येथें होता. त्याच्याकडून शिंदेहोळकरांनीं गंगानदीवर पूल बांधवून निवडक फौज पलीकडे पाठवून दिली. तिनें इ० स० १७५१ त ता० १९ एप्रिल रोजीं बहादरखानावर हल्ला करून त्याचा फडशा करून टाकला; त्याचीं हजारों घोडीं धरलीं, त्याचे हत्ती पाडाव केले, व त्याच्या लोकांची कत्तल केली. या ठिकाणीं सुमारें तीस हजार रोहिले ठार झाले. अहमदखान हें वर्तमान ऐकून पळून गेला. दत्ताजी शिंदे

यानें या वेळीं अहमदखानाचा पाठलाग करून त्याची धूळधाण करून टाकिली, व त्याचें सर्व सामान, उंटें, हत्ती, घोडीं, लुटून नेलीं. सफदरजंगानें रोहिल्यांचा पाठलाग करून त्यांना कमाऊनच्या पहाडांत पळवून लाविलें. या मदतीबद्दल सफदरजंगानें मराठ्यांस रोहिलखंडाची चौथाई दिली, व त्याशिवाय त्यांना कांहीं मुलूख कायमचा तोडून दिला. नानासाहेबांस हें वर्तमान समजलें त्या वेळीं आपल्या सरदारांचा पराक्रम पाहून त्यांना अत्यानंद झाला. त्यांनीं त्या वेळीं जयाप्पा शिंदे, व साबाजी शिंदे यांस जीं पत्रें पाठविलीं त्यांवरून ते आपल्या सरदारांचा गौरव कोणत्या रीतीनें करीत होते, हें स्पष्ट दिसून येतें. त्याचा थोडासा मासला येथें देण्यास कांहीं हरकत नाहीं. त्यांपैकीं एका पत्रांत आपलें कुशल वृत्त कळविल्यावर ते लिहितात कीं, "लिहिलें तें श्रवण केलें, आणि त्यानें संतोषाच्या कोटी झाल्या. शाबास तुमच्या हिमतीची, व दिलेलरस्तुमकीची (धारिष्टाची व पराक्रमाची); शाबास लोकांची, आमच्या दक्षिणच्या फौजांनीं यमुना, गंगा पार होऊन रोहिले पठाणांशीं युद्ध करून आपण फत्ते पावावें हें कर्म लहान सामान्य न झालें. तुम्हीं एकनिष्ठ कृतकर्मे सेवक, या दौलतीचे स्तंब आहां. इरानतुरान पावेतों लौकिक झाला कीं, वजीर धरला (रोहिल्यांनीं), पळाला असतां फिरून फत्तेच्या मसनदीवर (तुम्हीं) बसविला. शाबास सरदारांची व शाबास तुम्हां लोकांची आहे. दुसरीयास हें यश फार दुर्लभ आहे इ०." अशा प्रकारें सेवकांचा गौरव करणारे स्वामी असले ह्मणजे त्यांना मग दुप्पट स्फुरण कां चढणार नाहीं बरें?

नानासाहेबांची सलावतजंगावर स्वारीः—झांशीचा सुभे-

---

१ प० या० का० सं० १६२, १६३, ३६४.

दार नारो शंकर यानें बाळाजी महादेव नांवाच्या आपल्या कारकुना-बरोबर नानासाहेबांकडे खजिना पाठविला असतां, अबदुल खैरखान नामक निजामाच्या सरदारानें निजामाचा दिवाण रामदासपंत याच्या मसलतीवरून तो ब्ऱ्हाणपूर येथें लुटला. त्या वेळीं औरंगाबाद येथें सलाबतजंगाचे दरबारीं शामजी गोविंद व राघोबा गणेश हे दोन पेशव्यांचे वकील होते. त्यांनीं दिवाण रामदासपंत याच्याशीं खजिना परत देण्याविषयीं बोलणें लाविलें. प्रथमतः त्यानें 'त्या सरदारास लिहून खजिना परत देववितों' ह्मणून कबूल केलें. परंतु हें बोलणें फक्त वरकांती होतें. त्याचे मनांत पूर्वी नानासाहेबांनीं कृष्णेवर सलाबतजंगास जो त्रास दिला होता, त्याचा सूड घ्यावयाचा होता, व त्या कामीं फ्रेंच सरदार बुस्सी याचें त्याला पूर्ण पाठबळ होतें. रामदासपंत त्या वेळीं बुस्सी नाचवील तसें नाचणारें एक बावलें होतें, असें ह्मटलें तरी चालेल. त्यानें जानबा जसवंत निंबाळकर यास पेशव्यांचे दरबारीं तहाचें बोलणें करण्याकरतां ह्मणून पाठविलें होतें. परंतु त्यांत त्याचा हेतु असा होता कीं, अशा रीतीनें नानासाहेबांस बेसावध ठेवून आपण त्यांच्यावर स्वारी करावी. परंतु रामदासपंताचें हें कपट ते पूर्णपणें ओळखून होते. रामदासपंतानें आंतून लढाईची कडेकोट तयारी चालविली होती. त्यानें "तुमचा खजिना लौकरच देववितों; आम्हांस श्रीमंताचे आज्ञेप्रमाणें चालणें आहे; मोंगलाई व गनीमाई (मराठेशाई) एकच आहेत;" अशीं वरवर गुळचट बोलणीं लावून आंतून मराठ्यांत भेद करण्याचें काम चालविलें. त्यानें रघूजी भोसल्यास जहागीर देऊं करून त्याला फोडलें. परंतु त्याचें व रघूजीचें पुढें भांडण होऊन तो त्याला सोडून निघून गेला. त्यानें

१ म. इ. सा. खंड १ पत्र नंबर ३ व पुढील कांहीं पत्रें.

कोल्हापुरच्या संभाजी महाराजांशीं कारस्थान सुरू केलें होतें. पण त्या कामीं त्याला यश आलें नाहीं. ताराबाईनें मात्र त्याला पूर्ण अश्वासन दिलें होतें. बाबूजी नाईकही या वेळीं रामदासपंतास जाऊन मिळाला. त्याला नालंबदीस पैसे देऊन कर्नाटकांत पाठविण्याचा त्याचा विचार होता. औरंगाबाद येथें सैन्याची तयारी झाली. खैरखान वगैरे सरदारमंडळी आपल्या फौजेसह औरंगाबाद येथें आली. खैरखान यानें सलाबतजंग यास असें सांगितलें कीं, "प्रधानपंत फार बेफाम झाले आहेत. आपणांस सर्व गोष्टी अनुकूल आहेत. मी आतां वार्धक्यानें क्षीण झालों आहें. तेव्हां शेवटीं हा देह खावंदाचे कामीं खर्च व्हावा, अशी इच्छा आहे." त्या वेळीं नशीरजंग शौकतजंग म्हणून दुसरा एक मातबर सरदार निजामाचे पदरीं होता. त्यानें सलाबतजंगास असें सांगितलें कीं, "मागें थोरले बाबानें (निजामउल्मुल्क यानें) बहुत यत्न केला तो व्यर्थ झाला. ह्मणून सख्य संपादून होते. आतां तुम्हीं विरुद्ध वागतां. तुमच्यानें गनीमाई मोडवत नाहीं, व गनीमाईच्यानेंही तुह्मांला मोडवत नाहीं. विनाकारण दुर्लौकिक करून घेण्यांत कांहीं अर्थ नाहीं. सर्व मुल्खाचा पाठावरवंटा होईल." परंतु त्याच्या उपदेशाकडे कोणीं लक्ष दिलें नाहीं, व निजामाचें सैन्य पुण्यावर स्वारी करण्याचे उद्देशानें औरंगाबादेहून निघालें. नानासाहेबांस हें वर्तमान समजलें. तेव्हां तेही भाऊसाहेब, रामचंद्रबाबा, नाना पुरंदरे वगैरे मंडळी बरोबर घेऊन फौजेसह आक्टोबर इ० स० १७५१ च्या प्रारंभीं पुण्याहून निघाले. सलाबतजंग नगरास आला व तेथें त्यानें आपला जनानखाना ठेविला. नंतर कुपटी, केदळ, पावळ, वगैरे गांवांवरून तो कुकडी नदीवर आला.

त्याच्या सैन्यांत बुस्सीचे चार हजार लोक होते. त्यानें वाटेनें पेशव्यांचा मुलूख जाळून पोळून टाकिला होता. नानासाहेब पुण्याहून निघाले ते कळस, खेड, वडगांव या गांवांवरून कुकडी नदीवर आले. ता० २१ नवंबर इ० स० १७५१ रोजीं उभय सैन्यांची दृष्टादृष्ट झाली. त्या दिवशीं चंद्रग्रहण होतें, व मराठ्यांची फौज संध्याकाळीं स्नानें वगैरे करण्याचे कामीं गुंतली होती. ती संधी साधून बुस्सीनें रात्रीच्या प्रहरीं एकाएकीं मराठ्यांवर छापा घातला. त्यामुळें त्यांची अति धांदल होऊन त्यांना तेथून पळून जावें लागलें, व त्यांचें सामानसुमान शत्रूच्या फौजेनें लुटून नेलें. प्रथमतःच ही माघार आली, तथापि नानासाहेब डगमगले नाहींत. दुसरे दिवशीं त्यांची फौज पुनः तयार झाली, व तिनें सलाबतजंगाचे फौजेस त्रास देण्याचें काम सुरू केलें. तथापि निजामाची फौज पुढें येतच होती. तिनें रांजणगांव लुटलें, व तळेगांव ढमढेरे याचा विध्वंस करून टाकला. त्या वेळीं आतां निजाम पुण्यावर खास जाणार असें नानासाहेबांस वाटलें. तेव्हां नाशिक जिल्ह्यांतील निजामाचे मुलखास त्रास दिला, तर तो परत फिरेल असें नानासाहेबांस वाटल्यावरून त्यांनीं लगेच त्रिंबक सूर्याजी प्रभू नांवाच्या आपल्या सरदारास त्रिंबकचा किल्ला घेण्याकरतां फौजेसह तिकडे पाठवून दिलें. पुढें ता० २७ नवंबर रोजीं घोडनदीवर उभय पक्षांची लढाई झाली. नानासाहेबांनीं सलाबतजंगावर मोठ्या जोरानें हल्ला केला. महादाजीपंत पुरंदरे, दत्ताजी व महादजी शिंदे, कोन्हेर त्रिंबक एकबोटे वगैरे सरदारांनीं या वेळीं आपल्या पराक्रमाची शिकस्त करून सोडिली. एकबोटे यांस या लढाईपासून फांकडे असें उपनांव मिळालें. या लढाईंत निजामांचा पूर्ण पराभव झाला. फ्रे-

चांचा तोफखाना होता म्हणून निजामाची कांहीं तरी बाजू संभाळली गेली. त्रिंबक सूर्याजी नाशिक जिल्ह्यांत गेला व त्यानें कोळी लोकांस वश करून रात्रींचे प्रहरीं त्रिंबकचे किल्ल्यास शिडया लावून हल्ला केला, व मोठ्या मर्दुमकीनें तो किल्ला ता० १ दिजंबर इ. स. १७५१ रोजीं सर केला. सलाबतजंगास हें वर्तमान समजलें तेव्हां त्याला मोठी काळजी उत्पन्न झाली, व त्रिंबकचा किल्ला परत घेण्याकरितां अहमदनगर येथें प्रथमतः जाऊन तेथें युद्धसामुग्रीचा पुरवठा घेऊन मग त्रिंबक येथें जावें, अशा उद्देशानें तो परत फिरला. तो परत फिरला असें पाहून पेशव्यांची फौज त्याला फारच त्रास देऊं लागली. पिछाडी कडून पेशव्यांची फौज त्रास देत होती, व आघाडीकडून रघूजी भोसले यानें त्यास जेरीस आणलें. त्याचप्रमाणें फौजेचा पगार थकल्यामुळें त्याच्या लोकांचीही ओरड सुरू झाली होती. अशा रीतीनें मराठ्यांनीं मांडवगणावरून भालकीचिटकोंद्यापर्यंत सलाबतजंगास चोप देत देत परत घालविलें. त्यामुळें घाबरून जाऊन त्यानें तहाचें बोलणें लावलें. उभय पक्षांचा शिंगवें, परगणे राहुरी, येथें जानेवारी इ० स० १७५२ त तह झाला. त्यांत निजामानें लढाईच्या खर्चाबद्दल चार लाख रुपये पेशव्यास द्यावे व पेशव्यानें एका महिन्यांत त्रिंबकचा किल्ला निजामास परत द्यावा, असें ठरलें होतें. नंतर निजाम परत गेला, व नानासाहेब त्रिंबकेश्वर, भीमाशंकर वगैरे यात्रा करून ता० १८ मार्च इ० स० १७५२ रोजीं पुण्यास परत आले. सलाबतजंगाचे फौजेची पगारासंबंधें ओरडाओरड कमी झाली नव्हती. शेवटीं त्या लोकांनीं दंगा करून ता० ७ एप्रिल इ० स० १७५२ रोजीं रामदासपंताचा खून केला. या कामीं सलाबतजंगाचा धाकटा भाऊ निजामअल्ली याची त्या लोकांस फूस होती असें ह्मणतात.

रघूजी भोसले आपली सत्ता बंगाल्यांत व निजामाचे राज्यांत वाढवितोः—नानासाहेब सलाबतजंगाशीं लढत असतां वऱ्हाडांत रघूजी भोसले स्वस्थ बसला नव्हता. इ० स० १७५० त पुण्यास एकंदर प्रकरणांचा निकाल झाल्यावर रघूजी वऱ्हाडांत परत गेला. त्याच सुमारास त्याचा पुत्र जानोजीही कर्नाटकच्या स्वारी-वरून परत आला. नंतर रघूजीनें त्याला बंगाल्यांत मीर हबीब यास मदत करण्याकरितां पाठवून दिलें. मराठ्यांच्या अंतस्थ भानगडी-मुळें सुमारें एक वर्ष तो प्रांत मराठ्यांच्या ताबडींतून सुटला होता. जानोजी फौजेसह कटकप्रांतीं गेला. त्या वेळीं अलीवर्दीखान यानें कांहीं दिवस हातपाय हालविले, परंतु शेवटीं तो जेरीस आला, व त्यानें सर्व कटक प्रांत जानोजीस दिला, व मीर हबीब यास त्या प्रांताचा जानोजीचा सुभेदार असें कबूल केलें. परंतु वसुलाचे संबं-धानें थोडेच दिवसांत जानोजी व मीर हबीब यांच्यामध्यें तेढी उत्पन्न झाली. त्या वेळीं जानोजीनें त्याला कैद केलें. मीर हबीब यास तें अपमानाचें कृत्य सहन न होऊन तो जानोजीच्या मंडळीवर चालून गेला. त्या वेळीं झटापटींत जानोजीच्या लोकांनीं त्याला कापून काढलें. अलीवर्दीखानानें जानोजीस कटक प्रांत दिला, त्याच वेळीं त्यानें बंगाल व बहार या दोन प्रांतांच्या चौथाईबद्दल बत्तीस लक्ष रुपये देण्याचें कबूल केलें होतें. जानोजी बंगाल्यांत असतां इकडे रघूजी वऱ्हाडांत स्वस्थ बसला नव्हता. पुणें प्रांताचा पाटावरवंटा करण्याचे उद्देशानें सलाबतजंग आपले राज्यांतून निघून गेला आहे, अशी संधी पाहून रघूजीनें वाईनगंगा व गोदावरी या नद्यांच्यामधील निजामाचा सर्व मुलूख काबीज करून त्या प्रांतांतील मोगलांचीं

सर्व ठाणीं उठवून टाकून तेथें आपलीं ठाणीं बसविलीं, व तो सर्व मुलूख आपले राज्यांत सामील केला.

गाजीउद्दीन याचें दक्षिणेंत आगमनः--निजामउल्मुल्काचा जेष्ठ पुत्र गाजीउद्दीन यास दक्षिणेंत आणण्याबद्दल इ० स० १७५०* पासून नानासाहेबांचा प्रयत्न सुरू होता. त्या संबंधाचीं त्यांचीं पत्रें उत्तर-हिंदुस्तानांत त्या वेळीं मल्हारराव होळकर, व जयाप्पा शिंदे होते त्यांस जात असत. परंतु ते सरदार रोहिल्यांचे कामगिरीवर गुंतल्यामुळें व स्वतः गाजीउद्दीन यास दिल्लीच्या दरबारीं कांहीं महत्त्वाचीं कामें असल्यामुळें त्यास कांहीं दिवस दक्षिणेंत येण्यास सवड मिळाली नाहीं. तथापि गाजीउद्दीन यास नानासाहेबांनीं शिंदेहोळकरांच्या मार्फत नादीं लावून ठेविलें होतें. इ० स० १७५२ च्या जानेवारी महिन्यांत नानासाहेब व सलाबतजंग यांचेमध्यें जो तह झाला, त्या वेळीं जानबा निंबाळकर व औरंगाबादचा सुभेदार सय्यद लष्करखान हे वकील या नात्यानें नानासाहेबांकडे आले होते. ते आंतून गाजीउद्दीन याच्या पक्षाचे होते. तेव्हां तहाच्या अटी ठरत आहेत, अशा बहाण्यानें नानासाहेबांनीं त्यांना दोन महिने ठेवून घेतलें होतें. त्या वेळीं सलाबतजंग पांच लाखांची जहागीर देत असेल तर आपण गाजीउद्दिनाचा पक्ष सोडतों, असें नानासाहेबांनीं त्यांच्याशीं बोलणें लाविलें होतें. त्यांच्या मनांत ज्या बाजूकडे आपला फायदा होईल ती आपण स्वीकारावी असें होतें, व ह्मणून त्यांनीं कोणालाच वचन दिलें नव्हतें. प्रथमतः गाजीउद्दीन येणार या भीतीनें सलाबतजंग जहागीर देण्यास कबूल झाला. त्या वेळीं नानासाहेबांनीं एक पत्र शिंदेहोळकर यांस पाठविलें. त्यांत ते

* प० या० ३३४, ३५८, ३६१, ३८३, ३९१, ३९६ इ. का. सं.

असें लिहितात कीं, " आम्ही सलाबतजंगाची दस्तगिरी केली. कांहीं वचनांत गुंतलों. आमची जहागिरीविषयीं त्याजशीं बोली लागोन राहिली आहे. तुम्हीं गाजीउद्दीनाकडे वचनांत न गुंतावें. तुम्ही त्याजकडे वचनांत गुंतलां, व आम्हीं यांचेकडे गुंतलों येणेंकरून दोहींकडेही फार फार अवघड होऊन बेइमानाचा शब्दारोप पदरीं येईल." पुढें रामदासपंत व बुस्सी यांच्या सांगण्यावरून सलाबतजंगानें जहागिरीचें बोलणें अमान्य केलें. तेव्हां नानासाहेबांनीं इ० स० १७५२ च्या मार्च महिन्यांत "तुम्ही गाजीउद्दीन यास दक्षिणेंत घेऊन यावें," असें कायमचें पत्र शिंदेहोळकर यांस लिहिलें. कोणाला तरी दक्षिणच्या सहा सुभ्यांचा सुभेदार म्हणून दिल्लीच्या दरबारांतून नेमून आणावें, व त्याला टिक्याचा मालक करून आपला सर्व कार्यभाग उरकून घ्यावा, असा नानासाहेबांचा विचार होता, व म्हणून सफदरजंगाचा पुत्र सुजाउद्दौला यासच घेऊन यावें, असें त्यांस एकदा वाटलें. परंतु तसें केलें तर गाजीउद्दीन दिल्लीच्या दरबारीं दुसरांच कांहींतरी घोटाळा करील, त्याचप्रमाणें सुजाउद्दौला यास दक्षिणेंत मोंगल किंवा मराठे कोणींही साह्य करणार नाहींत, असें त्यांस वाटल्यावरून गाजीउद्दीन यासच आणावें म्हणून त्यांनीं शिंदेहोळकर यांस लिहिलें. गाजीउद्दीन बऱ्हाणपूर येथें आला म्हणजे त्याच्या पक्षाचे मोंगल व मराठे सरदारांनीं त्यास तेथें येऊन मिळावें, कर्नूल, कडप्पा, सावनूर येथील नबाबांनीं कर्नाटकची बाजू संभाळावी, अर्काटचा नबाब महमदअली यानें त्रिचनापल्लीचा बंदोबस्त करावा, खुदावतखान, शेख अलीखान, जमीलबेगखान, अस्सलखान, इशमदुल्लाखान वगैरे सरदार औरंगाबाद येथें होते, त्यांनीं सर्व शहरभर गाजीउद्दीन याचे नांवाची द्वाही फिरवावी,

अशा रीतीनें सर्व बेत सिद्ध करून ठेवलेले होते. गाजीउद्दीन यास आणण्याचे संबंधानें त्यांनीं शिंदेहोळकरांस जें पत्र पाठविलें होतें, त्यांतच रामदासपंताचे संबंधानें ते असें लिहितात कीं, " सारांश रामदासपंतानें अब्रू घेतली ती एकदा हरतजवीज करून त्यास पुरती जरब दर्णे घडल्यावांचून तुम्हांस कैलासवासी (बाजीरावसाहेब) यांनीं वाढविलें व तुम्हीं इराणतुराणपावेतों लौकिक केला तो सर्व व्यर्थ ! आम्हींही रायाचे वंशीं व्यर्थ जन्म घेतला. या उपरी तुम्हीं खामखा (निखालसपणें) त्यास (गाजीउद्दिनास) आणावें अथवा त्यांनीं दसराकरून मागून यावें. × × याउपर गाजीउद्दिनास पूर्ण भरंवसा देऊन वजिराशीं लगाम राखून शेवटीं न तोडतां दक्षिणचे कामास उपयोगीं पडत तें करून यावें. सर्वस्व वेंचून एकदा रामदासपंतास मोडावा. × × कदाचित् गाजीउद्दीन नामर्द, फौज न ठेवी, बाहेर न निघे, तर दुसरा कोणी पंधरा हजारांचा धनी आणावा. निदानीं तुम्हीं यावें. येथेंही फौज फार आहे. रामदासपंतास (मोडण्यास) तुम्ही आम्ही एकत्र झाल्यास अगाध नाहीं. × × सांप्रत नवें वर्तमान त्रिंबक आम्हीं न दिला यासाठीं रामदासपंत औरंगाबादेस येणार; मग किल्लाही कदाचित् देणें भाग पडेल. जहागिरीचा जाबसाल अद्याप त्याजकडून झाला नाहीं. मोठा लबाड, दगाबाज आहे. सारांश एकदा त्यास जरब द्यावी. तरच सर्व सार्थक *आहे. " यावरून रामदासपंताचे संबंधानें नानासाहेबांचा काय ग्रह झाला होता तें सहज कळून येईल. मागें सलाबतजंगाशीं तह केला त्या वेळीं त्रिंबकचा किल्ला एक महिन्यानें परत देऊं, अशी नानासाहेबांनीं त्याच्याशीं बोली केली होती. परंतु जहागिरीच्या संबंधानें सलाबतजंग

* प. या. १६१ का. सं.

कांहींच बोलेना, तेव्हां त्रिंबकच्या किल्ल्यासंबंधाची अटही विचा-रावरच पडली. तेव्हां त्याचा निकाल करून घेण्याकरितां रामदास-पंत फौजेसहवर्तमान औरंगाबाद येथें आला होता. त्याच्या फौजेंत पगा-रासंबंधानें कुरकूर उत्पन्न झालीच होती. शेवटीं त्या लोकांनीं औरं-गाबाद येथें दंगा करून ता. ७ एप्रिल रोजीं रामदासपंताचा खून केला हें मागें सांगितलेंच आहे.

अहमदशाहा अबदालीनें हिंदुस्तानावर दुसरी स्वारी (इ० स० १७५१) केली त्या वेळीं सफदरजंग शिंदेहोळकर यांचे मदतीनें रोहिले लोकांशीं लढत होता. दिल्लीच्या बादशाहानें त्यास परत येण्या-विषयीं पत्र पाठविलें, त्या वेळीं त्या लढाईचा शेवट झाला होता. बादशाहानें मुलतान, लाहोर वगैरे प्रांत अबदालीस देण्याची घाई केली नसती तर सफदरजंगानें शिंदेहोळकरांचे मदतीनें अबदालीचाही मोड केला असता. सफदरजंग यास त्याबद्दल वाईट वाटलें, परंतु त्याचा उपयोग काय? आतां आपण शिंदेहोळकरांचा कसा उतराई व्हावें हा सफदरजंगास मोठा प्रश्न येऊन पडला. याच संधीस नानासाहे-बांचें "गाजीउद्दीन यास दक्षिणेंत घेऊन यावें" असें शिंदे-होळकर यांस पत्र आलें. तेव्हां त्यांनीं सफदरजंगास ती गोष्ट सांगि-तली. बादशाहा गाजीउद्दीन यास दक्षिणेंत जाण्यास पुष्कळ दिवस परवानगी देत नव्हता. पुढें सफदरजंगाचे सांगण्यावरून त्यानें गाजीउद्दीन यास दक्षिणचा सुभेदार नेमून दक्षिणेंत जाण्यास पर-वानगी दिली. त्या वेळीं बादशाहानें गाजीउद्दीन यास मदत करण्या-विषयीं शिंदेहोळकर यांस सांगितलें, व नानासाहेबांसही एक पत्र दिलें. नंतर जुलै महिन्याच्या प्रारंभीं शिंदेहोळकर हे गाजीउद्दीन यास घेऊन ग्वालेरीस आले. त्या वेळीं जोराचा पावसाळा होता.

त्यामुळें त्यांना दक्षिणेंत लौकर येतां येईना. ता० ३१ जुलै रोजीं शिंदे-होळकर हे नर्मदेच्या अलीकडे *सिपावरड नांवाच्या गांवाजवळ होते. तथापि ६ आगस्टपर्यंत ते रेवातीरींच होते, असा दाखला सांपडतो. तेथून त्यांनीं "आपण पुण्याहून लौकर निघून यावें" असें पेशव्यांस पत्र पाठविलें. नानासाहेबांनीं जुलै महिन्यापासून फौजेची जमवाजमव चालविली होती. ते ता० ६ आगस्ट रोजीं पुण्याहून वानवडीस गेले, व तेथून पाटसावरून बीडसांगवीच्या रस्त्यानें पुढें मोंगलाईंत गेले, व शिंदेहोळकर, मार्केडा, इंद्राई, चांदवड, धोडप, कान्हेरा, राजदेहेर, †कानदेहेर, वगैरे किल्ले मोंगलांपासून घेत घेत औरंगाबादेच्या रोखानें निघाले, ते गाजीउद्दीन यासह ता० ३० सपटंबर १७५२ रोजीं औरंगाबादेस जाऊन पोहोंचले. रामदासपंत एप्रिल महिन्यांत वारला त्या वेळीं निजामाचे दरबारीं बुस्सीचें फार प्राबल्य होतें. तसेंच सय्यद लष्करखान व शहानवाझखान या नांवाचे दोन सरदारही विशेष प्रबळ होते. ते औरंगाबाद येथें रहात होते. फ्रेंचांनीं निजामाचे दरबारीं जें आपलें घोडें पुढें ढकललें होतें, तें त्यांस आवडत नव्हतें. परंतु बुस्सीच्या शहाणपणामुळें हळू हळू त्यांच्या मनांतून फ्रेंचांविषयींची मत्सरबुद्धि नाहींशी होत गेली. रामदासपंताचेमागें बुस्सीनें सलाबतजंगास सांगून सय्यद लष्करखान यास वजीर नेमिलें. गाजीउद्दीन नर्मदा उतरून अलीकडे आला हें वर्तमान सय्यद लष्करखान यास कळतांच त्यानें सलाबतजंग व बुस्सी यांस असें सांगितलें कीं, "मी

---

* पत्रें व यादी ८०; याशिवाय ४, ५, ६, ७, ८५, १६१ हीं पत्रें पहावीं. का. सं.

† हे किल्ले नाशिक व खानदेश जिल्ह्यांत आहेत.

गाजीउद्दीन यास मिळणार, असा बहाणाकरून मराठ्यांकडे जातों, व गाजीउद्दिनास त्यांनीं मिळूं नये, निदान गादीविषयींच्या तंट्याचा निकाल होईपर्यंत त्यांनीं कोणत्याच पक्षास मिळूं नये असें करितों ". अशा रीतीनें त्यानें आपल्या कामाचा राजीनामा दिला व तो जानबा निंबाळकर हा कर्माळें येथें रहात होता, तेथें गेला, व तेथून ते दोघे नानासाहेबांकडे आले. सय्यद लष्करखानाच्या-मागें सलाबतजंगानें शहानवाझखान यास आपली वजिरी दिली.

रामदासपंत होता तोंपर्यंत सय्यद लष्करखान याचें गाजीउद्दि-नाच्या पक्षास पूर्ण पाठबळ होतें. गाजीउद्दीन औरंगाबादेस आल्या-वर त्याचे सल्लामसलतगार सय्यद हशमतखान व महमद अनवार-खान यांनीं नानासाहेबांस सांगून पाठविलें कीं, " निंबाळकर व सय्यद लष्करखान हे हैदराबादेहून आले आहेत, त्यांस निरोप न देतां त्यांस आपण घेऊन शहागडावर यावें. तेथें आल्यावर आमचे व आपले विचारास येईल त्याप्रमाणें करावें. " त्यावरून नानासाहेब त्या उभयतांस घेऊन शहागडावर आले. त्या वेळीं नानासाहेबांबरोबर एकंदर दीड लाख फौज होती. औरंगाबादेस सलाबतजंगानेंही पुष्कळ फौज गोळा केली होती. पावसाळा असल्यामुळें ताबडतोब लढाईस सुरवात झाली नाहीं; तथापि तो संपतांच लढाई सुरू करावयाची, अशा उद्देशानें दोन्हींकडे कडेकोट तयारी होती. मध्यंतरीं दोन्ही फौजांची एक लहानशी चकमक झडली. परंतु तींत सला-बतजंगाचा पराभव होऊन त्याला मागें हटावें लागलें. नंतर नानासाहे-बांनीं गाजीउद्दीन याजपासून करार करून घेतला. त्यांत त्यानें नानासाहेबांस तापीपासून गोदावरीपर्यंतचा मुलूख म्हणजे ख़ान-देश सुभ्यापैकीं नाशिक, व जालनापूर हे प्रांत, आणि अशिरी व

दौलताबाद हे दोन किल्ले इतका मुलूख दिला. गाजीउद्दिनाकडे वडीलपणाचा हक्क असल्यामुळें सलाबतजंगाची बाजू लंगडी होती. तेव्हां आपणास या कामांत यश येणार नाहीं अशी शंका उत्पन्न होऊन सलाबतजंगानें तहाचें बोलणें सुरू केलें. हा तह चालला असतां निजामअल्लीच्या आईनें एके दिवशीं गाजीउद्दिनास मेजवानीस बोलाविलें व त्याला भोजनांत विष घातलें. त्यामुळें तो त्याच रात्रीं मरण पावला. गाजीउद्दिनाचा अशा रीतीनें अंत झाल्यामुळें सलाबतजंगास कोणी शत्रु उरला नाहीं, व मराठ्यांस आपण धाब्यावर बसवावें असें त्यास वाटूं लागलें. गाजीउद्दीन यानें केलेला करार सलाबतजंग कबूल करीना. त्यानें जंगी फौज गोळा करून पेशव्यांचे फौजेवर छापा घातला. दुसरे दिवशीं *भालकी येथें उभय पक्षांची फार मोठी लढाई झाली (दिजंबर १७५२). ह्या लढाईंत महादाजीपंत पुरंदरे, दत्ताजी व महादजी शिंदे, कान्हेरपंत एकबोटे वगैरे सरदारांनीं फार मोठा पराक्रम केला. सलाबतजंगाचा पराभव झाला, त्यामुळें बुस्सीच्या सल्लयानें त्यानें गाजीउद्दिनानें पूर्वी मराठ्यांस जो मुलूख देऊं केला होता तो देण्याचें कबूल केलें. त्यानें पूर्वीच्या करारांत एक कलम ज्यास्त घातलें तें एवढेंच कीं, रघूजी भोसल्यानें वाईनगंगेच्या अलीकडचीं आपलीं ठाणीं उठवून पलीकडे जावें. रघूजी त्या अटीला ताबडतोब कबूल झाला. बुस्सी मोठा राज्यकारस्थानी पुरुष होता. त्याच्या मनांत हिंदुस्तानांत फ्रेंचांस राजकीय हक्क प्राप्त करून घ्यावयाचे होते. आपण पेशव्यांचे विरुद्ध वागत गेलों तर ते बलवान् असल्यामुळें आपली महत्त्वाकांक्षा कधींही तृप्त होऊं देणार नाहींत, अशी त्यास खातरी होती. त्यामुळें तो नानासाहेबांस

* पेशव्यांची रोजनिशी.

कांहींसा नमून वागूं लागला होता; व यापुढील एक दोन वर्षे तो नानासाहेबांची मर्जी संपादन करीत होता. वरील गोष्टीमुळेंच त्यानें सलाबतजंगास तह करून तंटा मिटविण्याची सल्ला दिली होती. ता. २५ डिसेंबर रोजीं सलाबतजंग व पेशवे यांच्या भेटी झाल्या. अशा रीतीनें इ० स० १७५२ च्या दिजंबर अखेर नानासाहेब गाजीउद्दिनाच्या प्रकरणांतून मोकळे झाले.

भाग दहावा.

ताराबाईची गडबड :—मागें सांगितल्याप्रमाणें दमाजी गायकवाडास कैद केल्यापासून त्यानें ताराबाईचा पक्ष सोडून दिला व तो पेशव्यांच्याच तंत्रानें वागूं लागला, त्यामुळें ताराबाईच्या पक्षाचे हातपाय बरेच गळले होते. तथापि ती बाई स्वस्थ बसणारी नव्हती. नानासाहेब गाजीउद्दिनाच्या कारस्थानांत गुंतले असतां तिची नानासाहेबांविरुद्ध साताऱ्यास जारीनें खटपट सुरू होती. तिचा राग कमी व्हावा म्हणून नानासाहेबांनीं तिच्या कृत्यांवर विशेष नजर देण्याचें कमी केलें होतें. परंतु त्यांच्या संबंधानें तिच्या मनांत पक्का द्वेष बाणला होता. तिचा मुख्य हेतु नानासाहेबांस निर्माल्यवत् करावें असा होता. मोरो शिवदेव थिटे म्हणून चिटणिसाच्या हाताखालीं एक कारकून होता, त्याला तिनें आपला चिटणीस नेमिलें होतें, व तिचा एक पुराणीक होता, त्याला आपला कारभारी नेमिलें होतें, तिनें सर्व जुनीं माणसें काढून टाकिलीं. तसेंच "रामराजे यांस मोकळें सोडावें" इत्यादि गोष्टी तिच्यांजवळ कोणीं काढिल्या, तर ती त्याला देहांतशासन करूं लागली. प्रथमतः तिचा जगज्जीवन-

राव प्रतिनिधी याच्यावर फार भरंवसा होता. परंतु त्याचे हातून कांहीं होत नाहीं असें तिला दिसून आलें तेव्हां तिनें बाबूजी नाईक यास प्रतिनिधीपद देऊं करून त्याला साताऱ्यास बोलाविलें. नाईक साताऱ्यास आल्यावर तो प्रतिनिधीचे वाड्यांत राहिला. ताराबाईनें त्याला आपला प्रतिनिधी नेमून प्रथमतः बरोबर फौज देऊन त्याला जगज्जीवनराव प्रतिनिधीचा तालुका ताब्यांत घेण्याकरितां रवाना केलें. ताराबाईजवळ या वेळीं पांचसहा हजार फौज होती, व तिनें सातारा व वाई हे प्रांत आपल्या ताब्यांत आणिले होते. नाईक साताऱ्याहून निघाला तो तांदुळवाडी नांवाच्या गांवापाशीं येऊन पोहोंचला. जगज्जीवन यास हें वर्तमान कळतांच तोही कऱ्हाडाहून फौज घेऊन निघाला. उभय पक्षांची तांदुळवाडीजवळ लढाई झाली. तींत बाबूजी नाईक याचा पराभव होऊन तो जखमी झाला, व साताऱ्यास पळून आला. परंतु त्याचे मागोमाग प्रतिनिधीही त्याचे पाठीवर आला. तेव्हां आठ दिवस साताऱ्यास राहून आपणास हें प्रतिनिधीपद कधींही पचणार नाहीं असें वाटून तो बारामतीस आपल्या पेढीवर निघून गेला. यानंतर साताऱ्याच्या किल्ल्याचा अधिकारी आनंदराव जाधव यास पेशव्यांच्या विरुद्ध चालून आपला निभाव लागणार नाहीं, व रामराजे राज्याधिकारी असून त्यांस ताराबाईनें बंदींत ठेविलें आहे, ही गोष्ट अप्रशस्त आहे, असें वाटून त्यानें रामराजे यांस बंधमुक्त करून टाकण्याचा विचार केला. परंतु ताराबाईस ती बातमी कळून तिनें खलबत करण्याचे मिषानें त्यास बोलावून आणून कैद केलें व त्याचा शिरच्छेद केला; तसेंच रामराजे यांच्यावर तिनें ज्यास्त कडक पहारा ठेविला. नानासाहेबांनीं बरेच दिवस तिची उपेक्षा केली, परंतु ती हळू हळू अधिक अधिकच बखेडे माजवीत गेली. तेव्हां त्यांनीं ताराबाईची

व तिच्या साथीदार मंडळीची गडबड बंद करण्याचे हेतूनें दादीबा वाघ नांवाच्या आपल्या सरदाराची पांच हजार फौजेसह साताऱ्या-जवळ चंदनवंदन किल्ल्यावर कायमची नेमणूक करून टाकिली. या गोष्टीमुळें ताराबाईच्या उलाढाली बऱ्याच कमी पडल्या.

जगज्जीवनराव प्रतिनिधी कर्नाटकांत वसुलाकरतां जातो :—याच वेळेच्या सुमारास जगज्जीवनराव प्रतिनिधी सावनूरच्या नबाबापासून खंडणी वसूल करण्याकरितां कर्नाटकांत गेला होता. त्याच्या मनांत त्या प्रांतीं आपली छाप बसवावी असें होतें. तो पेशव्यांशीं सलोख्यानें वागूं लागला होता. कर्नाटकांत तरी तो नानासाहेबांच्या संमतीनेंच गेला होता. परंतु अंतर्यामीं त्या दोघांचीं मनें एकमेकांविषयीं शुद्ध नव्हतीं. नानासाहेबांनीं प्रतिनिधीच्या मदतीस म्हणून नारायणराव घोरपडे नांवाचा आपला सरदार दिला होता. परंतु आंतून "प्रनिनिधी सावनुरास गेले म्हणजे सावनूरकरांशीं संधान बांधून खंडणी न देतां त्यास हुसकून काढावें," असें त्याला सांगितलें होतें. तेव्हां तेथील नबाबानें घोरपडे याच्या मसलतीवरून त्याच्यावर अकस्मात् हल्ला केला व त्याला त्या प्रांतांतून पिटाळून *काढलें.

दादासाहेबांच्या गुजराथेंत स्वाऱ्या :—दादासाहेबांनीं इ० स० १७५० पासून १७६३ पर्यंत गुजराथेवर एकंदर चार स्वाऱ्या केल्या. त्या करण्यापूर्वी गुजराथची काय स्थिति होती व त्यांनीं त्या कां केल्या, याचा इतिहास देणें अगत्याचें आहे. महमदशाहा बादशाहाचे कारकीर्दीत इ० स० १७३८ त मोमीनखान नांवाच्या सरदाराची गुजराथप्रांतावर नेमणूक झाली होती. पुढें इ० स० १७३७ त

* पत्र नंबर. ३८४ का. सं.

निजामउल्मुल्कास गुजराथचा सुभेदार नेमिलें, तेव्हां मोमीनखान दिल्लीस परत गेला. भडोच शहर निजामास जहागीर ह्मणून दिलें होतें, तेथें निजामानें अबदुलबेग नांवाचा अधिकारी नेमिला होता. तो मराठ्यांस जुमानीनासा झाला. त्या वेळीं गुजराथचा सुभेदार ही पदवी पोकळ असून गुजराथ प्रांतापैकीं फारच थोडा मुलूख मोंगलांचे अमलाखालीं होता.

मोमीनखानाचे पूर्वी अभयसिंग नांवाचा सरदार अमदाबादच्या बंदोबस्ताकरितां नेमिलेला होता. त्यानें रतनसिंग भंडारी नांवाचा सरदार अमदाबादच्या बंदोबस्ताकरितां ठेविला होता. पुढें मोमीनखान आला, त्या वेळीं रतनसिंग त्यास अमदाबादचा अधिकार देईना. तेव्हां त्यानें दमाजी गायकवाड याच्याशीं पगडीभाई करून त्याची मदत घेतली. दमाजीनें रंगाजी नांवाच्या सरदारास मोमीनखानाचे मदतीस पाठविलें. त्या दोघांनीं रतनसिंगाचा पराभव करून अमदाबाद शहर ता० २० मे इ० स० १७३७ च्या सुमारास आपल्या ताब्यांत घेतलें. त्या वेळीं अमदाबादचें एकंदर उत्पन्न मोंगल व दमाजी यांनीं निमेनीम वांटून घ्यावें असें ठरलें होतें. त्याप्रमाणें मोमीनखान जिवंत होता तोंपर्यंत दमाजीस त्याचा हिस्सा मिळत असे. इ० स० १७४३ त मोमीनखान मरण पावला. त्या वेळीं दमाजीस अमदाबादच्या उत्पन्नाशिवाय गुजराथ व काठेवाड यांच्या उत्पन्नांतूनही कांहीं भाग मिळत असे. मोमीनखानाच्यामागें अबदुल अझीझखान नामक सरदाराची गुजराथच्या सुभेदारीवर नेमणूक झाली. तो दमाजीशीं सामना देण्याकरतां सैन्याची जमवाजमव करूं लागला. तो औरंगाबाद येथें होता; तथून तो आपलें सैन्य बरोबर घेऊन गुजराथेंत येण्याकरतां निघाला. तो प्रथमतः सुरतेस आला

तेथून भडोच येथें आला. नंतर भडोच येथून अंकलेश्वर येथें आला. तेथें दमाजीनें त्याच्यावर अकस्मात् हल्ला केला, आणि त्याचा अशा रीतीनें फडशा करून दिला कीं, अबदुल अझीझखान याचें पुढें काय झालें याचा पत्ताही लागला नाहीं. परंतु त्याच वेळीं साताऱ्यास नानासाहेब व रघूजी भोसले यांच्यामध्यें लढा उत्पन्न होऊन रघूजी साताऱ्यावर चाल करून येत असतां प्रतिनिधीनेंही उचल केली होती. तेव्हां त्या उभयतांस मदत करण्याकरतां दमाजी सैन्यासह गुजराथेंतून साताऱ्यास येण्याकरितां दक्षिणेंत निघून आला. परंतु जरी त्या वेळीं दमाजी गुजराथेंत नव्हता, तरी त्याचा सरदार रंगाजी हा अमदाबाद येथें होता; त्यानें फकीर उद्दौला नांवाचा सरदार गुजराथच्या सुभेदारीवर आला होता, त्यास गजराथचा अधिकार मिळूं दिला नाहीं. परंतु दमाजीचे घरांत भाऊबंदकी उपस्थित झाली होती. दमाजी साताऱ्यास गेला असें पाहून त्याचा भाऊ खंडेराव यानें रंगाजीस अमदाबाद येथून काढून टाकलें व आपला एक सरदार तेथें नेमिला. त्याचप्रमाणें त्यानें फकीर उदौला यास मदत करण्याचेंही कबूल केलें. दमाजीस हें वर्तमान कळतांच तो ताबडतोब गुजराथेंत परत आला. त्यानें खंडेराव यास बुरसटचा किल्ला व नडियाद प्रांत देऊन त्याला बडोदें येथें आपला दुय्यम नेमिलें, व अशा रीतीनें मोठ्या शहाणपणानें आपसांतील तंटा मिटवून टाकला. पुढें दमाजी यानें फकीर उद्दौला यास हुसकून लावण्याचा विचार केला, व मोमीनखान याचा भाऊ फिदाईउद्दीनखान व पुत्र मोबत पीरखान यांचा पक्ष उचलला. पुढें भडोच शहराचे संबंधानें मोंगलांचे आपसांत लढे उत्पन्न झाले. त्यांत सय्यद अचीनखान नांवाचा सरदार एका पक्षाकडे होता. त्यानें दमाजसि तीन लाख रुपये देऊं करून आपल्या

मदतीस बोलाविलें (इ० स० १७४७). तेव्हां दमाजीनें आपला भाऊ केदारजी यास त्याच्या मदतीस पाठवून दिलें. परंतु तो जाण्याच्यापूर्वीच तो तंटा मिटला. आपणास आतां तीन लाख रुपये मिळत नाहींत असें पाहून केदारजी भडोचच्या आसपासच्या मुलखास उपद्रव देऊं लागला. तेव्हां सय्यद अचीनखान तीन लाख रुपये फिटत तोंपर्यंत भडोचच्या उत्पन्नाचा तिसरा हिस्सा दमाजीस देण्यास कबूल झाला. अशा रीतीनें इ० स० १७९० च्या सुमारास दमाजीचा गुजराथ प्रांतावर बराच अंमल बसला होता. शाहू महाराजांच्या मृत्यूनंतर गुजराथचा निम्मे अधिकार पेशव्यांकडे आला होता. तेव्हां इ० स० १७५० त नानासाहेबांनीं रघुनाथराव दादास प्रथमतः गुजराथेंत आपला अंमल बसविण्याकरतां पाठवून दिलें. या स्वारीपासून फारसा फायदा झाला नाहीं. पुढें इ० स० १७५१ त रघुनाथराव पुनः गुजराथेंत गेला. परंतु त्याच संधीस सलाबतजंग पुण्यावर चाल करून येऊं लागला, तेव्हां नानासाहेबांनीं दादास ताबडतोब परत बोलाविलें. पेशव्यांचा अंमल गुजराथेंत बसण्यास विशेष भीति दमाजी गायकवाड याची होती. पुढें इ० स० १७५१त गेंड्याच्या माळावर दमाजीचा पराभव झाल्यावर नानासाहेबांनीं त्यास पुण्यांत कैदेंत ठेविलें होतें. तो कैदेंत असतां सुरत येथें बखेडे उत्पन्न होऊन दमाजीच्या हकास खो बसण्याची पाळी आली. जरी दमाजी प्रथम पेशव्यांच्या विरुद्ध होता, तथापि कैदेंत पडल्यावर पेशव्यांशीं विरुद्ध वागून आपली तड पोहोंचणार नाहीं असें त्यास दिसून आलें. तेव्हांपासून तो नानासाहेबांशीं वैरभाव टाकून सलगीनें वागूं लागला. पुढें त्या उभयतांचा तह होऊन नानासाहेबांनीं त्यास बंधमुक्त केलें. त्या वेळीं असें ठरलें कीं, दमाजीनें मागील बाकीसंबंधानें

पंधरा हजार रुपये पेशव्यांस द्यावे; गुजराथेंत दमाजीच्या ताब्यांत जो मुलूख होता तो व जो नवीन मुलूख तो संपादन करील तो यांपैकीं निम्मे मुलूख त्यानें पेशव्यांस द्यावा; याशिवाय इतर प्रांतांतून जी खंडणी किंवा लूट मिळेल तिचा खर्च वजा जातां निम्मे भाग त्यानें पेशव्यांस द्यावा, लढाईचा प्रसंग आल्यास त्यानें दहा हजार फौजेनिशीं पेशव्यांस मदत करावी; दाभाड्याचा मुतालीक या नात्यानें दाभाडे याचे गुजराथेंतील उत्पन्नांतून त्यानें पांच लाख रुपये द्यावे; स्वतः दमाजीच्या ताब्यांत जो मुलूख होता त्याच्याबद्दल पंचवीस हजार रुपये द्यावे; गुजराथेंतील पेशव्यांचे ताब्यांतील मुलखांत पेशव्यांचा अंमल बसविण्याकरितां त्यानें मदत करावी; व साताराच्या महाराजांच्या नेमणुकीपैकीं कांहीं रक्कम त्यानें सालीना देत असावी. हा करारनामा झाल्यावर दमाजी गुजराथेंत निघून आला. इ० स० १७६२च्या जानेवारींत दादा प्रथमतः खानदेशांत जाऊन नंतर गुजराथेंत शिरला. परंतु पुढें गाजीउद्दीन यास निजामाच्या गादीवर बसविण्याकरितां शिंदे व होळकर त्यास बरोबर घेऊन दक्षिणेंत आले, त्या वेळीं दादास नानासाहेबांनीं परत बोलाविलें. इ० स० १७६२ त गाजीउद्दीन मरण पावल्यावर नानासाहेबांनीं सलाबजंगाशीं तह केला, आणि ते परत फिरले. ते नाशिक येथें आल्यावर त्यांनीं रघुनाथरावास चवथ्यानें गुजराथेंत पाठवून दिलें. यापूर्वी इ० स० १७५२ च्या फेब्रुवारी महिन्यांत दमाजीस मुक्त करून नानासाहेबांनीं गुजराथेंत रवाना केलें होतें. दमाजी गुजराथेंत गेल्यावर त्यानें आपल्या मुलखाचा बंदोबस्त करून तो रघुनाथरावाची वाट पहात बसला. तो इ० स० १७५२ च्या दिजंबर महिन्यांत गुजराथेंत जाण्याकरितां नाशिक येथून निघाला, व वाटेनें खंडणी गोळा करीत

ता० १३ फेब्रुवारी इ० स० १७५३ रोजीं अमदाबादेस जाऊन पोहोंचला. त्या वेळीं जवान मर्दखान नांवाचा सरदार तें शहर बळकावून बसला होता. परंतु तो त्या वेळीं पालणपूर येथें गेला होता. अमदाबाद शहर मराठ्यांचे हातीं आलेंच होतें. परंतु जवान मर्दखान यास तें वर्तमान कळून तो ताबडतोब अमदाबाद येथें आला. त्यामुळें ती लढाई लांबली. ता० १८ फेब्रुवारी १७५३ रोजीं मराठ्यांनीं त्या शहरावर प्रथम हल्ला केला. त्या वेळीं त्यांचा पराभव होऊन त्यांत धनाजी थोरात व शहाजी चौधरी हे दोन सरदार पडले. पुढें ता० २४ फेब्रुवारीपासून ता० १६ मार्चपर्यंत एकसारखी लढाई सुरू होती. मराठ्यांनीं तें शहर घेण्याविषयीं पुष्कळ प्रयत्न केला, परंतु शहराचा तट अतिशय मजबूत असल्यामुळें त्यांना यश आलें नाहीं. ता० ३ मार्च रोजीं माणकोजी पवार नांवाचा दादासाहेबांचा सरदार पडला. तथापि न डगमगतां त्यांनीं वेढ्याचें काम तसेंच नेटानें चालविलें. या वेढ्यांत विठ्ठल शिवदेव विंचूरकर व नारो शंकर राजेबहादर यांनीं फार पराक्रम केला. शेवटीं इ० स० १७५३ च्या एप्रिल महिन्यांत तें शहर दादासाहेबांनीं सर केलें. जवान मर्दखान त्यांचे हातीं लागला, परंतु तो जरी शत्रु होता, तरी तो खरा योद्धा होता, ह्मणून त्यांनीं त्यास साबरमती व बुनास ह्या दोन नद्यांमधील मुलखाची जहागीर दिली, व अमदाबाद शहर आपल्या ताब्यांत घेतलें. त्या वेळीं अमदाबादेचें उत्पन्न पशवे व गायकवाड यांनीं निमेनिम वांटून घ्यावें असें ठरलें. तसेंच अमदाबादेस कोट होता, त्याच्या दरवाज्याचें रक्षण गायकवाडानें करावें व तटाचा बंदोबस्त पेशव्यांनीं करावा, परंतु शिबंदीचा सर्व खर्च दोघांनीं निमेनिम सोसावा असें ठरलें. नंतर दादांनीं

श्रीपतराव शेणवी नांवाच्या आपल्या सरदारास अमदाबाद येथें ठेविलें, व उत्तर-हिंदुस्तानांत मोहीम करण्याचे उद्देशानें ते थाळनेर येथें आले. अमदाबादेवर इ० स० १७५५ पर्यंत मराठ्यांचा कायमचा अंमल बसला नाहीं.

नानासाहेबांची कर्नाटकांत स्वारी:—इ० स० १७५२ अखेर सलाबतजंगाशीं तह होऊन नानासाहेब, भाऊ व दादा यांसह नाशकास * आले. नंतर दादाची तेथून गुजराथेंत रवानगी करून आपण भाऊसह पुण्यास आले व लगेच भाऊ व रामचंद्रबावा यांस समागमें घेऊन कर्नाटकांत गेले. ‡ ता० २९ जानेवारी इ० स० १७५३ रोजीं त्यांचा मुक्काम हरपनहल्लीनजीक होता. त्यांनीं प्रथमतः श्रीरंगपट्टणची खंडणी घेतली; नंतर ता० २० मार्च इ० स० १७५३ रोजीं होळीहोन्नूर किल्ल्यास मोर्चे लावून तो सर केला, व सरकारांत घेतला. भाऊसाहेब व रामचंद्रबावा तीन दिवस मोर्चांत बसले होते. कोन्हेर त्रिंबक एकबोटे यानें कृष्णा पलांडे, रामजी पवार, बाबाजी पडवळ वगैरे अकरा सरदारांस बरोबर घेऊन किल्ल्यावर हल्ला केला, व तो सर केला. त्या झटापटींत कृष्णा पलांडे गोळी लागून ठार झाला. नंतर स्वारी धारवाडास आली. तेथें पृथ्वीसिंग नामक मोंगलांचा किल्लेदार होता त्याच्याशीं लढाई झाली. पुढें सलोखा होऊन नानासाहेबांनीं त्यास पस्तीस हजार रुपये देऊन धारवाडचा किल्ला आपले ताब्यांत घेतला. नंतर पावसाळा नजीक आला म्हणून स्वारी पुण्यास आली (जून १७५३). पुढें त्याच वर्षीं

---

* पत्रें व यादी ३३२ कां. सं. पेशव्यांचे शकावलींत "श्रीमंत मोंगलांकडील कार्यभाग आटपून परभारें भाऊसाहेबसुद्धां कर्नाटकांत गेले" असें दिलें आहे.

‡ पत्रें व यादी १४—कां. सं.

रामचंद्रबावा मरण पावला व त्याचा पुत्र सदाशिव रामचंद्र ह्यास पेशव्यांनीं सरदारी दिली. रामचंद्रबावा मोठा हुषार, व कारस्थानी पुरुष होता.

ताराबाईच्या कारस्थानांचा शेवटः—मागें सांगितल्याप्रमाणें नानासाहेबांनीं दादोबा वाघ यास फौजेनिशीं चंदनवंदनचे किल्ल्यावर ठेवल्यामुळें ताराबाईची गडबड फारच कमी झाली होती. प्रधानपंत यांच्याशीं वाकडें चालून आपला परिणाम नाहीं, असें तिला वाटूं लागलें. नंतर ताराबाईनें मोरो शिवदेव थिटे, चिंतो अनंत देवस्थळे विष्णु नरहर व शिधंभट ठकार वगैरे मंडळीस कारभारी बाबाजी जाधवराव याचे मसलतीनें सल्लुख्याचीं बोलणीं लावण्याकरतां नानासाहेबांकडे पाठवून दिलें. नानासाहेब त्या वेळीं कर्नाटकचे मोहिमेवरून नुकतेच परत आले होते. त्यांनीं ताराबाईस पुण्यास बोलावून आणिलें. ती रामराजे यांसह पुण्यास आली. परंतु तेथेंही तिनें त्यांस एकाद्या कैद्याप्रमाणें फार बंदोबस्तांत ठेविलें. "रामराजे यांस बंधमुक्त करून त्यांस मसलतींत घेऊन राज्यकारभार चालवावा," असें नानासाहेबांनीं आईसाहेबांस (ताराबाईस) सांगितलें. परंतु तिला ती गोष्ट पसंत पडेना. पूर्वींपासून तिचे मनांत आपण स्वतंत्र रीतीनें कारभार पहावा असें होतें. नानासाहेबांसही तिनें तीच गोष्ट सांगितली. तिचा तो दुराग्रह पाहून केवळ आपसांतील बखेडे मिटवून टाकण्याच्या हेतूनें नानासाहेबांनीं त्या वेळीं तिचें बोलणें कबूल केलें, व उभय पक्षीं सलोखा झाला. नंतर नानासाहेबांनीं * त्रिंबकराव मामा पेठे यास ताराबाईचा कारभारी नेमून

* त्रिंबकरावाची बहीण अन्नपूर्णाबाई ही चिमणाजी आप्पाला दिली होती. त्यावरून तो सदाशिवरावभाऊंचा मामा होता. इ. स. १७५१ त नानासाहेबांनीं त्याला पुणें येथें आपला कारभारी नेमिलें होतें.

त्यास ताराबाईसह सातान्यास पाठवून दिलें. त्रिंबकराव मामा कारभारी झाल्यावर त्यानें आपल्या शहाणपणानें ताराबाईची मर्जी राखून तिला बरेंच ताब्यावर आणिलें. त्यानें ताराबाईनें साताराच्या किल्ल्यांत न राहतां खालीं शहरांत रहावें ह्मणून तिचें मन वळविलें; त्याप्रमाणें ती फत्तेसिंग भोसले याचे वाड्यांत येऊन राहिली. नंतर किल्ल्यावरील गडकरी मंडळीस बक्षीसें वगैरे देऊन त्यानें वश करून घेतलें, व कोणाला इनाम, कोणाला तैनात वगैरे देऊन ताराबाईच्या पक्षाच्या बहुतेक मंडळीस घरोघर स्वस्थ बसावयास लाविलें, व किल्ल्यावर सर्व नवे लोक ठेवून बंदोबस्त केला. अशा रीतीनें ज्या किल्ल्याचे आश्रयानें ताराबाईनें नानासाहेबांस अगदीं भंडावून सोडलें होतें, तो मामासाहेबानें मोठ्या शहाणपणानें आपल्या ताब्यांत घेतला. ताराबाईचा जुना कारभारी बाबाजी जाधवराव शिंदखेडकर यास रजा देण्यांत आली. रामराजे यांनीं आपला कारभार स्वतंत्र रीतीनें पहावा असें नानासाहेबांस वाटत होतें. परंतु राजे यांचे अंगीं ईर्षा किंवा पराक्रम मुळींच नाहीं, असें त्यांस दिसून आलें. तेव्हां ते नाउमेद झाले. पुढें ताराबाईनें त्रिंबकरावमामांचे मदतीनें सर्व कारभार पहावा असें त्यांनीं ठरवून टाकलें. अशा रीतीनें ताराबाईची महत्त्वाकांक्षा तृप्त करून नानासाहेब तिचे त्रासांतून कायमचे मोकळे झाले (इ० स० १७५२).

नानासाहेबांची कर्नाटकावर दुसरी स्वारीः—इ० स० १७५३ च्या आक्टोबर–नोव्हेंबर या महिन्यांत नानासाहेबांची स्वारी पुण्याचे आसपासचे प्रांतांत फिरत होती. नोव्हेंबरअखेर स्वारी पुण्यास आली. ता० ९ दिजेंबर इ० स० १७५३ रोजीं नानासाहेबांचे द्वितीयपुत्र श्रीमंत माधवराव साहेब यांचा विवाह झाला. त्यांस

शिवाजी बल्लाळ जोशी सोलापूरकर याची कन्या रमाबाई ही दिली होती. नंतर श्रीमंत कर्नाटकचे स्वारीस निघाले (फेब्रुवारी--मार्च १७५४). हरिहर, अंभी, बागलकोट, मुंडलगी इत्यादि ठिकाणीं लढाया झाल्या. ता० ११ मे इ० स १७५४ रोजीं स्वारी पुण्यास परत आली. या स्वारींत जमखिंडी व तेरदळ हे महाल पेशव्यांनीं घेतले. या स्वारीची सविस्तर माहिती उपलब्ध नाहीं.

भाग ११ वा.

कुंभेरीचा वेढा:--इ० स० १७५३ च्या एप्रिलांत अमदाबाद घेतल्यावर दादासाहेब आगष्टअखेर थाळनेरास आले. तेथून उत्तर-हिंदुस्तानांत जाण्याचे हेतूनें १९ सपटंबर इ० स० १७५३ रोजीं आवशीस २ घटका रात्रीस स्वारी डेरेदाखल * झाली. नर्मदापार झाल्यावर ते माळव्यांत शिरले; व दिजंबर महिन्यापर्यंत तिकडील मवाशी वगैरे बंडखोर लोकांचा त्यांनीं बंदोबस्त केला. त्या वेळीं त्यांच्याबरोबर मल्हारराव होळकर, जयाप्पा शिंदे, विठ्ठल शिवदेव विंचूरकर, अंताजी माणकेश्वर, यशवंतराव पवार वगैरे सरदार असून एकंदर फौज पाऊण लाख होती. माळवा, सोंदेवाडा, खेंचीवाडा, बुंदी, कोटा, राजगड, उदेपूर, जयनगर, नरवर, ग्वालेरी, झांशी, काल्पी वगैरे ठिकाणीं खंडणी वसूल करून स्वारी हवळपूर-चमेलीपार झाली. नंतर जाटांचा मुलूख लागला. जाटांचा राजा सुरजमल जाट यानें आपला वकील रूपराम चौधरी यास खंडणीची तडजोड करण्याकरतां दादासाहेबांकडे पाठवून दिलें. जाटापासून

* पेशव्यांची रोजनिशी.

पैसा काढण्यास ही संधी बरी आहे असें दादासाहेबांस वाटून त्यांनीं रूपराम चौधरी याजपाशीं एक कोट रुपयांची मागणी केली. रूपराम चाळीस हजार रुपये देण्यास कबूल झाला, परंतु दादासाहेब आपला हेका सोडीनात. तेव्हां निरुपाय होऊन तो परत गेला, व दादासाहेब जाटांचा कुंभेरी नांवाचा किल्ला घेण्याकरतां फौजेसह पुढें निघाले. रूपरामानें कच्चें वर्तमान सुरजमल यास सांगितलें. परंतु दादासाहेबांचें फाजील मागणें त्याच्यानें कबूल करवेना. तसेंच तो मोठा फौजबंद असून एकाएकीं मराठ्यांस दाद देणारा नव्हता. त्या वेळेपर्यंत मराठे व जाट यांच्यामध्यें कधींही तंटा उपस्थित झाला नव्हता. परंतु दादासाहेबांच्या फाजील मागणीमुळें या वेळीं उभय पक्षांमध्यें लढाईचा प्रसंग आला. पुढें मराठ्यांचें जें राज्य बुडालें त्याचें बीजारोपण पूर्वीं झालेलेंच होतें. त्या बीजांकुराला या तंट्यांत मनमुराद खत मिळालें व त्याचा परिणाम काय झाला हें पुढें लवकरच कळून येईल. असो.

हा तंटा गोडीगुलाबीनें शेवटास जात नाहीं असें पाहून जाटानें आपल्या प्रांताचा बंदोबस्त केला. "चाळीस लाख रुपये देतों ते घेण्यांत यावे नाहींतर युद्धास उभें रहावें," असा जाटानें दादासाहेबांस निरोप पाठवून बरोबर तोफेचे पांच गोळे व दारू पाठवून दिली, व आपण फौजेसह कुंभेरीस आला. दादासाहेबांसारख्या मानी वीराला हा निरोप मर्मस्थानीं झोंबला व ताबडतोब त्यांनीं कुंभेरीस मोर्चे लाविले. त्यांनीं एकसारखा पंचवीस दिवस त्या किल्ल्यावर तोफांचा मारा चालविला. परंतु तो किल्ला फारच मजबूत असल्यामुळें तोफांचा मुळींच उपयोग झाला नाहीं. पुढें दादासाहेबांनीं तटाला सुरुंग लावण्याचा प्रयत्न केला. परंतु तो प्रदेश वालुकामय असल्यामुळें सुरुंग

खोदतां येतना. मोर्चावरील तोफांचीं तोंडें जरा खालीं केलीं तर गोळे रेतींत जात, व किंचित् वर केलीं तर गोळा किल्ल्यावरून पार निघून जाऊन पलीकडच्या बाजूस जे मराठ्यांचे लोक होते त्यांत पडून त्यांचा नाश होत असे. अशा रीतीनें दीड महिना झाला. जाटास हां हां म्हणतां वठणीस आणूं अशी दादांस मोठी घमेंड होती. परंतु या वेढ्यांत जाटानें दादासाहेबांस बरेंच नरम केलें.

खंडेराव होळकर याचा मृत्यु:—अशा रीतीनें वेढ्याचें काम चाललें असतां एके दिवशीं भोजनविधि आटोपल्यावर मल्हारराव होळकराचा एकुलताएक पुत्र खंडेराव होळकर हा सहज फिरत फिरत निशाणापाशीं आला. इतक्यांत अकस्मात् शत्रूकडील जेजाल्याचा गोळा लागून तो जागचे जागींच ठार झाला. एकुलत्याएक पुत्राच्या या अकालिक व आकस्मिक मृत्यूमुळें मल्हारराव होळकर याच्या मनाची काय अवस्था झाली असेल त्याची कल्पनाही होणें अशक्य आहे. खंडेरावाची पत्नी सुप्रसिद्ध साध्वी अहल्याबाई हिच्यावर ऐन तारुण्यांत अशा प्रकारचा वैधव्यप्रसंग आल्यामुळें ती सति जाण्यास सिद्ध झाली. मल्हाररावास ती गोष्ट कळली त्या वेळीं तो एवढा धीर असतांही त्याचा धीर तुटून तो आपल्या लाडक्या स्नुषेपुढें डोकें टेंकून धाय मोकलून रडूं लागला व "खंडू तर मला दुःखसागरांत लोटून गेलाच. आतां तूं तरी मला म्हाताऱ्यास सोडून जाऊं नकोस," अशी तिची विनवणी करूं लागला. आपल्या श्वशुराची ती दीन अवस्था पाहून अहल्याबाईनें सहगमनाचा बेत रहित केला. परंतु जाटांनीं आपला आवडता बाळ मारला, ही गोष्ट तो मानी पुरुष कसा विसरणार? त्यानें त्याच वेळीं अशी घोर प्रतिज्ञा केली कीं, "माझ्या पुत्राच्या मृत्यूबद्दल सुरजमल जाटाचा शिरच्छेद करीन व कुंभेरीची माती यमुनेंत

नेऊन टाकीन, तरीच जन्मास आल्याचें सार्थक, नाहींतर मरून जाईन."

जाटाची त्रेधा व तिच्या निवारणार्थ उपाय :–सुरजमल यास तें वर्तमान समजलें त्या वेळीं त्याची अगदीं गाळण उडून गेली. मल्हारराावाच्या रागाचें अवसान त्याला पक्कें ठाऊक होतें, व आतां त्या मानी वीराचे क्रोधाग्नींत आपली आहुती पडणार अशी त्याला मोठी जबरदस्त दहशत बसली. पुढें तो, त्याची जेष्ठ पत्नी हंसया व त्याचा वकील रूपराम या तिघांनी एकांतीं बसून असा विचार केला कीं, जयाप्पा शिंदे याचा व आपला पूर्वीपासून स्नेह आहे, तर या वेळीं त्याच्याशीं पगडीभाई करून हा प्रसंग टाळावा. नंतर सुरजमल यानें रूपराम याचा पुत्र तेजराम यास जयाप्पाकडे पाठवून दिलें व त्याचेबरोबर आपले डोकीची पगडी पाठवून दिली. तेजराम यानें जयाप्पास सर्व हकीकत निवेदन केली; व "तुह्मी वडील बंधु व मी धाकटा बंधु, कळेल त्याप्रमाणें बचाव करावा," असा जाट राजाचा निरोपही सांगितला. जयाप्पा त्या वेळीं मोठ्या पेचांत सांपडला. जाटाचें रक्षण करावें तर राजद्रोह पदरांत येतो, न करावें तर मित्रद्रोहाचें पाप माथीं बसतें, व शरणागताचें रक्षण करणें हें जें आपलें ब्रीद्र त्यास बाध येतो. पगडीभाई झाल्यावर पोटचें द्यावें पण पाठचें देऊं नये हा धर्म.–शेवटीं सेवाधर्म बुडाला तरी हरकत नाहीं, पण शरणागताचें रक्षण अवश्य केलें पाहिजे, असा जयाप्पाचा निश्चय ठरला; व त्यानें सुरजमलाकडे "आपलें रक्षण करतों," ह्मणून बेलभंडार पाठवून दिला. नंतर जयाप्पा दादासाहिबांकडे गेला, व त्यानें त्यांस सांगितलें कीं, "आम्हीं जो जाबसाल सांगतों तो खावंदाचे मर्जीस येत नाहीं. आजच्चे समयीं जाटापासून खंडणी घेऊन पुढें मसलत फत्ते करावी. एक

जागां राहिल्यास पदरीं फौज भारी, निभावणी होणें कठीण. " त्या वेळीं " याचा विचार करून काय तें उत्तर देतों," असें सांगून दादांनीं त्यास निरोप दिला. जयाप्पा गोटांत आल्यावर तो जाटास आंतून धान्याचा व दारूगोळ्याचा पुरवठा करूं लागला. त्यामुळें जाट लौकर जेरीस येईना. मल्हारराव यास ह्या सर्व गोष्टी समजल्या, त्या वेळीं त्याला जयाप्पाचा अतिशय राग आला. तो तसाच दादासाहेबांचे डेऱ्यांत गेला, व त्यांना म्हणाला " दादासाहेब, आपले अस्तनींच अग्न, जाट हस्तगत होतो कैसा ? जाट व शिंदे पगडी-भाई झाले. " त्या वेळीं स्वारीबरोबर सखाराम बापू होता, त्यास दादासाहेबांनीं बोलावून पुढें कसें करावें ह्मणून विचारलें. तेव्हां त्यानें सांगितलें कीं, " शिंदे व होळकर हे आपले शरीराचे दोन हात आहेत. तेव्हां एकासही तोडतां येत नाहीं. या प्रसंगीं उत्तम गोष्ट ह्मटली ह्मणजे शिंदे ह्मणतात त्याप्रमाणें जाटाशीं सलोखा करावा, याशिवाय दुसरा मार्ग नाहीं. "

जयाप्याचा मारवाडांत जाण्याचा विचार:—याच वेळीं मारवाडांत एक राजकारण उपस्थित झालें. मारवाडचा राजा अजितसिंग यास अभयसिंग व बखतसिंग असे दोन पुत्र होते. त्यांपैकीं अभयसिंग हा अजितसिंगाचेमागें जोधपूरच्या गादीवर बसला. तो इ० स० १७५०त मरण पावला. त्याच्यामागें त्याचा पुत्र रामसिंग यास जोधपूरची गादी मिळावयाची. परंतु त्याचा चुलता बखतसिंग यानें ती गादी बळकाविली, व रामसिंगास जोधपूर येथून घालवून दिलें. तेव्हां रामसिंग जयपूर येथें येऊन राहिला. पुढें बखतसिंग यास विषप्रयोग होऊन तो इ० स० १७५३त मरण पावला. त्याच्यामागें त्याचा पुत्र बिजेसिंग हा गादीवर आला. तेव्हां राम-

सिंगानें त्याच्यापासून आपलें राज्य परत घेण्याचा विचार केला, व आपला वकील चेतराम यास कुंभेरीस जयाप्पाकडे मदत मागण्याकरतां पाठवून दिलें. जयाप्पाला कुंभेरी येथून निघण्यास कांहींतरी निमित्त पाहिजेच होतें, व त्याच संधीस हें कारस्थान अनायासानें पुढें आलें. तेव्हां त्याचा योग्य फायदा घेऊन त्यानें त्या वकिलापाशीं रामसिंगास मदत करण्याचें * कबूल केलें. नंतर तो दादासाहेब यांच्याकडे गेला व त्यानें त्यांस अशी विनंती केली कीं, "तुम्ही थोर खावंद आहां. आपण ह्या स्थळीं राहून जाटाचें पारिपत्य करावें. आम्हांस आज्ञा द्यावी. आम्ही मारवाडांत जाऊन मसलत फत्ते करितों. सर्वांनीं एके जागीं राहून मसलत बुडवावी हें ठीक नाहीं. पदरीं फौज भारी, यांस काय द्यावें? धनी यांनीं खुषीरजावंतीनें (मर्जीनें) निरोप दिला तर उत्तम आहे. नाहींतर आम्हांस साफ राहतां पुरवत नाहीं." वर सांगितल्याप्रमाणें दादासाहेबांस आपला निश्चय निवेदन करून जयाप्पा आपले गोटांत आला, व आपले सैन्यास कूचाची नौबत देऊन त्यानें आपल्या बाजूचे मोर्चे उठविले. दादासाहेबांनीं लगेच तें सर्व वर्तमान मल्हारराव होळकर यास कळविलें. त्या वेळीं त्याला आपली प्रतिज्ञा भंग होणार असें पाहून फार वाईट वाटलें, व जयाप्पाचा अतिशय राग आला. परंतु मल्हारराव खुनशी असल्यामुळें त्यानें त्या वेळीं आपला राग दाबून ठेविला, व दादासाहेबांस सांगितलें कीं, "तुह्मीं खावंद आहां. ज्यांत धन्याची मर्जी राजी त्यांत आह्मी राजी." नंतर दादासाहेब जयाप्पाकडे गेले व त्यांनीं त्याला कांहीं दिवस राहवून घेतलें; व त्याचे विद्यमानें सुरजमल या-

* इ० स० १७५० पासून जयाप्पालां रामसिंगाचा ओढा होता, परंतु इतर भानगडींमुळें त्याला तीन वर्षें रामसिंगास मदत करतां आली नाहीं.

घ्याशीं तह करून त्याच्यापासून साठ लाख रुपये खंडणी घेतली. नंतर दादासाहेब मल्हारराव होळकर, विठ्ठल शिवदेव विंचूरकर वगैरे सरदार बरोबर घेऊन दिल्लीवर जाण्याचे हेतूनें कुंभेरीहून निघाले. जयाप्पा कांहीं दिवस कुंभेरी येथें राहिला, व ता० २ जुलै इ० स० १७५४ रोजीं मारवाडांत जाण्याकरतां त्यानें फौजेचा तळ हालविला.

जयाप्पा व बिजेसिंग यांची धूळभेट किंवा मेढत्याची लढाई:—जयाप्पा ता० २ जुलै रोजीं कुंभेरीहून निघाला. वाटेनें जातां जातां कृष्णागर्ड नांवाचा किल्ला सर करून तो ता० ६ आगष्ट इ० स० १७५४ रोजीं मेढत्यास गेला. या कामगिरीबद्दल रामसिंगानें जयाप्पास दोन कोट रुपये व आपलें निमें राज्य देण्याचें कबूल केलें होतें[3]. आपला शत्रु रामसिंग शिंद्याचे मदतीनें आपणावर चाल करून आला, हें वर्तमान बिजेसिंग यास समजतांच तो आपणाबरोबर पन्नाससाठ हजार फौज, तोफखाना वगैरे जंगी लढाईचें सामान घेऊन नागोराहून निघाला. त्याला अडविण्याकरितां जयाप्पानें संताजी बावळे, शेटियाजी खराडे, भोइटे वगैरे आपले सरदारांस पंधराहजार फौजेनिशीं अघाडीस पाठवून दिलें[4].

---

१. पत्रें व यादी ३९८ का. सं.

२. म. इ. सा. खंड १ पत्र ३७.

३. शिंदे व रामसिंग यांच्यामध्यें झालेल्या तहपत्रास "हळदी" किंवा "बलपत्र" ह्मणतात. ह्या बलपत्रावर ज्या मराठे सरदारांच्या सह्या आहेत त्यांची नांवें:-जनकोजी शिंदे, संताजी बोले, दत्तो पाटील, राणू कोरटे, अंतो जशवंतराव, कान्होजी व जिवाजी जाधव, पिलाजी, सटवाजी व मालोजी शिंदे इ०. टॉड:- भाऊसाहेबांची बखर पान १२.

४. पत्रें व यादी ४५१ का. सं.

रजपूत व मराठे यांची दृष्टादृष्ट होतांच लढाईस सुरवात झाली; व जरी रजपुतांची फौज मराठ्यांचे फौजेचे चौपट होती, तरी कच न खातां मराठे मोठ्या वीरश्रीनें लढले. परंतु रजपुतांचा जमाव भारी. शिवाय राठोडांसारख्या हठेल्या रजपुतांशीं तोंड द्यावयाचें, तेव्हां या चिमूटभर मराठ्यांस यशप्राप्ति कशी होणार? ह्या पहिल्या सलामींत मराठ्यांचा पूर्ण पराभव होऊन हजारों लोक मेले, व त्यांच्या पालख्या, नगारे, निशाणें, चवऱ्या, अबदागिऱ्या वगैरे बरेंच सामान रजपुतांचे हातीं सांपडलें. या जयामुळें बिजेसिंगाचे लोकांस स्फुरण चढून ते एकदम चाल करून पुढें आले. जयाप्पानें आपले सर्व सरदार बोलावून आणून त्यांना आपण आज कोणाशीं लढणार व अपयश आलें तर आपणांस केवढा कलंक लागणार वगैरे सर्व गोष्टी समजावून सांगितल्या. आरंभीं झालेल्या पराजयामुळें मराठे चिडून गेले होते, व मारूं किंवा मरूं असा निश्चय करून सर्व फौजेनें जणूं काय सतीचें वाण उचललें. मराठे व मारवाडी यांच्यामध्यें दहा कोसांचें अंतर होतें. त्या दिवशीं सर्व मराठे वीर स्नानें करून, एकमेकांजवळ निरवानिरव करून, अंगांत चिलखतें व बक्तरें (लहान लोखंडी कड्यांचीं चिलखतें) घालून, जिरेटोप (शिरस्त्राण), पेट्या बांधून, दारू, गोळी लोकांस वांटून, तंगबार होऊन सुमुहूर्तानें सिद्ध होऊन चालले. मराठ्यांची फौज तीस हजार होती. तिचे दोन भाग करून एक भाग दत्ताजीनें आपले हाताखालीं घेतला व दुसऱ्यावर जनकोजीस नेमिलें. तिकडे बिजेसिंगही मोठ्या जय्यत तयारीनें सिद्ध झाला होता. उभय पक्षांमध्यें प्रातःकाळीं लढाईस सुरवात झाली. तोफा, हत्तनाले, जेजाला, बरकनदाज, वगैरेंची एकदम सरबत्ती झाली, व बाणांचा वर्षाव मेघधारांप्रमाणें होऊं लागला. त्या वेळीं धूर,

व धूळ यांनीं दशदिशा धुंद होऊन गेल्या, आकाश बाणांनीं भरून गेलें, व तोफांच्या धडाक्यामुळें कांटाळे बसून गेले. कोणी कोणास दिसेना. अशा रीतीनें दोन्ही सैन्यांची कांहीं वेळ सलामी झाल्यावर तोफा वगैरे सर्व बंद पडलें, व दोन्हींकडील घोडेस्वार मोठ्या वीरश्रीनें एकमेकांवर घसरले त्या वेळीं जी गर्दी उसळली ती 'न भूतो न भविष्यति.' तोफांची दणादणी बंद होऊन तरवारींची खणाखणी सुरू झाली. आधींच रजपूत, त्यांत मारवाडी हठेले! रजपुतांनीं मर्दुमकी केली यांत विशेष नवल नाहीं. परंतु त्या दिवशीं मराठ्यांनीं आपल्या शौर्याची कमाल केली. ही लढाई तिसरे प्रहरापर्यंत चालली होती. शिंद्याकडील सातआठशें लोक पडले, दोनतीनशें जखमी झाले, व पांचसहाशें घोडीं ठार झालीं. मारवाड्यांकडील एकंदर तीन हजार लोक मरण पावले, व त्यांच्या कांहीं तोफा व रिसाला मराठ्यांनीं घेतला. इतकें झालें तरी कोणीं कोणास हटेनात. त्या वेळीं जयाप्पाचा पुत्र जनकोजी यानें एक मर्दुमकीचें कृत्य केलें व त्यामुळें मराठ्यांस यशप्राप्ति झाली. त्यानें रजपूत लोक एक पाऊलभरही मागें हटत नाहींत असें पाहून आपणाबरोबर दोन हजार निवडक धारकरी लोकांची एक टोळी घेतली, व मोठ्या जोरानें रजपुतांवर हल्ला करून तो त्यांची फळी फोडून पार निघून गेला. त्या वेळीं त्याचे दोनशें लोक पडले, व त्याला एक लहानसा वार लागला. ह्या हल्ल्यांत रजपुतांचे बरेच लोक मेले, व त्यांच्यांत थोडासा गोंधळ झाला. ही संधी साधून जयाप्पानें सर्व फौज घेऊन चोहोंकडून एकदम हल्ला केला, व रजपुतांची कत्तल सुरू केली. त्या वेळीं त्या शूर राठोडांनीं कच खाल्ली व ते मागें हटत चालले. इतक्यांत, अस्तमान होऊन रात्र पडली, व विजेसिंग सांडणीस्वार

होऊन एकदम रातोरात ४० कोस नागोरास पळून गेला. रजपुतांचें पुष्कळ सामान या वेळीं शिंद्यांस मिळालें. *

---

* रजपुतांचा कैवारी कर्नल टॉड याचा लेख या वर्णनाशीं ताडून पहाण्यासारखा आहे. तो येणेंप्रमाणें:-(अ) "पुष्कर सरोवरावर रामसिंग व मराठे यांच्या फौजा उतरल्या. मरुदेशाची गादी खालीं करून देण्याविषयीं त्यांनीं (शिंद्यांनीं) बिजेसिंगास पत्र लिहिलें. तें अर्थात् त्याला मान्य न होऊन त्यानें युद्धाची सिद्धता केली. पत्र वाचून दाखवितांच सर्व राठोड सरदार रागानें ओरडले "कोण हा हाप्पा (आप्पा शिंदे)! आह्मी त्यास भीत नाहीं. आकाश कोसळून पडूं लागलें तरी आह्मीं आपलीं मस्तकें वर करून तें सावरून धरूं व आमच्या राजाचें रक्षण करूं."

(आ) लढाई मोठी हातघाईची झाली. बिजेसिंगास यश मिळणार असें दिसूं लागलें व आप्पाचें धैर्य गळून तो मागें फिरण्याचे बेतांत होता. इतक्यांत दोन गोष्टी घडून आल्या. त्या गोष्टी ह्याः-राठोड लोकांची शिळापोस केलेली पांच हजारांची एक तुकडी जय संपादून येत असतां ती शत्रूकडाल आहे असें समजून तिजवर बिजेसिंगाचे लोकांनीं गोळ्यांचा वर्षाव केला. त्यामुळें ती सर्व टोळी खलास झाली. हा मोठा अपशकून समजून रजपूत पुढें पाय टाकीनात. दुसरी गोष्टः-रूपनगरचा संस्थानिक सरदारसिंग हा पदच्युत झाला होता, ह्मणून रामसिंगाप्रमाणें तो आप्पा शिंद्याकडे आला. ह्या लढाईत आप्पानें त्यास सांगितलें कीं, "रामसिंगाप्रमाणें तुह्मी ही ग्रहदशा प्रतिकूल आहे ह्मणून जय मिळत नाहीं.तर आतां काय करावें?"तेव्हां सरदारसिंगानें हळूच आपला एक मनुष्य पाठलाग करीत आलेल्या बिजेसिंगाचे टोळींत पाठविला. तो त्या टोळींत शिरून आपण त्या लोकांपैकींच एक आहों असें दाखवून टोळीच्या सरदारास ह्मणाला," आतां आपण भांडून उपयोग काय? बिजेसिंग तर गोळी लागून ठार झाला." ही बातमी सर्व लोकांत पसरून तिचे खरेपणाविषयीं शोध न करतां रजपूत पळूं लागले, व बिजेसिंगास एकटेंच मागें हटावें लागलें.

(इ) बिजेसिंगाकडे दोन लाख फौजेचें स्वामित्व असतां त्यास एका जाट शेतकऱ्याचे खटाऱ्यांत बसून पळून जावें लागलें.

(ई) लालसिंग व रामसिंग हे त्यांचे प्रमुख सरदार पडले.

पुढें चालू.

जयाप्पाचा खून:—बिजेसिंग पराभव पावून नागोरास परत आल्यावर जयाप्पाही त्याचे मागोमाग नागोरास आला. परंतु तो वालुकामय प्रदेश असल्यामुळें तटास सुरुंग लागेनात. तेव्हां मोठ्या युक्तीनें त्यानें त्या शहराची मोर्चेबंदी केली. मराठ्यांचे फौजेंतून रोज शहरावर तोफांचा भडीमार होत असे. परंतु सातआठ महिने झाले तरी शहर हस्तगत होईना. या वेळीं जयाप्पाबरोबर एकंदर चाळीस हजार फौज होती. आपण सर्व एकत्र राहिलों तर मसलत लवकर पार पडणार नाहीं, असें जयाप्पास वाटल्यावरून त्यानें आपला पुत्र जनकोजी व रामसिंग यांचेबरोबर एकंदर दहा हजार फौज देऊन त्यांना मेढत्यास

मागील पृष्ठावरून पुढें चालू.

(उ) ह्या युद्धांत रजपुतांनीं ज्याप्रमाणें पराक्रम केला, त्याप्रमाणें दक्षिणी लोकांनींही आपली तरवार गाजविली, असें भाट लोकांनीं वर्णन केलें आहे. त्या संबंधानें एक पद्य आहे तें येणेंप्रमाणें:–"याद घणा दिन आवशी, हाप्पा वाला हेल, भागा तीनो भूपति मालखाजाना मेल." आप्पाच्या वेळेची लोकांस पुष्कळ दिवस आठवण राहील. या वेळीं तीन राजे आपलें सामानसुमान व जडजवाहीर टाकून पळून गेले. (हे तीन राजे ह्मणजे मारवाड, बिकानेर, व किसनगड येथील राजे होत.).

(ऊ) लढाई दोन दिवस झाली. पहिले दिवशीं नुसती तोफ सुरू होती. दुसरा दिवसही असाच लढण्यांत गेला. त्या दिवशीं पांच हजारांची टोळी नाहींशी झाल्यावर पुढें काय करावें ह्मणून बिजेसिंगानें आपले सरदारांस मसलत विचारली.

त्यांत बिकानेरच्या राजानें मागें फिरण्याची सल्ला दिली, दुसरे सरदार गुळमुळीतच होते. हा गुळमुळीतपणा लगेच फौजेंत पसरला, व बिकानेरचा राजा प्रथमतः रणभूमि सोडून पळून गेला. इतक्यांत मराठे व रामसिंग हे मारवाड्यांवर तुटून पडले. मग काय विचारावें ? जो उठला तो पळूं लागला. रजपुतांच्या सर्व तोफा मराठ्यांच्या हातीं लागल्या. " वरील वर्णनावरून जयाप्पास हा फारच मोठा जय मिळाला असें ह्मणावें लागतें.

पाठवून दिलें. ते मेढत्यास गेले व त्या शहराची मोर्चेबंदी करून राहिले. नागोरच्या वेढयाचें काम इ० स० १७५४ च्या सपटंबर महिन्यांत पुरें झालें. सुमारें दहा महिने जयाप्पानें बिजेसिंगास कोंडून धरलें होतें. त्यामुळें बाहेरून धान्यसामग्री वगैरे बंद झाल्यामुळें आंत महर्गता झाली व बिजेसिंग अगदीं जेरीस आला. शिंदे आपला हेतु शेवटास नेल्याशिवाय वेढा उठवीत नाहींत अशी बिजेसिंगाची खात्री झाल्यामुळें, व रणांगणीं सामन्यास उभें राहून दोन हात करण्याची त्याचे अंगांत हिम्मत नसल्यामुळें त्यानें रजपूत हें आपलें नांव विसरून जाऊन जयाप्पाचा खून करून आपण त्याच्या कैदें-तून मोकळें होण्याचा बेत केला. पुढें एके दिवशीं पहांटस चार घटका रात्रीस त्यानें तीन मारेकरी जयाप्पाचे गोटांत पाठवून दिले. ते तिथे कंगाल भिकाऱ्याचा वेष घेऊन जयाप्पाचे डेऱ्यापाशीं चार घटका दिवसास आले, व त्याला लागूनच घोड्यांची पागा होती तेथें भिकाऱ्याप्रमाणें खालीं पडलेले घोड्यांचे हरभरे वेंचीत बसले. जयाप्पा नेहमीं प्रातःकाळीं स्नान करीत असे. त्याप्रमाणें तो आंग पुसून चौरंगावर उभा राहिला, व डोक्यावरून वस्त्र घेऊन डोकें पुशीत आहे इतक्यांत ते हरामखोर चटकर त्याचेजवळ आले व त्यांपैकीं दोघांनीं जवळ लपवून ठेवलेल्या सुऱ्यांनीं जयाप्पाचे दोन्ही कुशींत वार केले. त्याबरोबर तो चौरंगावरून खालीं पडला. मारेकऱ्यांपैकीं दोघांस तेथच्या तेथें ठार केलें. एक मात्र पळाला तो बिजेसिंगास जाऊन मिळाला, व त्यानें सर्व कच्चें वर्तमान त्याला सांगितलें. त्या वेळीं बिजेसिंगास मोठा आनंद होऊन त्यानें आपले सर्व सरदार एकत्र बोलाविले व तो त्यांना ह्मणाला " यार हो आतां गनीम आहेत ते काय ? ' मुरगी मेरे बचे दाणादाण ' तैसी गत

होईल." असें सांगून त्यानें फौजेची तयारी केली, व तो शिंद्याचे फौजेवर हल्ला करण्याकरतां शहरांतून बाहेर पडला. त्या वेळीं शिंद्याचे लष्करांतील सर्व फौज हवालदील होऊन गेली होती. जयाप्पाचा कनिष्ठ बंधु दत्ताजी व इतर सर्व मंडळी त्याच्यासभोंवार दुःख करीत बसली होती. इतक्यांत मारवाड्यांची फौज शिंद्याचे मोर्चे मोडून पुढें आली. जयाप्पाला जरी भयंकर वार झाले होते, तथापि तो शुद्धींत होता. तो फक्त डोळे मिटून पडला होता. बिजेसिंग चाल करून आला हें वर्तमान त्याचे कानीं पडतांच त्यानें डोळे उघडले, व जवळ दत्ताजी गुडघ्यांत मान घालून रडत बसला होता, त्याला ह्मणाला "वैरी युद्धाला आला असतां तूं भागूबाईसारखा रडतोस हें क्षात्रधर्मास योग्य नाहीं. आतां मला कांहीं होत नाहीं. तुह्मीं शत्रूचा पराभव करावा." ज्येष्ठ बंधूचे हे शेवटचे शब्द कांनीं पडतांच दत्ताजीला दुःख व क्रोध या दोन विकारांनीं घाबरें करून सोडलें, व या दुष्ट कृत्याबद्दल बिजेसिंगाचा केव्हां सूड घेईन असें त्यास होऊन गेलें. त्यानें लढाईचा डंका दिला, व आपल्या फौजेसह प्रळयकाळच्या मेघाप्रमाणें तो बिजेसिंगावर जाऊन पडला. त्यानें थोड्याच वेळांत त्याची दाणादाण उडवून देऊन त्याला परत नागोरांत कोंडलें व पुनः मोर्चे बसवून तो प्रिय बंधूच्या दर्शनाकरितां परत फिरला. परंतु तो येण्यापूर्वीच जयाप्पाचें प्राणोत्क्रमण झालें होतें. त्या वेळीं आपल्या प्रिय बंधूचें प्रेत कवटाळून धरून दत्ताजी एखाद्या अर्भकाप्रमाणें हंबरडा फोडून रडूं लागला, व शिंद्याची फौज शोकसागरांत बुडून गेली. शेवटीं शिंद्यांचा दिवाण रामाजीपंत व इतर सर्व सरदार यांनीं त्याचें शांतवन केलें, व जयाप्पाच्या प्रेताचा अंत्यविधि केला. जयाप्पाचा खून ता० ३० जून इ० सन १७५५

रोजीं झाला.* तो मोठा रणशूर असून दानशूरही होता. सरदारांचे अंगीं अवश्य लागणाऱ्या दोन गुणांपैकीं शिपाईगिरी त्याचे अंगीं पूर्ण होती. परंतु मुत्सद्दीपणा त्याचे अंगीं कमी वसत होता. दुसरा एखादा सरदार असता तर रामसिंगाविषयीं विशेष इरयीस न पडतां बिजेसिंगाकडून त्याला थोडासा प्रांत देववून व लढाईचा खर्च घेऊन तो ताबडतोब त्या स्वारींतून मोकळा झाला असता, व त्याला ज्यास्त किफायतीचीं दुसरीं पुष्कळ कामें करितां आलीं असतीं. दादासाहेब मारवाडची स्वारी चालली असतां उत्तर-हिंदुस्तानांत होते. त्यांना जयाप्पासारख्या लढाऊ सरदाराची तेथें फार अवश्यकता होती. त्यांना रोहिलखंड, खेचीवाडा वगैरे बरेच ठिकाणीं बरींच कामें करावयाचीं होतीं. त्याचप्रमाणें काशी, प्रयाग वगैरे पवित्र स्थळें त्यांना अयोध्येच्या नवाबाकडून ताब्यांत घ्यावयाचीं होतीं. परंतु त्यांचेबरोबर फौजेची तयारी नसल्यामुळें त्यांना त्या वेळीं त्या गोष्टी साध्य

---

* होळकर व बिजेसिंग यांचा पूर्वीपासून मोठा स्नेह होता. परंतु त्याला शिंद्याविरुद्ध उघड रीतीनें बिजेसिंगास मदत करतां येईना. तथापि त्यानें त्याला मदत करण्याविषयीं इतर राजांस पत्रें लिहिलीं होतीं, व "तुम्हांस कोणी कांहीं मदत न करील तर कांहीं मोंगलाई मसलत करून तुम्हीं यश संपादावें" अशी त्यास मसलत दिली होती, व त्याप्रमाणें त्यानें मारेकरी घालून जयाप्पास ठार मारलें, असें भाऊसाहेबांचे बखरींत लिहिलें आहे. जयाप्पाविषयीं मल्हारराव होळकर ह्याचे मनांत पूर्वीपासून आढी होती. पुढें कुंभेरीच्या वेढ्यांत सुरजमल जाटाशीं पगडीभाई करून जयाप्पा फुटला त्यामुळें मल्हाररावाच्या भयंकर प्रतिज्ञेचा भंग झाला. त्यामुळें मल्हाररावासारख्या खुनशी मनुष्याच्या मनाला काय वाटलें असेल याची कल्पना वाचकांनींच करावी. त्यावरून पाहतां होळकर जयाप्पाविरुद्ध अशी मसलत देणार नाहीं असें खात्रीनें म्हणतां येत नाहीं. वर सांगितलेल्या गोष्टीस भाऊसाहेबांच्या बखरींखेरीज आजपर्यंत दुसरा दाखला मिळालेला नाहीं. तेव्हां जयाप्पाचा खून मल्हाररावाचे मसलतीमुळें झाला असें सप्रमाण म्हणावयाचें धाडस तूर्त करतां येत नाहीं.

करून घेतां आल्या नाहींत. परंतु जर त्या वेळीं त्यांचे मदतीस जयाप्पा गेला असता तर वर सांगितलेलीं सर्व कामें त्यांनीं शेवटास नेलीं असतीं. परंतु जयाप्पाचे अंगीं तें धोरण नव्हतें, हें मागें सांगितलेंच आहे. तेव्हां त्या संबंधानें ज्यास्त लिहिण्यांत अर्थ नाहीं.

नागोरचा वेढा पुढें चालू:—जयाप्पा मृत्यु पावला त्याच दिवशीं जनकोजीनें मेढतें काबीज केलें. त्याला पित्याच्या मृत्यूची दुःखद वार्ता कळतांच तो ताबडतोब नागोरास आला. चुलत्या-पुतण्यांच्या गांठी पडल्या त्या वेळीं जो आकांत झाला त्या प्रसंगाचें वर्णन करणें अशक्य आहे. पुणें येथें नानासाहेबांस हें वर्तमान समजलें त्या वेळीं त्यांनाही अतोनात दुःख झालें. पेशव्यांच्या सर्व सरदारांत यजमानाविषयीं निस्सीम असें प्रेम शिंद्याचे घराण्यांत वसत होतें, व पेशवेही ती गोष्ट ओळखून होते. मल्हारराव होळकर व जयाप्पा उत्तर-हिंदुस्तानांत मोहिमेवर असतां नानासाहेबांकडून जीं मसलतींचीं पत्रें वगैरे जात असत तीं नेहमीं जयाप्पाच्या नांवानें जात असत. असो. नानासाहेबांनीं दत्ताजी व जनकोजी यांस दुखवट्याचीं पत्रें पाठविलीं त्यांत " आमचा अर्जुन गेला, एक बाजू खचली. असो. जनकोजी शिंदे त्यांचे पुत्र, त्यास सवाई जयाजी करून दाखवूं. चिंता काय ? " असा त्यांचा मोठा गौरव करून त्यांना मोठा धीर दिला. जयाप्पाचा खून केला म्हणजे त्याच्या बाकीच्या फौजेचा सहज निकाल लावूं अशी बिजेसिंगास मोठी घमेंड होती. परंतु जयाप्पाचा खून झाला त्याच दिवशीं दत्ताजीनें त्याला आपला हात दाखविला होता. पुढें दत्ताजी व जनकोजी दोघेही इरयीस पडले, व त्यांनीं वेढ्याचें काम मोठ्या नेटानें चालविलें. इकडे बिजेसिंगानें आपल्या स्नेही राजांपाशीं मदत मागितली. तेव्हां जयनगरच्या माधवसिंग राजानें

आपल्या शकावंत, कूपावंत, राजावंत, वगैरे संस्थानिकांच्या हाताखालीं पंचवीस हजार फौज देऊन त्यांना बिजेसिंगाचे मदतीस पाठवून दिलें. शिंद्यास ती बातमी कळतांच त्यांनीं फौजेस तोंड देण्याकरितां बावळे, रामराव निळकंठ, व खराडे अशा तीन सरदारांस पंधरा हजार फौज बरोबर देऊन रवाना केलें, व मदतीकरितां पुण्यास पत्रें लिहिलीं. नानासाहेबांनीं ताबडतोब समशेरबहादर[1] व यशवंतराव पवार यांस दहा हजार फौजेनिशीं शिंद्यांचे मदतीस पाठवून दिलें. तसेंच अंताजी माणकेश्वर[2] बुंदेलखंडांत होता, त्याला नानासाहेबांनीं असें पत्र पाठविलें कीं, "गोपाळराव गणेश बर्वे यांचा बंदोबस्त तडजोड पाहून करणें. शिंदे यांची फौज मारवाडांत आहे, जयाजी शिंदे सरकारकार्यास आले, दत्ताजी व जनकोजी शिंदे जाऊन फसले आहेत. मोहरा शहास पडला. तुमची सर्फराजी सर्वप्रकारें करून वाढविलें आहे. तरी मातबर सरंजामानिशीं

१ पत्रें व यादी ३८६ का. सं.

२ इ०स० १७५५ च्या सिंहस्थांत नानासाहेब बेदरनूरच्या स्वारीबरोबर कृष्णेच्या कांठापर्यंत जाऊन तेथून परत फिरल, व नंतर नाशकास गेले. त्या ठिकाणीं त्यांनीं दादासाहेब उत्तर-हिंदुस्तानांत होते त्यांच्या मदतीस जावें म्हणून अंताजी माणकेश्वर यास आज्ञा केली तो फौजेसह उत्तर-हिंदुस्तानांत जात असतां वाटेंत त्याची व दादासाहेबांची ते परत येत असतां नरवरचे घाटांत गांठ पडली. तेव्हां त्यांनीं त्याच्या सैन्याची झडती घेतली; व गोपाळ गणेश बर्वे यास त्याच्या बरोबर देऊन त्याला गोविंदपंत बुंदेले याचे पासून बुंदेलखंडाचा निमे भाग घेऊन तो बर्वे याचे निसबतीस द्यावा, व त्याचा योग्य बंदोबस्त करावा म्हणून बुंदेलखंडांत पाठवून दिलें होतें. तो बुंदेलखंडांत जाऊन पोहोंचतों आहे तोंच त्याला शिंद्याचे मदतीस जाण्याविषयीं श्रीमंतांचें आज्ञापत्र येऊन पोंहचलें, व तो ताबडतोब मारवाडांत निघून गेला. पत्रें व यादी ४५१ का. सं.

जलद मारवाडांत जाऊन पुस्तपन्हा करून लढाईस हमरहा होणें. साम-दाम-दंड-भेद चहूंप्रकारें युक्तीस पडेल तसें करून शिंदे यांस काढून घेऊन येणें तरी तुमची तारीफ." तेव्हां गोविंदपंत बुंदेले व गोपाळ गणेश बर्वे यांचेमध्यें महालांची निमेनिम वांटणी करून अंताजीपंत विजयादशमीचे मुहूर्तानें बुंदेलखंडांतून ग्वालेरीकडे येण्याकरतां निघाला. त्यानें भोपाळवाले एक हजार पठाण, ग्वालेरचे बाराशें पठाण व झांशी प्रांतांतील कांहीं मराठे स्वार मिळून सुमारें तीन हजार फौज जास्त ठेविली. बाणांच्या कैच्या भरलेले शंभर उंट व जेजाल्याचे पंचवीस उंट घेतले. अशा तयारीनें दहा हजार फौज बरोबर घेऊन तो मारवाडचे रोखानें निघाला. वाटेंत गोपाळसिंग केरोलीवाला व रामसिंग बुंदीकोटकर या दोन संस्थानिकांस त्यानें आपल्या मदतीस घेतलें, व सर्व फौज मारवाडांत शिरली. जयनगरच्या राजानें बिजेसिंगाचे मदतीस पंचवीस हजार फौज पाठविली आहे हें वर्तमान अंताजीस अगोदरच समजलें होतें. तेव्हां त्यानें प्रथमतः जयनगर प्रांत उद्वस्त करण्यास प्रारंभ केला, व त्याच्या फौजेनें गांवचे गांव जाळून पोळून फस्त केले. अंताजी मोठमोठे मुक्काम करीत दिंडवणें नांवाच्या गांवापर्यंत येऊन पोहोंचला. तेथून जयनगरच्या राजाची फौज जवळच होती. तिच्या व शिंद्याच्या फौजेच्या झटापटी होतच होत्या. परंतु शिंद्याची फौज थोडी असल्यामुळें जयनगरची फौज एक एक पाऊल पुढें येत चालली होती. इतक्यांत अंताजी माणकेश्वर तेथें येऊन थडकला. ह्या गोष्टीमुळें शिंद्याचे फौजेस दुप्पट अवसान चढलें. पुढें त्यानें एकंदर फौजेचे तीन भाग केले. एका बाजूस शिंद्याची फौज, एका बाजूस अंताजीची फौज व एका बाजूस केरोलीवाले, बुंदीकोटकर यांची फौज. अशा रीतीनें तीन बाजूंनीं त्यानें जयनगरच्या फौजेस कोंडून धरलें. ती बातमी माधव-

सिंग यास समजतांच त्यानें आपल्या फौजेचा मुख्य सरदार अनिरुद्ध-सिंग यास मराठ्यांशीं तह करण्यास सांगितलें. तेव्हां त्या सरदारानें अंताजी माणकेश्वर याजपाशीं तहाचें बोलणें लाविलें. परंतु त्यानें त्या सरदारास असा निरोप पाठविला कीं, " तुह्मांस तहच करणें असेल तर तुम्हीं खासां व संस्थानिक ओलीस येणें, फौज लावून देणें. नागोरास गेल्यावर राजश्री पाटीलबोवा ज्याप्रमाणें आज्ञा करतील त्याप्रमाणें होईल. " त्याप्रमाणें त्या सरदारानें आपली सर्व फौज परत लावून दिली, व आपण व इतर संस्थानिक मिळून तिनशें लोक अंताजी माणकेश्वर याचे गोटांत येऊन राहिले. नंतर सर्व फौज नागोरास येऊन पोहोंचली. पुढें मराठयांची व बिजेसिंगाची एक घनघोर लढाई होऊन तींत त्याचा पूर्ण पराभव झाला, व तो तह करण्यास राजी झाला. पुढें उभय पक्षीं तह होऊन त्यांत असें ठरलें कीं, बिजेसिंगाचे राज्याचे तीन भाग करावे. झालोर येथें बिजेसिंगानें राहून आपला कारभार पहावा. रामसिंग यानें नागोर येथें राहून आपलें काम पहावें, व जोधपूर प्रांत मराठ्यांनीं घ्यावा. लढाईचे खर्चाबद्दल बिजेसिंगानें सात कोट रुपये देण्याचा करार करून हमी दिली. अनिरुद्धसिंग वगैरे जयनगरचे तीनशें लोक ओलीस घेतले होते, त्यांच्यापासून दोन कोट रुपये घेण्याचा करार करून त्यांस जयनगरास पाठवून दिलें. झालेला हा तह कितपत अमलांत आला तें खात्रीनें सांगतां येत नाहीं. परंतु इतकी गोष्ट खरी आहे कीं, मारवाडचें नाक जो अजमीर प्रांत तो या वेळीं मराठयांस मिळाला. हें वर्तमान इ० स० १७५६ च्या आरंभीं घडलें.

या मारवाडचे स्वारीसंबंधानें नानासाहेबांनीं दत्ताजी शिंदे व त्याचा दिवाण रामाजी अनंत यांस पाठविलेलीं पत्रें*. फार

* पत्रें व यादी ३४३, ३५१, ३५२, ३८६ इ० का. सं.

मुत्सद्दीपणाचीं आहेत. तसेंच शिंद्यांचे घराण्यावर पेशव्यांचा किती लोभ होता हेंही त्यांवरून स्पष्ट दिसून येतें. मारवाडचे स्वारी-संबंधानें शिंद्यांनीं इतकें इरयीस पडूं नये, असें नानासाहेबांचें मत होतें. तसेंच ह्या लढाईंत शिंद्यांनीं शिपाईगिरी केली, मुत्सद्दीपणा दाखविला नाहीं, असें त्यांचें ह्मणणें होतें. जयाप्पा व दत्ताजी यांचे अंगीं मुत्सद्दीपणा असता तर त्यांनीं ही लढाई तेव्हांच आटपून दुसऱ्या पुष्कळ महत्त्वाच्या कामगिऱ्यांकडे आपलें शौर्य व हिंमत हीं खर्च केलीं असतीं. पत्र ३५१ यांत नानासाहेब दत्ताजीस लिहितात कीं, "आप्पांनीं (जयाप्पानें) जें अविलंबिलें तें आम्हांस सर्वप्रकारें करणें, परंतु हा राजकार्यप्रसंग आहे. आप्पांसही बुद्धिवाद आप्पा असतां चार पांच महिने लिहीत गेलों. × × × हंगाम फौजसिद्ध ऐसा असता तर एक खावंद वीस हजार फौजेनिशीं तुह्मांजवळ प्रविष्ट झाला असता; परंतु नाइलाज. गैरहंगाम व दूर पथ, यामुळें विलंब लागला. दिढा महिन्यांत पांच सहा हजार फौज येऊन पावेल. मागाहून खासाही वीस हजार फौजेनिशीं येत आहे. तुम्हीं अविलंबिलें कार्य आह्मांस अगत्य करणें. परंतु होणारानुरूप आप्पांनीं हत्यार ओढिलें. शिपाईगिरीची रीत केली. सरदारगिरीचा प्रकार न केला. जेव्हां प्रथम भारती (जंगी) लढाई मारिली, त्या उपरी नव्या दरबारांत तूट सोसून सलूख हरप्रकारें, पुढील संकट दूर दृष्टीनें जाणून, करून मोकळे झाले असते तर आज प्रयाग, अंतरवेद, व अलीकडील खेचीचा मुलूख सोडविणें वगैरे कामें सर्वही सरकार-किफायतीचीं होऊन गेलीं असतीं. तुम्हींही आजपावेतों शिपाईगिरी केली. आतां सरदारीची रीत धरून तजविजीनेंच कांहीं कामें करावीं. जरूर संकट पडेल तेथेंच शिपाईगिरी करावी. × × मजवर ईश्वरी कृपा आहे तों

तुमचे साहित्यास कधीं चुकणार नाहीं. तीन पिढ्यांचे एकनिष्ठ सेवक कांमाचे असतां तुमचा अभिमान नसावा हें कधींही या घरांत घडणार नाहीं. सर्व प्रकारें चित्ताचें समाधान करून अष्टपैलूचे रीतीनें × × × मनसबा करीत जाणें × × × बिजेसिंगाचा वकील "पन्नास लक्ष रुपये द्यावे. रामसिंगास थोडीशी जागा पोटापुरती द्यावी;" ऐसें बोलत होता. आह्मीं त्यास साफ जबाब दिला, याउपरी आह्मांस तह करतां अनुकूळ पडत नाहीं इ०." वर दिलेल्या पत्रावरून पेशव्यांस शिंद्यांचा केवढा अभिमान होता हें साहजिक दिसून येईल. तसेंच शिंद्यांचे घराण्यानेंही शेवटपर्यंत पेशव्यांची एकनिष्ठपणें सेवा केली हेंही त्या घराण्यास फार भूषणावह आहे.

बुंदीचें राजकारणः—मारवाडची स्वारी आटोपल्यावर शिंदे फौजेसह उज्जनीस आले. बिजेसिंगानें लढाईचे खर्चाबद्दल सात कोटि रुपये देण्याचा करार केला होता. परंतु त्याचेजवळ रोख देण्यास मुळींच पैसे नव्हते. शिंद्याची फौज एकसारखी एके ठिकाणीं दोन वर्षे राहिल्यामुळें फौजेचें मनस्वी देणें राहिलें होतें. मोहिमेचा जमाखर्च तीन कोट रुपयांचा झाला, व तो पेंच कसा वारावा याची दत्ताजी व जनकोजी यांस मोठी काळजी लागली होती. इतक्यांत सुदैवानें दुसरें एक छोटेंसें राजकारण उपस्थित झालें, व त्याच्यायोगानें शिंद्यांवरचा तो पेंच अनायासानें टळला. तें राजकारण येणेंप्रमाणें:—बुंदीकोटचा राजा रामसिंग हा त्या सुमारास मरण पावला (एप्रिल इ० स० १७५६). रामसिंगाला पुत्र होता. परंतु तो फार लहान होता. तेव्हां रामसिंगाचे कुलतभावानें त्याचें राज्य हिरावून घेण्याचा विचार मांडला. त्या वेळीं रामसिंगाचे बायकोनें शिंद्यांपाशीं मदत मागितली, व माझे पुत्रास मदत करून गादीवर बसवून टिळा लावाल तर मी तुम्हांस

या कामगिरीबद्दल पाऊण कोट रुपये रोख देईन असें त्यांस वचन दिलें. दुष्काळांत सांपडलेल्या मंडळीस ज्याप्रमाणें मिष्टान्न मिळावें त्याप्रमाणें त्या वेळीं दत्ताजी व जनकोजी यांस झालें. ते दोघे ताब-डतोब फौज सिद्ध करून बुंदीकोट येथें गेले, व रामसिंगाचे पुत्राचे दायादास कैद करून रामसिंगाचे पुत्रास गादीवर बसविलें. या गोष्टीमुळें रामसिंगाचे बायकोस मोठा आनंद होऊन तिनें ताबडतोब देऊं केलेली रकम शिंद्यांचे पदरीं घातली, व त्याशिवाय त्यांना मोठा नजराणा देऊन निरोप दिला. नंतर शिंद्यांनीं आपल्या फौजेचें सर्व देणें देऊन टाकलें, व ते तिच्या ऋणांतून मुक्त झाले. इ० स० १७५६ च्या जुलै महिन्यांत शिंदे आपलें मूळगांव चांभारगोंदें येथें आले. ते त्या वर्षाच्या दिजंबर महिन्यापर्यंत तेथेंच होते. त्या मुदतींत त्यांना सात वर्षांचा जमेचा व खर्चाचा हिशेब पेशव्यांस द्यावयाचा होता, तो त्यांनीं तयार केला, व पेशव्यांकडे पाठ-वून दिला.*

भाग १२ वा.

दिल्ली येथील वर्तमानः—या संबंधानें इ० स० १७५१ त शिंदे व होळकर निजामउल्मुल्काचा जेष्ठ पुत्र गाजीउद्दीन यास दक्षिणेंत निजामाचे गादीवर बसविण्याकरितां घेऊन आले, येथपर्यं-तची हकीगत मागें आलीच आहे. गाजीउद्दीन दक्षिणेंत आला त्या वेळीं त्यानें आपला पुत्र मीर शिहाबुद्दीन यास दिल्ली येथेंच

* पत्रें व यादी ३४६–४७–४८–४९–५० इ० का. सं. या पत्रांवरून शिंद्यांची पेशव्यांचे ठिकाणीं किती नम्रता होती हें स्पष्टपणें कळून येतें.

ठेविलें होतें. पुढें गाजीउद्दीन यास विषप्रयोग होऊन तो मरण पावला हें वर्तमान शिहाबुद्दीन यास समजतांच तो अतिशय उदासीन वृत्तीनें राहूं लागला. तेव्हां वजीर सफदरजंग याला त्याची मोठी दया येऊन त्यानें बादशाहाकडून त्याला त्याच्या बापाचे सर्व अधिकार देवविले; त्याचप्रमाणें अमीरउल्उमराव ही पदवीही त्याला देवविली. हा इतिहासांत दुसरा गाजीउद्दीन या नावानें प्रसिद्ध आहे. शिहाबुद्दीन हा मोठा व्रात्य असून मोठा महत्त्वाकांक्षी होता. बापाच्या मृत्यूबद्दल त्यानें जें दुःख प्रदर्शित केलें होतें, व जी उदासीनता दाखविली होती, ती केवळ मानभावी असून तसें स्वरूप धारण करण्यांत आपणास आपल्या पित्याचे सर्व अधिकार मिळवून घ्यावे एवढाच त्याचा हेतु होता. तो अधिकारारूढ होतांच त्यानें पांघरलेलें कातडें टाकून दिलें व तो दरबारांत ढवळाढवळ करूं लागला. त्यानें प्रथमतः आपल्या उपकारकर्त्याची (वजीर सफदरजंगाची) फेड करण्यास सुरवात केली. त्यानें त्याला वजिरीवरून दूर करून ती आपल्या आतेचा नवरा इंतिज्म उद्दौला यास द्यावी म्हणून बादशाहाचें मन वळविलें. दरबारांत यामुळें दुफळी झाली, व तंटे सुरू झाले. ते तंटे पुढें इतके विकोपास गेले कीं, भररस्त्यांत दिवसा ढवळ्या उभयपक्षांची मारामारी व कापाकापी सुरू झाली. सफदरजंग शिया पंथाचा होता व शिहाबुद्दीन सुनी पंथाचा होता. त्यामुळें ह्या तंट्यांस पुढें धर्माचें स्वरूप येऊं लागलें. परंतु सफदरजंग याचें पारडें हळू हळू बसत चाललें, व शिहाबुद्दीन यानें शिंदे-होळकर यांस आपल्या मदतीस बोलाविलें, त्यामुळें आपणास या कामांत यश येणार नाहीं असें सफदरजंगास वाटल्यावरून सुमारें सहा महिन्यांनीं त्यानें मोठ्या शहाणपणानें आपल्या कामाचा राजीनामा दिला,

व तो लखनौ येथें आपले मुलखांत निघून आला. त्याच्यामागें बाद-शाहानें इंतिज्म उद्दौला यास आपली वजिरी दिली.

सुरजमल जाट याचेबरोबर शिहाबुद्दीन लढाई सुरू करतो:- माजी वजीर सफदरजंग व सुरजमल जाट यांचा अत्यंत ऋणानुबंध होता. मागील तंटयांत जाटानें सफदरजंगाला वेळोवेळीं मदत केली होती. तेव्हां सफदरजंग आपले मुलखांत निघून गेल्यावर शिहाबुद्दीन यानें जाटाशीं लढाई सुरू केली. त्यानें मल्हारराव होळकर व जयाप्पा शिंदे यांस आपले मदतीस बोलाविलें. दादासाहेबांनीं सुरजमल यांच्याशीं लढाई सुरू केली त्यासंबंधानें पूर्वी जें कारण दिलें आहे, त्याशिवाय त्याच संबंधानें हें एक दुसरें कारण आहे. कुंभेरीस मराठ्यांनीं जो वेढा दिला तो त्याच वेळेच्या सुमारास दिला होता. शिहाबुद्दीन यानें बादशाहास फौज पाठवून देण्याविषयीं विनंति केली. परंतु इंतिज्म उद्दौला यास शिहाबुद्दीन याचा उतावळा व हेकेखोर स्वभाव आवडत नसल्यामुळें त्याला मदत करूं नये, ह्मणून त्यानें बादशाहास सांगितलें. तें वर्तमान शिहाबुद्दीन यास समजलें तेव्हां त्याला अतिशय राग येऊन त्यानें बादशाहाचे फौजेंत फितूर करून दिल्लीचे आसपास बंडाळी मांडली. इकडे सुरजमलास मराठ्यांनीं कुंभेरी येथें कोंडून टाकल्यामुळें त्यानें बादशाहापाशीं मदत मागितली. तेव्हां त्यानें नवीन वजिराचे सल्ल्यानें मदतीकरितां आपली फौज रवाना केली. परंतु मध्यंतरीं जाटापासून साठ लक्ष रूपये खंडणी घेऊन दादासाहेब व मल्हारराव दिल्लीस येण्याचे हेतूनें मथुरेपर्यंत येऊन पोंहोंचले. त्या ठिकाणीं सुरजमलाचे मदतीस जाणारी बादशाही फौज आपणापासून ४० कोसांवर आहे असें वर्तमान मल्हाररावास समजलें.

तेव्हां रातोरात दौड करून तो अकस्मात् त्या फौजेवर जाऊन पडला. बादशाहाची फौज बेसावध असल्यामुळें मराठ्यांनीं हां हां म्हणतां तिची अगदीं दाणादाण उडवून दिली, व सर्व गोट लुटून फस्त केला. या ठिकाणीं बादशाहाची पत्नी मलिका जमानी ही मराठ्यांचे हातीं सांपडली. परंतु मल्हाररावानें तिचा योग्य बंदोबस्त करून तिला बादशाहाकडे पोहोंचती केली. नंतर मराठ्यांची फौज इ० स० १७५४ च्या जून महिन्यांत दिल्ली येथें येऊन पोहोंचली.

शिहाबुद्दीन अहमदशाहास पदच्युत करतोः—मराठे दिल्लीस आल्यावर शिहाबुद्दीन हा त्यांना येऊन मिळाला. नंतर मराठ्यांचे जोरावर त्यानें बादशाहास सांगून इंतिज्म उद्दौला यास वजिरीचे कामावरून दूर केलें व ती आपले नांवानें करून घेतली. अहमदशाहा बादशाहाचा स्वभाव दृढनिश्चयाचा नव्हता; त्यामुळें तो केव्हां केव्हां शिहाबुद्दीन याचे तंत्रानें वागत असे, व केव्हां केव्हां त्याचेविरुद्ध खटपटी करीत असे. पुढें शिहाबुद्दीन यास वजिरीचा हक्क प्राप्त होतांच त्यानें योग्य संधी साधून बादशाहास पदच्युत केलें, व त्याचे डोळे काढले. नंतर त्यानें त्याच वंशांतील दुसरा एक शाहाजादा पाहून त्याला दुसरा अलमगीर असा किताब देऊन गादीवर बसविलें (जुलै इ० स० १७५४). याच संधीस अयोध्येचा नबाब माजी वजीर सफदरजंग हा मरण पावला व त्याचा पुत्र सुजाउद्दौला हा अयोध्येचा नबाब झाला. त्या वेळीं उत्तर-हिंदुस्तान म्हणजे जुलूम, लुटालूट, व बेबंदशाही यांचें माहेरघरच बनून गेलें होतें; व दादासाहेबांस अशा वेळीं मराठ्यांचा मोठा फायदा करून घेण्याची वेळ आली होती; परंतु त्यांची बरीच

फौज मारवाडचे मोहिमेंत अडकून पडल्यामुळें त्यांचेपाशीं असावी तितकी फौज नव्हती. दादासाहेबाचे मनांत काशी, प्रयाग वगैरे क्षेत्रें अयोध्येचे नबाबाचे ताब्यांत होतीं तीं आपले ताब्यांत घ्यावीं असें होतें. त्यासंबंधानें नानासाहेबांचीही त्यांस आज्ञा झाली होती. त्याचप्रमाणें अंतरवेद, खेचीवाडा, वगैरे प्रांत त्यांना आपले अमलांत आणावयाचे होते. परंतु वरील अडचणीमुळें त्यांना त्या वेळीं कोणचाही हेतु साध्य करतां आला नाहीं. दादासाहेब इ० स० १७५४ च्या दिजंबर महिन्यापर्यंत दिल्ली येथें होते. पुढें रोहिलखंड, काशी, प्रयाग, जयनगर, वगैरे प्रांतांतून खंडणी घेत घेत ते नरवरचे घाटानें खालीं उतरले. वाटेंत अंताजी माणकेश्वर याची गांठ पडली, तेव्हां त्याच्या सैन्याची झडती घेऊन त्याच्याबरोबर गोपाळ गणेश बर्वे यास देऊन त्यास बुंदेलखंडांत रवाना केलें, व आपण सखाराम बापू, मल्हारराव होळकर, वगैरे मंडळीसह ता० ९ आगस्ट इ० स० १७५५ रोजीं पुण्यास येऊन पोहोंचले.

विठ्ठल शिवदेव ग्वालेरचा किल्ला घेतोः—दादासाहेब दिल्ली येथें असतां विठ्ठल शिवदेव विंचूरकर हे त्यांचेबरोबर होते. कुंभेरीस वेढा पडला असतां विठ्ठल शिवदेव विंचूरकर याचें कुटुंब निवर्तलें. तेव्हां दिल्लीस आल्यावर तो वधूचा शोध करूं लागला. नंतर काल्पी येथें एक मुलगी पसंत करून तो लग्नाकरितां फौजेसह तिकडे गेला. लग्नसोहळा उरकून विंचूरकर परत येत असतां त्याचा मुक्काम ग्वालेरच्या * किल्ल्यापाशीं पडला.

* ग्वालेरचा किल्ला एका बिकट व उंच डोंगराच्या सुळक्यावर बांधलेला आहे. तो पूर्वी मोंगलांचे ताब्यांत होता, व तेथें राजकीय कैदी ठेवीत असत. पुढें मोंगलांची सत्ता खालावली तेव्हां तो जाट लोकांनीं त्यांच्यापासून घेतला, व तो या वेळीं गोहदच्या राण्याच्या ताब्यांत होता.

पुढें त्याच्या सैन्याची एक लहानशी टोळी दाणावैरण आणण्याकरितां बाहेर पडली असतां तिचा व जाट लोकांचा तंटा लागून जाटांनीं विंचूरकराचे कांहीं लोक मारले व कांहीं लोक कैद करून नेले. ते लोक परत मिळावे म्हणून विठ्ठल शिवदेव यानें गोहदच्या राण्याकडे आपला वकील पाठविला. तेव्हां त्याच्या दिवाणानें त्या वकिलापाशीं विठ्ठल शिवदेव यास असा निरोप पाठविला कीं, " जर तुह्मांस आपले लोक सोडवून घेणें असेल तर तुम्हीं परवानगीवांचून आमचे मुलुखांत तळ दिला याबद्दल आमचे महाराजांपाशीं माफी मागितली पाहिजे. मग तुम्ही ब्राह्मण ह्मणून तुह्मांस ते क्षमा करतील व तुमचे लोक सोडून देतील. तुम्ही ब्राह्मण, वेदाध्ययन हें तुमचें काम, शूरत्व हा तुमचा विषय नव्हे. " विठ्ठल शिवदेवासारख्या मानी वीराच्या कानीं हा निरोप पडतांच त्याची तळपायाची आग मस्तकास गेली. त्याला तो अपमान सहन न होऊन त्यानें दादासाहेबांची परवानगी न घेतां एकदम ग्वालेरच्या किल्ल्यास वेढा दिला. अगोदर तो किल्ला मजबूत, त्यांत जाट लोकांसारख्या शूरांच्या ताब्यांत, त्यामुळें तीन महिने वेढा पडला तरी आंतील मंडळी दाद देईना. दादासाहेबांस हें वर्तमान समजलें त्या वेळीं त्यांनीं विंचूरकरांस निरोप पाठविला कीं, " तुम्हीं किल्ला कसा आहे याचा विचार न करतां व आमची आज्ञा न घेतां ही लढाई सुरू केली आहे, तर तिचा सर्व खर्च तुम्हांस मिळणार नाहीं; व शेवटीं अपयश आलें तर त्याबद्दल तुमचा सक्तीनें जाब घेतला जाईल. " विठ्ठल शिवदेव यास तो निरोप येऊन पोहोंचला तेव्हां त्यानें निश्चय केला कीं, " किल्ला तरी सर करीन नाहींतर मरून तरी जाईन." नंतर आपल्या सर्व सरदारांस आपला निश्चय सांगून दुसरे दिवशीं प्रातःकाळीं

त्यानें हल्लयास सुरुवात केली, व मराठ्यांची फौज किल्ल्याच्या दरवाज्यापर्यंत येऊन थडकली. तेव्हां जाट लोक एकदम दरवाजा उघडून बाहेर पडले, व मराठ्यांवर अशा रीतीनें तुटून पडले कीं, मराठ्यांच्या फौजेनें आपला मोर्चा फिरविला. विठ्ठल शिवदेव अशा आणीबाणीच्या वेळीं आपल्या लोकांस धीर देत होता.आपल्या फौजनें अशा रीतीनें पलटा खाल्ला हें पाहून तो आपल्या निवडक मंडळीसह जाटांवर तुटून पडला, व एकसारखा छाटाछाटी करीत गोहदचा राणा ज्या ठिकाणीं होता तेथपर्यंत गेला व त्यानें त्याला घोड्यावरून खालीं ओढून तेथच्या तेथें तरवारीस बळी दिलें. किल्ल्यांतील बहुतेक लोकांची कत्तल झालीच होती. बाकी थोडेसे शिल्लक होते ते शरण आले. अशा रीतीनें विठ्ठल शिवदेव यानें मोठ्या मर्दुमकीनें तो किल्ला सर केला. नंतर गोहदच्या राण्याचा पुत्र राजा गिरधर हा विठ्ठल शिवदेव यास शरण आला. तेव्हां ग्वालेरचा किल्ला व त्याच्या आसपासचा प्रांत सरकारांत ठेवून बाकीचा मुलूख त्यानें त्यास परत दिला, व तो फौजेसह दादासाहेबांस येऊन मिळाला. *

दक्षिणेंतील वर्तमानः—बेदनूरची मोहीमः—नानासाहेब होळीहुन्नूरची स्वारी आटोपून इ० स० १७५४ च्या जुलै महिन्यांत

---

* राजवाडे यांनीं इ० स० १७५५ च्या सपटंबर महिन्यांत विठ्ठल शिवदेव विंचूरकर यानें ग्वालेरचा किल्ला घेतला असें दिलें आहे. परंतु पेशव्यांच्या डायरींत ग्वालेरचा किल्ला विंचूरकरांनीं घेतला असें वर्तमान ७ जिलकद म्हणजे ता० १६ आगस्ट, इ० स० १७५५ रोजीं आलें असें दिलें आहे. त्यावरून ता० १६ आगष्टच्या पूर्वी महिना पंधरा दिवस तरी तो किल्ला विंचूरकरांनीं घेतला असावा असें दिसतें.

पुण्यास परत आले होते. नंतर इ० स० १७५६ च्या जानेवारी महिन्यांत ते बेदनूरच्या नबाबावर स्वारी करण्यास निघाले. स्वारीबरोबर महादाजीपंत पुरंदरे व माधवराव पानसे सोनोरीकर हे होते. श्रीमंतांची स्वारी कूच करून कृष्णेच्या कांठीं एरूर नांवाच्या गांवापर्यंत गेली. तेथें गेल्यावर त्यांचे मनांत सिंहस्थाकरतां नाशकास जावें असें आलें. तेव्हां स्वारीचें काम पुरंदरे व पानसे यांच्यावर सोंपवून ते नाशकास परत आले. पुरंदरे व पानसे खंडण्या घेत घेत बेदनूरपर्यंत जाऊन पोहोंचले, व तेथच्या नबाबापासून खंडणी वसूल करून परत आले. नानासाहेब नाशकास आल्यावर त्यांनीं तेथें अंताजी माणकेश्वर यास उत्तर-हिंदुस्तानांत दादासाहेबांचे मदतीस जावें म्हणून आज्ञा केली. अंताजी माणकेश्वर फौजेसह नर्मदा उतरून पलीकडे गेला. इतक्यांत दादासाहेब उत्तर-हिंदुस्तानांतून नरवरचे घाटानें खालीं उतरले. त्यांची व अंताजीची भेट झाल्यावर त्यांनीं अंताजीच्या सैन्याची झडती घेतली,* व हिंदुस्तानांत जाण्याचें कारण उरलें नव्हतें म्हणून बुंदेलखंडापैकीं चवदा महालांची मामलत गोपाळ गणेश बर्वे याचे नांवानें करून दिली होती, ते महाल बर्वे याचे ताब्यांत देऊन त्याचा बंदोबस्त करून देण्याकरतां दादांनीं त्याला बुंदेलखंडांत पाठवून दिलें. अंताजी बुंदेलखंडांत गेल्यावर त्यास मारवाडांत दत्ताजी शिंद्याचे मदतीस जावें लागलें या संबंधाचा इतिहास मागें आलाच आहे.

जानोजी भोसले याची निजामावर स्वारीः--सलाबतजंगाबरोबर चाललेल्या लढाईचा शेवट झाल्यावर इ० स० १७५३ च्या मार्च महिन्यांत रघूजी भोसले मरण पावला. रघूजी मोठा मह-

---

* अंताजी पेशाची अफरातफर करितो व फौज ठेवण्याकरतां दिलेल्या पैशांतून कमी फौज ठेवून पैसे खातो असा पेशव्यांस संशय होता.

स्वाकांक्षी असून दूरदर्शी होता. त्याच्या मनांत बाळाजी विश्वनाथे याचे वंशाकडून पेशवाई काढावी, तसेंच शाहू महाराजांचेमागें सातारची गादी आपणास मिळावी असें फार होतें. परंतु नानासाहेबांनीं 'ठकास महाठक' या न्यायानें त्याचे सर्व बेत मनचे मनांत जिरवून टाकिले. इतकेंच नव्हे तर त्यांनीं पुढें पुढें त्याला इतका वश करून घेतला कीं, तो नानासाहेबांच्या इच्छेविरुद्ध कधींच गेला नाहीं. असो. त्याला दोन बायका असून चार पुत्र होते. जानोजी व साबाजी हे धाकटीचे; मुधोजी व बिंबाजी हे थोरलीचे. त्यानें मरणसमयीं आपल्या मुलखाच्या चार वांटण्या करून त्या चौघांस वांटून दिल्या. त्यानें वडीलपणाचा मान व अधिकार जानोजीस दिला, व त्यालाच सेनासाहेबसुभे हें पद आपलेमागें द्यावें म्हणून नानासाहेबांस सांगितलें होतें. त्यानें मरणसमयीं आपल्या पुत्रांस जवळ बोलावून असा उपदेश केला कीं, "तुम्हीं सर्वजण एक दिलानें रहा व मराठ्यांची आपसांत दुही माजेल असें कृत्य करूं नका." रघूजीचा हा अंतकालचा उपदेश किती स्तुत्य होता हें सांगावयास नको. परंतु चमत्कार असा कीं, रघूजी मरून एक महिना झाला नाहीं तोंच जानोजी आणि मुधोजी यांच्यांत लढा उत्पन्न होऊन तो इतका वाढला कीं, शेवटीं जानोजीस हातांत शस्त्र धरावें लागलें. नानासाहेब त्या वेळीं कर्नाटकांत गुंतले होते. नंतर इ० स० १७५३ च्या जून महिन्यांत ते परत आले. पुढें जानोजी पुण्यास आला, व नानासाहेबांनीं त्याला सेनासाहेबसुभे हें पद दिलें. जानोजीनें त्या वेळीं रघूजीप्रमाणें "पेशव्यांस मदतीची जरूर लागेल त्या वेळीं दहा हजार स्वारांची मदत करूं, व सातारचे महाराजांचे तैनातीकडे सालीना नऊ लाख रुपये देत जाऊं" असा नवीन करार

करून दिला. नंतर जानोजी वऱ्हाडांत जाण्याकरितां निघाला. वाटेनें तो पेशवे व निजाम यांचे राज्यांतून घासदाणा वसूल करीत चालला. सलाबतजंगास या गोष्टीमुळें फार राग येऊन त्यानें आपला एक सरदार जानोजीवर पाठवून दिला. त्यानें जानोजीचा पराभव करून त्याच्या दिवाणास कैद केलें. त्यामुळें मिळालेली सर्व लूट देऊन जानोजीस त्याची मुक्तता करावी लागली व तो एकदम वऱ्हाडांत चालता झाला. परंतु याचा बचपा त्यानें लवकरच काढून घेतला. चिकाकोल व राजमहेंद्री हे प्रांत निजामाकडून फ्रेंचांस मिळाले होते. या प्रांतांवर पूर्वी जाफरअल्ली या नांवाच्या सरदाराची नेमणूक झालेली होती. परंतु बुसी साहेबानें त्याला काढून टाकून त्याचे जागीं विजयरामराजे नांवाच्या एका जमीनदारास नेमिलें. जाफरअल्ली यास तो अपमान सहन न होऊन त्यानें जानोजीशीं मदत मागितली, व त्या दोघांनीं तो प्रांत लुटून फस्त केला. जानोजीनें आपल्या लुटीचा पैसा ताबडतोब नागपुरास रवाना केला. त्यानें पाठविलेली लूट नागपुरास जाऊन पोहोंचेपर्यंत हळू हळू लढाई चालवून ती नागपुरास जाऊन पोहोंचली असें त्यास समजतांच तो एकदम आपले मुलखांत निघून गेला.

सावनूरची मोहीमः—फ्रेंच सरदार बुसी याचे सैन्यांत पूर्वी तोफखान्याकडे मुजफरखान नांवाचा मुसलमान सरदार होता. पुढें त्याचें व फ्रेंचांचें पटेना. तेव्हां तो इ० स० १७५० च्या सुमारास फ्रेंचांस सोडून पेशव्यांचे पदरीं येऊन राहिला व नानासाहेबांनीं त्याला आपल्या गारद्यांचे पथकावर मुख्य नेमिलें. इ० स० १७५५ त महादाजीपंत पुरंदरे बेदनूरचे स्वारीस निघाला तेव्हां तो स्वारीबरोबर होता. परंतु ती मोहीम चालली असतां हजिरीवरून त्याची व महादाजीपंताची तक्रार होऊन तो स्वारींतून निघून गेला. तो प्रथ-

मतः श्रीरंगपट्टण येथें गेला. परंतु तेथचा राजा त्यास आश्रय देईना. तेव्हां तो सावनूरचे नबाबाकडे गेला व त्यानें त्यास आपले पदरीं ठेविलें. नानासाहेबांस ही गोष्ट समजली तेव्हां त्या सरदारास तुम्हीं आमचेकडे पाठवून द्यावें, ह्मणून नानासाहेबांनीं सावनूरचे नबाबास पत्र लिहिलें. परंतु त्या नबाबास सोंडूर व गुत्ती येथील घोरपड्यांचें* पाठबळ असल्यामुळें त्यानें तो सरदार परत देण्याचें नाकारलें. त्यामुळें नानासाहेबांस राग येऊन त्यांनीं स्वारीची तयारी केली, व ता० २० आक्टोबर इ० स० १७५५ रोजीं स्वारी डेरेदाखल झाली.

मोहिमेची हकीकतः—त्या वेळीं स्वारीबरोबर स्वतः नानासाहेब व भाऊसाहेब व विश्वासराव हे तिघे खासे असून शिवाय मल्हारराव होळकर, विठ्ठल शिवदेव विंचूरकर, महादाजीपंत पुरंदरे, कोन्हेर त्रिंबक एकबोटे, गोपाळराव पटवर्धन, नारो शंकर राजेबहादर वगैरे सरदार होते. त्याचप्रमाणें नागपूरकर भोसलेही दहा हजार फौजेनिशीं आला होता. फौजेचा कूच होत असतां मध्यंतरीं नानासाहेब व भाऊसाहेब कोल्हापुरास जाऊन संभाजी महाराजांस भेटून पुनः फौजेंत येऊन मिळाले. सर्व फौज कृष्णा नदी उतरून पलीकडे गेली, व तिनें जानेवारी महिन्यांत बागलकोटचा किल्ला घेतला. तसेंच विठ्ठल विश्राम नांवाच्या सरदारानें शहापूर व बेळगांव हे किल्ले घेतले (जानेवारी १७५६). या वेळीं सलाबतजंगाच

---

* मुरारराव घोरपडे गुत्तीकर यानें आपल्या पक्षास चिकटून राहवें व सावनूरच्या नबाबास मिळूं नये म्हणून नानासाहेबांनीं त्यास एक मोठें गौरवाचें पत्र लिहिलें होतें व आपला गोविंद शामराव नांवाचा वकील, त्याच्याकडे पाठविला होता. परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. मुरारराव शेवटीं सावनूरच्या नबाबास जाऊन मिळाला. पत्रें यादी १३४ का. सं.

दिवाण शहानवाझखान हा पेशवे कदाचित् आपले मुलखास त्रास देतील तेव्हां त्यांच्यावर टेहळणी करणें जरूर आहे असें सलाबतजंगास सांगून कृष्णेवर येऊन उतरला होता. परंतु हें कारण खरें नव्हतें. त्याचा व नानासाहेबांचा आंतून गुप्त तह झाला असून तो त्यासंबंधानें नानासाहेबांस भेटण्याकरितां आला होता. सलाबतजंगास संशय येऊं नये म्हणून नानासाहेबांनीं आपला वकील शहानवाझखान याजकडे पाठविला, व त्याला असें कळविलें कीं, "आमचा तुमच्याशीं शत्रुत्वाचा भाव नसून मित्रत्वाचा आहे. हल्लीं सावनूरचा नबाब याचें आपणा उभयतांशीं जें वर्तन आहे तें शत्रुत्वाचें असून आपण उभयतां मिळून त्याचा आतांच बंदोबस्त केला नाहीं तर तो पुढें ज्यास्त बळावून सर्व कर्नाटक काबीज करील. आम्ही तर स्वारीची तयारी करून आलोंच; व तुम्हींही या कामीं आम्हांस मदत केली पाहिजे." शहानवाझखान यानें ती गोष्ट सलाबतजंगास कळविली. तेव्हां स्वतः सलाबतजंग व बुसी हे आपली फौज व तोफखाना यांसह मराठ्यांस येऊन मिळण्याकरतां हैदराबादेहून निघाले. पेशव्यांची फौज सावनूरचे रोखानें निघाली. मध्यंतरीं दादासाहेबांची पत्नी जानकीबाई ही ते हिंदुस्तानच्या मोहिमेवर असतां वारली होती, सबब त्यांनीं कृष्णेच्या कांठीं गलगले मुक्कामीं ता० ७ दिजंबर इ० स० १७५९ रोजीं आपलें दुसरें लग्न* केलें, व ते स्वारींत येऊन मिळाले. एकंदर फौज सावनुरास आल्यावर मराठ्यांनीं सावनुरास मोर्चे लाविले. दोन महिने झाले तरी तहही होत नाहीं व किल्लाही हस्तगत होत नाहीं असें पाहून, व सलाबतजंग येऊन मिळाल्यावर तह झाला किंवा किल्ला हातीं आला तर यशाचा वांटेकरी तो होईल असें नानासाहेबांस वाटल्या-

* या बाईचें नांव आनंदीबाई असें ठेविलें.

वरून, त्यांनीं १२ मार्च रोजीं सावनूरच्या बाहेर मुजफरखान याचे जे मोर्चे होते त्यांवर हल्ला केला, व तीन टेकड्या सर केल्या. या हल्ल्यांत मुजफरखानाचे ४०० गारदी मारले गेले; तीन चारशें जखमी झाले; व त्याच्या आठ तोफा, जेजाला, बंदुका वगैरे पुष्कळ सामान मराठ्यांचे हातीं लागलें. मराठ्यांचींही शेंसव्वाशें घोडीं मेलीं; सुमारें शंभरपर्यंत लोक मरण पावले व दोनतीनशें जखमी झाले. दुसरे दिवशीं पहांटेस मुरारराव घोरपडे याच्या मोर्च्यावर हल्ला चढविण्याचा बेत होता. परंतु मुरारराव व मुजफरखान यांनीं रातोरात आपले बाहेरचे मोर्चे उठविले व ते शहरांत शिरले. मराठ्यांनीं आपले मोर्चे सावनूरच्या खंदकास नेऊन भिडविले. त्याच सुमारास सलाबतजंग व बुसी हेही येऊन मिळाले. बुसीनें सावनूरवर आपला तोफखाना सुरू केला. तीन दिवसपर्यंत शहरावर असा भडिमार झाला कीं, " न भूतो न भविष्यति. " शहराचें अतिशय नुकसान झालें. तोफांच्या गोळ्यांनीं हजारों माणसें प्राणास मुकलीं. नबाबास मुरारराव घोरपडे व मुजफरखान यांचें पूर्ण पाठबळ असल्यामुळें तो बराच चढून गेला होता. मराठ्यांनींही या वेळीं आपली शिकस्त केली. भाऊसाहेब व महादाजीपंत पुरंदरे हे एकसारखे तीन दिवस मोर्च्यांत होते. बरेच दिवस वेढा पडला तरी नबाब वठणीस येईना. तेव्हां एक मोठा जोराचा हल्ला करून किल्ला सर करावा असा नानासाहेबांनीं निश्चय केला. हल्ल्याचें काम मल्हारराव होळकर व विठ्ठल शिवदेव विंचूरकर यांनीं सूर्योदयापूर्वींच सुरू केलें. सावनूरकराची फौज फ्रेंचांचे कवायतीखालीं तयार झालेली असल्यामुळें तिनें मराठ्यांचे फौजेवर गोळ्यांचा पाऊस पाडला. परंतु त्या भयंकर मारास न जुमानतां मराठे एक-

सारखे पुढें चाल करीत करीत किल्ल्याचे दरवाज्यापर्यंत गेले, व हत्तीच्या गंडस्थळाची धडक देऊन त्यांनीं दरवाजा फोडला, व ते आंत शिरले. विंचूरकर या वेळीं आपल्या घोड्याखालीं उतरून सावनूरच्या फौजेची कत्तल करीत पुढें चालला. इतक्यांत सर्जेखान व मत्तेखान या नांवाच्या दोन बंधूंनीं किल्ल्याचे तटावर चढून आपलीं पागोटीं फाडून सावनूरकराचें निशाण पाडून तेथें मराठ्यांचें निशाण लाविलें. नबाबाचें निशाण नाहींसें होतांच त्याच्या फौजेचा धीर तुटून ती सैरावैरा पळत सुटली व मराठ्यांनीं सावनूरचा किल्ला सर केला. सावनूरचा नबाब शरण येऊन तह करण्यास कबूल झाला. त्या वेळीं उभयपक्षीं जो तह झाला त्यांत पेशव्यांनीं नबाबाचें अर्धें * राज्य घेतलें, व अकरा लाख रुपये खंडणी घेण्याचा करार केला. नबाबापाशीं खंडणीचा पैसा नव्हता म्हणून बंकापूर किल्ला सरकारांत गहाण घेतला. मुरारराव घोरपडे याची समजूत करून त्यास त्याचे जहागिरीवर पाठवून दिलें. सावनूरच्या नबाबानें मुजफरखान यास निरोप दिला. नंतर तो सलाबतजंगाचे पदरीं राहिला. पुढें सलाबतजंगानें त्यास काढून टाकिलें, तेव्हां त्यानें मी इतःपर कपट न करतां इमानानें चाकरी करीन असें वचन दिल्यावर नानासाहेबांनीं त्यास पुनः आपले पदरीं ठेविलें. सावनूर येथील मोहीम आटोपल्यावर स्वतः नानासाहेब तुंगभद्रेवर आले, व हरपनहल्ली, व चित्रदुर्ग येथील मामलत विल्हेस लावून त्यांनीं तमाम खंडण्या वसूल केल्या. त्याचप्रमाणें

---

* या वेळीं जो मुलूख पेशव्यांस मिळाला, त्यांत पाच्छापूर, कितूर, गोकाक, यादवाड, बागलकोट, बदामी, नवलगुंद, डंबळ, अनिगिरी, राणेबेदनूर, तोरगल, हल्याळ, हुबळी, मिश्रीकोट, कुंदगोळ, लक्ष्मेश्वर, मुतगुंड, बेहट्टी, बेटिगिरी, वगैरे तालुके होते. यांपैकीं बराच भाग पुढें पेशव्यांनीं रास्ते व पटवर्धन यांना जहागिरीदाखल देऊन टाकला. पेशव्यांची शकावली, पा० १३८.

बेदनूरचीही खंडणी त्यांनीं वसूल केली. या वेळीं त्यांचेबरोबर सलाबतजंगही होता. जुलैच्या प्रारंभीं स्वारी कृष्णेवर आली. नंतर स्वारी ता० १९ जुलै इ० स० १७५६ रोजीं सर्व मंडळीसह पुण्यास आली.

गोपाळराव पटवर्धन याची सोंध्यावर स्वारी:—सावनूरची मोहीम आटोपल्यावर नानासाहेबांनीं गोपाळरांव पटवर्धन याचे बरोबर दहा हजार फौज व पांच तोफा देऊन त्याला सोंधें प्रांतीं रवाना केलें. त्या वेळीं त्याचेबरोबर मल्हारराव रास्ते, हरी गोपाळ, गंगाधर बाजीराव, बेदरखान गारदी वगैरे सरदार होते. मराठ्यांची फौज सोंधें येथें गेल्यावर तिनें बाजारपेठ मारून ती लुटली. नंतर किल्ल्यास मोर्चे लाविले. त्या वेळीं सोंधेकर देसाई शरण येऊन आठ लक्ष रुपये देण्यास कबूल झाला. त्यांपैकीं अडीच लाख रुपये त्यानें रोख दिले व बाकी साडेपांच लाखांबद्दल फोंडा किंवा मदनगड नांवाचा किल्ला आठ महिने गहाण ठेविला. किल्ला हातास येईतोंपर्यंत सोंधेकराचा मेहुणा ओलीस घेतला होता. त्याचप्रमाणें तेथील संस्थानिकानें मराठ्यांस चौथाई व सरदेशमुखी देण्याचें कबूल केलें, व जे मराठे लोक त्यानें कैदेंत ठेविले होते त्यांस त्यानें सोडून दिलें. फोंडा किल्ला गोंवें प्रांताच्या हद्दीवर असल्यामुळें तो मराठ्यांचे हातांत गेला ह्मणजे पुढें मराठे आपल्या मुलखास त्रास देतील अशी पोर्तुगीज लोकांस मोठी भीति पडली, व त्यांनीं तो किल्ला आपले ताब्यांत घेण्याकरतां आपली फौज पाठवून त्या किल्ल्यास वेढा दिला. पोर्तु-

---

१ सोंधें हें शहर कारवार जिल्ह्यांत शिरसीपासून १० मैल दूर आहे. तेथील देसाई त्या वेळीं बरेच प्रबळ असून हल्लींच्या बहुतेक कारवार जिल्ह्यावर त्यांचा अंमल होता. हल्लीं हें एक पांच हजार वस्तीचें शहर आहे.

२ ऐ. लेख सं. नंबर ३-४. पटवर्धन घराण्यांतील पुरुषाचा हा पहिला उल्लेख होय. या पुढें या घराण्यांतील पुरुषांनीं मोठमोठे पराक्रम केले.

गीज लोकांनीं गोरी व काळी मिळून पांच हजार फौज फोंड्यास आणिली होती. पोर्तुगीजांच्या गव्हर्नरानें सुरुंग लावून किल्ल्याचा एक बुरूज उडवून दिला. नंतर पोर्तुगीज लोक दरवाजा फोडण्याचा प्रयत्न करूं लागले. त्या वेळीं आंतील मराठी फौजेनें दरवाजा एकदम खुला करून मोठ्या जोरानें पोर्तुगीज लोकांवर हल्ला केला. या झटापटींत पोर्तुगीजांचे दोनशें लोक ठार झाले, व त्यांचा गव्हर्नरही प्राणास मुकला. त्यामुळें पोर्तुगीज लोकांस दहशत बसून ते तेथून पळून गेले. त्या वेळीं पोर्तुगीज लोकांचें पुष्कळ सामान मराठ्यांचे हातीं लागलें. नंतर गोपाळराव बंकापुराजवळ हनगळ येथें छावणी करून राहिला. पावसाळा संपल्यावर श्रीरंगपट्टणाकडे त्यानें आपला कोर्चा फिरविला. सावनूरची मोहीम आटोपल्यावर नानासाहेबांनीं दादासाहेबांस कितूरशहरची खंडणी घेण्याकरतां पाठवून दिलें होतें. त्यांनीं पुढें ती खंडणी वसूल केली, व ते पुण्यास येऊन दाखल झाले.

पेशवे व इंग्लिश यांचा सुरत शहर घेण्याचा विचार व आंग्र्यावरील मोहीमः—इ० स० १७३९ त चिमणाजी आप्पाचे मदतीनें पहिले बाजीराव साहेब व मुंबईकर इंग्लिश यांचेमध्यें तह झाला होता. इंग्लिश लोक पहिल्यापासून पेशव्यांचे विरुद्ध न जातां त्यांना बहुतेक मिळूनच रहात असत. ता० १७ नवंबर इ० स० १७५० रोजीं बोरचीर नांवाच्या साहेबाची मुंबईचे गव्हर्नराचे जागीं नेमणूक झाली. तो ता० २४ नवंबरपासून आपलें काम पाहूं लागला. त्या वेळीं "या पुढें तुमचा आमचा स्नेह ज्यास्त वृद्धिंगत व्हावा," अशी त्यानें नानासाहेबांस विनंती केली; व त्या दिवसापासून पेशवे व इंग्लिश यांच्यामध्यें दळणवळण ज्यास्त वाढलें.

प्रथमतः उभय पक्षांमध्यें सुरत शहर घेण्याचा निश्चय ठरला. सुरत शहर मूळ दिल्ली सरकारचे ताब्यांत होतें; परंतु दिल्लीचे बादशाहा इतके नामधारी व कमकुवत झाले होते कीं, त्यांना त्यांच्या स्वतःच्या राजधानीचेंही संरक्षण करण्याचें सामर्थ्य उरलें नव्हतें; तेव्हां इतर प्रांतांवरचा त्यांचा अधिकार कितीसा कायम राहणार? त्यामुळें सुरत शहरावर तीन चार सरदारांचा अंमल सुरू झाला होता. त्या-शिवाय दमाजी गायकवाड व इंग्लिश यांचेही मुनीम तेथें होतेच. या वेळेच्या सुमारास जंजिऱ्याच्या शिद्दीचा मसाऊद शिद्दी नांवाचा सरदार सुरत येथें होता, तो आपल्या धन्याचें जूं फेंकून देऊन सुरत शहराचा अधिकार स्वतंत्र रीतीनें पाहूं लागला. इ०स० १७५४ त नानासाहेबांनीं सुरत येथून शिद्दी मसाऊद यास काढून टाकून तें शहर आपले अमलाखालीं आणावें म्हणून कांहीं आरमार पाठवून दिलें. परंतु या कामगिरीवर त्यांनीं ज्या सरदाराची योजना केली होती तो निमकहराम होऊन शिद्दीस जाऊन मिळाला. त्यामुळें नानासाहेबांचें तें कारस्थान फसलें.

कान्होजी आंग्रे वारल्यानंतर त्याचे मुलखाचे दोन विभाग झाले होते. त्यांपैकीं बाणकोटचे खाडीचे उत्तरेकडील मुलूख त्या वेळीं मानाजी आंग्रे याचे ताब्यांत होता, व तो पेशव्यांचा अंकित होता. परंतु बाणकोटचे दक्षिणेस सावंतवाडीपर्यंतचा सर्व प्रांत मानाजीचा सावत्र भाऊ तुळाजी आंग्रे याचे ताब्यांत असून तो स्वतंत्र रीतीनें आपला कारभार चालवीत असे. तो या वेळीं अधिकारमदानें फारच चढून गेला होता, व ज्या गलबतीवर त्याचा परवाना नाहीं, मग तें कोणाचेंही असो, असें गलबत तो बेलाशक धरून नेत असे. त्यामुळें एकंदर व्यापाऱ्यांस-विशेषतः परदेशस्थ व्यापाऱ्यांस-

फारच त्रास होऊं लागला; व त्याचा बंदोबस्त करणें पेशव्यांस भाग पडलें. तेव्हां नानासाहेबांनीं तह करण्याचे हेतूनें कोकणचा सुभेदार रामजी महादेव भानू यास मुंबईस इंग्लिशांकडे पाठवून दिलें. त्या वेळीं उभयपक्षीं असें ठरलें कीं, पेशवे व इंग्लिश या उभयतांनीं मिळून तुळाजी आंग्रे याचें पारिपत्य करावें; आरमाराची सर्व व्यवस्था इंग्लिशांनीं पहावी; व जमिनीच्या बाजूनें पेशव्यांनीं आपली फौज पाठवावी. आंग्र्यांचीं जहाजें पाडाव होतील तीं उभयतानीं निमेनिम वांटून घ्यावीं व बाणकोट व त्याखालीं येणारे नऊ गांव व त्याच्या शेजारचा हिंमतगड नांवाचा किल्ला, व बाणकोटच्या खाडीवरील सर्व हक्क पेशव्यांनीं इंग्लिशांस द्यावे. तुळाजी आंग्र्याच्या एकंदर किल्ल्यांत सुवर्णदुर्ग व विजयदुर्ग असे दोन किल्ले बळकट होते. विजयदुर्ग किल्ल्याला त्या वेळीं घेरिया असें म्हणत असत. हे दोन किल्ले प्रथमतः सर करण्याचें ठरून इंग्लिशांचे आरमाराचा सरदार कमांदर जेम्स हा इंग्लिशांचें व मराठ्यांचें आरमार बरोबर घेऊन ता० २६ मार्च इ. स. १७५९ रोजीं मुंबईहून निघाला तो टेहळणी करीत करीत जयगडपर्यंत गेला, व तेथून मागें फिरून ता. ४ एप्रिल रोजीं त्यानें सुवर्णदुर्गावर आपली तोफ सुरू केली, व चार दिवसांत तो किल्ला सर केला. रामजी महादेव यानें जमिनीवरून किल्ले घेण्याचें काम सुरू केलें. त्याच्या मदतीस नानासाहेबांनीं मस्तानीचा पुत्र समशेर बहादर यास पाठवून दिलें. ते दाघेही किल्ले सर करीत करीत रत्नागिरीपर्यंत जाऊन पोहोंचले. पुढें पावसाळा नजीक आल्यामुळें जेम्स साहेब ता० १८ मे रोजीं आपल्या आरमारासह मुंबईस आला. पावसाळा संपल्यावर पुनः लढाईस सुरवात झाली. त्या वेळीं अॅडमिरल वॉटसन व कर्नल क्लाईव्ह हे दोन प्रसिद्ध सरदार विलायतेहून आरमार

घेऊन आलेले होते; व ते तुळजीचे राहिलेले किल्ले घेण्याचे उद्देशानें इ० स० १७५६ च्या आरंभीं निघाले. त्यापूर्वी इ० स० १७५५ च्या नवंबर महिन्यापासून रामजीपंत व खंडोजी माणकर यांनीं विजयदुर्गपर्यंतचे सर्व किल्ले जिंकून खुष्कीच्या बाजूनें विजयदुर्गास वेढा देऊन ते इंग्लिश आरमाराची वाट पहात बसले होते. पुढें इंग्लिशांचें आरमार आलें त्या वेळीं तुळाजी आंग्रे तह करण्याचे हेतूनें मराठ्यांचे छावणींत आला. तेव्हां रामजीपंत भानू व खंडोजी माणकर हे त्याच्याशीं किल्ला खालीं करून मागूं लागले. भानूनें "तुळाजी आंग्रे तह करण्याकरतां आमचेकडे आला आहे, व त्याजपाशीं काय अटी ठरवावयाच्या त्यासंबंधानें मी आपल्या भेटीस येणार आहें असा इंग्लिश आरमाराचा मुख्य साहेब अॅडमिरल वॉटसन यास निरोप पाठविला. परंतु तो निरोप जाण्यापूर्वीच समुद्राचे बाजूनें वॉटसन यानें व जमिनीचे बाजूनें कर्नल क्लाईव्ह यानें वेढ्याचें काम सुरू केलें होतें. या किल्ल्यावर तुळाजी आंग्र्याचें मुख्य ठाणें असून तेथें पुष्कळ संपत्ति आहे असें इंग्लिशांस समजलें होतें, व त्या ठिकाणीं जी लूट सांपडेल तीपैकीं मराठ्यांस एक कवडीही न देतां ती सर्व आपसांत वांटून घ्यावयाची असा वॉटसन, क्लाईव्ह आदीकरून दहा इंग्लिश अमलदारांचा मुंबईहून निघते वेळीं बेत ठरला होता. पुढें रामजी पंताचा निरोप जाऊन पोहोंचला तथापि त्याची फारशी दाद न घेतां त्यांनीं वेढ्याचें काम तसेंच पुढें चालविलें. इंग्लिशांनीं किल्ल्यावर आपला तोफखाना सुरू केला त्या वेळीं किल्ल्याच्या आश्रयानें तुळाजीचें जें आरमार होतें त्यापैकीं एका गलबतावर तोफेचा गोळा पडून त्यानें पेट घेतला; व त्याचे बरोबर दुसरींही गलबतें जळून खाक झालीं.

ता. १३ फेब्रुवारी इ० स० १७५६ रोजीं वॉटसन साहेबानें तो किल्ला सर केला. रामजीपंतानें मराठी फौज किल्ल्यावर नेण्याचा प्रयत्न केला, परंतु क्लाईव्हच्यापुढें त्याचें कांहीं चालेना. नंतर वॉटसन व क्लाईव्ह किल्ल्यावर गेले; तेथें त्यांना दहा लाख रुपयांची लूट मिळाली. नंतर पूर्वीं ठरलेल्या कराराप्रमाणें इंग्लिश सरदारांनीं ती आपसांत वांटून घेतली व तो किल्ला आपले ताब्यांत ठेविला. या वेळीं इंग्लिशांनीं मराठ्यांस न विचारितां आपल्या मताप्रमाणें सर्व गोष्टी करून घेतल्या. नानासाहेबांस तें वर्तमान समजलें तेव्हां तो किल्ला आपणास मिळावा व लुटीचा भाग आपणास द्यावा म्हणून त्यांनीं मद्रास व मुंबई येथील इंग्लिश अधिकाऱ्यांशीं पुष्कळ पत्रव्यवहार केला. परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. त्या वेळीं नानासाहेब सावनूरच्या मोहिमेवर गुंतले होते. पुढें ता० १९।२० जुलैच्या सुमारास ते पुण्यास परत आले, व त्यांनीं पुनः बोरचीर साहेब यास पत्र पाठविलें कीं, "घेरिया किल्ल्याच्या संबंधानें व दुसऱ्या कांहीं महत्त्वाच्या गोष्टींसंबंधानें कायमचा निकाल होणें राहिलें आहे. तर तुह्मीं आपला कोणी तरी सरदार आमचेकडे पाठवून द्यावा." बोरचीर यानें नानासाहेबांस पत्राचें जें उत्तर पाठविलें त्यांत "तुह्मीं आह्मांस बाणकोट देण्याचें कबूल केलें होतें, तर त्याचेबद्दल आम्हांस घेरिया किल्ला द्यावा; तो किल्ला आमचे ताब्यांत असला ह्मणजे पोर्तुगीज लोकांपासून तुम्हांस मुळींच त्रास होणार नाहीं व तुमचे व पोर्तुगीज लोकांचे दरम्यान् घेरिया हा एक बळकट बंधारा होईल," इत्यादि मजकूर लिहिला होता. या लिहिण्याचें मर्म नानासाहेबांस पूर्णपणें कळून चुकलें होतें. त्यांनीं त्या पत्राचा उलट जबाब पाठवून बोरचीर यास कळविलें कीं,

"पोर्तुगीज लोकांस माझे मनांत हिंदुस्तानांतून हाकून द्यावें असें आहे, व तसें झालें म्हणजे त्यांचे व आमचे मुलखाचे दरम्यान् बंधाऱ्याचें कांहींच कारण राहणार नाहीं." अशा रीतीनें नानासाहेबांनीं बोरचीर साहेबाचें ह्मणणें मोठ्या युक्तीनें खोडून काढलें.

जॉन स्पेन्सर व थॉमस बॉयफील्ड या नांवांचे दोन गृहस्थ बोरचीर यानें मुंबईहून पुण्याचे दरबारीं पाठवून दिले. नंतर उभयपक्षीं बोलणीं चालणीं होऊन ता. १२ आगष्ट इ. स. १७५६ रोजीं तह ठरला. त्याचीं एकंदर अठरा कलमें होतीं. त्यांपैकीं मुख्य कलमें येणेंप्रमाणें:—१ पेशव्यांनीं डच लोकांस आपले राज्यांत व्यापार करण्यास सवलत देऊं नये. २ स्पेन्सर व बॉयफील्ड पुण्याहून निघाल्यापासून चोवीस दिवसांचे आंत इंग्लिशांनीं घेरिया किल्ला पेशव्यांचे ताब्यांत द्यावा. ३ पेशव्यांनीं बाणकोट, त्याच्या सभोंवतालचे दहा गांव व बाणकोटच्या खाडीचें स्वामित्व ईस्ट इंडिया कंपनीस द्यावें. ४ पेशव्यांनीं तुळाजी आंग्र्यास[१] घाटाचे खालीं कोठेंही मुलूख देऊं नये. ५ इंग्लिशांचे मालावर जकात बसूं नये इ०.

निजामचे दरबारांतून बुसीचें उच्चाटण:—फ्रेंच सरदार बुसी यानें निजामाचे दरबारीं बरेंच वर्चस्व स्थापिलें होतें, व दरबारचा सर्व कारभार बहुतेक त्याचेच तंत्रानें चालत असे. सलाबतजंगास बुसीचें पाठबळ नसतें तर मराठ्यांनीं त्याची तळी तेव्हांच उचलून मोंगलाई बुडवून टाकिली असती. वरील कारणांमुळें तो निजामाचे दरबारी मंडळीच्या व पेशव्यांच्या डोळ्यांत कणाप्रमाणें सलत होता. सलाबतजंगाचा दिवाण शहानवाझखान व नानासाहेब यांचे

---

१ पेशव्यांनीं तुळाजीस कैद केल्यावर त्याला प्रथम सातान्याजवळ वंदन नांवाच्या किल्ल्यावर ठेविलें; नंतर त्याला सोलापुरच्या किल्ल्यांत ठेविलें, व तेथेंच तो मरण पावला.

बुसीची उचलबांगडी करण्याचे बेत फार दिवसांपासून चालले होते. सावनूरचे मोहिमेंत वरील सर्व मंडळी हजर होतीच, व तेथून त्याला रजा द्यावी असा नानासाहेब व शहानवाझखान यांचा बेत ठरला होता. नंतर शहानवाझखान यानें सलाबतजंगाचे मनांत फ्रेंचांविषयीं अप्रीति उत्पन्न करून "आतां तुमचें काम आटोपलें, दक्षिणचे सुभेदारास तूर्त तुमचे मदतीची जरूर नाहीं; करितां तुह्मांस आजपासून रजा दिली आहे" असें त्याच्याकडून बुसीस सांगवलें. एकाएकीं असा निरोप ऐकून बुसीच्या मनाची काय स्थिति झाली असेल त्याची कल्पना वाचकांनींच करावी. त्या वेळीं बुसीबरोबर जय्यत तोफखाना असून शिवाय फौजही बरीच होती. एकट्या निजामाचे त्यानें हां हां ह्मणतां बारा वाजविले असते. परंतु निजामाला त्या वेळीं मराठ्यांचें पूर्ण पाठबळ होतें. त्यामुळें त्याला तसें कांहीं करतां आलें नाहीं. शेवटीं आलेल्या प्रसंगास धिमेपणानें पाठ देऊन तो आपल्या फौजेसह सावनूर येथून परत फिरला व आपणास वाटेनें त्रास होऊं नये ह्मणून त्यानें "मच्छलीपट्टण येथें मला जाणें आहे तर परवाने द्यावे" असें सांगून परवाने घेतले. नानासाहेबांनींही त्याला मच्छलीपट्टण येथें पोहोंचविण्याकरितां पांचशें स्वार दिले, व मर्जी असेल तर तुम्हीं आमचे पदरीं नोकरीस रहावें ह्मणून त्यास सांगितलें. फ्रेंचांना निजामाचे दरबारांतून काढण्यांत नानासाहेबांचा मुख्य उद्देश निजामाला बलहीन करावयाचा होता. परंतु बुसी परत फिरला, तो मच्छलीपट्टण येथें न जातां थेट हैदराबादेस आला, व तेथें आपला पक्का बंदोबस्त करून तो सलाबतजंग येण्याची वाट पहात बसला. मध्यंतरीं त्यानें पोंदेचेरी येथून मदत मागितली व सुरतेस मदतीसाठीं लिहिलें. बुसी असा कांहीं तरी डावपेंच करील असें निजामास वाटलें होतें. त्या-

वरून त्यानें त्याचे पाठोपाठ रामचंद्र जाधव व जानोजी निंबाळकर यांस सहा हजार फौज देऊन रवाना केलें. सुरतेहून बुसीचे मदतीस अबिसिनियन लोकांची टोळी येत होती तिच्यावर रामचंद्र जाधव यानें हल्ला करून ९० लोक ठार केले, व बाकीच्यांस कैद केलें. त्या वेळीं फ्रेंचांस हैदराबाद येथून काढून टाकण्याकरितां शहानवाझखान यानें इंग्लिशांपाशीं मदत मागितली होती. परंतु ह्याच वेळीं बंगाल्यामध्यें सुराजउद्दौला यानें कलकत्त्याचा किल्ला घेऊन त्यांत जे इंग्लिश लोक सांपडले त्यांस एका लहानशा खोलींत कोंडून ठार मारल्यामुळें त्यांची सर्व फौज बंगाल्यांत गुंतली होती. इकडे बुसीनें जाधव व निंबाळकर यांस वश करून घेतलें, व पोंदेचेरी आणि मच्छलीपट्टण येथून त्याचे मदतीस जी फौज रवाना झाली होती ती सुखरूपपणें हैदराबाद येथें आगस्ट इ० स० १७५६ त येऊन पोहोंचली. सलाबतजंग कर्नाटकांतून परत गेला तेव्हां त्याच्या व बुसीच्या कांहीं चकमकी झडल्या. बुसी व सलाबतजंग दोघेही आपापल्या तऱ्हेनें नानासाहेबांपाशीं मदत मागूं लागले. परंतु त्यांनीं कोणासच मदत केली नाहीं. बुसीपुढें आपला निभाव लागणार नाहीं असें पाहून सलाबतजंगानें त्याच्याशीं सलूख केला, व बुसीनें निजामाचे दरबारीं पुनः आपला बज बसविला.

दादासाहेबांची उत्तर-हिंदुस्तानांतील जंगी मोहीम किंवा मराठ्यांचा भगवा झेंडा अटकेवर फडकतो:—सावनूरची मोहीम आटोपल्यावर ता. १२ आक्टोबर इ. स. १७५१ रोजीं इंग्लिश व पेशवे यांच्यांत तह झाला तोंपर्यंत सर्व खासे पुण्यासच होते. पुढें लौकरच नानासाहेबांनीं दादासाहेबांबरोबर सदाशिव रामचंद्र यास देऊन गुजराथेंत पाठवून दिलें. ही मोहीम सुमारें दोन वर्षे चालली

होती. तेव्हां तिचें वर्णन करण्यापूर्वी मध्यंतरीं घडलेल्या इतर गोष्टी सांगून नंतर तिकडे वळावें हें बरें.

श्रीरंगपट्टणची मोहीमः—इ. स. १७५७ च्या जानेवारी महिन्यांत नानासाहेब व भाऊसाहेब बरोबर साठ हजार फौज घेऊन श्रीरंगपट्टणचे मोहिमेस निघाले. नाना फडणवीस प्रथमच या स्वारींत आपले कामावर रुजू झाला होता. कृष्णा नदी उतरून गेल्यावर त्या प्रांतांतील सर्व संस्थानिकांनीं आपापल्या खंडण्या पावत्या केल्या; परंतु श्रीरंगपट्टणचा राजा चिक्क कृष्णराय यानें खंडणीची कांहींच तडजोड केली नाहीं. त्यावरून नानासाहेबांस राग येऊन त्यांनीं श्रीरंगपट्टणावर आपला मोर्चा फिरविला, व गोपाळराव पटवर्धन, मल्हारराव रास्ते व बळवंतराव मेहेंदळे हे कर्नाटकांतून चाल करून आले. या स्वारीचे वेळीं कडप्याचा नबाब शिवाय करून बाकी सर्व संस्थानिकांनीं व जहागिरदारांनीं पेशव्यांचें स्वामित्व कबूल केलें. श्रीरंगपट्टणच्या राजाचा दिवाण नंदराज हा खंडणीचा पैसा देईना, तेव्हां पेशव्यांनीं श्रीरंगपट्टणास आपले मोर्चे लाविले. या वेळीं भाऊसाहेब मोर्च्यांत होते, व त्यांनीं एकसारखा २७ दिवस त्या शहरावर तोफांचा मारा चालविला होता. पुढें एके दिवशीं तोफेचा गोळा लागून श्रीरंगपट्टण येथील रंगस्वामीचे देवालयाचा कळस फुटला व त्याच संधीस तोफखान्यापैकीं एक तोफ फुटून तिच्यायोगानें पेशव्यांचे बरेच लोक जायां झाले. तेव्हां ही गोष्ट अशुभसूचक आहे असें नानासाहेबांस वाटून त्यांनीं नंदराजानें तहाचें बोलणें सुरू केलें होतें तें ताबडतोब मान्य केलें व ३६ लाख रुपये खंडणी घेण्याचा करार करून त्याच्याशीं तह केला. या ३६ लाखांपैकीं पांच लाख रोख देऊन बाकीच्या रकमेच्या फेडीकरितां नंदराजानें आपलें राज्यांपैकीं

१४ महाल पेशव्यांकडे लावून दिले. शिरें, मंगळूर, उसकोटा, बाळापूर, कोल्हार वगैरे प्रांतांवर शहाजीचे वेळेपासून मराठ्यांचा हक्क होता, परंतु मध्यंतरीं तिकडील पाळेगार लोकांनीं ते प्रांत बळकाविले होते. तेव्हां ते प्रांत परत आपले अमलाखालीं आणावे असें नानासाहेबांचे मनांत होतें. त्याप्रमाणें स्वारी करून मार्च १७५७ त त्यांनीं चिनापट्टण घेतलें व बाकीचे प्रांत घेण्याकरितां त्यांनीं बळवंतराव मेहेंदळे याचेबरोबर बरीच फौज देऊन त्याला कर्नाटकांत रवाना केलें,व आपण ज्येष्ठ मासीं ह्मणजे इ० स० १७५७ च्या जून महिन्यांत तुंगभद्रेवर आले, व जुलै महिन्यांत पुण्यास परत आले. त्याचें कारण असें होतें कीं,श्रीमंत त्या प्रांतीं गुंतले असतां उदाजी चव्हाण, कोल्हापूरकर, चिकोडीकर, प्रतिनिधीचा मुतालीक यमाजी शिवदेव, यांनीं देशीं लुटालूट व दंगा केला होता. परंतु नानासाहेब पुण्यास परत आल्यावर नुकताच उदयास येऊं लागलेला नंदराजाचा सरदार हैदरखान याच्या चिथावणीवरून नंदराजानें त्या १४ महालांतून पेशव्यांचे लोकांस घालवून दिलें. पावसाळा संपल्याबरोबर नानासाहेबांनीं गोपाळराव पटवर्धन यास फौजेसह पुन्हा म्हैसुरावर रवाना केलें. त्यानें ते प्रांत पुन्हा काबीज केले व चिनापट्टण सर करून मंगळुरास वेढा दिला. इतक्यांत म्हैसूरकरांची फौज घेऊन हैदरअल्ली लढाईस आला. तीन महिने लढाई झाल्यावर तह झाला, त्यांत असें ठरलें कीं, मागील बाकी व चालू सालची खंडणी मिळून ३२ लाख रुपये घेऊन मराठ्यांनीं त्या १४ महालांवरचा आपला हक्क सोडावा. या तहाप्रमाणें ३२ लाख रुपये घेऊन गोपाळराव अर्काटकडे गेला. गोपाळरावानें केलेला हा नुकसानीचा तह नानासाहेबांस आवडला नाहीं.

मेहेंदळे यांची कर्नाटकांतील मोहीमः—बळवंतराव मेहेंदळे कर्नाटकांत गेल्यावर त्यानें ऊसकोटा प्रांत कडप्याचे नबाबापासून जिंकून घेतला. त्याचप्रमाणें कडेपट्टण नांवाचें अर्काटचे नबाबाचे ताब्यांतील एक शहर त्यानें घेतलें, व त्या नबाबाकडे चौथाईची जी बाकी तुंबली होती तिची मागणी केली. होय नाहीं करतां करतां शेवटीं साडेपांच लक्ष रुपये द्यावयास तो कबूल झाला. त्या रकमेपैकीं दोन लाख रुपये त्यानें रोख दिले, व अडीच लाखांचे हवाले दिले. मेहेंदळ्याचा दिवाण अमृतराव यानें मद्रासच्या इंग्लिश लोकांवर खंडणीची मागणी केली. प्रथमतः त्यांनीं त्या प्रांताचें उत्पन्न अगोदरच कमी, व जें कांहीं उत्पन्न होतें ते त्या प्रांताच्या बंदोबस्ताकरतां खर्च होतें ह्मणून सांगितलें. परंतु अमृतराव तें बोलणें मान्य करीना. त्यामुळें इंग्लिशांस मागितलेला पैसा देणें भाग पडलें. मुराराव घोरपडे गुत्तीकर हा त्या मोहिमेंत होता, व तो त्या जिंकलेल्या मुलखापैकीं एक किल्ला मागत होता. परंतु मेहेंदळ्यानें तो किल्ला दिला नाहीं, व त्यानें त्या संबंधानें नानासाहेबांस लिहिलें. त्यांनीं घोरपडे यास तो किल्ला देण्यास सांगितलें. परंतु तसें होण्यापूर्वींच घोरपडे आपल्या नेहमींच्या क्रमा-प्रमाणें कडप्पा, सावनूर, कर्नूल, व दुसरे कांहीं संस्थानिक यांनीं मेहेंदळ्याविरुद्ध कट केला होता त्यांत जाऊन मिळाला. त्या संस्थानिकांनीं इंग्लिशांसही आपले मदतीस बोलाविलें होतें. परंतु त्यांची फौज त्या वेळीं बंगाल्यांत गुंतल्यामुळें त्यांना वरील मंडळीस मदत करतां येईना.

म्हैसूरचे राज्यांत हैदरअल्लीचें बरेंच प्रस्त माजलें होतें व त्याच्या उपदेशावरून तेथील राजानें मराठ्यांचे खंडणीपैकीं जी बाकी देणें राहिली होती ती देण्याचें नाकारलें, व ती वसूल करण्याकरतां पेशव्यांनीं त्याचे

राज्यांत जे कारकून ठेविले होते त्यांना हांकून दिलें. नानासाहेबांस या गोष्टीचा राग येऊन त्यांनीं गोपाळराव पटवर्धन त्या वेळीं युवराज विश्वासराव यांचेबरोबर गोदावरीचे कांठीं होता,त्याच्याबरोबर दहा हजार फौज देऊन म्हैसूरचे बंदोबस्ताकरतां जावें म्हणून त्याला आज्ञा केली. परंतु ते पावसाळ्याचे दिवस असल्यामुळें गोपाळरावास त्या वेळीं तिकडे जातां आलें नाहीं. नानासाहेबांनीं याच वेळेच्या सुमारास बळवंतराव मेहेंदळे यास बेदनूर घेण्याविषयीं पत्र लिहिलें. त्यांत त्यांनीं मेहेंदळे यास असें लिहिलें कीं, " तुह्मीं एकदम बेदनूर येथें जावें, बेदनूरचा राजा व त्याचा पुत्र हे हल्लीं मयत आहेत. त्याचप्रमाणें बेदनूरच्या सैन्यांतही आजार पसरला आहे. गोपाळराव आपणास येऊन मिळण्यापूर्वीं आपण तें ठाणें सर करावें, व गोपाळराव आल्यावर चितळदुर्गावर हल्ला करावा." नानासाहेबांच्या लिहिण्याप्रमाणें जर या वेळीं सर्व गोष्टी घडून आल्या असत्या तर त्या योगानें हैदरअल्लीच्या वाढत्या जोमास बराच दाब बसला असता. परंतु इ० स० १७५८ च्या फेब्रुवारी महिन्यापर्यंत बळवंतरावाचे सर्व दिवस कडप्पा प्रांत घेण्यांत व तिकडील पाळेगार लोक वठणीस आणण्यांत गेले. इतक्यांत निजामाकडे एक बडें राजकारण उपस्थित झालें. त्यामुळें नानासाहेबांनीं बळवंतरावास सर्व फौजेसह कर्नाटकांतून परत बोलाविलें.

हैदराबाद येथील हकीगतः—हैदराबादचा निजाम सलाबतजंग यानें आपला दिवाण शहानवाझखान याचे सल्यानें आपले बंधु

---

१. निजामाचे दरबारीं या वेळीं मोठा घोंटाळा झाला होता. तेव्हां त्याचे देखरेखीकरितां नानासाहेबांनीं आपले ज्येष्ठ चिरंजीव विश्वासराव यांचेबरोबर फौज देऊन त्यांना गोदावरीचे कांठीं पाठविलें होतें. गोपाळराव हा या वेळीं त्यांच्याबरोबर होता. या स्वारीची हकीगत पुढें येईल.

बसालतजंग व निजामअली यांस इ० स० १७५६ त अनुक्रमें विजापूर व वऱ्हाड या प्रांतांचे सुभेदार नेमिलें होतें. त्याच वेळीं बंगाल्यांत इंग्लिश व फ्रेंच यांची लढाई सुरू झाली होती. त्यामुळें बुसी आपल्या लष्करासह आपल्या बसाहतींचा बंदोबस्त करण्याकरितां हैदराबाद येथून निघून गेला होता. पूर्वी सावनूरचे स्वारीचे वेळीं सलाबतजंग यानें बुसीस रजा दिली त्या वेळीं त्याच्या पाठलागाचें काम त्यानें रामचंद्र जाधव यास सांगितलें होतें. बुसीनें त्या वेळीं मच्छलीपट्टण येथून फौज मागवली होती व तिची व बुसीची गांठ पडूं देऊं नये म्हणून निजामाचा बेत होता. परंतु जाधवाचे फितूरीमुळें ती शेवटीं बुसीस येऊन मिळाली. निजामास त्या कृत्याबद्दल मोठा राग आला होता, व बुसी हैदराबाद येथून गेल्यावर त्यानें बसालतजंग व शहानवाझखान यांस बरोबर घेऊन रामचंद्र जाधव याचेवर स्वारी केली, व थोडकेच अवधींत त्याची बहुतेक जहागीर जप्त केली. नंतर पावसाळा नजीक आल्यामुळें तो बसालतजंग व शहानवाझखान यांसह औरंगाबाद येथें छावणी करून राहिला. ह्याच वेळीं त्यानें दौलताबाद किल्ल्याचा जुना किल्लेदार सादत बोखरू यास दूर करून तो किल्ला शहानवाझखान याचा एक आश्रित होता त्याचे स्वाधीन केला. नानासाहेब यांचा निजामाचे राज्यावर फार दिवसांपासून डोळा होता, व शहानवाझखान ह्यास हाताशीं धरून मोंगलाई नवीजुनी करावी व त्या धालमेलींत आपला कार्यभाग साधून घ्यावा अशाविषयीं त्यांची मोठ्या जारीनें खटपट सुरु झाली होती. त्यामुळें निजामाचे दरबारीं खेळखंडोबा सुरू झाला. या नाटकांतील मुख्य

---

१ हा धनाजी जाधव यांचा नातू होता.

भूमिका शहानवाझखान याजकडे असून अंतस्थ त्याचे मदतीस, परंतु बाह्यात्कारी निजामाचे हालचालींवर टेहेळणी करण्याकरितां म्हणून नानासाहेबांनीं आपला ज्येष्ठ पुत्र विश्वासराव याच्याबरोबर दत्ताजी, जनकोजी व महादजी शिंदे, महादाजीपंत पुरंदरे, गोपाळराव पटवर्धन, गोविंद हरी वगैरे सरदार देऊन त्याला गोदेच्या कांठीं अगोदरच पाठवून दिलें होतें (इ० स० १७५७ आगस्ट).

निजामाचे दरबारीं चाललेल्या नाटकाचें संविधानकः— इ० स० १७५७ च्या आगस्ट महिन्यांत औरंगाबाद येथील निजामाच्या सैन्यानें पगाराची बाकी थकली म्हणून ओरड चालविली, व ते लोक शहानवाझखान याच्यापाशीं पगाराची बाकी मागूं लागले. परंतु त्यानें त्यांच्या मागणीकडे फारसें लक्ष दिलें नाहीं. त्यावरून शहानवाझखान यास दिवाणाच्या कामावरून दूर करावें व बसालतजंग यास त्या कामावर नेमावें अशी त्या सैन्यांतील लोकांनीं सलाबतजंगास धमकी दिली. सलाबतजंगाचे मनांत ती गोष्ट करावी असें नव्हतें; परंतु सैन्याची बाकी चुकती करून देण्यास त्याचेपाशीं पैसे नव्हते, त्यामुळें त्याला त्या लोकांचें ह्मणणें कबूल करणें भाग पडलें. परंतु एवढ्यानें त्या लोकांची शांतता झाली नाहीं. ते शहानवाझखान याजवर उठले. तेव्हां तो स्वसंरक्षणाकरितां आपल्या कुटुंबासह दौलताबादच्या किल्ल्यांत पळून गेला, व त्यानें तेथें त्या लोकांशीं सामना देण्याची कडेकोट तयारी केली. वर सांगितलेल्या सर्व गोष्टी शहानवाझखान यानें करविल्या होत्या. या एकंदर कारस्थानांत त्याला तीन गोष्टी साध्य करून घ्यावयाच्या होत्या. त्या येणेंप्रमाणें:—१ सलाबतजंग यास दौलताबादचे किल्ल्यांत अटकेंत ठेवावयाचें; २ फ्रेंचांचें प्राबल्य

निजामचे दरबारीं फार झालें होतें त्यांना हुसकून काढावयाचें; व ३ निजामाचे गादीवर निजामअल्ली व बसालतजंग यांपैकीं कोणास तरी बसवावयाचें. शहानवाझखान दौलताबादचे किल्ल्यावर पळून गेला, म्हणजे सलाबतजंग आपल्या मानभंग झालेल्या दिवाणाचें शांतवन करण्याकरितां व त्यानें हातघाईस येऊं नये म्हणून त्यास उपदेश करण्याकरितां दौलताबादच्या किल्ल्यावर जाईल व तसें झालें ह्मणजे त्याला तेथल्या तेथेंच कैद करण्यास ठीक पडेल असें सैन्यांतील लोकांस वाटत होतें. सलाबतजंग जाणारही होता; परंतु सलाबताचे पदरीं जी फ्रेंचांची फौज होती तिच्यावरील अमलदारास या सर्व कृत्याचा संशय आल्यावरून त्यानें त्याला ती गोष्ट उघड करून सांगितली व अशा रीतीनें त्याचा किल्ल्यावर जाण्याचा बेत रहित केला. पुढें सलाबतजंग यानें शहानवाझखान यास असा निरोप पाठविला कीं, " तुम्ही आह्मांस शरण याल तर आम्ही तुमचे विरुद्ध जी मंडळी आहे त्यांच्यापासून तुमचें संरक्षण करतों. " त्या दिवाणास हा अपमानाचा निरोप सहन न होऊन त्यानें सलाबतजंगाचे फौजेवर आपली तोफ सुरू केली. तेव्हां सलाबतजंगानें दौलताबादच्या किल्ल्यास वेढा देण्याचें काम सुरू केलें, व निजामअल्ली यास वऱ्हाडांतून आपले मदतीस बोलाविलें. शहानवाझखान यास मराठ्यांची मदत असल्यामुळें तो मुळींच डगमगला नाहीं. निजामअल्ली बरोबर फौज घेऊन औरंगाबाद येथें येण्याकरितां वऱ्हाडांतून निघाला; परंतु सलाबतजंगाचे पदरच्या एका सरदारानें सलाबतास असें सांगितलें कीं, निजामअल्ली जरी आपला बंधु आहे, तरी तो आपल्याविरुद्ध आहे. याकरितां त्याला इकडे बोलावूं नये. त्यावरून त्यानें "तुम्हीं तूर्त इकडे येऊं नये" ह्मणून

निजामअल्लीस निरोप पाठविला. परंतु "माझ्या बंधूला एका यःकश्चित बंडखोर दिवाणानें अशा रीतीनें वागवावें ही गोष्ट मला कधींच खपणार नाहीं, याकरितां मला दौलताबाद घेऊन त्याचें पारिपत्य केलेंच पाहिजे," असा बहाणा करून सलाबताचे निरोपास धाब्यावर बसवून तो थेट औरंगाबाद येथें आला. "तुम्हीं निजामअल्लीस येऊं देऊं नये, तो आला तर तुमचा आमचा सलोखा राहणार नाहीं," असें नानासाहेबांनीं सलाबतजंगास अगोदरच सांगितलें होतें. निजामअल्ली सलाबतजंगास येऊन मिळतांच त्यांनीं मराठ्यांशीं सामना देण्याकरतां मोठी कडेकोट तयारी केली. मराठ्यांस तें वर्तमान कळतांच ते निजामाचे राज्यांत शिरले, व त्यांनीं तो प्रांत लुटण्यास प्रारंभ केला. सलाबतजंगानें आपसांतील बखेडे मिटवून टाकले, शहानवाझखान याच्याशीं सल्ला केला, व निजामअल्लीस फौजेचा सर्व अधिकार देऊन त्याला मराठ्यांचें पारिपत्य करण्याकरतां पाठवून दिलें. शहानवाझखान हा सैन्याबरोबर होता, परंतु त्याला एकादा मोठा अधिकार नव्हता. त्याला सामानसुमानाचें रक्षण करण्याकरतां पिछाडीस ठेविलें होतें. सलाबतजंगाचे हितचिंतकांनीं सैन्याचें सर्व आधिपत्य निजामअल्लीस देणें रास्त नाहीं व यापासून पुढें घोंटाळा माजेल असें त्यास सांगितलें. त्यावरून त्यानें निजामअल्लीकडून तो अधिकार काढून घेण्याचा विचार केला. प्रथमतः निजामअल्लीस मोठा राग येऊन त्यानें आपला अधिकार सोडून दिला. परंतु मागाहून त्यानें " आपलें जें कल्याण तेंच आमचें व आपली जी मानहानी तीच आमची" इत्यादि गुळचट वातांनीं सलाबतजंगास इतकें मोहून टाकलें कीं, निजामअल्लीविषयीं जो त्याचा प्रतिकूल ग्रह झाला होता तो त्याचे मनांतून नाहींसा झाला. इतकेंच नव्हे तर सैन्याचें

आधिपत्य त्यानें पुनः स्वीकारावें म्हणून सलाबतजंग ह्याची विनवणी करूं लागला, व त्याचा फारच आग्रह पडला तेव्हां त्यानें तें स्वीकारिलें. त्यानें निजामअल्लीस आपल्या बापाचा निजामउल्मुल्क असोफजा असा जो किताब होता तो दिला. या गोष्टी चालल्या असतां सलाबतजंगास अशी बातमी येऊन पोहोंचली कीं, रामचंद्र जाधव हा आपल्या फौजेसह मुख्य सैन्यास मिळण्याकरतां येत असतां वाटेंत मराठ्यांनीं त्याच्यावर हल्ला करून त्याचें सर्व सामान लुटलें व त्याला शिंदखेड येथें कोंडून ठेविलें आहे. त्या वेळीं निजामअल्लीनें सलाबतजंगासह सर्व फौज घेऊन शिंदखेड येथें जाण्याचा निश्चय केला. परंतु पूर्वी सलाबतजंगाचे हितचिंतकांस शहानवाझखान याचा जसा संशय आला होता तसा त्यांना या वेळीं निजामअल्लीचाही आला होता. त्यांनीं सलाबतजंगास 'आपण सैन्याबरोबर जाऊं नये' म्हणून विनंती केली. त्यावरून त्यानें एकट्या निजामअल्लीसच मराठ्यांवर पाठवून दिलें. निजामअल्ली शिंदखेड येथें आला. पण निजामाचें सैन्य तेथें येण्यापूर्वींच नानासाहेब व भाऊसाहेब फौजेसह विश्वासरावाचे कुमकेस येऊन पोहोंचले होते.

शिंदखेडची लढाई:— ही लढाई इ० स० १७५७ च्या आक्टोबर महिन्यांत झाली. उभयपक्षीं लढाईची सिद्धता झाल्यावर प्रथमतः दोहींकडून तोफांचा भडिमार सुरू झाला. परंतु मराठ्यांच्या तोफखान्याचा भडिमार सहन न होऊन मोंगलांची फौज पळूं लागली. शेवटीं निजामअल्लीनें मराठ्यांच्या तोफखान्यावर चाल केली. त्या वेळीं दत्ताजी शिंदे यानें मोठा विलक्षण पराक्रम केला, आणि मोंगलांचे फौजेची दाणादाण उडवून दिली. हा पराक्रम पाहून भाऊसाहेबांनीं दत्ताजीची पाठ थोपटून त्याचा बहुमान केला. तिकडे

निजामअल्ली यासही आपणास या मोहिमेंत यश येणार नाहीं असें वाटूं लागलें. तेव्हां 'झांकली मूठ सवा लाखाची' असें मनांत आणून त्यानें नानासाहेबांपाशीं तहाचें बोलणें सुरू केलें. पुढें साखरखेडली मुक्कामीं तह होऊन त्यांत १० लाखांची जहागीर व नगर प्रांत व परांडा हा किल्ला पेशव्यांस देण्याचें निजामानें कबूल केलें. नंतर नानासाहेब आपल्या फौजेसह निजामअल्ली याजबरोबर औरंगाबाद येथें आले.

बुसी औरंगाबाद येथें येतो:—नानासाहेब औरंगाबाद येथें आल्यावर कांहीं दिवसांनीं बुसी आपल्या फौजेसह तेथें आला. त्या वेळीं त्याच्याबरोबर दोनशें युरोपियन घोडेस्वार, पांचशें युरोपियन पायदळ, पांच हजार काळे लोक, २० तोफा इतका सरंजाम होता. बुसी अशा जय्यत तयारीनें आला होता ह्मणून सलाबतजंगाविरुद्ध पुढें जीं कारस्थानें चालवयाचीं होतीं तीं जागचे जागींच जिरलीं. शहानवाझखान आदीकरून जी मंडळी त्याच्याविरुद्ध होती ती पुनः त्याचा अधिकार मानूं लागली. फक्त निजामअल्लीची मात्र त्याचेविरुद्ध खटपट सुरू होती. झालेल्या एकंदर गोष्टींत निजामअल्लीपेक्षां सलाबतजंगच बरा असें शहानवाझखान यास वाटूं लागलें होतें; परंतु एकदा मनुष्याचे हातून अविचार झाला ह्मणजे त्याची सारासार विचारशक्ति इतकी मंद होते कीं, आपण जें काय करतों किंवा बोलतों त्याचा परिणाम पुढें काय होईल याचेंही त्यास भान रहात नाहीं, व शहानवाजखान याचीही पुढें तीच स्थिति झाली.

शहानवाजखान याचा अविचार व त्याचा शेवट:—बुसी औरंगाबाद येथें आल्यावर त्याच्या व सलाबतजंग, नानासाहेब, निजामअल्ली, बसालतजंग वगैरे मंडळीच्या भेटी झाल्या; परंतु निजामअल्लीविषयीं त्याचे मनांत पूर्वीपासून संशय असल्यामुळें त्याचे

भेटीचे वेळीं त्यानें विशेष बंदोबस्त ठेविला होता. पुढें शहानवाझखान हा त्यास भेटावयास गेला; परंतु त्याची त्यानें भेट न घेतां त्याला आपला दिवाण हैदरजंग याजकडे पाठवून दिलें. तसें करण्यांत बुसीचा दुटप्पी कावा होता. एक असें करण्यांत बुसीनें आपण भेट देण्याइतकी शहानवाझखान याची लायकी नाहीं असें दाखविलें, व दुसरा त्या वेळीं निजामाचे दरबारीं जीं गुप्त कारस्थानें चाललीं होतीं त्यांचें कारण काय, व त्यांचा पल्ला कोठपर्यंत पोहोंचला आहे त्याचा अंदाज हैदरजंग हा त्याच्याच धर्माचा, दर्जाचा व मोठा पाताळयंत्री असल्यामुळें त्याच्याकडून ताबडतोब काढून घेईल. हैदरजंगानें शहानवाझखान हा भेटण्यास आला तेव्हां बाह्योपचारी मानमरातबाची रेलचेल केली. तेव्हां खान मोठा खुष होऊन आपले पूर्वीचे सर्व बेत त्याच्याशीं ओकला. त्यानें त्यास असेंही सांगितलें कीं, " आपण ज्या कांहीं गोष्टी केल्या त्या सलाबतजंग हा खंबीर मनाचा पुरुष नसल्यामुळें केल्या. फ्रेंचांविषयीं माझे मनांत द्वेषभाव आहे ह्मणून केल्या असें मुळींच नाहीं. " शहानवाझखान हैदरजंग याचे भेटीस आला त्या वेळीं त्याच्या मित्रमंडळीनें त्याला हैदरजंग याचेबरोबर सावधगिरीनें बोलावयास सांगितलें होतें, व तोही स्वतः मोठा शहाणा होता. परंतु त्या वेळीं त्याची मति गुंग होऊन काय बोलावें व काय न बोलावें याचा विचार न राहून त्यानें आपलीं एकंदर कारस्थानें हैदरजंग यास सांगितलीं. नंतर हैदरजंग यानें शहानवाझखान त्याच्याशीं जें काय बोलला होता तें तिखटमीठ लावून बुसीस सांगितलें, व अशा रीतीनें त्याचा बुद्धिभ्रंश केला. अशा वेळीं शहानवाझखान यास पुनः सलाबजंगाचा दिवाण नेमणें यांतच बुसीचा विशेष शहाणपणा दिसून आला असता. कारण

शहानवाझखान हा सर्व निजामाचे राज्यांत वाखाणलेला पुरुष होता, लोकांचे मनांत त्याचेविषयीं आदरबुद्धि होती, व एकंदर देशस्थिति त्याला पूर्णपणें अवगत होती. त्यानें आपल्या शहाणपणानें निजामाचे राज्यास आळा घालून त्याची जमाबंदी वाढविली होती. फ्रेंचांची शक्ति किती व आपलें बळाबळ किती ह्या गोष्टी तो ओळखून होता. ज्या निजामअलीचे संबंधानें त्यानें खटपट केली होती तो किती नीच व उलट्या काळजाचा मनुष्य होता त्याचा त्याला अनुभव आला होता, व त्यामुळें पहिलें तेंच बरें असें त्यास वाटूं लागलें होतें. अशा वेळीं त्याला दिवाणगिरी मिळाली असती तर त्याच्यायोगानें निजामाचे राज्यांतील गोंधळ तेव्हांच नाहींसा झाला असता. परंतु ती गोष्ट बुसीच्या ध्यानांत आली नाहीं. हैदरजंग यानें त्याचें मन कलुषित केल्यामुळें बुसीनें त्याला दिवाणगिरी देण्याचें मिष दाखवून कैद करण्याचा विचार केला. हा सर्व व्यूह रचण्यांत हैदरजंग यास स्वतः निजामाचा दिवाण व्हावयाचें होतें. या पुढील नाटकांत मुख्य भूमिका हैदरजंग यानें घेतली.

नाटकाचा शेवट व शहानवाझखान याचा मृत्यु:—शहानवाझखान यानें पूर्वी सलाबतजंगाविरुद्ध जो व्यूह रचला होता, त्याचे सर्व मार्ग त्यानें मूर्खपणानें हैदरजंग यास कळविल्यामुळें तें सर्व कारस्थान उलट त्याच्याच गळ्यांत आलें. त्यानें बुसी याचे मनांत शहानवाझखान याचेविषयीं कुतर्क भरवून त्याच्या परवानगीनें दगाबाजीनें शहानवाझखान यास कैद करून दौलताबादचा किल्ला आपले ताब्यांत घेतला. त्याचप्रमाणें निजामअलीचे फौजेस आठ लाख रुपये चारून त्याचे सैन्यापैकीं बरेच लोक त्यानें वश करून घेतले. या वेळीं नानासाहेब औरंगाबादेपासून पश्चिमेस ५० मैलांवर

होते. त्यांना वरील वर्तमान कळतांच ते ताबडतोब औरंगाबाद येथें आले, व त्यांनीं दौलताबादचा किल्ला आपणास द्यावा ह्मणून बुसीपाशीं बोलणें लाविलें. परंतु बुसानें तें बोलणें मान्य केलें नाहीं. त्या वेळीं निजामअल्लीनें आपणास निजामाचे गादीवर बसवाल तर दौलताबादचा किल्ला व दुसरा पुष्कळ मुलूख देऊं असें नानासाहेबांपाशीं बोलणें लाविलें. परंतु निजामअल्ली हा हातीं धरण्याच्या लायकीचा मनुष्य नाहीं असें नानासाहेबांस वाटल्यावरून त्यांनीं त्यांचें बोलणें मान्य केलें नाहीं.

बसालतजंग या वेळीं सलाबतजंगाचा दिवाण होता. तो स्वभावतः दुष्ट किंवा खटपट्या नव्हता. परंतु त्याची बुद्धि स्थिर नसल्यामुळें त्याला नादीं लावणारा भला किंवा बुरा जसा मनुष्य भेटेल तसा तो वळत असे. हैदरजंग याचे मनांत त्याला काढून टाकून ती दिवाणगिरी आपण पटकवावी असें होतें. परंतु निजामअल्ली जोंपर्यंत खुला आहे तोंपर्यंत त्याला बसालतजंगाचे वाटेस जातां येईना. म्हणून प्रथमतः निजामअल्लीस कैद करण्याचा त्यानें विचार केला. आपला डाव साधण्याकरितां त्यानें निजामअल्लीपाशीं मी तुह्मांस हैदराबादची गादी मिळवून देतों असें बोलणें लाविलें व तो त्याचेकडे खलबत करण्याकरता जाऊं येऊं लागला. निजामअल्लीस कैद करून दौलताबादच्या किल्ल्यावर ठेवावें असें प्रथमतः त्यास वाटलें. परंतु आपण तसें केलें तर आपले सैन्यांतील बरेच लोक निजामअल्लीस अनुकूल आहेत, त्याचप्रमाणें तो किल्ला वऱ्हाड प्रांताला लागून असल्यामुळें तो तेथून पळून जाईल, अशी त्यास शंका आली. त्यावरून त्याला गोवळकोंड्याकडे अगदीं एका बाजूस नेऊन कैद करावें असा त्याचा विचार ठरला. परंतु निजामअल्ली हें त्याचें

कपट पूर्णपणें ओळखून होता. तथापि हैदरजंग यास त्यानें त्याचा पत्ताही लागूं दिला नाहीं. पुढें अमुक दिवशीं निघावयाचें असें ठरून हैदरजंग हा निजामअल्लीस भेटण्याकरतां त्याचे तंबूंत गेला. परंतु त्याला ठार मारण्याविषयींची तयारी निजामअल्लीचे लोकांनीं अगोदरच करून ठेविली होती, व तो तंबूंत शिरतांच निजामअल्लीचे लोकांनीं त्यास ठार मारून टाकलें. पुढें हें कृत्य निजामअल्लीनें शहानवाझखान याचे मसलतीवरून केलें असावें असा हैदरजंग याचे लोकांस संशय आल्यावरून त्यांनीं शहानवाझखान यास कैदी दाखल एका तंबूंत ठेवलें होतें, तेथें जाऊन त्याला व त्याच्या पुत्राला ठार मारलें. अशा रीतीनें ता० ११ मे इ० स० १७५८ या दिवशीं या शोकपर्यवसायी नाटकाचा शेवट झाला.

बुसीस निजामाचे दरबारांतून जावें लागतें:— हैदरजंग याचा खून झाला त्याच दिवशीं निजामअल्ली आपल्या फौजेसह बऱ्हाणपुराकडे निघून गेला. निजामअल्लीशीं लढाई चालविणें बुसी यास बरोबर न वाटल्यामुळें तो सलाबतजंग यास घेऊन औरंगाबाद येथून हैदराबाद येथें जाण्याकरतां निघाला. परंतु हिंदुस्तानांतील फ्रेंचांचा सुभेदार लाली यानें त्यास 'तुम्हीं सर्व फौजेसह एकदम निघून यावें' असा सक्तीचा हुकूम पाठविला होता. तो त्यास वाटेंतच मिळाला. त्यामुळें त्याला निजामाचे दरबारांतून सर्व फौजेसह एकदम निघून जावें लागलें (१८ जून १७५८). हिंदुस्तानांत फ्रेंचांच्या सत्तेचा जो ऱ्हास झाला त्याचा हा प्रारंभ होय. बुसी मोठा शहाणा दूरदर्शी व राजकारस्थानी पुरुष होता. त्यानें निजामाचे दरबारीं आपलें चांगलें वजन बसविलें होतें. बुसी नसता तर मराठ्यांनीं निजामास कधींच घशाखालीं सोडलें असतें. बुसी तसाच पुढें

आणखीं कांहीं दिवस निजामाचे दरबारीं असता तर त्यानें फ्रेंचांस पुष्कळ प्रांत व हक्क मिळवून दिले असते. लालीस बुसीचा उत्कर्ष सहन न होऊन त्यानें हें कृत्य केलें असावें. परंतु या अविचाराच्या कृत्याचे परिणाम पुढें फ्रेंचास भोगावे लागले, व त्यांच्या सत्तेचा हिंदुस्तानांतून बहुतेक लोप झाला. बुसी गेल्यामुळें सलाबतजंगाचे हातपाय गळून गेले, व तेव्हांपासून तो अगदीं निरुत्साह होऊन गेला.

नानासाहेब सुरत शहर घेण्याचे कामीं इंग्लिशांस अडथळा करतात—दौलताबादचा किल्ला हैदरजंग यानें घेतला त्या वेळीं नानासाहेब औरंगाबादेच्या पश्चिमेस पन्नास मैलांवर होते असें मागें सांगितलेंच आहे. ते त्या वेळीं तेथें काय काम करीत होते तें कळणें आवश्यक आहे. सुरत शहरांत व्यापार व इतर संबंधानें आपणास इतर राष्ट्रांप्रमाणें सवलती मिळाव्या अशाबद्दल मुंबईसरकारची फार दिवसांपासून खटपट सुरू होती, व त्या संबंधानें इंग्लिशांनीं पेशव्यांचे दरबारीं मोठ्या आग्रहपूर्वक पुष्कळ दिवस बोलणें लाविलें होतें. परंतु पेशव्यांकडून मदत मिळण्याचें चिन्ह दिसेना. तेव्हां तें काम स्वतः करावें असें त्यांनीं मनांत आणलें. त्या वेळीं इलिस नांवाचा साहेब सुरत येथें इंग्लिशांचा गुमस्ता होता. त्यानें तें काम कोणत्या रीतीनें पार पाडावयाचें त्याची तयारी केली. नानासाहेबांस त्या गोष्टीची बातमी लागतांच त्यांनीं कल्याणचा सुभेदार शंकराजी नारायण यास मुंबईस इंग्लिशांचा प्रेसिडेंट बोरचीर साहेब याच्याकडे पाठवून दिलें. त्यानें नानासाहेबांच्या हुकमाप्रमाणें 'सध्यां तुम्हीं सुरतेच्या संबंधानें घाई करूं नये, थोडकेंच दिवसांत आमची फौज सुरत येथें आपल्या मदतीस येईल' ह्मणून सांगितलें. परंतु तें बोलणें बोरचीर यास फारसें पटलें नाहीं. त्याचप्रमाणें पेशव्यांचे मदतीशिवाय

हें काम पार पाडावें असें त्याचे मनांत होतें, व तेवढयाकरितां त्यानें मुंबईस आरमाराची व फौजेची मोठी जय्यत तयारी चालविली होती. तेव्हां शंकराजी नारायण यानें ती सर्व हकीगत पेशव्यांस कळविली. नानासाहेब या वेळीं औरंगाबाद येथें निजामाचे दरबारीं चाललेल्या खेळखंडोबांत गुंतले होते. तथापि त्यांनीं बोरचीर याचा बेत सिद्धीस जाऊं द्यावयाचा नाहीं असा निश्चय केला; ते सुरत येथें येण्याकरितां फौजेसह औरंगाबाद येथून निघाले. त्यांनीं पुणें येथें इंग्लिशांचा जो हिंदु वकील होता त्यास असें कळविलें कीं, 'आमचा बेत नाशकावरून वसईस जाण्याचा आहे.' त्यावरून त्या वकिलानें बोरचीर यास असें कळविलें कीं, "मराठे मोठे कावेबाज आहेत, व ते संधी साधल्यास मुंबईवरही स्वारी करावयास चुकणार नाहींत तर सुरतेच्या शहास गुंतण्याच्या अगोदर तुह्मीं मुंबईचा उत्तम बंदोबस्त करावा." तेव्हां इंग्लिशांस भीति पडून त्यांनीं सुरतेस जाण्याचा बेत रहित केला, व सुरत येथें त्यांची जी फौज व आरमार होतें तें सर्व मुंबईच्या बंदोबस्ताकरतां परत बोलाविलें. अशा रीतीनें नानासाहेबांनीं सुरत शहर घेण्याचा इंग्लिशांचा बेत या वेळीं फिका पाडला.

भाग १३ वा.

दिल्ली येथील हकीगतः–इ० स० १७५४ पर्यंत या संबंधाचा इतिहास पूर्वी सांगण्यांत आलाच आहे. त्यापुढील हकीगत येणेंप्रमाणें:–इंतिज्म उद्दौला यास मीर शिहाबुद्दीन यानें काढून टाकून मराठ्यांचे साह्यानें बादशाहांची वजिरी पटकावल्यावर दिल्ली येथें त्याच्याविरुद्ध मोठें बंड झालें. परंतु मोठे सक्तीचे व कडक

उपाय योजून त्यानें तें मोडून टाकलें. नंतर बादशाहास दिल्ली येथें ठेवून तो बादशाहाचा पुत्र अली गोहर यास बरोबर घेऊन मुलतान व लाहोर हे प्रांत अबदालीनें घेतले होते, ते परत जिंकून घेऊन बादशाही अमलाखालीं आणावे अशा उद्देशानें तिकडे निघाला. तेव्हां मीर मनू नांवाचा सरदार त्या प्रांताचें काम पहात असे. इ० स० १७५१ त अबदालीनें हिंदुस्तानावर दुसरी स्वारी केली त्या वेळीं मीर मनू प्रथमतः त्याच्याशीं लढाईस उभा राहिला. परंतु अबदालीनें त्याचा पराभव करून ते प्रांत घेतले. परंतु तो परत गेला त्या वेळीं त्यानें मीर मनू यास आपले तर्फे त्या प्रांताचा सुभेदार नेमिलें होतें. मीर मनू पुढें मरण पावला तेव्हां अबदालीनें ती सुभेदारी त्याच्या मुलास दिली. परंतु तो अज्ञान असल्यामुळें त्या मुलाची आई त्या प्रांताचा अधिकार चालवूं लागली. तिच्या कारकीर्दींत त्या प्रांतांत फारच बखेडे माजले व शीक लोकांनीं आपलें डोकें वर उचललें. त्यामुळें तिकडे फारच गोंधळ माजला. पुढें मीर मनूचा पुत्रही मरण पावला. परंतु ती बाई आपला अधिकार सोडीना. तेव्हां तिच्या हाताखालच्या एका सरदारानें बंड करून तिला कैद केलें. पुढें त्या दोघांनीं तो तंटा आपसांत मिटविला, व तीं दोघेही त्या प्रांतांचा अधिकार पाहूं लागलीं. अशा गोंधळांत त्या प्रांतांचा ताबा आपणास अनायासें प्राप्त होईल असें मीर शिहाबुद्दीन यास वाटणें साहजीकच होतें. म्हणून तो तिकडे चाल करून गेला. त्यानें ते प्रांत आपले ताब्यांत आणण्याकरितां प्रसिद्ध राजद्रोही अदिनाबेग, ज्यानें मूळ अबदालीस हिंदुस्तानावर स्वारी करण्याची चट लावून दिली, त्यास हाताशीं धरलें. पूर्वी मीर मनू याची कन्या मीर शिहाबुद्दीन यास

देण्याचें ठरलें होतें. तेव्हां पंजाबांत गेल्यावर त्यानें अदिनाबेग याच्या मसलतीनें मीर मनू याच्या स्त्रीजवळ तिच्या मुलीबद्दल मागणी घातली. बादशाहाचे वजिरानें आपल्या मुलीस मागणी घातली असें पाहून ती बाई खुष होऊन तिनें ती कबूल केली. पुढें लग्न-सोहळा आटोपल्यावर मीर शिहाबुद्दीन यानें ते दोन्ही प्रांत आपले ताब्यांत घेतले, आदिनाबेग यास त्या प्रांतांचा सुभेदार नेमिलें, व आपली सासू व पत्नी यांस समागमें घेऊन तो दिल्लीस परत आला.

अबदालीची हिंदुस्तानावर तिसरी स्वारी:—वर सांगितल्या-प्रमाणें मीर शिहाबुद्दीन यानें लाहोर व मुलतान या प्रांतांवरील आ-पला अमल उठविला असें पाहून अबदालीस मोठा राग येऊन तो इ० स० १७५६ च्या दिजंबर महिन्याच्या सुमारास मोठी जंगी फौज बरोबर घेऊन हिंदुस्तानावर स्वारी करण्याकरतां काबूल येथून निघाला. अटकेच्या अलीकडे आल्यावर त्यानें लाहोर व मुलतान हे प्रांत ताबडतोब पुनः आपले अमलाखालीं आणिले. त्या वेळीं मीर शिहाबुद्दीन यानें वाढविलेला नजीबखान नांवाचा रोहिला सरदार दिल्ली येथें होता, व पेशव्यांचा सरदार अंताजी माणकेश्वर हा वकील या नात्यान पांच हजार फौजेनिशीं दरबारीं होता. एवढ्याशा फौजेनें अबदालीच्या अवाढव्य फौजेस तोंड देणें अगदींच अशक्य होतें. तसेंच नजीबखान आंतून अबदालीस सामील झालाच होता. परंतु वरकांती त्यानें आपला आश्रयदाता मीर शिहाबुद्दीन यास अशी मसलत दिली कीं, तुम्हीं मला अब-दालीकडे पाठवाल तर मी त्याच्याशीं सल्ला करून त्याला वाटेंतूनच परत लावतों. मीर शिहाबुद्दीन यास त्याचें कपट माहीत नसल्यामुळें त्यानें त्यास अबदालीकडे जाण्यास परवानगी

दिली. परंतु तो कृतघ्न मनुष्य अबदालीकडे गेला, तो परत येण्याकरितां गेला नव्हता. तो आपले तीन हजार लोकांसह अबदालीस जाऊन मिळाला. वजिरास हें वर्तमान समजलें तेव्हां तो घाबरून गेला व 'शहरचा बंदोबस्त तुह्मी करा, व किल्ल्याचा बंदोबस्त मी करतों,' असें अंताजी माणकेश्वर यास सांगूं लागला. परंतु अंताजीपाशीं फौज फारच थोडी असल्यामुळें त्याच्यानें तें बोलणें कबूल करवेना. तो दिल्ली सोडून वल्लभगडाकडे निघून गेला. अबदाली एकदम दिल्लीवर चाल करून आला व प्रथमच्या सलामींत त्यानें शहरांतील दहा हजार लोक ठार मारले. वजीर अबदालीस शरण आला. नजीबखान यानें त्यास ठार मारावें अशी अबदालीस मसलत दिली. परंतु अबदालीनें तसें न करतां त्याला त्याच्या अपराधांची क्षमा केली, व लूट मिळविण्याचे कामीं त्यानें त्याचा चांगला उपयोग करून घेतला. अबदाली दिल्ली येथें असतां एके दिवशीं शहरांतील लोकांनीं उचल केली व त्याचे बरेच लोक ठार मारले. त्या वेळीं त्याला मोठा राग येऊन त्यानें शहरांतील लोकांची कत्तल करावी असा आपले फौजेस हुकूम केला. त्या वेळीं जो अनर्थ गुदरला त्याचें वर्णन करणें अशक्य आहे. त्या रानटी व क्रूर लोकांनीं पुरुष, स्त्रिया, पोरेंबाळें, गुरेंढोरें, गाढव, कुत्रें, जें हातीं सांपडलें त्याचा सप्पा उडविला. अशा रीतीनें सुमारें दोन तासांत त्यांनीं अठरा हजार माणसांची कत्तल केली, व सर्व दिल्ली शहर लुटून फस्त केलें. त्यानें सुमारें तीस कोटींची लूट मिळवून ती स्वदेशीं आपल्या मुलाबरोबर पाठवून दिली. नंतर तो आपल्या फौजेसह दिल्ली येथून निघाला. वाटेंत त्याची व अंताजी माणकेश्वर याची लढाई झाली. अंताजीजवळ त्या वेळीं फक्त पांच हजार फौज होती.

तथापि न डगमगतां त्यानें अबदालीस चांगलाच हात दाखविला. परंतु त्याची फौज फारच थोडी असल्यामुळें शेवटीं त्याचा पराभव झाला. मराठ्यांचे निवडक अडीच हजार लोक ठार झाले व अंताजीचा पुत्रही लढाईत मरण पावला. नंतर अंताजी राहिलेल्या फौजेसह दादासाहेबांस[1] येऊन मिळाला. नंतर अबदाली वल्लभगडावरून मथुरेस आला. तेथें सुमारे पांच हजार जाट लोक त्याला आडवे झाले. परंतु त्यानें त्यांचा पराभव करून त्याचे लोक शहरांत घुसले. अबदालीची फौज दीड प्रहरपर्यंत त्या शहराची कत्तल करीत होती, व तें शहर लुटीत होती. सुमारें पंचवीस लाखांची लूट मिळवून अबदाली गोकुळवृंदावन येथें गेला, व सुमारें दोन हजार गोसावी त्यानें ठार मारले. नंतर तेथून निघून तो आग्र्यास आला. तेव्हां शहरांतील लोकांनीं प्रथमतः पांच लाख रुपये देण्याचें कबूल केलें. परंतु मुदतीप्रमाणें रकमेचा वायदा टळतांच अबदालीनें त्या शहरावर हल्ला करून तें लुटलें व हजारों लोकांची कत्तल केली. वजीर मीर शिहाबुद्दीन यास अबदालीनें आपणाबरोबर घेतलें होतें. अबदालीनें आग्र्याच्या किल्ल्यावर हल्ला करून तो किल्ला सर केला. पुढें तो

---

१ दादासाहेब या वेळीं कोठें होते व काय करीत होते त्याचा इतिहास पुढें येईल

२. यासंबंधानें भाऊसाहेब यांचे बखरींत असा मजकूर दिला आहे कीं, अबदालीनें मीर शिहाबुद्दीन यास कैद करून बरोबर घेतलें होतें. अबदालीचा मुक्काम गोघाट म्हणून गोकुळाचे पलीकडे स्थळ आहे तेथें असतां, मीर शिहाबुद्दीन यानें पहारेकऱ्यांची नजर चुकवून गंगेंत उडी टाकली, व तो पोहत पोहत आग्र्याच्या किल्ल्याच्या पायथ्याशीं आला. तेव्हां आग्र्याच्या किल्लेदारानें त्याला किल्ल्यांत घेतलें. पुढें अबदाली आग्रा येथें आला; त्या वेळीं

पुढें चालू.

माळव्यांत येऊन बंगाल्यावर व दक्षिणेवर स्वारी करणार अशी अफवा उठली होती. परंतु तसें कांहीं एक न होतां तो तेथून परत फिरला. अबदाली परत फिरण्याचीं दोन तीन कारणें आढळतात. कांहीं इतिहासकार त्याच्या सैन्यांत भयंकर रोगाची साथ उत्पन्न झाल्यामुळें तो परत फिरला असें ह्मणतात, व कांहीं ठिकाणीं तिकडचा उन्हाळा त्याचे फौजेस सहन होईना, त्याचप्रमाणें राघोबादादा बरोबर जंगी फौज घेऊन आपणावर चाल करून येत आहे, अशीही बातमी त्यास लागली होती, त्यावरून तो परत फिरला, असें आढळतें. सारांश कोणतेंही कारण असो; पण तो परत फिरला इतकी गोष्ट खरी आहे. तो परत येत असतां सुरजमल जाट यास धाकदपटशा दाखवून त्याच्यापासून त्यानें दहा लाख रुपये घेतले, व तो दिल्लीस आला. तेथें आल्यावर नजीबखान यास त्यानें अमीर उल् उमराव असा किताब देऊन त्याला 'मीर बक्षी' किंवा सेनापति नेमिलें. नंतर तो पंजाबांत आला व आपला पुत्र तैमूरशाहा यास जिंकलेल्या प्रांताचा सुभेदार नेमून तो इ० स० १७५७ च्या एप्रिल महिन्यांत काबुलास गेला.

मागील पृष्ठावरून पुढें चालू.

त्या किल्लेदारानें अबदालीला तेथून धुडकावून दिलें. वर जो मजकूर दिला आहे, तो मराठ्यांचे इतिहासाचीं साधनें खंड १ यांतील ६३ व्या पत्राच्या आधारानें दिलेला आहे; व तोच जास्त विश्वसनीय आहे. भाऊसाहेबांचे बखरींत बऱ्याच गोष्टींचा विपर्यास केलेला आढळतो.

१ डफच्या इतिहासांत इ० स० १७५५ च्या अखेर अबदाली हिंदुस्तानांत आला, व इ० स० १७५६ च्या प्रारंभीं परत गेला असें लिहिलें आहे. परंतु या संबंधानें दुसरा पुरावा कांहींच मिळत नाहीं. कीन साहेब अबदालीनें

पुढें चालू.

दादासाहेबांच्या हिंदुस्तानांतील स्वारीची हकीगतः— सावनूरची मोहीम आटोपल्यावर इ० स० १७५६ च्या सपटंबर महिन्यापर्यंत दादासाहेब पुण्यास होते. नंतर सदाशिव रामचंद्र यास बरोबर घेऊन त्यांनीं गुजराथेवर स्वारी केली. तेथील बंदोबस्त करून व सदाशिव रामचंद्र यास त्या प्रांतीं ठेवून ते माळव्यांत आले. त्या वेळीं विंचूरकर वगैरे सरदार त्यांच्याबरोबर होते. ते ता० १४ फेब्रुवारी इ० स० १७५७ रोजीं इंदूर येथें आले. तेथें मल्हारराव होळकराचा व त्यांचा मिलाफ होऊन ते पुढें चालले. अबदाली आल्याची बातमी त्यांना अगोदर समजली होती व त्याचा बंदोबस्त करण्याकरतां ते फौज गोळा करीत करीत उत्तरेकडे चालले होते. ते इंदूर येथें आले त्याचेपूर्वींच अबदाली दिल्ली येथें येऊन पोहोंचला होता. त्यांच्याजवळ त्या वेळीं सुमारें सहा हजार फौज होती, व हिंदुस्तानांत अंताजी माणकेश्वर, समशेर बहादर, व नारो शंकर यांचेपाशीं सुमारें दहा हजार फौज होती. परंतु अबदालीशीं टक्कर देण्यास तेवढी फौज ह्मणजे अगदींच कमी होती. तेव्हां ज्यास्त फौज जमा करीत ते जयनगरचे रोखानें निघाले, व दत्ताजी शिंदे, मुधोजी व जानोजी भोसले, गोविंदपत बुंदेले यांस ताबडतोब पाठवून देण्या-

---

मागील पृष्ठावरून पुढें चालू.

ता० ११ सपटंबर इ० स० १७५७ रोजीं दिल्ली शहर लुटलें असें आपले ग्रंथांत ह्मणतात. परंतु त्यालाही कोठें आधार मिळत नाहीं. मराठ्यांचे इतिहासाचीं साधनें खंड १ या ग्रंथांत प्रसिद्ध केलेल्या ५२।५३।५४।६३।६७ इत्यादि पत्रांवरून वरील विधानाची असत्यता दिसून येते. त्या पत्रांवरून आम्ही लिहिल्याप्रमाणें अबदाली इ० स० १७५६ च्या अखेर हिंदुस्तानांत येऊन इ० स० १७५७ च्या एप्रिल-मेच्या सुमारास परत गेला असें ठरतें.

विषयीं त्यांनीं पुण्यास पत्रें लिहिलीं. बिजेसिंग मारवाडकर, माधवसिंग जयनगरकर वगैरे मराठ्यांचे विरुद्ध असलेल्या रजपूत राजांनीं अबदालीकडे वकील पाठवून त्याच्याशीं राजकारण सुरू केलें होतें. अबदाली कदाचित् पावसाळ्यांत हिंदुस्तानांत छावणी करून राहिला तर त्याचा समाचार घ्यावा ह्या उद्देशानें पेशव्यांस अनुकूल अशा लहानलहान रजपूत राजांच्या फौजा गोळा करीत दादासाहेब चालले होते. ते छोटे छोटे मुक्काम करीत व फौजा गोळा करीत उदेपुराजवळ ज्यावह म्हणून शहर आहे तेथपर्यंत येऊन पोहोंचले व तेथील संस्थानिकापासून एक लाख रुपये खंडणी घेतली. नारो शंकर व समशेरबहादर हे आपापल्या फौजेसह झांशी येथें होते. अबदालीस दक्षिणेंत येऊं देऊं नये ह्मणून तोंडावर दादासाहेब होतेच. शिवाय दक्षिणेंत नानासाहेब व निजाम हे त्याच्या प्रतीकाराची तयारी करून बसलेच होते. परंतु पेशव्यांचा हा सर्व व्यूह फसला. अबदाली दक्षिणेंत न येतां आग्रा येथून एकदम परत फिरला, व घाईघाईनें इ० स० १७५७ च्या एप्रिल अखेर काबुलांत निघून गेला. अबदालीच्या शहांतून मोकळे झाल्यामुळें दादासाहेबांना बिजेसिंग, माधवसिंग वगैरे शत्रूंचा समाचार घेण्यास अनायासें संधि प्राप्त झाली. ते इ० स० १७५७ च्या जून महिन्यांत जयनगर येथें जाऊन पोहोंचले. त्या वेळीं जोधपूरचा राजा बिजेसिंग यास भीति पडून त्यानें आपला वकील दादासाहेबांकडे पाठवून दिला व त्याच्यामार्फत शिंद्यांचा व आपला सलोखा करून द्यावा असें त्यानें त्यांच्याशीं बोलणें सुरू केलें. शिंद्यांनीं रामसिंगाचा पक्ष सोडला तर लाहोर, मुलतान, दिल्ली, आग्रा, प्रयाग, वगैरे ज्या ठिकाणीं मराठे स्वाऱ्या करितील तिकडे तिकडे मदतीस येण्याचें

बिजेसिंगानें कबूल केलें. परंतु दत्ताजी देशीं असल्यामुळें त्याचे सल्लयाशिवाय ही गोष्ट आह्मांस करतां येत नाहीं, असें त्यांनीं त्या वकिलास सांगितलें. या वेळीं मल्हारराव होळकर यानें 'बिजेसिंगाचे ह्मणण्यास रुकार द्यावा, पुढें दत्ताजी बिजेसिंगाविरुद्ध गेला तर आपण बिजेसिंगास मदत करून दत्ताजीचें पारिपत्य करूं, ' अशी भयंकर मसलत दादासाहेबांस दिली. होळकराचे मनांत शिंद्यांविषयीं किती द्वेषबुद्धि होती हें या गोष्टीवरून सहज दिसून येतें. परंतु दादासाहेबांनीं मल्हाररावाचा निषेध केला. अबदाली निघून गेल्यावर राजपुतान्यांतील बारीक बारीक भानगडी आटोपून दिल्ली व लाहोर हे सुभे जप्त करावे, ह्मणजे पैशापरी पैशाची प्राप्ती होऊन अबदालीचा पाठलाग केला असेंही होईल, असा दादासाहेबांचा हेतु होता. परंतु मल्हारराव जेथें तेथें दादासाहेबांस अडवूं लागला व नसतींच कुलंगडीं काढून तीन महिनेपर्यंत त्यानें त्यांचा हेतु सिद्धीस जाऊं दिला नाहीं. पुढें मल्हाररावाचा त्रास येऊन दादासाहेबांनीं माधवसिंग जयनगरकर याच्याशीं मल्हाररावास न विचारतां तह केला व ते आपल्या फौजेसह जुलै महिन्यांत दिल्लीस आले. त्यामुळें नाइलाज होऊन मल्हाररावालाही दादासाहेबांबरोबर दिल्लीस यावें लागलें. त्या वेळीं अंतरवेदींतील मराठ्यांचा अंमल उठला होता. तेव्हां दादांनीं सखारामबापू, अंताजी माणकेश्वर व विठ्ठल शिवदेव यांस त्या प्रांतांत पाठवून आपला अंमल पुनः बसविला. दादासाहेब दत्ताजी शिंदे यास पाठवून देण्याविषयीं वारंवार पुण्यास लिहीत असत, त्यांत त्यांचा मुख्य हेतु असा होता कीं, मल्हारराव दादासाहेबांस खोटेनाटे हिशेब दाखवून लुबाडीत असे, ती लबाडी दत्ताजी आला तर अनायासें बंद होईल; त्याचप्रमाणें अबदाली परत आला तर त्याचें पारिपत्य क-

रण्यास त्याची फार मदत होईल व अबदाली न आला तर काशी, बंगाला वगैरे प्रांतांवर त्याला बरोबर घेऊन स्वारी केली तर मुबलक पैसा मिळेल. परंतु वरील गोष्टींपैकीं एकही गोष्ट साध्य झाली नाहीं. दत्ताजी निजामाबरोबर चाललेल्या लढाईत गुंतल्यामुळें नानासाहेबांना त्याला दादासाहेबांकडे पाठवितां आलें नाहीं.

दिल्ली येथील घोटाळा:—अबदाली हिंदुस्तानांतून परत गेला त्या वेळीं नजीबखान रोहिला यास अमीर उल् उमराव असा किताब देऊन मीर बक्षी केलें होतें हें मागें सांगितलेंच आहे. नजीबखान मूळ आपला हस्तक असून तो आतां आपल्यापेक्षांही वरचढ होणार असें वजीर शिहाबुद्दीन यास वाटून तो त्याचा द्वेष करूं लागला व अबदाली गेल्यावर त्यानें त्याचा अधिकार काढून घेऊन तो स्वतःच्या जोरावर अहंमदखान बंगष नांवाच्या सरदारास दिला. परंतु दिल्ली शहर नजीबखानाचे ताब्यांत असून बादशाहाही त्याला सामील होता. तेव्हां दिल्ली शहर हस्तगत करून नजीबखानास हतवीर्य करण्याचा मीर शिहाबुद्दीन यानें विचार केला, व दादासाहेबांपाशीं मदत मागितली. तेव्हां दादासाहेब आपल्या फौजेसह दिल्लीस आले. मराठ्यांनीं दिल्लीस मोर्चे लाविले. नजीबखानानें सुमारें पंधरा दिवस टिकाव धरला. परंतु पुढें निभाव लागत नाहीं असें पाहून त्यानें मल्हाररावाशीं अंतस्थ कारस्थान सुरू केलें. त्यानें "मी तुमचा धर्मपुत्र आहें; माझा बचाव करावा. शरण आला त्याला मरण चिंतू नये हें समर्थास उचित होय," असा मल्हाररावास निरोप पाठविला. तेव्हां मल्हाररावानें त्यास अभय देऊन तो दादासाहेबांकडे त्याचे संबधानें रदबदली करूं लागला. दादासाहेबांचे मनांत नजीबखानास ठार मारावें असें होतें.

परंतु मल्हाररावानें त्याचा पक्ष घेतल्यामुळें त्यांना त्याच्या उलट जातां येईना. त्याचप्रमाणें आपण विरुद्ध गेलों तर तो भलतेंच लचांड उपस्थित करील अशीही त्यांना भीती पडली. त्यामुळें त्यांनीं मल्हाररावाचे बोलण्यास रुकार दिला, व नजीबखान मल्हाररावाचे गोटांत येऊन राहिला. दादांनीं नजीबखानास दिल्लींतून घालवून दिलें. परंतु मल्हाररावाचे मध्यस्थीमुळें त्याचा मुलूख त्याचेकडे ठेविला. नंतर दादांनीं अलमगीर यास पुनः गादीवर बसविलें; मीर शिहाबुद्दीन यास त्याचा वजीर नेमिलें व ते आपल्या फौजेसह कुरुक्षेत्रीं आले.

दादासाहेबांची पंजाबावर स्वारी किंवा मराठ्यांच्या वैभवाची अखेरः—अबदाली हिंदुस्तानांतून परत गेला त्या वेळीं त्यानें आपला पुत्र तैमूरशाहा यास पंजाबचा सुभेदार नेमिलें होतें. त्याचा दिवाण जहानखान यानें पंजाबचा माजी सुभेदार अदिनाबेगखान यास त्या प्रांताची उत्तम माहिती असल्यामुळें त्याला आपणाकडे ओढून त्याच्या सल्ल्यानें तो एकंदर प्रांताचा अधिकार पाहूं लागला. पुढें त्यानें अदिनाबेगखान यास लाहोर येथें भेटण्यास बोलाविलें. परंतु त्याला संशय आल्यावरून तो भेटीस गेला नाहीं. त्यावरून जहानखान यानें त्यास बंडखोर ठरवून त्याच्या पारिपत्याचे उपाय योजले. तेव्हां त्यानें शीख लोकांस हाताशीं धरून जहानखान याच्या फौजेचा पराभव केला. त्याचवेळीं त्यानें दादासाहेब दिल्ली येथें होते, त्यांना आपल्या मदतीस बोलाविलें. दादासाहेब बरोबर फौज घेऊन लाहोर येथें जाण्याकरितां निघाले. वाटेंत सरहिंद येथें त्यांनीं दुराणी सरदार सयदखान कत्तलबाज याचा पराभव करून त्याचें सर्व सामानसुमान लुटून

फस्त केलें. दादासाहेब पुढें निघाले, परंतु ते लाहोरास येण्यापूर्वींच तैमूरशाहा कंदाहार येथें पळून गेला. विजयश्री-विराजित दादासाहेब लाहोरांत शिरले व त्यांनीं आपल्या दक्षिणी घोड्यांस अटकेंचें पाणी पाजलें. त्यांनीं आदिनाबेगखान याच्याशीं सालीना ७९ लाख रुपये खंडणी घेण्याचा करार करून त्यास त्या प्रांताचा सुभेदार नेमिलें, व त्याच्या मदतीस साबाजी शिंदे नांवाच्या सरदारास ठेवून ते दक्षिणेंत येण्याकरितां निघाले. मराठयांचे वैभवाचा येथें कळस झाला. यापुढें त्यांच्या अपकर्षास प्रारंभ झाला.

जनकोजी शिंदे याची उत्तर-हिंदुस्तानांत रवानगीः— शिंदखेडची लढाई आटोपल्यावर नानासाहेबांनीं जनकोजी शिंदे यास उत्तर-हिंदुस्तानच्या मोहिमेवर पाठवून दिलें; व दत्ताजी चांभारगोंदे येथें गेला. जनकोजी नर्मदा उतरून उज्जनी येथें आला. नंतर बुंदीवाडा संस्थानांत हरगड येथें गुमानसिंग नांवाचा एक लुटारू सरदार रहात असे व तो माळवा प्रांतास फार उपद्रव देत असे, त्याचा बंदोबस्त करून व वाटेनें खेंचीवाडा, राजगड, पाटण, बुंदीकोटा येथील खंडण्या वसूल करीत करीत तो जयनगर येथें येऊन पोहोंचला. तेथचा राजा माधवसिंग यानें प्रथमतः थोडीशी गडबड केली. परंतु जनकोजीपुढें आपला निभाव लागत नाहीं असें पाहून त्यानें वीस लाख रुपये खंडणी दिली. नंतर जनकोजी मारवाडांत गेला. तेव्हां उदेपुरच्या राण्याचा संस्थानिक शिवसिंग शिसोदे हा त्या राण्यास जुमानीनासा झाला होता. राण्यानें त्याचें पारिपत्य करण्याकरतां जनकोजीस बोलाविलें. बरसात सुरू झाल्यामुळें जनकोजीनें चार महिने तेथेंच घालविले, व शिवासिंगाचा मोड करून त्यास राण्याचे ताब्यांत दिलें, व उभयतांचा सलोखा करून दिला. या कामगिरीबद्दल राण्यानें जनकोजीस वीस लाख रुपये दिले.

पुढें दादासाहेब लाहोरच्या स्वारीहून जुलै--आगस्ट इ० स० १७९८ च्या सुमारास दक्षिणेंत परत येत असतां वाटेंत त्यांची व जनकोजीची भेट झाली. त्या वेळीं " जरी नजीबखान रोहिला यास मल्हारराव होळकरानें आपला पुत्र असें मानिलें आहे तरी तो महा-नीच कपटी आहे तरी त्याला ठार मारून टाकावें, " असें दादांनीं मोठ्या कळकळीनें त्यास सांगितलें व ते दक्षिणेंत निघून आले. मागाहून मल्हारराव होळकर येत होता तो स्वतः जनकोजीस भेटण्याकरितां त्याचे डेऱ्यांत गेला व त्यानें त्यास असा उपदेश केला कीं, " बाबा, तुमचा मूलस्वभाव अटकपासून रामेश्वरा-पर्यंत एकछत्री राज्य झालें. हिंदुस्तानांत एक नजीबखान मात्र खळी राहिला आहे; त्याचें पारिपत्य केलिया पेशवे अटेकपासून जा-सुदा हातीं पैसा आणवितील; मग तुम्ही आह्मी सहजच निर्माल्यवत झालों; मग कोणीं पुसणार नाहीं. यास्तव एवढा खळी रक्षून जें करणें तें करावें. तुह्मी नजिबास हातीं धरून भागीरथीस पूल बांधावा व अयोध्या प्रांत घ्यावा. "

मागाहून दत्ताजी शिंदे हिंदुस्तानांत जाण्याकरितां निघाला होता त्याची व दादासाहेब आणि मल्हारराव यांची अनुक्रमें वाटेंत गांठ पडली, व त्यांनीं अनुक्रमें पूर्वी जनकोजीस जसा उपदेश केला होता त्याप्रमाणें दत्ताजीसही उपदेश केला. होळकराचा आत्मघातकी उप-देश जनकोजीचे मनांत फारसा ठसला नाहीं. परंतु दत्ताजीचे मनांत तो बराच बिंबला. मारवाडचा बंदोबस्त करून जनकोजी रेवाडीवर गेला तेथें त्याची व दत्ताजीची गांठ पडली व तेथून कूच करून ते दोघे दिल्लीस गेले. ते यमुनेच्या कांठीं तळ देऊन बसले. तेथें वजीर गाजीउद्दीन व शिंदे यांच्या भेटी झाल्या. वजिरानें ' नजीब-

खानाचें पारिपत्य करावें, मीही मदतीस येतों' असें सांगितलें. दत्ताजीला तसें करणें नव्हतें म्हणून त्यानें कांहीं तरी कुरापत काढून वजिरापाशीं अकबर बादशाहाच्या वेळच्या अटक, फत्तेलष्कर व किल्लेकुशाद अशा तीन तोफा दिल्लीस होत्या त्या मागितल्या. त्या देण्याचें वजिरानें नाकबूल केलें, तेव्हां दत्ताजीची व वजिराची एक लहानशी चकमक झडली. दत्ताजी दिल्लींत शिरला व त्यानें दोन तोफा काढून घेतल्या. या गर्दीत दिल्लींतील जयसिंगपुऱ्याचा फार नाश झाला. पुढें ते चुलतेपुतणे दिल्लीहून निघून पानपतावरून कुरुक्षेत्रांत गेले, व तेथून सतलजनदीपर्यंत गेले. पूर्वी दादासाहेब लाहोराहून परत आले त्या वेळीं त्यांनीं अदिनाबेगखान यास पंजाबचा सुभेदार नेमिलें होतें. पुढें अदिनाबेग मरण पावला, व त्याचेमागून थोडेच दिवसांत त्याचा पुत्रही मरण पावला. त्यामुळें पंजाबांत थोडासा घोटाळा झाला होता. तेव्हां नानासाहेबांनीं दत्ताजीस पंजाबचा बंदोबस्त करण्यास सांगितलें होतें. दत्ताजी पंजाबांत गेल्यावर त्यानें अदिनाबेग याचा दिवाण लक्ष्मी नारायण व पेशव्यांचे सरदार साबाजी शिंदे व त्रिंबक बापूजी यांचे हाताखालीं पंधरा हजार फौज ठेवून त्यांस लाहोर, मुलतान वगैरे प्रांतांचा बंदोबस्त सांगितला. अशा रीतीनें पंजाबचा साधारण बंदोबस्त करून दत्ताजी जनकोजीसह परत फिरला, व त्यानें कुंजपुऱ्याजवळ आपला तळ दिला.

उत्तर-हिंदुस्तान जिंकण्याचे संबंधानें नानासाहेबांचें धोरणः— या वेळीं पेशवे व शिंदे यांच्यांत जो पत्रव्यवहार झाला त्यावरून बंगालपर्यंतचा तिकडील सर्व मुलूख जिंकून तो मराठी अमलाखालीं आणण्याची केवढी अवाढव्य कल्पना पेशव्यांचे मनांत

चोळत होती याचें उत्तम दिग्दर्शन होतें. ता. २७ दिजंबर इ० स० १७५८ रोजीं नानासाहेबांनीं आकोळनेरचा इनामदार रामाजी अनंत दत्ताजीबरोबर स्वारींत होता, त्यास पत्र लिहिलें त्याचा सारांश असा आहे कीं, "गाजीउद्दीन यास दादांनीं हातीं धरलें आहे, करितां त्याला हातीं धरून नजीबखानाचें पारिपत्य करावें. लाहोरचा सुभा अदिनाबेग मरण पावला याकरतां दत्ताजीनें तिकडे जाऊन त्या प्रांताचा पुरा बंदोबस्त करावा. लाहोरचा पक्का बंदोबस्त झाल्यावर मग बंगाल प्रांताकडे लक्ष द्यावें. वजीर सुजाउद्दौला यासारखा मातबर मदतीस घेऊन मोठ्या फौजेनिशीं बंगाल्यावर स्वारी करून पुष्कळ पैसा मिळवावा. वजिरापासून काशी, प्रयाग, वगैरे क्षेत्रें नजर ह्मणून घ्यावीं." ता० २४ फेब्रुवारी इ० स० १७५९ च्या पत्रांत पेशवे रामाजी अनंत यास लिहितात कीं, "लाहोरचा बंदोबस्त उत्तम करावा, दत्ताजी व जनकोजी यांनीं पाटणा प्रांत घ्यावा व तेथें छावणी करून रहावें. पावसाळा संपल्यावर दादासाहेब तिकडे येतील. मग सर्वांनीं मिळून बंगाल्यावर स्वारी करून मातबर पैसा मिळवावा. सुजापासून काशी, प्रयाग वगैरे क्षेत्रें घ्यावीं इ०". ता० २१ मार्च इ० स० १७५९ च्या पत्रांत पेशवे प्रत्यक्ष दत्ताजीस लिहितात कीं, "आपणास बादशाहाची वजिरी दिल्यास ५० लक्ष रुपये देतों ह्मणून सुजा ह्मणत आहे. गाजीउद्दीन यास आपण वजीर केलें आहे, परंतु त्याचेकडून पूर्वील करारांत अंतर पडत असेल तर त्याची भीड धरण्यांत मतलब नाहीं. सुजा एक वर्षांत ५० लक्ष रुपये, काशी व प्रयाग वगैरे क्षेत्रें देत असेल तर त्यास वजिरी द्यावी. त्याच्या कृत्यांत लबाडी दिसून आल्यास त्यास वजिरी देऊं नये. कारण तो मोठा फौजबंद असून त्याचा व जाटांचा स्नेह आहे, व ते दोघे

एक झाले तर पुढें आपल्या डोईजड होतील. दिल्लीचा बादशाहा निवळ नामधारी आहे व त्याच्या वजिरींत आतां कांहीं अर्थ राहिला नाहीं. असें असतां सुजाउद्दौला ती मागत आहे त्या अर्थी ह्यांत कांहीं कपट आहे किंवा काय याचा बारकाईनें तपास करावा. नजीबखानास बक्षिगिरी दिल्यास तो ३० लाख रुपये देत आहे; परंतु तो पुरा हरामखोर लुच्चा आहे. तो दिल्लीस आला तर अबदालीचें ठाणें दिल्लीस बसलेंच असें समजावें. त्यास वाढविणें ह्मणजे सर्पास दूध पाजण्याप्रमाणें आहे. याकरतां त्याचें पारिपत्य करावें. प्रथमतः ग़ाजीउद्दीनखान यास हाताशीं धरून तो व तुह्मी मिळून अंतरवेदींतून बंगाल्यावर चाल करावी. इकडून चिरंजीव दादाही बुंदेलखंडांतून प्रयागावर पाठवून देतों. असें झालें ह्मणजे सुजाउद्दौलाही घाबरून जाऊन त्यालाही आपल्यास भारी नजर द्यावी लागेल. गाजीउद्दिन स्वारीस बाहेर पडेल तर सुजाउद्दौल्यापाशीं सख्य करून त्याजपासून काशी, प्रयाग, हीं क्षेत्रें घ्यावीं व त्यास, बंगाल्यांत जी किफायत होईल तिचा निमे भाग देऊं करून तो व तुह्मी मिळून बंगाल्यावर स्वारी करावी. तुह्मी तूर्त लाहोर प्रांतीं आहां, तर तिकडेही तुम्हांस फार कामें आहेत; त्यामुळें तिकडे तुम्हांस उशीर लागेल, तेव्हां हें काम पुढील वर्षावर जाईल असें वाटतें. तथापि थोडकेच दिवसांत लाहोरचा बंदोबस्त उत्तम रीतीनें झाला तर छावणी दिल्ली येथें येऊन करावी, व पुढील उद्योगास लागावें." ह्या वेळीं शिंदे सतलज नदीवर होते. हें पत्र ता० २२ एप्रील इ० स० १७५९. रोजीं त्यांस मिळालें. पुढें मे ता० ४ इ० स० १७५९ रोजीं पाठविलेल्या पत्राचा सारांश वरील तीन पत्रांप्रमाणेंच आहे. विशेष मजकूर इतकाच आहे कीं, " लाहोरचा बंदोबस्त

उत्तम प्रकारें करावा; अदिनाबेग याप्रमाणेंच कोणी इमानी मातबर सरदार तिकडे ठेवून वसुलाचा पैसा हुजुरास येईल असें करावें, व इतक्या गोष्टी झाल्या ह्मणजे मग दिल्लीस यावें; नजीबखान पाजी मनुष्य आहे. त्यास हाताशीं धरूं नये." परंतु वरील गोष्टींपैकीं एकही गोष्ट व्यवस्थित रीतीनें दत्ताजीनें केली नाहीं. वरील पत्रें नानासाहेबांच्या मुत्सद्दीपणाची पूर्ण साक्ष पटवीत आहेत. तसेंच बंगालपर्यंत सर्व हिंदुस्तान मराठी अमलाखालीं आणण्याच्या केवढ्या अचाट कल्पना पेशव्यांच्या मनांत घोळत होत्या, हेंही या पत्रांवरून दिसून येतें. परंतु दत्ताजी पेशव्यांच्या उपदेशाप्रमाणें वागला नाहीं. त्यानें पंजाबचा उत्तम बंदोबस्त केला नाहीं व नजीबखानाचें पारिपत्यही केलें नाहीं; इतकेंच नव्हे, तर होळकराच्या विघातक उपदेशास अनुसरून त्यानें नजीबखानाशीं स्नेह केला, व त्याचें योग्य प्रायश्चितही दत्ताजीस पुढें कसें मिळालें तो मजकूर पुढें येईल. पेशव्यांच्या ह्मणण्याप्रमाणें दत्ताजी वरील दोन गोष्टी करता तर अबदाली पुनः हिंदुस्तानांत कां येतां ? नजीबखान दगलबाजीनें दत्ताजीचा गळा कां कांपता ? पानपतांत मराठ्यांचे शेंकडों सरदार, हजारों वीर, व लाखों शिपाई कां पडते ? व मराठशाही गतभर्तृकेप्रमाणें पदराखालीं तोंड झांकून आपल्या उंबरठ्यांत मुळमूळ रडत कां बसती ? भवितव्यतेबाई तुझाच महिमा अगाध आहे !

दत्ताजी नजीबखानाशीं स्नेह करतोः—शिंद्याची फौज आपले मुलखांत आलेली पाहून नजीबखान घाबरला. गोविंदपंत बुंदेले व नजीब यांचा पूर्वीपासून स्नेह होता. तेव्हां त्यानें गोविंदपंतास दत्ताजीपाशीं आपली तरफदारी करावयास सांगितलें. गोविंदपंतानें दत्ताजीची गांठ घेऊन नजीबखानासंबंधानें खातरजमा केली.

पूर्वी मल्हाररावानें नजीबखानासंबंधानें त्यास राखावें ह्मणून दत्ताजीस सांगितलेंच होतें. त्यांत गोविंदपंताच्या शिफारशीची भर पडतांच दत्ताजीस गोविंदपंताची मसलत पसंत पडून त्यानें नजीबास भेटीस बोलाविलें, व त्याचा मोठा गौरव करून सुजाउद्दौला याचे मुलखांत स्वारी करण्यास सुलभ पडावें ह्मणून त्यास भागीरथीस पूल बांधण्यास सांगितलें. जनकोजी, नारो शंकर, अंताजी माणकेश्वर यांचे मनांत नजीबास त्याच वेळीं कैद करावें असें होतें. परंतु दत्ताजीपुढें त्यांचें कांहीं चालेना. दत्ताजीनें सुजाउद्दौल्याचे मुलखांत लूट मिळेल तिचा दहावा हिस्सा नजीबास देण्याचें कबूल केलें, व नजीबखानानें आपल्या इमानीपणाबद्दल साजकरोटी उचलून दिली. पण त्या धूर्त नजीबखानाचें कपट त्या भावड्या दत्ताजीस कसें कळणार ?

नजीबखान दत्ताजीस फसवितो व शुक्रतालची लढाईः— दत्ताजीस इमान देऊन नजीबखान परत गेल्यावर त्यानें अयोध्येचा वजीर सुजाउद्दौला यास असें कळविलें कीं, "शिंदे तुमचे मुलखावर स्वारी करणार आहेत, तेव्हां आपण सर्वांनीं मिळून त्यांचें पारिपत्य करणें जरूर आहे. तुमची मदत असेल तर मी त्यांचा समाचार घेतों." आपणावर आलेलें संकट पाहून वजीर नजीबखानास वश झाला. इकडे दत्ताजीला " मी शुक्रताल येथें भागीरथीस पूल बांधीत आहें," अशा थापा देऊन त्यानें स्वस्थ बसविलें व शुक्रताल येथें आपली फौज गोळा करून व सभोंवर खंदक खणून त्यानें आपला पक्का बंदोबस्त केला. अशा रीतीनें आपली सर्व सिद्धता झाल्यावर त्यानें दत्ताजीस निरोप पाठविला कीं, " सध्यां पर्जन्यकाल सुरू असल्यामुळें पूल बांधतां येत नाहीं, तेव्हां चार महिने कोणीकडे तरी काढणें. पावसाळा संपल्यावर आपले कामासंबंधानें पहातां येईल ! तूर्त आ-

पणाकडे येण्याची मला सवड नाहीं." असा हा रोखठोक जबाब दत्ताजीस मिळतांच नजीबखानानें आपणास ठार फसविलें, अशी त्याची खातरी झाली. नजीबखानाचा त्यास इतका राग आला कीं, त्याचें पारिपत्य करण्याचा निश्चय करून तो ताबडतोब फौजेसह शुक्रताल येथें येऊन पोहोंचला (ता. ६ मे इ. स. १७५९). दत्ताजीनें दुसरे दिवशीं नजीबखानावर चाल केली, परंतु त्यानें शुक्रतालचा पक्का बंदोबस्त केल्यामुळें शिंद्याचे तोफखान्याचें कांहीं चालेना. नुसती ४ महिने गोळागोळी सुरू होती. पुढें एके दिवशीं दत्ताजी व जनकोजी सर्व फौज घेऊन बाहेर पडले. नजीबखानाची फौज पुढें आली. त्या वेळीं भयंकर काटाकाटी सुरू झाली. ह्या लढाईत शिंद्यांचें फार नुकसान झालें. दत्ताजी व जनकोजी दोघेही जखमी झाले. तेव्हां त्यांच्या लोकांनीं त्यांस लढाईतून काढून नेलें. जिवाजी व हणमंतराव शिंदे हे सरदार ठार झाले; सात आठशें लोक पडले; व पुष्कळ जखमी झाले. तेव्हां शिंद्यांची फौज परत फिरली. अशा रीतीनें ता० १ आक्टोबर इ० स० १७५९ पर्यंत एकसारखी धामधूम सुरू होती.

दत्ताजीची मोहीम पुढें चालू:—चार महिने धडपड करून कांहीं अर्थ झाला नाहीं असें पाहून भागीरथी उतरून रोहिल्यांचा मुलूख जिंकण्याचा दत्ताजीनें बेत केला. पुढें जैता गुजर नांवाचा एक डोंगरी लुटारू सरदार होता, त्याचे मदतीनें हरिद्वार येथें शिंद्यांची फौज गंगा उतरून पार गेली (ता० २२ आक्टोबर १७५९). याच वेळीं गोविंदपंत बुंदेलेही शिंद्यांचे मदतीस आला. नजीबखानाचा पुत्र जाबताखान व सासरा दुंदेखान तसेंच सादुल्लाखान, हफिज रहिमत वगैरे रोहिले सरदार दहाबारा

हजार फौजेनिशीं जलालाबाद येथें होते. मराठे व रोहिले यांच्या एक दोन चकमकी झडून मराठ्यांनीं रोहिल्यांचे कांहीं घोडे व तोफा घेतल्या, नजीबखानाच्या पुलापर्यंत रोहिल्यांचे गांव जाळून व लुटून फस्त केले, व पुलाच्या दोन नावा तोडून तो निरुपयोगी करून टाकला. त्या वेळीं नजीबखान घाबरून गेला व त्यानें हफिज रहिमत याच्यामार्फत शिंद्यांशीं तहाचें बोलणें सुरू केलें. अशा रीतीनें दत्ताजीस तहाच्या नादीं लावून आंतून त्यानें सुजाउद्दौला यास तावडतोब मदतीस बोलाविलें. सुजास पूर्वीपासून मराठ्यांची भीति होतीच. तेव्हां त्यानें रामगंगेस पूल बांधला व आपला सरदार उमरावगीर गोसावी यासह दहा हजार फौजेनिशीं तो जलालाबाद येथें रोहिल्यांस जाऊन मिळाला. सुजा आपले मदतीस येतो असें ऐकून नजीबखान एके दिवशीं फौजेसह बाहेर पडला. तेव्हां मराठ्यांचें बाजारबुणगें अघाडीस होतें तें घाबरून जाऊन गंगानदी उतरून घाईघाईनें अलीकडे येऊं लागलें. त्या धांदलींत मराठ्यांचे हजार पंधराशें लोक नदींत बुडून मेले व कांहीं रोहिल्यांनीं ठार मारले. शिंद्यांची फौज ता० ७ नवंबर इ० स० १७५९ रोजीं गंगानदी उतरून अलीकडे आली. इतक्यांत अबदाली लाहोरास आल्याची बातमी येऊन थडकली.

सुजा व नजीब यांची दत्ताजी व जनकोजी यांस ठार मारण्याची मसलतः–दत्ताजी शुक्रताल येथें असतां सुजा व नजीब यांनीं तो व जनकोजी यांस दगा करून ठार मारावें असा बेत केला. सुजानें उमरावगीर गोसावी यास दत्ताजीकडे पाठवून ‘ आम्ही एक कोट रुपये देतों; नजीबखान व तुम्ही पाहिजे तें करा; तुह्मी व जनकोजी सर्व मिळून भेटीस यावें; ’ असा निरोप पाठविला. दत्ताजी

कोट रुपयांच्या आशेस गुंतून राहिल्यामुळें त्याचे मनांत भेटीस जाण्याचें होतें. परंतु नारो शंकर वगैरे सरदारांनीं त्यास नीट बुद्धिवाद सांगून तसें करूं दिलें नाहीं. अशा रीतीनें भेटीची मसलत फसली तरी सुजानें दत्ताजीस कोट रुपयांच्या आशेस लावून ठेविलें होतें. नजीबखानानें अबदालीस ताबडतोब येण्याविषयीं पत्रें लिहिलीं, व माधवसिंग जयनगरकर यास, कदाचित् होळकर शिंद्यांचे मदतीस येईल तर कांहींतरी कुरापत काढून तिकडेच गुंतवून धरण्यास सांगितलें. मराठ्यांचें पारिपत्य करण्याकरितां सर्व मुसलमान एक झाले आहेत असें पाहून दिल्लीचा बादशाहा अलमगीर यासही चेव आला. त्यानें सुजाउद्दौला यास गुप्त रीतीनें पत्र लिहिलें कीं, "तुह्मीं सर्व मिळून दख्खनियांचें पारिपत्य करावें, गाजीउद्दिनाचा शिरच्छेद करावा, तुह्मांस वजिरी व नजीबखान यास बक्षिगिरी देईन." अशाच रीतीनें अबदालीसही त्यानें पत्रें लिहिलीं. परंतु बादशाहाचे दुर्दैवानें तीं पत्रें गाजीउद्दीन याच्या हातीं सांपडलीं. तेव्हां त्यानें लगेच बादशाहास ठार मारिलें, व १४।१९ नवंबरचे सुमारास तो दत्ताजीस जाऊन मिळाला. दत्ताजी अबदालीशीं सामना देण्याकरितां आपले मुलखांतून निघून गेला असें पाहून ज्यास्त भानगडींत न पडतां सुजाउद्दौला आपले मुलखीं जाऊन स्वस्थ बसला.

भाग १४ वा.

अबदालीचें आगमनः—अबदाली इ० स० १७५९ च्या नवंबरच्या प्रारंभीं लाहोरास आला व त्यानें आपला जहानखान नांवाचा

---

१ बादशाहा शहराबाहेर एका अवलीयाच्या भेटीस रात्रीं गेला असतां तेथें मारेकरी घालून गाजीउद्दीन यानें त्याचा खून केला.

सरदार सदरेवर पाठवून दिला. इ० स० १७५८ त दादासाहेबांनीं अबदालीचा पुत्र तैमूरशाहा यास पंजाबांतून घालवून दिल्यावर साबाजी शिंदे व त्रिंबक बापूजी या दोन सरदारांस तिकडील बंदोबस्ताकरतां ठेविलें होतें. अबदालीची व साबाजीची एक लहानशी चकमक झडली. परंतु अबदालीची फौज फार असल्यामुळें त्याच्या पुढें साबाजीचा निभाव लागेना. तेव्हां तो पंजाब सोडून ता० १० नवंबरच्या सुमारास शुक्रताल येथें दत्ताजी शिंदे यास येऊन मिळाला. दत्ताजीचे मनांत सुजा व नजीब यांचा पुरता समाचार घ्यावयाचें होतें. परंतु अबदाली आल्यामुळें दिल्लीकडील लोक त्याच्या दहशतीनें जिकडे वाट फुटेल तिकडे पळत सुटले. तेव्हां त्याला तोंड देण्याकरतां दत्ताजीला शुक्रताल येथून आपला तळ उठविणें भाग पडलें. तो कुंजपुऱ्यावर यमुना उतरून पलीकडे गेला, व अबदालीशीं सामना देण्याची तयारी करूं लागला. साबाजी शिंदे परत आला त्या वेळीं त्रिंबक बापूजीचें पथक मागें होतें. हे लोक सुमारें सहा हजार होते. तो सतलज नदी उतरून अलीकडे येत असतां अबदालीच्या लोकांनीं त्यास गांठलें. त्या चकमकींत त्रिंबक बापूजीचे बहुतेक लोक ठार मारले गेले, व त्याच्या फौजेपैकीं सुमारें पांचशें माणसें साबाजीच्या मागून १५ दिवसांनीं शिंद्यांचे फौजेस येऊन मिळालीं. मध्यंतरीं अबदाली व शीख यांची एक बरीचशी मातबर लढाई होऊन शीखांनीं त्याचे दोन हजार लोक ठार मारले व एक हजार घोडे धरून नेले.

दत्ताजी अबदालीवर चाल करून जातोः—दत्ताजीनें जनजी शिंदे, गोविंदपंत बुंदेले, गाजीउद्दीन, वगैरे मंडळीबरोबर आपले काबिले देऊन त्यांस दिल्लीकडे रवाना केलें, व आपण अबदालीशीं

सामना देण्याकरितां एकटाच पुढें चालता झाला. त्यानें जिवाजी भोईटे वगैरे आपले सरदार टेहेळणीकरतां पुढें पाठविले. याच संधीस त्रिंबक बापूजीचे पथकांतील अबदालीनें कैद केलेले व उपासमरीमुळें अस्थिपंजरवत् झालेले मराठ्यांचे लोक त्यानें कुरुक्षेत्रांतून पुढें आल्यावर दत्ताजीकडे पाठवून दिले. दत्ताजीनें अघाडीस जी फौज पाठविली होती तिची व अबदालीची ता० २४ दिजंबर १७५९ च्या सुमारास लहानशी चकमक झाली. अबदालीची फौज संख्येनें अतिशय जास्त होती, तथापि शिंद्याचे फौजेनें त्यास बराच हात दाखविला. परंतु तिच्यानें फार वेळ टिकाव धरवेना. अबदालीचा जोर पाहून तिनें दहशत खाल्ली व एकदम पळण्यास सुरवात केली. सुमारें दोन हजार लोक ठार झाले. तें पाहून दत्ताजीच्या जवळच्या फौजेनेंही माघार घेतली. अबदाली पाठलाग करीत करीत अनूपशहरापर्यंत आला व तेथें त्यानें आपला तळ दिला. दत्ताजी विन्मुख होऊन परत फिरला; व त्यानें आपल्या फौजेचा तळ दिल्लीनजीक दिला. अबदाली अनूप शहरीं आल्यावर नजीबखान, कुतुबशाहा, अहमदखान लंगडा पठाण, दुंदेखान, वगैरे मुसलमान सरदार आपल्या फौजेसह त्यास येऊन मिळाले, व त्याचेपाशीं एकंदर एक लाख चाळीस हजार फौज जमा झाली.

बडाऊंच्या घाटावरील युद्ध व दत्ताजीचा मृत्युः—अब-

१ सुजाउद्दौला ५०००० फौज व ३० तोफा घेऊन अबदालीस याच वेळीं मिळाला असें भाऊसाहेबांचे बखरींत व नातूकृत महादजीचे चरित्रांत लिहिलें आहे परंतु राजवाडे यांनीं मराठ्यांचे इतिहासाचीं साधनें खंड १ या पुस्तकांत पानपतचे संबंधानें जीं पत्रें प्रसिद्ध केलीं आहेत त्यांवरून पानपतची मोहीम सुरू झाल्यावर मग सुजास अबदालीनें आपल्या पक्षास सामील करून घेतलें असें ठरतें.

दाली पंजाबांत आल्यापासून दत्ताजी व पेशवे यांचीं मदतीसाठीं ह्मणून मल्हारराव होळकर यास पत्रें जात होतीं. परंतु लहानसहान रजपूत संस्थानें जिंकीत बसून त्यानें दत्ताजीस एकटाच अबदालीच्या तोंडावर दिलें. दत्ताजी खरा शूर होता. आपल्या फौजेनें माघार खाल्ली या गोष्टीची त्यास मोठी चीड येऊन त्यानें जिवावर उदार होऊन एकदम सोक्षमोक्ष करून टाकण्याचा निश्चय केला. त्यानें गोविंदपंत बुंदेले व सुरजमल जाटाचा वकील रूपराम कटारी यांचे-बरोबर आपलीं मुलेंमाणसें व बाजारबुणगें यांस माळव्यांत रवाना केलें. दत्ताजीजवळ फक्त तीस चाळीस हजार फौज होती. परंतु त्यानें गनिमी काव्यानें लढाई करण्याची मराठ्यांची नेहमीची पद्धत टाकून देऊन अबदालीशीं खडी लढाई देण्याचा निश्चय केला. दोन्हीं फौजां-मध्यें फक्त यमुनेचें पात्र मात्र होतें. ता० ९ जानेवारी इ० स० १७६० रोजीं दत्ताजीनें एक दोन ठिकाणीं यमुनेस पायउतार होतो किंवा नाहीं तें पाहिलें. परंतु पायउतार कोठेंच मिळेना. दुसरे दिवशीं ह्मणजे ता० १० रोजीं लढाई देण्याचा बेत करून दत्ताजीनें पहाटेस प्रहर रात्रीचे सुमारास जानबा बावळे व मालोजी शिंदे यांस फौजे-सह घाटाचे संरक्षणाकरतां पाठवून दिलें. सुमारें तीन घटका दिव-सास लढाईस तोंड लागलें. गिलचे तोफेच्या माराखालीं यमुना उत-रून अलीकडे येऊं लागले. तेव्हां जानबा बावळे यानें मदत मागितली. दत्ताजीनें जयाजी शिंदे यास पांच हजार फौज देऊन त्याचे मदतीस पाठवून दिलें. इतक्यांत अबदालीची फौज यमुना उतरून अलीकडे आली. जयाजी एकदम गिलच्यांवर तुटून पडला. परंतु त्या चकमकींत तो गोळी लागून ठार झाला. त्याबरोबर मरा-ठ्यांची फौज मागें फिरली, व गिलच्यांनीं घाट आपले ताब्यांत घेतला.

हें पाहून दत्ताजी चाल करून पुढें निघाला. त्याचे मनांत गिलच्यांस अडचणीच्या जागेंत नेऊन तेथें मार द्यावा असें होतें. ह्मणून त्यानें जेथें शेरणीचीं बेटें होतीं, अशा अडचणीच्या जागीं आपली फौज नेली. परंतु तेथें शिंद्यांचेच फौजेचे फार हाल झाले. शिंद्यांचें निशाण हळू हळू यमुनेपर्यंत जाऊन थडकलें. त्याबरोबर उभयपक्षांकडून तोफा, हस्तनाले, सुरतनाले, जेजाला, बंदुका यांचा एकदम धडाका उडाला. धुरानें दशदिशा व्याप्त होऊन गेल्या. इतक्यांत राजगडचे घाटावर मालोजी शिंदे होता त्यावर गिलच्यांनीं हल्ला केला. त्या ठिकाणीं मोठी निकराची लढाई होऊन मालोजी पडला. इतक्यांत अबदालीची शिल्लक राहिलेली फौज अलीकडे आली. निशाणापाशीं जनकोजी होता. त्याच्यावर गिलच्यांनीं चाल केली. जनकोजी मोठ्या नेटानें गिलच्यांबरोबर लढत असतां त्याचे उजवे दंडास गोळी लागून त्याला घेरी येऊन तो खालीं पडला. दत्ताजी निशाणाचे उजवे बाजूस लढत होता. त्याला "जनकोजी पडला" असें समजलें. त्याबरोबर त्याचा धीर सुटून "बाबा आम्हांस सोडून गेले, आतां आम्हांस देशीं तोंड दाखवावयास येणार नाहीं. रणांत मृत्यु आला तर बरें आहे; नाहींतर विष भक्षून प्राण द्यावा." असे निर्वाणीचे शब्द काढून तो बेहोषपणानें अठरा असामींसह दहा हजार गिलच्यांच्या टोळीवर चालून गेला. इतक्यांत त्याचा सरदार यशवंतराव जगदाळे हा गोळी लागून पडला. त्याला गर्दीतून काढण्याकरतां त्याचा भाऊ पिराजी हा दत्ताजीस हाक मारूं लागला, म्हणून दत्ताजी आपले लालमणी घोड्याचें तोंड मागें फिरवितो आहे तोंच त्याचे उजवे बरगडींत गोळी लागून तेथेंच तो खालीं पडला.

जनकोजीस जखम लागली त्या वेळीं निशाणापाशीं लढाईची एकच गर्दी उसळून गेली होती. परंतु दत्ताजी पडला हें वर्तमान समजतांच मराठ्यांनीं माघार घेतली. शिंद्यांची फौज पळूं लागली असें पाहून गिलच्यांनीं एकदम कत्तल सुरू केली. तळावर लक्ष्मी नारायण पांच हजार फौजेनिशीं होता, व मराठी फौज गनिमी काव्यानें लढत असेल असें त्यास प्रथमतः वाटलें. परंतु मराठे पळाले ते मागें कशास पाहतात ? ज्याला जिकडे रस्ता सांपडला तिकडे तो पळाला. गिलच्यांनीं तळावर हल्ला केला, तेव्हां आपला निभाव लागत नाहीं असें पाहून पांचशें लोकांनिशीं लक्ष्मी नारायण यानें आपला रस्ता सुधारला. बाकीचे लोकांस गिलच्यांनीं ठार मारिलें व सर्व गोट लुटून फस्त केला.

जनकोजी घायाळ झाला तेव्हां त्याला येसाजी भोईटे व जानबा बावळे या दोघांनीं उचलून घोड्यावर घातलें, व ते युद्धाच्या गर्दींतून अगोदरच निघून गेले. ही लढाई सुमारें एक प्रहर चालली व तींत सुमारें शिंद्यांचे आठ हजार लोक पडले. दत्ताजी पडल्यामुळें *मराठ्यांचें फार मोठें नुकसान झालें. तो मोठा शूर, अभिमानी व इमानी सरदार होता. परंतु तो मोठा उतावळा होता.

---

* भाऊसाहेबांची बखर पान ६८।६९ यांत दत्ताजीस कुतुबशहानें लाथेनें ढकलून पालथा पाडून त्याचा शिरच्छेद केला, इत्यादि हृदयद्रावक मजकूर लिहिला आहे. परंतु ती गोष्ट खरी नसावी. कारण राजवाडेकृत मराठ्यांच्या इतिहासांची साधनें खंड १ या पुस्तकांतील पत्र नं० १६५ यांत 'पाटील युद्धांत गोळी लागून.रणांत राहिले' असें आहे, व अशा प्रकारचे आधार आणखीं दोन तीन पत्रांत आहेत. सदर बखरकारास कादंबरीप्रमाणें मजकूर लिहिण्याचा सवय असल्यामुळें तो प्रसंग खुलवून लिहिण्याच्या नादांत त्यानें आपल्या कल्पना- [illegible] अनर्गल सोडली असावी असें मानण्यास जागा आहे.

कोणतेंही कृत्य करणें झालें तर त्याच्या परिणामावर तो नजर देत नसे. त्यामुळें त्याचा शेवटीं नाश झाला. दत्ताजीचा अशा रीतीनें अंत होण्याचीं कारणें जर शोधावयाचीं असतील तर त्यांमध्यें मल्हारराव होळकरानें त्याला केलेल्या देशविघातक उपदेशावरून त्यानें नजीबखानास 'खळी' ह्मणून राखून ठेविलें हें एक कारण आहे.

जनकोजी व मल्हारराव होळकर यांची भेट:– जनकोजीस गोळी लागल्यामुळें त्यास घोड्यावर बसण्याचें सामर्थ्य नव्हतें. तशा स्थितींत आपल्या अवशिष्ट राहिलेल्या फौजेसह तो पळत असतां अठरा कोसपर्यंत गिलच्यांनीं त्याचा पाठलाग केला. शिंद्यांचीं बायकामुलें दिल्लीपासून सुमारें चोवीस कोस गेलीं होतीं. दुसरे दिवशीं प्रहर रात्रीस जनकोजी ह्या मंडळीस जाऊन मिळाला. त्या वेळीं तेथें जो आक्रांत झाला त्याची कल्पना वाचकांनींच करावी. तथापि दत्ताजीची स्त्री भागीरथीबाई व जनकोजीची स्त्री काशीबाई यांनीं ह्या बिकट प्रसंगीं फारच धारिष्ट दाखविलें. त्यांनीं आपलें दुःख गिळून जाऊन जनकोजीसह एकदम पुढचा रस्ता सुधारला. शिंद्यांचे फौजेस गिलच्यांची इतकी भीति बसली होती कीं, नुसतें त्यांचें नांव ऐकल्याबरोबर ती सैरावैरा पळत सुटे. त्यामुळें जनकोजीचे वाटेनें फार हाल झाले. अशा कष्टप्रद स्थितींत ती मंडळी रेवाडीवरून ता. १२ जानेवारी रोजीं दिल्लीपासून ८० कोसांवर कोटपुतळी येथें जाऊन पोहोंचली. या ठिकाणीं जनकोजीनें आपली पांगलेली सर्व फौज गोळा केली. मल्हारराव होळकर हा शिंद्यांच्या मदतीकरतां ह्मणून जयनगराहून निघाला होता. त्याची व जनकोजीची याच ठिकाणीं याच वेळीं गांठ* प-

*इ० स० १७५९ च्या नवंबर महिन्यांत दत्ताजी शुक्ताल येथें नजीबखानाशीं लढत असतां अबदाली आल्याची बातमी आली, तेव्हां त्यानें मल्-

पुढें चालू.

डली. शिंद्यांचे फौजेची अबदालीनें केलेली दाणादाण पाहून होळकराची खानदेशी फौज घाबरून गेली. होळकराचे मनांत सर्वांनीं मिळून पुढें न जातां दक्षिणेंत परत यावें असें होतें. परंतु जनकोजीनें त्याचा निषेध केला. तेव्हां केरोलीच्या राजाच्या आश्रयानें गोविंदपंत बुंदेले याजबरोबर शिंदेहोळकर यांनीं आपलीं मुलेंमाणसें स्वदेशीं पाठवून दिलीं व गनिमी काव्यानें अबदालीस जेरीस आणण्याचा मनसुबा करून ते दोघे मारवाडांत गेले.

गिलचे शिंदे व होळकर यांस जेरीस आणतातः—बडाऊंचे घाटीं विजयी झाल्यावर अबदाली दिल्लीवर चालून आला व तें शहर घेऊन त्यानें कांहीं दिवस तेथेंच मुक्काम केला. वजीर गाजीउद्दीन हा अबदाली येण्यापूर्वींच दिल्ली सोडून पळून गेला होता.

मागील पृष्ठावरून पुढें चालू.

रावास आपल्या मदतीस बोलाविलें होतें. परंतु जयनगर प्रांतीं शिकार संस्थानें घेत बसून तो दोन महिनेपर्यंत शिंद्याचे मदतीस गेला नाहीं. पेशव्यांनींही या संबंधानें मल्हाररावास पत्रें पाठविलीं होतीं (म० इ० सा० खंड १ नं. १६१). मल्हाररावाच्या संबंधानें नानासाहेब दत्ताजीस असें लिहितात कीं, "मल्हारबांनीं आधीं काम कोणतें करावें, मग कोणतें करावें ? माधोसिंगाचा मजकूर काय ! जेव्हां म्हटलें तेव्हां पारिपत्य होतें, तो विचार त्यांनीं न केला. " " मल्हारबांस वारंवार पत्रें पाठविलीं आहेत, त्यांचे प्रकृतीस तुम्ही जाणतां. इ० ". अशा रीतीनें पेशव्यांनीं मल्हाररावाच्या दिरंगाईबद्दल व त्याच्या दुष्ट हेतूबद्दल स्पष्ट उल्लेख केला आहे. होळकर अगदीं आरंभीं दत्ताजीचे मदतीस गेला असता तर त्या उभयतांनीं रोहिले व सुजा यांचा तेव्हांच बंदोबस्त केला असता व अबदालीसही त्यांनीं रेटलें असतें. परंतु तसें झालें असतें तर नजीबखानासारख्या पुत्राचा विश्वासघात केला म्हणून पदरीं येणारा दोष व ज्या शिंद्यांच्या घराण्याशीं पूर्वीपासून तेढ धरली होती त्यांना मदत केली तर लागणारें पाप हीं दोन्हीं एकदम मल्हाररावाच्या माथीं बसलीं नसतीं काय !

शिंदेहोळकर मारवाडांत आहेत असें अबदालीस समजल्यावर त्यानें त्यांचा पाठलाग सुरू केला. अबदालीस जेरीस आणण्याचे हेतूनें ते पानपत, कर्नोल, दिल्ली, आग्रा, जयनगर, उदेपूर वगैरे ठिकाणीं भराभर मुक्काम करीत फिरूं लागले. परंतु अबदालीचे लोक मराठ्यांपेक्षांही राकट असून शिवाय त्यांस काबूल, अफगाणिस्थान यांसारख्या डोंगराळ प्रदेशांतून मोठमोठ्या मजला मारण्याची संवय होती. त्यामुळें ते मराठ्यांस त्या कामीं दाद देईनात. गिलचे त्यांचा पिच्छा सोडीनात. सुमारें महिना दीड महिना शिंदेहोळकर वर सांगितलेल्या रीतीनें रंगण घेत पळत सुटले. शिमगी पौर्णिमा ह्मणजे ता० १ मार्च १७६० रोजीं शिंदेहोळकर यांनीं एकाएकीं यमुना उतरून शिकंदरा शहरावर हल्ला करून मोठी लूट मिळविली. इतक्यांत दुराणी त्यांचे पाठीवर आला. तेव्हां होळकरानें शेटियाजी खराडे व गंगाधर यशवंत चंद्रचूड यांचे हाताखालीं सहा सात हजार फौज मागें ठेवून तो जनकोजीसह नरवर प्रांताकडे निघून गेला. सुमारें ता. ४ मार्चचे सुमारास गिलच्यांनीं एका दिवसांत ३९ कोसांची मजल करून भर दिवसास खराडे याचे फौजेवर छापा घातला. त्या गर्दीत होळकराचे लोकांची दाणादाण होऊन त्याचे शेटियाजी खराडे, गंगाधरपंत चंद्रचूड याचा पुतण्या, संताजी वांबळे, आनंदराव रामाजी यादव याचा पुत्र वगैरे सरदार मारले* गेले, व सर्व फौजही मारली गेली. पुढें शिंदेहोळकर अंतरवेद प्रांतीं गेले. परंतु दुराणीची फौज तेथें येतांच ते यमुना उतरून अलीकडे आले. अशा रीतीनें हा हुतूतूचा खेळ मे-जून १७६० पर्यंत चालला होता. अबदालीस त्या प्रांतांतील उन्हाळा सोसेना,

* ऐतिहासिक लेखसंग्रह १७।२०.

त्याचप्रमाणें पावसाळाही नजीक आला होता, म्हणून तो आपल्या फौजेसह अंतरवेदींत कोजळेश्वर येथें तळ देऊन बसला. मल्हारराव व जनकोजी शिंदे केरोलीचे सुमारें चंबळा नदीचे पलीकडे राहिले. अबदाली दिल्ली सोडून सुमारें ९० कोस चाल करून आला होता. परंतु त्या प्रांतांतील उन्हाळा त्यास सहन न होऊन तो अंतरवेदींत परत निघून गेला. अबदाली परत गेला तरी त्याचा सरदार जहानखान व नजीबखान रोहिला हे शिंदेहोळकरांचेमागें लागलेच होते. शिंदेहोळकरांचीं मदतीसाठीं तीन चार महिने पेशव्यांस वरचेवर पत्रें येत होतीं. परंतु दक्षिणची सर्व फौज याच वेळीं निजामावरील शहांत गुंतल्यामुळें नानासाहेबांस योग्य वेळीं त्यांना मदत पाठवितां येईना. पुढें भाऊसाहेब स्वतः त्यांच्या मदतीस गेले. परंतु तो वृत्तांत सांगण्यापूर्वी निजामाबरोबरच्या या जंगी मोहिमेचें वर्णन देणें अवश्य आहे.

निजामावरोबर तंट्याचें कारणः—पूर्वी साखरखेडली मुक्कामीं झालेल्या तहांत निजामानें पेशव्यांस दहा लाखांची जहागीर व नगर व परांडा हे दोन किल्ले देऊं केले होते. सलाबतजंग पुढें त्या अटी कबूल करीना. तेव्हां सदाशिवरावभाऊ व विश्वासराव हे त्याच्यावर स्वारी करण्याकरितां ता० १ आक्टोबर इ० स० १७५९ रोजीं दसऱ्याच्या मुहूर्तानें वानवडीवर डेरेदाखल झाले. तेथें गारद्यांचा सरदार मुजफ्फरखान यानें भाऊसाहेबांचा खून करण्याचा प्रयत्न केला. परंतु तो त्याचा प्रयत्न फुकट गेला, व तो आणि त्याचा साथीदार हैदरखान यांस धरून ठार मारलें. हें कारस्थान निजामाचें होतें. पुढें कांहीं दिवसांनीं भाऊसाहेब नगरच्या रोखानें निघाले. नगरचा किल्ला घेण्याकरितां भाऊसाहेबांनीं

बिसाजी कृष्ण बिनीवाले यास दहा हजार फौजेनिशीं अगोदरच पाठविलें होतें. प्रथमतः किल्लेदार कविजंग हा त्यास दाद देईना. परंतु स्वतः खासे आपणावर शिस्त धरून येत आहेत, असें वर्तमान त्यास समजतांच शिबंदीच्या खर्चाकरितां म्हणून चाळीस हजार रुपये घेऊन त्यानें ता०* ९ नवंबर इ० स० १७५९ रोजीं तो किल्ला बिनीवाले याचे हवालीं केला. नंतर लवकरच भाऊसाहेब फौजेसह अहमदनगर येथें येऊन पोहोंचले, व तेथून जास्त फौज पाठविण्याविषयीं त्यांनीं नानासाहेबांस लिहिलें. तेव्हां त्यांनीं दादासाहेब यांस फौजेसह भाऊंचे मदतीस पाठवून दिलें, व मागाहून आपण स्वतः निघाले. ता० २९ नवंबर १७५९ रोजीं श्रीमंत सिद्धटेकास येऊन पोहोंचले, व भाऊसाहेब राक्षसभुवनाच्यापुढें दोन मुक्काम गेले होते. मध्यंतरीं दादा भाऊंस जाऊन मिळाले. सलाबतजंग व त्याचा भाऊ निजामअल्ली हे उदगीरनजीक आपल्या फौजेसह ठाणें देऊन बसले होते. पेशवे आपणावर चाल करून येत आहेत, असें पाहून निजाम पूर्वीं देऊं केलेली जहागीर व नगर व परांडा हे किल्ले देण्यास कबूल झाला. परंतु फौजबंद होऊन इतक्या खर्चाच्या पेंचांत आल्यावर भाऊसाहेब निजामाचें बोलणें कबूल करीनात. त्यांनीं निजामाची पक्की रग जिरविण्याचा निश्चय केला. ता. ९ जानेवारी इ० स० १७६० रोजीं

---

* म. इ. सा. खंड १ पत्र १४७ यांत कार्तिक वद्य ५ रोजीं श्रीमंत स्वामींनीं अहमदनगरचा किल्ला घेतला अशी मिती दिली आहे. कार्तिक वद्य ५ म्हणजे ता० ९ नवंबर १७५९ असें मोडक यांचे जंत्रींत सांपडतें. रा० राजवाडे आपल्या पुस्तकांत २१३ व्या टिपेंत '१० आक्टोबर १७५९ रोजीं अहमदनगरचा किल्ला पेशव्यांच्या हातीं कविजंगानें दिला' असें म्हणतात तें चूक आहे. ता. १० आक्टोबर रोजीं अश्विन वद्य ५ येते.

भाऊसाहेब परळीवैजनाथच्या जवळ जाऊन पोहोंचले. निजामाचा तळ तेथून ४० कोसांवर होता. मराठी फौज सुमारें २५ हजार असून तिच्यांत दिवसेंदिवस जास्त भर होत होती. ता० १३ जानेवारीच्या सुमारास पेशव्यांची फौज उदगीर नजीक येऊन थडकली. सलाबतजंगाची सलामत या वेळीं त्याला फारशी अनुकूल नव्हती. पूर्वी त्यास फ्रेंचांचें चांगलें पाठबळ होतें. परंतु इ० स० १७५८ त लालीच्या हुकुमावरून बुसी निजामाच्या दरबारांतून निघून पोंदेचेरीस परत गेल्यामुळें तें पाठबळ नाहींसें झालें होतें. त्याचा भाऊ बसालतजंग त्याला सोडून कर्नाटकांत जाऊन बसला होता, व ह्या ऐन प्रसंगीं त्याचा तोफखान्याचा सरदार इब्राहिमखान गारदी हा भाऊसाहेबांस जाऊन मिळाला. या एकंदर गोष्टींमुळें निजामाची या वेळीं फार हालाकी झाली होती. नानासाहेब, भाऊसाहेबांस वेळींच कुमक करतां यावी म्हणून नगरास येऊन बसले होते.

उदगीरची लढाई:—मोंगल व मराठे यांची उदगीर नजीक बेदर येथें गांठ पडली. ता. १९।२० जानेवारी इ० स० १७६० रोजीं दोन चकमकी झडून सलाबतजंग बराच जेरीस आला. तेथून सलाबतजंग युद्ध करीत करीत आवशास आला, व त्याचा बेत धारूर येथें त्याचे सरदार जानोजी व व्यंकटराव निंबाळकर, लक्ष्मणजी खंडगाळे वगैरे सात आठ हजार फौजेनिशीं होते, त्यांस जाऊन मिळावयाचा होता. आवशाहून धारूर सुमारें २० कोस होतें. निजाम मारहाण करीत सुमारें १० कोस आला. निजाम धारूरास पोहोंचल्यावर पुढें त्यास जिंकण्यास जड जाईल असें भाऊसाहेब यांस वाटल्यावरून त्यांनीं त्यापूर्वीच त्याचा फडशा पाडण्याचा निश्चय केला. ता. ३ फेब्रुवारी रोजीं धारूरास जाण्याचे हेतूनें नि-

जामानें आपला तळ उठविला. तो गोल किल्ला करून सभोंवार आपला तोफखाना ठेवून चालला होता. भर दोनप्रहरीं मराठ्यांनीं निजामाच्या पिछाडीवर हल्ला केला. त्या वेळीं निजामाच्या तोफखान्यानें असा भडिमार केला कीं, इब्राहिमखानाचे व खुद्द पेशव्यांचे तोफखान्यापैकीं पुष्कळ लोक ठार झाले. अशा निकराचे वेळीं भाऊसाहेब व विश्वासराव उजवे बाजूनें व दादासाहेब डावे बाजूनें निजामावर तुटून पडले. सुमारें चार घटका तीर, तरवार, गोळा, गोळी, बाण, हातधोंडा यांचा मारा होत होता. कापाकापी करीत मराठी फौज सलाबतजंगाचे हौद्यास जाऊन भिडली. निजामाच्या तोफखान्याचा सरदार कादरखान मारला गेला; शोकतजंग यास हत्तीसुद्धां मराठ्यांनीं कैद केलें; सुरेराव निंबाळकर जखमी झाला; तसेंच १५ तोफा, हत्ती, तसेंच अंबाऱ्या, हौदे, निशाणें वगैरे मराठ्यांनीं घेतलीं. आपल्या फौजेची अशा रीतीनें वाताहत झालेली पाहून निजामानें तहाचें निशाण उभारलें. या लढाईंत पेशव्यांकडील बराणजी मोहिते, भगवंतराव शिंदे, महादजी सालोंखी, केशवराव पानशे, सखोजी घाडगे वगैरे सरदार कामास आले. तहः—निजामाचा दिवाण विठ्ठल सुंदर याच्यामार्फत तहाचीं बोलणीं सुरू होऊन शेवटीं निजामानें पेशव्यांस अशेरी, दौलताबाद, सालेर, मुल्हेर, अहमदनगर व बऱ्हाणपूर असे सहा किल्ले व आंबेड, फुलंबरी, नांदेड, व विजापूर हे प्रांत मिळून साठबासष्ट लक्षांचा मुलूख देण्याचें कबूल केलें. किल्ले ताब्यांत येततोंपर्यंत निजामानें आपला तळ हालवूं नये, सलाबतजंगानें हैदराबादेस व निजामअलीनें अलजपुरास रहावें, निंबाळकर वगैरे सरदारांवर निजामाचा ताबा असूं नये. इ०. नंतर नवीन प्राप्त झालेल्या मुलखाचे बंदोबस्ताकरतां

आपले लोक पाठवून भाऊ, दादा, व विश्वासराव परत फिरले. नानासाहेब नगराहून निघून पैठणवरून आंबेपडदूर येथें आले. बंधूबंधूंच्या पडदूर मुक्कामीं रंगपंचमीच्या दिवशीं (७ मार्च १७६० रोजीं) भेटी झाल्या, व मराठ्यांच्या छावणींत त्या दिवशीं आनंदीआनंद होऊन गेला.

ह्याच वेळेच्या सुमारास मराठे सरदारांनीं इतर ठिकाणीं केलेला पराक्रमः-प्रस्तुत चिरत्राच्या शेवटच्या शोकपर्यवसायी अंकाचा पडदा उघडण्यापूर्वी (उदगीरची मोहीम सुरू होण्यापूर्वी व ती झाल्यानंतर) महाराष्ट्र रंगभूमीवर मराठे वीरांनीं कोठें कोठें पराक्रम केला तें सांगणें आवश्यक आहे. (अ.) इ० स० १७५८ त नानासाहिब औरंगाबाद प्रांतीं मोहिमेवर फिरत असतां त्यांनीं मल्हार भिकाजी रास्ते व गोपाळराव पटवर्धन यांस कर्नाटकांत पाठवून दिलें. स्वारीमध्यें दोघांचीं कामें अगदीं पृथक् पृथक् करून दिलीं होतीं. शिक्कामोर्तब व खर्चाचा हिशेब पटवर्धन यांनीं ठेवावा, व रास्ते यांनीं कुचाचा नगारा, संस्थानिकांशीं बोलाचाली वगैरे कामें करावीं. कोणाशीं तडजोड करणें झाल्यास ती दोघांनीं एकमेकांचे विचारें करावी. सुमारें वर्ष दीड वर्ष ते दोघे त्या प्रांताचा बंदोबस्त करीत होते. बळवंतराव मेहेंदळे पूर्वीपासून तिकडे होताच. पुढें निजामावरची मोहीम निघाली तेव्हां नानासाहेबांनीं मेहेंदळे, पटवर्धन वगैरे सरदारांस परत बोलाविलें. पुढें मोहीम आटोपल्यावर तहाच्या शर्तीप्रमाणें दौलताबाद किल्ल्याचा किल्लेदार सुध्या मतानें तो किल्ला पेशव्यांचे हवालीं करीना. तेव्हां नानासाहेबांनीं गोपाळराव पटवर्धन यास दहा हजार फौज देऊन दौलताबादेवर पाठवून दिलें. गोपाळराव तेथें गेल्यावर एकदम किल्ल्यास वेढा दे-

ऊन नाकेबंदीचें काम करण्याचें सोडून देऊन त्यानें लांचलुचपत देऊन किल्लेदारास वश करून घेण्याचें काम चालविलें. तेव्हां तो किल्लेदार शेफरून जाऊन भलत्याच मागण्या करूं लागला. दोन महिने झाले तरी किल्ला हातीं येत नाहीं असें पाहून नानासाहेबांस या दिरंगाईबद्दल गोपाळरावाचा फार राग आला. त्यांनीं गोपाळरावास एक खरमरीत पत्र लिहिलें. तें येणेंप्रमाणें:—" वारंवार लिहितां कीं स्थळें दुर्घट आहेत, शहास गुंततां येत नाहीं, विचारें कार्यसिद्धि करावी लागते, ह्मणून हल्ला राहविली ह्मणून लिहतां; हें बहुत अपूर्व वाटतें! विचार दूरदेशी (दूरदर्शी), तुम्हांस कळतें, हें पूर्ण प्रत्ययास येऊन गेलें. परंतु हें राजकारण प्रथम नरम धरलेंत, रसद बंद न केली, ये गोष्टीची तारीफ चिरंजीव भाऊ वगैरे सर्व शहाणे तुमची फार करतात! तुम्हांस स्थळें अवघड वाटतात, परंतु श्रीकृपेनें तृणप्राय आहेत. मल्हारबांनीं घोडप हल्ला करून घेतली. तें स्थळ हल्ला करून यावयाचें होतें! मोंगलांवर उभयतां चिरंजिवांनीं सफेजंगी केली. एका लढाईत मोंगल चकाचूर केला × × × तुह्मी सख्त शिपाई असें जाणोन मी तुह्मांस पाठविलें होतें. तुह्मींच आह्मांस विचार लिहिणार, इतकें कळलें असतें तर एकादे लहानसहान पथके पाठविले असते. तो प्रथम दिवशींच रसद बंद करता. कांहींच ध्यावयाचें न बोलतां, ह्मणजे आज काम झालें असतें. तुम्ही मातबर, तुह्मांस कार्य झाल्यावांचून आणतां नये, यास्तव तुह्मांस यश यावें ह्मणून तुह्मांसच आज्ञा करतों ते तुह्मी करीत नाहीं. ये गोष्टीस इलाज कोणता करावा? गोपाळरावजी! हे दौलताबाद तुह्मांस दुर्घट वाटते. परंतु दो महिन्यांत सक्तीनें वेढा घालून एक रुपया न देतां घेऊं, × × × रागें भरून लिहिलें म्हणून आतां

तुह्मांस राग येईल. परंतु तुम्हीं वारंवार आम्हांस विचार लिहितां यास्तव लिहिणें प्राप्त जहालें. या पत्रापूर्वीं कार्य जहालें असेल तर उत्तम आहे. नाहीं तरी परिच्छिन्न शहरपन्हा घेऊन वेढा बसविणें × × जों जों तुम्हीं राजकारणें करितां तों तों काम नासतें. याउपर या पत्रावरून जितका राग येईल तितका त्याजवर काढणें. जर कार्य जहालें असेल तर व्यर्थ राग येऊं न देणें. तुमचा स्वभाव रागीट, यास्तव इतके दिवस सख्त लिहिलें नाहीं. आतां वारंवार तुम्हीं विचार लिहूं लागलां तेव्हां नाइलाज जाणून लिहिलें आहे. हें पत्र कोणास ठाऊक नाहीं. लेंकरादाखल सेवकावर एकांतीं रागें भरल्यास वाईट मानूं नये" (ऐ० ले० सं० भाग १ पान २७।२८). असें हें खरमरीत पत्र येतांच गोपाळरावानें तावडतोब हल्ला करून शहरच्या बाहेरचा कोट सर केला व किल्ल्याची नाकेबंदी केली. पुढें किल्लेदारास पस्तीस लक्षांची जहागीर व एक लक्ष पंधरा हजार नक्त असा करार करून ता० ८ एप्रिल १७६० रोजीं मराठ्यांचें निशाण किल्ल्यावर चढलें. नानासाहेब त्या वेळीं टोंक्यास होते. तेथूनच ते दौलताबादेस गेले व त्यांनीं गोपाळरावाचा मोठा गौरव केला. विसाजी कृष्ण विनीवाले व हरी गोपाळ यांस त्यांनीं कर्नाटकचे बंदोबस्ताकरतां पूर्वीच पाठवून दिलें होतें. त्यांनीं पुढें मे १७६० त शिरहट्टी वगैरे ठिकाणें काबीज केलीं. (आ.) इ० स० १७६० त मानाजी आंग्रे मरण पावल्यावर त्याचा पुत्र रघोजी आंग्रे कुलाब्याचा कारभार पाहूं लागला. त्या वेळीं जंजिऱ्याचे शिदीनें आंग्र्याचे मुलखावर स्वारी करून पुष्कळ देवालयांचा विध्वंस केला, व पुष्कळ खेडींपाडीं बेचिराख करून टाकिलीं. तेव्हां रघोजीनें त्याचें पारिपत्य करण्याकरतां नानासाहेबांपाशीं मदत मागितली; त्यांनीं

शंकराजी नीलकंठ, रामजी महादेव व मराठ्यांचे आरमाराचा सरदार नारो त्रिंबक यांस त्याचे मदतीस पाठवून दिलें. मग सर्वांनीं मिळून हबशीचा पराभव करून त्यास आंग्र्याचे मुलखांतून घालवून दिलें. त्या वेळीं उंदेरी हें दुर्घट स्थळ हबशीचे ताब्यांत असून तेथून तो आंग्रे व पेशवे यांचे मुलखास त्रास देत असे. तेव्हां तें स्थळ घेण्याविषयीं पेशव्यांनीं रघोजीस आज्ञा केली. तेव्हां त्यानें ताबडतोब उंदेरीच्या वेढ्याचें काम सुरू केलें (इ० स० १७५९). हबशी रात्रीस मराठ्यांचे मुलखावर छापे घाली, म्हणून अलीबागेपासून थळ, नागांव, किहीम, सासवनें, मांडवें, रेवस येथपर्यंत जागोजाग त्यानें चौक्या बसवल्या, उरणच्या खाडीचा बंदोबस्त केला, व हबशीस सामानसुमानाचा पुरवठा होऊं नये म्हणून उत्तर व दक्षिण बाजूस आरमार ठेविलें. पेशव्यांनीं रामजी महादेव यास फौजेसह पाठविलें व पेशव्यांचा आरमाराचा सरदार नारो त्रिंबक सुरतेस होता त्याला आंग्र्याचे मदतीस जाण्याची आज्ञा केली. हें वेढ्याचें काम सुमारें दहा महिने चाललें होतें. पुढें मराठे व शिद्दी यांचा एक जोराचा सामना होऊन ता. १९ जानेवारी इ० स० १७६० रोजीं मराठ्यांनीं उंदेरी बेट सर केलें. पुढें कांसे वगैरे दुसरीं बेटें घेऊन मराठ्यांनीं हबशीचा अंमल बहुतेक उठवून टाकला.

भाग १५ वा.

भाऊसाहेब यांची अबदालीवर स्वारीः—बडाऊंच्या घाटावरील युद्धांत दत्ताजी शिंदे मरण पावल्यावर जनकोजी व

१ उंदेरी हें बेट मुंबई बंदराच्या तोंडाशीं आहे. हें अतिशय खडकाळ असून पूर्वी त्याला उत्तम तटबंदी केलेली होती.

मल्हारराव यांस अबदालीनें भंडावून सोडल्यामुळें होतें, व मदतीसाठीं म्हणून त्यांचीं पेशव्यांस वरचेवर पत्रें येत होतीं. परंतु त्या वेळीं पेशवे उदगीरच्या मोहिमेवर गुंतून राहिल्यामुळें त्यांना शिंदेहोळकर यांचे मदतीस ताबडतोब फौज पाठवितां आली नाहीं. तथापि ती मोहीम संपल्यावर "दादासाहेब आविलंबें तिकडे पाठवून देतों," असें नाना व भाऊ यांनीं त्यांस कळविलें. पुढें उदगीरच्या मोहिमेचा शेवट झाल्यावर पडदूर मुक्कामीं रंगपंचमीचे दिवशीं ह्मणजे ता० ७ मार्च इ० स० १७६० रोजीं नाना, भाऊ, दादा व विश्वासराव या सर्वांच्या भेटी झाल्यावर तेथें हिंदुस्तानांत कोणी जावें या संबंधानें वाटाघाट सुरू झाली. हें खलबत सुमारें आठ दिवस चाललें होतें. शेवटीं ता० १६ मार्च इ० स० १७६० रोजीं हिंदुस्तानच्या मोहिमेवर भाऊसाहेबांनीं जावें असें ठरलें.

१प्रथमतः शिंदेहोळकर यांचे मदतीस दादासाहेब यांस पाठविण्याचें ठरलें असून मागून भाऊसाहेबांस कां पाठविलें या संबंधानें निरनिराळे ठिकाणीं निरनिराळीं कारणें सांपडतात. भाऊसाहेब यांचे बखरींत असें दिलें आहे कीं, प्रथमतः भाऊंनीं दादांस पाठवून यावें असा आग्रह धरला, परंतु नानासाहेबांस ती गोष्ट पसंत नाहीं असें पाहून स्वतः जाण्याचा निश्चय करून हेकेखोरपणानें नानासाहेबांची परवानगी घेतली. डफसाहेब आपले इतिहासांत असें लिहितात कीं, लाहोरच्या मोहिमेवरून दादा परत आले तेव्हां तिकडून पैसा बरोबर न आणतां कर्ज मात्र करून आले. त्यामुळें दादा व भाऊ यांचें भांडण होऊन "तुमचेमध्यें एवढें चातुर्य असेल तर तुम्हीं दुसरे स्वारीस जा," असें दादांनीं भाऊंस सांगितलें. भाऊसाहेबांचे कैफियतींत असें आहे कीं, "आम्हांस पूर्वी साठ लक्ष रुपये कर्ज झालें आहे तें वारल्यावर मग स्वारीस जाऊं," असें दादांनीं नानासाहेबांस सांगितलें. त्यावरून "आम्हीं जाऊं किंवा तुम्हीं जातां" असें नानासाहेब भाऊंस म्हणाले. तेव्हां भाऊंनीं ती कामगिरी आपले शिरावर घेतली. नातूकृत महादजीचे चरित्रांत असें सांगितलें आहे कीं, दौलतीस पूर्वी कर्ज करून त्यांत दादासाहेबांनीं आपल्या स्वाऱ्यांच्या योगानें जास्त भर

पुढें चालू.

भाऊंचें उत्तर-हिंदुस्तानांत प्रयाण:—ता० १३ मार्च रोजीं भाऊंनीं स्वारीवर जावें असा सिद्धांत ठरल्यावर सर्व खासे मंडळी

मागील पृष्ठावरून पुढें चालू.

घातली असें पाहून भाऊंस फार राग आला व त्यांनीं "यापुढें मी मुलूखगिरी करतों, तुम्हीं कारभार पहावा" असें दादांस सांगितलें. तसेंच नानासाहेबांची स्त्री गोपिकाबाई भाऊंचा द्वेष करीत असे व त्यामुळें घरांत नेहमीं कलागती सुरू असत. तेव्हां या प्रापंचिक त्रासास कंटाळून भाऊ आपण होऊन या स्वारीस गेले. वरील सर्व कारणें अंशतः खरीं असतलि. तथापि दादांस न पाठवितां नानासाहेबांनीं त्या कामगिरीवर भाऊंची योजना करण्याचें मुख्य कारण असें असावें कीं, दादासाहेबांचा कारभार नेहमीं सरळ असे, ते फार भोळे असल्यामुळें त्यांच्या पदरचे सरदार व बाहेरचे शत्रु त्यांच्या ह्या भोळेपणाचा फायदा घेत व त्यामुळें दौलतीचें नुकसान होई. दादांनीं हिंदुस्तानांत ज्या स्वाऱ्या केल्या त्यांच्यायोगानें दौलतीस भर पडली नाहीं इतकेंच नव्हे, तर कर्जाचा उलट बोजा मात्र वाढला. मल्हारराव होळकर, गोविंदपंत बुंदेले, अंताजी माणकेश्वर वगैरे हितशत्रु व सुजा, नजीब वगैरे परशत्रु यांनीं दादांच्या भोळेपणाचा फायदा घेऊन दौलतीचें फार नुकसान केलें होतें. तशा प्रकारचें नुकसान या मोहिमेंत होऊं नये व गोविंदपंतासारख्या खाल्ल्याघरचे वांसे मोजणाऱ्या मंडळीस चांगलें वटणीस आणावें व एकंदर कार्यभाग मोठ्या शहाणपणानें उरकावा, एवढ्याकरितां नानासाहेबांनीं भाऊंची या मोहिमेवर मुद्दाम योजना केली असें म्हणणें फारसें धाडसाचें होईल असें वाटत नाहीं. ही मोहीम फारच महत्त्वाची होती. जर पानपतांत पेशव्यांस अपयश आलें नसतें तर सर्व उत्तर-हिंदुस्तान एकसययावच्छेदेंकरून पेशव्यांच्या खास अमलाखालीं येऊन हिंदुपदपादशाहींत अंतर्धान पावलें असतें. तसेंच सर्व हिंदुस्तानांतील राजेरजवाडे या वेळीं पेशव्यांचे विरुद्ध होते व त्यांच्या मानभावी कृत्यांपुढें भोळ्या राघोबाचा मुळींच टिकाव लागला नसता. तेव्हां अशा महत्त्वाच्या कामगिरीवर भाऊंसारखा कडकडीत मनुष्य पाठविणेंच इष्ट होतें. तसेंच भाऊंस हिंदुस्तानांत पाठविण्याचा विचार उदगिरची मोहीम सुरू होण्यापूर्वींच ठरला होता, इत्यादि भ्रामक विधानें ग्रांड-डफ प्रभृति इतिहासकारांनीं केलेलीं आहेत, व दुसरी कांहीं मंडळी तोच आधार समजून त्याचें अनुवादन करतात. परंतु त्यांचें हें म्हणणें अगदीं चुकीचें आहे. ही गोष्ट रा. राजवाडे यांनीं मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड १ या पुस्तकांतील लेखांक १६७।१६८।१६९ इत्यादि लेखांकावरून स्पष्ट रीतीनें सिद्ध करतां येते.

पडदूर येथून निघून ता० १४ रोजीं शिंदखेड येथें आली. नंतर ता० १५ रोजीं भाऊसाहेब नानासाहेबांचे ज्येष्ठ चिरंजीव विश्वासराव यांसह डेरेदाखल झाले. पडदूर मुक्कामीं एकंदर पाऊण लाख फौज होती. ती पैकीं ५० हजार फौज भाऊंनीं आपणाबरोबर घेतली व बाकीची २५ हजार दादांजवळ ठेवून त्यांनीं निजामावर देखरेख करण्याकरतां गंगथडी-बालाघाट या प्रांतीं मे-जूनपर्यंत रहावें असें त्याच वेळीं ठरलें. भाऊसाहेब स्वारीवर निघाले त्या वेळीं त्यांचेबरोबर बळवंतराव मेहेंदळे, नाना पुरंदरे, महिपतराव चिटणीस, नाना फडनवीस, हरी शिवराम खासगीवाले वगैरे मंडळी होती. शिंदखेड येथें फौजेची गणती केली त्या वेळीं स्वारीबरोबर दादासाहेबांपैकीं दहा हजार, समशेर बहादर, विठ्ठल शिवदेव विंचूरकर, मानाजी पायगुडे, अंताजी माणकेश्वर, खंडेराव नाईक, सुभानराव माने, महादजी नाईक निंबाळकर वगैरे सरदार मिळून १३ हजार स्वार, देशचे फौजेपैकीं २० हजार लोक, गाडदी ८ हजार, शिवाय तोफखाना इतकी फौज होती (ऐ. ले. सं. २१). शिंदखेड येथून निघाल्यावर ता. ४ एप्रिलच्या सुमारास भाऊंची स्वारी ब-हाणपूर येथें दाखल झाली. तेथून १२।१३ तारखेच्या सुमारास भाऊसाहेब इंडिया

१ ग्रांड डफमध्यें २० हजार घोडेस्वार, व १० हजार पायदळ इतकी फौज भाऊंबरोबर होती असें दिलें आहे, व ऐतिहासिक लेखसंग्रहांत २५ हजार होती असा दाखला मिळतो.

२ या वेळीं सलाबतजंग, निजामअली, व बसालतजंग हे त्रिवर्ग बंधु कलबुर्ग्यास एकत्र जमले होते, व पेशवे अबदालीच्या शहास गुंतले आहेत असें पाहून त्यांचे मनांत देशीं बखेडा माजवून आपले गेलेले प्रांत पुनः परत मिळविण्याचे विचार चालले होते. त्यांचे बेत हाणून पाडण्याकरतां नानासाहेबांनीं दादासाहेबांची योजना केली होती.

येथें आले व तेथून ते मधील वाटेनें ह्मणजे शिहूर, भोपाळ, सिरोंज अरुण, माल्न, पहारी, कलेधार, नरवर, ग्वालेर, ढवळापूर या शहरांवरून आग्रयाच्या रोखानें पुढें चालले. दमाजी गायकवाड, संताजी वाघ, इब्राहिमखान गारदी वगैरे मंडळी भाऊंच्या पूर्वीच पुढें निघून आली होती. त्यांची व भाऊंची वाटेंत गांठ पडली.

भाऊसाहेबांच्या कुचाची पुढील हकीगतः—ता० २८ एप्रिलच्या सुमारास भाऊसाहेब सिहूरास येऊन पोहोंचले. तेथून त्यांनीं माधवसिंग, बिजेसिंग, कोटेवाले, राणाजी वगैरे रजपूत संस्थानिकांकडे पत्रें पाठविलीं. हे सर्व संस्थानिक दोन्हीं दगडींवर हात ठेवून बसले होते; व ज्या बाजूस विजयदेवता माळ घालील तिकडे मिळण्याचा त्यांचा बेत होता. भाऊसाहेब सन्निध येऊन पोहोंचल्यामुळें त्यांनीं त्यांस मिळण्याचें वचन दिलें. परंतु तें बोलणें केवळ मानभावीपणाचें होतें. त्यांचा खरा ओढा अबदालीकडे होता, व मराठ्यांचे कैचींतून स्वतंत्र होण्याचे विचार त्यांचे मनांत घोळत होते. सिहूरास आल्यावर आसपासच्या दंगेखोर मवाशांचें पारिपत्य करून भाऊंची स्वारी ६ मेच्या सुमारास सिरोंज येथें येऊन पोहोंचली. त्या वेळीं त्या प्रांतांत अहीर लोकांनीं बंड केलें होतें तें मोडून भाऊ १४ मेच्या सुमारास खेचीवाड्यांत अरुण येथें येऊन पोहोंचले. ह्या वेळीं अबदाली अंतरवेदींत अनूप शहरीं होता. त्यानें आपला सरदार जहानखान व नजीबखान या दोघांस अंतरवेदींत गोविंदपंत बुंदेले यांचे ताब्यांतील मुलखास त्रास देण्याकरितां व सुजाउद्दौला ह्यास आपले पक्षाकडे सामील करून घेण्याकरितां पाठवून दिलें होतें. अंतरवेदींत या वेळीं पराशर दादाजी वाघ नांवाचा गोविंदपंताचा एक पथक्या होता. त्याचा व अबदालीनें पाठविले-

त्या फौजेचा सामना होऊन त्याची सर्व फौज पळून गेली, व सकुराबादचें ठाणें मुसलमानांनीं घेतलें. याच सुमारास बक्षी व सुमेरसाचा पुत्र रतनसा यांनीं बुंदेलखंडांत बंड केलें. गोविंदपंताचे ताब्यांतील बुंदेलखंडचा भाग, अंतरवेद व कडा—कुरा प्रांत यांतही अशीं बंडें होत होतीं, व त्यामुळें गोविंदपंताची कांहींच मदत मिळेना. वर सांगितलेलीं बंडें मोडून जेणेंकरून किफायत होईल तें करा म्हणून मल्हारराव होळकर, जनकोजी शिंदे व भाऊसाहेब यांचीं गोविंदपंतास वरचेवर पत्रें जात होतीं. तसेंच सुजाउद्दौला, मालिका जमानी, अल्लीगोहर व मिरजाफर यांच्याशीं राजकरण करून त्यांना मराठ्यांच्या पक्षाकडे सामील करून घेण्याविषयीं भाऊसाहेब गोविंदपंतास एकसारखें लिहित होते. तेव्हां आपल्या मुलखाचा बंदोबस्त करून हीं बाहेरचीं राजकारणें करण्याची दुहेरी कामगिरी गोविंदपंतावर येऊन पडली. रतनसा वगैरे मंडळीस वश करून घेऊन बुंदेलखंडांतील बंडें त्यानें कशींबशीं मोडलीं. तसेंच अल्लीगोहर यास बादशाहा करून सुजाउद्दौला यास त्याची वजिरी दिल्यास सुजा मराठ्यांचे बाजूस येण्यास कबूल आहे असें त्यानें भाऊंस कळविलें. तेव्हां भाऊंनीं शामजी रंगनाथ यास सुजाकडे वकिली करण्याकरितां पाठवून दिलें,व आपण माळन,पहारी या शहरवांरून ता. ३०मेला शिंदेहोळकर यांच्या सांगण्याप्रमाणें ग्वालेरीस आले. शिंदेहोळकर यांनीं सुजास मराठ्यांकडे ओढण्याचा पूर्वीपासून प्रयत्न चालविलाच होता. याच सुमारास जहानखान व नजीबखान यांनीं गोविंदपंताचे ताब्यांतील इटावें शहरास वेढा दिला. अंतरवेदींतील ठाणेदार केवळ भीतीनेंच आपापलीं ठाणीं सोडून पळून जाऊं लागले. त्या वेळीं गोविंदपंतानें इटाव्याकडे कांहीं फौज

पाठवून देण्यास भाऊसाहेबांस विनंती केली. भाऊंनीं गोविंदपंतास लिहिलें कीं, “ दूरची आवई ऐकून तुमचे ठाणेदार ठाणीं सोडून पळून जातात हीं शरमेची गोष्ट आहे. अशा पळपुव्या ठाणेदारांस योग्य शिक्षा करून ते अब्रूनें योग्य दम धरून झुंझतील अशी व्यवस्था तुम्हीं अवश्य करावी. म्हणजे दुसरे ठाणेदारांस वचक बसून ते झुंजून मरतील परंतु पळणार नाहींत. ” अशी ताकीद करून भाऊसाहेब ता. २ जून रोजीं ग्वालेरीहून निघाले ते ता. ४ जूनला ढवळापूरच्या खालीं पांचचार कोस चंबळा नदीच्या उत्तरतीरीं गेले, व ता. १२ जून रोजीं बोडशांस जाऊन पोहोंचले. आग्र्यास ताबडतोब जावें असा भाऊंचा बेत होता; परंतु गंभीरा नदीस फार पाणी असल्यामुळें त्यांना आठ पंधरा दिवस तेथेंच कुचंबावें लागलें. पुढें जूनच्या अखेरीस ते गंभीरानदी उतरून पलीकडे गेले व ता. ६ जुलैच्या सुमारास त्यांची व शिंदेहोळकरांची भेट झाली. नंतर सर्वांनीं मिळून पुढें काय काय करावयाचें त्याचा त्या ठिकाणीं विचार केला. नंतर सुरजमल जाट यास सामील करून घेऊन ता. १२ जुलैच्या सुमारास भाऊसाहेब सर्व फौजेसह आग्रा येथें दाखल झाले.

सुजाउद्दौला, नजीबखान वगैरे मुसलमान सरदारांच्या हालचाली व गोविंदपंत बुंदेले याचा कुचरपणाः—ता. १५ मार्च १७६० रोजीं भाऊसाहेब पडदुराहून डेरेदाखल झाले. तेव्हांपासून सुजास आपले पक्षाकडे सामील करून घेण्याविषयीं गोविंदपंतास भाऊंचीं एकसारखीं पत्रें येत होतीं. अबदाली व सुजा यांचें पिढीजाद वैमनस्य होतें; व नजीबखान व सुजा यांचेंहीं फारसें चांगलें नव्हतें. इ० स० १७५९ त दत्ताजीशीं सामना देण्याकरतां सुजा नजीबखानास मिळाला होता; परंतु त्या वेळीं दत्ताजीचा बेत

त्याच्या प्रांतावर स्वारी करण्याचा होता, ह्मणून स्वतःच्या बचावा-करतां त्यानें तसें केलें होतें. पुढें अबदाली आल्यामुळें दत्ताजी सुजा व नजीब यांचें पारिपत्य करण्याचा विचार रहित करून त्याच्याशीं सामना देण्याकरतां सुजाचा मुलूख सोडून निघाला, तेव्हां सुजाही नजीबखानाची संगत सोडून आपले राज्यांत स्वस्थ बसला. गोविंद-पंत व सुजा यांचा निकट संबंध असून स्नेहही होता. तेव्हां तो सुजास आपले पक्षाकडे सहज अनुकूल करून घेईल, अशी भाऊ-साहेबांची खातरी होती, व ह्मणूनच त्यांनीं ती कामगिरी गोविंद-पंतास सांगितली होती. सुजाचा बाप सफदरजंग यानें अनेक वेळां मराठ्यांचें साह्य घेतलें होतें. तसेंच बादशाहाची वजिरी आपणास दिल्यास ५० लाख रुपये पेशव्यांस देण्याचे संबधानें सुजानें पुष्कळ दिवसांपासून बोलणें सुरू केल होतें. तसेंच ह्या आणीबाणीच्या प्रसंगीं सुजासारखा मातबर मुसलमान सरदार मराठ्यांचे बाजूस पाहिजे होता. सुजास आपले पक्षाकडे सामील करून घेण्याविषयीं भाऊंनीं गोविंदपंतास अनेक वेळां आग्रहपूर्वक लिहिलें. "नजीबखान × × × × × आहे तो तुह्मांस थाप देऊन अबदालीकडे नेऊन फसवील, पैशाकरतां अबदाली तुमची इजत घेईल व मग तुम्ही पस्ताव्यांत पडाल. चकत्याच्या पादशाहींत अबदालीचा हात पडणें इष्ट नाहीं. तुम्ही आमचेकडे आल्यास बराच प्रांत व वजिरी तुम्हांस देऊं. न आल्यास तुमचें सर्वस्वी नुकसान होईल." वगैरे गरमनरम गोष्टी बोलून व वाटेल त्या सवलती देऊन सुजाला कसेंतरी करून आपले बाजूस मिळवून घ्यावें, ह्मणून भाऊंनीं गोविंदपंतास लिहण्याची आपली शिकस्त केली. सुजा पेशव्यांस अनुकूल झाला असता तर त्यापासून मराठ्यांस फार मोठा फायदा झाला असता. सुजाचा

प्रांत रोहिलखंडास लागून असल्यामुळें सुजाचे मदतीनें मराठ्यांस रोहिलखंडांत दंगा माजवितां आला असता, व तसें होतें म्हणजे नजीबखानास 'भीक नको पण कुतरें आवर' असें होऊन अबदालीस सोडून तो स्वसंरक्षणाकरतां परत आपले मुलखीं आला असता. तसेंच पुढें सुजाचे मुलखांतून अबदालीस दाणावैरणीचा जो पुरवठा झाला व पैशाची जी मदत झाली ती झाली नसती, व अबदालीस ' दे माय धरणी ठाय ' असें होऊन गेलें असतें. शिवाय सुजासरखा एक बलिष्ठ सरदार मराठ्यांकडे आला असता म्हणजे हफिज रहिमत, अहमदखान बंगष, वगैरे लुंगेसुंगे सरदार अबदालीस मिळाले नसते. ह्या एकंदर गोष्टींचा विचार करतां सुजास मराठ्यांनीं आपले पक्षाकडे ओढणें अवश्य होतें, व याच हेतूनें गोविंदपंत खातरीचा मनुष्य ह्मणून भाऊंनीं ती कामगिरी त्यास सांगितली होती. परंतु मोठी दुःखाची गोष्ट ही कीं, गोविंदपतानें सुजास वळविण्याचा मनापासून मुळींच प्रयत्न केला नाहीं, व " सुजा आपले बाजूस येण्यास कबूल आहे, त्याची अबदालीकडे जाण्याची इच्छा नाहीं, " इत्यादि थापाथापीवर त्यानें भाऊस चाळवण्या देण्याचें काम चालविलें. शेवटीं इ० स० १७६० च्या मे महिन्यांत अबदालीनें नजीबखान व जहानखान यांस गोविंदपंताचे मुलखांत पाठविलें व सुजाशीं स्नेह जोडण्याचीही कामगिरी त्यानें त्यांसच सांगितली. कोजळेश्वर किंवा अलीगड येथून निघून गोविंदपंताचीं सकुराबाद, इटावें वगैरे ठाणीं घेऊन बिथूर येथें सुजाची गांठ घेण्याचा नजीबखानाचा बेत होता. या वेळीं गोविंदपंतानें जोराचा प्रयत्न केला असता तर नजीबखानाचा बेत त्याला हाणून पाडतां आला असता; परंतु त्यानें मुळींच हातपाय हालविले नाहींत. गोविंदपंतानें भाऊंस असें लिहीलें कीं,

" तुम्हीं जलदीनें आल्यास नजीबखान व जहानखान यांस दहशत बसून ते परत अबदालीकडे जातील व सुजा आपणास येऊन मिळेल." तेव्हां भाऊ ताबडतोब गंभीरा नदीवर आले. परंतु त्यांस तेथें असें समजलें कीं, नजीबखानाच्या उपदेशावरून सुजाचा अबदालीकडे जाण्याचा निश्चय ठरला. तेव्हां भाऊंनीं असा विचार केला कीं, आपण शिंदेहोळकर व जाट यांस बरोबर घेऊन आग्र्याजवळ यमुना उतरून अबदाली व नजीब यांचेमध्यें तळ देऊन दोघांचेंही पृथक् पृथक् पारिपत्य करावें. अबदाली या वेळीं अनूपशहरीं होता, आणि नजीब व सुजा बिथूर येथें होते. गोविंदपंत आठ दहा हजार फौजेनिशीं इटाव्याजवळ होता. आपणास यमुना नदी जलदीनें उतरतां यावी म्हणून भाऊंनीं गोविंदपंतास नावांची तयारी करून ठेवण्यास सांगितलें होतें. भाऊ ता० ६ जुलैच्या सुमारास शिंदेहोळकर यांस जाऊन मिळाले, व ता० १२ जुलैला ते, सर्व सरदार व जाट यांसह आग्र्यास आले. त्यांनीं तीन हजार जाट व आपला सरदार मानाजी पायघुडे यांस सकुराबाद येथें ठाणें देण्याकरितां अगोदरच पाठवून दिलें होतें. परंतु भाऊ आग्र्यास आल्यावर आतां अंतरवेदींत जाणें फुकट आहे असें त्यांस दिसून आलें. कारण ते येण्यापूर्वींच सुजा व नजीब हे बिथूर येथून निघून शिकंदऱ्यास अबदालीस येऊन मिळाले होते. असें जरी होतें तरी भाऊंच्या हुकुमाप्रमाणें गोविंदपंतास नावा तयार करून ठेवणें जरूर होतें. परंतु गोविंदपंताच्या हातून ती कामगिरी झाली नाहीं. तसेंच सुजा व नजीब हे अबदालीस मिळण्याकरितां निघाले त्या वेळीं गोविंदपंतानें त्यांस काडीचाही अडथळा केला नाहीं. गोविंदपंताच्या ह्या हलगर्जीपणामुळें भाऊंनीं आरंभीं रचलेला सर्व व्यूह फुकट गेला.

मराठे दिल्ली शहर काबीज करतातः—यमुना नदीला पाणी फार असल्यामुळें व गोविंदपंताचे कुचरपणामुळें वेळेवर नावा न मिळाल्यामुळें भाऊंस यमुना उतरून पलीकडे जाऊन अब्दालीस शह देतां आला नाहीं. तेव्हां त्यांनीं त्याचे पारिपत्याची दुसरी युक्ति काढिली. अबदाली या वेळीं सुजा व नजीब यांसह शिकंदऱ्यास होता व त्याचे पाठीमागें गंगा नदी होती, आणि पुढचे अंगास यमुना नदी होती. डावे बाजूस सकुराबादपर्यंत जाट व मराठे यांचीं ठाणीं असून तिकडे गोविंदपंत होता. तेव्हां फक्त उजवे बाजूस सरहिंदकडे जाण्याचा अबदालीचा मार्ग काय तो खुला होता. तेव्हां भाऊंनीं मनांत अशी योजना केली कीं, यमुनेच्या दक्षिणतीरानें मथुरा, दिल्ली, कुंजपुरा या शहरांवरून जाऊन यमुना नदी उतरून अबदालीला पूर्वेकडे कोजळेश्वर (अलीगड), सकुराबाद वगैरे ठाण्यांवरून गोविंदपंताचे अंगावर रेटावें व गोविंदपंतानें कोजळेश्वरापर्यंत मराठ्यांचीं ठाणीं बसवून अबदालीच्या सभोंवतालचा मुलूख बेचिराख करावा, रोहिल्यांचे मुलखांत सोमरचे घाटानें उतरण्याची आवई घालावी व सुजाचे मुलखांत दंगे माजवावे. अशा रीतीनें बेत ठरवून भाऊंनीं मथुरेहून शिंदे होळकर व बळवंतराव मेहेंदळे यांच्याबरोबर हुजूरची ८ हजार सडी फौज देऊन त्यांस रवाना केलें. बळवंतराव दिल्लीस जाऊन पोहोंचला त्याच दिवशीं त्यानें तें शहर हस्तगत करून घेतलें व किल्ल्यावर मराठ्यांचें निशाण रोंविलें. परंतु मराठ्यांचे फौजेपैकीं कांहीं लोक बेसावधपणानें जनानखान्यांत शिरून लुटालूट करीत असतां आंतील पठाण लोकांस राग येऊन त्यांनीं त्या लोकांची कत्तल केली. तेव्हां बळवंतरावानें किल्ल्यास मोर्चे लाविले. पुढें तां॰ ३० जुलै रोजीं भाऊ दिल्लीस येऊन पोहोंचले,

व ता. १ आगस्ट रोजीं त्यांनीं दिल्लीचा किल्ला सर केला. याकूब अल्लीखान ह्मणून अबदालीचा कोणी सरदार किल्ल्यांत होता तो आपले लोकांस सोडून एकटाच नावेंत बसून पळून गेला. किल्ल्यांत अबदालीचे लोक होते ते शरण आले तेव्हां त्यांस कौल देऊन किल्ल्यांतून काढून दिलें. भाऊ दिल्ली येथें सुमारें दोन महिने तळ देऊन राहिले.

अबदालीची विपन्नावस्थाः—मराठ्यांनीं दिल्ली शहर अबदालीपासून हिसकावून घेतल्यामुळें अबदालीचा बोज कमी होऊन मराठ्यांचें महत्त्व वाढलें, व अबदालीच्या सैन्यांत व साथीदारांत फुटाफूट होऊं लागली. हाफिज रहिमत, सादुल्लाखान अहमदखान बंगष, फैजुल्लाखान वगैरे रोहिले सरदारांचीं राजकारणें भाऊंपाशीं सुरू होतींच, व दिल्ली शहर भाऊंनीं घेतल्यामुळें त्यांस अबदालीच्या बळाविषयीं संशय येऊं लागला, व ते त्यास सोडण्याचा विचार करूं लागले. अबदालीच्या अफगाण फौजेपैकीं कांहीं लोक त्यास सोडून स्वदेशीं गेले. अबदाली सुजापाशीं पैसा मागूं लागला, व तो तो देईना तेव्हां त्यानें सुजावर मारेकरीही घातले. तेव्हां अबदालीचें खरें स्वरूप सुजास कळून आपण त्यास मिळालों ही मोठी चुकी केली असें त्यास वाटून त्यानें पुनः भाऊंशीं तहाचें बोलणें सुरू केलें. नजीबखानाच्या नादीं लागून आपण व्यर्थ फसलों असें स्वतः अबदालीस वाटूं लागलें. तेव्हां तहाचें बोलणें करण्याकारितां त्यानें आपला वकील भाऊंकडे पाठवून दिला. त्यानें शिंद्यांचे फौजेचा यमुनेच्या कांठीं जो विध्वंस केला होता तो भाऊंचे मनांत एकसारखा डांचत होता, व त्याबद्दल यथेच्छ सूड घेण्याची उत्कट इच्छा भाऊंस झाली होती. तसेंच भाऊंपाशीं अब्दालीपेक्षां उत्तम

व ज्यास्त फौज व तोफखाना होता. त्यामुळें अबदालीच्या तहाच्या बोलण्याकडे भाऊंनीं फारसें लक्ष दिलें नाहीं. या वेळीं भाऊंनीं अबदालीशीं सलोखा केला असता व त्यास स्वदेशीं घालवून दिलें असतें तर मराठी राज्यावरचें केवढें संकट टळलें असतें ? परंतु भाऊंचा स्वभाव पडला मानी व हेकेखोर! तसेंच त्यांस स्वतःच्या बलाविषयीं ज्यास्त घमेंड होती. त्यामुळें त्यानीं मराठशाहीवरचें संकट टळण्याची संधी आली असतां ती घालविली. भाऊंनीं ह्या वेळीं अबदालीशीं सख्य केलें असतें तर त्यापासून पुढें मराठी राज्याचें वैभव किती वाढलें असतें ह्या गोष्टीचा विचार केला तर भाऊंचे हातून ह्या मोहिमेंत ज्या चुका घडल्या त्यांपैकीं ही एक अत्यंत महत्त्वाची चूक झाली असें मोठया कष्टानें ह्मणावें * लागतें.

भाऊंनीं दिल्लीस असतां केलेलीं कामें:— पावसाळ्यामुळें आगष्टपासून २९ आक्टोबर १७६० पर्यंत भाऊंस दिल्लीस रहावें लागलें. अबदाली व सुजा ह्यांनीं तहाचीं बोलणीं सुरू केलीं त्या वेळीं भाऊ दिल्लीस होते. वर सांगितलेल्या वेळांत त्यांनीं दिल्लीच्या बादशाहीची व्यवस्था लाविली. इ० स० १७५९ च्या नवंबरांत गाजीउद्दीन यानें अलमगीर बादशाहास ठार मारून कामबक्षाचा पुत्र शहाजहान यास बादशाही तक्तावर बसविलें. परंतु त्याचें राज्य औटघटकेचें होतें. इ० स० १७६० च्या जानेवारींत अबदालीनें दिल्ली घेतली, तेव्हां त्याचा अवतार संपला. तेव्हांपासून इ. स १७६० च्या आगष्ट महिन्यांत भाऊंनीं दिल्ली घेतली, तोंपर्यंत अबदालीनें कोणाही शाहांजाद्यास गादीवर न बसवितां दिल्लीचें तक्त

* रा. राजवाडे या संबंधानें भाऊंचें समर्थन करतात, परंतु तें एकदेशीय आहे असें आमचें मत आहे.

रिकामें ठेविलें होतें. अलमगीर याचा पुत्र अल्लीगोहर हा इ. स. १७५९ त पाटणा येथें पळून गेला होता. भाऊंनीं दिल्ली शहर घेतलें हें वर्तमान त्यास समजलें तेव्हां मराठ्यांस येऊन मिळण्याचा आपला बेत त्यानें भाऊंस कळविला. त्याच्याकडे भाऊंनीं शिधू भट नांवाचा वकील पाठविला होता. ह्या वकिलाच्या सांगण्यावरून अल्लीगोहर मराठ्यांस येऊन मिळण्यास कबूल झाला. परंतु लढाईचा निकाल होईपर्यंत त्यानें दिल्लीस येण्याचें नाकारलें. तथापि त्यानें आपला पुत्र जवानबख्त यास भाऊंकडे पाठवून दिलें. भाऊंनीं नाना पुरंदरे व आप्पाजी जाधवराव यांच्या हस्तें ता० १० आक्टोबर इ० स० १७६० रोजीं जवानबख्त यास 'वालीहद' केलें व अल्लीगोहर यास शाहाआलम हें नांव देऊन त्याच्या नांवानें राजशिक्के चालविले. सुजा यास बादशाहाची वजिरी व नजीबखानास बक्षिगिरी पाहिजे होती. त्यांत त्यांचा हेतु बादशाहीचें कल्याण करण्याचा नसून केवळ स्वतःचा फायदा करून घेण्याचा होता. कारण मोंगलबादशाहीविषयीं त्यांचे मनांत काडीभरही प्रेमभाव वसत नव्हता. अबदालीनें सुमारें आठ महिने दिल्लीचें तक्त रिकामें ठेविलें होतें. त्यावरून पुढें आपण बादशाहा व्हावें असा हेतु कदाचित् त्याचे मनांत असावा असें मानण्यास बराच जोर येतो, व अबदाली बादशाहा झाला असता तर सुजास वजिरी व नजीबास बक्षिगिरी सहज प्राप्त झाली असती. परंतु भाऊंनीं अल्लीगोहर यास बादशाहा केल्यामुळें त्या दोघांचेही बेत फसले. यापूर्वी सुजाचा मराठ्यांस मिळण्याचा बेत होता. परंतु वरील गोष्टीमुळें त्याचा तो बेत फिरला. त्या वेळेपासून अबदाली, सुजा व नजीब यांची एक गट्टी झाली व ते एकदिलानें मराठ्यांच्या नाशाची

तयारी करूं लागले. " भाऊसाहेब यांचे मनांत विश्वासराव यास दिल्लीचे तक्तावर बसवावयाचें होतें, " इत्यादि जो मजकूर भाऊसाहेब यांचे कैफियतींत बखरकारांनीं दिला आहे, त्यास भाऊंनीं दिल्ली घेतल्यावर बादशाहीची वर सांगितलेली जी व्यवस्था केली तिच्याबद्दल कागदोपत्रीं जो पुरावा मिळतो त्यावरून कांहीं आधार आहे असें दिसत नाहीं. ह्या बखरकारास अतिशयोक्तीनें लिहिण्याची जी संवय आहे, तिचेंच हें एक उदाहरण असावें असें वाटतें. भाऊंनीं नारो शंकर यास बादशाहाची वजिरी दिली व त्यास दिल्लीचा कारभार सांगून बाळोजी पगडे व मीरखान ठोके यांस फौजेसह त्याचे मदतीस ठेविलें. ह्या वेळीं शिपाई लोकांचे पगार थकल्यामुळें त्यांनीं कुरकूर चालविली. तेव्हां भाऊसाहेबांनीं बादशाही तक्तावरील रुप्याचें छत फोडून त्याचें सात लाख रुपयांचें जें रुपें निघालें तें शिपाई लोकांस वांटून दिलें. ही गोष्ट भाऊसाहेबांचे बखरींत व कैफियतींत लिहिली आहे. ही गोष्ट खरी असेल तर त्यांचे हातून पानपतच्या मोहिमेंत ही दुसरी मोठी चूकी झाली असें म्हणणें भाग पडतें. कारण दिल्लीच्या बादशाहीबद्दल पूज्यभाव असलेले पुष्कळ मुसलमान लोक व रजपूत राजे त्या वेळीं हयात होते, व भाऊंनीं अशा रीतीनें तक्ताची जी अमर्यादा केली त्याबद्दल त्यांना भाऊंचा राग आला असला पाहिजे. पानपतांतील अपयशास या गोष्टीचें अंशतः तरी साह्य झालें असलें पाहिजे.

सुरजमल जाट व भाऊः—दिल्लीचा बंदोबस्त केल्यानंतर कुंजपुरा घेण्याची मसलत करण्याकरतां भाऊंनीं शिंदे, होळकर, सुरजमल जाट वगैरे सरदार मंडळीस पाचारण केलें. त्या वेळीं सुरजमलानें त्यांस असें सांगितलें कीं, "भाऊसाहेब आमचें ऐकाल तर दरबारचें

छत काढलें आहे तें पुनः बसवावें व आमचें व शिंदे होळकर यांचें गाजीउद्दीन यास वजिरी देण्याविषयींचें वचन गुंतलें आहे तर त्यास दिल्लीची वजिरी द्यावी. आपणास लागेल तो घासदाणा मी पुरवितों. आपण येथेंच स्वस्थ रहावें. दुसरे कोणास पाठवून कुंजपुरा घ्यावा. स्वतः सर्व फौज घेऊन तिकडे जाऊं नये." मल्हारराव होळकराचेंही मत जाटाप्रमाणेंच पडलें. परंतु भाऊंस ही गोष्ट पसंत पडली नाहीं. त्यांनीं जाटास साफ उत्तर दिलें कीं, "आम्ही दक्षिण सोडून येथवर आलों आहों ते कांहीं तुमच्या बळावर आलों नाहीं. आमचे आम्ही खंबीर आहों. आह्मांस वाटेल तसें आम्ही करूं. तुह्मांस वाटेल तर तुम्ही येथें रहावें नाहींतर आपले ठिकाणीं परत जावें. गिलच्यांचें पारिपत्य केल्यावर तुम्ही आह्मी समजून घेऊं." या दर्पोक्तीचें जाटास फार वाईट वाटून तो आपले डेऱ्यास निघून गेला. मागें भाऊसाहेब व बळवंतराव मेहेंदळे यांनीं जाटास कैद करून त्याचा गोट लुटण्याचा बेत केला. वजीर गाजीउद्दीन हा सुरजमल जाट याचे आश्रयास राहिला होता. जाट भाऊंस येऊन मिळाला तेव्हांपासून त्यानें दिल्ली शहर हस्तगत झाल्यावर तें भाऊसाहेबांनीं त्याचे हवालीं करावें, व गाजीउद्दीन यास वजिरी द्यावी असें बोलणें लाविलें होतें. परंतु भाऊंनीं दिल्ली घेतल्यावर जाटाचे बोलण्याचा कांहींएक विचार न करतां नारो शंकर यास बादशाहीचा कारभार सांगिला; इतकेंच नाहीं, तर त्यास भाऊंनीं कैद करण्याचा विचार चालविला. तेव्हां जाटास त्या गोष्टीचें वाईट वाटून तो भाऊंस सोडून निघाला. ह्या कामींसुद्धां भाऊंनीं पोक्त विचार केला नाहीं असें मोठ्या कष्टानें ह्मणावें लागतें. हें भाऊंचें कृत्य केवळ हेकेखोरपणाचें होतें व त्याचा परिणाम अखेरीस भाऊंसच भोगावा लागला.. भाऊंस आ-

पल्या बलाचा फाजील अभिमान होता, हें या कृत्यावरून सिद्ध होतें. जाटाचें पाठबळ यःकश्चित कारणावरून भाऊंनीं घालविलें ही त्यांचे हातून बरीच मोठी चुकी झाली.

भाऊ कुंजपुरा घेतातः—पावसाळा संपल्यावर भाऊंनीं कुंजपुऱ्यावरून सांरगपूर येथें यमुना उतरून अंतरवेदींत जाण्याचा निश्चय केला. कुंजपुरा हें स्थळ फार मजबूत असून मोठें नाकेबंदीचें होतें. तेथें अबदालीचा सामतखान नांवाचा सरदार पांच सहा हजार फौजेनिशीं एक वर्षभर राहिला होता. तें शहर घेण्यासाठीं भाऊंनीं शिंदेहोळकर, बळवंतराव मेहेंदळे, विठ्ठल शिवदेव विंचूरकर वगैरे मंडळीस फौजेसह पुढें पाठवून दिलें व मागून आपण स्वतः सर्व लष्करासह दिल्लीहून निघून ता. १५ आक्टोबर इ० स० १७६० रोजीं तेथें जाऊन पोहोंचले. मराठ्यांच्या सैन्याला अंगावर घेऊन आपण पळत सुटावें व अशा रीतीनें मराठे पुढें घसरले म्हणजे मागून अबदालीनें चाल करून त्यांस कैचींत पकडावें, असा सामतखानाचा उद्देश होता. परंतु मराठ्यांनीं कुंजपुऱ्यास एकदम वेढा दिल्यामुळें सामतखानाचा तो बेत फसला. कुंजपुऱ्याची गढी अतिशय मजबूत असल्यामुळें प्रथमतः मराठ्यांचा कांहींच इलाज चालेना. तेव्हां ते गढीस मोर्चे लावून बसले. पुढें गिलचे सामतखानाचे मदतीस येत आहेत, हें वर्तमान भाऊसाहेबांस कळतांच त्यांनीं गढीवर एकदम जोराचा हल्ला करून ती घेण्याचा निश्चय केला. ता. १७ आक्टोबर रोजीं मराठ्यांनीं गढीवर हल्ला केला. पठाणांनीं आंतून त्यांच्यावर मोठा भयंकर मारा चालविला. परंतु जिवाची परवा न धरतां मराठे मारामार करीत तटाला जाऊन भिडले. सामतखानानें मोठ्या निकरानें मराठ्यांवर हल्ला केला. दोन्ही सैन्यें हातघाईवर येऊन लढूं लागलीं. अखेरीस सामतखा-

नाचा पराभव होऊन तो पडला, व त्याच्या फौजेची मराठ्यांनीं कत्तल केली. कुतुबशाहा म्हणून दुसरा एक पठाण सरदार होता त्यास मराठ्यांनीं पकडून ठार मारलें. जनकोजी शिंद्यानें ह्या लढाईत फारच शौर्य दाखविलें. किल्ला मराठ्यांचे हातीं लागला तेव्हां त्यांत भाऊसाहेबांस ५० लाखांची लूट सांपडली. किल्ल्यास खणत्या लावून त्याचे तट भाऊंनीं फोडून टाकिले व तो जमीनदोस्त केला. या लढाईत सामतखानाचे सुमारें सात हजार लोक पडले. मराठ्यांचेंही बरेंच नुकसान झालें.

भाग १६ वा.

भाऊंची पुढील हालचालः—कुंजपुरा घेतल्यावर सारंगपु-[ऱ्याज]वळ यमुना उतरून अंतरवेदींत शिरण्याचा भाऊंचा विचार [होत]ा. इतक्यांत *बागपताजवळ यमुना उतरून अबदाली अलीकडे [आल]ा, ही बातमी भाऊंस समजली. अबदाली बागपताजवळ ता० २९ आक्टोबरच्या सुमारास यमुना उतरून अलीकडे आला, व २८ व्या तारखेस गणोरावरून संभाळकियास येऊन पानपताच्या रोखानें तीन कोस पुढें आला. भाऊसाहेबांस हें वर्तमान समजलें तेव्हां त्यांनीं होळकर, शिंदे, गायकवाड, विंचूरकर, मेहेंदळे, समशेरबहादर, इब्राहिमखान गारदी वगैरे प्रमुख सरदारांस बोलावून पुढील हालचालीबद्दल खलबत चालविलें. त्यांत शेवटीं असें ठरलें कीं, होईल तेवढी त्वरा करून भाऊंनीं दिल्लीस निघून जावें. सभों-

*दिल्लीपासून यमुनेच्या उत्तर तीरास बागपत २० मैल; गणोर ३६ मैल, संभाळकिया ४५ मैल, पानपत ५४ मैल व कुंजपुरा ७८ मैल आहे.

वार तोफांचा गोल बांधून व मध्ये सैन्य घालून दिल्लीस सुरक्षितपणें नेण्याची हमी इब्राहिमखानानें घेतली. नंतर टेहेळणीकरतां म्हणून बाजी हरि व येसाजी भोईटे यांस, पांच सहा हजार फौज देऊन पुढें पाठवून देऊन सर्व सैन्य दिल्लीच्या रोखानें निघालें. अबदाली दिल्लीस जाण्याचा रस्ता रोखून बसला होता. गिलच्यांनीं बाजी हरीच्या तुकडीवर हल्ला करून दोन हजार लोक ठार मारले व त्या चकमकींत बाजी हरि पडला. गिलच्यांनीं राहिलेल्या फौजेचा अशा जोरानें पाठलाग केला कीं, त्या लोकांची परत भाऊंच्या सैन्यांत येऊन मिळेपर्यंत अगदीं दाणादाण होऊन गेली. प्रथमतः असा मक्षिकापात झाल्यामुळें मराठयांची हिंमत खचली, व अबदालीनें रस्ता अडविल्यामुळें भाऊंस अबदालीच्या सामन्यास पानपत येथें तळ देणें भाग पडलें.

गोविंदपंत बुंदेले याची कसुरीः—अबदाली या वेळीं मराठ्यांच्या चांगला कैचींत सांपडला होता. तोंडावर भाऊंची जय्यत फौज होती. कुंजपुऱ्यापर्यंतचे सर्व घाट मराठ्यांचे ताब्यांत होते. दिल्ली येथें नारो शंकर सहा सात हजार फोजेनिशीं तयारीनेंच होता. अशा रीतीनें यमुनेच्या उजव्या तीरानें मराठ्यांनीं अबदालीला वेढून टाकला होता. अबदालीला मोकळी बाजू म्हटली ह्मणजे नजीबखानाच्या ताब्यांतील अंतरवेद व रोहिलखंड हे प्रांत होते. त्याला तिकडून पायबंद देऊन रसदबंदी करून हैराण करण्याचें काम भाऊंनीं गोविंदपंत बुंदेले यास सांगितलें. परंतु या कामीं गोविंदपंतानें समजून उमजून टाळाटाळ करून पानपतच्या अपयशाचें खापर अंशतः तरी आपल्या डोक्यावर फोडून घेतलें. ता. ३ नवंबर इ० स० १७६० रोजीं भाऊ गोविंदपंतास लिहितात कीं, “तुम्हीं जलदीनें

यमुनेपलीकडून येऊन बागपतेपर्यंत धुमामा चालवून अबदालीस रसद न पोंहचे, फौजेस शह पडे, ऐसें करावें. गिलच्यांचा पेंच तिकडे नाहीं. यास्तव लांब लांब मजलीनें येणें. या कामीं दिरंग न लावणें. हें काम मागेंच करावें ऐसें होतें. या उपरी तपशील न लावणें × × गडमुक्तेश्वर, शामळी, वगैरे नजीबखानाचे प्रांत जाळावे. अबदालीस मागें रसद बंद होऊन मुलखाचा बोभाट होय ऐसें करणें........इरे धरून तडकून येऊन काम करणें इ०. " ता. ४ नवंबर रोजीं ते गोविंदपंतास पुनः लिहितात कीं, "कार्यावरी आज्ञेप्रमाणें जातों ऐशा गोष्टी रिकाम्या लिहितां. निदर्शनास यांतील एकही येत नाहीं. यामुळें तुमच्या कर्तृत्वाची तारीफ वाटते ती कोठवर लिहावी ? लिहितां लिहितां भागलों ! अबदालीची व आमची गांठ पानपताजवळ पडली आहे.........त्याच्यानें इकडे तिकडे जाववत नाहीं व कांहीं करवत नाहीं. दीड पावणेदोन कोसांची तफावत आहे. पेंढारी....नित्य उंटें, घोडीं, तट्टें, बैल आघाडीपिछाडीपासून जाऊन घेऊन येतात. त्यांचे कोणीं पाठीवरही निघत नाहीं. तुह्मीं पत्र पावतांच अंतरवेदींतून पटपटगंजावरी त्याच्या पिछाडीस येऊन पोहोंचणें.... रसद त्याजकडे जावयाची आढळेल ते लुटणें, दबाब पाडणें, म्हणजे चहूंकडून घाबरा होईल. हे युक्त तुम्हांस बहुत वेळ लिहिली. परंतु तुम्हीं येत नाहीं. सारीच डोळेझांक करतां....तुह्मीं दरमजल बागपताचे सुमारें अंतरवेदींतून येऊन रसद मारणें. नजीबखानाचा मुलूख जाळून लुटून फस्त करणें. आपले अब्रूची इरे धरून काम बजावून आणणें. या दिवसांत लिहिलेप्रमाणें तुम्ही येऊन पावलां असतां तर किती काम होतें. अजून तरी करून दाखविणें....मसलत मोठी. या दिवसांत ज्यास जें लिहावें त्याप्रमाणें होऊन न येईल मग तुम्ही आमचे

कामाचे काय ? याउपरी आज्ञेची व चाकरी करून दाखवावयाची सीमा केली ! " याप्रमाणें टोंचून खोंचून लिहून भाऊंनीं गोविंदपंताची पुष्कळ कानउघाडणी केली. ता० ३ नवेंबर रोजीं नारो शंकर यानेंही वरच्याप्रमाणेंच कानउघाडणीचें एक पत्र गोविंदपंतास लिहिलें. परंतु गोविंदपंतानें तिकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं. विथुराकडे तालगांव, तिरज, कनोज, मोहना, बरगांव, गुलोली वगैरे लहानसहान गढ्या घेण्यांत आपल्या अमूल्य वेळेचा दुरुपयोग करून भाऊंनीं सांगितलेल्या कामगिरीची त्यानें जाणूनबुजून हयगय केली. अबदालीच्या सैन्यांत या वेळीं धान्याचा तोटा पडला होता. परंतु तो गोविंदपंताच्या रसदबंदीमुळें नसून यमुनेस महापूर येऊन दाणावैरण बंद झाल्यामुळें पडला होता. अशा वेळीं भाऊंनीं इतक्या कळकळीनें सांगितलेली कामगिरी गोविंदपंतानें मनापासून बजावली असती तर मराठे या वेळीं सर्व प्रकारें वरचढ असल्यामुळें अबदाली ठार बुडाला असता.

उभय सैन्यांचे पानपत येथील तळः—दोन्ही सैन्यांचे तळ पानपतच्या पुराणप्रसिद्ध मैदानांत पडले होते. काशीरायाच्या मताप्रमाणें मराठयांकडे ५५००० पायदळ, १५००० स्वार, दोनशें तोफा इतका सरंजाम असून शिवाय लहान लहान पथके व पेंढारी मिळून २०००० लोक होते. याशिवाय सुमारें दीडलाख बाजारबुणगें [1]होतें. भाऊंनीं दक्षिणेंतून निघतेवेळीं आप-

---

१ पानपतचे बखरींत, एकंदर साडेतीन लक्ष लोक होते त्यांपैकीं लढाऊ लोक एक लाख सत्तर हजार असावे' असें दिलें आहे. भाऊसाहेबांचे बखरींत गारद्यांचीं पलटणें व तोफखाना शिवाय करून झुंजती फौज सुमारें साठ हजार होती असें दिलें आहे.

त्याबरोबर उत्कृष्ट फौज, उत्तम हत्ती, उंटें, घोडीं, उंचीं वस्त्रें, बहुमोल अलंकार, भरगच्ची, किनखाबी डेरे, राहुट्या वगैरे जेवढें उत्तम तेवढें घेतलें होतें. शिवाय बायका, पोरें, ढोरें, दासदासी वगैरे हजारों लचांडें बरोबर होतीं. नाचतमाशेसुद्धां या स्वारीबरोबर होते. सारांश भाऊंनीं या स्वारींत जुना मराठी बाणा टाकून देऊन आगंतुक मोंगली बाणा पतकरला होता असें ह्मटलें तरी चालेल. या लढाईत आपणास अपयश येईल असें भाऊंच्या स्वप्नीं सुद्धां येत नव्हतें. कारण त्यांच्या फौजेची उत्तम तयारी असून सर्व शूर सरदार त्यांनीं आपणाबरोबर घेतले होते. इब्राहिमखानाचे हाताखालची कवायती फौज, तसेंच मल्हारराव होळकर, जनकोजी शिंदे, दमाजी गायकवाड, यशवंतराव पवार, समशेर बहादर, हरि दामोदर, सोनजी भापकर, महादाजी व तुकोजी शिंदे, नाना व त्रिंबक सदाशिव पुरंदरे, बळवंतराव मेहेंदळे, संताजी आटोळे, आनंदराव व तुकोजीराव पवार, तसेंच मोहिते, बांडे, देवकांते, महाराणे, निंबाळकर, वाघ वगैरे लहान मोठे सर्व सरदार दक्षिणेंतून आपापल्या फौजेसह या युद्धांत सामील झाले होते. खासे आंब्याचे बागेंत पागासुद्धां राहिले. उजवे बाजूस जांबळीचे बागेशेजारीं जनकोजी शिंदे, त्याचे उजवे बाजूस मल्हरराव होळकर व त्याचे उजवे बाजूस पेंढारी. होळकराचे पिछाडीस रेणको आप्पाजी व यशवंतराव पवार, डावे बाजूस इब्राहिमखान गारदी, व दुसरे किरकोळ सरदार, त्यांचे डावे बाजूस दमाजी गायकवाड, मानाजी पायगुडे, बाजी हरि, विठ्ठल शिवदेव, नारायणराव बापूजी, कृष्णाजी अनंत तांबे वगैरे सरदार होते. त्यांचेपलीकडे बुणगें होतें. बुणग्याचे सभोंवार तोफखाना होता. सर्व सैन्याचे सभोंवार ४० हात रुंद व १२ हात

खोल असा खंदक खणला होता. अबदाली व त्याचे साथीदार सुजा, नजीब व इतर मुसलमान सरदार यांची फौज ४१८०० स्वार ३८००० पायदळ व ८०[१] तोफा इतकी होती. पिछाडीस खासा अबदाली. पुढें बाजूस त्याचे पठाण, डावे बाजूस सुजाउद्दौला व उजवे बाजूस नजीबखान व इतर सरदार होते. छावणीपासून अर्ध्या-कोसावर अबदालीनें मोर्चे दिले होते. दोन्ही छावण्यांत सुमारें एक कोसाचें अंतर होतें. गिलच्यांनीं मोठं मोठे वृक्ष तोडून ते आपणा-समोर तटाप्रमाणें रचले होते. मराठ्यांनीं आपल्या सैन्याच्या मध्यभागीं एक रणस्तंभ उभा केला होता, व त्यावरून ते अबदालीच्या सैन्यांतील हालचालींची टेहेळणी करीत असत.

युद्धास सुरवातः—अशा रीतीनें दोन्ही फौजांचे तळ पड-ल्यावर दररोज गोळागोळी सुरू झाली. तोफांच्या गोळ्यांनीं उभय पक्षांकडील जनावरें व माणसें रोजच्यारोज मरूं लागलीं. पेंढारी अबदालीचे अघाडीपिछाडीवर छापे घालूं लागले. दाणावैरण आण-ण्याकरतां इकडून मराठ्यांच्या व तिकडून अबदालीच्या टोळ्या बाहेर पडत, त्यांच्या चकमकी झडूं लागल्या. ता० ८ नवंबर रोजीं कृष्ण जोशी संगमेश्वरकर हा तोफेचा गोळा लागून ठार झाला. अशा रीतीनें युद्धास थोडथोडें तोंड लागलें. अबदालीची सरदबंद करून त्याला सतावून सोडण्याविषयीं भाऊनीं गोविंदपंत बुंदेले यास नरमगरम रीतीनें लिहिण्याची शिकस्त केली. परंतु गोविंदपंताचे हातून अबदालीस काडीभरही अडथळा झाला नाहीं. अबदालीस अंतरवे-दींतून मनमुराद दाणावैरण बिनहरकत मिळूं लागली. त्यामुळें अबदाली शेर होऊन बसला. अबदालीची स्थिति जसजशी सुधा-

---

१ भाऊसाहेबाचे बखरींत ३०० तोफा होत्या असें दिलें आहे.

रत चालली तसतशी मराठ्यांस विपन्नावस्था प्राप्त होत चालली. ता० १५ नोवेंबरपासून मराठयांचे छावणींत अन्नाची टंचाई पडूं लागली, व हळूहळू लोकांची उपासमार होऊं लागली. मराठ्यांचे पिछाडीस पहाडी मुलूख असल्यामुळें तिकडून त्यांस दाणावैरण मिळण्याची मुळींच सोय नव्हती, व अघाडीस अबदाली तोंड दाबून बसला होता; त्यामुळें दिल्लीच्या बाजूनेंही रसद पोहोंचेनाशी झाली. मराठयांचे लष्करांत महागाई झाली. सभोंवार गिलचे लोक विरव्या घालूं लागले. दाणावैरणीची रसद मुसलमान लोक मधल्यामध्येंच मारीत. जवळचा जो खजिना होता तो संपला, त्यामुळें पैशाचा व दाण्याचा एकदम दुष्काळ पडला. दर दिवस चतकोर भाकरीपर्यंत मजल येऊन ठेपली. लष्कर अगदीं जेरीस आलें. वैरण न मिळाल्यामुळें घोडे, हत्ती, उंटें पटापट मरूं लागलीं. पैशाची तूट पडली तेव्हां लष्करांत सोन्यारुप्याची जेवढी चीजवस्त होती, तेवढी मोडून भाऊशाई, मल्हारशाई, जनकशाई, अशा मोहरा व रुपये पाडले; तरी पैसा पुरेनासा झाला. सर्व लोकांची हिम्मत खचली. तमाम फौजेंत निरवानिरव होऊं लागली. आतां आपण येथून जगून जाऊं असें कोणासही वाटेना. प्राणांतसमय जवळ आला असें वाटून प्रत्येकाच्या चेहऱ्यावर उदासीनता दिसूं लागली. दाणा व खजिना दिल्लीस होता. परंतु तो तिकडून इकडे येऊन पोहोंचेना. बरें एखादा लमाण चुकून आला तर प्रथमतः जे जात त्यांस थोडेंसें धान्य मिळे. पैसा जवळ असूनही धान्य मिळेना. अशा रीतीनें भाऊसाहेब पानपतांत कोंडले जाऊन मारावें किंवा मरावें याशिवाय त्यांस दुसरी तोड उरली नाहीं.

विश्वासरावाचें कुमकेसाठीं नानासाहेबांस पत्रः—अशा प्रकारची भयंकर स्थिति प्राप्त झाली तरी भाऊंचा अभिमान सुटेना. आपल्या स्थितीचा विचार करून त्यांनीं योग्य वेळीं कुमकेसाठीं नानासाहेबांस पत्र लिहिलें असतें तर पानपतचा भयंकर प्रसंग मराठ्यांवर ओढवण्याची भीति बरीच कमी झाली असती, किंबहुना तो ओढवलाही नसता. परंतु आपण नानासाहेबांजवळ गिलच्यांचें पारिपत्य करण्याची प्रतिज्ञा करून निघालों, तेव्हां आतां आपल्यासारख्या शूर वीरानें मदत मागवी यांत आपला कमीपणा आहे असें त्यांस वाटूं लागलें. वृथाभिमानाच्या कचाटींत सांपडून ते स्वस्थ बसले. विश्वासराव यास हें वर्तमान समजलें तेव्हां त्यानें जनकोजीच्या मसलतीनें नानासाहेबांस पत्र लिहिलें कीं, " गिलच्यांचा पेंच भारी पडला. निभावणी व्हावयाचा प्रकार राहिला नाहीं. भाऊसाहेब हे अभिमानी पुरुष. यांतच गर्द होतील परंतु व्यंगोत्तर लिहिणार नाहींत. यास्तव या संकटांत आणखीं ५० हजार फौज व क्रोड रुपये खजिना असें पाठवितां तरी तुमचीं आमचीं दर्शनें होतील. नाहींतर पत्रीं लिहिली भेट समजावी. नानासाहेब ! आम्हांसारखे तुम्हांस पुत्र आहेत व आणखीं होतील, परंतु भाऊंसारखा बंधु मिळणार नाहीं." पुढें हें वर्तमान भाऊंस समजलें तेव्हां त्यांस मोठा राग आला. त्यांनीं विश्वासराव यास बोलावून सांगितलें कीं, " तुम्हांस जीव निभावणें असेल तर उत्तम आहे. अजुनी लावून द्यावयास फुरसत आहे. हरप्रयत्न करून तुम्हांस दिल्लीस पावते करतों. तेथून पांच हजार फौज घेऊन देशास जाणें. आमची आस्था धराल तर आजचीं शंभर वर्षे पूर्ण भरलीं." भाऊंचें हें भाषण ऐकून वि-

श्वासरावास फार वाईट वाटलें व तो खालीं मान घालून बसला. नंतर भाऊंच्या पायांवर हात ठेवून 'पुनः मी असें पत्र लिहिणार नाहीं' अशी त्यानें शपथ वाहिली, व भाऊंचा राग शांत केला. भाऊंच्या मानी स्वभावाचें हें एक उत्तम उदाहरण आहे. वास्तविक विश्वासरावानें नानांस जें पत्र लिहिलें तेंच भाऊंनीं त्या पूर्वीं कधींच लिहावयास पाहिजे होतें, व तसें झालें असतें तर नानासाहेबांची भाऊंस योग्य वेळीं कुमक पोहोंचून पुष्कळ अंशीं पानपतचा प्रसंग टळला असता.

शिंदे व मेहेंदळे यांचा कलह व जनकोजीचा शत्रूशीं पहिला सामनाः—एके दिवशीं शिंदेहोळकर, दमाजी गायकवाड, बळवंतराव मेहेंदळे वगैरे सरदार बसले होते. बळवंतरावानें कर्नाटकांत बरेच विजय संपादन केल्यामुळें त्याच्या शौर्याची बरीच प्रसिद्धि झाली होती. शिवाय भाऊसाहेबांची त्याच्यावर फार मर्जी होती, त्यामुळें त्यास बराच गर्व चढला होता, व भरसभेंत तो वाटेल त्या सरदारास चीड येण्यासारखें मर्मभेदक भाषण करीत असे. वर सांगितलेल्या दिवशीं तो शिंदेहोळकर यांस उद्देशून ह्मणाला कीं, " शिंदेहोळकर एवढे लढवय्ये सरदार असतां त्यांची हिम्मत खचली. अगदीं हतवीर्य झाले. मला वाटतें आम्हीं हिंदुस्तानांत आलों ह्मणून ते असें करितात." मल्हाररावानें तें भाषण थट्टेवर नेलें, परंतु जनकोजीस तें सहन न होऊन त्यानें भाऊसाहेबांसमक्ष बळवंतरावास प्रत्युत्तर केलें कीं, "बळवंतराव तुम्हीं आमचें काय पाहिलें आहे? आमची हिम्मत हरली ह्मणतां, पण तुह्मीं दिग्विजय कोणता केला? तुह्मांस आमचा तमाशा पाहणें असेल तर उदयिक युद्ध करतों." असा रोकडा जबाब देऊन जनकोजी रागानें सभेंतून निघून

गेला, व सभेंत घडलेला प्रकार आपले सरदार व मानकरी मंडळीस सांगून दुसरे दिवशीं लढाईची तयारी करण्याची आज्ञा केली. भाऊंनीं मल्हारराव होळकर यास जनकोजीची समजूत करण्यास सांगितलें. परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. पहाट होतांच जनकोजी आपल्या तमाम फौजेसह बाहेर पडला व मल्हाररावास मदतीस येण्याविषयीं त्यानें निरोप पाठविला. भाऊंच्या आज्ञेशिवाय आपण गेलों तर त्यांचा रोष होईल अशी भीति मल्हाररावास पडून स्वतः न जातां त्यानें संताजी वाघ, व भोजराव बारगळ, यांच्या समागमें फौज देऊन त्यांस जनकोजीच्या मदतीस पाठवून दिलें. भाऊंस हें वर्तमान समजलें तेव्हां त्यांनीं बळवंतराव मेहेंदळे यास बोलावून आणून सांगितलें कीं, "हुजरतीची फौज सिद्ध करून जनकोजी शिंदे यांची कुमक करावी. त्यांचे वडील आमचे सेवेवर कामास आले. तो वंश एवढाच राहिला आहे. तोही तुम्हीं वचनानें पोळून इरेस घातला हें उत्तम नाहीं. सत्वर कुमक करणें." अशा रीतीनें भाऊंनीं मेहेंदळे यास जनकोजीचे मदतीस पाठवून दिलें.

मराठ्यांची फौज बाहेर पडली असें पाहून अबदालीच्या छावणींतून नजीबखान, अहमदखान लंगडा, सुजाउद्दौला हे बरोबर निवडक फौज व दहापंधरा तोफा घेऊन बाहेर पडले. दोन्ही सैन्यांची दृष्टादृष्ट होतांच प्रथमतः दोन्हींकडून तोफांचा व बाणांचा मारा सुरू झाला. सुमारें तिसरे प्रहरापर्यंत गोळागोळी सुरू होती. होळकराचा सरदार संताजी वाघ यानें गनिमी काव्यानें लढाई सुरू केली. तेव्हां गिलचे व पठाण एकदम त्याच्यावर घसरले. तेव्हां वाघाची पीछेहट होऊन तो परत फिरला, व शिंद्याचे फौजेचे आश्रयास गेला. त्यामुळें मुसलमानांनीं शिंद्याचे फौजेवर लगट केली. दोन्ही सैन्यें एक-

मेकांवर आदळलीं तेव्हां तोफा, बाण वगैरे बंद होऊन तरवारींची चकमक सुरू झाली. मराठ्यांनीं त्या दिवशीं लढण्याची शिकस्त केली. संध्याकाळ झाला तरी कोणी कोणास हटेनात. शेवटीं जनकोजीनें शत्रूवर जोराचा हल्ला करून खेंचीत खेंचीत त्यांचे गोटांत त्यांस परत नेऊन घातलें, त्यांच्या दोन चार तोफा ओढून आणल्या, व अवजड होत्या त्यांचे कानांत खिळे मारले. अंधार पडला तेव्हां जनकोजी आपले फौजेसह डेऱ्यास परत आला. ही लढाई ता. २३ नवंबर इ. स. १७६० रोजीं झाली. ह्या लढाईत शत्रूचीं सहा सातशें व मराठ्यांचीं दोन अडीचशें माणसें पडलीं.

मेहेंदळे जनकोजीचे मदतीस आला होता तरी तो लढाईत न शिरतां आपले फौजेसह एका बाजूस उभा होता. त्याचे मनांत असें होतें कीं, शिंदेहोळकरांची फौज गिलच्यांपुढें धास्ती खाईल व तिचा निभाव लागणार नाहीं. मग ऐन वेळेस आपण शत्रूवर हल्ला करून त्याचा पराभव करावा, व यशाचा वांटा आपण घ्यावा. परंतु त्याचे मनाप्रमाणें कांहींच घडून आलें नाहीं. अशा प्रकारचा स्वार्थपरायणतेचा विचार त्यानें मनांत न आणतां ऐन प्रसंगीं जनकोजीस मदत केली असती, तर त्या दिवशीं शत्रूचे पांच सहा हजार लोक मराठ्यांनीं रणभूमीवर लोळवले असते.

दुसरें युद्ध व बळवंतराव मेहेंदळे याचा मृत्युः—पहिल्या युद्धांत पराभव पावल्यामुळें अबदाली व त्याचे साथीदार बरेच घाबरले होते. दुसरे दिवशीं मराठ्यांनीं तसाच सामना दिला असता तर शत्रूची पांचांवरच धारण बसली असती. परंतु भवितव्यतेपुढें इलाज नाहीं. मराठे झालेल्या जयाबद्दल आनंद मानीत स्वस्थ बसले. परंतु मेहेंदळे यानें शिंद्यास मदत न केल्यामुळें सर्व

लोक मेहेंदळ्यास दूषण देऊं लागले, व सर्व मसलत त्यानें फसविली असें ह्मणूं लागले. बळवंतरावाचे मनास ती गोष्ट लागून स्वतः लढाई देण्याचा त्यानें निश्चय केला, व परवानगी मागण्याकरतां तो भाऊसाहेबांकडे गेला. प्रथमतः भाऊनीं त्याचें मन वळविण्याचा प्रयत्न केला, पण शेवटीं त्याचा दुराग्रह जाणून त्यास आज्ञा दिली, व हुजुरातच्या लहान थोर सर्व सरदार मंडळीस जरीपटक्यासह बळवंतरावाचे मदतीस पाठवून दिलें. त्या दिवशीं दुसरे कोणी सरदार त्याचेबरोबर निघाले नाहींत. फक्त शिंदेहोळकर मात्र आपल्या फौजेसह एके बाजूस उभे राहिले. या युद्धांत यशप्राप्ति झाली तरच भाऊंस तोंड दाखवावयाचें, नाहीं तर लढाईत धारातीर्थी देह ठेवावयाचा, अशा निश्चयानें बळवंतराव त्या दिवशीं लढाईस निघाला. बळवंतरावानें आपणाबरोबर आपली स्त्री लक्ष्मीबाई व पुत्र आप्पाराव यांस घेतलें होतें. लढाईस जाण्यापूर्वी त्यानें सर्व गोष्टींची निरवानिरव केली, व तो लक्ष्मीबाईची शेवटची भेट घेण्याकरतां ह्मणून गेला. त्या वेळीं त्याचा कंठ दाटून येऊन त्याच्यानें एक शब्दही बोलवेना. शेवटीं मोठ्या कष्टानें त्यानें लक्ष्मीबाईस सांगितलें कीं, " ईश्वरानें मला या लढाईत यश दिलें तर उत्तम आहे, नाहींतर तुमची आमची भेट यापुढें स्वर्गांत होईल. " हे निराशेचे शब्द लक्ष्मीबाईचे कानीं पडले तेव्हां तिची काय अवस्था झाली असेल त्याची कल्पना वाचकांनींच करावी. लक्ष्मीबाई महा पतिव्रता, तिनें तें सर्व दुःख गिळून व तो प्रसंग ओळखून उत्तर दिलें कीं, ' फार उत्तम गोष्ट सांगितलीत. मनुष्याचे आयुष्याची मर्यादा शंभर वर्षे आहे. त्या अवधींत तो केव्हां तरी मृत्युमुखीं पडणारच. तेव्हां धारातीर्थी अशा समारंभांत मरण

आलें तर अति उत्तम. त्याची क्षीत कशाला करावी ? परंतु इतकें मात्र सांगतें कीं, आपण लौकिक करून गेलां तर मीही मागें न राहतां आपणाबरोबर येईन." लक्ष्मीबाईचे वरील शब्द प्रत्येक सुशिक्षित स्त्रीनें लक्षांत धरण्यासारखे आहेत. अशा रीतीनें स्त्रीची शेवटची भेट घेऊन बळवंतराव हुजुरातची फौज व जरीपटका घेऊन युद्धास निघाला. तिकडून गिलचे व रोहिले पांच सहा हजार फौज बरोबर घेऊन बाहेर पडले. बळवंतराव मारीन किंवा मरेन अशा निश्चयानें बाहेर पडला होता. त्यामुळें तो मोठया निकरानें लढूं लागला. परंतु शत्रूनें मराठयांवर तोफांचा भयंकर भाडिमार केला. त्यामुळें मराठ्यांनीं कच खाल्ली. धूर, रेती व धुरळा यांनीं दशदिशा धुंद होऊन गेल्या. मनुष्यें व जनावरेंहीं धुंद झालीं. शत्रु कोण व मित्र कोण ? हें ओळखेनासें झालें. मराठे मागें हटले त्याबरोबर शत्रूची फौज मराठ्यांचे गोटावर चालून आली. शिंदेहोळकर बाजूस उभे होते त्यांस धुरळ्यामुळें कांहींच दिसेना, व त्यांच्यावर मागून गोळ्यांचा वर्षाव होऊं लागला. इतक्यांत मोठा वारा सुटून धुरळा नाहींसा झाला. मराठे पहातात तों रोहिल्यांचीं निशाणें मराठ्यांनीं खंदकाचे बाजूनें जे मोर्चे उभारले होते तेथपर्यंत येऊन थडकलीं. मेहेंदळे यानें हा प्रकार पाहून "आतां भाऊंस तोंड काय दाखवावें" म्हणून शत्रूवर अशा जोरानें हल्ला केला कीं, त्यामुळें गिलच्यांची फौज जागचेजागींच थबकली. शिंदेहोळकर यांनीं हा पराक्रम पहातांच आपली फौज मध्यें घालून शत्रूवर मारा चालविला. तोंडावर मेहेंदळे व मागून शिंदेहोळकर अशा रीतीनें गिलचे व रोहिले मराठ्यांचे कैचींत सांपडले. दोन्ही फौजा हातघाईस आल्या व भयंकर कत्तल सुरू झाली. रक्ताचे पाट चालले. मुडद्यांचे ढीग प-

ढले. पण अशा आणीबाणीच्या प्रसंगीं बळवंतराव यांस छातींत गोळी लागून तो घोड्यावरून खालीं पडला. त्याबरोबर पठाण लोक धांवले. एकानें त्याचे तोंडावर तरवारीचा वार केला व त्याचें शीर नेण्याकरतां दुसरा एक त्याचा गळा कापूं लागला. अर्धा गळा कापला इतक्यांत खंडेराव नाईक निंबाळकर अकलूजकर यानें पांच सहा राउतांनिशीं त्यांच्यावर हल्ला केला. व शिपाईगिरीची शर्थ करून त्यानें बळवंतरावाचा मुडदा सोडवून आणला. शिंदेहोळकर यांस हें वर्तमान समजतांच त्यांनीं मोठ्या जोराचा नेट करून शत्रूचे सुमारें पांच हजार लोक कापून काढले. मराठ्यांच्या आराव्यापुढेंच तर शत्रूचे दीड हजार लोक मरून पडले होते. मराठ्यांकडीलही फार लोक मेले व सहा सातशें जखमी झाले. ही लढाई ता० ७ दिजंबर इ० स० १७६० रोजीं अस्तमानीं सुरू झाली, व ती तीन घटका रात्रीपर्यंत चालली होती. गिलच्यांचा पराभव होऊन ते आपले गोटांत निघून गेले. बळवंतराव हा भाऊंचा मुख्य सल्लागार होता. तो पडल्यामुळें भाऊंस फार दुःख झालें. बळवंतराव ची स्त्री लक्ष्मीबाई हिनें पुत्र आप्पाराव यास भाऊंचे पदरांत घालून सहगमन केलें.

गोविंदपंत बुंदेले याचा मृत्युः—मागें सांगितल्याप्रमाणें खजिना पाठविण्याविषयीं व अंतरवेदप्रांतीं जाऊन त्या प्रांतांतून अबदालीस रसद पोहोंचत होती ती बंद करून अबदालीस हैराण करण्याविषयीं भाऊंचीं गोविंदपंत बुंदेले यास एकसारखीं पत्रें चाललींच होतीं व तो मनापासून टाळाटाळ करीतच होता. शेवटीं १९ नवंबर १७६० रोजीं भाऊ गोविंदपंतास लिहीतात कीं, “ फौजेसुद्धां लवकर येणें, ऐवज रवाना करणें, हें लिहिलेप्रमाणें एकही काम

होऊन आलें नाहीं. फार दिवस खावंदानें लहानाचें थोर केलें, वाढविलें, त्याचें सार्थक केलें! अजून सावध होऊन लिहिलेप्रमाणें येऊन पोहोंचणें." पुढें भाऊसाहेबांची सरशी होत आहे व नानासाहेब दक्षिणेंतून तीस पसतीस हजार फौज घेउन नर्मदेपर्यंत आले आहेत, इत्यादि वर्तमान गोविंदपंतास समजलें तेव्हां 'आतां आपण ढिलाई केली तर पुढें आपली धडगत रहाणार नाहीं' असें त्यास वाटून तो आपल्या फौजेसह दिल्लीस आला, व नारो शंकर याचे हाताखालची आणखीं फौज घेऊन तो अबदालीची रसद मारण्याकरितां अंतरवेदींत गेला. जैतागुजर म्हणून एक लुटारू सरदार त्या प्रांतीं होता. त्यानें ती बातमी अबदालीस दिली. तेव्हां अबदालीनें दुंदेखान रोहिला, उमरावगीर गोसावी व अहमदखान लंगडा पठाण याचा भाऊ यांच्याबरोबर पंधरा हजार फौज देऊन त्यांस गोविंदपंतावर पाठवून दिलें. गोविंदपंत त्या प्रांतीं सावधगिरीनें न राहतां खंडण्या वसूल करीत करीत चालला होता. पठाणांनीं मोंगलाई मसलत करून आपले फौजेंत होळकराचीं निशाणें लाविलीं व ते गोविंदपंतावर चाल करून आले. मराठी फौजेनें दुरून ती फौज पहातांच त्यांनीं आपली जीनबंदी केली. परंतु गोविंदपंतानें आपले फौजेस सांगितलें कीं, "नारो शंकर याची फौज आली. निशाणें त्यांचींच आहेत." त्यामुळें ते बेसावध राहिले. इतक्यांत पठाणांनीं गोविंदपंतावर छापा घातला. मराठी फौजेची दाणादाण होऊन ती अस्ताव्यस्त रीतीनें पळूं लागली. स्वतः गोविंदपंत पळतां पळतां घोड्यावरून खालीं पडला. तेव्हां जवळच्या एका सरदारानें त्याला पुनः घोड्यावर बसविलें, व तो पुनः पळूं लागला. पठाण मराठ्यांची कत्तल करीत चालले. गोविंदपंत पळतां पळतां पुनः घोड्या-

वरून खालीं पडला, व त्याचा पाय मोडला. गोविंदपंताबरोबरचे लोक, प्रत्यक्ष त्याचा मुलगा बाळाजी, हे स्वप्राणरक्षणाकरतां गोविंदपंतास तसाच टाकून देऊन पळून गेले. गोविंदपंत पठाणांचें हातीं सांपडला. त्या वेळीं त्यानें "मला प्राणदान दिल्यास एक कोट रुपये देतों," म्हणून त्यांस सांगितलें. परंतु त्यांनीं गोविंदपंताचा एकदम शिरच्छेद केला, व धड तेथेंच टाकून देऊन शीर अबदालीकडे पाठवून दिलें. या गर्दीत पठाणांनीं मराठ्यांचे सुमारे पंधराशें लोक कापले. पुढें एक दोन दिवसांनीं अबदालीनें तें शीर भाऊसाहेबांकडे पाठवून दिलें व पत्र पाठविलें कीं, "तुमचे गोविंदपंत पुढें तुह्मांस स्वर्गी जागा पहावयास गेले आहेत आणि तुम्हांस न्यावयास शीर पाठविलें आहे. होय न होय हें पहावें." गोविंदपंताचें शीर पाहून सर्व सरदार मंडळीची मुखश्री म्लान होऊन गेली, व त्यांच्या मनाला जबरदस्त धक्का बसला. भाऊसाहेबांस अबदालीच्या या दर्पोक्तीचा मोठा राग आला व त्यांनीं त्यास असें उत्तर पाठविलें कीं, "तो जागा सर्वत्रांचा आहे, याशिवाय दुसरी गती कोणती आहे? प्रस्तुत तुम्ही थोर कंदाहारचे पादशाह, तुम्ही तेथें जाल, तेव्हां तुमच्या स्वरूपाप्रमाणें मान झाला पाहिजे. ह्मणोन तुमचे मेजवानीस पुढें गोविंदपंत बुंदेले साहित्यास गेले आहेत." नंतर गोविंदपंताचें शीर नेऊन त्यास अग्नि दिला. गोविंदपंत ता० २२ दिजंबर रोजीं मारला गेला.*

मराठ्यांचे खजिन्याची लूट:—गोविंदपंताचा वध झाल्यावर त्याचा पुत्र बाळाजी गोविंद व सरदार पाराशर दादाजी वाघ हे राहिलीसाहिली फौज बरोबर घेऊन दिल्लीस येऊन राहिले.

* म. इ. सा. खंड १ लेखांक २७२.

होते. खजिना पाठवून देण्याविषयीं भाऊसाहेबांचीं निकडीचीं पत्रें येतच होतीं. तेव्हां २ जानेवारी इ० स० १७६१ रोजीं बाळाजीनें पाराशरपंत वाघ याचेबरोबर प्रत्येकीं पांचपांचशें रुपयांची थैली दिलेली असे तीनशें स्वार व बंदोबस्ता करतां दुसरे कांहीं लोक देऊन त्यास भाऊसाहेबांकडे रवाना केलें. पाराशरपंत तिसऱ्या दिवशीं ह्मणजे ता० ५ रोजीं चाळीस कोस मजल मारून चार घटका रात्रीस मराठ्यांचे लष्करापासून दोन कोसांचे अंतरावर येऊन पोहोंचला. परंतु दुर्दैवानें त्याच दिवशीं सुजाउद्दौल्याची कांहीं फौज दिल्लीचे रस्त्यावर येऊन उतरली होती. पाराशरपंत यास तें मराठ्यांचें लष्कर आहे असें वाटून त्यानें गोट कोणाचा आहे ही चवकशी करण्याकरतां एक राऊत पाठवून दिला. तेव्हां त्या लोकांनीं लबाडी करून 'इब्राहिमखान गारद्याचा गोट आहे' असें त्यास सांगितलें. तेव्हां मराठे स्वार आपल्या खजिन्यासह गोटांत शिरले, व अचानक शत्रूच्या हातीं सांपडले. शत्रूनीं हुल्लड केल्याबरोबर वाघ यास आपली चूकी कळून आली पण उपयोग काय? थोडीशी मारामारी करून कांहीं स्वारांनिशीं मोठ्या शिकस्तीनें तो भाऊंचे लष्करांत येऊन मिळाला. राहिलेल्या लोकांस शत्रूनें ठार मारलें. अशा रीतीनें बाळाजीनें पाठविलेला बहुतेक खजिना शत्रूच्या लोकांनीं लुटला.

भाग सतरावा.

पानपत येथील रणयज्ञाची पूर्णाहुतिः—वर सांगितल्याप्रमाणें उभय पक्षीं चकामकी झडत होत्या तरी सलोख्याचीं बोलणीं सुरू होतींच. दोघांसही एकमेकांचें भय होतें. सुजाउद्दौला व दुसरे कांहीं मुसलमान सरदार तहास अनुकूल होते. परंतु नजीबखान

विरुद्ध होता. अटकेपर्यंत मुलूख घेऊन अबदालीनें परत जावें असें भाऊंचें ह्मणणें होतें. परंतु मराठ्यांची विपन्नावस्था जसजशी वाढत चालली तसतसा अबदाली भलतींच मागणीं करूं लागला. भाऊंसारखा मानी पुरुष तीं कशीं कबूल करणार ? अबदालीचा व त्याच्या साथीदारांचा असा विचार होता कीं, तहाच्या लालुचीवर भाऊंस लटकत ठेवावें व उपासमरीमुळें मराठ्यांची फौज हैराण झाली ह्मणजे तिचा एकदम नाश करावा. सुमारें महिना दीड महिना धान्याचे तोट्यामुळें मराठ्यांचे फार हाल झाले. जवळचा पैसा नाहींसा झाला. अन्नावांचून जनावरें व मनुष्यें पटापट मरूं लागलीं. त्या वेळीं सर्व लोकांनीं भाऊंस विनंती केली कीं, "आह्मांस रणांत मारावें, परंतु अन्नाविणें मारूं नये. आज सवा महिना सर्वांनीं तवाई सोसली. अन्नापाण्यासाठीं घोड्यामाणसांचे प्राण जातात. पुढें महाराज काय तजवीज सांगणें ती सांगावी. अन्नावाचून हात पाय सुजले. तरवार कोणत्या रीतीनें धरावी ? आतां साहेबीं ओंजेपर्यंत यश संपादून शत्रु पादाक्रांत केला. आतां सर्व दौलत बुडवून नाश आरंभिला, दुसरें कांहीं एक नाहीं. विनाश काळासारखी तुमची बुद्धि झाली. आपणाबरोबर आम्हां सर्वांचीं घरें बुडतात. आमचीं रांडापोरें आमच्या डोळ्यां देखत इराणी सर्व घेऊन जातो, असा समय प्राप्त झाला. तुमचे बुद्धीस भ्रंश झाला ह्मणून आपण कोणाचें तिळमात्रही ऐकत नाहीं. उगाच हेका केला, तो यासमयीं फळास आला. सारांश आपण सर्वांचें मान्य करून सल्लख करून देशीं गेलों ह्मणून भित्रे झालों असा अर्थ नाहीं. ह्या हट्टानें सर्व लयास गेलें. कांहीं आहे तेंही जाणार !" आपल्या फौजेचें हें भाषण ऐकून भाऊंस फार वाईट वाटलें. त्यांनीं शिंदे, होळकर, दमाजी गायकवाड, वि-

इल शिवदेव, समशेर बहादर, अंताजी माणकेश्वर, यशवंतराव पवार, सोनजी भापकर, वगैरे आपल्या सरदारांस बोलावून पुढील मसलतीचा मनसोबा चालविला. तेव्हां मल्हारराव होळकर पुढें सरून ह्मणाला कीं " द्वापारयुगीं राजा दुर्योधन शतबंधूंसहित राज्य करीत असतां द्रौपदीमुळें सर्व राज्य लयास गेलें. त्या काळीं व्यास, विदुर, श्रीकृष्ण यांनीं बहुत प्रकारें सांगितलें. परंतु राजाचें ह्मणणें कीं, "सुईच्या अग्राइतकी मृत्तिका देणार नाहीं." यामुळें मार्गशीर्ष वद्य ३० सायंकाळीं राजा दुर्योधन युद्धांत पडून राज्य हरवलें. तसेंच भाऊसाहेब आपणास घडून आलें. आतां अंत राहिला नाहीं. तुमच्या लष्कराची खराबी दुराणीस कळली. आतां सर्वस्वी बुडवितो. काळचक्रांत पडलों. उत्तम गोष्ट घडून न आली. पहिल्यानेंच स्नेह संपादिला नाहीं. आतां इराणी तुह्मांस खातरेंत आणीत नाहीं. तुह्मी हेका केल्यानें सर्व दौलत बुडविली. या समयीं या ठिकाणीं श्रीमंत राजश्री नानासाहेब असते तर कसच्या गोष्टीचा हेका न करते. तुह्मी प्राणानिशीं जातां. तुमच्या चित्तांत असें येत असेल, इराणीचा मजकूर किती? मारून धुडकावून देऊं, ही गोष्ट सांगतां खरी, परंतु तो प्रसंग आतां नाहीं. हा जीव तुमचे अन्नाचा आहे; या प्रसंगीं खर्च झाला असतां चांगला. परंतु अगोदर अन्नावांचून डोळ्यांपुढें अंधारे येतात. तेव्हां युद्धाची वार्ता कशी करावी? आतां जीवित्वाची तमा करून रांडापोरें वांचतात असा अर्थ नाहीं. तुह्मीं सर्वांचा घात केला. आपल्या हातें सर्व वैभव बुडविलें; आमच्या डोळ्यांदेखत आमचीं रांडापोरें गिलचा बाटवितो यांत संदेह नाहीं; तें दुःख प्रत्यक्ष दृष्टीनें पहावें. आपण आपला कुटुंबघात आपल्या देखत करून घेतला. उद्यांच्या लढाईत आम्ही प्राणांनिशीं गेल्यानें आपली स्वारी फत्ते होते कीं काय?" हें भाषण ऐकून भाऊंचे मनास फार

वाईट वाटलें. त्यांना आपल्या चुका दिसूं लागल्या. पण उपयोग काय? शेवटीं निराश होऊन ते म्हणाले कीं, "होणारास उपाय नाहीं. आपण आपलें अनिष्ट चिंतीत नाहीं. दैवगतीनें घडून आल्यास उपाय कोणता? यश किंवा अपयश महाराज छत्रपतींकडे. आतां शरीर तृणप्राय मानून मर्दुमकीचा हिय्या न सोडतां समशेरीची शर्थ करून दाखवावी. कौरव–पांडव सकळ सेनेसहित कुरुक्षेत्रीं धारातीर्थीं सुस्नात झाले. तदनुरूप आपणही व्हावें. यापरता पराक्रम कोणता? सर्व सत्ता श्रीकैलासनाथाची, त्याप्रमाणें घडून येतें. दूषणें लावतां तीं सर्व प्रमाणच. गेल्या गोष्टी पुढें येतात असें नाहीं. प्रस्तुत पुढची विचारणा चित्तांत आणून छत्रपतींचें यश सांभाळावें. हें यश तुह्मां समस्तांचें आहे. निदान--समय–सागर–तारक पिनाकपाणी आहे. इराणीची तमा ती काय? आतां भय धरल्यानें काय होतें? श्रीसांबकृपेनें इराणीस मारून गर्दीत मिळवून देऊं. सत्कीर्ति करून मरावें या भूषणापरतें दुसरें काय आहे.? उद्यां सर्वांनीं खंदक पार होऊन मारतां मारतां कटून मरावें, या भूषणा परतें काय आहे? आतां कुजून मरावें हें ठीक नाहीं. गिलचे यांचें पारिपत्य करावें. गिलचे यांचें बळ दिवसेंदिवस अधिक होत चाललें आहे, आणि आपलें लष्कर झडत चाललें. घोडीं मेलीं, मातबर खासे घोड्यामुळें पायउतार झाले. यास्तव हा एक वेळ मुक्काम सोडून बाहेर मोकळे रानीं निघून जावें. दिल्लीचा रस्ता सोडून दुसरीकडे जावें तर झाडी मातबर आहे, मार्ग नाहीं. तोफखाना निभावणार नाहीं. यास्तव दिल्लीच्या रस्त्यानें जावयास मार्ग उत्तम आहे. परंतु वाटेवर गिलचे यांचा मुक्काम राहिला आहे. ते जाऊं देणार नाहींत. यासाठीं बंदोबस्तीनें निघून

जावें. यमुनेच्या तीरीं येथून पांच कोसांवर जाऊन नदी पाठीशीं घ्यावी. पुढें गिलच्यांचे तोंडावर तोफखाना द्यावा. दिल्लीचे उत्तर बाजूस राहून दिल्लीहून सरंजाम आणून सारें लष्कर आबाद करावें." "अशा रीतीनें आपण गेलों तर गिलच्यांपुढें आपला निभाव लागणार नाहीं," असें मल्हारराव होळकर यानें सांगितलें. तेव्हां भाऊसाहेब म्हणाले कीं, "कुलबुणगेंसुद्धां झुंझ देत मारीत उडवीत जावें आणि पुढें मुक्काम झाल्यावर चोहोंकडून सरांजामही येऊन पोंहचेल. मग गिलच्यांचें वगैरे पुनः पारिपत्य करूं ." त्या वेळीं जनकोजी शिंदे मल्हाररावास म्हणाला कीं, "निभाव झाला तरी हा विचार उत्तमच आहे; नाहीं तरी निभाव न झाल्यास पुढें गत कैसी होईल? निघण्याचा विचार ठीक दिसत नाहीं. परंतु भाऊसाहेबांचा व सर्वत्र मुत्सद्दी सरदार यांचा, लहान थोरांचा, आग्रह कीं कूच करून दिल्लीच्या रोखें जावें. यास्तव उपाय राहिला नाहीं. परंतु उद्यांच निघून जावें असें नाहीं. रविवारीं कूच करून जावें." त्यावर भाऊसाहेब ह्मणालें, कीं "आज मंगळवार आहे. रविवारास सहा दिवस अवकाश आहे. तोंपर्यंत लष्कराचे लोक कितीक अन्नाविना मरतील. कित्येक अन्नामुळें गिलच्यांचे लष्करांत जातील, मग जाऊन सार्थक काय? इतके दिवस लष्करांत लोकांस धीर पुरवत नाहीं. यास्तव उदईकच कूच करून जावें, मरावें किंवा मारावें हाच सिद्धांत उत्तम."अशा रीतीनें निघण्याचा बेत ठरवून भाऊनीं इब्राहिम गारदी यास बोलावून आणिलें व झालेला सर्व बेत त्यास सांगितला. तुमचा विचार काय आहे ह्मणून त्यास विचारतांच तो म्हणाला कीं, "भाऊसाहेब, तुम्हीं जे समयीं इकडे यावयाची मसलत केली. ते समयीं तुमचें आमचें इमानप्रमाण झालें तेंच करार आहे. आमचें गैरइमान असतें तरी आम्ही

आजपर्यंत येथें तुह्मांपाशीं न ठरतों. तुह्मांस मिथ्या भासेल तर प्रचीत दाखवितों." असें म्हणून त्यानें अबदाली, नजीबखान व सुजा-उद्दौला यांचीं पंचवीस लाखांचा मुलूख घेऊन फितूर व्हावें अशा अर्थाचीं पत्रें दाखविलीं. त्या वेळीं भाऊसाहेबांची त्याच्या इमानी-पणाबद्दल पूर्ण खात्री होऊन ते ह्मणाले कीं, "तुमचें आमचें इमान आहे तेंच करार आहे. परंतु आतां दिल्लीस जाऊन पोहोंचावयाची मसलत कोणती करावी ? निभावणी कैशी होईल ? याची मसलत काय ?" त्या वेळीं इब्राहिमखान यानें असें सांगितलें कीं, "तुह्मी गनीम लोक, तुम्हांस हिम्मत पुरणार नाहीं. तुह्मी आह्मांस घेऊन आलां ते कांहीं निभावणी करावयाची दिसत नाहीं. रणांत आह्मांस सोडून जाल. आह्मांस मात्र मृत्यूनें गांठलें हेंच खरें." तेव्हां भाऊसाहेब त्यास ह्मणाले कीं, "तुह्मांस सोडून आह्मी कदापि जाणार नाहीं. तुह्मी जेथें ठाकून उभे रहाल तेथें आम्हीही येऊं; परंतु रण सोडून जाऊं, हें घड-णार नाहीं." अशा रीतीनें भाऊंनीं इब्राहिमखानाची खात्री केल्या-वर त्यानें सांगितलें कीं, "हरप्रयत्नें दिल्लीस पोहोंचावें हें खरेंच आहे. आतां जावयास उपाय सांगणें, त्या रीतीनें वर्ताल तर अवघेच पार पडून जाऊं. याची मसलत एक आहे कीं, देशीं मोंगल ।निजाम-अल्ली तुह्मांशीं लढाई हमेषा करतो, त्याजप्रमाणें गोल बांधून, मध्यें बुणगे घालावेत व भोंवताला आराबा वांटून द्यावा. चहूंकडे चार मातबर सरदार देऊन जिकडील तिकडे बाजवा वांटून द्याव्या, आणि कोस दोन कोस लढत भांडत दिल्लीस जाऊन पोहोंचावें." ही व्यूहरचना शेवटीं इब्राहिमखान गारदी व मल्हारराव यांच्या मता-प्रमाणें ठरल्यावर सर्व सरदार मंडळीनें आपला ठराव करून नि-श्चयानें लढाई करण्याविषयीं विडे उचलले. नंतर सभा बरखास्त

होऊन जे ते आपापल्या ठिकाणीं गेले. त्या रात्रीं मराठी फौजेंत सर्व उदासीनतेचीं लक्षणें दिसूं लागलीं. सर्वजण एकमेकांस भेटून शेवटची स्थिति जो जिवंत राहून दक्षिणेंत जाईल त्यानें तिकडील मंडळीस सांगावी असें सांगूं लागले. सर्वजण जिवावर उदार झाले, व त्यांच्या अंगांत वीरश्रीचें वारें संचरूं लागलें. सर्वांनीं रात्र चैनींत घालविण्याचा निश्चय केला. त्या दिवशीं भाऊ व विश्वासराव यांनीं उपवास केला होता. रात्रीं मात्र थोडासा फराळ केला. क्षणभर झोंप घेऊन उठावें असा बेत करून भाऊ आपल्या तंबूंत गेले. या शेवटल्या आणीबाणीच्या प्रसंगीं तहाचा उपाय करावा म्हणून त्यांनीं घाईघाईनें काशीरायास बोटभर चिठी लिहिली कीं, "भाडें पूर्ण भरलें. एक बिंदूही जास्त राहूं शकत नाहीं. सल्ल्याचें काय करणें असेल तर तें आतां करा. अगर नाहीं म्हणून साफ सांगा." ही चिठी जासुदाबरोबर पाठवून भाऊ निद्रेस गेले. मराठ्यांस ही भयंकर रात्र कशी गेली असेल याचा वाचकांनींच विचार करावा. परंतु 'सतीचें वाण' घेतल्यामुळें मराठे लोक मृत्यूविषयीं बेफिकीर झाले. पहाटेची प्रहर रात्र असतांच भाऊ व विश्वासराव उठून त्यांनीं निशाणाजवळ लौकर तयार होऊन यावें म्हणून सर्व सरदारांस आज्ञा केली. ते बाहेर पडण्याची ललकारणी होतांच सर्व मराठ्यांच्या तळावर रणवाद्यांचा एकच गजर झाला. भाऊ व विश्वासराव अंबारींत स्वार झाले. भल्या पहाटेस सर्व सरदार आपापल्या फौजेसह भगव्या झेंड्यापाशीं जमा झाले, व त्यांनीं भाऊंस मुजरे केले. सर्व सरदारांस पण मुख्यत्वें करून शिंदे, होळकर व गायकवाड यांस उद्देशून भाऊसाहेब म्हणाले कीं, "आजचा निदानसमय

---

१ सुजाउद्दौल्याचा वकील.

आहे. शंभर वर्षे पूर्ण भरलीं. सतीचें वाण घेतलें. तुम्हीं पुरातन कैलासवासी रावसाहेब (बाजीराव) व आप्पासाहेब (चिमणाजी आप्पा) यांचे वेळचे मुखत्यारी आहां. आजपर्यंत अन्न भक्षिलें त्याचें आज सार्थक करून दाखवावें. स्वर्गी रावसाहेब व आप्पासाहेब भले ह्मणतील, तें कर्म करावें. रायांनीं दौलतसुद्धां आह्मांस तुमचे हवालीं करून कैलासभुवनास गेले. त्या गोष्टीची शरम तुह्मांस येऊन यश किंवा अपयश हें तुमचें तुह्मीं सांभाळावें." असें बोलून भाऊंनीं सरदारांपुढें पदर पसरला. तेव्हां त्यांनींही वचनप्रमाण देऊन जे ते आपापल्या ठिकाणीं गेले.

थोड्याच वेळानें मराठयांची फौज खंदक सोडून मैदानांत आली. पूर्वी ठरल्याप्रमाणें सैन्याची रचना केली. इब्राहिमखान गारदी व त्याचा तोफखाना पुढचे बाजूस. शिंदेहोळकर व दुसरे कांहीं बारिक सारिक सरदार आपापल्या फौजेसह उजवे बाजूस होते. दमाजी गायकवाड, यशवंतराव पवार, अंताजी माणकेश्वर, विठ्ठल शिवदेव विंचूरकर, समशेर बहाद्दर व आणखीं लहानथोर पथके डावे बाजूस होते. सर्वांच्यामध्यें भाऊसाहेब, विश्वासराव व पार्वतीबाई यांच्या अंबाऱ्या होत्या. तोखान्यापैकीं मोठमोठया तोफा निवडून त्या गिलच्यांच्या तोंडावर घातल्या, लहानलहान तोफा सभोवार ठेविल्या, व त्यांचेमागें गारदी यांचा रिसाला नेमून दिला. त्यांचेमागें सड्या फौजा, त्यांचेमागें बुणगें व त्यांचेमागें पुनः सड्या फौजा, अशा रीतीनें गोल बांधून मराठ्यांचा सेनासागर तळ सोडून जमावसुद्धां दिल्लीच्या रस्त्यानें चालूं लागला. सुमारें दीड कोस गेल्यावर भाऊंनीं अशी मसलत काढिली कीं, "आपण नीट चालोन जावें. आह्मांस गिलच्यानें वाट देऊन एकीकडे बगल मारून (एके बाजूस होऊन) जाहला

तरी लढाईचें प्रयोजन नाहीं. आणि मार्ग मोकळा करीत नाहीं तरी मधींच घोडे घालून मारामार करीत उधळून मार देत, नीट निघोन जावें, " व तशा रीतीनें सैन्याची व्यवस्था करावी ह्मणून जासुदांहातीं सर्व सरदार मंडळीस हुकूम पाठविले. तेव्हां पूर्वी गोल बांधून नीट व्यवस्थेनें सैन्यभार चालला होता ती व्यवस्था मोडून लोक ज्याप्रमाणें मुजऱ्यास उभे राहतात त्याप्रमाणें सैन्य उभें राहिलें. सर्व फौज तोफखाना मागें टाकून निशाणें सोडून पुढें चालली. इब्राहिमखान गारदी यानें हा प्रकार पाहून तो जागच्या जागीं स्तब्ध झाला. भाऊसाहेबांनीं अशा रीतीनें पूर्वीची मसलत बिघडविली असें पाहून त्यास फार वाईट वाटलें. त्यानें असा विचार केला कीं, " भाऊसाहेब यांस इमान दिलें आहे त्यापेक्षां आतां मागेंपुढें पहावें तरी आपले पूर्वजांस बोल लागेल. भाऊसाहेब जें करतील त्यास सादर न होतां गत तर नाहीं. दैवीं असेल तेसें घडेल. परंतु रणांत विन्मुख व्हावयाचें नाहीं. आपले आयुष्याची सीमा होऊन शंभर वर्षे आतांच पूर्ण भरलीं हें खरें. " असा विचार करून तो डावे बाजूस हटला.

मराठ्यांच्या हालचालींची शत्रूला वर्दी पोहोंचून तेही तयार होऊन उभे राहिले. भाऊंनीं काशीरायास पाठविलेल्या शेवटच्या चिठीपासून फायदा तर झाला नाहींच, पण उलट अपाय मात्र झाला. कारण मराठ्यांचा बेत अगोदरच शत्रूस कळून पहाटेपासून त्यांनींही आपली उत्तम व्यवस्था करून ठेविली.

दोन्ही सैन्यें समोरासमोर आल्यावर प्रथमतः तोफांची सलामी झाली. त्याबरोबर शत्रूकडील व मराठ्यांकडील सर्व तोफांची एकदम सरबत्ती झडली. धुरानें दशदिशा भरून गेल्या, सूर्यबिंब आच्छादून गेलें. धूर व धूळ यांनीं कोणी कोणास दिसेना. कोणाची

कोणास वर्दी कळेना. अशा रीतीनें एकच गर्दी उसळून गेली. कांहीं वेळानें धूर कमी होऊन हुजुरातीच्या खानदान लोकांनीं आपल्या घोडेस्वारांनिशीं शत्रूवर हल्ला केला. एकवेळ मराठ्यांनीं गिलच्यांस हटवावें, दुसरे वेळीं गिलच्यांनीं मराठयांस मार द्यावा, असा 'हुतूतू'चा खेळ कांहीं वेळ चालला.

नंतर विठ्ठल शिवदेव व यशवंतराव पवार यांनीं आपापल्या फौजा घेऊन शत्रूवर हल्ला केला. परंतु शत्रुसैन्यानें त्यांच्यावर जोराचा मारा केल्यामुळें ते हटले व तोफखान्यापाशीं येऊन उभे राहिले. पुढें गिलच्यांनीं दमाजी गायकवाड याच्यावर हल्ला करून त्यासही मागें हटविलें. पुढें इब्राहिमखानानें तोफांच्या माऱ्याखालीं आपलीं पलटणें पुढें घातलीं. त्यानें शत्रूच्या उजव्या बाजूकडील रोहिलेपठाणांच्या फौजांवर मारा सुरू केला. प्रहर दिवसाचे सुमारास सर्व फौजा चाऱ्ही बाजूंस निकरानें लढूं लागल्या. इब्राहिमखानानें इतक्या निकराचा एक हल्ला केला कीं, त्या सपाट्यांत त्यानें ८००० रोहिले ठार केले, व त्यांचे दुंदेखान वगैरे सरदार जखमी झाले. उजवे बाजूस शिंदेहोळकर होते त्यांच्यावर सुजाउद्दवला चाल करून आला. ह्या दोन्हीं फौजांतील लोकांस परस्परांची माहिती असल्यामुळें ते एकमेकांवर बेलाशक चालून गेले. दोन्हींकडे मोठ्या निकरानें युद्ध सुरू झालें. अशा रीतीनें युद्धाची एकच गर्दी चालली असतां, भाऊसाहेब व विश्वासराव हे अंबारींतून खालीं उतरून अनुक्रमें बोर घोडीवर व पिलवाला घोड्यावर बसून त्यांनीं दुराणीच्या वजिरावर हल्ला केला. त्यांनीं पहिल्या तडाक्यास शत्रूची पंधरा हजारांची फळी फोडून शत्रूचे तीन हजार लोक ठार मारले. या गर्दींत वजिराचा मुलगाही पडला. पण अशा आणीबाणीच्या प्रसंगीं विश्वासरावाचे

छातींत गोळी लागून तो खालीं पडला व तत्काळ मरण पावला. तेव्हां जवळच्या लोकांनीं त्वरा करून त्यास उचलून अंबारींत घालून वर शालजोडी घातली. अशा रीतीनें पेशव्यांचे वंशांतील एक अमोलिक हिरा हरपला.

इकडे भाऊसाहेब स्वतः हातांत तरवार घेऊन मोठ्या शौर्यानें लढत असतां त्यांस ही बातमी समजली, तेव्हां त्यांचे हातपायच गळाले. त्या वेळीं बेहोष होऊन त्यानीं प्रतिज्ञा केली कीं, "गिलच्या खाशासुद्धां ठार करीन तरच पुण्यास जाईन." नंतर त्यांनीं आपल्या घोड्याखालीं उडी टाकिली, आणि समशेरबहादर यास बरोबर घेऊन शत्रुसैन्यांत मुसंडी मारिली. तें पाहून हुजुरातीपैकीं खानदान लोकही 'श्रीमंतांच्या आजपर्यंत खाल्लेल्या अन्नाचा उपयोग करण्याची हीच वेळ आहे' असा विचार करून मोठ्या आवेशानें शत्रूवर तुटून पडले. तेव्हां तिरंदाजी, बंदुका वगैरे सर्व बंद होऊन तरवारींचीच चकमक सुरू झाली. तेव्हां मुर्दावर मुर्दे कोसळून पडूं लागले. त्या वेळीं सर्वांस विलक्षण रणमद चढला असल्यामुळें ते बेशुद्ध होऊन वरून तरवारीचा घाव आला तरी पुढें टाकलेलें पाऊल मागें न घेतां ठांसून उभे राहिले. भाऊसाहेबांनीं तर शौर्याची कमाल करून सोडिली. त्या वेळीं रणभूमीचा देखावा फारच भयंकर दिसूं लागला. कोणाचें शीर तुटून नुसतें कबंधच नाचत आहे! कोणाचें पोट फुटून आंतडीं लोंबत आहेत! मुर्द्यांचे ढिगांवर ढीग पडले आहेत! ज्या ठिकाणीं स्वतः भाऊसाहेब लढत होते तेथें तर रक्ताचे पाट चालले होते. अशा रीतीनें घनघोर रणसंग्राम होऊन कितीएक अमीरउमरावांचे घोडे रिकामे पडले. त्या वेळीं रोहिला माघारीं फि-

रला व खासा अबदाली तर दोन कोस यमुनेच्या अंगास परत गेला. अशा रीतीनें भाऊसाहेबांनीं मर्दुमकीची कमाल केली.

परंतु ह्याच वेळीं दुर्दैवानें एक विपरीत गोष्ट घडून आली. विठ्ठल शिवदेव यानें बरेच पठाण लोक नोकरीस ठेविले होते. त्यांस खुणेकरितां भगवे पटके बांधावयास दिले होते. त्यांनीं या वेळीं ते पटके फेंकून देऊन मराठ्यांचा पराभव झाला असा पुकारा करून मराठ्यांचे लष्करांत लुटालूट सुरू केली. त्यामुळें बाजारबुणगे घाबरे होऊन आपला पराभव झाला व त्यामुळें गिलचे आपणास लुटीत आहेत असा त्यांचा समज होऊन ते पळावयास लागले. तेव्हां फौजेंतील इतर लोकांचाही तसाच समज होऊन तेही रणांगणांतून आपला पाय हळूहळू काढूं लागले. याप्रमाणें मराठी फौजेंत घोंटाळा माजत चालला.

मराठ्यांनीं आपल्या फौजेचा मोड केला असें पाहून अबदालीनें आपलें राखून ठेविलेलें सैन्य पुढें झुंजावयास पाठवून दिलें. त्यांनीं येऊन एकदम हुजुरातीवर व इब्राहिमखानावर हल्ला केला. इब्राहिमखानानें त्यांस न जुमानतां उलट त्यांच्यावर हल्ला केला व त्यांस रेंटीत पुनः पूर्वस्थळावर घालवून दिलें. हें पाहून नजीबखान अंबारींतून खालीं उतरला व आपल्या फौजेसह मोठ्या त्वेषानें मराठ्यांवर चालून आला. त्याबरोबर अहमदखान लंगडा वगैरे सरदारही आपापल्या फौजेनिशीं मराठ्यांवर धांवले. ह्या सर्वांनीं शिंदेहोळकर उजवे बाजूस आहेत असें पाहून मराठ्यांच्या डाव्या बाजूवर हल्ला केला. डाव्या बाजूच्या तोंडाशींच समशेर बहादर होता, त्याच्यावरच प्रथमचा मारा बसला. त्या वेळीं तो मोठ्या शौर्यानें लढला व त्याच्या अंगावर अनेक वार झाले तथापि तो लढतच होता.

परंतु फौजेचा धीर तुटून पळापळ सुरू झाल्यामुळें त्याचा नाइलाज होऊन तो माघारा फिरला. नंतर शत्रूनें दमाजी गायकवाड, विठ्ठल शिवदेव विंचूरकर, अंताजी माणकेश्वर, यशवंतराव पवार यांच्यावर अनुक्रमें हल्ले केले. प्रत्येकानें आपापल्या सामर्थ्याप्रमाणें लढण्याची शिकस्त केली. परंतु फौजेंत पळापळ सुरू झाल्यामुळें त्यांनाही हटावें लागलें. या गर्दीत यशवंतराव पवार ठार झाला.

नंतर इब्राहिमखानावर शत्रूनें पुनः चाल केली. त्यानें जिवाचा धडा करून श्रीमंतांचे पदरीं राहिल्याचें चीज व्हावें ह्मणून मोठ्या शौर्यानें युद्ध केलें. त्याचे पुष्कळ गारदी पडले. परंतु प्रत्येक सरदार आपापल्या धांदलींत असल्यामुळें त्याचे मदतीस कोणी गेलें नाहीं. एकंदर पांच हजार गारदी ठार झाला, तेव्हां बाकीचे लोक हुजुरातीकडे पळूं लागले. इब्राहिमखान स्वतः हातांत तरवार घेऊन शत्रूचे फौजेंत शिरून युद्ध करूं लागला, व एका घटकेंत त्यानें शत्रूचे दहा पांच नामांकित सरदार रणभूमीस बळी दिले. परंतु त्याच्या सभोंवार शत्रूचा वेढा पडला. त्याच्या गारदी लोकांच्या प्रेतांचे ढीगांवर ढीग पडले. स्वतः त्याचा मुलगा व भाचा हे त्याचे डोळ्यांसमोर ठार झाले, व त्याच्या अंगावर अनेक जखमा होऊन तोही घायाळ होऊन पडला. शेवटीं त्यास गिलच्यांनीं धरून नेलें.* इब्राहिमखान जातीचा मुसलमान होता. परंतु ह्या हिंदुमुस-

---

* इब्राहिमखान सुजाउद्दौल्याकडे पाडाव सांपडला होता. त्यास अबदालीचे सरदारांपैकीं एकानें "मी यास कांहींएक न करितां जिवंत तुमच्या स्वाधीन पुनः करीन' अशा करारानें सुजाउद्दौल्यापासून मागून घेतलें. त्यानें त्याच्या जखमांत एक प्रकारचें विष घालून त्यास परत पाठवून दिलें. नंतर आठ दिवसांनीं इब्राहिमखान मरण पावला.–अप्रकट मल्हारराव होळकर याचे

पुढें चालू.

लमानांच्या लढाईत तो निमकहराम बनला नाहीं हें त्यास मोठें भूषणावह आहे.

रणभूमीचे मध्यभागीं भाऊसाहेब लढाई करीतच होते. इब्राहिमखानास धरून नेल्याची व यशवंतराव पवार पडल्याची बातमी जेव्हां त्यांना समजली तेव्हां त्यांना चोहोंकडून आकाश कोसळल्यासारखें झालें. डाव्या बाजूचा निकाल झाल्यावर शत्रूनें भाऊसाहेबांवर आपला मोर्चा फिरविला. हुजुरातीच्या खानदान लोकांनीं तर युद्धाची कमाल केली. विश्वासराव पडल्यामुळें "आतां पुण्यास जाऊन नानासाहेबांस हें काळें तोंड काय दाखवावें?" ह्मणून ते बेहोष होऊन युद्ध करीत होते. सुमारें चार घटका भाऊसाहेबांनीं भयंकर रणकंदन केलें. परंतु चोहोंबाजूनें आकाश फाटलें. "हाणा हाणा," "मारा मारा," ह्मणतां ह्मणतां भाऊंचे तोंडास कोरड पडली.

उजव्या बाजूस जनकोजी शिंदे व तुकोजी शिंदे होते. त्यांस जेव्हां विश्वासराव पडल्याची बातमी समजली तेव्हां ते मारामार करीत भाऊंपाशीं आले. भाऊसाहेब तर बेफाम होऊन लढत होते. तुकोजी शिंदे त्यांस म्हणाला ' महाराज, क्षात्रधर्माची आपण शर्थ केली. आतां निघावें हें उत्तम. तेव्हां भाऊ त्यास म्हणाले, "तुकोजी बावा आतां कोणीकडे जावें! रावसाहेबांची (विश्वासरावाची) काय गत झाली ती पहावी. आतां नानासाहेबांस कसें तोंड दाखवावें?

मागील पृष्ठावरून पुढें चालू.

चरित्र. भाऊसाहेबांचे बखरींत असें दिलें आहे कीं, ' इब्राहिमखान दुराणीचे हातीं सांपडल्यावर त्यानें त्यास आपल्या पदरीं राहण्यास सांगितलें. इब्राहिमखानानें त्यास सांगितलें कीं, ' भाऊसाहेबांचें व माझें वचनानें इमानप्रमाण झालें आहे. यास्तव अशी गोष्ट आपणाकडून कदापि घडणार नाहीं. तेव्हां गिलच्यांनीं त्याचा शिरच्छेद केला.

इब्राहिमखानास वचन दिलें आहे, त्याअर्थी आतां दुसरा विचार नाहीं. रणाचें ठायीं जें घडेल तें खरें; परंतु परत म्हणून फिरावयाचें नाहीं." तुकोजी शिंद्यानें हें वचन ऐकून आपणही घोड्याखालीं उडी टाकिली, व घटकाभर भयंकर रणसंग्राम करून त्यानें धारातीर्थी देह ठेविला. जरीपटक्या सभोवतीं शत्रूचा धागडधिंगा चाललाच होता. तेथें अतिशय गर्दी झाल्यामुळें जरीपटका हत्तीवरून काढून घोड्यावर घेतला. तेव्हां फौजेंतील तमाम लोक आपापलीं निशाणें गुंडाळून पळूं लागले. भाऊसाहेबांनीं तें पाहून आपण शहाजाणें वाजविलीं असतां आपला जय झाला असें समजून आपली फौज माघारी फिरेल असें त्यांस वाटलें व त्याप्रमाणें त्यांनीं शहाजाणें वाजविण्यास आज्ञा केली. शहाजाणें वाजूं लागलीं परंतु पळत असलेल्या हजारों लोकांपैकीं एकानेंही आपलें तोंड मागें फिरविलें नाहीं. भाऊसाहेबांपाशीं फक्त जनकोजी शिंदे, विश्वासरावाच्या मुर्द्याचा हत्ती व शें दीडशें लोक एवढे होते. सभोंवता शत्रूच्या लोकांचा गराडा पडला. नजीबखान बारा हजार फौजेनिशीं भाऊसाहेबांवर चालून आला. त्या गर्दीत भाऊसाहेब मिसळून गेले. त्यांचें पुढें काय झालें तें समजलें नाहीं. अशा रीतीनें हा दुसरा खासा मोहरा रणदेवीनें बळी घेतला. जनकोजी शिंदे पाठोपाठ होताच. पण त्यास शत्रूनें धरून कैद

---

१ भाऊसाहेबांची बखर, भाऊसाहेबांची कैफियत व रघुनाथ यादवकृत पानपतची बखर या ग्रंथांचें असें ह्मणणें आहे. 'भाऊचें धड सांपडलें होतें व शीर एका दुराणीनें नेलें होतें तें आणून दिल्यावर सुजाउद्दौला व उमरावगीर गोसावी यांनीं त्यांच्या प्रेतास 'यथाविधि अग्नि दिला' असें काशीरायाचें ह्मणणें आहे. नानाफडनवीस याचें म्हणणें "ते मारले गेले" असें आहे.—नातूकृत महादजीचें चरित्र.

केलें. याप्रमाणें अस्तमानपर्यंत युद्ध झालें. पुढें युद्ध बंद होऊन पळाचे लोकांची कत्तल मात्र सुरू होती. ही लढाई ता० १४[१] जानेवारी इ० स० १७६१ रोजीं झाली.

भाग अठरावा.

पानपतच्या पळाची हकीकतः—भाऊसाहेब वगैरे सरदार पुनः तळावर येतील या आशेनें हजारों लोक पानपताकडे पळाले होते. परंतु त्यांची कत्तल होऊन सर्व खंदक प्रेतांनीं भरून गेला. मराठयांची सर्व चीजवस्त, सामानसुमान, तोफा वगैरे सर्व सामान शत्रूच्या हातीं लागलें. सर्व रणांगणांवर प्रेतांचे ढीगच्याढीग पडले होते व मराठ्यांच्या तीन निशाणांजवळ तर हजारों मुर्दे पडलेले होते. या भयंकर युद्धांत मराठयांच्या दोनतीन लाख लोकांपैकीं वीस पंचवीस हजार लोक पळाले तेवढे लोक वांचले असतील. बाकीच्या बहुतेक लोकांची कत्तल झाली व कांहीं थोडे लोक शत्रूच्या हातीं सांपडले.

या लढाईत आपली धडगत नाहीं असें भाऊसाहेबांस वाटलें त्या वेळीं त्यांनीं त्यांची पत्नी पार्वतीबाई युद्धांत त्यांचेबरोबर होती

---

१. एकंदर उपलब्ध मराठी बखरी, कैफियती व शकावल्या यांवरून पाहतां पौष शुद्ध ८ बुधवार ह्मणजे ता. १४ जानेवारी १७६१ हीच या युद्धाची खरी तारीख ठरते. ग्रांट डफ वगैरे इतिहासकार ही लढाई ता० ७ जानेवारी रोजीं झाली असें ह्मणतात. पौष शुद्ध २ मंगळवार ह्मणून रघुनाथ यादव लिहितो तें चुकीचें आहे. त्या द्वितीयेस मंगळवार नसून गुरुवार होता. पौष शुद्ध १० असें मल्हारराव रामराव लिहितो तेंही चुकीचें आहे. रा. राजवाडे, रा. भातू, कीनसाहेब यांनीं १४ जानेवारी हीच या युद्धाची खरी तारीख असें ठरविलें आहे.

तिला विसाजी कृष्ण जोगदंड नांवाच्या गृहस्थाच्या स्वाधीन करून त्याचेबरोबर पांचशें धनगर लोक दिले. भाऊंनीं त्यास अशी आज्ञा केली होती कीं, "आम्ही झुंजून पार निघालों असें कळलें तरी तुह्मी यांस घेऊन दिल्लीचे रोखें आमचेमागें पिछाडीस घेऊन यावें. आणि रणांत पडलों असें वर्तमान ऐकिल्याबरोबर यांस तुम्हीं जीवें मारून निघोन जावें. गिलच्यांचे हातीं भाऊसाहेब यांची स्त्री जिवंत सांपडली, असा लौकिक मात्र न होईल ऐसें करावें." परंतु ज्या वेळीं मराठ्यांचा पराजय होऊन ते वाट फुटेल तिकडे पळूं लागले, व गिलचे त्यांचेमागून लांडगेतोड करीत चालले, तेव्हां जोगदंड याचा धीर खचून तो व त्याचे लोक स्वप्राणरक्षणाकरतां बिच्याऱ्या पार्वतीबाईस एकटीच टाकून निघून गेले. अशा भयंकर प्रसंगीं पार्वतीबाईनें मोठें प्रसंगावधान दाखविलें. ती आपल्या अंबारींतून पायउतार होऊन बुणग्याचेमागें पळूं लागली. फक्त जानू भिंताड्या नांवाचा खिजमतगार मात्र तिच्याबरोबर होता. त्या वेळीं बावरेकर नांवाचा कोणी मातबर मनुष्य घोड्यावर बसून पळत होता. त्याला पार्वतीबाईनें विनंती केली कीं, "मी भाऊसाहेबांची स्त्री आहे, मजला घोडीवर घ्यावें." तेव्हां त्यानें मोठा हिय्या करून तिला शालजोडीनें आपल्या पाठीमागें बांधलें व त्यानें डोळे मिटून असा घोडा भरधांव काढला कीं, तो पाठलाग करणाऱ्या गिलच्यांच्या तावडींतून पार निसटून गेला. नाना फडणवीस याची मातुश्रीही या लढाईत होती. ती या शेवटच्या पळापळीच्या वेळीं गिलच्यांचे हातांत सांपडली, व तिची पुढें काय गत झाली त्याचा पत्ता लागला नाहीं. नानाचे कुटुंबानें मात्र या गर्दीत आपले अंगावरचे दागिने टाकून दिले,

फाटकीं वस्त्रें अंगावर घेतलीं व अंगास मातीं लावून दिल्लीच्या रोखानें निघून आली.

विश्वासराव याचे मुर्दाचा हत्ती सुजाउद्दौला याच्याकडे नेलेला होता. तेव्हां सुजाउद्दौल्याचा सरदार उमरावगीर गोसावी यानें तीन लक्ष रुपये भरून विश्वासराव, तुकोजी शिंदे, संताजी वाघ, यशवंतराव पवार, यांचीं प्रेतें सोडवून आपणाकडे आणिलीं व त्यांचें यथाविधि दहन केलें. एकंदर पळापैकीं पांच सहा हजार लोक दिल्लीच्या रस्त्यानें आले. त्यांत नाना पुरंदरे, बाजी हरि, अंताजी माणकेश्वर, मल्हारराव होळकर वगैरे सरदार होते. वाटेनें गिलच्यांच्या व त्यांच्या मारामारींत अंताजी माणकेश्वर व बाजी हरि हे ठार झाले. त्यांच्या प्रेतांकडे कोणी ढुंकूनही पाहिलें नाहीं. मराठे लोक पळत असतां कुंजपुरा येथील पराजयाचा सूड उगविण्याकरितां कुतुबशाहाचे पुत्रानें चार हजार लोकांची कत्तल केली. सैमदखान कतलबाज याचे पुत्रानें बहादर गडानजीक पांच हजार लोक मारले. पानपत शहरांत बरेच लोक पळाले होते. तेव्हां गिलच्यांनीं शहरची नाकेबंदी करून पंधरा हजार लोकांस कैद केलें. तसेंच खंदकांत जे लोक दडून बसले होते त्यांसही कैद केलें; सुजाउद्दौला

---

१ रा. अत्रेकृत मल्हारराव होळकर यांचे चरित्रांत "युद्धाची गर्दी सुरू होण्यापूर्वी भाऊसाहेबांनीं मल्हारराव होळकर यास पार्वतीबाईस तुम्ही सुरक्षितपणें देशीं नेऊन पोहोंचवावें" असा मजकूर आहे, पण त्यास आधार दिलेला नाहीं. या गोष्टीला आधार रा. राजवाडे यांनीं तिसऱ्या खंडामध्यें पत्र नंबर १७२ त 'होळकराची थैली' म्हणून जो मजकूर छापला आहे त्यांत मिळतो. परंतु ह्या पत्रांतील मजकुरावरून ही थैली स्वतः मल्हाररावाच्या सांगण्यावरून पानपतच्या लढाईतून ऐन प्रसंगीं तो निघून आला हा दोषारोप नाहींसा करण्याकरतां तयार केली असावी अशी शंका घेण्यास जागा राहते.

यानें त्या सर्वांबद्दल तीन लक्ष रुपये भरून त्यांस बंधमुक्त केलें.* गिलच्यांचें लष्कर लुटीनें कुबेर झालें. घोड्यांस कोणी पुसेनासें झाले. ज्यास गाढव बसायास मिळत नव्हतें त्याला हत्ती प्राप्त झाला. ह्या लढाईत गिलच्यांस इतकी लूट मिळाली कीं, ती नेण्याचें ओझें होऊं लागलें ह्मणून पुष्कळ चीजवस्त जागचेजागीं टाकून ते लोक निघून गेले.

जनकोजी शिंद्याचा शेवटः—शूर जनकोजीचा शेवट फारच वाईट झाला. लढाईचे तिसरे दिवशीं विश्वासरावाचे प्रेतास अंत्याग्नि मिळावा ह्मणून काशीराय एका सरदाराच्या तंबूंत गेला होता. तेथें एका कोपऱ्यांत बाबूराव फडणीस व जनकोजी हे त्याचे दृष्टीस पडले. जनकोजीस गोळी लागली असून शिवाय एक भाल्याचा वारही झाला होता. काशीरायास पाहून जनकोजीनें खालीं मान घातली. तें पाहून काशीरायास फार वाईट वाटलें, व तो जनकोजीस ह्मणाला, "महाराज, तुह्मी खालीं मान कां घालतां? मर्दुमकीनें व मेहनतीनें जें काम करतां यावयाचें तें सर्व तुह्मीं केलें आहे, आणि लढाईचे दिवशीं जीं कृत्यें केलीं त्यांचें स्मरण मनुष्यमात्रास सदोदित राहील." हें ऐकून जनकोजी वर मान करून ह्मणाला कीं, "हें खरें आहे कीं, 'नशिबाबरोबर कोणास भांडतां येत नाहीं.' मी लढाईत मेलों असतों तर बरें झालें असतें! परंतु मला येथें धरून आणिलें हें माझें दुर्दैव होय! हे लोक माझ्या मोकळिकेबद्दल दंड मागतात तो देणें मला मुष्कील आहे असें नाहीं.

---

* भाऊसाहेबांचे बखरींत असें जरी लिहिलें आहे, तरी अन्यत्र असा दाखला सांपडतो कीं, पराजयाचे दुसरे दिवशीं या पाडाव केलेल्या मराठे लोकांच्या रावणीच्या दावणी उभ्या करून त्यांस मूठभर फुटाणे व चुळकाभर पाणी देऊन त्यांची दुराणी लोकांनीं मोठ्या हौसेनें कत्तल केली.

पण तो येथें मिळणें अशक्य आहे. तुह्मी माझे वाडिलांचे दोस्त आहां व माझे व सुजाउद्दौल्याचे घराण्याची हमेषा दोस्ती असून माझा बाप त्यांचे उपयोगीं पुष्कळ वेळां पडलेला आहे. या वेळीं माझे मोकळिकेबद्दलचा ऐवज जर नबाबसाहेब देतील तर तो उपकार मी कधींही विसरणार नाहीं."

काशीरायानें अभिवचन देऊन तो सुजाउद्दौल्याकडे गेला, व त्यानें त्यास वरील हकीगत सांगितली. त्या बैठकींत नजीबखान होता. त्यानें बाह्यात्कारी जनकोजीस सोडावें असें भाषण केलें. परंतु अंतर्यामीं तो शिंद्याचे घराण्याचा नाश करण्याची संधी पहातच होता. त्यानें तावडतोब दुराणी वजिराकडे जाऊन त्यास हें वर्तमान सांगितलें. दुर्दैवानें ज्याच्या तंबूंत जनकोजी होता त्याचें व या वजिराचें वैमनस्य होतें. वजीर त्याचा नाश करण्याची संधी पहातच होता; तेव्हां कैदी छपविल्याचा आरोप त्याच्यावर आणून त्याचें पारिपत्य करावें अशा उद्देशानें तो नजीबखानास घेऊन अबदालीकडे गेला व त्यानें अबदालीस ती गोष्ट कळविली. अबदालीनें त्या सरदारास बोलावणें पाठविलें, व त्याच्या तंबूचा झाडा घेण्याचा हुकूम दिला. आपल्या धन्याचा नाश होतो असें पाहून त्या सरदाराच्या नोकरांनीं जनकोजी व बाबूराव फडणीस यांस ठार मारून त्यांचे मुर्दे गुप्त रीतीनें गाडून टाकिले. होळकराचा उपदेश ऐकून दत्ताजी व जनकोजी यांनीं ज्याचें संरक्षण केलें त्याच नजीबखानानें शिंद्यांच्या घराण्याचा नाश केला. पण या भयंकर युद्धांतून शिंद्यांचे घराण्यांतील एक पुरुष जिवंत राहिला. त्यानें पुढें सर्व रोहिल्यांचा व नजीबखानाच्या वं-

शाचा उच्छेद करून टाकिला. हा पुरुष ह्मणजे प्रख्यात महादजी शिंदे होय.

पानपतच्या पळाची पुढील हकीकत:—पळापैकीं सुमारें पांच सात हजार लोक, कांहीं घोड्यावर, कांहीं पायचाली, अशा रीतीनें दिल्लीस येण्याकरितां निघाले. वाटेनें त्या प्रांतांतील लोकांनीं दांडगाई करून कांहींचे घोडे छिनावून घेतले, कांहींस ठार मारून त्यांचे कपडे, दागदागिने वगैरे लुटून नेले, कांहींस त्यांचें सर्वस्व नागवून उघडे बोडके सोडून दिलें. अशा कष्टप्रद स्थितींत शिलक राहिलेले सुमारें पांचसातशें लोक गुरुवारीं संध्याकाळीं दिल्लीस येऊन पोहोंचले. भाऊसाहेबांची स्त्री पार्वतीबाई याच लोकांत होती. तिचा विश्वासू

---

१ पानपतच्या युद्धांत महादजी अखेरपर्यंत लढत होता. परंतु अखेरच्या चकमकींत त्याचा भाऊ तुकोजी मरण पावला, व जनकोजी गर्दीत मिसळून दिसेनासा झाला, तेव्हां महादजीनें आपली घोडी माघारी फिरवून रणांगण सोडलें. त्याचेमागें एक पठाण लागला. महादजी पुढें व पठाण मागें अशा रीतीनें महादजी जिवाची आशा सोडून पळत असतां महादजीची घोडी एका नाल्यावरून उडी मारीत असतां तिची उडी चुकली व तिच्यासह महादजी खालीं नाल्यांत पडला. इतक्यांत पठाणानें त्याच स्थितींत महादजीस गांठून त्याच्या डाव्या पायांवर सांगेचा वार करून त्यास जन्माचा लंगडा केलें, व तो महादजीची घोडी व त्याचे अंगावरील सर्व अलंकार बुचाडून घेऊन निघून गेला. महादजी त्या दुःसद स्थितींत पडला असतां मराठ्यांचे पळापैकीं राणाखान नांवाचा एक इसम भिस्त्याचे वेषानें चालला होता. त्यानें महादजीस ओळखून त्यास आपले बैलावर बसवून दक्षिणेंत आणिलें. या राणाखानाचे उपकार महादजी जन्मभर विसरला नाहीं. महादजीनें त्यास पुढें मोठ्या योग्यतेस चढविलें. राणाखान हा भिस्ती होता असें कांहीं इतिहासकाराचें मत आहे पण तें चुकीचें आहे.—नातूकृत महादजींचें चरित्र.

खिजमतगार जानू भिंताड्या हा तिच्याबरोबर होताच. तिला बावरेकर यानें पाठीशीं बांधून कांहीं कोस आणल्यावर त्याचें घोडें थकलें. पुढें पिराजी राऊत पुणतांबेकर म्हणून पळापैकींच एक शिलेदार होता त्यानें तिला आपल्या घोड्यावर बसविलें. परंतु त्याचाही घोडा थकला. तेव्हां जानूनें कांहीं वेळ पायचाली कांहीं वेळ घोड्यावर अशा रीतीनें तिला दिल्लीस आणिलें. कदाचित् भाऊसाहेब आपणास दिल्लीस भेटतील अशी पार्वतीबाईला फार आशा होती. परंतु भाऊ दिल्लीस नाहींत असें तिला समजलें तेव्हां तिची काय स्थिति झाली असेल याची कल्पना वाचकांनींच करावी. परंतु तिनें आपणावरचा प्रसंग ओळखून ताबडतोब दक्षिणचा रस्ता सुधारला.

नारो शंकर राजेबहादर, बाळाजी गोविंद बुंदेले, वगैरे सरदार व लक्ष्मणराव गावडे, हिरोजी शिरके, पर्वतराव कदम वगैरे पथके तीन चार हजार फौजेनिशीं दिल्लीस होते. त्या सर्वांस पळाचें वर्तमान समजलें. कदाचित् भाऊसाहेब पानपतांतून निघून दिल्लीस आले, व आपण पळून गेलों असें त्यांस समजलें तर आपली मोठी नापत होईल या भीतीनें गुरुवारीं तिसऱ्या प्रहरापर्यंत ही मंडळी धीर धरून होती. नारो शंकर याचेपाशीं ४० हजार रुपये सरकारी खजिना होता. गुरुवारीं संध्याकाळीं होळकराचा दिवाण गंगोबातात्या चंद्रचूड पानपत येथून पळून दिल्लीस नारो शंकर याचे घरीं आला व त्यानें पानपतचें कच्चें वर्तमान त्यास सांगून "याउपर जसा मार्ग भगवंत देईल त्याप्रमाणें निघोन पार व्हावें. नीट दिसत नाहीं. तुम्ही डोळे झांकून कां बसलां?" असा त्यास उपदेश करून तो तेथून पळून गेला. तेव्हां नारो शंकर याचा धीर तुटून तोही सरकारी खजिना टाकून देऊन दिल्लींतून पळून गेला. या वेळीं दिल्ली येथें मराठ्यांची

अशी स्थिति झाली होती कीं, दिल्लींतील शहरवासी लोक, भिकार-टाकार, बकाल, बायकासुद्धां मराठ्यांशीं मारामाऱ्या करून त्यांस लुटूं लागल्या. दिल्लीपासून सुमारें तीन मजला आल्यावर नाना पुरंदरे, मल्हारराव होळकर वगैरे मंडळीची व पार्वतीबाईची गांठ पडली. तेथें बरेंच लष्कर गोळा झालें. नंतर सुमारें अकरा दिवसांनीं ही सर्व मंडळी भिंडीस येऊन पोहोंचली.

विठ्ठल शिवदेव, दमाजी गायकवाड वगैरे सरदार ज्याला जशी वाट सांपडली तसे दक्षिणेंत पळून आले. नाना फडनवीस पानपतच्या लढाईत भाऊसाहेबांच्या सन्निधच होता. डावे बाजूचे मातबर सरदार चौघड्याचे धनी देखील पळून गेले, त्याचप्रमाणें उजवे बाजूस शिंदेहोळकर निघून गेल्यामुळें मराठ्यांनीं आपलें निशाण काढून नेलें व त्या गर्दीत भाऊसाहेबही कोठें दिसतना; तेव्हां नाना फडनवीस मागें फिरला, व घोड्यावर बसून संध्याकाळचे दोन घटका दिवसास पानपत गांवांत आला. अशा डामडौलाच्या रीतीनें आपला निभाव लागणार नाहीं असें वाटून त्यानें अंगावरचे सर्व कपडे टाकून देऊन लंगोटी लाविली, व इतर लोकांबरोबर तो पळूं लागला. एका कोसांत तीन चार वेळ पठाण लोक त्यांचा झाडा घेत व प्रत्येक खेपेस ते दहा वीस लोक ठार मारीत. अशा रीतीनें शेवटीं नाना एकटाच शिलक राहिला. पठाण आले ह्मणजे लपावें, ते गेले ह्मणजे पुढें जावें, अशा रीतीनें तो सोळा सतरा कोस आला. क्षुधेमुळें बोरीचा पाला खाण्यापर्यंत मजल येऊन पोहोंचली. वाटेनें जो जें कांहीं देईल तें खावें अशा रीतीनें सात दिवस पायचाली चालल्यावर तो रेवडीवर[१] आला. तेथें रामजीदास जोशी नांवाचा एक मातबर

१ रेवडी हें शहर दिल्लीच्या वाटेवर मुक्कामाची जागा आहे.

गृहस्थ होता त्यानें सात दिवसपर्यंत नानाचा उत्तम रीतीनें पाहुणचार केला. तेथून तो पुढें निघाला तेव्हां वाटेनें त्याची व त्याच्या पत्नीची गांठ पडली. नंतर ती सर्व मंडळी डीग येथें आली. तेथून ढवळापुरावरून, पार्वतीबाई, नाना पुरंदरे, मल्हारराव होळकर वगैरे मंडळी ग्वालेरीस होती तेथें तो येऊन पोहोंचला. नंतर ही सर्व मंडळी नानासाहेबांचा मुक्काम बऱ्हाणपूर येथें होता तेथें त्यांस येऊन मिळाली.

ज्यांना दिल्लीचा रस्ता सांपडला नाहीं व जे भयानें आडरानांत शिरले होते, असे सुमारें वीस पंचवीस हजार लोक होते. ते जिकडे वाट सांपडेल तिकडे भटकत फिरूं लागले. वाटेनें गांवकरी लोक त्यांस लुटीत, मारीत, त्यांचीं घोडीं पळवून नेत. पोटास अन्न न मिळाल्यामुळें हजारों लोक मरण पावले. जे शिल्लक राहिले ते केवळ हाडांचे जिवंत सांपळे झालेले, नागवे, उघडे, बोडके, केवळ भणंग, कंगाल, कळाहीन अशा स्थितींत मथुरेवरून सुरजमल जाट याचे मुलखांत येऊन पोहोंचले. त्या वेळीं सुरजमल जाट यानें मागील वैमनस्य विसरून जाऊन फार मोठें औदार्य दाखविलें. त्यानें आपल्या सर्व राज्यांत सांडणीस्वार पाठवून असा हुकूम फर्माविला कीं, "कोणास न छळतां ज्यास जैसें अनुकूल पडेल तसें त्यानें अन्नवस्त्र द्यावें." गरीब व मातबर दोघेही या वेळीं एकाच स्थितीस येऊन पोहोंचले होते. भरतपूर येथें जाटाची बायको होती तिनें फार मोठें औदार्य दाखविलें. जागोजाग स्वार पाठवून पळाचे लोक बोलावून आणिले व त्यांस अन्नवस्त्र देऊन जाते वेळीं त्यांस आठ दिवसांचा शिधा दिला. ब्राह्मण होते त्यांना पांच रुपये, एक पागोटें, एक रजई, एक धोतर व आठ दिवसांचा शिधा असें सामान दिलें.

श्रीमंत असल्यास घोडा, पालखी अशा रीतीनें जाटानें सुमारें दहा लक्ष रुपये खर्च केले. परंतु वाटेनें लुटारू लोकांनीं पुनः त्यांचें सर्व सामान छिनावून घेतलें, व ते लोक पुनः भणंग भिकाऱ्याच्या स्थितींत भिंडीस येऊन पोहोंचले. तेथें नाना पुरंदरे, मल्हारराव होळकर, पार्वतीबाई वगैरे मंडळी होती. भिंडीस सुमारें पंधरा दिवस राहून ही सर्व मंडळी ग्वालेरीस आली व तेथें एक महिना मुक्काम केला. पळाचे लोक आले त्या सर्वांस पार्वतीबाईनें अन्नवस्त्र देऊन शिवाय प्रत्येकास पांच पांच रुपये रोख दिले. नाना पुरंदरे यानें भाऊसाहेबांचे शोधास ग्वालेरीहून बैरागी लोक पाठवून दिले. परंतु त्यांचा शोध लागला नाहीं. घायाळ समशेर बहाद्दर कुंभेरीस आला. तेथें सुरजमल यानें त्याचा उत्तम पाहुणचार करून त्यास घोडीं व पालखी देऊन वाटेस लाविलें. परंतु " नानास तोंड काय दाखवावें!" असें ह्मणत व "भाऊ" "भाऊ", असा शोक करीत तो वाटेंतच मरण पावला. बळवंतराव मेहेंदळे याचा पुत्र आपाराव याच पळांत होता. तोही मोठ्या कष्टानें दक्षिणेंत सुखरूप येऊन पोहोंचला. सारांश या पळांत मराठ्यांचे इतके भयंकर हाल झाले कीं, त्याची कल्पना करणेंही अशक्य आहे.

नानासाहेब भाऊंचे मदतीस पुण्याहून निघतात.—भाऊसाहेब मानी असल्यामुळें त्यांनीं नानासाहेबांस मदतीकरितां म्हणून कधींच पत्रें पाठविलीं नाहींत, किंवा आपली विपन्नावस्थाही त्यांस दाखविली नाहीं. पानपतचे संबंधानें मदतीकरितां विश्वासराव यानें पाठविलेल्या पत्राचा उल्लेख मागें आलाच आहे. तें पत्र त्यानें पाठविलें असो किंवा नसो, परंतु पानपतच्या छावणींतून निरानिराळ्या मंडळीचीं पुण्यास व दुसरीकडे पत्रें येत होतीं त्यांवरून आपले फौजेची

पानपत येथील स्थिति नानासाहेबांचे लक्षांत येऊन चुकली होती. तेव्हां ते भाऊंच्या मदतीकरितां ह्मणून स्वारीची तयारी करून ता. २२ आक्टोबर १७६० रोजीं डेरेदाखल झाले. या वेळीं त्यांनीं आपली पत्नी गोपिकाबाई व पुत्र माधवराव व नारायणराव यांस बरोबर घेतलें होतें. स्वारी प्रथम सिद्धटेकास गेली. तेथून नगरावरून नानासाहेब पैठण येथें आले. तेथें मार्गशीर्ष वद्य ६ शके १६८२ ह्मणजे ता० २७ दिजंबर इ० स० १७६० रोजीं त्यांनीं नारोबा नाईक बाकरे या देशस्थ गृहस्थाच्या मुलीशीं आपलें दुसरें लग्न केलें. या बाईचें नांव राधाबाई असें ठेविलें होतें.

निजामाची गडबडः—पानपतांत मराठे बरेच जेरीस आले आहेत ही बातमी सलाबतजंगाचा भाऊ निजामअल्ली यास होतीच. तेव्हां त्याला अवसान येऊन तो फौज गोळा करून दंगा करण्याचे बेतांत होता. त्याला जरबेंत ठेवण्याकारितां दादासाहेब ता० १९ जानेवारी इ० स० १७६१ रोजीं डेरेदाखल झाले. निजामअल्लीची दोस्ती संपादून त्यास नानासाहेबांबरोबर स्वारीस घेऊन जाण्याचे उद्देशानें ते निघाले होते. ह्या वेळीं नानासाहेबांनीं गोपाळराव पटवर्धन यास दादासाहेबांचे कुमकेस जाण्याविषयीं मोठ्या कळकळीनें पत्र पाठविलें. परंतु गोपाळराव व दादासाहेबांचा मुख्य सल्लागार सखारामबापू यांचीं एकमेकांविषयीं मनें शुद्ध नसल्यामुळें गोपाळराव दादासाहेबांकडे न जातां आपल्या फौजेसह नानासाहेबांचे फौजेस येऊन मिळाला. पानपत येथील वर्तमान वरचेवर निजामअल्लीचे कानीं येतच होतें. तेव्हां दादासाहेब तिकडे गेले तेव्हां त्यानें उत्तरहिंदुस्तानांत नानासाहेबांचे मदतीस जाण्याचें बोलणें टाकून देऊन त्यांच्याशीं उडवाउडवीचीं बोलणीं सुरू केलीं. तेव्हां दादासाहेबांस

त्याचा राग येऊन त्यांनीं निजामअल्लीवर चालून जाण्याची तयारी केली. तेव्हां तो तोंड न देतां चुकवाचुकवी करूं लागला. इकडे नानासाहेबांस मध्यंतरीं पानपतचें वर्तमान समजल्यामुळें त्यांना मोठा धक्का बसून त्यांची प्रकृति अशक्त होऊन बेताल झाली, व ते पुढील स्वारीचा बेत रहित करून पुण्यास परत फिरले. तेव्हां दादासाहेबांनींही निजामअल्लीवरच्या स्वारीचा बेत तहकूब करून ते घाईघाईनें पुण्यास आले (ता० २१ एप्रिल १७६१). मागें निजामअल्लीनें फौजेची तयारी करून पेशव्यांनीं निजामाचा घेतलेला मुलूख परत मिळविण्याची खटपट चालविली. त्यानें जाधवराव, उदाजी चव्हाण, लाला ब्रिजदास वगैरे आपल्या सरदारांस पेशव्यांच्या मुलखावर स्वारी करण्याकरितां पाठवून दिलें. त्यांनीं मलिखेड सरकार, अळंद, गुंजोटी, चितापूर वगैरे सरहद्दीवरील महाल घेऊन अक्कलकोट परगणा लुटून फस्त केला. पुण्यास हें वर्तमान समजलें, तेव्हां दादांनीं आपल्या सर्व सरदारांस फौज गोळा करण्याकरितां ताकीद केली व पावसाळा संपल्यावर निजामाचा समाचार घेण्याचा विचार केला.

नानासाहेबांच्या स्वारीची पुढील हकीकत व शेवटः— नानासाहेबांनीं पैठण मुक्कामीं आपलें दुसरें लग्न केल्यावर ते फौजेसह वऱ्हाडांत बाळापुरच्या रोखानें आले. तेथें नागपुरकर जानोजी भोसले व मुधोजी भोसले सहासात हजार फौजेनिशीं त्यांस येऊन मिळाले. या वेळीं नानासाहेबांबरोबर गोपाळराव पटवर्धन, सदाशिव रामचंद्र शेणवी, विठ्ठल विश्राम, यमाजी शिवदेव वगैरे सरदार मंडळी होती. ता. २० नवंबर इ. स. १७६० रोजीं अक्कलकोटचे राजे फत्तेसिंग बावा हे मरण पावले. नानासाहेबांनीं

बाबूजी नाईक बारामतीकर यास अक्कलकोटास पाठवून दिलें. त्यानें सर्व वित्तविषय होता तितका जप्त केला व शहाजी भोसले यास बरोबर घेऊन तो याच संधीस नानासाहेबांस येऊन मिळाला.* एकंदर फौज सुमारें तीस पसतीस हजार होती. जानेवारी महिन्यांत स्वारीचा मुक्काम तळेगांव, परगणे आडगांव, प्रांत वऱ्हाड येथें होता. तेथें तीन दिवस मुक्काम करून स्वारी पुढें निघाली. वाटेनें विंध्याद्रींतील गोंड लोकांच्या राजास निमंत्रण करून त्यास श्रीमंतांनीं वस्त्रें अलंकार, कडीं, शिरपेंच वगैरे नजराणा दिला, व अशा रीतीनें त्यास खुष करून त्यास सामील करून घेतलें. नंतर सातपुडा पर्वत ओलांडून स्वारीचा तळ नर्मदातटाकीं येऊन पडला. तेथें फौजेची नीट व्यवस्था करून फौज पुढें निघाली. तिची अघाडी भेलशापर्यंत येऊन पोहोंचली होती. भेलशास आल्यावर नानासाहेबांनीं तेथें एक महिना मुक्काम केला. खेचीवाडेकर बेइमान झाला होता ह्मणून जानोजी भोसले व हुजुराती पथके त्याचे पारिपत्यास पाठवून दिले. जानोजीनें १५ मार्च १७६१ रोजीं खेचीवाडेकर याचा पराभव करून त्यास वठणीस आणिलें. नानासाहेबांची स्वारी भेलशास असतां तेथें पळाचे उघडे बोडके लोक आले, व त्यांनीं पानपतचें एकंदर वर्तमान त्यांस सांगितलें. त्या वेळीं त्यांच्या मनास केवढा जबरदस्त धक्का बसला असेल याची कल्पना वाचकांवरच सोंपवावी हें बरें. तथापि परत न फिरतां तसेंच पुढें जाऊन अबदालीचें पारिपत्य करावें असा त्यांनीं निश्चय केला. परंतु गोपिकाबाईनें त्यांचा तो बेत फिरविला. नंतर गोपाळराव पटवर्धन यास छावणीस ठेवून स्वारी परत फिरली, व दरकूच दरमजल करीत

*ऐ. ले. सं. भाग. १ पान. ४१ प. २६.

ब्ऱ्हाणपुरास आली. तेथें ग्वालेरीहून नाना पुरंदरे, नाना फडण-वीस, त्याची स्त्री, भाऊसाहेबांची स्त्री पार्वतीबाई वगैरे मंडळी ५ मे १७६१ रोजीं नानासाहेबांस येऊन भेटली, व त्यांनीं पानपतचें सर्व कच्चें वर्तमान सांगितलें. त्या वेळीं जो आकांत झाला त्याची कल्पनाही करणें अशक्य आहे. विश्वासरावासारखा पुत्र, भाऊसा-हेबांसारखा प्रतिअर्जुनासारखा बंधु यांचा वियोग, स्वकीयांचा नाश, प्रजेची हानी, व मनांत धरलेल्या मोठमोठ्या हेतूंचा विलय इत्यादि भयंकर हानींमुळें नानासाहेब एकसारखे तळमळूं लागले. उठतांबसतां, खातां पितां, तोंडानें "भाऊ भाऊ!" याशिवाय दुसरा शब्दच निघेनासा झाला. विश्वासु जानू भिताड्या यास नानासाहेबांनीं एक गांव इनाम दिला. दिवसेंदिवस मानसिक जबरदस्त यातनांमुळें नानासाहेबांची प्रकृति अतिशय अशक्त झाली, व त्यामुळें क्षणोक्षणीं रागाचे झटके येऊं लागले. कोणाची दशा केव्हां काय होईल याचा नेम राहिला नाहीं. नाना फडणवीस यानें या संबंधानें आत्मचरित्रांत असें लि-हिलें आहे कीं, "शरीर फार क्षीण झालें आहे, मर्जी बेतऱ्हा जाली आहे. बहुतांच्या अब्रू क्षणक्षणां जातात." नंतर हळू हळू मुक्काम करीत स्वारी टोंक्यांस आली. तेथें वैशाख शुद्ध १३ (ता. १६ मे इ० स० १७६१) रोजीं बाजीरावसाहेबांचें श्राद्ध करून ता. ५ जून इ० स० १७६१ रोजीं नानासाहेब पुण्यास येऊन पोहोंचले. दादासाहेबांच्या व त्यांच्या भेटी झाल्या. ता. ७ जून १७६१ रोजीं नारायणरावांची मुंज झाली; ती नानसाहेबांनीं न लावितां दादासाहेबांनीं लाविली. भाऊसाहेबांच्या शोका-मुळें नानासाहेबांची प्रकृति क्षीण होत चाललीच होती.

---

१ पत्रें व यादी. का. सं. ५३.

शेवटीं शरीर अतिशय कृश झालें; बुद्धिभ्रंश झाला; कारभार विपरीत होऊं लागला. आतां आपला अंतकाल समीप आला असें वाटून नानासाहेबांनीं दादासाहेब, सखारामबापू, व निळकंठ महादेव पुरंदरे यांस बोलावून आणिलें व माधवरावसाहेब यांचा हात त्यांचे हातांत देऊन " राज्य राखावें " म्हणून आपली शेवटची आज्ञा सांगून ते पर्वतीस जाऊन राहिले (ता. १८ जून इ० स० १७६१). श्रीरामचंद्राच्या वियोगानें दशरथ राजानें " राम " " राम " असें म्हणत ज्याप्रमाणें प्राणत्याग केला त्याप्रमाणें भाऊसाहेबांच्या वियोग-वेदना असह्य होऊन ह्या महाप्रतापी थोर पेशव्यानें " भाऊ " " भाऊ" असें म्हणत शके १६८३ वृषानाम संवत्सरे, मंगळवार, ज्येष्ठ वद्य[1] ६ म्हणजे ता. २३ जून इ० स० १७६१ रोजीं आवशीचे प्रहर दीड प्रहर रात्रीस आपली इहलोकची यात्रा संपविली. दुसरे दिवशीं बुधवारीं लकडी पुलाजवळ त्यांचे देहाचें सार्थक केलें.

पहिले बाजीरावसाहेब व चिमणाजी आप्पा, त्याचप्रमाणें नानासाहेब व भाऊसाहेब यांच्यासारखीं बंधुद्वयें दुनियेंत फारच थोडीं

१ भाऊसाहेबांचे बखरींत ज्येष्ठ वद्य ७ मंगळवार असें दिलें आहे, पण सप्तमीस बुधवार येतो. पेशव्यांचे बखरींत ज्येष्ठ शुद्ध ८ मीस कैलासवास झाला, असें दिलें आहे, तें अगदींच चूक आहे. त्याचप्रमाणें डेक्कन व्हर्नेक्युलर ट्रान्सलेशन सोसायटीनें छापलेल्या शाहूमहाराज यांच्या डायरींत पान ४३ मध्यें शके १६८३ आषाढ शुद्ध ५ सोमवार म्हणजे ६ जुलै १७६१ ही नानासाहेबांचे मृत्यूची तारीख दिलेली आहे तीही चुकीची आहे. म. इ. सा. खंड १ पत्र नंबर २८६ व २८९ यांत दिल्याप्रमाणें, तसेंच बखरकारानें, ज्या अर्थी मंगळवार असें दिलें आहे, त्याअर्थी ज्येष्ठ वद्य ६ हीच नानासाहेबांचे मृत्यूची मिति असली पाहिजे. कारण इतर बऱ्याच ठिकाणीं हीच मिति सांपडते. ज्या ठिकाणीं नानासाहेबांच्या प्रेताचें दहन केलें तेथें वृंदावन आहे असें एके ठिकाणीं लिहिलें आहे. परंतु तें अमुकच ठिकाणीं आहे असें खातरीनें कोणास सांगतां येत नाहीं.

सांपडतील. दोन्ही जोडयांचा ऋणानुबंधच असा होता कीं, एक मरतांच दुसऱ्यानें त्याच्या वियोगानें मेलें पाहिजे! बाजीरावसाहेब निजधामास गेल्यावर सात आठ महिन्यांच्या आंतच चिमणाजी आप्पा त्यांचे भेटीस इहलोक सोडून गेले; त्याचप्रमाणें भाऊसाहेब नाहींसे झाल्यावर सहा महिन्यांतच नानासाहेबांनीं परलोकचा रस्ता सुधारला. भट पेशव्यांचे वंशांत शेवटचा बाजीराव शिवाय करून बाकी सर्व पुरुष फार पराक्रमी निर्माण झाले होते. परंतु ते सर्व अल्पायुषी मरण पावले हें या देशाचें दुर्भाग्यच समजलें पाहिजे.

समाप्त.

उपसंहार.

पेशवेपदप्राप्तिः—सन १७४० त बाजीराव साहेब कैलासवासी झाल्यावर नानासाहेबांस पेशवेपद प्राप्त झालें; पण तें प्राप्त करून घेण्यास त्यांस महत्प्रयास पडले. रघूजी भोसले याचे मनांत पूर्वीपासून मराठी राज्याचें धुरीणत्व आपले हातीं असावें असें होतें, व तत्प्रीत्यर्थ त्याचे अव्याहत प्रयत्न सुरू होते. त्याची राज्यतृष्णा इतकी जबरदस्त वाढली होती कीं, शाहूमहाराज कदाचित् आपणास दत्तक घेतील व त्यांचे पश्चात् आपण मराठी राज्याचे मालक व चालक होऊं असें त्यास वाटूं लागलें होतें. परंतु त्याच्या या महत्त्वाकांक्षेला बाजीरावसाहेबांनीं बराच आळा घातला होता. रघूजी हा एक मातबर फौजबंद सरदार असून बाजीरावसाहेबांस एक जबरदस्त प्रतीस्पर्धी होता. परंतु सातारचे दरबारीं त्याचीं कोणीं पुरस्कर्तीं माणसें नसल्यामुळें, व बहुतेक दरबारी मंडळी बाजीरावसाहेबांची हितचिंतक असल्यामुळें, शिवाय खुद्द बाजीरावसाहेबांवर शाहूमहाराजांची पूर्ण मर्जी असल्यामुळें रघूजीचें कांहीं चालेना. शेवटीं ही आपसांतील स्पर्धा उभयपक्षीं नाशकारक व राष्ट्रविघातक आहे व तिच्यामुळें आपल्या खऱ्या कर्तव्यास अंतराय पोहोंचेल असें बाजीरावसाहेबांस वाटून त्यांनीं रघूजीस कर्नाटकच्या लुटीची आशा दाखवून त्या संबंधाची त्यास शाहूमहाराजांकडून सनद करून दिली, व अशा रीतीनें त्यांनीं आपसांतील तंट्याचें बीज बरेंच मोडून टाकलें. इतकें झालें तरी रघूजीच्या मनांतील पूर्वीची महत्त्वाकांक्षा समूळ नष्ट

झाली नव्हती. प्रसंग आला म्हणजे तिला पुनः पंख फुटत व ती भराऱ्या मारावयास लागे. बाजीरावसाहेब मरण पावले त्या वेळीं रघूजी कर्नाटकच्या मोहिमेवर गुंतलेला होता. त्यास हें वर्तमान समजतांच तो बाबूजी नाईक जोशी बारामतीकर हें बावलें हातीं धरून त्याला नामधारी पेशवा करावा व खऱ्या सत्तेचा उपभोग आपण घ्यावा ह्या उद्देशानें पेशवाईची रिकामी झालेली जागा शाहूमहाराजांकडून बाबूजी नाईक याचे नांवें करून देण्याचे हेतूनें साताऱ्यास आला. नानासाहेबांस पेशवाई मिळूं नये म्हणून त्यानें आपली पराकाष्ठा केली, पण शेवटीं त्याचा हेतु सफल झाला नाहीं व चिमणाजी आप्पाचे अश्रांत परिश्रमानें व नाना पुरंदरे व गोविंदराव चिटणीस यांचे साह्यानें पेशवेपद नानासाहेबांसच प्राप्त झालें. तथापि त्यांस पेशवेपदावरून शाहूमहाराजांनीं काढून टाकवें अशा संबधानें विरुद्ध मंडळीचीं कारस्थानें जारीनें सुरू होतीं.

नानासाहेबांस पेशवेपदावरून दूर करण्याचा शाहूमहाराजांचा विचारः—साताराचे राजमंडळांत प्रतिनिधी वगैरे मंडळी पेशव्यांचे विरुद्ध होती व नानासाहेबांस पेशवेपदावरून भ्रष्ट करण्यासंबंधानें त्यांचे अव्याहत प्रयत्न सुरू होते. नानासाहेबांचे विरुद्ध खोट्यानाट्या गोष्टी सांगून त्यांनीं महाराजांचें मन कलुषित करण्याचा प्रत्यन चालविला. शाहूमहाराजांस सकवारबाई व सगुणाबाई अशा दोन राण्या होत्या. त्यांचे आपसांत नेहमी तंटे असत. सकवारबाई ही महत्त्वाकांक्षी बायको असून राज्यकारभारांतील बरीचशी सत्ता आपले हातीं असावी असें तिला वाटत असे. परंतु नानासाहेबांचे दक्षतेमुळें तिचें कांहीं चालत नसे. त्यामुळें ती नानासाहेबांचा अतिशय द्वेष करीत असे. ह्या दोन राण्यांतील तंटे मोड-

ण्याचें काम शाहूमहाराजांनीं नानासाहेबांस सांगितलें होतें. तसेंच शाहूमहाराजांस कर्जही बरेंच झालें होतें. तेंही वारण्याचें काम त्यांनीं नानासाहेबांस सांगितलें. परंतु नानासाहेब स्वतः कर्जबाजारी असल्यामुळें, व मोठमोठ्या मोहिमा करण्यांत अतिशय खर्च येत असल्यामुळें त्यांना महाराजांच्या कर्जाचे तगादे वेळेवर वारतां येत नसत. तसेंच उभय राण्यांतील एक तंटा मोडावा तों लगेच दुसरा उपस्थित होत असे. त्यामुळें त्या तंट्याचाही निकाल लागेना, व जी ती आपापल्या तऱ्हेनें नानासाहेबांविरुद्ध महाराजांकडे गाऱ्हाणीं सांगत असे. तसेंच विरुद्ध मंडळीनें, पेशवे गादीचें कर्ज मुद्दाम वारीत नाहींत, असें महाराजांचे मनांत भरवून दिलें. बाबूजी नाईक बारामतीकर यास शाहूमहाराजांनीं कर्नाटकांत कांहीं प्रांतांचा सुभा सांगितला होता. तो सुभ्याचें काम पहात असतां नानासाहेबांनीं भाऊंस कर्नाटकच्या मोहिमेवर पाठवून दिलें. तेव्हां नानांनीं भाऊंस बाबूजी नाईक यास त्रास देण्याकरितां मुद्दाम कर्नाटकांत पाठवून दिलें असें विरुद्ध मंडळीनें महाराजांस भासविलें. इतकेंच करून ती मंडळी थांबली नाहीं. त्यांनीं 'पेशव्यांनीं ब्राह्मणांचे हात तोडले, कलावंतिनी राखल्या. धुंद जहाले'[1] अशा प्रकारची महाराजांपाशीं नानासाहेबांची मनसोक्त नालस्ती केली. ह्या एकंदर गोष्टींमुळें महाराजांचें मन नानासाहेबांविषयीं फार कलुषित झालें, व त्यांना पेशवेपदावरून दूर करण्याचे विचार त्यांचे मनांत घोळूं लागले. नानासाहेबांस ही बातमी समजली तेव्हां दरबारीं गोविंदराव चिटणीस होता त्याच्या मार्फत त्यांनीं महाराजांस पत्र पाठविलें त्यांत ते लिहितात कीं, 'दोन्ही महालांतील (राण्यांतील) गुंते फारकतून दूर केले. रोज नवे निघतात त्यास

---

१ भारतवर्ष. प. ६४

मात्र आमचा इलाज नाहीं. सांप्रत महालांतील गुत्ता नाहीं.... महाराज-कर्जाचे मजकुराचा गुत्ता, तो महाराज सर्व विचार ध्यानांत आणून आज्ञा करितील त्याप्रमाणें वर्तणूक जेथें असूं तेथें करूं.... परंतु निभावे ऐसी आज्ञा केली पाहिजे.... महाराजांचे कर्जाचा बोजा उरकावा तेव्हांच जावें, ऐसीच मर्जी असली तर इकडून फिरून सेवेशीं येऊं..... सावकाशीनें महाराज कृपा करून पुण्यास जाण्यास आज्ञा देतील तेव्हां जाऊं.... (बाबूजी)' नाईकांशीं कज्जा करावयासी जातां ' ऐसा जनबोलावरून संदेह मनांत वाटला असला तर त्याविशीं निशा करून घ्यावी.... कजिया, कफवा हे गोष्ट महाराजांचे हुकुमावांचून सहसा होणें नाहीं. चिरंजीव भाऊ तिकडे गेले आहेत. नबाबही तिकडे गेले म्हणजे गोऱ्यांच्या शहास अंतर होऊन किरकोळ गुत्ते तसेच अडकून पडतील. महाराज निरोप देतात हा लौकीक जनांत जाहला. नबाबापावेतों बातमी जाईल. इतके प्रकारें निखालसतेनें विनंती केली असतां महाराज ध्यानांत न आणतील तर ईश्वरेंच या दौलतीवर इतराजी केली अशी जाणावी." " ब्राम्हणांचे हात तोडले " इत्यादि जे आरोप नानासाहेबांवर आले

---

१ भारतवर्ष, प. नं. ४५ व ६४. शाहूमहाराजाचे चरित्रांत बाळाजी बाजीरावाची निष्ठा पाहण्याकरितां म्हणून शाहूमहाराजांनीं त्यास पेशवेपदावरून दूर केलें होतें असें लिहिलें आहे. त्या वेळीं मुत्सद्दी मंडळींनें अशी विनंती केली कीं, " हिंदुस्थानप्रांतीं ही बातमी गेली व जाईल, तालुके व सरदार चहूंकडे यांचे (पेशव्यांचे) विद्यमानचे आहेत, त्यांत बखेडे होतील. मारले जातील. यास्तव त्यांजवर कृपा करणें." तेव्हां बाळाजी स्वतः एका खिजमतगारानिशीं येऊन त्यानें महाराजांपाशीं विनंती केली कीं, "अपराधी सर्वस्वें आहों. पायांपाशीं कोणती सेवा सांगणें ती आज्ञा होऊन पायांचा वियोग मात्र न व्हावा. तेव्हां महाराज कृपावंत होऊन त्यांनीं नानासाहेबांस पेशवेपद पुनः

(पुढें चालू.)

होते त्यांसंबंधानें महाराजांनीं शेटी मळीक ह्मणून कोणी जासूद पुण्याहून दरबारीं आला होता त्याला एकांतीं नेऊन बारकाईनें सर्व चौकशी

(मागील पृष्ठावरून पुढें चालू.)

सांगितलें. वरील मजकूर जरी आख्यायिके दाखल दिलेला आहे, तरी ती आख्यायिका नसून सत्यवार्ता होती असें वरील आधारांवरून दिसून येईल. रा. राजवाडे मराठ्यांचे इतिहासाचीं साधनें खंड १ यांतील विवेचनांत असें म्हणतात कीं, " खुद्द शाहूमहाराजांशींही बाळाजी बाजीरावाचें वर्तन धरसोडीचें होतें. शाहूचें कर्ज वारण्यास बाळाजी विलंब लावूं लागला. शाहूच्या राण्यांचींही कर्जे वारण्यास बाळाजी अळमटळम करूं लागला. तेव्हां शाहूला अर्थातच बाळाजीचा राग आला व १७४७त बाळाजीचा अधिकार काढून घेण्याचा त्यानें विचार केला." रा. राजवाडे आपले म्हणण्यास वर दिलेल्या पत्रांचाच आधार देतात. परंतु बाळाजीच्या पत्रांतील जे उतारे वर दिले आहेत त्यांवरून रा. राजवाडे यांचे विधानास कोठें आधार मिळत नाहीं. इतकेंच नाहीं तर त्यांवरून महाराजांपाशीं बाळाजीचें आचरण किती लीनतेचें होतें हें सहज दिसून येतें. ज्याप्रमाणें बाळाजी विश्वनाथ व बाजीराव यांनीं शाहूमहाराजांची एकनिष्ठपणें सेवा केली, त्याप्रमाणें बाळाजी बाजीरावानेंही त्यांची सेवा एकनिष्ठपणें केली. शाहूमहाराज राजविलासी असल्यामुळें जरी त्यांच्या हातून राज्याची दगदग होत नसे व म्हणून त्यांनीं राज्याचा सर्व भार पेशव्यांवर लोटिला होता, तरी राज्यकारभार चालविण्यास ते असमर्थ होते असें मात्र कोणाला म्हणतां येणार नाहीं. सर्व सत्ता त्यांच्या हातीं असून राज्यांतील हरएक उलाढाल त्यांचे हुकुमानें होत असे. बाळाजीला पेशवेपदावरून दूर करावयाचें असा त्यांचा पक्का निश्चय झाला असता तर तसें करण्यास ते असमर्थ होते असें नाहीं. पेशवे फौजबंद असल्यामुळें त्यांनीं घोटाळा माजविला असता असें घेऊन चाललें तरी रघुजी भोसले, दाभाडे, गायकवाड, प्रतिनिधी व दुसरे कितीएक सरदार यांचे हातून त्यांना पेशव्यांचा बंदोबस्त करतां आला असता. परंतु शाहूमहाराज शाहाणे व दूरदर्शी होते व बाळाजीची खरी योग्यता त्यांस माहीत होती. त्यांनीं बाळाजीविरुद्ध आणलेल्या आरोपांची बारकाईनें चौकशी केली व शेवटीं जेव्हां हें विरुद्ध मंडळाचें कारस्थान आहे अशी त्यांची खातरी झाली, तेव्हां त्यांनीं आपला बेत रहित केला. शाहूचेमागें रामराजासारखा कर्तृत्वहीन पुरुष गादीवर आल्यामुळें सातारचे राजे पुढें निर्माल्यवत् झाले. परंतु त्यांना तसें करण्याचा बाळाजीचा कृतसंकल्प होता असें मात्र ह्मणतां येणार नाहीं.

केली. तेव्हां हे सर्व आरोप खोटे आहेत अशी त्यांची खात्री झाली. त्या वेळीं महाराज असें ह्मणाले कीं, "लोक भलतेंच सांगतात. सर्व लटकें. नाना जिवानें खुशाल असला म्हणजे सर्व बरें आहे. बारांना वाईट नाना. माझा तेवढाच चाकर माझे पदरीं मातबर आहे." यावरून नानासाहेबांविषयीं शाहूमहाराजांचें मत काय होतें व त्यांच्यावर महाराजांची केवढी भिस्त होती हें सहज दिसून येतें. वर सांगितल्याप्रमाणें महाराजांनीं आपली खातरी करून घेतल्यावर नानासाहेबांस पेशवेपदावरून दूर करण्याचा आपला विचार त्यांनीं रहित केला, व अशा रीतीनें नानासाहेब एका मोठ्या अरिष्टांतून निभावले.

दरबारी मंडळीकडून नानासाहेबांस झालेला त्रासः–सातारचे दरबारीं नानासाहेबांचे मुख्य प्रतिस्पर्धी म्हटले म्हणजे प्रतिनिधी व तदंगभूत त्याचा मुतालिक यमाजी शिवदेव, दाभाडे सेनापति व तदंगभूत दमाजी गायकवाड, बाबूजी नाईक बारामतीकर व रघूजी भोसले हे होत. पेशवे व प्रतिनिधी यांच्यांत मूळपासून वैमनस्य होतें, व पेशव्यांनीं आपल्या तेजानें त्यांस शाहूमहाराजांचे कारकीर्दींत बहुतेक अस्तंगत केलें होतें. इ० स० १७३१ त बाजीराव साहेबांनीं त्रिंबकराव दाभाडे सेनापति याचा डभई येथें पराभव केल्यामुळें व फौजेचा अधिकार पेशव्यांनीं आपलेकडे घेतल्यामुळें, तसेंच त्रिंबकरावाचेमागें त्याचा पुत्र खंडेराव दाभाडे हा व्यसनी बनल्यामुळें सातारचे दरबारीं दाभाड्यांचें महत्त्व फार कमी झालें होतें. बाकी राहिलेल्या मंडळींत रघूजी भोसले मात्र नानासाहेबांस होईजड प्रतिस्पर्धी होता, व त्यानें नेटानें पेशव्यांविरुद्ध खटपटी केल्या असत्या तर पेशव्यांस बरेंच घाबरें करून सोडलें असतें. परंतु इ० स० १७४४ त नानासाहेबांनीं रघूजीशीं शाहूमहाराजांचे मध्यस्थीनें तह

करून त्याला आपलासा केलें होतें. ह्या सर्व गोष्टींमुळें शाहूमहाराजांचे मृत्यूपर्यंत विरुद्ध मंडळीकडून नानासाहेबांस फारसा त्रास पोहों-चला नाहीं. परंतु त्यांचेमागें वरील मंडळीनें नानासाहेबांविरुद्ध मोठें काहूर करून सोडलें. नानासाहेबांनीं इ० स० १७५० पासून इ० स० १७५३ पर्यंत त्या सर्व मंडळीचा बंदोबस्त करून त्यांना जागच्याजागीं बसविलें. सांगोल्यास भाऊंचे हस्तें प्रतिनिधी व यमाजी शिवदेव यांचा मोड करून त्यांस हतवीर्य केलें; दाभाडे व दमाजी गायकवाड यांचा गेंडयाचे माळावर पराभव करून गायक-वाडास कायमचा आपले बाजूस सामील करून घेतलें व अशा रीतीनें ताराबाईची बाजू लंगडी केली. कर्नाटकांत सोंधें, बेदनूर, सावनूर वगैरे ठिकाणीं मक्त्याचे पैसे भरून बाबूजी नाईक चौथाई वगैरे हक्क वसूल करण्याकरितां जात असे. परंतु नानासाहेबांनीं त्या त्या प्रांतांतील मंडळीकडून बाबूजीस त्रास देवबून त्याची रग जिरवून टाकिली. फक्त ताराबाईकडून मात्र त्यांना अखेरपर्यंत अतिशय त्रास भोगावा लागला. शाहूमहाराज गादीवर होते तोंपर्यंत या बाईचें कांहीं चाललें नाहीं. परंतु त्यांचेमागें तिचा नातू रामराजा हा राज्यपदारूढ झाल्यामुळें तिचें फारच प्रस्थ माजलें[1]

---

[1] इ० स० १७०७ त शाहूमहाराज मोंगलांचे कैदेंतून सुटून दक्षिणेंत आले त्या वेळीं त्यांचा गादीवरचा हक्क उडवून टाकण्याकरितां ताराबाईनें इ० स० १७१२ पर्यंत त्यांना अतिशय त्रास दिला. पण त्या कामीं तिला अपयश आ-ल्यामुळें तिनें कोल्हापुरास स्वतंत्र गादीची स्थापना केली. पण इ० स० १७१२ त तिचा पुत्र शिवाजी मरण पावल्यामुळें रामचंद्रपंत अमात्य यानें तिची सवत. राजसबाई हिचा पुत्र संभाजी यास गादीवर बसवून या बाईस राज्यकारभारांतून काढून नजरकैदेंत ठेविलें. सन १७३० त श्रीपतराव प्रतिनिधीनें संभाजी-महाराजांचा पराभव केला त्या वेळीं तिला कैद करून साताऱ्यास आणिलें व शाहूमहाराजांनीं तिला अखेरपर्यंत साताऱ्याचे किल्ल्यावर नजरकैदेंत ठेविलें होतें

व सर्व राज्यकारभार आपले मतानें चालावा असें तिला वाटूं लागलें. नानासाहेबांस ही गोष्ट पसंत नसल्यामुळें ती त्यांचा द्वेष करूं लागली. तिनें दादोबा प्रतिनिधी व यमाजी शिवदेव यांस नानासाहेबांविरुद्ध उठविलें, बाबूजी नाईक यास नानासाहेबांस त्रास देण्याविषयीं भर दिली, सलाबतजंगाचा दिवाण रामदासपंत याच्याशीं राजकारण करून त्याच्या भावास पेशवाई देण्याचा विचार केला, महादाजीपंत पुरंदरे यास फितविलें, व त्याच्याच मध्यस्थीनें रामचंद्रबाबा शेणवई याच्या द्वारें भाऊसाहेबांचें मन नानासाहेबांविषयीं कलुषित केलें, दमाजी गायकवाड यास फौजेसह सातान्यास आणिलें, कोल्हापुरच्या संभाजी महाराजांनीं सातान्यावर पेशव्यांविरुद्ध स्वारी करावी ह्मणून खटपट केली, उमाबाई दाभाडे हिला चढीं लाविलें, शिंदेहोळकर यांच्या बुद्धीस भ्रंश पाडण्याचा प्रयत्न केला, रघूजी भोसले यास सलाबतजंगास मिळण्यास सांगितलें व स्वतः नानासाहेबांविरुद्ध फौज तयार केली. अशा रीतीनें तीन वर्षेपर्यंत या बाईनें नानासाहेबांस फार त्रास दिला, व त्यांच्या नाशाविषयीं तिचा एकसारखा प्रयत्न सुरू होता. परंतु त्या कामीं तिला यश आलें नाहीं. नानासाहेबांनीं तिची समजूत घालण्याचा पुष्कळ प्रकारें प्रयत्न केला पण तिची समजूत पटेना. तिनें रामराजे यांसह किल्ल्यांतून खालीं येऊन शहरांत वाड्यामध्यें रहावें ह्मणून त्यांनीं आपली होती तेवढी शिकस्त केली, तसेंच राज्यकारभारांतही कांहीं गोष्टी तिच्या सल्ल्यानें करावयाच्या असें ठरविलें; पण ही बाई इतकी विलक्षण होती कीं, तडजोडीचें बोलणें बोलण्याकरितां ह्मणून तिच्या तर्फेच्या मंडळीबरोबर नानासाहेबांनीं ज्या सरदारास पाठविलें होतें त्याला तिनें संशयानें किल्ल्यांत घेतलें नाहीं, इतकेंच नव्हे तर तिनें आपल्या तर्फेच्या

मंडळीसही आंत घेतलें नाहीं. शेवटीं "उतरली तर उत्तम, नाहीं तर एका खाशानें एथें दहा हजार फौजेनिशीं असलें पाहिजे" असें नानासाहेबांनीं ठरविलें. पुढें त्रिंबकराव मामा पेठे यास त्यांनीं ताराबाईच्या बंदोबस्ताकरितां साताऱ्यास पाठवून दिलें. त्यानें मोठ्या शहाणपणानें ताराबाईचें मन वळवून किल्ल्यांतील तिच्या तर्फेच्या मंडळीमध्यें भेद करून तिचा कायमचा बंदोबस्त केला.

नानासाहेबांच्या कारकीर्दीचें धोरण:—इ० स० १७४० पासून इ० स० १७५० पर्यंत म्हणजे शाहूमहाराजांचे मृत्यूपर्यंत नानासाहेबांच्या कारकीर्दीचें धोरण शाहूमहाराजांची एकनिष्ठपणें सेवा करून इतर सरदार व मंत्रिमंडळावर आपला वचक ठेवून मराठ्यांची सत्ता हळू हळू विस्तृत करण्यापलीकडे फारसें नव्हतें. शाहूमहाराजांचेमागें सर्व राज्यांचीं सूत्रें त्यांचे हातीं आल्यावर त्यांच्या कारकीर्दीचें पहिलें धोरण फिरलें. यापुढील अकरा वर्षांत ह्मणजे इ० स० १७५० पासून इ० स० १७६१ पर्यंत सर्व हिंदुस्तान देश मराठ्यांचे अमलाखालीं आणण्याचा त्यांनीं प्रयत्न केला, व त्या कामीं सदाशिवरावभाऊंचें त्यांस फार साह्य मिळालें. या अकरा वर्षांच्या नानासाहेबांच्या कारकीर्दीचें धोरण खालीं दिलेल्या तत्त्वांवर होतें:—१ उत्तर-हिंदुस्तानांत राजपुताना, रोहिलखंड, अंतरवेद, मुलतान, लाहोर वगैरे प्रांतांत मराठ्यांचा अमल बसवावयाचा; २ काशी, प्रयाग, अयोध्या वगैरे हिंदूंचीं क्षेत्रें अयोध्येच्या वजिरापासून घेऊन बंगाल प्रांत ताब्यांत आणावयाचा; ३ दक्षिणेंत निजामाचें राज्य घ्यावयाचें; ४ कर्नाटकांत श्रीरंगपट्टणचें राज्य हैदरअल्लीनें

---

१ पत्रें व यादी का. सं. ३५३, ३५४, ३५९. २ राजवाडेकृत म. इ. सा. खंड १ लेखांक १, ३१, ३७, ३९ इ. व. का. सं. प. या. ३६२, ३७३, ३८७ इ.

तेथच्या हिंदु राजापासून बळकाविलें होतें तें बुडवावयाचें; ५ कोंकणांत हबशीचा अमल नाहींसा करावयाचा; ६ सातारा व कोल्हापूर या गाद्या एक करावयाच्या; ७ मराठे सरदारांची व्यवस्था लावावयाची. कलम १ यांत नमूद केलेले प्रांत इ० स० १७५० त अहमदशाहा बादशाहानें पेशव्यांस दिले होते व त्याच वेळीं अबदालीचा बंदोबस्त करण्याचें वचन पेशव्यांनीं बादशाहास दिलें होतें. इ० स० १७५७ त अबदालीनें हिंदुस्तानावर स्वारी केली त्या वेळीं त्याचें पारिपत्य करण्याकरितां नानासाहेबांनीं दादासाहेबांची रवानगी केली. परंतु दादा त्या प्रांतीं जाऊन पोहोंचतात तोंच अबदाली आपले मुलखीं निघून गेला. परंतु परत जातांना त्यानें पंजाबचा बंदोबस्त करण्याकरितां आपला पुत्र तैमूरशाहा यास त्या प्रांतीं ठाविलें होतें. पुढें इ० स० १७५८ त दादांनीं त्याला पंजाबांतून घालवून दिलें, व त्या प्रांतीं मराठ्यांचा अमल बसविला. अंतरवेद गोविंदपंत बुंदेले याच्या ताब्यांत पेशव्यांनीं पूर्वीच दिली होती. अयोध्या, रोहिलखंड वगैरे जिंकण्याचें काम शिंद्यांस सांगितलें होतें, व त्यांनीं सुजा व नजीबखान यांस बरेंच दमविलें होतें. २ काशी, प्रयाग वगैरे क्षेत्रें सुजाउद्दौल्यापासून घेण्याचा नानासाहेबांचा प्रयत्न इ० स० १७४२ पासून सुरू होता. इ० स० १७५३ त जयाप्पा शिंदे उत्तर-हिंदुस्तानांत गेला त्या वेळीं वरील दोन क्षेत्रें घेण्याचें काम नानासाहेबांनीं त्यास सांगितलें होतें, व तें काम प्रथमतः करण्याचा जयाप्पाचा बेत होता. परंतु त्याच वेळीं मारवाडची मोहीम सुरू झाल्यामुळें व पुढें त्याच मोहिमेंत इ० स० १७५५ त जयाप्पाचा खून झाल्यामुळें त्याचे हातून वरील काम तडीस गेलें नाहीं. पुढें ती कामगिरी

१ राजवाडेकृत म. इ. सा. खंड १ लेखांक. १.

नानासाहेबांनीं दत्ताजी शिंदे यास सांगितली. परंतु तीनचार वर्षे तो इतर मुलूखगिरींत गुंतल्यामुळें त्याला तिकडे लक्ष देण्यास अवसर मिळाला नाहीं. इ० स० १७५९ त दत्ताजी लाहोरास गेला व तिकडचा बंदोबस्त करून काशी, प्रयाग वगैरे क्षेत्रें घेऊन बंगाल्यावर स्वारी करण्याचे हेतूनें तो परत फिरला. इतक्यांत अबदालीचा शह येऊन पोहोंचला. त्यामुळें दत्ताजीला आपला मूळचा बेत रहित करून अबदालीच्या पारिपत्याचा विचार करावा लागला. ३ दक्षिणेंत पेशव्यांनीं इसवी सन १७५१, इसवी सन १७५२, इसवी सन १७५७ व इसवी सन १७६० या सालांत सलाबतजंगावर स्वाऱ्या करून त्याचा बहुतेक मुलूख घेतला होता. शिवाय नागपुरकर भोसल्यांनींही पाइनगंगेच्या बाजूनें सलाबताचा बराच मुलूख आपले ताब्यांत आणला होता. अशा रीतीनें निजामाची बहुतेक सत्ता मराठ्यांनीं संपुष्टांत आणिली होती, व त्याच्याकडे फारच थोडा मुलूख शिलक राहिला होता. ४ कर्नाटकांत इ० स० १७५९ पर्यंत बहादुरभेंडा, बेदनूर, होळीहोन्नूर, सावनूर, सोंधें वगैरे प्रांत मराठ्यांनीं घेऊन श्रीरंगपट्टणच्या कुंभार राजाची सत्ता बहुतेक नामशेष केली होती. पुढें हैदरअल्लीनें तें राज्य बळकाविलें. तेव्हां सदाशिवराव भाऊनें तें राज्य खालसा करण्याचा निश्चय केला होता. ५ मराठ्यांनीं कोकणांत हबशीवर वारंवार स्वाऱ्या करून त्याचीं कांसें, उदेरी वगैरे बेटें इ०स० १७६० त घेऊन त्याचा बहुतेक अमल उठविलाच होता. सारांश इ० स० १७६० पर्यंत नानासाहेबांनीं आपल्या अलौकिक शहाणपणानें बहुतेक हिंदुस्तानांत मराठ्यांची सत्ता प्रस्थापित केली होती, व तिला कायमचें रूप देणें मात्र शिलक राहिलें होतें. सुजाउद्दौला,

नजीबखान, सलाबतजंग, हैदरअल्ली, निजामअल्ली, हबशी वगैरे मंडळीस दाबून टाकून व सर्वत्र एकछत्री अमल सुरू करून हिंदुपदपादशाहीच्या टोलेजंग इमारतीचें काम त्यांनीं फारच थोड्या अवकाशांत पुरें केलें असतें. परंतु मनाप्रमाणें सर्व गोष्टी घडून आल्या तर काय होणार नाहीं ? पेशव्यांचे मनांतील वर सांगितलेले अवाढव्य हेतु अबदालीच्या आगमनानें जागच्याजागींच थिजले, व पानपतच्या पराजयामुळें मराठ्यांनीं जी एकदा माघार खाल्ली तींतून त्यांनीं आपलें डोकें कधींच वर काढलें नाहीं.

सातारा व कोल्हापूर हीं राज्यें एक करण्याचा नानासाहेबांचा विचार:—सातारा व कोल्हापूर या गाद्या एक करण्याचा विचार इ. स. १७४७ पासून नानासाहेबांचे मनांत घोळत होता, व याच हेतूनें त्यांनीं इ. स. १७४० त कोल्हापुरच्या संभाजी महाराजांशीं गुप्त करार केला होता. हा करार[1] येणेंप्रमाणें:—

"१ साताऱ्यास तीर्थस्वरूप शाहूमहाराज राज्य करीत होते त्याजमुळें वारणेचा तह जहाला होता. त्यासि तीर्थस्वरूप शाहूमहाराज याणीं कैलासवास केला. त्यांच्या पोटीं संतान नाहीं तेव्हां तें राज्य स्वामींचें आणि एकछत्री शिक्का महाराजांचा चालावा.

शाहूमहाराज असते समयीं किल्ले सातरच्या मुक्कामीं सेवकांनीं विनंति केली जे, शाहूमहाराज यांचा जीवात्मा आहे तों बाह्यात्कारी त्यांचे सेवक. अंतर्यामीं स्वामींचे. शाहूमहाराज याणीं कैलासवास केल्यावर दोहीं राज्यांवर स्वामींची (सत्ता) आणि आम्ही सेवक स्वामींचे. स्वामींच्या आज्ञेप्रमाणें वर्तणूक करूं अशी शपथ दिली होती. त्याचप्रमाणें दोन्ही राज्यें एक करून स्वामींचा शिक्का चा-

१ पत्रें व यादी ४२८ का. सं.

लावा आणि आम्ही शाहूमहाराज यांचे कारकीर्दीप्रमाणें सेवा करून असावें हें प्रमाण. यासि अंतर करणार नाहीं.

२ वारणेआलीकडे तुंगभद्रेपावेतों खासगी प्रांत करून महाराजांस द्यावा.

वारणेपासून तुंगभद्रेपावेतों गड, कोट, किल्ले, ठाणीं दरोबस्त खासगींस करून देऊं.

३ साताऱ्यास राजधानीचा खर्च व खासगी खर्चास सरंजाम महाराजांकडे द्यावा.

शाहूमहाराज यांच्या कारकीर्दीप्रमाणें देऊन वर्तणूक करूं.

४ स्वामींच्या सन्निध लहान मोठे सेवक सेवा करून होते त्यांस त्यांच्या योग्यतेप्रमाणें चालवणें.

योग्यतेनुरूप स्वामींच्या आज्ञेप्रमाणें चालवूं.

५ हुजूरच्या सनदेनें लोकांस गांव इनाम व वतनें दिलीं तीं चालवावीं. अंतर करूं नये.

स्वामींनीं कृपाळू होऊन ज्यांस इनाम गांव व वतनें जीं दिलीं असतील तीं आज्ञेप्रमाणें चालवूं.

६ संस्थान बिदनूर व सोंधें व अंतरूज व सावनूर येथील चवथाई व तोफेचा ऐवज सरकारांत यावा.

पावत आल्याप्रमाणें ऐवज पावता होईल आणि स्वामींच्या आज्ञेप्रमाणें निर्वेधपणें होई तसें करूं.

७ स्वामींत व तुम्हांत किमपि पडदा नसावा. स्वामींनीं जें केलें तें तुम्ही परिणामास नेऊन स्वामींच्या लक्षानुरूप चालून प्रांजळ रीतीनें स्वामींच्या सेवेसीं सादर असावें.

स्वामींची सेवा एकनिष्ठेनें करून स्वामी आज्ञा करितील तदनुरूप

आज्ञेप्रमाणें मनोदयानुरूप वर्तणूक करूं. स्वामीचरणीं द्वैतभाव किमपि न धरूं.

८ शिंदे, नरगुंदे व पतके पूर्वी हुजूरपागेचे सरदार सरंजाम-सुद्धां पूर्ववत्प्रमाणें स्वामींच्या हुजुरातीस सेवा त्यांनीं करावी. त्यांचा सरंजामाचा व पागेचा फडशा हुजूर होणें तो होत असावा.

स्वामींच्या आज्ञेप्रमाणें त्यांचे हातून वर्तणूक होय ऐशी करून देऊं. आज्ञेप्रमाणें त्यांच्या हातून वर्तणूक न होय तरी त्यांजकडील सरंजाम गडं, कोट, किल्ले, ठाणीं सरकारांत घेऊन देऊं.

९ सरदेशमुखी व बाजे वतनें जीं सरकार तालुक्यास आहेत तीं सरकारांत असावीं.

शाहूमहाराजांच्या कारकीर्दीप्रमाणें सरकारांत चालवूं.

१० स्वामींकडे किल्ले हुजुरातीस आहेत त्यांचे सरंजाम पूर्वील वहिवाटीप्रमाणें किल्ल्यांच्या तनख्यास किल्ल्यांकडे सुधामत चालावे.

पूर्वील भोगवट्याप्रमाणें निर्वेध चालवूं.

११ सरदेशकुळकर्णाचे व इनाम गांव चालवावे.

आज्ञेप्रमाणें चालवूं.

१२ आंगरेकडील किल्ले व जंजिरे व भुईकोट पंचमहाल जयगडा-पर्यंत सरकारांत यावे.

आज्ञेप्रमाणें आंगरेकडील किल्ले व जंजिरे व भुईकोट पंचमहाल जयगडापर्यंत दरोबस्त मुलूख घेऊन स्वामींकडे देऊं. ”

अशा रीतीनें बारा कलमांचा ठराव त्या वेळीं उभयपक्षीं झाला. जरी हा करार शाहूमहाराजांचे हयातींत इ: स. १७४० त झाला होता, तरी त्याची बजावणी शाहूमहाराजांचे मृत्यूनंतर व्हावयाची होती. हा करार नानासाहेबांचे मनांत शाहूमहाराजांविषयीं अप्रीति

होती ह्मणून केला होता असें जरी ह्मणतां येणार नाहीं, तरी त्यावरून एवढी गोष्ट सिद्ध होते कीं, शाहूमहाराज निपुत्रिक वारल्यास त्यांचेमागें सातारा व कोल्हापूर या दोन गाद्या एक करण्याचे विचार नानासाहेबांचे मनांत इ. स. १७४० पासून घोळत होते. परंतु त्यांचा हा मनांतील हेतु शाहूमहाराजांनीं ताडला होता असें दिसतें. कारण ते १७४९ त मरण पावले त्या वेळीं त्यांनीं पेशव्यांस जी यादी करून दिली तींत त्यांनीं स्पष्ट रीतीनें म्हटलें आहे कीं, "कोल्हापुरचें न करनें." त्यामुळें नानासाहेबांस इ. स १७४९ त आपला हेतु सिद्धीस नेतां आला नाहीं. पण त्यामुळें ते निराश मात्र झाले नव्हते. कोल्हापुरचे संभाजीमहाराजही निपुत्रिक असून वृद्ध झाले होते. तेव्हां त्यांच्या मृत्यूनंतर आपला इष्ट हेतु सिद्धीस न्यावा असें त्यांचे मनांत होतें. इ. स. १७६० च्या दिजंबर महिन्यांत संभाजीमहाराज वारले. परंतु त्यांनींही मरणसमयीं राज्यव्यवस्थेसंबंधानें जो लेख केला त्यांत खानवटकर भोसले कुळांतील एक मुलगा दत्तक घेऊन राज्य चालवावें असें लिहून ठेविलें होतें. परंतु ह्या गोष्टीमुळें नानासाहेब नाउमेद झाले नव्हते. खानवटकर कुळांतील जो मुलगा दत्तक घ्यावयाचा होता त्यास रामराजे यांच्या मांडीवर दत्तक देऊन दोन्ही गाद्यांचा एकच धनी करावा असा नानासाहेबांनीं घाट घातला.* परंतु पानपतच्या भयंकर अपघाताचा जबरदस्त धक्का बसून नानासाहेब पुढें लवकरच मरण पावले व त्यांचा मनांतील हेतु तसाच राहून गेला. सारासार रीतीनें व राजकीय दृष्ट्या नानासाहेबांचा हेतु स्तुत्य होता. त्यांच्या हेतूप्रमाणें ह्या दोन गाद्या एक होण्याचा सुयोग जुळून आला असता

* म० इ० सा० खंड १ प्रस्तावना पान ४६, लेखांक २८९, व चिटणिसांची बखर.

तर मराठ्यांतील आपसांतील दुहीचें बीज बरेंच नष्ट झालें असतें, व त्यांचे संघशक्तीस फार जोर येऊन नानासाहेबांसारख्या राजकार्यकुशल पुरुषानें त्याचा राष्ट्रकार्याकडे फार उत्तम उपयोग करून घेतला असता.

पेशव्यांनीं आपल्या सरदारांची केलेली व्यवस्थाः— इ० स० १७५२ पर्यंत नानासाहेबांनीं मराठमंडळांतील त्यांच्या विरुद्ध असलेल्या ताराबाई, सेनापती दाभाडे, गायकवाड, प्रतिनिधी इत्यादि मंडळीचा बंदोबस्त केला. त्यामुळें पुढें दुसऱ्या महत्त्वाच्या कामगिऱ्या करण्यास त्यांना बराच अवकाश सांपडला. त्या वेळीं राज्यांतील मुख्य सरदार म्हटले ह्मणजे शिंदे, होळकर, पवार, गायकवाड, भोसले, अंताजी माणकेश्वर, पिलाजी जाधव, विंचूरकर, गोविंदपंत बुंदेले, नारो शंकर राजेबहादर, पटवर्धन, मानाजी आंग्रे, त्रिंबकरावमामा पेठे, मेहेंदळे, बिनीवाले, पुरंदरे, वगैरे होते. हे सर्व सरदार पेशव्यांचे नोकर असून त्यांपैकीं बहुतेक पेशव्यांनीं निर्माण केले होते. उत्पन्नाचे संबंधानें त्यांचा अधिकार मामलेदारीचा असे. त्यांनीं आपले ताब्यांतील जहागिरीचा पैसा वसूल करून खर्चवेच वजा जातां जी शिलक राहील तिचा हुजूरपोत्यास भरणा करावा असा निर्बंध असे. कित्येकांना कमज्यास्ती फौज बाळगावी लागे व पेशवे मोहिमेवर निघाले ह्मणजे त्यांना त्यांचे मदतीस यावें लागत असे. जे निवळ मामलेदार असत त्यांना शिबंदीच्या खर्चाचा पैसा महालांतून मिळत असे, व जे सरदार असत त्यांना फौजेच्या खर्चाकरितां निराळा प्रांत तोडून दिलेला असे. अशा रीतीनें मुलकी व लष्करी अशा दोन्ही नात्यांनीं पेशव्यांचा आपल्या सरदारांशीं संबंध असे. सरदारांना दिलेल्या जहागिरी वंशपरंपरा असून त्यांना दरवर्षास आपल्या प्रांताचा हिशेब पेशव्यांस द्यावा लागत असे. जहा-

गिरींतील प्रजेला एखाद्या सरदाराविरुद्ध तकरार सांगावयाची असल्यास त्याची दाद पेशव्यांचे दरबारीं लागत असे, किंवा त्यांना आपलीं गान्हाणीं पेशव्यांनीं नेमलेल्या दरखदारांजवळ सांगतां येत असत. सरदारांकडून येणाऱ्या वार्षिक रसदेची रकम ठराविक नसून ती दरवर्षी ठरविली जात असे. पेशवे आज्ञा करितील त्या वेळीं त्यांना फौजेसह हुजूर यावें लागत असे. जहागिरदार निपुत्रिक असल्यास दत्तक कायम करण्याचा अधिकार पेशव्यांकडे असे. एखादा जहागिरदार किंवा सरदार मृत्यु पावला व त्याला एकापेक्षां अधिक मुलगे असले तर ती जहागिर कोणाला द्यावयाची याचा अधिकार पेशव्यांचे हातीं असे. तसेंच एखाद्या जहागिरदाराचे वर्तन गैर दिसल्यास त्याची जहागिर खालसा करण्याचा अधिकार पेशव्यांकडे असे. परकीय संस्थानिकांशी तह वगैरे करणें झाल्यास तो पेशव्यांचे मंजुरीनें करावा लागे. सातारच्या राजमंडळांतील प्रतिनिधी, सचीव, सेनापति, सुमंत, राजाज्ञ वगैरे मंत्रिमंडळ निस्तेज होऊन केवळ नामधारी झालें होते. त्याच्यात पेशव्याच्या शिंदे, होळकर, विंचूरकर पटवर्धन यांच्याप्रमाणे एखादा सरदार, किंवा पुरंदरे किंवा फडणीस यांच्याप्रमाणे एखादा मुत्सद्दी निर्माण झाला नाहीं. त्यामुळें राज्याचीं सर्व सूत्रें अप्रतिबद्ध नानासाहेबांचे हातीं आलीं, व पुणें हें मराठशाहीच्या राजधानीचें शहर झालें. वर सांगितलेली सरदार लोकांची व्यवस्था नानासाहेब व भाऊसाहेब या दोघांनीं केली होती. सरदार लोकांस वर सांगितल्याप्रमाणें जखडून टाकिल्यामुळें त्यांना फारच थोडी स्वतंत्रता राहिली होती; त्यामुळें कांहीं कांहीं सरदार पेशव्यांचा द्वेष करूं लागले, व त्याचा परिणाम पेशव्यांस पानपतांत भोगावा लागला.

या विरुद्ध मंडळींत मल्हारराव होळकर, गोविंदपंत बुंदेले, अंताजी माणकेश्वर यांचीं नांवें प्रमुखत्वानें सांगतां येतील. या सरदारांनीं पेशव्यांशीं कोणच्या रीतीनें कपटाचरण केलें याचें वर्णन पुढील कलमांत येईल.

पानपतांतील अपयशाचीं कारणें:—पानपतच्या लढाईत पेशव्यांस जें अपयश आलें त्याचीं निरनिराळीं कारणें सांगण्यांत येतात. त्यांतील मुख्य मुख्य कारणें येणेप्रमाणें:—

१ पेशव्यांनीं छत्रपतींची सत्ता संपुष्टांत आणिल्यामुळें कांहीं कांहीं मराठे व ब्राह्मण सरदारांचीं मनें त्यांच्याविषयीं कलुषित झालीं होतीं.

२ पेशव्यांनीं वाढविलेल्या व निर्माण केलेल्या सरदारांस पेशव्यांची कैद असह्य होऊन ते आपण स्वतंत्र व्हावें या उद्देशानें पेशव्याचे नाशाविषयीं प्रयत्न करूं लागले.

३ या मोहिमेंत सदाशिवरावभाऊचें वर्तन उद्दामपणाचें होतें, व स्वतःचे बलाविषयीं त्यास फाजील अभिमान होता.

४ त्यानें इब्राहिमखान गारदी याची मसलत ऐकून तोफखान्यावर ज्यास्त भिस्त ठेविली व जुनी गनिमी काव्यानें लढाई करण्याची रीति सोडून देऊन मोंगलाईपद्धतीचा अंगीकार केला.

५ शिवाजीनें लढाईस जाण्याचे वेळचे घालून दिलेले नियम सोडून देऊन सदाशिवरावानें बाजारबुणगें, कबिले वगैरे बरोबर घेऊन मोंगलाई थाटाची स्वारी काढिली.

६ सदाशिवरावानें दिल्लीचें तख्त फोडून मुसलमानांचें वैर संपादन केलें.

७ नानासाहेबांनीं रघुनाथरावासारख्या शूर पुरुषास मोहिमेचें

आधिपत्य न देतां तें सदाशिवरावास दिलें. सदाशिवरावास लढा-ईचा सराव नव्हता.

वर दिलेल्या कारणांपैकीं खरीं कोणती व खोटीं कोणतीं याचा येथें विचार करणें अवश्य आहे.

(१) बाळाजी बाजीरावानें साताऱ्च्या छत्रपतींची सत्ता संपुष्टांत आणिली ही गोष्ट जितकी खरी आहे, तितकीच शाहूमहाराजांचेमागें त्या छत्रपतींच्या अंगीं मराठी राज्याचीं सूत्रे समाधानकारक रीतीनें चालविण्याचे सामर्थ्य नव्हतें ही गोष्टही खरी आहे. शाहू-महाराज जिवंत होते तोंपर्यंत त्यानीं आपल्या मंत्रिमडळाच्या साह्यानें फार उत्तम रीतीनें राज्यकारभार चालविला. परतु वृद्धावस्थेत पुत्रशोक, स्त्रीशोक इत्यादि सकटें आल्यामुळें, राज्यास कोणी धनी न राहिल्यामुळे, व सकवारबाईच्या भयंकर कारस्थाना-मुळे आपलेमागे त्यांस राज्याची धडगत दिसेना व त्यामुळें त्याचे मनास फार क्लेश होऊ लागले. आपलेमागे गादीवर येऊन राज्यसूत्रें उत्तम रीतीने चालवील असा भोसले कुळात कोणी खबीर पुरुष त्यास दिसेना. तेव्हा मत्रिमडळापैकी कोणातरी खबीर पुरुषाच्या हातीं राज्यसत्ता देण्याचा त्यानी निश्चय केला. रघूजी भोसले, सेनापति दाभाडे, प्रतिनिधी वगैरे मंडळी होती, पण बाळाजी बाजीरावाचे अगी जे गुण व जी कर्तबगारी होती ती त्यांचे अंगीं त्यास दिसेना. तेव्हां त्यानी पोक्त विचार करून आपले कारकीर्दीचे अखे-रीस पुढील राज्यव्यवस्थेसंबधाने एक यादी करून ती बाळाजींचे स्वाधीन केली. या यादीचा उल्लेख मागें आलाच आहे. तिच्यामुळें सातारचे छत्रपति नामधारी बनून खरी राज्यसत्ता पेशव्यांकडे आली. शाहूमहाराजांचेमागें रामराजा गादीवर आला, पण तो मंदबुद्धि व

कर्तृत्वहीन होता. रामराजाच्या खर्चाकरितां म्हणून साठसत्तर हजारांचा मुलूख तोडून दिलेला होता. पण त्याची सुद्धां व्यवस्था त्याचे हातून होईना. बाळाजीचे हातीं राज्यकारभार आल्यावर ताराबाईपासून त्याला फार त्रास सोसावा लागला. तिचे मनांत सर्व मंत्रिमंडळ आपले ताब्यांत ठेवून सर्व कारभार आपण स्वतंत्र रीतीनें चालवावा असें होतें, व दाभाडे सेनापति, गायकवाड, प्रतिनिधी वगैरे मंडळींचें तिला पाठबळ होतें. पण इ० स० १७५३ पर्यंत बाळाजीनें तिच्यापक्षाच्या सर्व मंडळींची रग जिरवून व तिला कांहीं थोडासा अधिकार देऊन स्वस्थ बसविलें. इ० स० १७५५ त रामराजा व ताराबाई यांनीं अशी तोड काढिली कीं, पेशव्यांनीं उत्पन्नाची वाटेल तशी व्यवस्था करून आपला खर्च *चालवावा. या गोष्टीमुळें त्या दोघांचें जें कांहीं थोडेसें स्थानिक महत्त्व होतें तेंही नष्ट झालें. यापुढें ब्राह्मण सरदार किंवा मराठे सरदार यांपैकीं कोणींही तिच्याकडे लक्ष दिलें नाहीं. इ० स० १७५१ त ताराबाईच्या वतीनें बाळाजीशीं सामना देणारा दमाजी गायकवाड इ० स० १७६० त बाळाजीचा साह्यकर्ता म्हणून पानपतच्या मोहिमेंत आला होता. नागपुरकर भोसले व प्रतिनिधी यांशिवाय सर्व ब्राह्मण व मराठे सरदार पानपतांत हजर होते. तेव्हां साताऱ्च्या छत्रपतींची सत्ता संपुष्टांत आणल्यामुळें सरदार लोकांचीं मनें कलुषित होऊन त्यांनीं बाळाजीस साह्य न केल्यामुळें त्यास पानपतांत अपयश आलें, हें विधान सयुक्तिक दिसत नाहीं. आतां पानपतच्या मोहिमेंत कांहीं

* चिटणीसकृत पेशव्यांची बखर. म. इ. सा. खंड १–प्रस्तावना.

सरदार पेशव्यांच्या विरुद्ध गेल्याचे दाखले सांपडतात. पण हे सरदार सातारच्या राजमंडळापैकीं नसून पेशव्यांनींच स्वतः वाढविलेले व निर्माण केलेले होते, व ते विरुद्ध कां गेले याचीं कारणें पुढें येतील.

(२) राज्याचीं सर्व सूत्रें पेशव्यांचे हातीं आल्यामुळें मोहिमा, तह, निरनिराळ्या प्रांतांच्या उत्पन्नाची व्यवस्था इत्यादि सर्व गोष्टींची व्यवस्था पेशव्यांचे दरबारांतून चालत असे. सरदारमंडळानें कोणत्या नियमांनीं चालावयाचें तें नानासाहेब व भाऊसाहेब यांनीं ठरवून टाकिल्यामुळें पूर्वीप्रमाणे स्वतत्ररीतीने त्यास कोणतीही गोष्ट करतां येत नसे. इ० स० १७५३ पर्यंत रघूजी भोसले, दाभाडे, गायकवाड, प्रतिनिधी, यमाजी शिवदेव वगैरे विरुद्ध मडळीचा बदोबस्त केल्यानंतर सर्व राज्यसूत्रं सुरळीत रीतीने नानासाहेबाचे हातीं आलीं. परंतु पेशव्यांनी वाढविलेल्या व निर्माण केलेल्या सरदारांस पेशव्यांची ही सार्वभौमसत्ता असह्य होऊन ते आपले धनी पेशवे यांच्याविरुद्ध खटपटी करूं लागले. त्यामुळें राज्यांतील जुन्या सरदारांच्या भानगडी मिटत आहेत तोंच पेशव्यांना स्वकीय सरदारांचे डावपेंच, फंदफितूरी, कपट, उद्दामपणा यांना आळा घालण्याचा प्रसंग येऊन ठेपला. सरदार लोकांच्या या आत्मघातकी प्रयत्नांचे परिणाम पेशव्यांस पानपतांत भोगावे लागले. पेशव्यांस ताप देणाऱ्या या स्वकीय सरदारांत मल्हारराव होळकर, गोविंदपंत बुंदेले, अंताजी माणकेश्वर, वगैरे मंडळीचीं नांवें प्रमुखत्वानें सांगतां येतील. ही मंडळी कशी विरुद्ध वागली याचा थोडासा इतिहास देणें जरूर आहे.

मल्हारराव होळकर:—मल्हाररावासंबंधानें सदाशिवराव-भाऊचे मनांत इ० स० १७५० पासून आढी बसली होती. परंतु

मल्हाररावाचें त्यावेळ[1]पर्यंत पेशव्यांविरुद्ध मत नव्हतें, इतकेंच नव्हे तर इ० स० १७५३ पर्यंत मल्हाररावाचें पेशव्यांस पूर्ण पाठबळ होतें. असें ह्मटलें तरी चालेल. इ० स० १७५४ त कुंभेरीच्या वेळ्यांत शिंद्याच्या व जाटाच्या पगडीभाईमुळें मल्हारराव भ्रष्टप्रतिज्ञ झाला, व तेव्हांपासून तो शिंद्यांचा व पेशव्यांचा द्वेश करूं लागला. नागोरच्या स्वारींत जयाप्पाचा खून करण्याची मसलत मल्हाररावानेंच बिजेसिंगास दिली अशी शंका कांहीं ठिकाणीं आढळून येते. इ० स० १७५७ त राजपुतान्यांतील माधोसिंग, बिजेसिंग वगैरे मंडळीचा बंदोबस्त करीत असतां रघुनाथरावास फार अडथळे आले, याचें कारण मल्हाररावाची त्या मंडळीस आंतून मदत होती[3]. सहारणपूर वगैरे ठिकाणचे रोहिले रघुनाथरावास शरण आले. परंतु नजीबखान रोहिला त्याचे हातीं सांपडला नाहीं. इ० स० १७५७ त बादशाहा व सुजाउद्दवला यांस फसवून तो अबदालीस जाऊन मिळाला होता. रघुनाथराव दिल्लीस आल्यावर त्यानें नजीबखानाचें पारिपत्य करण्याचा निश्चय केला, तेव्हां तो मल्हाररावास शरण गेला. मराठ्यांच्या नाशाविषयीं नजीबखान कायावाचामनें करून प्रयत्न करीत असतांही मल्हाररावानें पेशव्यांस कोणीतरी शत्रु शिलक ठेविला पाहिजे अशा उद्देशानें त्यास आश्रय दिला. व कांहींतरी कारणें सांगून रघुनाथरावाचा नजीबखानावरचा राग शांत केला. इ० स० १७५८ त रघुनाथराव उत्तर-हिंदुस्तानची मोहीम आटपून दक्षिणेंत परत येत असतां वाटेंत त्याची व दत्ताजी आणि जनकोजी शिंदे यांची गांठ पडली, तेव्हां त्यानें नजीबखान

१ पृष्ठ ११० टीप १. २ का. सं. पत्रें व यादी ६२, ६९, ७४, ३५९, ३६३ वगैरे. ३ म. इ. सा. लेखांक ५२, ६७, ७१.

यास ठार मारून टाकावें असा त्या दोघांस उपदेश केला. या उपदेशाप्रमाणें त्या वेळीं नजीबखानाचें पारिपत्य झालें असतें तर मराठ्यांवर पानपतचा प्रसंग कधींच ओढवला नसता असें ह्मणण्यास हरकत नाहीं. पण जें होणार तें कसें टळणार ? रघुनाथरावाचेमागून मल्हारराव त्याच वाटेनें आला व त्यानें त्या दोघांस असा उपदेश केला कीं, "अटकेपासून रामेश्वरापर्यंत एकछत्री राज्य झालें, एक नजीबखान मात्र खळी राहिला आहे; त्याचें पारिपत्य केलिया मग आह्मांस कोणी पुसणार नाहीं. यास्तव एवढा खळी रक्षून जें काय करणें तें करावें." मल्हाररावाचा हा आत्मघातकी उपदेश जनकोजीस रुचला नाहीं, पण दत्ताजीस तो मानवला, व त्यानें नजीबखानास हाताशीं घेतलें. त्याचा अखेर परिणाम दत्ताजीसच भोगावा लागला व तोच नजीब त्याच्या नाशास कारणीभूत झाला. याच वेळेच्या सुमारास पेशवे व होळकर यांच्यामध्यें हिशेबासंबंधें तेढ उत्पन्न झाली. इ. स. १७५९ त दत्ताजी अंतरवेदींत रोहिल्यांशीं लढत असतां अबदाली आल्याची बातमी जेव्हां त्यास समजली तेव्हां दत्ताजीनें मल्हाररावास मदतीसाठीं पत्रें पाठविलीं, व पेशव्यांसही पत्रें लिहिलीं. पेशव्यांनींही दत्ताजीचे मदतीस जाण्याविषयीं मल्हाररावास पत्रें पाठविलीं. "मल्हाररावांनीं आधीं काम कोणतें करावें ? मग कोणतें करावें ? माधोसिंगाचा मजकूर काय ? जेव्हां ह्मटलें तेव्हां पारिपत्य होतें. तो विचार त्यांनीं न केला." या प्रमाणें नानासाहेबांनीं मल्हाररावास दोष दिला आहे. तसेंच "मल्हारबांस वारंवार पत्रें रवाना केलीं आहेत, परंतु त्यांचे प्रकृतीस तुह्मीं जाणतां," असें गोविंदपंत बुंदेले यास लिहून नानासाहेबांनीं मल्हाररावाचा दुष्ट हेतु व्यक्त केला

---

१ म. इ. सा. खंड १ लेखांक, १५७, १६१.

आहे. परंतु मल्हाररावास इतकीं आर्जवाचीं पत्रें गेलीं असतांही त्यानें जाणूनबुजून त्यांच्याकडे दुर्लक्ष केलें व तो जयनगर प्रांतांत भिकार गावें व गढ्या घेत बसला. मल्हारराव त्या वेळीं दत्ताजीस जाऊन मिळाला असता तर रोहिले व सुजाउद्दौला यांचें तावडतोब पारिपत्य होऊन अबदालीस त्यांची मदत मिळाली नसती, व शिंदे आणि होळकर या दोघांस त्याचें सहज पारिपत्य करतां आलें असतें. रघुनाथरावाचीही अशीच इच्छा होती. मल्हाररावास पाठविलेल्या एका पत्रांत त्याने असें लिहिलें आहे कीं, "दोन्ही सरदार एकत्र असलियास उत्तम रीतीनें पठाणांचें पारिपत्य होईल × × एकदिल फौज असलिया हें काम सहजांत आहे." परंतु मल्हाररावाचे मनांत पेशवे व शिंदे यांचेविषयीं पूर्ण द्वेष बाणला होता. शिंदे पेशव्यांचे मताप्रमाणें चालतात, नजीबखानास मारून पेशव्यांचें राज्य निष्कंटक करण्याचा शिंद्यांचा प्रयत्न आत्मघातकी आहे, हिंदुस्तानांत एखादा तरी 'खळी' राखून ठेवला तरच पेशवे आपणास वचकून रहातील, इत्यादि कुत्सित कल्पना मनांत आणून मल्हारराव ऐन आणीबाणीचे प्रसंगीं दत्ताजीचे मदतीस गेला नाहीं, व तारीख १० जानेवारी रोजीं दिल्लीजवळ बडाऊंच्या घांटावर दत्ताजी व अबदाली यांचें युद्ध होऊन दत्ताजी रणांगणीं पडून त्याच्या सर्व फौजेचा विध्वंस झाला, व जनकोजी रणांत घायाळ होऊन मोठ्या कष्टानें आपले प्राण वांचवीत कोटपुतळीपर्यंत पळत आला तेव्हां आपणास जसें काय माहीतच नाहीं असें दाखविण्याकरितां शाहाजणें वाजवीत मल्हारराव घायाळ झालेल्या जनकोजीस येऊन भेटला. पण त्याच्या येण्यापासून मुळींच उपयोग झाला नाहीं. शिंद्याचे फौजेचा नाश झाल्यामुळें अबदालीच्या पारिपत्याचें काम एकट्या होळकराच्या फौजेस रेटेना.

ता. ४।५ मार्च १७६० चे सुमारास होळकराचे फौजेचा व अबदालीचा सामना झाला व त्यांत होळकराचा पूर्ण पराभव झाला. मल्हारराव या लढाईत हजर नव्हता. अबदालीनें जनकोजी व मल्हारराव यांची एकसारखी पाठ धरली होती. शेवटीं मेच्या सुमारास ते दोघे आपापल्या फौजेसह केरौलीच्या आसपास राहिले व अबदाली अंतरवेदींत अनूप शहरीं तळ देऊन बसला. पानपतच्या मोहिमेत मल्हाररावानें कसूर केल्याचा प्रत्यक्ष लेखी पुरावा अद्यापि उपलब्ध नाहीं. पण मराठ्यांचे इतिहासाची साधनें खंड १ यांतील लेखांक २०२ यांत सदाशिवरावभाऊनें सुजाउद्दौल्यास लिहिलें आहे कीं, "अबदालीस खूब तंबी करावी, मल्हाररावाचा या गोष्टीविषयीं संशय न आणावा." या वाक्यावरून असें अनुमान काढतां येतें कीं, मल्हारराव अबदालीचे पारिपत्य करण्यास तयार नाहीं असें सुजाउद्दौल्यास वाटलें होतें. तसेंच अबदालीचें पारिपत्य करणें म्हणजे अप्रत्यक्ष नजीबखानाचे पारिपत्य करणें, व ती गोष्ट तर मल्हाररावास कर्तव्य नव्हती. तेव्हां मल्हाररावानें पानपतच्या मोहिमेंत जाणूनबुजून कुचराई केली असली पाहिजे असा संशय घेण्यास जागा राहते. तसेंच इ. स. १७६३ त निजामाशीं पेशव्यांची राक्षसभुवन येथें लढाई झाली त्या वेळीं प्रथमतः मराठ्यांचा मोड होऊन मराठी फौज पळूं लागली तेव्हां मल्हाररावानें "मावारे चला, पुण्याचें राज्य करूं," असा पहिले माधवराव यांस उपदेश केला. त्या वेळीं माधवरावानें त्यास असा जबाब दिला कीं, "काका, भाऊसाहेब यांस आपण मागें (पानपतांत) बुडविलें असें ऐकत होतों तें आज खरें झालें." या वाक्यावरून सुद्धां मल्हाररावानें पानपतच्या युद्धांत

बरीच कुचराई केली असावी असें म्हणण्यास जागा राहते. एकं-दरीनें पाहतां मल्हाररावाचें पेशव्यांशीं वर्तन कपटाचें होतें व पान-पतच्या अपयशाचें खापर अंशतःतरी मल्हाररावाचे डोक्यावर फुटलें पाहिजे असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

गोविंदपंत बुंदेलेः—याचें मुळचें नांव गोविंद बल्लाळ खेर. इ. स. १७३३ त बाजीरावानें त्यास बुंदेलखंडचा सुभेदार केलें असें कोठें कोठें ह्मटलें आहे, पण तें खरें नसावें. इ. स. १७४० च्या सुमारास तो बुंदेलखंडांत प्रथम आला असावा. इ. स. १७४६ पर्यंत तो एक साधारणच कमाविसदार होता. इ. स. १७४६।४७ सालीं जैतपुरची लढाई होऊन कलिंजर वगैरे ठिकाणें मराठ्यांनीं बुंदेल्यां-पासून घेतलीं. तेव्हां जिंकलेल्या प्रांताची कमावीस गोविंदपंतास मिळाली. तेव्हांपासून हळूहळू गोविंदपंताचे हातीं सर्व बुंदेलखं-डाचा अंमल येऊन त्याचा अधिकार बराच वाढला. इ. स. १७४७ च्यापुढें गोविंदपंत फौजफांटा ठेवून बुंदेलखंडांत मराठ्यांचा अं-मल बसवूं लागला, व तो एक मातबर कमाविसदार व सरदार बनला. पुढें गोविंदपंत आपल्या कमाविशींत पैशाची अफरातफर करितो असा नानासाहेब व सदाशिवरावभाऊ यांस संशय येऊं लागला, व इ. स. १७५७ त त्यांनीं त्रिंबक कृष्ण कानिटकर व जनार्दन आ-प्पाजी येरंडे या दोन कामगारांस प्रत्यक्ष बुंदेलखंडांत जाऊन खरी स्थिति काय आहे तें पाहण्याकरितां पाठवून दिलें. त्यांनीं खालीं दिलेल्या तकरारी गोविंदपंताविरुद्ध आणिल्याः—

१ "मागील जमा आहे त्यांपैकीं सोडून देऊन जमा कमी करितात."[1]

---

१ म. इ. सा. खंड १ लेखांक १४१

२ " दोन रुपये मागे ज्या महालांत शिबदी प्यादे होते त्याचा खर्च होता तो ज्यास्ती वाढविला. ज्या ठिकाणीं पांच प्यादे राहिले होते तेथे हल्लीं पचवीस ठवितात. "

३ " फौज नेमणूक प्रमाणे ठेवावी ते मन मानेल तशी ठेवून चार रुपये खर्च करावा ऐसें चित्तांत जाणून खर्च बहुत करितात. "

४ " वाटणी केली त्यास शिद्याकडे एक परगणा पांच लाखांचा गुजाराविशीं होता तो दिल्हा व जे सिबदी बहुत नलगे ते परगणे त्याजकडे दिल्हे. बहुत सिबदी लागती ते परगणे सरकारात ठेविले. "

५ " उभयता चिरंजीव भेटी व नजराणे आतस्ते घेतात. "

६ " आम्ही कर्ज जमा धरून सीलेदार यास मात्र रोजमारा (?) देतों. महालाचा अगर आणीक कोठील दाखला आजपर्यंत किमपि नाहीं. "

७ आह्माकडे माणूस आलें त्यास बरे पहात नाहीं; मग जमीदार आला तरी तो जिवें कैसा राहील ? या दहशतीमुळें कोणी येऊन आम्हांस भेटत नाही. "

८ " येथील अर्थ दुसरा वकील आल्याखेरीज कांहीं समजत नाहीं; कलमरुजवात यथास्थित होणार नाही. "

९ " येथील जुने कारभारी आहेत ते मन मानेल तैसे कारभारांत पडोन जें मिळविणें तें मिळवितात. "

अशा रीतीनें येरंडे व कानिटकर यांनीं गोविंदपताविरुद्ध नऊ तकरारी पेशव्यांकडे पाठवून दिल्या. गोविंदपंतास ती गोष्ट समजली

१ पेशव्यांनी कानिटकर व येरंडे यांस नेमून देऊन गोविंदपंताचा मोठा गौरव केला असें रा. पारसनीस बुंदेलखंड प्रकरण, पृष्ट १७३ येथें म्हणतात. पण त्याचें म्हणणें रा. राजवाडे यांनीं म. इ. सा. खंड १ यांत सप्रमाण खोडून काढलें आहे, व प्रस्तुत लेखकाचेंही तेंच मत आहे.

तेव्हां त्याचें धाबें दणाणून गेलें, व तो कानिटकर व येरंडे यांची विनवणी करूं लागला. गोविंदपंताचे प्रांतांत आपली कांहीं दाद लागत नाहीं असें पाहून येरंडे पुण्यास जाऊं लागला. तेव्हां आपणास संभाळून घेऊन आपलें रक्षण करावें म्हणून गोविंदपंत त्याची फारच खुशामत करूं लागला. अशा थापाथापीनें गोविंदपंतानें इ० स० १७६० च्या एप्रिलपर्यंत त्यांस आपले प्रांतीं ठेवून घेतलें. पुढें स्वतः सदाशिवरावभाऊ उत्तर-हिंदुस्तानांत येऊं लागला. भाऊ इ० स० १७६० च्या एप्रिलपासून इ० स० १७६१ च्या जानेवारी-पर्यंत उत्तर-हिंदुस्तानांत होता. पण त्या मुदतींत गोविंदपंतानें त्यालाही येरंडे व कानिटकर यांच्याप्रमाणें फसविलें. पानिपतच्या मोहिमेंत गोविंदपंतानें कशी कुचराई केली, व त्या योगानें तो कसा देशद्रोही बनला याचें थोडेंसें वर्णन करणें अवश्य आहे.

---

१ म. इ. सा. खंड १ लेखांक १३३—१५० हीं पत्रें वाचलीं असतां गोविंदपंत पैशाची अफरातफर करून पेशव्यांस कसें फसवीत होता याची सत्यता दिसून येते. तसेंच त्याच ग्रंथांतील लेखांक २०१ पासून २५९ पर्यंतची पत्रें वाचलीं तर तो भाऊसाहेब उत्तर-हिंदुस्तानांत गेल्यावर त्यांना कशा हुलकावण्या देत होता तेंही दिसून येतें. रा. राजवाडे यांनीं त्या ग्रंथांत गोविंदपंताविरुद्ध जो मजकूर दिला आहे तो खरा आहे असें वरील पत्रें वाचलीं म्हणजे सहज समजून येतें. पैशाची अफरातफर ही गोष्ट पेशवे व गोविंदपंत यांच्यामध्यें वैमनस्य उत्पन्न करण्यास मूळ कारणीभूत झाली. तेव्हां पेशव्यांचे कचाटींतून कसें सुटावें हा प्रश्न गोविंदपंतापुढें येऊन पडला. पानपतांतून मोकळे झाल्यावर आपल्या कुचराईबद्दल सदाशिवरावभाऊ आपली खात्रीनें वाट लावणार, अशी गोविंदपंतास दहशत बसली होती. तेव्हां मल्हारराव होळकराप्रमाणें तोही पेशव्यांचें महत्त्व जेणेंकरून कमी होईल अशा गोष्टी करूं लागला, व पानपतच्या मोहिमेंत सदाशिवरावानें ज्या ज्या म्हणून कामगिऱ्या त्यास सांगितल्या त्या करण्यास जाणूनबुजून कुचराई करूं लागला.

ता० १९ मार्च इ० स० १७६० रोजीं सदाशिवरावभाऊ आंबेपडदुराहून निघाला. तेव्हांपासून तो गोविंदपंतास सुजाउद्दौल्याशीं स्नेह करण्यास व दुसऱ्या कांहीं कामगिऱ्या करण्यास एकसारखीं पत्रें पाठवीत होता. "आपला व आमचा स्नेह वडिलोपार्जित आहे," "सरदारांनीं (शिंदे, होळकर यांनीं) व चिरंजिवांनीं (रघुनाथरावदादांनीं) आपले ठायीं ममतेंत अंतर केलें नाहीं. अबदालीची 'जड' हिंदुस्तानचे पादशाहींत रुतों देणें अयोग्य आहे", इत्यादि गोष्टी सांगून सुजास आपले बाजूस वश करून घेणें, पादशाहा अलीगोहर, मलकाजमानी व पट्टण्याचा सुभेदार जाफरअल्लीखान यांना अनुकूल करून घेणें, हिंदुपत वगैरे बुंदेले व यमुनेच्या पलीकडचे रजपूत संस्थानिक यांना चाकरीस सिद्ध करणें, अबदालीकडील बारीक बातमी काढून पाठविणें, स्वारी हिंदुस्तानांत आली म्हणजे वीस पंचवीस लाख रुपये ताबडतोब पाठविणें, वगैरे कामगिऱ्या सदाशिवरावानें गोविंदपंतास सांगितल्या होत्या.

गोविंदपंतानें या कामगिऱ्या करण्यांत कशी कुचराई केली व त्यानें प्रथम काय केलें पाहिजे ह्मणून त्याला भाऊनें व इतर मंडळींनें टोंचून खोचून कसें लिहिलें होतें याचें वर्णन भाग १९ व १६ यांत आलें आहे. त्याची द्विरुक्ति या ठिकाणीं करण्याचें कारण नाहीं. गोविंदपंताच्या या कुचराईचा अखेर परिणाम असा झाला कीं, अबदाली दिवसेंदिवस शेर होऊन उलट सदाशिवरावभाऊच त्याचे कचाटींत सांपडला, व त्यानें चोहोंकडून रसद बंद केल्यामुळें पानपत येथें भा-

१ यासंबंधानें म. इ. सा. खंड १ यांतील १७३, १८७, १८८, १९५, २०५ व २६० पासून २६८ पर्यंत पत्रें वाचलीं तर गोविंदपंत पानपतचे मोहिमेंत कशी कुचराई करीत होता तें समजून येईल.

ऊच्या गोटांत धान्याचा तोटा पडून फौजेची उपासमार होऊं लागली. शेवटीं लढाईस तोंड लागून भाऊस जय मिळत आहेत, आपले संबंधानें बरेच सरदार मंडळीस व स्वतः भाऊंस संशय येऊं लागला आहे, तसेंच स्वतः नानासाहेब तीसपस्तीस हजार फौजेनिशीं भाऊचे मदतीस बऱ्हाणपूरपर्यंत येऊन पोहोंचले, इत्यादि गोष्टी गोविंदपंतास समजल्या, तेव्हां आतां ज्यास्त कुचराई केली तर आपली शंभरी भरली अशी त्यास भीति पडून त्यानें चार लाख रुपये दिल्ली येथें नारो शंकर याचे स्वाधीन केले व भाऊस मदत करण्याचे हेतूनें तो आपल्या फौजेसह पानपताकडे येण्यास निघाला. अबदालीच्या अताईखान नामक सरदारानें त्याची पाळथ ठेवून वाटेंत अकस्मात् त्याच्यावर छापा घालून त्यास ठार मारलें व त्याच्या सैन्याची कत्तल केली. अशा रीतीनें आपल्या धन्याशीं कुचराई करणाऱ्या गोविंदपंतास त्याचे अपराधाबद्दल यथायोग्य प्रायश्चित मिळालें. पण स्वतः-च्या कपटी वर्तनानें तो आपल्या धन्याच्या, आपल्या देशाच्या, व संपूर्ण मराठी राज्याच्या नाशास अंशतः तरी कारणीभूत झाला.

अंताजी माणकेश्वरः—अंताजी माणकेश्वर हा इ० स० १७५६ पासून तीन चार वर्षे पेशव्यांचे तर्फेनें दिल्ली येथें होता. तो शूर असून मोठा कारस्थानी होता. दिल्लीच्या दरबारीं त्याचें बरेंच वजन होतें. पण तो पैशाचा मोठा लोभी होता, व तो पेशव्यांस फसवून व प्रसंगीं पठाण, रोहिले, रजपूत इत्यादिकांस पेशव्यांविरुद्ध मसलती सांगून पैसे खात असे. नानासाहेबांकडे त्याच्यासंबंधानें तक्रारी येऊं लागल्या. शेवटीं नानासाहेबांस त्याचा इतका राग आला कीं, त्यांनीं इ० स० १७५८ त दत्ताजी व जनकोजी शिंदे यांस त्याला एकदम कैद करून पुण्यास पाठवून घावें

ह्मणून आज्ञा केली. काव्येतिहाससंग्रह-पत्रें व यादी-नंबर ३१७ यांत नानासाहेब शिंद्यांस लिहितात कीं, " अंताजी माणकेश्वर हरप्रकारें उशीर लावून राहतात, आम्हांस सांगतात दत्तबांनीं राहविलें × × सांप्रत तुमच्या लिहिण्यावरून दिसून आलें कीं, लबाडी करितात. हरप्रकारें ऐवज हाताखालीं घालून हात उगवणार. अबरूचा, प्रामाणिकतेचा दरकार त्यांनीं टाकिलासें दिसतें. यास्तव पत्रदर्शनीं तिळमात्र मुलाहिजा न धरतां × × × कैद करून पाठवून द्यावें इ०. " तसेंच नंबर ३८७ या पत्रांत नानासाहेब शिंद्यांचा दिवाण रामाजी अनंत यास लिहितात कीं, " अंताजी माणकेश्वर यास दिल्लीच्या कारभारांतून काढावें. × × × कित्येक लबाड्या करितात त्या तुमच्या प्रत्ययास येऊन तुम्ही त्यास ठेवून घेतां. मेरट वगैरे परगणे मध्येंच खातात. हजेरी बारा हजार फौजेची लटकीच देतात × × × सुप्रयुक्त (युक्तीच्या वाटेनें) आले तर बरें. नाहीं तर धरावें, लुटावें* इ०. " वर दिलेल्या उताऱ्यांवरून अंताजी पेशव्यांशीं कशा लबाडया करीत असे तें दिसून येईल. पण पानपतांत अंताजी पेशव्यांच्या विरुद्ध गेल्याचा पुरावा अद्यापि उपलब्ध नाहीं.

(३) पानपतांत मराठ्यांस अपयश येण्यास मल्हारराव होळकर, गोविंदपंत बुंदेले यांचा कुचरपणा जसा कारणीभूत झाला त्याचप्रमाणें सेनानायक या दृष्टीनें सदाशिवरावभाऊचे हातूनही बऱ्याच चुका झाल्या. त्या येणेंप्रमाणें:—१ भाऊनें दिल्ली शहर काबीज केलें व अबदालीचे लोकांस तेथून घालवून दिलें, त्यामुळें अबदालीचे बळासंबंधानें त्याचे स्वतःचे सैन्यास व त्याला येऊन मिळालेल्या मुसलमान सरदारांस शंका येऊं लागली. अबदालीचे फौजेपैकीं आफ्रिदीज वगैरे लोक

* का. सं. पत्र. ३७३ यांतही असाच मजकूर आहे.

त्यास सोडून[1] गेले; हफीज राहिमतखान, सादुल्लाखान वगैरे रोहिले सरदारांनीं भाऊशीं राजकारणें सुरू केलीं; अबदालीनें खर्चाकरितां सुजापाशीं पैसे मागितले व त्यानें सुजावर मारेकरेही घातले. तेव्हां नजीबखानाच्या नादीं लागून आपण व्यर्थ फसलों असें त्यास वाटूं लागलें, व त्यांनेंही भाऊशीं तहाचें बोलणें सुरू केलें; अबदालीनें अलीगोहर व मिरजाफर यांसही वश करण्याचा[1] प्रयत्न केला पण तो फुकट केला. त्याचे कांहीं लोक मराठ्यांस मिळाले व कांहीं स्वदेशी निघून गेले. तेव्हां अबदाली घाबरून जाऊन त्यानें तहाचें बोलणें बोलण्याकरितां भाऊकडे आपला वकील पाठविला. पण अबदाली आपणास भितो असें भाऊस वाटल्यामुळें स्वतःचे बळाविषयीं त्यास अधिकच जोर वाटूं लागला, व त्यानें अबदालीच्या बोलण्याकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं. सुजा आदीकरून मुसलमान सरदार अबदालीस सोडून भाऊस येऊन मिळाले असते तर कदाचित् भाऊचें हें करणें क्षम्य झालें असतें. पण अबदालीस सोडण्याचा कांहीं सरदारांचा फक्त विचार चालला होता. अशा वेळीं भाऊनें फाजील अभिमानानें अबदालीचें राजकारण नासून टाकलें ही त्याचे हातून मोठी चूक झाली असें मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें. २ भाऊ दिल्लीस असतां फौजेचा पगार चुकता करण्याकरितां सुरजमल जाटासारख्याचा उपदेश धुडकावून देऊन बादशाही तख्ताचे छताचें रुपें काढून तें शिपाई लोकांस वांटून दिलें. भाऊचें हें कृत्य बादशाहीविषयीं अभिमान असलेल्या पुष्कळ मुसलमान व रजपूत लोकांस आवडलें नाहीं, व ते आपणांकडून शक्य तेवढ्या रीतीनें मराठ्यांच्या नाशाविषयीं खटपट करूं लागले. भाऊचे हातून ही

१ म. इ. सा. खंड १ लेखांक २३३, २०४, २२७ इ०.

दुसरी चुकी झाली. मराठ्यांच्या तख्ताचा दुसऱ्या कोणी असा अपमान केला असता तर त्याबद्दल मराठ्यांस काय वाटलें असतें याचा विचार भाऊनें अवश्य केला पाहिजे होता. ३ वजीर गाजीउद्दीन हा पूर्वीपासून मराठ्यांच्या पक्षाचा होता. शिंदे, होळकर व सुरजमल यांनीं त्यास बादशाहाची वजिरी देण्याचें कबूल केलें होतें. भाऊ दिल्ली येथें आल्यावर त्यानें अलीगोहर यास बादशाहा केलें व नारो शंकर यास बादशाहाचा वजीर नेमिलें. त्या वेळीं सुरजमलानें भाऊस सांगितलें कीं, “ आपण दरबारचें रुप्याचें छत काढलें आहे तें पुनः लावावें व गाजीउद्दीन यास वजिरी द्यावी. आपण येथें राहून कुंजपूर घेण्याकरितां दुसरा कोणी सरदार पाठवावा. या ठिकाणीं आपणास पाहिजे तितका घासदाणा मी पुरवीन. ” सुरजमलाची ही सल्ला किती पोक्तपणाची होती ? पण गर्वानें दीड बोट स्वर्ग उरलेल्या भाऊस ती कशी पसंत पडणार ? त्यानें जाटास निक्षून सांगितलें कीं, “ आह्मी दक्षिण सोडून इकडे आलों ते तुमच्या बळावर आलों नाहीं. आह्मांस वाटेल तें आह्मीं करूं. तुह्मांस रहाणें नसेल तर तुह्मी निघून जा. गिलच्यांचें पारिपत्य केल्यावर तुम्ही आम्ही पाहून घेऊं. ” इतकें बोलून डेऱ्यांत परत आल्यावर बळवंतराव मेहेंदळे याच्या विचारानें सुरजमलास कैद करण्याचा भाऊनें बेत केला.

वर सांगितलेल्या एकंदर गोष्टींचे परिणाम झाले ते येणेप्रमाणें:— सुजास बादशाहाची वजिरी पाहिजे होती ती नारो शंकर यास दिल्यामुळें तो अबदालीस चिकटून राहिला, व मराठ्यांच्या नाशाविषयीं मनापासून प्रयत्न करूं लागला. बादशाहाची वजिरी नारो शंकर यास दिल्यामुळें मराठे हळूहळू सर्व हिंदुस्तानची बादशाही हाताखालीं घालतील असा मुसलमानांचा समज होऊन ते आपसांतील तंटे

विसरून जाऊन एकजुटीनें मराठयांच्या नाशाची खटपट करूं लागले. सुरजमलाचें मन दुखविल्यामुळें तो नाखुष होऊन मोठ्या युक्तीनें भाऊस सोडून निघून गेला. पानपतचे मोहिमेंत सुरजमलाची मराठ्यांस मदत असती, व त्याचे उपदेशाप्रमाणें भाऊ वागला असता तर पानपतांत मराठ्यांस जें अपयश आलें तें बहुतेक अंशीं टळलें असतें. पण " युक्तचि मरणाराला हित परिणामीं न सोसवे काढा " ही कविवर्य मोरोपंताची उक्ति खोटी कशी ठरणार ! भाऊचे हातून ही तिसरी मोठी चुकी झाली.

४ या स्वारींत भाऊनें जुना मराठी बाणा टाकून आगंतुक मोंगली बाणा स्वीकारला होता. या वेळीं अबदालीस दिपविण्याकरितां भाऊनें आपणाबरोबर दक्षिणेंत जेवढें कांहीं उत्तम म्हणून होतें तेवढें सर्व बरोबर घेतलें होतें. शूर सरदार, लढाऊ व कसलेली फौज, उत्तम हत्ती, उमदे घोडे, उंचीं वस्त्रें, बहुमोल अलंकार, भरगच्ची व किनखाबी डेरेराहुट्या, सुंदर पालख्या व म्याने सर्व कांहीं उत्तम होतें. शिवाय स्वारीबरोबर बायका, पोरेंटोरें, दासदासी, नाचतमाशे हा परिवारही होताच. शिवाजीचे वेळीं स्वारीबरोबर बायको, बटीक, कलाल वगैरे नेण्याची सक्त मनाई असे, पण या स्वारींत ती सर्व शिस्त सुटली होती. एक लाख फौज तर दोन लाख बाजारबुणगें ! 'अबदाली ह्मणजे कःपदार्थ, आपण त्यास सहज खेळत खेळत धुडकावून देऊं' असें भाऊस वाटत होतें. सारांश या पानपतच्या स्वारीच्या थाटास स्वारी ह्मणण्यापेक्षां श्रीमंतांच्या एखाद्या लग्नाची मिरवणूक ह्मणणें ज्यास्त शोभलें असतें ! 'मियां वीतभर तर दाढी हातभर' असा या स्वारीचा प्रकार नसता तर मराठ्यांच्या सड्या फौजेस अबदालीचा गोट फोडून बाहेर पडणें

विशेष जड गेलें नसतें. पण शत्रूस संभाळण्यापेक्षां बाजारबुणग्यास संभाळतां संभाळतांच मराठ्यांस पुरे पुरे झालें, व त्याचा शेवट असा झाला कीं, भाऊनें दक्षिणेतून निघतांना जेवढें उत्तम उत्तम ह्मणून बरोबर घेतलें होतें तेवढें सर्व—अर्थात् महाराष्ट्राचें सर्व वैभव—पानपतच्या समरभूमीवर नष्ट झालें.

५भाऊनें बळवंतराव मेहेंदळे यास कुंजपुरा घेण्याकरितां दिल्लीहून पाठवून दिलें, व मागून आपण स्वतः दिल्लीस फक्त सहा सात हजार फौज ठेवून बाकीच्या फौजेसह कुंजपुऱ्यास गेला. भाऊच्या हातून ही फार भयंकर चुकी झाली. बळवंतराव मेहेंदळे याचे मदतीस फौज पाठविणें जरूर होतें तर भाऊनें सुरजमल जाटाच्या उपदेशाप्रमाणें एखाद्या सरदारास कांहीं फौजेसह पाठविलें असतें ह्मणजे काम भागलें असतें. भाऊ दिल्लीस फौजबद असता तर अबदालीची यमुना उतरून दिल्ली व कुजपुरा यांचे दरम्यान् तळ देण्याची छाती झाली नसती व तसे त्यानें केलें असतेंच तर एका बाजूस भाऊ व दुसरे बाजूस मेहेंदळे यांचे कचाटींत तो सांपडून ठार बुडाला असता. अबदालीशीं भाऊचा हा पहिलाच सामना होता, तेव्हां त्याची ओळख पटेपर्यंत भाऊला आपल्या हालचाली फार सावधागिरीनें ठेवावयास पाहिजे होत्या. भाऊचा ज्याप्रमाणें अबदालीस कोंडण्याचा प्रयत्न चालला होता त्याप्रमाणें अबदालीचाही भाऊस कोंडण्याचा प्रयत्न सुरू होता. भाऊचें सर्व फौजेसह कुंजपुऱ्यास जाणें अबदालीच्या चांगलेंच पथ्यावर पडलें. तो ताबडतोब बागपताजवळ यमुना उतरला. कुंजपुऱ्याच्या पलीकडे हिमालयाचा पहाडी मुलुख असल्यामुळें तिकडून निघून जाण्यास भाऊस मार्ग नाहीं हें अबदालीस माहीत होतें. त्याचप्रमाणें दिल्लीच्या सहा सात हजार

मराठ्यांच्या फौजेसही तो भीक घालीत नव्हता. तेव्हां तो कुंजपुरा येथें भाऊस कोंडण्याकरितां पानपतच्या रोखानें पुढें निघाला. भाऊ कुंजपुरा घेऊन परत फिरतो आहे तों अबदाली त्याच्या तोंडावर येऊन पोहोंचला, तेव्हां भाऊला पानपत येथें आपला तळ देणें भाग पडलें. अशारीतीनें अबदालीस कोंडण्याचा भाऊचा विचार मनचेमनांत राहून उलट भाऊ मात्र अबदालीचे पंज्यांत सांपडला. भाऊपाशीं या वेळीं जय्यत फौज होती व अबदालीपेक्षां वरचढ असा तोफखाना होता व त्यानें एकदम अबदालीशीं खडा सामना दिला असता तर त्यांत अबदालीचा पराभव होण्याचा ज्यास्त संभव होता. पण तसें कांहीं न करतां तो इब्राहिमखान गारद्याच्या मसलतीप्रमाणें आपणाभोंवतीं खंदक खणून पानपत येथें तळ देऊन बसला. अशारीतीनें आपल्या हातानें आपणास कोंडून घेण्याचें मराठ्यांचे इतिहासांतील हें पहिलें उदाहरण भाऊनें केलें. लहान वयांतच भाऊ उत्तम मुत्सद्दी ह्मणून जसा नावाजला गेला होता, त्याप्रमाणें तो शूर सरदार ह्मणूनही नावाजला गेला होता. बहादूरभेंड्याची स्वारी (इ० स० १७४७), यमाजी शिवदेवाचें बंड (इ० स० १७५०), भालकीची लढाई (इ० स० १७५२), श्रीरंगपट्टणची स्वारी (इ० स० १७५३), होळीहोन्नूरची स्वारी (इ० स० १७५४). सावनूरची स्वारी (इ० स० १७५६) श्रीरंगपट्टणची स्वारी (इ० स० १७५७), व दुसऱ्या किरकोळ स्वाऱ्या यांत भाऊनें चांगला पराक्रम गाजविला होता. या गोष्टीमुळें भाऊचे अंगांत थोडेंसें अभिमानाचें वारें शिरलें होतें; व इ० स० १७६० त उदगीरच्या लढाईत निजामाचा फडशा उडवून दिल्यामुळें तें पारडें फारच वर चढलें होतें. बळवंतराव मेहें-

दळ्यासारख्या समवयस्क, शूर पण उतावळ्या व गर्विष्ठ सरदाराच्या नादीं लागून अनुभवशीर व पोक्त सरदारांची मसलत भाऊ कवडी किमतीनें लेखूं लागला. व स्वतःस वाटेल तसें स्वैर वर्तन करून त्यानें आपल्या साथीदारांचीं व सरदारांचीं मनें दुखविलीं, व शेवटीं आपल्या दुराग्रहाचें प्रायश्चित्त आपणाबरोबर आपल्या सरदारांस, आपल्या फौजेस व आपल्या देशास भोगावयास लाविलें. गोविंदपंत बुंदले यास भाऊनें जें करावयास सांगितलें तेंच भाऊनें स्वतः करावयास पाहिजे होतें. दिल्ली येथें असतां भाऊनें कबिले व बाजारबुणगें तेथें ठेवून आपल्या मातबर फौजेचे निरनिराळे भाग करून त्यांवर निरनिराळ्या सरदारांची योजना केली असती व अबदालीच्या सभोंवार आपली सर्व फौज पसरून देऊन अबदालीशीं गनिमी काव्याची लढाई चालवून त्याची रसद बंद करून त्याला चोहोंकडून भंडावून सोडलें असतें तर इ० स० १७३८ त पहिले बाजीरावसाहेब यांनीं भोपाळ येथें आपणापेक्षां वरचढ अशा निजामउल्मुल्काच्या फौजेस कोंडून टाकून जसा फडशा उडवून दिला, त्याप्रमाणें भाऊनेंही अबदालीला अंतरवेदींत नामशेष करून सोडलें असतें.

६ मराठे पानपत येथें कोंडले गेल्यामुळें, अबदाली त्यांची रसद मधल्यामध्यें मारून नेऊं लागल्यामुळें, व भाऊजवळचा खजिना संपल्यामुळें मराठ्यांचे छावणींत पैशाचा व अन्नाचा भयंकर दुष्काळ पडला व उपासमरीनें लोक पटापट मरूं लागले. अशा भयंकर प्रसंगीं विश्वासरावानें कुमकेविषयीं नानासाहेबांस पत्र पाठविलें. पण भाऊस ही गोष्ट समजली तेव्हां त्याला विश्वासरावाचा मोठा राग येऊन त्यानें विश्वासरावास सांगितलें कीं, “ तुम्हांस जीव निभावणें असेल तर उत्तम आहे, अजुनी लावून द्याक्यास फुरसत आहे........तुम्हांस

दिल्लीस पावते करितों. तेथून........देशास जाणें. आमची आस्था कराल तर आमचीं शंभर वर्षें पूर्ण भरलीं." भाऊनें पोकळ अभिमानाचे भरीस पडून मराठ्यांचें व मराठी राज्याचें जें नुकसान केलें त्याचें हें एक उत्कृष्ट उदाहरण आहे. विश्वासरावानें नानासाहेबांस कुमकेविषयीं जें पत्र पाठविलें तेंच भाऊनें त्यापूर्वी कधींच पाठवावयास पाहिजे होतें. 'आपलीं शंभर वर्षें पूर्ण भरलीं' अशी भाऊची ठाम समजूत झाली असतांही कुमकेसाठीं दुसऱ्या कोणास नव्हे तर पित्याचे ठिकाणीं असलेल्या आपल्या वडील बंधूस पत्र पाठविणें ह्मणजे त्यांत आपले इभ्रतीस व मानी स्वभावास कमीपणा आहे असें भाऊस वाटणें व अखेर त्या अभिमानापायीं सफेजंग बुडून जाणें ह्मणजे दुर्दैव त्या मराठी राज्याचें! भाऊचें कुमकेविषयीं नानासाहेबांस योग्य वेळीं पत्र आलें असतें तर ऐन आणीबाणीचे प्रसंगीं नानासाहेबांची भाऊस मदत पोहोंचून पानपतांत मराठ्यांची जी स्थिति झाली तीच उलट अबदालीची झाली असती. पण भाऊच्या बुद्धीला आकाबाईनें पूर्ण भ्रंश पाडला होता तेव्हां त्याला तरी तशी बुद्धि होणार कुठून?

७ या मोहिमेंत भाऊचें वर्तन कसें होतें व त्याचेसंबंधानें त्याच्या फौजेंतील सरदारमंडळीचें व लोकांचें काय मत झालें होतें हें खालीं दिलेल्या कांहीं वाक्यांवरून वाचकांचे ध्यानांत येईल. "आजपर्यंत यश संपादून........आतां सर्व दौलत बुडवून नाश आरंभिला," "विनाशकाळासारखी तुमची बुद्धि झाली," "आपणाबरोबर आह्मां सर्वांचीं घरें बुडतात," "तुमचे बुद्धीस भ्रंश झाला ह्मणून आपण कोणाचें तिळमात्रही ऐकत नाहीं," उगाच हेका केला तो या समयीं फळास आला," "या हट्टानें सर्व लयास

गेलें, " " या समयीं या ठायीं श्रीमंत राजश्री नानासाहेब असते तर कसच्या गोष्टीचा हेका न करते, " " तुह्मी प्राणनिशीं जातां, " " तुह्मीं सर्वांचा घात केला, " " आपल्या हातें सर्व वैभव बुडविलें " इ०. वरील वाक्यांवरून या मोहिमेंत भाऊचें वर्तन किती हेकेखोरपणाचें होतें याची वाचकांस कल्पना होईल. पूर्वीं जो भाऊ सुरजमलासारख्या शूर राजासही टाकून बोलला होता त्यालाच स्वतःचे चुक्यांबद्दल आपल्या लोकांचीं मर्मभेदक भाषणें ऐकून घेण्याचा प्रसंग आला. चुकी करून कांहीं उपयोग नाहीं अशा वेळीं त्याला स्वतःच्या चुक्या दिसूं लागल्या. तो जयाविषयीं अगदीं निराश झाला, व शेवटीं " होणारास उपाय काय ? " अशा दैववादी माणसाच्या ठराविक उत्तराशिवाय त्याच्याजवळ दुसरें उत्तर शिलक राहिलें नाहीं.

८ पानपतचे लढाईचे आदले रात्रीस इब्राहिमखान गारद्याच्या मसलतीनें असें ठरलें कीं, " गोल बांधून मध्यें बुणगें घालून भोंवताला आराबा वांटून द्यावा, चहूंकडे चार मातबर सरदार नेमून जिकडील तिकडे बाजवा वांटून द्याव्या, आणि........दिल्लीस जाऊन पोहोंचावें." पण दुसरे दिवशीं प्रातःकाळीं फौज निघाली त्या वेळीं भाऊनें रात्रीं ठरलेला सर्व बेत फिरवला. " आपण नीट चालून जावें........(गिलचा) मार्ग मोकळा करीत नाहीं तरी मर्धींच घोडे घालून मारामार करीत उधळून, मार देत नीट निघोन जावें, " असा त्यानें हुकूम केला. या शेवटच्या प्रसंगीं इब्राहिमखानाची मसलत चांगली होती. पण जयाविषयीं निराश झालेल्या भाऊचें मन त्या वेळीं फारच गोंधळून गेलें असावें व आपण केलें काय व करतों काय, यांचें भान न राहून त्यानें वरील हुकूम दिला असावा असें म्हणणें भाग पडतें.

९ लढाई ऐन जोरांत आल्यावर विश्वासरावास एकाएकीं गोळी लागून

तो मरण पावला. त्या वेळचें भाऊचें वर्तन सेनानायकास अत्यंत अनुचित असें होतें. ज्याप्रमाणें सिंहगडावर तानाजी मालुसरे ठार होऊन पडल्यामुळें त्याचे लोक सैरावैरा पळत सुटले असतां तानाजीचा भाऊ सूर्याजी यानें त्या सर्वांस धीर देऊन परत फिरविलें व उदयभानास ठार मारून रजपूत व मोंगल फौजेस कापून काढून 'सिंह' गेला पण 'गड' घेतला, त्याप्रमाणें विश्वासरावाचे मृत्यूमुळें भयभीत झालेल्या व गोंधळून गेलेल्या आपल्या फौजेस धीर देऊन व त्यांचे अंगांत वीरश्री उत्पन्न करून शत्रूवर जोराचा हल्ला करण्याचें सोडून देऊन भाऊ एखाद्या यःकश्चित् मनुष्याप्रमाणें भांबावून जाऊन घोड्यावरून खालीं उतरून बेहोष रीतीनें शत्रुसैन्यांत मुसंडी मारून शेवटीं गर्दीत मिसळून गेला. ज्या भाऊनें मोठमोठया लढाया मारून व त्यांत मोठीं पराक्रमाचीं कृत्यें करून मोठा नांवलौकिक संपादन केला होता त्यानें या ऐन आणीबाणीच्या प्रसंगीं सेनानायकास लांछनास्पद असें आचरण करणें म्हणजे सेनानायकाच्या पदास आपणास नालायक करून घेणें होय. भाऊचे हातून ही शेवटची पण अतिशय भयंकर अशी चुकी झाली.

वर दिलेल्या हकीकतीवरून असें दिसून येईल कीं, पानपतांत मराठयांस जें अपयश आलें त्याचा बराच मोठा भाग भाऊच्या वांट्यास येतो. मल्हारराव होळकर, गोविंदपंत बुंदेले वगैरे चुकार मंडळीस भाऊ पूर्णपणें ओळखून होता, तेव्हां आपलीं गृहछिद्रें लक्षांत घेऊन भाऊला अबदालीप्रमाणें फार सावधगिरीनें आपल्या हालचाली करणें जरूर होतें. पण अबदाली आपणास भितो अशी तोंडपुजा मंडळीच्या सांगण्यावरून आपली खोटी समजूत करून घेऊन व स्वतःचे बळावर फाजील भिस्त ठेवून

भाऊ या मोहिमेंत बराच बेपरवाईनें वागला असें ह्मणावें लागतें. रा. राजवाडे यांनीं मराठ्यांचे इतिहासाचीं साधनें खंड १ यांत भाऊस पानपतच्या अपयशाच्या कारणांपासून बहुतेक निर्दोषी ठरविण्याचा प्रयत्न केला आहे पण तो एकदेशीय आहे असें मोठ्या कष्टानें ह्मणावें लागतें. पानपतच्या मोहिमेंत भाऊ हा सेनानायक होता व त्या दृष्टीनें विचार केला ह्मणजे त्यानें केलेल्या अनिष्ट चुक्यांचें समाधानकारक रीतीनें कधींही समर्थन करितां येणार नाहीं. नानासाहेबांनीं भाऊची या मोहिमेवर ज्या कारणांकरितां योजना केली होती तीं लक्षांत घेतलीं असतां त्यांचें तें करणें रास्त होतें. पण भाऊनें पुढें ज्या अक्षम्य चुक्या केल्या व ज्यांचा भयंकर परिणाम पानपतांत मराठ्यांच्या एका सबंध पिढीस भोगावा लागला त्याचा विचार केला तर नानासाहेबांनीं त्या वेळीं या मोहिमेवर भाऊच्याबद्दल दादाची योजना केली असती तर फार चांगलें झालें असतें असें वाटतें. पानपतांतील अपयशाचीं जी कारणें दिलीं आहेत त्यांपैकीं ४।५।६।७ या कारणांचा वर दिलेल्या तिसऱ्या कारणाच्या विवेचनांत समावेश होतो, तेव्हां त्यांसंबंधानें निराळें विवेचन करण्याचें कारण नाहीं. शेवटीं मराठ्यांचे हातीं फार दिवस राजसत्ता राहूं नये असा ईश्वरी संकल्प होता व त्याप्रमाणें ज्या गोष्टी घडत गेल्या त्या यदृच्छेनें घडत गेल्या असें मानून मनाचें समाधान करून घेणें भाग आहे.

पानपतच्या लढाईचे परिणामः—पानपतच्या पराजयामुळें मराठशाहीचें पाऊल जें एकदा आंत पडलें तें पुनः पुढें सरलें नाही. पेशव्यांच्या हिंदुपदपादशाहीच्या कल्पना मनच्यामनांतच जिरल्या. मराठ्यांचे शत्रूंनीं चोहोंकडून उचल केली व त्यांनीं मराठ्यांचा अंमल झुगारून दिला. . नजीबखान यास कांहीं काळ स्वास्थ्य मिळून दि-

ल्लीच्या दरबारीं प्रमुखत्व मिळालें. सुजाउद्दौला मराठ्यांचे भीतींतून मोकळा झाला. रोहिले लोक स्वतंत्र झाले. श्रीरंगपट्टणचें राज्य मराठ्यांस न मिळतां तें हैदरअल्लीनें बळकाविलें. पुंडपाळेगार लोकांचीं बंडें पुनः माजलीं. मल्हारराव होळकरासारखी मंडळी पेशव्यांचीं धोतरें बडविण्याच्या भीतींतून मोकळी झाली. जानोजी भोसल्यासारखी मंडळी पेशव्यांविरुद्ध कारस्थानें करूं लागली. स्वतः पेशव्यांचे घराण्यांत भयंकर गृहकलह सुरू झाले. पहिले माधवराव, नाना फडनवीस, महादजी शिंदे यांनीं मराठ्यांचें वर्चस्व पुनः स्थापण्याचे प्रयत्न केले, पण मराठशाहीची एकदा जी घडी विसकळीत झाली ती पुनः नीट बसली नाहीं. बंगाल, मद्रास व मुंबई या इलाख्यांत इंग्लिशांची सत्ता कायमची स्थापन होऊन इ० स० १७६१ च्या पुढें हिंदुस्तानच्या बादशाहीचा झगडा मराठे व इंग्लिश यांचेमध्यें सुरू झाला, व शेवटीं इ० स० १८१८ त इंग्लिश लोक या देशाचे सार्वभौम सत्ताधीश झाले.

पेशव्यांचे राज्यकारभारांतील दोष.—हिंदुपदपादशाहीच्या स्थापनेचें काम पेशव्यांनीं सुरू केलें, त्या वेळीं जिंकलेल्या प्रदेशांतील लोकांचीं मनें आपणाकडे ओढून घेणें व ते आपल्या अमलाखालीं गुण्यागोविंदानें राहतील अशा रीतीनें त्यांचीं मनें तयार करणें हें पेशव्यांचें मुख्य कर्तव्य होतें. पण तशा प्रकारचा प्रयत्न पेशव्यांचे हातून झालेला दिसत नाहीं. आज हा किल्ला घे, उद्यां तें शहर काबीज कर, परवां तो प्रांत सर कर, अशा रीतीनें इ० स० १७२० पासून इ० स० १७६० पर्यंत त्यांनीं बहुतेक हिंदुस्तान देश काबीज केला. पण जिंकलेल्या प्रांतांतील लोकांचे मनांत मराठ्यांविषयीं मुळींच प्रेमभाव वसत नसे. मुसलमानांप्रमाणें मराठेही

परके आहेत असा दुजाभाव त्यांचे मनांत राही. ते मोठ्या जुलमानें मराठ्यांची सत्ता कबूल करीत, पण संधी सांपडल्यास ते मराठ्यांविरुद्ध कारस्थानें करण्यास एका पायांवर तयार असत. आपली सत्ता किती अशाश्वत आहे याचा अनुभव पेशव्यांस पानपतच्या लढाईपर्यंत फारसा आला नाहीं, व पानपतांत त्यांस अपयश आलें नसतें तर तो बरेच दिवस पुढेंही आला नसता. पण पानपतच्या पराजयानंतर त्यांना त्या गोष्टीचा चांगला अनुभव आला. ज्या वेळीं गिलच्यांच्या भीतीनें मराठे पानपत सोडून चोहोंकडे सैरावैरा पळत सुटले त्या वेळीं ते ज्या ज्या प्रांतांतून पळत होते त्या त्या प्रांतांतील लोक त्यांस थारा देतना; इतकेंच नव्हे तर त्या लोकांनीं त्यांस लुटण्यास व ठार मारण्यासही कमी केलें नाहीं, व मराठ्यांचा सूड घेण्यास ही संधी बरी आहे असें ज्याला-त्याला वाटूं लागलें.

ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास इत्यादि संतमंडळीनें आपल्या उपदेशानें व पवित्र आचरणानें महाराष्ट्रांत स्वधर्म व स्वदेश यांविषयीं अतिशय अभिमान उत्पन्न केला व त्या अभिमानाचा राष्ट्रकार्याकडे कसा उपयोग करून घ्यावा हें रामदासानें शिवाजीस शिकविलें. त्यामुळें शिवाजीस महाराष्ट्रांत स्वराज्यस्थापनेचें काम पुष्कळ सोंप गेलें व त्या प्रांतांत मराठ्यांचा अंमल कायमचा बसला. पण हिंदुपदपादशाहीचे स्थापनेस पेशव्यांनीं सुरवात केली तेव्हां महाराष्ट्रेत्तर प्रांतांत स्वधर्म व स्वदेश यांविषयीं अभिमान उत्पन्न करण्याचें काम पेशव्यांचे हातून झालें नाहीं. जिंकलेल्या लोकांचीं मनें आकर्षून घेण्यास व त्यांच्यांत राष्ट्रीयप्रेम उत्पन्न करण्यास पेशव्यांनीं कांहीं प्रयत्न केला होता असें दिसून येत नाहीं. याशिवाय पेशव्यांची

दुसरी मोठी चुकी ह्मटली ह्मणजे त्यांनीं राजद्रोही, डोईजड, व ताळेवार स्वकीय सरदारांस वेळेवरच वठणीस आणण्याचा प्रयत्न केला नाहीं. मल्हारराव होळकर, गोविंदपंत बुंदेले वगैरे सरदार आपल्याशीं बेपरवाईनें वागतात असें पेशव्यांस माहीत असूनही त्यांस ताळ्यावर आणण्याचा पेशव्यांचे हातून कांहींच प्रयत्न झाला नाहीं. इतकेंच नव्हे तर प्रसंगीं पेशव्यांनीं त्यांची मनधरणी केल्याचें दिसून येतें. त्यांना वठणीवर आणतांना प्रथमतः पेशव्यांस बराच त्रास भोगावा लागला असता; पण एकदां तें स्वजनविरोधाचें बीज नाहींसें झालें असतें म्हणजे हिंदुपदपादशाहीचे स्थापनेचें काम पेशव्यांस बरेंच सोपें गेलें असतें. पण नानासाहेबांनीं किंवा भाऊसाहेबांनीं तशा प्रकारचा मुळींच प्रयत्न केला नाहीं हा पेशव्यांचे राज्यकारभारांतील बराच मोठा दोष आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

इ० स० १४९८ पासून युरोपियन लोकांचा हिंदुस्तानाशीं संबंध जडला. पोर्तुगीज, डच, फ्रेंच, इंग्लिश हे लोक एकामागून एक हिंदुस्तानांत येऊन त्यांनीं येथें आपल्या वसाहती स्थापन केल्या. शिवाजीच्या वेळेपासून त्यांच्या व मराठ्यांच्या गांठी पडूं लागल्या व पहिले बाजीराव व नानासाहेब यांचे वेळीं पोर्तुगीज, फ्रेंच, व इंग्लिश यांचा व मराठ्यांचा निकट संबंध येऊन पोहोंचला. चिमणाजी आप्पानें पोर्तुगीज लोकांशीं बरींच वर्षें झगडून इ० स० १७३८ त त्यांची सत्ता उत्तर-कोकणांतून नाहींशी केली. नानासाहेब व फ्रेंच सरदार बुसी यांच्या निजामाचे कारस्थानांत अनेक वेळां झटापटी झाल्या होत्या. पेशवे व इंग्लिश मिळून त्यांनीं शिद्दी व आंग्रे यांच्याशीं अनेक सामने दिले होते. त्यामुळें त्या लोकांचीं उत्तम शस्त्रास्त्रें, त्यांची सुधारलेली युद्धकला, त्यांचें उच्च आरमार यांचें मराठ्यांस

बरेंच ज्ञान झालें होतें. असें असतां त्यांच्याप्रमाणें आपल्यांत सुधारणा करावी असें पेशव्यांस किंवा त्यांच्या मुत्सद्यांस वाटलें नाहीं. छापण्याच्या कलेचा, नौकानयनाचा, होकायंत्राचा उपयोग काय हें युरोपियन लोकांच्या सान्निध्यानें पेशवे व त्यांचे मुत्सद्दी यांस समजलें होतें. पण त्या कला आपण घेण्याचें त्यांचे स्वप्नींही आलें नाहीं. कवायती फौजेचा लढाईंत कसा उपयोग होतो हें पेशव्यांनीं अनेक लढायांत पाहिलें होतें. पण तशा प्रकारची आपली फौज तयार करण्याचीही त्यांनीं फारशी पर्वा केलेली दिसत नाहीं. कांहीं गारद्यांचीं पलटणें अशा रीतीनें तयार झालेलीं होतीं. पण तीं पेशव्यांचीं नसून ज्यांनीं तीं तयार केलीं होतीं ते जो भाकरी देईल त्याची चाकरी करण्यास तयार असत-मग ते पेशवे असोत किंवा त्यांचे शत्रु असोत. पेशव्यांनीं आपली व आपल्या सरदारांची सर्व फौज इंग्लिश किंवा फ्रेंच यांच्याप्रमाणें कवाईत शिकवून तयार केली असती तर मराठ्यांची राजसत्ता अल्पकाळांत नष्ट न होतां बराच कालपावेतों टिकली असती. पण पूर्वीपासून सुधारणेच्या कामीं हिंदुस्तानची जी पीछेहट होत चालली होती ती मराठशाहींतही तशीच होत चालली होती, व अखेरीस मराठशाही साफ बुडून हिंदुस्तान देश सर्व प्रकारें वरचढ अशा इंग्लिश लोकांचे हातीं गेला.

शेवटः—बाळाजी विश्वनाथाच्या वंशांत नानासाहेबांसारखा धोरणी, कुशल, कार्यदक्ष व मुत्सद्दी पेशवा दुसरा कोणी झाला नाहीं असें ह्मटलें तरी चालेल. त्यांना पेशवाई प्राप्त झाल्यापासून त्यांच्यावर स्वकीय व परकीय अशीं अनेक संकटें आलीं. परंतु मोठ्या धीमेपणानें व सावधगिरीनें जसा प्रसंग येईल तशी त्यास पाठ देऊन

त्या संकटांतून ते मोकळे होत. त्यांनीं आपल्या अवघ्या एकवीस वर्षांच्या कारकीर्दीत आपल्या शहाणपणानें, व धोरणानें बहुतेक हिंदुस्तान देश पादाक्रांत केला, व त्यांचे कारकीर्दीचे अखेरीस मराठ्यांवर पानपतचा घोर प्रसंग आला नसता तर हिंदुपदपादशाहीची स्थापना त्यांचेच हातून झाली असती असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. नानासाहेबांच्या कारकीर्दीचें साधारण धोरण काय होतें हें खालीं दिलेल्या त्यांनीं आपल्या सरदारांस पाठविलेल्या पत्रांतील उताऱ्यांवरून सहज दिसून येईल. 'सर्वप्रकारें समाधान चित्ताचें करून अष्टपैलूचे रीतीनें जसा जे समयीं प्रसंग पहाल तसा मनसबा करीत जाणें;' 'तजविजीनें दमवून युक्तीनें समय पाहून जरब देऊन स्वकार्यसिद्धि करावी;' 'साध्य असाध्य विचार करून कार्य करणें;' 'एकाशीं स्नेह तर एकाशीं बिघाड, एकदाच सर्वांशीं कलह करूं नये;' 'तोंडानें गोड बोलून राजकारण राखणें.' इ०.[१] वरील उताऱ्यांवरून त्यांच्या कारकीर्दीचे धोरण लक्षांत येईल, व कसाही प्रसंग आला तरी न डगमगतां ते त्यांतून पार पडत असत.

बाळाजी बाजीरावाची राजनीति कुटिल होती असें कांहीं इंग्लिश ग्रंथकारांचें मत आहे. परंतु बाळाजीच्या वेळीं सर्व हिंदुस्तान देशाची जी राजकीय परिस्थिति होती ती लक्षांत घेतली तर सर्व हिंदुस्तान देश एकछत्री अमलाखालीं आणण्याची महत्त्वाकांक्षा त्या कालीं दुसऱ्या कोणी धरिली असती, व त्या कामीं त्याचे प्रयत्न सुरू झाले असते म्हणजे त्याच्या राजनीतीला वरील विशेषणच मिळालें असतें. ज्यांनीं ज्यांनीं म्हणून आजपर्यंत सार्वभौम सत्ता आक्रमण करण्याचा प्रयत्न केला, व जे जे म्हणून पुढें करितील त्यांनीं त्यांनीं याच

१ का. सं. पत्रें व यादी नंबर ३६१, ३७६, ३८९,९०.

राजनीतीचा अंगीकार केलेला आहे व त्यांना त्यांना याच राजनीतीचा अंगीकार करावा लागेल. बाळाजीनें हिंदुपदपादशाहीच्या स्थापनेचें काम हातीं घेतलें होतें व तें काम तडीस नेण्यासाठीं त्याला अनेक शत्रूंशीं सामना द्यावयाचा होता. तेव्हां त्या सर्वांचा एकसमयावच्छेदें-करून बंदोबस्त करण्याकरितां 'एकाशीं स्नेह तर एकाशीं विघाड' याच राजनीतीचा अंगीकार करणें बाळाजीस अवश्य होतें. तसें त्यानें केलें नसतें तर त्याला आपला इष्ट हेतु कधींच साध्य करून घेतां आला नसता.

'भाऊसाहेब आपल्या पुत्रांच्या तोंडास पानें पुसून कदाचित् आपणच राजसत्ता बळकावतील असें नानासाहेबांची पत्नी गोपिका-बाई हिला वाटत असे, व म्हणून ती भाऊंचा द्वेश करीत असे;' 'भाऊ या प्रापंचिक त्रासास कंटाळून आपण होऊन पानपतच्या मोहिमेवर गेले;' इत्यादि गोष्टी मराठी बखरींतून ध्वनित केलेल्या आहेत. पण नानासाहेब होते तोंपर्यंत हे गृहकलह फारसे पुढें आले होते असें दिसत नाहीं. गोपिकाबाई कदाचित् प्रसंगीं नाना-साहेबांचें मन भाऊबंदांविषयीं कलुषित करण्याचा प्रयत्न करीत असेल, पण तिच्या बोलण्याकडे नानासाहेबांनीं फारसें लक्ष दिलेलें दिसत नाहीं. हे गृहकलह नानासाहेबांचे पश्चात् फार विकोपास गेले व त्या कलहाग्नींत आरंभीं नारायणराव पेशव्याची प्रथमाहुति पडून शेवटीं पेशवाईची पूर्णाहुति पडली.

नानासाहेब आळशी व विलासी होते असें ग्रांटडफ प्रभृति कांहीं इतिहासकार म्हणतात. पण इ० स० १७४० पासून इ० स० १७६१ पर्यंत या ग्रंथांत दिलेल्या प्रत्येक वर्षाच्या त्यांच्या हालचा-लींचें बारकाईनें निरीक्षण केलें, व रा. राजवाडे व डेकन व्हर्नॅक्यु-

लर ट्रान्सलेशन सोसायटी यांनीं त्यांच्या सालोसालच्या हालचालींचे जे तक्ते प्रसिद्ध केले आहेत ते पाहिले ह्मणजे त्यांवरून असें दिसून येईल कीं, त्यांच्या एकतीस वर्षांच्या कारकीर्दींत असें एकही वर्ष नाहीं कीं ज्या वर्षी ते अमुक एक ठिकाणीं स्वस्थ बसले होते. त्यांचा सर्व काळ शाहूमहाराज जिवंत होते तोंपर्यंत साताराचे दरबारचीं सूत्रें राखण्यांत व त्यांचे पश्चात् दरबारांतील विरुद्ध मंडळीचीं कारस्थानें मोडण्यांत, परकीय शत्रूंचा बंदोबस्त करण्यांत व दूरदूरच्या मोहिमांत खर्च झाला. वर्षांतून सरासरी आठ महिने ते मुलुखगिरीवर असत, व बाकीचा काळ राज्याची व्यवस्था करण्यांत जात असे. तेव्हां ते आळशी होते असें म्हणणें ह्मणजे त्यांत कांहींच अर्थ नाहीं. त्याचप्रमाणें, निरुद्योगी लोक आळशी बनतात व आळसाच्या पोटीं विलासाची उत्पत्ति असते असा बहुतेक अनुभव आहे. ज्या अर्थी ते आळशी नव्हते ही गोष्ट निर्विवाद सिद्ध आहे त्याअर्थी ते विलासीही नव्हते असेंच म्हटलें पाहिजे.

नानासाहेबांचा बहुतेक काळ धामधुमींतच गेला. पण राज्याची व्यवस्था करण्यास जो कांहीं थोडासा वेळ त्यांस मिळाला तेवढ्या अवधींत त्यांनीं प्रजाहिताचीं बरींच कामें केलीं. या कामीं भाऊसाहेब व रामचंद्र बाबा शेणवी यांचें त्यांस फार साह्य मिळालें. प्रांतांचे बंदोबस्ताकरितां सुभेदार, मामलतदार, महालकरी वगैरे कामगार नेमून त्यांच्यावर देखरेख ठेवण्याकरितां सरसुभेदार म्हणून कामगार नेमिलेले होते. वसूल करण्याकरितां निरनिराळे प्रांतीं कारकून नेमलेले असत व त्यांच्यावर अधिकारी नेमलेले असत. कोणी वसुलाचा हिशेब बरोबर न दिल्यास त्यास शासन होत असे. लुटारू लोक गांवकरी लोकांस त्रास देत असत तेव्हां शिबंदी ठेवून त्यांचा त्यांनीं बंदोबस्त केला. मक्त्याच्या

मामलती बंद केल्या. या व प्रजाहिताच्या इतर गोष्टींमुळें नानासाहेबांचे कारकीर्दीत लोकांस फार सुख झालें. बाळकृष्ण शास्त्री गाडगीळ ह्मणून एक नामांकित शास्त्री होता त्यास पुण्याचा न्यायाधीश नेमिलें होतें, त्यामुळें पुण्यांतील लोकांसही फार सुख झालें. या कारकीर्दीत पुष्कळ ब्राह्मण सरदार व मुत्सद्दी उदयास आले. शूर सरदार महादजी शिंदे व चतुर मुत्सद्दी नाना फडणवीस ज्यांनीं पुढें पानपतांत झालेलें नुकसान बरेंच भरून काढलें व मराठशाहीचें तीस चाळीस वर्षें संरक्षण केलें ते नानासाहेबांचेच तालमेंत तयार झालेले होते. मराठ्यांचे दुर्दैवामुळें नानासाहेबाचे पश्चात् मराठी राज्यांतील कर्ते व शहाणे पुरुष हळूहळू नाहींसे होत गेले व मराठी राज्याचीं सूत्रें शेवटीं दुसऱ्या बाजीरावासारख्या कर्तृत्वहीन व नामर्द पुरुषाचे हातीं गेल्यामुळें मराठे लोक आपल्या स्वातंत्र्यास मुकले.

शुद्धिपत्र.

पृष्ठ.	ओळ.	अशुद्ध.	शुद्ध.
२२	२	मुलूख मरणसमयीं	मुलूख व मरणसमयीं
४५	२४	वटा	वाट
७२	११	नियंत्रिक	नियंत्रित
८१	१३	बहादुरभेंढा	बहादुरभेंड
१३१	२४	फ्रचांचा	फ्रेंचांचा
१५४	७	मत्यु	मृत्यु
१५८	९	कृष्णागड	कृष्णगड
२३८	२०	फोजद्दी	फौजद्दी
३१६	२४	सन १७१०	सन १७३०